रत्नागिरी, कुलाबा व ठाणें या जिल्ह्यांतील

# खोती-सत्ताप्रकार.

— लेखक —


जनार्दन वामन जोशी

बी. ए. एल्‌ एल्‌. बी.

वकील, रत्नागिरी.



2)·23151·N3
F9
)1544



एप्रिल १९२९

किंमत रुपये २-८-०

101544

SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY,
POONA 4.

FOR INTERNAL CIRCULATION

To be returned on or before the last date stamped below

17 JAN 1966

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-101544

रत्नागिरी, कुला[illegible] जिल्ह्यांतील

# खोती-सत्ताप्रकार.

खोती सेटलमेंट आक्ट सन १८८० चा मुं० आक्ट १ सर्व दुरुस्त्यांसह
व १८६५ चा मुं० आक्ट १, यांवरील ना. हायकोर्टाचे प्रसिद्ध
व अप्रसिद्ध ठराव, प्रसिद्ध सरकारी ठराव, इतिहास,
इत्यादि सर्व प्रकारच्या उपलब्ध माहितीनें भरलेलें,
प्रवेशिका, नियम, नमुने, विषयसूची,
ठरावसूची, अनुक्रमणिका,
यां ह.

— लेखक व प्रकाशक —

जनार्दन वामन जोशी बी. ए. एल् एल्. बी.
वकील, रत्नागिरी.

मुद्रक— नारायण विष्णु शितूत.
रत्नागिरी "सत्यशोधक प्रेस"

( सर्व हक्क लेखकानें स्वाधीन राखिले आहेत. )

एप्रील १९२९

किंमत रुपये ३-८-०

# संक्षिप्तें व त्यांचें स्पष्टीकरण.

अ० = अलाहाबाद माला, I. L. R. Allahabad series.
ई० अ० = इंडियन अपील्स, Indian Appeals series.
ई० पि. कोड = इंडियन पीनल कोड (फौजदारी कायदा).
क० = कलम.
क० = कलकत्ता माला, I. L. R. Calcutta Series.
क्रॉ० अ० नं० = क्रॉस अपील नंबर.
खो० आ० = खोती आक्ट (इंग्रजी, इ. स. १९१३) रा. रा. अ. ग. देसा
खो० स० = खोती सत्ताप्रकारासंबंधें रिपोर्टांचा गोषवारा.
(Government Selection No. 134—1873.)
ट्रां० प्रा० = ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी आक्ट.
दि० का० = दिवाणी कायदा (Civil Procedure Code.)
दु० अ० नं० = दुसरें अपील नंबर
नि० ता० = निकाल तारीख.
न्या० = न्यायमूर्ति.
पु० आ० = पुराव्याचा आक्ट (Evidence act)
प्रिं० ज० = प्रिंटेड जजमेंट (Printed Judgements)
फॉ० आ० = फॉरेस्ट आक्ट (जंगलाबाबद)
म० = मद्रास माला, I. L. R. Madras series.
मु० का० = मुदतीचा कायदा (Limitation Act)
मुं० = मुंबई माला, I. L. R. Bombay series.
मुं. लॉ. रि. = मुंबई लॉ रिपोर्टर (Bombay Law Reporter)
मुं० स० ग्या० = मुंबई सरकारी ग्याझेट.
मुं० हा० रि० = मुंबई हायकोर्ट रिपोर्ट्स.
मूर्स इं. अ. = मूर्स इंडियन अपील.
लँ० रे० कोड = लँड रेव्हेन्यू कोड (जमीन महसुलाचा कायदा).
ले० पे० अ० = लेटर्स पेटंट अपील.
स० ठ० = सरकारी ठराव.
सि० अ० नं० = सिव्हिल अपील नंबर.
सि० ज्यू० = सिव्हील ज्युरिस्डिक्शन अर्ज.

# प्रस्तावना.

खोतीचा विषय वरवर पाहाणाराला सोपा दिसतो खरा, परंतु तशी वस्तुस्थिती नाहीं. इतर कायदा जितका गहन आणि अभ्यासगम्य आहे, तितकाच खोतीचा कायदाही आहे. प्रांत विशिष्ट परिस्थितींशीं त्याचा संबंध असल्यामुळें त्याचेकडे सुशिक्षित समाजाकडून व अधिकारी वर्गाकडून जावें तितकें लक्ष जात नाहीं. कित्येक प्रसंगीं तर खोती कायद्याचें मर्म न कळल्यामुळें त्याचा जाणूनबुजून अगर न कळतां दुरुपयोग केला जातो. खोती ह्मणजे काय याची कल्पनाही नसतां त्यावरील कायद्याचे गहन प्रश्न चुटकीसारखे सोडविले जातात व त्यामुळें कित्येकप्रसंगीं खोतांच्या त्याचप्रमाणें कुळांच्या हक्कांची पायमल्ली होते. १९२५ सालीं तर खोती अजिबात नष्ट करावी असा प्रयत्न सुरू झाला व खोत आणि त्यांची रयत यांचेमध्यें कलह उत्पन्न झाला. या एकंदर परिस्थितींत खोती संबंधें विशेष रीतीनें अभ्यास करावा अशी जिज्ञासा उत्पन्न झाली व तेव्हांपासून आह्मीं उद्योगास लागलों.

खोती कायद्यासंबंधें रा. रा. अ. ग. देसाई बी. ए. एल् एल्. बी. हायकोर्ट वकील, यांनीं लिहिलेलें पुस्तक वाचलें, परंतु तेवढ्यानें समाधान झालें नाहीं. गेल्या १५।१६ वर्षांत कायद्यांत काय काय फेरबदल झाले आहेत, खोती कायदा कसा अस्तित्वांत आला वगैरे संबंधें उपलब्ध असलेलीं पुस्तकें, लेख, रिपोर्ट वगैरे वाचले व जसजशी माहिती मिळत गेली तसतशी ती टांचून ठेवण्याचा क्रम चालू ठेविला. अभ्यासांतील प्रगति बरोबरच खोत व रयत यांना आपल्या स्वतःच्या हक्कांची योग्य जाणीव असणें आवश्यक आहे असें वाटून त्याकरितां आपण कांहीं तरी प्रयत्न करावा अशी इच्छा उत्पन्न झाली.

प्रथम केवळ अभ्यास या दृष्टीनें चालविलेल्या प्रयत्नांचें रूपांतर पुस्तक लेखनांत झालें. पुस्तक लेखनाचें जबाबदारीचें काम आपल्या हातून कितपत झेपेल अशी शंका होतीच; परंतु प्रयत्न न सोडतां कितपत जमतें तें पहावें, या बुद्धीनें उद्योगास लागलों. उपलब्ध असलेली सर्व माहिती मिळाल्यानंतर खोतीसंबंधें सरकारी अप्रसिद्ध ठरावही वाचावे व त्यांचाही समावेश पुस्तकांत करावा, अशी इच्छा उत्पन्न झाली व तशी परवानगी मिळावी ह्मणून मुंबई सरकारकडे अर्जही केला. परंतु सरकारनें, रा० रा० देसाई हे लवकरच आपले पुस्तकाची ताजी आवृत्ति काढणार असल्यामुळें परवानगी देण्याचें कारण दिसत नाहीं, असें ह्मणून मजला परवानगी देण्याचें नाकारलें. परवानगी न मिळाल्यामुळें निरुत्साह होऊन पुस्तक लेखनाचा विचार सोडून द्यावा असें वाटूं लागलें, परंतु कांहीं खोत मित्रमंडळीकडून विशेष प्रोत्साहन मिळाल्यामुळें पुन्हां उमेद आली व प्रयत्न चालू ठेविला. पुस्तक अप्रसिद्ध ठरावांच्या दृष्टीनें थोडें अपुरें राहिलें आहे खरें, परंतु या बाबतींतहि स्वप्रयत्नानें व मित्रमंडळीच्या मदतीनें जी माहिती लागली ती दिली आहे.

कायद्याचें पुस्तक मराठींत लिहिणें ही गोष्ट सोपी नाहीं; कारण का[य]द्याची भाषा, पारिभाषिक शब्द वगैरे सर्व इंग्रजींत असल्यामुळें ती अर्थभंग होऊं [न देतां] मराठींत आणणें फारच धोक्याचें व अवघड असतें. तरीही धिटाईनें प्रयत्न [केला] असून बहुतेक सर्व ठिकाणीं शंका राहूं नये म्हणून इंग्रजींतील अवतरणेंही [दिलीं] आहेत. चुका राहूं न देण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे; परंतु अशा का[यद्या]च्या पुस्तकांत पुष्कळच चुका राहिल्या असण्याचा बराच संभव आहे. त्याबद्दल [वाचक] मजला क्षमा करितील व त्या चुका माझे नजरेस आणितील अशी आशा आहे.

पुस्तक लिहिण्याचें मनांत आणल्यापासून प्रोत्साहनाचा मुबलक पुरवठा [वेळो]वेळीं चिपळुण तालुका खोती सभेचे चिटणीस रा. रा. वासुदेव परशुराम केत[कर] यांचेकडून झाला; इतकेंच नव्हे तर प्रकाशनाचे कामीं द्रव्यसाहाय्यही त्यांनीच दि[लें] याबद्दल त्यांचा मी किती आभारी आहे हें लिहिणेंच शक्य नाहीं. त्यांचेप्रमाणें ठाण्याचे सुप्रसिद्ध वकील रा. रा. परशुराम आबाजी भट बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं कुलाबा व साष्टी भागांतील खोतीसंबंधें साधनसामुग्री पुरवून व आपल्या ज्ञानाचा फायदा देऊन उपकृत केलें आहे. पुस्तक लेखनाचें काम जितकें अवघड आहे तितकेंच प्रकाशनाचेंहि अवघड असतें. माझ्यासारख्या अल्पबुध्दीच्या लेखनांत कित्येकवेळां शब्दप्रयोग चुकीचे झालेले असतात, वाक्यरचना दुर्बोध हेते, किंबहुना इंग्रजीचें मराठींत भाषान्तरहि चुकतें. अशा गोष्टींत लक्ष घालणें लेखनापेक्षांही कटा[क्षानें सांभा]ळवाणें असतें. असें असतांही या कामीं दीर्घोद्योगानें ति. रा. निळकंठ विनायक शेवडे बी. ए. यांनीं जें अमूल्य साहाय्य दिलें त्याबद्दल व प्रुफें तपासणीचे कामीं वगैरे त्यांची जी मदत झाली त्याचेबद्दल मीं त्यांचा अत्यंत ऋणी आहे. याशिवाय पुष्कळांचें साहाय्य झालें आहे, परंतु त्यांचे व्यक्तीविषयक आभार मानणें अशक्य आहे. ज्यांचे ज्यांचे साहाय्य मिळालें आहे त्यांचा त्यांचा मी फार आभारी आहे. पुस्तक प्रकाशनाचे कामीं सत्यशोधक संस्थेचे व्यवस्थापक रा. रा. द. ह. लिमये बी. ए. एल् एल्. बी. यांचेही आभार मानणें जरूर आहे. छापखान्याकडे इतर कामांचा भार येऊन पडल्यामुळें ठरावाबाहेर थोडा कालावधी लागला तरीही, उत्साहानें उत्तम प्रकारची छपाई करून दिली याबद्दल त्यांचा व त्यांचे बरोबरच छापखान्यांतील सर्व कामकरी वर्गाचाही मी आभारी आहें.

शेवटीं त्या जगन्नियंत्या श्री. रामानें प्रेरणा केली व हातीं घेतलेलें कार्य तडीस नेलें याबद्दल त्याचे अनंत उपकार मानून, असेच वेळोवेळीं बुद्धि व उत्साह देण्या-बद्दल त्याची प्रार्थना करितों.

ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु !

वर्षप्रतिपदा, }
शके १८५१. }

ज. वा. जोशी.
बी. ए. एल् एल्. बी. वकील - रत्नागिरी.

# अनुक्रमणिका.

(सन १८८० चा मुं० आक्ट १.)


खोती सत्ताप्रकार प्रवेशिका. ... ... ... I

## भाग १.

| कलम. | प्रथमारंभींचे नियम. | पान. |
|---|---|---|
| १ | लहान सरनामा. व्याप्ति ... ... ... | १ |
| २ | सन १८६५ च्या मुंबईच्या १ ल्या आक्टाचीं कलमें ३७ व ३८ हीं रद्द करणें. ... ... ... ... | ९ |
| ३ | अर्थाचें कलम. "गांव," "खोत," "खोतकी," "जमा," "हक्कवाला खातेदार." ... ... ... | १५ |
| | "धारेकरी," "कच्चा धारेकरी," "निरंतरचें कूळ," "धान्याची जमीन," "खोती जमीन," "रिकार्डिंग कामगार," "मुंबईच्या जमीन महसुलाच्या" कायद्यांत व्याख्या केलेल्या संज्ञा. ... ... | १६ |

## भाग २.

खोत व त्यांचे कनिष्ठ धारणकरणारे यासंबंधीं साधारण ठराव.

खोत.

| | | |
|---|---|---|
| ४ | खोताचे गांव जमा भरतील तोंपर्यंत चालतील. ... ... | ४५ |

कनिष्ठ धारण करणारे.

| | | |
|---|---|---|
| ५ | कोणत्या धारण करणारास "निरंतरचें कूळ" समजावें. ... | ५२ |
| ६ | जेव्हां जमीन अन्यायानें दुसऱ्यास प्राप्त करून दिली असेल तेव्हां 'निरंतरची कुळ वहिवाट' ... ... ... | ६२ |
| ७ | हक्कवाले खातेदार यांचे सत्ताप्रकार चालविणें. ... ... | ६७ |
| ८ | सामान्य कूळ. ... ... ... ... | ७५ |
| ९ | कोणते हक्क दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगे आहेत ... .. | ८३ |
| १० | हक्कवाल्या खातेदारांच्या जमिनीचा राजिनामा त्या गतकुळी होणें किंवा खालसा होणें. ... ... ... | ९९ |

खोतानीं हक्कवाल्या खातेदारांचे हक्क देणें.

| | | |
|---|---|---|
| ११ | खोतांनीं हक्कवाल्या खातेदारांचे हक्क देणें. ... ... | ११५ |
| १२ | देणगी दिल्याचा लेख. ... ... ... | ११७ |
| १३ | रद्द. ... ... ... ... ... | ११९ |

थळाचे वसुलाबद्दल.

१४ ज्या जमिनीची लावणी करण्यास खातेदार कूळ हयगय करील त्या जमिनीचें थळ ... ... ... ... १२०

हिशोब.

१५ खोतानें हिशोब ठेवावे. आणि ज्यावेळेस लागतील त्यावेळेस ते हजर करावे आणि लेखी पावत्या द्याव्या. ... ... ... १२२
दंड ... ... ... ... ... १२३

## भाग ३.

सर्वे अँड सेटलमेंट,–सेटलमेंटाचे कागदपत्र.

१६ खोती गावाचे सेटलमेंटाचें पत्रक तयार करणें. ... ... १२८
१७ दुसऱ्या कागदपत्रांत काय दाखल असावें, हक्कवाल्या खातेदारांचा थळें, आणि खोतकीचे विभाग झाले नसतील तेव्हां, सहभागिदारांचे परस्परांचें हक्क, किंवा खोतकीचे विभाग झाले असतील तेव्हां, प्रत्येक भाग निरनिराळा मानावा.... ... ... ... १४७

कागदपत्रांचा ताबा आणि त्यांची सुधारणाः तक्रारींचा निकाल करणें.

१८ सर्वे सेटलमेंट पुरें झाल्यावर कलेक्टरनें कागदपत्र ठेवावे. पक्षकारांच्या लेखी कबुलीनें कागदपत्रांत सुधारणा करण्याचा रिकार्डिंग कामगाराचा अधिकार. आणि दुसऱ्या कांहीं बाबतींत अधिकार ... ... १५८
१९ रिकार्डिंग कामगारानें तक्रारींचा निकाल करणें. ... ... १६५
पक्षकारांस त्यांचे ह्मणणें ऐकून घेण्याबद्दलची नोटीस आणि संधि द्यावी. १६६
विशेष ठराव. ज्या कोणत्याहि संबंध असलेल्या पक्षकारांस अशी कोणतीही नोटीस किंवा संधि देण्यांत येणार नाहीं त्यानें करावयाचा इलाज. ,,
२० कांहीं बाबतींत रिकार्डिंग कामगाराचा निकाल अखेरचा असणें ... १६९
अशा निकालावर गव्हर्नर–इन–कौन्सिल यांजकडे अपील चालेल. चालू दिवाणी कामांचा बचाव. ... ... ... ... ... १७०
२१ रिकार्डिंग कामगाराचा निकाल अखेरचा नसेल तेव्हां तो फक्त कोर्टाच्या हुकूमनाम्यानेंच रद्द होईल.... ... ... १७३
दावे करण्यास अटकाव करण्याकरितां विशेष ठराव... ... १७४
२२ सरकारावर किंवा सरकारी अंमलदारांवर दावा करण्याची मनाई ... १८९

## भाग ४.

या आक्टा प्रमाणें केलेल्या सर्वे सेटलमेंटांचे वहिवाटी विषयीं

२३ या भागाचे ठराव केव्हां लागू होतील याविषयीं ... ... १९२

खोतांची जमा.

२४ जमा कधी आकारावी; कांहीं मुदतीपर्यंत रकम ठरविणें ... १९४

वहिवाटदार खोताविषयीं.

२५ खोतांच्या कबुलायती रद्द करणें ... ... ... १९६
२६ "वहिवाटदार खोताची" नेमणूक ... ... ... २०२
२७ वहिवाटदार खोतास कसें नेमावें ... ... ... २०६
२८ कलेक्टरानें केलेल्या नेमणुकीबद्दल किंवा निवडणुकीबद्दल तक्रार चालणार नाहीं; परंतु खोतांमधील वहिवाटींचे हक्का विषयींच्या फिर्यादीस हरकत होणार नाहीं ... ... ... २१२
२९ वहिवाटदार खोतांचा दाखला ... ... ... २१४
३० जेव्हां सह भागिदार नाहींत तेव्हां वहिवाटदार कोण... ... २१५
३१ वहिवाटदार खोताचा अनन्यग्राह्याधिकार ... ... २१६
३१ अ वहिवाटदार खोतांचें कामें व अधिकार सोंपवून देणें ... २३२

विभक्त झालेले भागिदार.

३२ विभक्त झालेले भागिदार हे आपल्या निरनिराळ्या विभागाबद्दल निरनिराळे जबाबदार आहेत ... ... ... २३३

हक्कवाल्या खातेदारांचीं थळें.

३३ हक्कवाले खातेदारांनीं द्यावयाचे थळाचा प्रकार आणि रकम ... २३६
" कानु १–देण्याचा प्रकार नोंदींत लिहिणें ... ... २४४
" कानु २–कबुलायतीनें निश्चित केलेल्या ह्मणून कोणत्या नोंदी कशा नोंदाव्या. पिकाचा हिस्सा कबुलायतीनें निश्चित केलेला ह्मणून नोंदावयाचा नाहीं. "पक्षकार" या शब्दाचा अर्थ ... ... २४८
कुळाबरोबर केलेल्या कबुलायतींत वहिवाटदार खोत खोतकींतील भागिदारास किंवा भागिदारांस कोठवर बांधूं शकतो ... २४९
कानू ३–कबुलायतीनें ठरविलेल्या ऐवजाच्या नोंदी शिवाय करून इतर नोंदी कशा निश्चित कराव्या ... ... ... २५३
पिकाचे हिस्शांची इयत्ता ... ... ... २५४
कानु ४–सेटलमेंटच्या वेळीं नोंद करण्याची राहिल्यास किंवा नोंद लागू होण्याची बंद झाल्यास नोंदी करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार ... ... ... ... २५६
किंवा नोकरीच्या विशेष शर्तीवर धारण करणाऱ्या कुळानें अशी नोकरी करण्याचें बंद केल्यास नोंदी करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार. २५७
किंवा ठरलेला ऐवज सर्वेचा आकार व लोकलफंड सेस व त्यावरील दोंकडावळ यांच्या रकमे इतका नसल्यास नोंदी करण्याचा किंवा बद-

लण्याचा अधिकार. मात्र सरकारानें जर सदहू शेंकडावळीची सगळी रक्कम किंवा तिचा अंश भरला, तर त्या मानानें ऐवज कमी करण्याचा अधिकार आहे. .... ... ... ... २५७
किंवा जमिनीस नुकसान झाल्यामुळें आकाराची सूट दिली असल्यास अगर कमी केला असल्यास, नोंदी करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार ... ... ... ... २५८
" कानु ५–पिकाच्या हिश्शाची मोबदला–किंमत केव्हां नोंदतां येईल, आणि अशा नोंदीचा परिणाम. "मोबदला–किंमत" ह्या संज्ञेचा अर्थ, आणि ती कशी ठरवावी. ... ... ... २६४
राबाच्या कारणासाठीं उपयोग केल्यास वगैरे जमिनीसंबंधानें विशेष ठराव. मोबदला–किंमत तपासलेल्या सर्वे सेटलमेंटाच्या वेळीं तपासली जाण्यास पात्र आहे. ... ... ... ... २६५
३४ हक्कवाले खतेदारांचीं यळें कशीं आणि केव्हां यावीं... ... २७०

.बाबी वगैरेविषयीं.

३५ सर्व बाबी, वगैरे काढून टाकणे .... ... ... २७१

लोकलफंड सेस.

३६ लोकलफंड सेसाविषयीं खोताची पात्रता. धारेकरी व कच्चे धारेकरी कितपत सेस देण्यास पात्र आहेत. दुसरे कनिष्ठ धारण करणारे बाब देण्यास पात्र नाहींत. ... ... ... २७३

## भाग ५.

### किरकोळ.

३७ हल्लींचीं सर्वे सेटलमेंटें बहाल केलीं.... ... ... २७५
३८ हल्लींच्या सेटलमेंटाचे बदला नवीं सेटलमेंटें करितां येतील. ... २७६
३९ सन १८८९ चा मुंबईचा जमीनमहसुलाचा कायदा खोती गांवांस कितपत लागू होणार नाहीं. ... ... ... २७६
४० गव्हर्नर–इन्–कौन्सिल यांनीं कानू करणें. ... ... २८९
४१ लागवड न केलेल्या जमिनींत राखलेलें जंगल करण्याचा सरकारास अधिकार आहे. ... ... ... ... २९०
४२ सदरील शेवटच्या कलमाअन्वयें केलेलें जें राखींव जंगल त्यास सन १८७८ चा हिं० जंगलाचा आक्ट यांतील ठराव लागू होतील. ३०६
परिशिष्ट– ... ... ... ... ३०८
अपेंडिक्स–सरकारी कानु– ... ... ... ३०९
नमुने... ... ... ... ... ३३१

# खोती-सत्ताप्रकार-प्रवेशिका.

"खोत" या शब्दानें सह्याद्रीच्या पश्चिमेस अरबी समुद्राच्या किनाऱ्या-पर्यंतच्या ठाणें, कुलाबा व रत्नागिरी या जिल्ह्यांतील गिरिकंदरें फोडून, दगडांचा दोर काढून, कोंकणच्या भूप्रदेशाला शोभिवंत करणाऱ्या मानव जातीचें चित्र डोळ्या पुढें उभें राहातें. कोह् = डोंगर, कन् = फोडणें, या फारशी शब्दांवरून ज्या प्रदेशाला डोंगरांनीं फोडलेलें आहे त्यास 'कोंकण' म्हणतात. अशा अद्रिमान् प्रदेशाला ज्यांनीं स्वकष्टानें सजविलें, ज्यांनीं मातृभूमीकरितां आपलें तन-मन-धन अर्पण केलें, अशा इसमांचा निर्देश खोत या शब्दानें होतो. खोत या शब्दाची खरी उत्पत्ति काय असावी याबद्दल साधार माहिती उपलब्ध नाहीं. परंतु "खेत" = क्षेत्र, जमीन, या हिंदुस्थानी शब्दावरून "खेती = शेती करणारा तो "खोत"; अगर "खुद् = मालक" या फारसी शब्दापासून खोद्, खोत (मालक), असा शब्द रूढ झाला असावा असा तर्क आहे. खोत या शब्दाचा अर्थ प्रथम मोल्सवर्थसाहेबांनीं सन १८३१ मध्यें आपल्या शब्द-कोशांत "गांव भाड्यानें करणारा", "सरकार-करतां गांवचा वंशपरंपरा वसूल करणारा अधिकारी" असा केला. परंतु हा खोत या शब्दाचा खरा अर्थ नाहीं, खोत हा केवळ वसुल्या नसून वरिष्ठधारणकरणारा, बहुतांशीं जमिनीचा मालक व वंशपरंपरा वसूल करण्याचा हक्क असणारा इसम आहे, असें आतां कायद्यानें सिद्ध झालें आहे. (पुढें पान १९ ते २८ पहा).

खोत ही संस्था कशी व केव्हां अस्तित्वांत आली, याबद्दल ऐतिहासिकदृष्ट्या समाधानकारक संशोधन अद्याप झालेलें नाहीं. परंतु इतकें खरें कीं, खोत ही संज्ञा ४००।५०० वर्षांपूर्वीपासून अस्तित्वांत आलेली असून जुन्यांत जुनी उपलब्ध सनद विजापूरच्या आदिलशाहीच्या काळांतील आहे. परंतु तोंपर्यंत खोत ही संज्ञा रूढ झालेली असल्यानें खोती त्याचे पूर्वीच केव्हां तरी सुरू झाली असावी यांत शंका नाहीं, खोतीचा इतिहास पाहण्यापूर्वीं कोंकणच्या इतिहासाचें थोडक्यांत निरीक्षण करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

## कोंकणचा इतिहास.

कोंकणच्या निरनिराळ्या भागांत जुनीं लेणीं असून त्यांवरून इतिहासास प्रारंभ होतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. साष्टी तालुक्यांत कान्हेरी, कोंडिवटें, जो-गेश्वरी, मंडपेश्वर इत्यादि, घारापुरी बेटांत एलिफंटालेणीं; कोंडाणें, चंदनसार; कुलाबा जिल्ह्यांत पाल, कुडा; रत्नागिरी जिल्ह्यांत चिपळूण, खेड, दाभोळ, संगमेश्वर, वाव्हाने, वेलगांव, वाडेपडेल इत्यादि प्रसिद्ध लेणीं असून त्यांवरून कोंकणच्या इतिहासाला सुरवात इ० स० पूर्वीं २०० पासून होते असें अनुमान निघतें. महाक्षत्रप राजा

रुद्रदमन याच्या राज्याच्या विस्तारांत पहिल्या शतकांत कोंकणचा भाग येत असून त्यावेळीं कोंकण किनाऱ्यावरील बंदरें प्रसिद्ध होतीं. त्यानंतर आंध्रभृत्य (२।३ शतक), चित्रकूट (४।५ वें शतक), चालुक्य (६ वें शतक), व मौर्य (७ वें शतक) या घराण्यांच्या राजांकडे कोंकणचा भाग होता. नववे शतकाचे सुमारास मालखेड-च्या राठोड घराण्याकडे कोंकणचें राज्य होतें व त्यावेळीं ठाणें ही कोंकण प्रांताची राजधानी होती. बाराव्या शतकाचे सुरवातीस देवगिरीच्या यादवांनीं कोंकणप्रांत जिंकून आपलेकडे घेतला, परंतु तो त्यांचेकडे फार दिवस टिकला नाहीं. गुजराथ-कडील चालुक्य राजांनीं तो पुन्हां आपले अंमलाखालीं आणिला. पुढें बाराव्या शत-काच्या अखेरीस कोंकण प्रांत चाकण, रायगड, पन्हाळा, कुडाळ आणि सोंडा येथील लहान लहान मराठी राजांच्या अंमलाखालीं आला. तोच पुढें १५ व्या शतकाचे सुरवातीपासून मुसलमानी अंमलाखालीं गेला. दक्षिण महाराष्ट्रांत ब्राह्मणी राज्य इ. स. १३४७ च्या सुमारास स्वतंत्र झाल्यानंतर दक्षिण कोंकण त्यांचा समुद्र-किनारा असल्यामुळें त्यास विशेष महत्व येऊन दाभोळ हें त्यावेळचें अगदीं मुख्य बंदर बनलें. इ. स. १४२९ चे सुमारास ब्राह्मणी राजा मलिक-उल्-तुजार यानें या प्रांतावर स्वारी करून लहान लहान राजांस आपल्या अंमलाखालीं आणलें. परंतु हा अंमल फार दिवस टिकला नाहीं. इ. स. १४८४ च्या सुमारास अहंमद-नगरच्या मलिक अहंमदशहानें कोंकणावर उत्तरेकडून स्वारी केली, पुष्कळसे किल्ले सर केले आणि आपलें राज्य दक्षिण कोंकणापर्यंत वाढविलें. इ. स. १५०० च्या सुमारास बहामनी राज्याचे विभाग झाल्यानंतर दक्षिण कोंकणचा भाग विजा-पुरच्या आदिलशहाकडे आला. इ. स. १६५८ च्या सुमारास शिवाजीनें दक्षिण कोंकण आपले अमलांत आणण्यास सुरवात केली व हळूहळू जुने किल्ले दुरुस्त करून, नवीन बांधून त्यानें आपली सत्ता बसविली. संभाजीच्या वधानंतर इ. स. १६९० च्या सुमारास सुवर्णदुर्ग आणि अंजनवेल हे प्रांत जंजिऱ्याचे शिद्दीचे ताब्यांत गेले; परंतु १६९८ चे सुमारास ते मराठ्यांच्या आरमाराचा मुख्य कानोजी आंग्रे यानें आपणाकडे घेतले व समुद्रकिनाऱ्यावर आपलें वर्चस्व कायम ठेविलें. इ. स. १७२८ मध्यें कानोजी आंग्रे मरेपर्यंत दक्षिणकोंकणाच्या समुद्रकिनाऱ्याचा तोच राजा होता असें म्हणण्यास हरकत नाहीं, कारण इंग्रज, डच, पोर्चुगीज, सिद्दी वगैरे कोणाची-ही त्याचेपुढें डाळ शिजत नव्हती. त्याचेनंतर आंग्रें यांचें घराण्यांत दुही उत्पन्न झाली. परंतु मराठ्यांचा अंमल कमी झाला नाहीं. कोंकण प्रांत मराठेशाहींत पेशव्यांच्या अंमलाखालीं इ. स. १८१८ पर्यंत चालला व त्यानंतर इंग्रजी अंमलाखालीं आला.

## जमीन महसूल पद्धति.

कोंकणच्या जमीनमहसुलाची पद्धति थोडीफार ब्राह्मणी राज्यापासून (इ. स. १३४७) सुरवात झाली असावी; परंतु कागदोपत्रीं पुरावा इ. स. १५०२

पासून विजापूरच्या आदिलशाहीच्या काळापासूनचा उपलब्ध आहे. खोत ही संस्था तेव्हांपासून अस्तित्वांत आहे यांत शंका नाहीं. या वेळीं भात जमिनीवर एकंदर उत्पन्नाचा एकपष्ठांश बहुतेक ऐनजिनसांत व कांहीं नक्त असा घेण्यांत येई. विजापूरच्या या महसूल–पद्धतीप्रमाणें जमिनी मोजलेल्या नसून केवळ पहाणीनें महसूल बसविण्यांत येत असे. पहाणी दरसाल करण्यांत येत असल्यानें जमिनदारांना कर डोईजड होत नसे व त्यामुळें देशाची हळूहळू भरभराट होत चालली. वर्कस जमिनीचे बाबतींत "औतबंदी" पद्धत असून प्रत्येक नांगरावर थोडाफार कर होता. पडजमिनी अगर गांवें यांचे बाबतींत ती सरकारी अंमलदारांना वाटेल त्या रीतीनें कसणुकीकरितां देण्याची मुभा होती. व त्यामुळें अशा जमिनी फार सवलतीनें मिळत असत. प्रत्येक जमीन धारणकरणारा हा मिरासदार अथवा धारेकरी गणला जात असे व ऐनजिनसी बेताचा कर घेण्यांत येत असे. जुलमी कर कोणत्याही प्रकारचे नसत.

यानंतर जमीन महसुलाचे पद्धतींत विशेष महत्वाचे फेरफार शिवाजीचे कारकीर्दींत दादोजी कोंडदेव व आण्णाजी दत्तो यांचे सल्ल्यानें झाले. देशावर त्या वेळीं चालू असलेली मलिकंबराची महसुलपद्धति स्वीकारण्यांत आली. व भात जमिनी मोजण्यास सुरवात झाली. बिघा (सु० ४०० चौ. काठ्या) क्षेत्रांतील उत्पन्नाचे मानानें कर आकारण्यांत येई व त्याचें प्रमाण सु० शेंकडा ४० असे. जमिनीच्या प्रतीही ठरविण्यास सुरवात झाली. वर्कस जमिनींचें क्षेत्र न पाहतां नांगरावरच त्याची मोजदाद होई व दर नांगरापाठीमागें महसूल घेण्यांत येई. बागायत जमिनीवर अंदाजी उत्पन्नावर एकषष्ठांश कर कमालदराप्रमाणें बसविण्यांत येत असे. इतर कोणताही कर वसूल केला जात नसे. दोन–पंचमांश कर जरी फार दिसला तरी बिघ्याचेंप्रमाण फार मोठें धरण्यांत येत असल्यामुळें कराचें प्रमाण उत्पन्नाचे एक–तृतीयांश इतकेंच पडे. संभाजीच्या कारकीर्दींत अण्णाजी दत्तोनें घालून दिलेली ही पद्धत मोडली व कराचें प्रमाण एक द्वितीयांशापासून एक तृतीयांशपर्यंत वाढविण्यांत आलें; कराचें प्रमाण डोईजड झाल्यानें जिकडे तिकडे अव्यवस्था झाली. राजारामाचे कारकीर्दींत त्यानें बरीच सुधारणा करण्याचा प्रयत्न केला, परंतु अंजनवेल व सुवर्णदुर्ग हे प्रांत सिद्दीच्या अंमलांत गेल्याकारणानें त्याला कांहीं करितां आलें नाहीं. सिद्दीच्या अमलांतील मुख्य फरक म्हणजे खंडीस तीन मण या प्रमाणांत कर घेण्यांत येऊन शिवाय दर बैलामागें सुमारें दीड रुपया कर घेण्यांत येऊं लागला. बागायताची नवीन पाहणी करून कर घेण्यास सुरवात झाली. वसूल करणाऱ्या अंमलदारांच्या पगाराचा बोजा महसुलाचे उत्पन्नांतूनच घेण्यांत येऊं लागला. आंग्रे यांच्या कारकीर्दींत करानें प्रमाण फार वाढलें व पुष्कळ प्रकारचे निरनिराळे मापवर्तोळा, शेर वर्तोळा, किल्ले वर्तोळा, उंदीर खाज, फसकी, कसरबावती,

कोटीभाडें, खरेदी, हकदारी, पंचोत्रा, मुशाहिरा ( salary cess ), गळेपट्टी ( stable cess ), पोतदारी, बट्टा, तूपपट्टी, पेंढापट्टी, सादिलवार पट्टी, एकसाली पट्टी, महाल खर्च इ० इ० जुलमी कर बसविण्यांत आले. (पुढें पान २७१।२७२ वरील माहिती पहा.) इ. स. १७५६ मध्यें आंग्रयांचा अम्मल कमी झाल्यानंतर कोंकणप्रांत पेशव्यांकडे आला, व नाना फडणवीसानें १७८० मध्यें जमिनीची मोजणी करण्यास सुरवात केली. ही मोजणी कल्याणपर्यंतच येऊन पोंचली. परंतु पुढें १७८८ ते १८०२ पर्यंत परशुरामपंत रामचंद्र परांजपे व रघुनाथपंत त्रिंबक वर्वे या दोघां मामलतदारांनीं सुवर्णदुर्ग, अंजनवेल, रत्नागिरी आणि विजयदुर्ग या मामल्यांची पाहणी केली. पेशव्यांची पाहणी करण्याची पद्धत फारच शिस्तीची होती. व तिचा उपयोग अद्यापही होत असल्यामुळें त्याबद्दल योग्य व सविस्तर माहिती असणें आवश्यक आहे.

## पेशवे पद्धति.

" पहाणखडा " हा कागद अगदीं प्रथम तयार करण्यांत येई. त्यांत प्रत्येक शेताचें नांव, एकंदर क्षेत्र, कीर्दसार जमीन किती व खराबा किती याची माहिती, शेत्याचें अथवा जमीन धारण करणाराचें नांव, मागील पहाणींत चालू पहाणीचे वेळीं कांहीं फरक झाला असल्यास तो व प्रत्यक्ष लागवडींत जमीन किती बिरे, किती पांड, व किती काळ्या हें नक्की नमूद करीत व अशा रीतीनें मोजलेल्या जमिनीवर महसूल किती बसविला हें लिहीत. पहाणखड्याचे शेवटीं एक तेरीज करून त्यांत प्रत्येक शेत्याचे ताब्यांत जमीन किती व आकार येणें किती याची एकंदरी केलेली असे. ज्या ठिकाणीं जमीन पड असून कोणाच्याही ताब्यांत नसे त्या ठिकाणीं ती मोत्रम खराबा म्हणून राखून ठेवण्यांत येई (पुढें पान ३५६ पहा.). पहाणखड्यांवरून बोटखत तयार करीत. यामध्यें प्रत्येक इसमाचें निरनिराळें खातें असून त्यांत त्याच्या पहाणखड्यांत नमूद केलेल्या सर्व जमिनी एकत्र केल्या जात. बोटखताचा मुख्य हेतु, प्रत्येक खातेदाराकडे किती जमिनी आहेत व तो देणें काय, हें एके ठिकाणीं दिसावें असा होता. वसुलाचे बाबतींत बोटखताचा उपयोग फार होत असे. पहाणखड्यांवरून तेरीज शेतगणा व तेरीज कुळवडणी असे दोन कागद तयार करण्यांत येत ( पान ३३० पहा ). पहिल्यांत शेतांची नांववार गणती व दुसऱ्यांत खातेदार कुळांचीं नांवें व एकंदर त्यांचेकडून येणें, नमूद करण्यांत येई. वर नमूद केलेले चार कागद भातजमिनीचे बाबतींत केले जात. वर्कस जमिनीची मोजदाद ठोकळमानानें नजर मोजणीनें करण्यांत येई. व त्यांचें बाबतींत "वर्कस-नजर माजना" व "वर्कस बोटखत" असे दोन कागद तयार केले जात (पान ३२८।३३० पहा). ओसाड जमिनीची मोजणी अगर नोंद करीत नसत. अशा रीतीनें कागद तयार झाल्यावर एक सरहिशेब म्हणून कागद तयार करण्यांत येऊन त्यांत

त्या गांवचा प्रत्येक जातीचा गल्ला किती येणें, हें दाखविण्यांत येई. अशा रीतीनें गांववार मोजणी करण्यांत आल्यानंतर शेवटीं सर्व जमिनी दाखविल्या, कांहीं चूकभूल झालेली नाहीं, अशा तऱ्हेचा कतबा गांवचा खोत, व महार यांचे सहीचा घेण्यांत येई. अखेर प्रत्येक प्रांतवार "जावता देहझाडा" झणून एक कागद तयार करून प्रत्येक गांववार येणें किती, गांव खोती, सरकारी अगर कसें तो प्रकार, व खोती वगैरे असल्यास खोत कोण त्याचे नांव, याप्रमाणें माहिती, देण्यांत येत असे. अशा रीतीनें गांववार टरविलेलें उत्पन्न वसूल करण्याची जबाबदारी प्रत्येक गांवच्या खोतावर टाकण्यांत येई, व त्याचे मोबदला कुळांकडून मिळेल तो नफा घेण्याची खोतास मोकळीक असे. महसुलांत चढ करण्यांत आल्यास तोहि खोतासच द्यावा लागे. खोत कुळांकडून नवीन जमिनी लागवडीस आणून वगैरे प्रकारानें आपलीही भर करीत. खोताचा ऐनजिनसी महसूल कोठें तरी "फडावर" अगर दारवामावर नेऊन भरणा करावा लागे. पेशव्यांची ही पद्धत चांगली होती, तथापि कासाई सारखे कर घेण्यांत कोणत्याहि प्रकारें बंदी नसल्याकारणानें कांहीं ठिकाणीं ते घेतले जात. कांहीं असलें तरी खोत आणि कुळें यांचे संबंध फारच सलोख्याचे असल्यानें कोणाचा कोणाला त्रास वाटत नसे.

## कोंकणचे प्रांत–विभाग.

पेशव्यांकडून ब्रिटिशांकडे कोंकणप्रांत आला त्यावेळीं त्याचे सांकशी, अवचितगड, राजपुरी, रायगड, सुवर्णदुर्ग, अंजनवेल, रत्नागिरी, विजयदुर्ग आणि मालवण असे तालुके होते. आणि प्रत्येकांत ५ ते १२ पर्यंत महाल, टप्पे, मामले अथवा तर्फ असत. या शिवाय याच्या उत्तरेस साष्टी आणि कर्नाळा हे दोन भाग होतेच. साष्टी बेट आणि कारंजा हे भाग इ. स. १७७४ मध्यें पेशव्यांकडून ब्रिटिशांनीं जिंकून घेतले असून, बाणकोट (फोर्ट व्हिक्टोरिया) व त्याचे जवळचीं ९ खेडीं सन १७५५ सालींच पेशव्यांनीं ब्रिटिशांस दिलीं व तेव्हांपासून त्यांचेवर ब्रिटिशांचा अम्मल होताच. सन १८१७ सालीं खडकीच्या लढाईत बाजीरावाचा पराभव झाल्यानंतर दक्षिण कोंकणचा बाकीचा भाग झणजे बाणकोटच्या खालचा भाग ब्रिटिश अंमलाखालीं आला, व तो मालवणच्या रेसिडेंटाच्या ताब्यांत देण्यांत आला. परंतु ही व्यवस्था फार दिवस टिकली नाहीं. सन १८१९ सालीं बाणकोटच्या कलेक्टरकडे सर्व सत्ता देण्यांत आली. परंतु पुढच्याच वर्षीं तेथील ठाणें उठवून कलेक्टरचे ठाणें रत्नागिरीस आणण्यांत आलें. कोंकणचे बाकीचें बाणकोटच्या उत्तरेचे सांकशी, राजपुरी, रायगड हे भाग इ. स. १८१७ च्या पुण्याच्या तहानें ब्रिटिशांच्या अंमलाखालीं आले. इ. स. १८२० मध्यें सध्यां कुलाबा जिल्ह्यांत मोडत असलेला हा भाग रत्नागिरी जिल्ह्यांत सामिल करण्यांत आला व त्यास दक्षिण कोंकणचा उत्तर भाग झणत. पुढें इ. स. १८३० सालीं

रत्नागिरीचा भाग सब्कलेक्टरेट केला व ठाणें मुख्य जिल्हा केला. त्या वेळीं सांकशी राजपुरी, रायगड, हा भाग ठाणें जिल्ह्यांत सामिल करण्यांत आला. इ. स. १८३३ सालीं ठाणें आणि रत्नागिरी असे दोन जिल्हे करण्यांत आले. इ. स. १८४० सालीं आंग्रे यांचें संस्थान, उंदेरी आणि रेवदंडा; ह्मणजे सध्यांचा अलिबाग व रोह्याचा कांहीं भाग, खालसा केल्यानंतर त्यावर पोलिटिकल सुपरिंटेंडेंट या नांवाचा अधिकारी नेमला. १८४४ सालीं त्यालाच एजंट ह्मणण्यास सुरवात झाली. सन १८५३ सालीं हा एजंटाचे ताब्यांतील भाग व वरील ३ तालुके यांस सब् कलेक्टरेट करण्यांत आलें. सन १८६६ सालीं सांकशीला पेण, राजपुरीला रोहा, रायगडला महाड आणि उंदेरी व रेवदंडा मिळून होणाऱ्या भागाला अलिबाग अशीं नावें देण्यांत आलीं व थोडेच दिवसांत तळ, निजामपूर व गोरेगांव हे पेटे नाहींसे करून माणगांव तालुका करण्यांत आला, आणि बिरवाडी आणि पोलादपूर हे पेटे महाड तालुक्यांत सामिल करण्यांत आले. इ. स. १८६९ सालअखेर कुलाबा जिल्हा स्वतंत्र जिल्हा झाला. सन १८३३ अखेरपासून रत्नागिरी जिल्हा बनला त्या वेळीं रत्नागिरी जिल्ह्याचे पांच भाग जमाबंदीकरितां केलेले होते. ते सुवर्णदुर्ग ( दापोली आणि खेड. ) अंजनवेल ( चिपळूण आणि संगमेश्वर ) रत्नागिरी, विजयदुर्ग (राजापूर आणि देवगड.) आणि मालवण असे होते. १८६८ मध्यें ह्याच भागाचे ८ तालुके आणि ४ पेटे करण्यांत आले. पुढें १८७९ सालीं वेंगुर्ला स्वतंत्र तालुका करण्यांत येऊन लांजें पेटा आजुबाजूच्या तीन तालुक्यांत वाटण्यांत आला. अशा रितीनें सध्यांचे प्रांतविभाग झाले.

## खोतीची मूळ-पीठिका.

खोतीची सुरवात आज उपलब्ध असलेल्या कागदांवरून विजापूरच्या आदिलशाहीच्या काळापासून ( इ. स. १४८९ ते १५१०) झाली असावी असें मानण्यांत येतें, परंतु खोती–सत्ताप्रकाराची सुरवात त्याचे पूर्वीच केव्हां तरी ब्राह्मणी राज्यांच्या वेळेपासून किंबहुना त्याचे पूर्वीच झाली असावी असें वाटतें. खोतांच्या उपलब्ध सनदांचा विचार केल्यास कांहीं विजापूरच्या राजांच्या वेळच्या, कांहीं मोंगलांच्या वेळच्या (१६९० ते १७२०) व कांहीं मराठ्यांच्या वेळच्या (१७५० ते १८१८) आहेत. या बाहेर खरा काळ ठरविण्यास संशोधन होणें अत्यंत जरूर आहे. मि. पेर्ली यांनीं (१८१९।२०) ह्मटल्याप्रमाणें " खोतांचे सुरवातीचा शोध लावणें सोपें काम नाहीं." ( The origin of the khots is not easy to be traced ). कांहीं असलें तरी खोत ही संस्था निदान पांच शतकांपूर्वीची आहे याबद्दल दुमत नाहीं.

खोती प्रकार कां अमलांत आला याबद्दल विचार केल्यास सुरवातीस सुचविल्याप्रमाणें कोंकणची देशस्थिति हेंच कारण असावें खास! डोंगराळ मांपिक

मुद्दल असल्यामुळें इतका प्रदेश असूनही त्याचें उत्पन्न कांहीं मिळणें शक्य नव्हतें. व त्यांची व्यवस्था करणेंही जुन्या अमदानींत शक्य नव्हतें. याकरितां कोंकणचें जें थोडेंफार उत्पन्न पूर्वीच्या राजांस मिळूं लागलें तें खोतांच्या मदतीनेंच होय. नवीन वस्ती करून, गांवचे गांव वसवून, पडजमिनी लागवडीस आणून देशाची स्थिति सुधारण्यांत खोतांच्या हाडांची काडें झालेलीं आहेत. व म्हणूनच ब्रिटिश अंमलापूर्वीं पुष्कळ वेळां जमावंदी झाल्या तथापि कोणीही खोती–प्रकार नष्ट करण्याचा विचारही डोक्यांत आणला नाहीं. खोत नवीन वसाहती करण्याकरितां जमीनी लागवडीस आणण्याकरितांच अस्तित्वांत आले, ही गोष्ट कोणतीही जुनी सनद पाहिली असतां सिद्ध होईल! परमुलखी कुळें आणून महामुरी करणें, " गांवांत कुळ–भरणा करून देताची बांध बंदस्ति चांगली राखून सरकार दस्ताची उगवणी आम्ही करीत आलों त्यास पैका खर्च केला. ", त्याचप्रमाणें " गांव पडीत जहाला, कूळ–भरणा नाहीं, गांवचे दस्ताची उगवणी होत नाहीं, गांव खराब झाला यास्तव सरकार आबादीवर नजर देऊन खोती दिली असे. " वगैरे उल्लेखांवरून याबद्दलची खात्री होईल. ही गोष्ट ब्रिटिश अंमलदारांनींसुद्धां मान्य केली आहे. मि. चॅपलिन (१८२१) यांनीं " गांवांची भरभराट करण्याकरितां खोत ही संस्था अस्तित्वांत आली असें मानतात ", असें म्हटलें असून, ले. डॅविल यांनीं " जिल्ह्यांत चाललेल्या लढायांमुळें उजाड, पड पडलेल्या गांवांतील शेती सुधारण्याकरितां व महसूल वसूल करण्यास सोपें पडावें म्हणून खोत अस्तित्वांत आले. " ( खो. स. पा ५ ). कांहीं असलें तथापि रा. सा. मंडलिकांच्या भाषेंत बोलावयाचें तर " खोत हे केवळ भोजनभाऊ (drones) नसून त्यांनीं हाडांचीं काडें केलीं असून पैसा आणि श्रम ओतले आहेत. त्याचीं फळें कोणीं चाखावीं हाच प्रश्न आहे."*

## इंग्रजी अंमल

विजापूरकर, मराठे व पेशवे यांनीं खोती अस्तित्वांत आणली व ती वाढविण्याचे प्रयत्न केले; परंतु ब्रिटिश अंमल सुरू झाल्यापासून त्याची अवस्था काय झाली हें पाहणें जरूर आहे. वर नमूद केल्याप्रमाणें साष्टी तालुका ब्रिटिश अंमलाखालीं सन १७७४ मध्यें आल्यानंतर साष्टी खोतांची इंग्रजांस प्रथम माहिती लागली, व सन १८०८ च्या रग्युलेशन १७ चें कलम १८ रकम २ यांत खोतांचेबद्दल " माधवराव (पेशवे) याचे कारकीर्दींत, ज्या वेळीं स्थानिक कामगारांचे स्वैर इच्छेवर व विचारांवर ( discretion and arbitrary will ) सर्व कारभार सोंपविण्यांत येत होता अशा वेळीं, सर्वसाधारणपणें हानिकारक अशा वार्षिक

* " Thus at the worst the khots have not been drones. They have worked, laid out money and labour. Who shall reap, is the question." Mandlik's writings & Speaches, P. 68.

भाड्याचे पद्धतीनें जास्तींत जास्त भाडें देणाऱ्या खोतांस, तात्पुरत्या वसुल्यांस, (temporary farmers) जमिनी देणें योग्य ठरविण्यांत आलें इ०" असा उल्लेख केलेला असून खोत हें तात्पुरते वसूल करणारे इसम असें ठरविलें होतें. साष्टी खोतांची स्थिति आणि कुलाबा व रत्नागिरी खोतांची स्थिति अगदीं भिन्न आहे. इंग्रजी अंमदानींत पहिला उपलब्ध रिपोर्ट म्हटला म्हणजे १८१७।१८ सालीं सालशी महालाचे बाबतींत मि. हेल (Hale) यानीं केलेला रिपोर्ट होय, त्या रिपोर्टांत (प्या. ५०) "घाटाकडील गांवाचे बाबतींत ठराविक दस्त असा बसलेला नसून गांवच्या मुख्य जमीनदाराकडे वसूल ठरवून दिलेला असतो, अशा जमिनदारांस त्या गांवचा पूर्ण ताबा होता, आणि आपणांस फायदेशीर अशा रीतीनें रयतेला काढीत अगर जमिनी देत, त्यामुळें कायमचे जमीन धारण करणारे कोणी नसून तात्पुरत्या रहिवाशांकडून वहिवाट करून घेतली जाते," असा उल्लेख करून ही परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न कसा करावा तें दर्शवून (प्यारा ५६) अखेर (प्यारा ६०) "ज्या ठिकाणीं खोत अथवा जमीनदार खेडेगांवांतील जमिनीचे पूर्ण मालक आहेत, तेथें पूर्वीप्रमाणें महसूल त्यांचे हातूनच आला पाहिजे." इ०* असें सुचविलें. यानंतर मि. पेली यांचा तारीख १८।१२।१८२० चा, दक्षिण कोंकण कलेक्टरचे कचेरींत लिहिलेला, रिपोर्ट होय. या रिपोर्टांत आप्ट्यापासून सालशी पर्यंतच्या भागांतील गांवांस खोती अथवा कुळारगी असें म्हणतात; खोती गांवांत कांहीं कुळांकडून जरी कांहीं ठराविक रक्कम घेण्यांत येई तरी इतरांपासून खोतांस वाटेल तो फायदा करून घेतां येतो. अशा रीतानें धारेकरी व अर्धेली असे कुळांचे प्रकार केले पाहिजेत. धारेकरी हे देशावरील मिरासदारांप्रमाणें आहेत. अर्धेली मात्र उपरी कुळा प्रमाणें आहेत. त्यांस विकतां अगर गहाण देतां येत नाहीं. त्यांस केव्हांहि काढून टाकितां येतें इ०, अशा रीतीनें अर्धेली कुळांची स्थिति दाखवून, खोतांमध्यें पाटिलकी एकरूप झाली असल्याचें दाखवून लिहिलें कीं "त्यांच्या नांवावरून जो अर्थ–बोध होतो त्याप्रमाणें खोत इतरत्र असलेल्या सरकारचे एजंट अथवा वसूल घेणाऱ्या पाटलांपेक्षां निराळे, गांवचा सर्व वसूल गोळा करणारे आहेत."† (खो. स. पान ९.) हा मि. पेलीं यांचा रिपोर्ट सरकारनें स. ठ. नं. १४८ ता० २३।१।१८२१ व स. ठ.

---

* "Where these zamindars (or khots) are the exclusive proprietors of the lands in their respective villages, the revenues of each, must of course go through their hands nearly in the same manner as before."

† As his name would seem to imply he may rather be viewed as the farmer of the entire revenue of the village than like the patel elsewhere, the mere agent or receiver of Government.

नंबर ९५५ तारीख २८।१।१८२१ यांत मान्य केला असून सरकारनें खोत हे, "बंगाल्यांतील लहानशा जमिनदारांप्रमाणें आहेत," असें कबूल केलें आहे. मि. चॅपलिन कमिशनर यांनी आपल्या नंबर ४० तारिख २१।११।१८२१ च्या रिपोर्टांत खोतांचा, याप्रमाणें दर्जा मान्य करून असें म्हटलें आहे कीं "दस्ताची कितीही रकम असो, ती देण्यास सरकारला खोत जबाबदार आहे. तो तितक्या दस्ता करितां जमिनी घेतो आणि रयतेला जास्तींत जास्त नफा होईल अशा रीतीनें देतो. खोतापाशीं ज्याप्रमाणें त्यास ठराव करितां येईल, त्याबाहेर रयतेला कांहींएक हक्क नाहीं."* अशा रीतीचा स्पष्ट उल्लेख करून थलीचा मात्र अर्धेलीचा शिरस्ता आहे असें नमूद केलें आहे. अशा रीतीनें काल गेल्यानंतर मि. डनलॉप यांनीं खोतांची सत्ता मर्यादित करण्याबद्दल रिपोर्ट तारीख ३१।१२।१८२२ रोजीं केला व स. ठ. नंबर ४३५ तारिख २५।३।१८२६ च्या उत्तरांत गव्हर्नर-इन्-कौन्सिलनें त्यास मान्यता देऊन असें म्हटलें कीं "खोतांची सत्ता कमी करणें हें सरकार व लोक या उभयतांच्या हिताचें आहे. आणि हा हेतु सर्व्हे करूनच सिद्धीस जाण्यासारखा आहे."† इ० लिहून सर्वेच्या कामीं कुळांचे हकांची चौकशी करण्याबद्दल हुकूम केला. त्यानंतर मि० डनलॉप यांनीं नंबर ५३ तारिख १९।८।१८२४ चा लांबलचक रिपोर्ट केला, व अखेर ठराविक महसुलाबाहेर कसणारास कांहीं देण्यास भाग पाडूं नये अथवा तावडतोब नवीन सर्व्हे करावी असा रिपोर्ट केला; परंतु सरकारनें स. ठ. नंबर ३३ तारिख १०।१।१८२५ या महत्वाचे ठरावांत खोत व सरकार यांचे संबंधाचे बाबतींत "खोतांचे हक्काचा उगम कसाही असला तरी आतां त्यांस अशा तऱ्हेचा हक्क प्राप्त झाला आहे कीं त्यांत हात घालणें न्यायाचें अगर शहाणपणाचें होणार नाहीं."‡ यांत व रयत यांचे संबंधांत "गव्हर्नर-इन्-कौन्सिल यांचे मतें खोतांचे हक्क बाजूस न सारतां इतर वर्गांचे हक्क काय आहेत तें पाहून नक्की

* "Whatever be the amount of assessment, the khot alone is answerable for it, to Government. He farms the lands at that rate, and lets them out to the best advantage to the ryots............nor has the ryot any right to it except upon the terms upon which he can agree with the khot." etc. खो. स. पान ११.

† "It is the interest both of the Government and the people to weaken the power of the khots and that, that object can only be accomplished by a survey such as you have proposed." खो. स. पा. १३.

‡ "Whatever may have been the origin of their title, they appear now to have acquired a right with which it would be neither just nor politic to interfere." खो. स. पा. १५.

करणें इतक्याच मर्यादित सुधारणा असाव्या. उपरी अथवा अर्धेली कुळांचा नुसता वहिवाटीचा सुद्धां हक्क नाहीं असें दिसतें, तेव्हां त्यांचे बाबतींत कोणताही नियम करून सरकारला हात घालण्याचें कारण नाहीं."* अशा रीतीनें येथील सरकारनें ठराव केला; परंतु कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचे, खोतांच्या "जुलमी" वसुलास आळा घालण्याबद्दल ( ४।५।१८२५ ), व कुळांचें देणें नक्की करून त्याप्रमाणें अंमल होईल असें करण्याबद्दल ( २३।५।१८२७ ), हुकूम आले, व त्याप्रमाणें एकसाली कुळें, व बरेच वर्षे तेंच ठिकाण सारखें कसणारीं कुळें, असा फरक सन १८२७ पासून करण्यांत येऊं लागला, व या दुसऱ्या तऱ्हेच्या कुळांच्या जमिनी बापाकडून मुलाकडे येतात, खोतास काढून टाकतां येत नाहीं, आणि उत्पन्नाचा ठराविक हिस्सा खोतास देऊन जमीन धारण करण्याचा अशा कुळांस हक्क आहे, वगैरे ठरविण्यांत आलें, ( मि० रीड यांचा रिपोर्ट नंबर ५४ तारीख २६।८।१८२८). दरम्यान सरकारनें सर्व्हे करण्याचा अधिकार देण्याकरितां सन १८२७ चा रेग्युलेशन १७ पास केला व त्यांत सर्व प्रकारच्या जमिनीवर कर बसविण्यास सरकारास मुभा आहे, पडजमिनी दुसऱ्यास देण्याचा कलेक्टरास अधिकार आहे, दस्त, जप्ती विक्री वगैरे प्रकारें वसूल करितां येईल, वगैरे गोष्टी नमूद करून त्या रेग्युलेशनचा भाग ६ प्रमाणें सरकारदस्त वसूल करण्याकरितां गांव मक्त्यानें देण्याचा अधिकार देण्यांत आला, व तो कमा बजावावा हेंही ठरविण्यांत आलें. या रेग्युलेशनमध्यें अलीकडील सर्व्हेप्रमाणें सर्वेनंबरवार मोजणी करण्याचें तत्व अमलांत आलेलें नव्हतें, फक्त प्रत्येक शेतावर दस्त बसविण्याबद्दलचा कायदा होता.

इ. स. १८२६ मध्यें सर्व्हे करण्याबद्दल मंजुरी देण्यांत आल्याप्रमाणें ले. डॉवेल यांनां रत्नागिरी तालुक्यांत पेशव्यांचे पहाणी पद्धतीचे धोरणानें सर्वे सुरू केली व १८२९ मध्यें संपविली; हिलाच डुबल पहाणी असें ह्मणतात. डॉवेल साहेबांच्या पहाणींत कांहीं जमिनी, भात जमिनी व थोड्या वर्कस जमिनी, खोतांच्या खुद्द वहिवाटींत असतात व कांहीं कर्दे यांच्या वहिवाटींत असतात; कर्दे हे जुने धारेकरी अगर मुळचीं कुळें असून त्यांचे हक्क शिरस्त्यावर अवलंबून आहेत, त्यांना खोत काढून टाकूं शकत नाहींत; कांहीं जमिनी "गाविक" ह्मणजे ज्यांची व्यवस्था सर्वथैव खोतांकडे असते व वहिवाट वाघेकरी अथवा दुलडी यांच्याकडे

* "The Governor-in-council is of opinion that any improvements should be confined to ascertaining and securing the rights of the other classes without setting aside the claims of the khots. Uparis or ardhelies do not appear to possess even a usufructuary right to the soil which they cultivate." खो, स, पान १५।१६.

असते अशा होत, वगैरे गोष्टी आढळांत आल्या. डॅविल साहेबांनीं १८२९ ते १८३३ पर्यंत खोत, कुणबी, महार वगैरेंकडून शक्य तितकी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला, व सत्ताप्रकार, शिरस्ते, कबुलायतींच्या पद्धती वगैरे संबंधें माहिती गोळा केली, व ती ६५४ पानांच्या हस्तलिखित रिपोर्टांत नमूद केली आहे. ही माहिती गांववार असून फारच महत्वाचा असवी, कारण प्रत्येक गांवांतील कुळें कोणत्या प्रकारचीं आढळलीं वगैरे वगैरे फारच महत्वाची माहिती त्यांत दिलेली आहे.*

ले० डॅविलच्या प्रसिद्ध पद्धाणीनंतर विशेष महत्वाचा रिपोर्ट वेसवी महालाचे बाबतींत मि. ग्लास यांनीं तारीख ५।५।१८३७ रोजीं लिहिला, व त्यांत "निव्वळ खोती गांवांत जमिनीवरील मालकी हक्क खोतांचाच आहे"† असें ह्मणून खोती प्रकाराची प्रवृत्तीच रयतेला दारिद्र्यांत ठेवण्याची आहे, परंतु खोत बहुधा कुळांवर माया करणारे व पडतें घेणारें असतात, इ० उल्लेख केला आहे. यानंतर १८४३।४४ सालीं शिरगांवचे (अंजनवेल तालुका) कुळांनीं खोतांविरुद्ध, खोत वेठ, कासाई वगैरे कर घेतात, अशाबद्दल तक्रारी अर्ज केले. त्या बाबतींत मि. इलिस यांनीं तारीख २०।२।१८४५ रोजीं आपला रिपोर्ट केला व आगाऊ नोटीस देऊन व करार करून असे कर निरनिराळ्या उत्पन्नांच्या बाबींवर घेण्यास हरकत दिसत नाहीं. वास्तविक पाहतां अशा बाबी शिरस्त्याचे बाहेरच्या आहेत. परंतु खोत आणि कुळें यांचे संबंधांत हात घालतां येईल किंवा नाहीं याबद्दल शंका आहे, वगैरे लिहून या बाबतींतील खोतांचा हक्क ( privilege ) कायम राखण्यापुरत्या कांहीं अगदीं हलक्या बाबी कायम ठेवण्याबद्दल सूचना केली. परंतु ही सूचना सरकारला आवडली नाहीं, व नं. २६४१ ता. १०।५।१८४८ च्या स. ठरावानें जरी सरकारला कायद्यानें अशा बाबी बंद करण्याचा अधिकार असला तथापि कुळांचे जुलमी व त्रासदायक करापासून संरक्षण करतांना खोतांचे बाबतींत अयोग्य वर्तन होऊं नये, याकरितां "पूर्ण व शोधक (full and searching) चौकशी" करण्याचें ठरलें व मि० कोल्स यांची कलेक्टरचे जागीं नेमणूक झाली.

मि. कोल्स यांनीं चौकशी करून आपल्या नं० १५३० ता० ९।११।१८४८ च्या रिपोर्टांत खोतांस सन १८२७ च्या रेग्युलेशन १७ चा भाग ६ लागू नसून त्या प्रमाणें खोतांकडे मक्त्यानें गांव दिले असें होत नाहीं असें ह्मटलें आहे. तेळें गांवाचे बाबतींत कांहीं वर्षं जप्तींत असलेला गांव परत करण्याबद्दलचा प्रश्न निघाला त्यावरही १८५० सालीं कोल्स यांनीं पेशवाईपासूनचे पद्धतीचा विचार करून गांव

---

* कांहीं गांवची माहिती खो. स. पान २२ ते २८ येथें दिली आहे. ही हस्तलिखित प्रत सरकारचे दप्तरीं उपलब्ध असणें शक्य आहे.

† "In villages purely khoti, the proprietary right to the land centres in the khot."

खोताचा खोतास तोट्याची रक्कम घेऊन परत केला पाहिजे असेंच टरविलें. मि० फोर्लस यांनीं केलेल्या बारकाईच्या ( searching ) तपासाअंतीं असा शोध लागला कीं, "खोती गांवांतील सर्व कुळांस कायम कुळ मानलें जाण्याचा हक्क आहे; परंतु सरकारी अधिकाऱ्यांच्या, खोत हे मालक आहेत, असें समजण्यामुळें आतां त्यांनीं बरेच अधिकार बळकाविले आहेत. या दृष्टीनें विचार केल्यास खोत आणि कुळें यांचे मधील संबंधांत कायदा करून हात घालण्याचा सरकारला अधिकार आहे, व रयतेची हीन स्थिति, जिल्ह्याचें दारिद्र्य, फाजील लोकसंख्या, उद्योगधंद्याचा अभाव, व खोत आणि कुळें यांचा कुळांस हानिकारक संबंध, यांमुळें ही स्थिति सुधारणें जरूर आहे. खोतांस शिरस्त्याप्रमाणें जरी अर्धेल तिर्धेल घेतां येत असली, तथापि अंदाज करणें त्यांचेच हातांत असल्यामुळें ते कुळांकडून मन मानेल तसा वसूल घेतात; व आठ वेठ वगैरे घेऊन कुळांना गुलामगिरींत ठेवितात " वगैरे दाखवून कायदा करण्याबद्दल सुचविलें. अशा रीतीनें आलेल्या रिपोर्टाप्रमाणें क्या० विंगेट यांनीं आपल्या सूचना केल्या व (१) खोती नष्ट करून सर्व कुळांना धारेकरी बनवावें व ही गोष्ट अमलांत आणणें कडक उपाय असें वाटल्यास (२) खोत आणि त्यांचीं कायम कुळें यांचेमधील संबंध पुढील देणें मर्यादित होईल या दृष्टीनें नक्त ठरावांत ठरवावें, गांविक जमिनी खोताकडे सोंपविण्यांत याव्या; परंतु यांचेंही अर्धेलपेक्षां जास्त उत्पन्न घेण्यांत येऊं नये. खोतास यामुळें जो चट्टा बसेल त्याकरितां सरकारानें आपलें जमेचें प्रमाण कमी करावें. अशा रीतीनें सुचवून प्रयोगादाखल सर्वे करण्याबद्दल सुचविलें. महत्त्वाची गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी अशी कीं विंगेटसाहेबांनीं कुळांचे असलेले हक्क कबूल करण्याची ( recognise ) सूचना केली, नवीन देण्याबद्दल ( create ) सूचना केली नाहीं. त्यांनीं कोंकणची रयत निरनिराळ्या पुष्कळ प्रकारची आहे; करितां त्यांचेसंबंधें चौकशी करणें जरूर आहे. अशा रीतीनें सूचना आल्यानंतर सरकारनें स० ठ० १०५५५ तारीख ८।११।१८५१ करून सर्व्हे करण्यास परवानगी दिली. परंतु खोत आणि कुळें यांचा परस्पर संबंध ठरविण्याचे बाबतींत कायद्याचा आधार असल्याशिवाय सर्व्हे निरुपयोगी होईल असेंही नमूद केलें. ह्यानंतर पुन्हां मि० केंडॉल, विंगेट, फोर्लस वगैरे अधिकाऱ्यांनीं चौकशी केली व खोत हे केवळ दस्ताचे मक्तेदार ( farmers of revenue ) आहेत, कुळांस जास्त हक्क देण्यास हरकत नाहीं वगैरे प्रकारें कुळांचा कैवार घेण्यास सुरवात झाली. क्या० विंगेट यांनीं सन १८५३ च्या जून महिन्यांत कशा प्रकारचा कायदा असावा याचा मसुदाही तयार केला, व खोतांस त्यांच्या हक्काबद्दल मोबदला देऊन कुळांस त्यांनीं धारण केलेल्या जमिनीचे मालक समजण्यांत यावें असें सुचविलें व ही गोष्ट सरकारानेंही स० ठ० नं० १९३७ तारीख ३१।३।१८५३ यांत मान्य केली. त्यांत क्या० विंगेटच्या मताप्रमाणें खोतांना जमिनीवर मालकी हक्क नाहीं असें स्पष्ट नमूद करण्यांत आलें.

(different landlords) मि० विंगेट यांनीं सुचविल्याप्रमाणें प्रयोगादाखल रत्नागिरीच्या सर्व्हे मोजणीस सरकारनें स० ठ० नं० १३५४ ता० १४।३।१८५४ करून अनुमति दिली. व त्याप्रमाणें सर्व्हेचें काम कोळंबें, टिकें, वगैरे गांवीं सुरू करण्यांत आलें. परंतु या सर्व्हेच्या कामीं कॅप्टन विंगेट यांच्या सूचनांविरुद्ध मि० टरकांड यांनीं पुष्कळ तक्रारी मांडल्या. खोत आपणांस मालकी हक्क आहेत असें प्रस्थापित करूं पहात होते व सरकार व इतर ते केवळ दस्ताचे वहिवाटदार आहेत असें प्रस्थापित करूं पहात होते. त्यामुळें सर्व्हेचे कामकाजाचे बाबतींत पुष्कळ हरकती येत होत्या. मि. टरकांड यांनीं कॅ. विंगेटच्या सुचनांविरुद्ध १८५६ मध्यें टिक्याचे सेटलमेंटचे संबंधांत पत्र लिहिलें. त्यांत सर्व खोतांना केवळ वसुले समजणें योग्य नव्हे. ज्या गांवांत धारेकऱ्यांसारखीं जुनीं, जमिनी मालकीनें धारण करणारीं कुळें आहेत त्या ठिकाणीं असें म्हटलें असतां चालेल. परंतु "ज्या ठिकाणीं खोतांनीं गांव वसविले व स्वतः कुळें आणून ठेविलीं, अशा ठिकाणीं खोतास केवळ वसुले समजणें बरोबर होणार नाहीं. कारण माझ्या मतें त्यांस मालक समजणें न्यायाचें आहे"* असें नमूद करून त्यांस मालकच आहेत असें समजलें पाहिजे असें सुचविलें. टरकांड यांनीं खोतांचे तर्फे आपलें मत फारच जोरदार रीतीनें सरकारपुढें मांडलें व आपलें मत पुढील शब्दांत नमूद केलें. "कुळांना काढून टाकणें, जमीन दुरुस्तीवर पैसा खर्च करणें, वेठ घेणें, देशमुखी हक्क भोगणें, दस्त न देतां जमिनी कसणें, कर्द्यांच्या जमिनींतील फणस झाडांवर थल घेणें, दारिद्र्याचे अगर तोट्याचे प्रसंगीं सूट देणें, अशासारख्या मालकी दाखविणाऱ्या ज्या निरनिराळ्या गोष्टी तो करितो त्यांवरून खोताचे मालकी हक्क अधिकच शाबीत होतात. परंतु ते पूर्ण मालक नसून संकोचित मालक आहेत."§

* "Where in short the villages were settled and peopled by the khots themselves with cultivators brought by themselves I certainly think we should not be doing to these Khots as we should be done by in constituting them as mere farmers; for I conceive they are equitably entitled to be considered proprietors." २१ खो. स. पा. ६२.

§ "His proprietary rights are further proved by his exercise of the various functions of a proprietor such as ousting tenants, expending capital on the improvement of the land, demanding labour rents, enjoying manorial rights, cultivating land without paying government revenue, assessing the jack trees in the Karde's holding, remitting a portion of the rents in cases of poverty or loss. But they are limited and not absolute proprietors." खो. स. पान ६४

कुळांचे बाबतींतही टरकांडसाहेबांनीं आपलें मत योग्य प्रकारचेंच दिलें. ज्या कुळांची तीस वर्षांवर वहिवाट आहे त्यास वंशपरंपरा चालणाऱ्या खातेदारांचे हक्क आहेत. त्यांवरील खोतांची सत्ता मर्यादित असून अशा कुळांस काढून टाकतां येणार नाहीं, असें ठरविलें. मि. टरकांड यांनीं जोरदार रिपोर्ट केला परंतु तो टिकला नाहीं. रे. कमिशनर मि. रिव्हज् यांनीं खोत तेथपर्यंत देत असलेल्या सालोसालचे कबुलायतीवर भर देऊन असें ह्मटलें कीं "बावरून खोत, आपण रेव्हेन्यू कामगार, सरकारचे नोकर, जमीनीचे व दस्ताचे व्यवस्थापक आहों असें आपणास समजतात व सरकार त्यांस तसेंच समजतें; त्यांची व्यवस्था ठेवण्यापलीकडे मालकी नाहीं इ०" अशा रीतीनें नमूद करून "खोतांस खरेदीनें कबुलायतीनें अगर समाधानकारक प्रकारानें प्रत्यक्ष वहिवाटीस चालत असलेल्या जमिनीस सरकार कागदीं वरिष्ठ धारणकरणारा ह्मणून दाखल करावें, रयतेपासून सर्व–दस्ताबाहेर खोतानें कांहीं घेऊं नये" वर्कस जमिनीचे बाबतींत भात–जमिनीप्रमाणेंच सेटलमेंट करावें, असें सुचविलें. अशा रीतीनें एकंदरींत पाहूं गेल्यास मि. रीव्हज् यांनीं मि. विंगेट व मि. टरकांड यांच्या मताचा सबेट करण्याचा प्रयत्न केला. या रिपोर्टावर स. ठ. नं. १८९९ ता. २३।४।५७ चा झाला व सर्व करणेपूर्वी कायदा केला पाहिजे. कारण अस्तित्वांत असलेला कायदा फार अपुरा आहे असें ठरविलें, व चाल-लेलीं सर्वेचीं कामें बंद करण्यांत आलीं.

त्यानंतर १८५७ सालच्या बंडाच्या धामधुमीचा काळ गेला. राणीसरकारचा जाहिरनामा निघून सर्वांचे हक्क अबाधित ठेवण्याबद्दलचें आश्वासन मिळालें; तरीही खोताचे हक्काची चौकशी करण्याचें बंद झालें नाहीं. १८५८ मध्यें खोत हे वंशपरंपरागत वतनदार आहेत किंवा काय व त्यांस वतन आक्ट सन १८४३ चा आक्ट ११ लागू करावा किंवा काय असा प्रश्न उपस्थित झाला. परंतु मि० लेटन यांनीं १८५८ मध्यें त्यास विरोध केला; कारण तसें करणें ह्मणजे "सरकारनें खोत हे वंशपरंपरेचा हक्क असलेले वतनदार असल्याचें वस्तुतः मान्य केल्यासारखें आहे." या विरोधामुळें तो विचार रद्द पडला. नंतर सरकारनें रेव्हेन्यू कमिशनर यांस नं० १८९२ ता० १९।५।१८५९ चें पत्र लिहून कॅ० फ्रॉन्सिस यांचेकडे सेटलमेंटचें काम सोंपविण्याचें ठरविलें. कॅ० फ्रॉन्सिस यांनीं दक्षिण कोंकणच्या सांकशी वगैरे तालुक्यांत चौकशी करून खोतीसंबंधें आपला पहिला रिपोर्ट नं० ४६६ ता० २३।९।१८५९ चा लिहिला. कॅ. फ्रॅन्सिस यांनीं, सरकार खोतांची सत्ता कमी करण्याचा व अवाचेसवा मागण्यांपासून कुळांचें थोडेंफार संरक्षण करण्याचा प्रयत्न करीत आहे, व त्याप्रमाणें वार्षिक कबुलायतींतील शर्तींत दरसाल फेरबदल होत आहे, असें कबूल करून सेटलमेंट करणें कितपत शक्य व योग्य आहे व तें कोणत्या तत्वावर करतां येईल याचा विचार केला. "ह्या जिल्ह्यांत खोती पद्धति अगदीं सामान्य परिस्थिति (normal state of things) झाली आहे असें दिसतें आणि

मला अशी भिती वाटते की रयतेची स्थिति सुधारणें हें खोतांचे मालकीहक्क काढून घेण्याइतकेंच कठीण काम आहे असें आढळेल. माझ्या मतें खोतांना वरिष्ठ धारण करणारे समजून त्यांच्याशीं करार करावे, या धोरणानें सेटलमेंट केल्यास तेंच यशस्वी होईल. तेव्हां मी असें सुचवितों कीं, गांवच्या वसुलासंबंधें एकदम स्थूल मानानें (in gross) खोताशीं आज ज्याप्रमाणें कबुलायती करण्यांत येत आहेत तीच पद्धत कायम ठेवावी, परंतु कुळांचें संरक्षण करण्याकरितां त्यांस खातेदार कुळांचे हक्क द्यावे, कलेक्टरकडे अर्ज देऊन हुकूम घेतल्याशिवाय कुळांस काढतां येऊं नये आणि त्यांस पावती देणें भाग पाडावें. न देणें हा शिक्षेस पात्र गुन्हा समजण्यांत यावा" असें सुचविलें. कॅ. फ्रॉन्सिसच्या सूचनेप्रमाणें सर्व प्रकारच्या कुळांना, साध्या एकसाली कुळांस सुद्धां, खातेदाराचे हक्क द्यावयाचे होते, फरक इतकाच कीं, सर्वांनीं सर्व-दस्तच फक्त द्यावा असें ह्मणणें नव्हतें. धारेकऱ्यांनीं सरकारदस्त खोतामार्फत द्यावा, ज्या रयतेला कूळहक्क आहे, परंतु मक्ता ठरलेला नाहीं, त्यांनीं खोताशीं ठराव होईल त्याप्रमाणें द्यावें व ज्या रयतेला खातेदाराचा हक्क प्राप्त होत नाहीं, अगर थलही ठरा-विक नाहीं, त्यांनीं सर्वस्वी जमिनीचे कबजाचे व थलीचे बाबतींत खोतावर अवलंबून असावें. या सेटलमेंटप्रमाणें खोतानें सर्वदस्ताकरितां तीस वर्षांची कबुलायत द्यावी व गांव धारण करावा. व आपल्या कबुलायती इतक्याच मुदतीच्या खोत निस-बत जमिनींतील (धारेकऱ्यांशिवाय करून) कुळांकडून सर्व दस्ताच्या बाहेर त्याच्या निम्पटीपेक्षां जास्त नाहीं अशा दराच्या कबुलायती घ्याव्या व अशीं कुळें वंशपरंपरा हक्क असणारीं असें समजावें इ०" सुचविलें. त्यावर अशा तऱ्हेचें सेटलमेंट कायम करण्याकरितां स. ठ. नं. १८३२ ता० १०।५।१८६० चा झाला. हा ठराव फारच महत्त्वाचा गणला जात असून त्यांतील पहिल्या पॅरिग्राफांत—"जें सेटलमेंट आतां मंजूर होईल त्याच पद्धतीनें कुलाबा सब्‌कलेक्टरेटचे तालुके व रत्ना-गिरी कलेक्टरेटचा बहुतेक भाग यांचे पुढील कामकाजाचें (proceeding) निय-मन व्हावें. अस्तित्वांत असलेले न्याय (justice) व जमीनमहसुलाची न्याय्य पद्धति (sound scheme) यांस अनुसरून असणारे खोतांचे सर्व हक्कसंबंध कायम ठेवण्याचा व या जिल्ह्यांत, काढून टाकणें शक्य असलें तरी ज्या काढून टाकण्यानें सामाजिक क्रांति (revolution) होईल, अशा बद्धमूल झालेल्या व अस्तित्वांत असलेल्या संस्था (institution) नष्ट (overthrow) न करितां होतां होईल तों चालू ठेवणेचा सरकारचा इरादा आहे." अशा प्रकारें खोत व कुळें यांचे संबंधांत कितपत हात चालावा, वगैरे ठरावांत सविस्तर नमूद केलें असून खोत वरिष्ठ धारण करणारे आहेत असें कबूल करण्यांत आलें, व तीस वर्षांची एकदम खोताकडून कबुलायत घ्यावी व त्याच मुदतीची कायमकुळांसही खोतांनीं द्यावी आणि कुळांकडून खोतानें शिकस्तीच्या महसुलाबाहेर कांहीं घेऊं नये, खोताचे संमती-शिवाय कोणत्याही जमिनीचा वर्ग होऊं नये, खोतानें नजराणा अगर फी घेऊन

कबुली द्यावी व तसें केल्याबद्दल वर्गाच्या कागदावर सही करावी. जर खोत कबुली देणार नाहीं, तर कुळानें केलेल्या सुधारणांची पंचमतें जी किंमत ठरेल ती कुळास खोतानें द्यावी, वर्ग करण्यासंबंधाचा हक्क असल्यास तो नमूद करावा, व संमति दिल्यास त्याची फी अगर नजराणा त्यास द्यावा, इ. ठरविण्यांत आलें. या सरकारी ठरावानें महत्वाचीं नवीन तत्वें अंमलांत आलीं तीं (१) खोतांनी आपल्या कायम कुळांस कबुलायती द्याव्या; (२) कुळांस खोताचे संमतीशिवाय वर्ग करण्याचा हक्क नाहीं; (३) खोतांचा कुळांकडून वसूल घेण्याचा हक्क सरकार (state) पासून प्राप्त (derived) झालेला असल्यामुळें त्याचें नियमन करण्याचा सरकारला अधिकार आहे. या ठरावाप्रमाणें सन १८६१ सालीं क. फ्रान्सिसनें नागोठणें पेट्याचें सर्वेसेटलमेंट करून मंजुरीकरितां रिपोर्ट केला, व त्याचेबरोबर सेटलमेंटाचा कायदा कसा असावा याबद्दल मसुदा करून पाठविला. परंतु सरकारनें स. ठ. नंबर ३७६५ ता. २४।८।१८६१ च्या महत्वाचा ठराव पास करून, गांव धारण करणारे खोत असले तथापि कायदा पास करण्याचें कारण नाहीं, "आमचे खोतांस ते ज्या गांवचा सरकारदस्त देतात त्या गांवचा वसूल करण्याचा व त्यांतील जमिनीची व्यवस्था ठेवणेचा वंशपरंपरेचा हक्क आहे, ह्मणून खोत हा आमच्या शेतकरी प्रजेपैकीं सन १८२७ च्या रेग्यूलेशन १७ कलम ३ खालीं येणारा सरकारला ज्याचे पाशीं दस्ताचा ठराव केला पाहिजे असा खातेदार आहे, व असें गणणें भाग आहे"* असें ठरविलें. आजपर्यंतच्या ठरावांकडे नजर दिल्यास सेटलमेंटचा कायदा नको ह्मणणारा हा ठराव विलक्षण दिसतो; परंतु त्याचें कारण खोत दरसाल कबुलायती देत आले होते व त्यामुळें सरकारला जमीन सहसलांत, जमिनीच्या व्यवस्थेंत वगैरे सुधारणा करणें झाल्यास तें करणें शक्य आहे असें वाटत होतें हें होय.

कबुलायतीच्या इतिहासासंबंधें भरपूर माहिती पुढें कलम २५ खालील टिपांत (पान १९७ येथें) दिली आहे. त्याप्रमाणें लवकरच "कबुलायतीच्या आधारांवर खोत गांव धारण करीत नाहींत; त्यांची मालकी दाखविणारा कागद त्यांची सनद होय. कबुलायत ही केवळ सरकारदस्त देण्याबद्दलची हमी आहे." (पान १९९) ही गोष्ट सरकारच्या नजरेस आली. सरकारी ठराव ४०८८ तारिख २०।९।१८६१

* "Our khots have a heriditary right to realize the revenue and manage the lands of their villages, upon which they pay the land tax to Government; consequently, in accordance with the definition laid down in Sec. III of Regulation XVII of 1827, the khot is of that class of our agricultural subjects who is and ought to be looked upon as the occupant with whom the Government are called upon to make the settlement." खो. स. पा. ७९.

यांत असेंही म्हणण्यांत आलें होतें कीं, " कबुलायत न दिल्यानें एकदां नष्ट झालेला हक्क दिवाणी कोर्टामार्फत परत मिळवितां येईल किंवा काय ही गोष्ट अद्याप सिद्ध व्हावयाची आहे." परंतु आप्पाजी नारायण वि. नारो त्रिंबक २ बोराडेल ५९२ यांत जिल्हा अजमेंत वादीनें दाखल केलेली सनद हा मालकीचा कागद धरून वादीच्या गैरहजेरींत सरकारनें खोती दिली एवढ्यानें प्रतिवादीस वंशपरंपरेचा हकसंबंध प्राप्त होत नाहीं असें ठरविलें व तेंच वरील कोर्टानेंही कायम करण्यांत आलें. सनदा, ना. हायकोर्टाचे ठराव, वगैरेंचा विचार केल्यासही कबुलायती हा मालकी दाखविणारा कागद नव्हे हें सिद्धच आहे. तेव्हां कबुलायतींतील शर्ती वाढविण्यानें खोतांच्या कायदेशीर हक्कांविरुद्ध जातां येणार नाहीं, व कायद्याचा पाठिंबा नसतां सेटलमेंट करूं जाणेंही इष्ट नाहीं; शिवाय इलाख्यांतील इतर जिल्ह्यांप्रमाणें खोती चालू असलेल्या भागासही सेटलमेंटचे बाबतींत कायमपणा आणणें तर भाग; करितां त्याच वेळीं म्हणजे १८६५ चे सुमारें लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें चर्चा चालू असलेल्या "मुंबई सर्वे आणि सेटलमेंट आक्टांत" कलमें ३७ व ३८ हीं घालण्यांत आलीं. हीं कलमें कौन्सिलमध्यें सादर करतेवेळीं, खोतीचे पुरस्कर्ते कै. रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांची चळवळ व अनुकूल असलेले मि. एलिस वगैरे यांचीं झालेलीं भाषणें, फारच महत्वाचीं आहेत. परंतु तीं येथें सविस्तर देणें शक्य नाहीं. सन १८६५ चा आक्ट १ कलमें ३७ व ३८ हीं काय आहेत व त्यांचा परिणाम काय याबद्दलची चर्चा कलम २ खालील टिपेंत सविस्तर केली आहे. (पान १० ते १४ पहा).

१८६५ चा आक्ट १ जरी अमलांत आणिला, तथापि त्या वेळीं लक्षांत न आलेल्या चुका हळू हळू सरकारच्या नजरेस आल्या. १८६५ चा आक्ट १ कलम ३७ यांतील दोष थोडक्यांत दिसून आले ते—

(१) खोतांना खातेदार (occupant) ठरविलें.

(२) सनदांच्या जोरावर धारण केलेल्या गांवांस हें कलम लागू होणें शक्य नव्हतें; कारण दरसाल घेण्यांत येणारी कबुलायत केवळ सरकारदस्त वेळीं देणें व गांवांत योग्य व्यवस्था ठेवणें या बद्दलची हमी (security) होती, आणि असें व्हावें असा सरकारचा हेतु नव्हता.

(३) कबुलायती वास्तविक खोतानें सरकारला द्यावयाच्या होत्या; परंतु कबुलायत (lease) द्यावयाची असें म्हटल्यानें ती कलेक्टरनें खोतास द्यावयाची असा अर्थ होऊं लागला व अशा रीतीनें ही व्याकरणाची चूक झाली.

(४) तीस वर्षांच्या मुदतींत सरकारला दस्ताची वाढ करतां येणें अशक्य झालें. खोतास मात्र खातेदार (occupant) या नात्यानें वाटेल त्या वर्षी राजिनामा देण्यास हरकत नाहींशी झाली. शिवाय सरकारदेणें सेटलमेंटच्या मुदतीपर्यंत देण्याचे कबुलीची, अगर जर तो वक्तशीर न देईल तर त्याची

इष्टेट विक्री वगैरे न करतां सरकारजमा होईल, अशा शर्तीची कबुलायत व्हावी असा सरकारचा हेतु असणेंही अशक्य होतें.

(५) कलमाच्या भाषेवरून सर्व कामगारानें वाटल्यास कबुलायत घ्यावी आणि खोतानें दरसालच्या कबुलायतीऐवजीं वाटल्यास ती स्वीकारावी असा अर्थ निघतो. न स्वीकारल्यास काय करावें याबद्दल कांहीं ठराव नव्हता त्यामुळें सेटल्मेंट अपुरें राहणें प्राप्त होतें.

कलम ३८ यांतील दोष दिसून आले ते—

(१) कलमांत "कूळ" असा शब्द वापरल्यानें त्यांत एकसाली, उपरी कुळांच्याही अंतर्भाव होऊं लागला, व त्यामुळें उपरी कुळांकडूनही सेटल्मेंट ठरावाप्रमाणें थल घेणें खोतास भाग झालें. यामुळें खोताचे हक्क कमी झाले व कुळाचे वाढले. हें प्रघात (usage), शिरस्तां (custom), कायदा व न्याय (equity) याचे विरुद्ध झालें.

(२) उपरी कुळाला नोटीस देऊन काढतां येणें शक्य असल्यानें खोतानें एकास काढून दुसऱ्यास स्वतःच्या मर्जीप्रमाणें थल देण्याचे करारानें ठेवण्यास प्रत्यवाय नव्हता.

(३) कायदा करणारांचा हेतु कायम कुळांचे देणें ठरवावें असा होता व त्यामुळें "कूळ" याचा अर्थ "कायम कूळ" असा समजला तरच तो हेतु सिद्ध होणें शक्य होतें.

(४) "वर्ग करतां येत नाहीं" असा ठराव केला तोही अपुरा व अयोग्य होता. कारण एकतर उपरी कुळाचे बाबतींत हा ठराव असून नसून सारखाच व कायम कुळेंही दोन प्रकारचीं (१) ज्यांस खोताच्या कबुलीशिवाय विकण्याचा हक्क आहे अशीं, धारेकरी यांसारखीं व (२) ज्यांस खोताचे संमत्तीशिवाय विकण्याचा हक्क नाहीं अशीं, हा भेद करण्यांत आला नव्हता.

(५) कलमांतील ठरावाचा योग्य अर्थ केल्यास खोतास कबुलायत देण्यापूर्वीं सर्वे ऑफिसरानें गव्हर्नर इन् कौन्सिलचे मंजुरीची वाट पाहिली पाहिजे; आणि त्याचप्रमाणें कलमें ३७।३८ एकदम वाचल्यास खोतांचे मागण्यांची इयत्ता गव्हर्नर इन् कौन्सिल यांची मंजुरी मिळवून कायम झाल्याशिवाय सर्वे कामगाराला कुळाची थल कायम करणें अशक्य होतें. अशा प्रकारें दोन्ही वेळीं मंजुरी घेणें भाग व्हावें असा कायद्याचा हेतु नव्हता.

अशा प्रकारचीं पुष्कळ व्यंगें आक्टांत असल्यामुळें हा सेटल्मेंटला लागू करणें फारच जड व अयोग्य असें सरकारचें सरकारलाच वाटूं लागलें. हीं दोन्ही कलमें कशा प्रकारें अयोग्य व मूळ हेतूशीं विरोधी आहेत हें रेव्हेन्यू कमिशनरचा नंबर ३९४५ ता० २१।८।१८६७ चा मेमोरँडम वाचला ह्मणजे कळेल. मि० कँडी यांचे भाषेत थोडक्यात बोलावयाचें तर "चालू कायदा खोती गांवांचें सेटलमेंट

करण्याचे बाबतींत अगदीं गैरलागू व अयोग्य होता, असें भरपूर सिद्ध झालें आहे.* परंतु आक्ट पास झाल्याबरोबर त्याचे अंमलबजावणीस सुरुवात झाली व सेटलमेंट करण्यांत येऊं लागलें.

या सेटलमेंटचा परिणाम खोतीवर काय झाला तेंही पाहाणें जरूर आहे. खोतांचे दृष्टीनें हा कायदा फारच जाचक झाल्याकारणानें त्याचेविरुद्ध त्यांनीं जोराची चळवळ सुरू केली. खोतांचीं कारणें पुष्कळ होतीं. एक तर सरकारनें वसुलाचा ठराव करण्यास सुरुवात केल्यानें उत्पन्न नक्की झालें व त्यामुळें त्यांच्या खोतीची किंमत, गहाण खरेदी करण्याच्या दृष्टीनें फारच कमी झाली. कुळांच्या दृष्टीनें पाहूं गेल्यास खोत, पूर्वी धान्य तयार होतांच त्यांतील आपला थलीचा वांटा घेत; नंतर रोकड कांहीं येणें असल्यास मागाहून घेत व त्यांतून भर न झाल्यास कुळांकडून अंगमेहनत करून घेऊन आपलें देणें कसें तरी भागवून घेत. आतां सेटलमेंट झाल्यामुळें कायदेशीर नक्त येणें जें ठरलें तें अगोदर कुळांस देणें भागच होतें; न दिल्यास त्यांच्या खात्याची विक्री होण्याचा संभव! पैशाचे देणें अगोदर व धान्याचें नंतर असा प्रकार ठरला असल्यानें, पैसे ठरविलेल्या हप्त्याचे तारखेस द्यावे लागल्यानें धान्य येईल त्या भावानें विकावें लागे, व धान्य देण्याचे वेळीं हातीं कांहीं नाहीं असें होई. शिवाय पूर्वी देण्यास सवड मिळत असे, तीही आतां ठराविक मर्यादा झाली, त्यामुळें खोतांकडून मिळेनाशी झाली. असा उलटा कारभार झाला. खोतांस आजपर्यंत जो फायदा मिळत होता, त्याचेवर एकदम गदा आली. खोत व कुळें यांचा जो सलोखा होता त्यांतही बिघाड पडला. खोतांना प्रत्यहीं कोर्टाची पायरी सरकार-विरुद्ध व कुळांविरुद्ध चढावी लागली. सेटलमेंटांत नांवें दाखल करण्याचे बाब-तींतही चुका होऊं लागल्या. कूळ कोणाला म्हणावें हें ठराविक नसल्यामुळें उपरी कुळांचीं नांवें सुद्धां दाखल होऊं लागलीं. केवळ सर्वेमुळें कुळांच्या विरुद्ध शेंकडों फिर्यादी दाखल झाल्या. सरकारनें ठरविलेली दस्ताची जबर रक्कम हप्त्याच्या ठरा-विक वेळीं न लागल्यानें कित्येक गांव जप्त झाले. त्याचप्रमाणें गांवच्या विक्री-चेंही प्रमाण फार वाढलें. सर्वे लागू करण्यास सुरुवात झाल्यापासून पांच वर्षांत आलेला अनुभव मि. नेअर्न यांनीं आपल्या नं. २९९ ता. २४।१०।१८७२ च्या पत्रांत नमूद केला आहे, व ४ वर्षांत ५६५६ जप्त्या झाल्या, १२९४ विक्र्या झाल्या, सर्वे नोंदी विरुद्ध १५६६ अपिलें झालीं असें दाखवून, जमिनी घेणारे न भेटल्यानें मामलेदारांनीं खोतांकरितां १ पै लास बोलून, खोताच्या त्या वर्षाच्या खोत-फायद्यांतून बाकी वसूल करून घ्यावयाची, अशी वहिवाट पडली. अशा रीतीनें खेड पेट्यांत ७१५ रुपये सरकारदस्त देणारी २०२२ एकर जमीन खोती खाजगींत

* "Enough has been said to show the unsuitability and inadequacy of the present law for carrying out any settlement in khoti villages."

दाखल करण्यांत आली. इसकें खोतांचें नुकसान झालें तरी सुद्धां क. फ्रान्सिस सारख्यांना त्यांत विलक्षण असें कांहींच वाटलें नाहीं. खोतांनीं खोतीसभा वगैरे स्थापन करून एकजुटीनें जोरानें प्रयत्न चालविला. मि. नेअर्न आणि एल्फिन्स्टन यांनीं रिपोर्ट केला. तेव्हां १८७३ मध्यें मि. हॅव्हलॉक कमिशनर स्वतः रत्नागिरी जिल्ह्यांत येऊन त्यांनीं चौकशी केली. खोत, धारेकरी व कुळें यांच्या तक्रारी एकून घेऊन रिपोर्ट नं. १५८० ता० २८।४।१८७३ चा केला. त्यांत सरकारचा दस्त पुष्कळ अंशीं कमी तरी करावा अथवा ऐनजिनसी थलीची आणि सालोसाल थल ठरविण्याची जुनी पद्धत सुरू करावी असें सुचवून आपलें मत खालीं टिपेंत उध्दृत केल्याप्रमाणें दुसऱ्या प्रकारास अनुकूल असल्याचें कळविलें.† त्यावेळीं खोतानीं चालविलेल्या चळवळीच्या परिणामाचें वर्णन रेव्हेन्यू कामिशनर मि. हॅवलॉक यांचे भाषेंत करावयाचें झाल्यास "खोतांस न रुचणाऱ्या गोष्टी अंमलांत आणण्याचा परिणाम पुष्कळ ठिकाणीं खोत आणि कुळें यांचेमध्यें वैर उत्पन्न होणेंत झाला, आणि कांहीं ठिकाणीं तर खोत आणि कुळें सरकारविरुद्ध एक झालीं यांत नवल नाहीं; खोतनिसबत जमिनींच्या विक्रयांनीं अविश्वास उत्पन्न झाला, इ." अशा रीतीनें १८६५ चा आक्ट वर दाखविल्याप्रमाणें अयोग्य आहे, त्याची भाषाही बरोबर नाहीं, सेट्लमेंटवर परिणामही व्हावा तसा होत नाहीं. व जिकडे तिकडे वर लिहिल्याप्रमाणें असमाधान झालें,असें दिसतांच सरकारनें निराळा कायदा करण्याचें मनांत आणलें व सन १८७३ चे जुलै महिन्याचे सुमारें एक मसुदा तयार करून त्यावर निरनिराळ्या अधिकाऱ्यांचीं मतें मागविण्यांत आलीं. मि. ई. टी. क्यांडी, गव्हर्मेंट चीफ सेक्रेटरी मि. चापमन वगैरे यांची मतें वाचनीय आहेत. परंतु तीं येथें सविस्तर देणें शक्य नाहीं. परंतु २८।१२।१८७३ रोजच्या मि. ए. टी. क्राफर्ड यांच्या मेमोरँडममधील एक उतारा येथें दिल्याविना राहावत नाहीं. " देशावरील रयतवारी पद्धत सुरू करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. त्यांत अत्यंत अपयश ( disastrous failure ) आलें. खोतांच्या, आपल्या सत्ताप्रकारावर

---

† " I beg respectfully to state that it appears to me well worth the consideration of Government, either that a material abatement of the Government fixed demand in cash should be made in the district of Ratnagiri brought under survey and assessment or return to the practice of grain rental and annual commutation should be permitted. I prefer latter course, because the Government revenue would thereby suffer diminution and because I fear that the poorest cultivating classes are not those who would principally benefit by the abatement which might be given."

ही गदा आहे ही गोष्ट लक्षांत आली. या वेळीं खोतांचा जमाव (combination) असा नव्हता. हल्लीं खोतांस एकवटून त्यांची चळवळ चालविणारे, स्वतः खोतच असलेले, धूर्त (astute) वकील, यांची त्या वेळीं तितकी ख्याति नव्हती अगर त्याचें आजचेइतकें वजनही बसलें नव्हतें. धिमेपणानें ते आपला मार्ग सावधगिरीनें काढीत होते. सर्वेची कामें पुढें सरसावू लागलीं आणि सर्व जमिनी कुळांचे नावां-वर चढविल्या गेल्या. खोतांची पांचावर धारण बसली. सर्वे कामगाराजवळ झालेल्या क्षुल्लक तक्रारीसुद्धां फुगवून भयंकर मोठे अन्याय असें दाखविण्यांत येऊं लागलें. द्वेषबुद्धि पसरविण्यास सुरवात झाली; जिल्ह्यांत एक सभा स्थापन झाली; इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रांत ओरड झाली आणि आमच्या खेडेगांवांतील जमिनीवर आमची मालकी आहे, असें मानल्याविना आमचें समाधान होणार नाहीं असें धिटाईनें पुकारण्यांत आलें."‡ यावरून खोतांनीं किती जोराची खटपट चाल-विली होती याची कल्पना होईल. विशेषतः धूर्त वकील कै. रा. सा. वि. ना. मंडलिक यांनीं खोतांची बाजू त्या वेळीं फारच जोरदार रीतीनें संभाळली. वतनदार खोतांविषयीं त्यांनीं तारीख १।२।१८७४ रोजीं "वतनदार खोतांचा संक्षिप्त इतिहास"§ या मथळ्याचा निबंध वतनदार खोतांच्या हक्कांची जाणीव सरका-रला करून देण्याकरितां, लिहिला. या निबंधांत रा. सा. मंडलिक यांनीं वतनदार

---

‡ "An attempt was made to introduce Deccan Ryatwari Settlement. Disastrous failure was the result. Khots saw that the blow was aimed at their tenure. At that time no regular combination existed among the Khots. The astute lawyer, himself a Khot, who now directs their combined action, had not the reputation, nor did he then possess his present local influence. He was only feeling his way coutiously. The survey operations progressed; all lands were entered in the tenants' names; general consternation arose among the Khots, a few trivial disputes with the survey officers were magnified into great wrongs at their hands; and ill-will was sedulously fostered by the malcontent leaders who now formed a formal "association" throughout the Zilla, worked the press, both native and English, and at last boldly throwing off the mask, declared they would be satisfied with nothing less than the absolute recognition of their proprietary rights in the soil of their villages."

§ "Brief History of watandar Khots" Writings and speaches of late R. S. V. N. Mandlik. Page 65.

खोतांनीं वतन मिळविण्यास काय काय प्रयत्न केले, पैसा व परिश्रम कसे ओतले, तें सप्रमाण दाखवून त्यांचेकडे वंशपरंपरा चालणाऱ्या, वर्ग करण्याचा हक्क असलेल्या, आणि जमिनीवर मालकी आहे, अशा खोती वतनाची जाणीव सरकाराला उत्पन्न केली. रा. सा. मंडलिकांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या खोती सभेनें जोराची चळवळ केली, फिर्यादीमागून फिर्यादी एकसारख्या चालू झाल्या व तितक्या सर्व चालविण्यास सरकारला त्रास व खर्च येऊं लागला. अशा रितीनें जोरानें चळवळ सुरू झाली. तेव्हां सरकारनें अखेर स. ठ. नं ४९८६ तारिख १६।९।१८७४ व स. ठ. नं ५७६३ तारिख ३०।१०।१८७४ चे दोन ठराव करून एक कमिशन नेमिलें, व त्यावर क. फ्रान्सिस, मि. ए. के. नेअर्न, रा. रा. नारो बाबाजी गोळे, व रा. रा. नारायण गणेश साठे या चौघांची नेमणूक करण्यांत आली. यासच खोती कमिशन असें ह्मणतात.

कमिशनच्यापुढें चौकशीकरितां कांहीं ठराविक प्रश्न दिले होते. खोत व कुळें यांचेमध्यें तडजोड होणें शक्य आहे किंवा नाहीं, आणि पुढील गोष्टी करणें इष्ट आहे कीं नाहीं—(१) धारेकरी आणि त्यांचेसारखे हक्कदार कोण आहेत तें ठरविणें. (२) धारेकरी यांच्या भात जमिनी कोणत्या तें ठरविणें. (३) शिरस्त्याची, वंशपरंपरा हक्क असणारीं, परंतु वर्ग करण्याचा अधिकार नसलेलीं कुळें कोणतीं ? (४) किती वर्षांच्या सततच्या वहिवाटीवर त्यांचा भोगण्याचा हक्क ( prescriptive right ) मानावा हें ठरविणें. (५) शिरस्त्याचे ( customary ) कुळांनीं धारण केलेल्या जमिनी ठरविणें. (६) कुळांनीं ऐनजिनसी थल काय द्यावी हें ठरविणें. (७) खोत आणि साधीं कुळें यांचे संबंधांत हात न घालणें; अगर (८) साध्या कुळांची शिरस्त्याची थल ठरवून त्यास वंशपरंपरेचा हक्क देणें; इतक्या गोष्टींची चौकशी करून रिपोर्ट करावयाचा होता. त्याप्रमाणें कमिशनचा रिपोर्ट तारीख ८।२।१८७५ रोजीं आला. रा. रा. ना. ग. साठे व रा. रा. ना. बा. गोळे यांनीं त्यास आपली भिन्नमतपत्रिका जोडली. कमिशनचा रिपोर्ट येतांच सरकारनें स. ठ. नं. १३५१ ता. ५।३।१८७५ चा करून, १८६५ च्या आक्टाप्रमाणें केलेले ठराव रद्द आहेत, पुन्हां पूर्ववत् ऐनजिनसी थल द्यावी व "जुलमी मागण्यापासून, पीक अन्नाचेसत्रा धरण्यापासून व खोतांचे दरसाल उशिरां अभावणी करण्यापासून, संरक्षण करण्याकरितां कायदा करण्याचा विचार चालू आहे," असें कुळांस जाहीर करावें, असें ठरलें. त्यानंतर सुमारें एक वर्षाचे आंत खोती आक्टाच्या इतिहासांत सुप्रसिद्ध व खोती से. आक्टांतील सर्व तत्वें मान्य करणारा असा स. ठ. नं. २४७४ तारीख २४।४।१८७६ चा ठराव करण्यांत आला. त्यांत—धारेकरी व त्यांच्या जमिनी कायम कराव्या; खोत सनदी असो वा नसो, त्यास वरिष्ठ धारणकरणाराचे (superior holder) हक्क आहेत. खोतांची जमा ठरवितांना शेंकडा १५ ते २५ सूट द्यावी; कुळांची नांवें जीं सर्व कागदीं दाखल करण्यांत येत होतीं त्यांचे सत्ताप्र-

कारासंबंधें भरपूर माहिती घ्यावी आणि त्यांची थल अथंल तिथंल या प्रमाणांत ठरवावी; १८६५ चे पूर्वी २० वर्षे सतत वहिवाट असलेल्या कुळाला खातेदार कूळ समजावें; इत्यादि ठरलें. थोडक्यांत लिहावयाचें ह्मणजे १८८० चा आक्ट १ यांत ग्रथित केलेल्या सर्व तत्वांचा समावेश केला गेला. हा ठराव होतांच त्याप्रमाणें गांवोगांव सेटलमेंट करण्यास सुरवातही झाली. या ठरावानें खोतांचें बऱ्याच अंशीं समाधान झालें व खोती सेटलमेंटचीं कामें संतोषानें चालूं लागलीं. परंतु या सरकारी ठरावाआधारें चालू असलेल्या सेटलमेंटास कायद्याचा आधार व मंजुरी पाहिजे असें ठरून अखेर कौन्सिलांत, १८७९ चें बिल नं० ३ सपटंबर १८७९ मध्यें आणण्यांत आलें. सिलेक्ट कमेटीचा रिपोर्ट तारीख ३।१।१८७९ रोजीं झाला व तिसरें वाचन होऊन तारीख ६।१।१८८० रोजीं बिल पास झालें. हाच १८८० चा आक्ट १ खोती सेटलमेंट आक्ट होय. आक्ट पास होऊन खोती सेटलमेंटची झालेलीं कामें मंजुर झालीं व पुढें सर्व जिल्हाभर त्या आधारें सेटलमेंट झालें.

१८८० चा आक्ट १ हा सरकार, खोत व कुळें यां त्रिवर्गातील एक प्रकारें तडजोडच होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. खोतांचे मालकीहक्काचे मागणीला कायद्याचे स्वरूप न येतां तो प्रश्न तसाच मुग्ध राहिला. कुळांस सरकारचे दृष्टीनेंही थलीचे बाबतींत मिळावी तितकी सवलत मिळाली नाहीं; खोतांची सत्ता त्यांचेवर राहिलीच. त्यामुळें ऐनजिन्नसी थल देण्याबद्दलचा ठराव कुळांस जड जातो ही गोष्ट सरकारला दिसूं लागतांच, ही कुळांवरील आपत्ति दूर करण्याकरितां, ऐनजिन्नसी थल अजिबात काढून टाकण्याचे विचारानें सरकारनें कौन्सिलांत १८९८ सालीं नं० ४ चें बिल आणिलें. त्यास जोडगोळी ह्मणून खोती सेटलमेंट कामगाराचे ठरावामुळें होणारें खोतांचें नुकसान टाळण्याकरितां व कांहीं बाबतींत आक्टांतील ठरावांस गलकालसापेक्षता देण्याकरितां रा० रा० दाजी आबाजी खरे यांनीहि खोतांतर्फे नं. ५ चें बिल त्याच वेळीं कौन्सिलांत आणिलें. बिल नं. ४ ला विरोध बराच झाला. तेव्हां १९०० सालीं जानेवारी महिन्यांत तें सरकारनें मागें घेतलें. रा० रा० खरे यांनींही आपलें मागें घेतलें. मध्यंतरीं सन १८९० सालीं स० ठ० ८३९८ तारीख ९।६।१८९० चा ठराव सरकारनें पास करून त्यावरून खोतांस पाटील व कुळकर्णी यांचीं कामें करावयास लावणेचा व खोतांवर पुष्कळशीं रेव्हेन्यूकडील कामें लादण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या वेळच्या खोती सभेनें त्या विरुद्ध जोरानें झगडून सरकारला तसें करण्यापासून परावृत्त केलें. त्या वेळीं खोती सभेचे सेक्रेटरी असतां रा. रा. गणेश कृष्ण देशमुख यांनीं लिहिलें "खोती प्रश्नासंबंधें विचार" हें पुस्तक या बाबतींत फारच महत्वाचें आहे. १८९८ चा प्रयत्न फसला. तथापि तेवढ्यावर न थांबतां मुख्यत: ऐनजिन्नसी थलीचें रूपांतर नक्त थलींत करण्याचे हेतूनें पुन्हां १९०३ मध्यें नंबर ६ चें बिल सरकारनें आणिलें व पहिलें वाचन तारीख १०।१२।१९०३ रोजीं पुरें झालें. रा० रा० दाजी आबाजी खरे यांच्या भिन्नमतपत्रिके-

सद सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट ता. ८।२।१९०४ रोजीं आला व पुष्कळ चर्चा होऊन बिलाचें तिसरें वाचन झालें व तारीख २७।४।१९०४ रोजीं पास झालें. रा. रा. दा. आ. खरे यांनीं या वेळीं बरीच महत्वाची कामगिरी केली यांत शंका नाहीं. त्यानंतर पुन्हां खातेदार कुळांस खात्याचा वर्ग करितां येऊं नये या धोरणानें कलमें ९।१० यांत सुधारणा करण्याकरितां नं. ७ चे बिल मे १९११ त कौन्सिलांत आणण्यांत आलें. सिलेक्ट कमेटीचा रिपोर्ट तारीख २९।१।१९१२ रोजीं होऊन अखेर १९२१ चा आक्ट ८ पास झाला. सन १९१३ त लँड रेव्हेन्यू कोडांत सुधारणा करण्याकरितां एक बिल आलें. त्या वेळीं खोती आक्टांत थोडी सुधारणा करणें आवश्यक झालें, व १९१३ चा आक्ट ४ पास झाला. वर नमूद केलेले आक्ट केव्हांपासून लागू झाले, (पान ७) व त्यामुळें काय काय दुरुस्त्या झाल्या तें प्रसंगानुसार टिपांत दिलें आहे.

अशा रीतीनें वेळोवेळीं सुधारणा झाल्याप्रमाणें चालू कायदा अस्तित्वांत असून सुरळीतपणें व्यवहार चालू होते. अशा स्थितींत कुळांनीं आपणास जास्त हक्क मिळावे, ह्मणून मागणें करण्यास सुरुवात केली. जिकडे तिकडे कुळांचे संघ खोतांविरुद्ध होऊं लागले व बरीच खळबळ उडाली. १९२६ मध्यें कौन्सिल मेंबर मि. बोले व ॲ. सुर्वे यांनीं खोती नष्ट करावी, व खोतासंबंधें चौकशी करण्याकरितां कमिशन नेमावें अशा अर्थाचे ठरावही कौन्सिलांत आणले; त्यामुळें त्यावेळचे कमिशनर मि. मॉटफर्ड यांचेकडून सरकारनें चौकशी करविली व अखेर तारीख २१।७।१९२६ रोजीं स. ठ. L. C. २०८३ प्रसिद्ध करून सरकारनें हात घालण्यासारखें कांहीं नाहीं; १८६५ च्या आक्टाप्रमाणें साध्या कुळांच्या सुद्धां नोंदी झाल्या होत्या, त्यांचे आधारावर खातेदाराचा हक्क आपणास मिळावा असें कुळांचें मागणें आहे. परंतु तें सेटलमेंट सरकारनें चुकीचें ह्मणून रद्द केलें असल्यामुळें नोंदी करून कांहींएक हक्क त्यांस मिळावयाचा नाहीं; खोतांच्या खासगी जमिनींत ४०।५० वर्षें सतत वहिवाट असलेलीं कुळें आपणांस कायम कुळें समजावीं असें मागणें करीत आहेत, व लँड रेव्हेन्यू कोड कलम ८३ अशा कुळांस लागू करण्यांत येईल की काय अशी खोतांस भीति वाटत आहे. परंतु तें कलम लागू होणें शक्य नाहीं, कारण १८७६।१८७९ मध्यें जी चौकशी झाली ती अगदीं पूर्ण झाली असल्यानें १८४५ च्या पूर्वींची आपली वहिवाट असें कोणास ह्मणणेंहि शक्य नाहीं; १८७६ सालीं प्रसिद्ध स. ठ. २४७४ चा झाला त्या वेळींच खोत आणि सरकार यांचे दरम्यान खोतांनीं १८४५ पासून ज्यांची वहिवाट आहे त्यांस निरंतरचीं कुळें समजावें व सरकारनें त्याबाहेर कोणासही खातेदार कूळ समजूं नये, अशीं अभिवचनें देण्यांत आलीं असल्यानें तीं आतां मोडणें शक्य नाहीं; वगैरे जाहीर केलें. सरकारचा पाठिंबा नाहीं असें दिसतांच रा. बोले व रा. सुर्वे यांनीं आपलीं बिलें मागें घेतलीं.

## कुलाबा जिल्ह्यांतील खोती.

रत्नागिरी जिल्ह्याला खोती से० आक्ट लागू करण्यांत आला, तसा कुलाबा जिल्ह्याला लागू नसल्यामुळें तेथील परिस्थितीचें अवलोकन करणें प्राप्त आहे. रत्नागिरी व कुलाबा यांमध्यें, सन १८७६ चा सरकारी ठराव २४७४ पास होईपर्यंत कांहीं फरक नव्हता. परंतु तेव्हांपासून फरक पडत जाऊन कुलाबा जिल्ह्यांत पूर्वीची स्थिति कायम राहिली व रत्नागिरी जिल्ह्यांत मात्र कायदा पास करण्यांत आला. खोती से. आक्ट कलम १ यांत कुलाबा जिल्ह्याला आक्ट लागू करण्याचा अधिकार गव्हर्नर–इन् कौन्सिल यांचेकडे दिला असतांही अद्याप आक्ट लागू करण्यांत आला नाहीं. त्यामुळें आजपर्यंत कुलाबा जिल्ह्यांतील खोती १८६५ चा आक्ट १ कलमें ३७।३८ व त्या आधारें घेण्यांत येणाऱ्या कबुलायती यांवर अवलंबून आहे. या कलमांचा विचार, वर व पुढें आक्टांत (पान १० ते १५ पाहा) भरपूर केला आहे. खोती सेटलमेंट आक्ट लागू असलेल्या खोतकींत व १८६५ च्या आक्टाप्रमाणें चालू असलेल्या खोतकींत, कितपत फरक आहे याचा विचार करणें आवश्यक आहे.

खोती सेटलमेंट आक्ट कलम ३ मधील सर्व व्याख्या कुलाबा खोतीस लागू पडतात. खोती जमिनींचे बाबतींत धारा, खोती खासगी व खोत निसबत जमिनी असा भेद आहेच. कलम ४ प्रमाणें जमा देईपर्यंत खोती चालेल असें सरकारचें आश्वासन आहेच. कलम ५ प्रमाणें खातेदार अगर "निरंतरचें कूळ" याची व्याख्या नसून कलम ३८ प्रमाणें खोत निसबत जमिनींत मूळ सर्व्हे अगर तपासणी सर्व्हेच्या वेळीं ज्या कुळांची नांवें दाखल आहेत तीं सर्व कायम कुळें गणलीं जातात. कलम ६ चें अर्थातच कारण नाहीं. कलमें ७।८ यांचे प्रमाणेंच कुलाबा कुळांची स्थिति आहे. कलम ९ प्रमाणें पूर्वीपासून अस्तित्वांत नसेल तर वर्ग करण्याचा अधिकार नाहींच. कलम १० चे बाबतींत लँ रे. कोडप्रमाणें सर्व व्यवस्था चालते. कलम ११।१२ यांबद्दल कुलाबा खोतीसंबंधें कांहीं ठराव नाहीं. कलमें १४।१५ यांबद्दल कबुलायतींत करार आहेत. कलमें १६ ते २२ याप्रमाणें सेटलमेंट होत नाहीं. परंतु १९१४ पासून रेकार्ड ऑफ राईट लागू करण्यांत आलें असून त्यांत निरनिराळ्या नोंदी काय व कशा कराव्या याबद्दल ठरलें आहे. कलम २३ चें या जिल्ह्याला कारण नाहीं. कलम २४ मधील ठराव महत्वाचा आहे, त्याबद्दलचा स्पष्ट करार कबुलायतींत केलेला असतो. क. २५ प्रमाणें कबुलायत घेण्याचें बंद झालेलें नसून कबुलायती घेण्याचा क्रम चालू आहे. कलमें २६ ते ३२ हीं वहिवाटदार खोत, त्याची नेमणूक व कर्तव्यें वगैरेसंबंधें असून कुलाबा जिल्ह्याचे बाबतींत हा प्रश्न कबुलायतींत घातलेला आहे. वाटपानें वगैरे खोत स्वतंत्र झाले असतां वहिवाटदार खोत नेमण्याचें कारण नाहीं असें स. हु. नं. ४५८० तारीख १२।४।१९२७ यांत ठरलें आहे. कलम ३३ प्रमाणेंच धारे-

करी यांस सरकारदस्त लोकलफंड द्यावा लागतो; कुलाबा जिल्ह्यांत कच्चे धारेकरी नाहींतच; खोतनिसबत जमिनींतील कायम कुळाचे बाबतींत कलम ३८ प्रमाणें सेटलमेंटचे ठराव झाले असून खोतांच्या कबुलायतींत त्याप्रमाणेंच घेऊं असा करार आहे. खरीप जमिनीचे बाबतींत एक रुपया दस्त व फायद्याबद्दल आठ आणेमानानें सड्या पायली भात व दर मणास १० पेंढे; वर्कस जमिनीचे बाबतींत दस्त एक रुपया असल्यास फायद्याबद्दल बारा आणे याच मानानें ऐनजिन्नसी गल्ला ६ पायली, पैकीं निम्मे नागली व निम्मे वरी; रब्बीचे बाबतींत दस्त एक रुपया असल्यास तो व फायद्याबद्दल नक्त आठ आणे, याप्रमाणें वसूल करण्याबद्दल कायमचा ठराव झालेला आहे. त्यामुळें अभावणी करण्याचें अगर "मोबदला–किंमत" ठरविण्याचें कारणच नाहीं. कलम ३५ प्रमाणें ठरलेल्या बेकायदेशीर पट्ट्या व बाकी न घेण्याबद्दल कबुलायतींत करार असतो. कलम ३६ प्रमाणें धारेकरी व इतर हक्कवाले खातेदार यांचेकडून लोकलफंड वसूल करण्याचा हक्क कबुलायतींत नमूद केलेला आहे. कलमें ३७।३८।३९।४० यांचें लँड रे० कोड लागू असल्यामुळें कांहीं कारण उरत नाहीं. कलम ४१ लागू नसून त्याचे ऐवजीं लँड रे० कोड कलम ३८ लागू आहे. या बाबतींत एक दोन सरकारी महत्वाचे ठराव आहेत. स. ठ. नं. १००८७ तारीख २३।१२।१८९२ या ठरावानें कुलाबा जिल्ह्यांतील (खोतांनीं) धारण केलेल्या सर्व जमिनींतील राखींव अगर न राखींव झाडांवरील हक्क सोडून दिला असून वर्कस जमिनींतील साग, शिसवा आणि चंदन या झाडांवरील हक्क मात्र सरकारनें आपलेकडे ठेविला. त्यानंतर स. ठ. नंबर ८३३ तारीख ३०।१।१८९३ प्रमाणें यापुढें खोत निसबत जमिनींत वाढणाऱ्या झाडांवरील हक्क सरकारनें सांडला. याप्रमाणें तुलना करितां कुलाबा खोतींत व रत्नागिरी खोतींत फारसा फरक नाहीं असेंच ह्मणणें प्राप्त होईल.

कुलाबा खोतीप्रकारांत महत्वाचे फरक दोन तीन बाबतींत आहेत. पहिला महत्वाचा फरक ह्मणजे कुलाबा खोतांकडून कबुलायती घेण्यांत येतात. या कबुलायतीचा इतिहास कलम २५ खालीं (पुढें १९७ ते २०० पानांवर,) दिला आहे. १८८० नंतर त्यांत काय काय शर्ती जास्त घालण्यांत आल्या त्या कितपत योग्य व बंधनकारक आहेत, याबद्दलचा उहापोह गणपती वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं. लॉ. रि. ७५४ यांत झालेला असून कबुलायतीचा नमुनाही दिला आहे. त्या आधारें आतां कबुलायतीवर खोतांचे हक्क अवलंबून नसून कबुलायती घेणें त्या कायदा व शिरस्ता यांस धरूनच घेतल्या पाहिजेत असें ठरलें आहे.

दुसरा महत्वाचा फरक म्हणजे गांवचे जप्तीचे बाबतींत. खोतांकडून सरकारदस्ताचा भरणा वेळीं न झाल्यास लँ. रे. कोड क. १४४ प्रमाणें गांव जप्त होतो. कलम ३९ खालील टिपांत क. १४४ व क. १५९ याप्रमाणें जप्ती होण्यांत फरक काय, अशा जप्तीचा अखेर परिणाम काय होतो, याबद्दलचा भरपूर विचार केला आहे (पान

२८५ ते २८७ पहा). कलम १४४ प्रमाणें कुलाबा जिल्ह्यांतील गांव जप्त होत असल्यामुळें खोत फायदा मागण्याचा हक्क खोतांस प्राप्त होत नाहीं. याबद्दल पुष्कळ सरकारी ठराव १८६८ पासून झालेले आहेत. त्यांपैकीं शेवटचा ठराव स. ठ. ९७५८ तारीख १२।१०।१९०६ चा असून, स. हु. नं. ८७२४ तारीख ७।९।१९१६ होऊन त्यावरून जप्त झालेले खोती गांवात खर्चा करितां म्हणून केवळ दोन आणे फायदा घ्यावा असेंही ठरविलें आहे. याबद्दल ना. हायकोर्टाचे ठरावही झालेलें आहेत त्याबद्दलचा विचार पुढें योग्य ठिकाणीं सविस्तर केला आहे.

३. तिसरा महत्वाचा फरक म्हणजे सेटलमेंटचे कागदांचे बाबतींत. रत्नागिरी जिल्ह्यांत खोती गांवांचे बाबतींत बोटखत व इतर महत्वाचे कागद असून त्यांस खोती सें. आक्टानें विशेष महत्व दिलें गेलें आहे. कुलाबा जिल्ह्याचे बाबतींत तसा प्रकार नाहीं. सर्व सेटलमेंटचे इतर सर्व कागद कुलाबा जिल्ह्यांत सन १८६५ चा आक्ट १ व लँड रेव्हेन्यू कोड यांस अनुसरून झालेले आहेत. कुलाबा जिल्ह्यांत विशेष प्रकारचे कागद कांहीं आहेत. १८५३।५४ च्या सुमारास 'तेरीज कुळरुजवात' (तेरीज चौकनीस) या नांवाचा नमुना खोतांकडून भरून घेतला जात असे. त्यांत कुळांची नांवें देऊन प्रत्येकाकडून येणें गल्ला अगर नक्त किती, त्या सालाला प्रत्येक कुळाकडून वसूल काय आला, हें लिहून त्यावर प्रत्येक कुळाची सही घेण्यांत येई; व नंतर त्याची सरकारी अधिकारी रुजवात घेत. १८६२।६३ सालापासून जंगलखर्डा, ह्मणून एक कागद तयार करण्यांत येई. यांत प्रत्येक ठिकाणाचें नांव, सर्वेनंबर, पोटनंबर, प्रतवार क्षेत्र, ठिकाणाच्या हद्दी, इ० लिहून ज्याचें नांवें खातें आहे ह्मणजे ज्याकडून वसूल यावयाचा त्याचें नांव देऊन सर्व कागदीं काय स्थिति आहे तें दिलेलें आहे. गांव जप्तींत असतां "एकंदर जमाबंदी कुळवार ठरावबंदाचे व कुळाचें खात्याचे मेळाचें" टिपण करण्यांत येई व त्यांत प्रत्येक कुळाचें नांव, लावणी असलेली जमीन, येणें वसूल, वगैरे माहिती दिलेली असे. १९१४ सालापासून स. ठ. नं. ४१८७ तारीख ५।५।१९१४ चा होऊन कुलाबा जिल्ह्यांतील खोती गांवास रेकार्ड ऑफ राईट लागू करण्यांत आलें. रेकार्ड ऑफ राईटमध्यें नोंदणी करितांना, मूळच्या सर्वेच्या वेळीं खोताच्या अगर खोत हिस्सेदारांच्या नांवांवर असलेल्या सर्व जमिनी, मूळ सर्वे झाली तेव्हांपासून खोत या नात्याव्यतिरिक्त खरेदी अगर अन्य कायदेशीर वर्गाचे आधारें मिळविलेल्या जमीनी, व मूळ सर्वेच्या वेळीं खोत निसबत पडित खात्यांत सामील असून खोतानें स्वतः आपल्या खर्चानें वहिवाटीस आणलेल्या जमीनी, या सर्व खोती खासगी समजाव्या; मात्र त्यांत; खोतांकडे आलेल्या (lapsed) धारा अगर खोतनिसबत जमिनी, खोतनिसबत पडित खात्यांतील खोताव्यतिरिक्त अन्य इसमानें वहिवाटींत आणलेल्या जमिनी, आणि खोत या नात्यानें मिळविलेल्या जमिनींचा समावेश होत नाहीं; अशा सर्व जमिनी खोतानिसबत समजाव्या असें ठरलें. त्यानंतर पुन्हां स. ठ. नंबर १३०५० तारीख २९।१२।१९१४

चा ठराव होऊन नमुना नंबर १ (क) लिहितांना रकाना ९ मधील मजकूर काळजी-पूर्वक लिहावा. खोती नसलेली जमीन, इनाम, कौली, धारा, जशी असेल त्याप्रमाणें दाखल करावी. बिन आकारी जमीन सनदी खोत आपल्या खोतींत असल्याचें शाबीत न करील तर सरकारी ह्मणून दाखल करावी. रकाना १० मध्यें "खातेदार अथवा वरिष्ठ धारणकरणारा" या सदरांत, धारेकरी, कौलदार, इनामदार इ. यांचीं नांवें द्यावीं. या रकान्यांत खोत या नात्यानें धारण करो, अथवा खोती खासगी जमिनींचा मालक ह्मणून धारण करो, खोताचें नांव लिहावें. खोती खालसा झाल्यास खोताला सर्व खोत निसबत जमीन सोडावी लागेल, खोती खासगी मात्र त्याचेकडेच राहील. पूर्वीं खोत निसबत ह्मणून दाखल झालेली जमीन विरुद्ध हुकूम होईपर्यंत खोत निसबत ह्मणून गणली जाईल, वगैरे ठरलें; व याप्रमाणें रेकार्ड ऑफ राईट मध्यें नोंदणी झाली आहे व होत आहे. त्यानंतर तारीख ५।८।१९१८ च्या मुं. स. ग्याा० भाग ५ पान ७८३ येथें हाच नमुना प्रत्येक रकानेवार कसा भरावा याबद्दलच्या सविस्तर सूचना प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांत ८ रकान्यांचा नवीन नमुना दिला असून त्यांत खोताचे नांव, आणेवारी हिस्सा, पाळीचा क्रम, खोताचा दर्जा, फायदा, कुळाचा वर्ग करण्याचा अधिकार, व फेरफार वगैरे माहिती द्यावयाची आहे. दिला गहाण असल्यास गहाणदाराचें नांव त्यांत दाखल करण्यांत येतें. दिगरबाद नमूद करावयाची नाहीं, असेंही सुचविलें आहे. रकाने १२ व १३ यांत मूळ सर्वेचे वेळीं दाखल असलेलीं सर्व कुळें, त्यांचेकडून येणें ठरलेली रकम, त्यांचे वारसांची अगर कायदेशीर हक्कदारांचीं नांवें, व खोत निसबत जमिनींतील खोतानें उत्पन्न केलेलीं कायम कुळें, (नांवें दाखल करण्यास आपसांतील कसरानें हरकत नसल्यास), दाखल करावीं. कोणीच कूळ नसेल तर रकाना कोरा सोडावा. मूळ सर्वेच्या वेळीं नांव दाखल असून कबजा लढाईनें काढला अगर त्यास एकसाली कूळ बनविलें असें झाल्याचें आढळेल त्या वेळीं कलेक्टरकडे रिपोर्ट करावा. अशा कुळांचीं नांवें कबजेदार ह्मणून रकाना १३ यांत नमूद करावीं व त्यांत स्पेशल ठराव नसल्यास खोत-फायद्यासह देणें काय तें नमूद करावें, जर कुळ फाजिल देतो असें आढळेल तर कलेक्टरकडे रिपोर्ट करावा व कलेक्टर जो ठराव करील तो दाखल करावा, वगैरे सूचना आहेत; व त्याप्रमाणें नोंदणीचें काम चालू आहे.

रत्नागिरी खोत व कुलाबा खोत यामध्यें फारसा फरक नाहीं हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईलच, परंतु अद्याप खोती सेटलमेंट आक्ट त्यांस लागू करण्यांत आलेला नाहीं. कुलाबा खोतांनीं अशा तऱ्हेची द्विधा प्रवृत्ति झाल्याचें दिसू लागतांच रत्नागिरी खोतांप्रमाणें आपणास कायदा लागू करावा असें मागणें केलें आहे व जोराचे प्रयत्न चालविले आहेत, परंतु त्यांचे ते सर्व प्रयत्न निष्फळ झाले आहेत. खोती कमिशनचा रिपोर्ट होऊन स. ठ. नं. २४७४ चा १८७६ सालीं होतांच तो आप-

गांस लागू करावा म्हणून ता. २७।२।१८७८ रोजीं कुलाबा खोतांनीं अर्ज केला त्यास सरकारनें स. ठ. नं. १२४४ तारीख ८।३।१८७८ चा ठराव करून " रत्नागिरी जिल्ह्यांतील खोती गांवच्या प्रश्नाचा अखेर निकाल लागेपर्यंत तुमच्या अर्जाचा विचार करितां येत नाहीं, " असा जबाब मिळाला. खोती बिल १८७९ सालीं कौन्सिलांत आणिलें त्या वेळीं तारीख २७।१०।१८७९ रोजीं माणगांव तालुक्यांतील खोतांनीं खोती बिलांत कुलाब्याचा समावेश करावा अशी मागणी केली. दक्षिण भागचे कमिशनर मि. काफर्ड यांनीं अनुकूल रिपोर्ट केला. परंतु सरकारनें त्यास मान्यता न देतां स. ठ. नं. ६०० तारीख ४।२।१८८० च्या ठरावानें " गव्हर्नर जनरल यांची मंजुरी मिळून खोतीबिलाला कायद्याचें स्वरूप येईपर्यंत कुलाबा जिल्ह्याला या बिलांतील ठराव लागू करितां येत नाहींत " असा ठराव केला. त्यानंतर खोती से. आक्ट ६ मे १८८० रोजीं कायदा म्हणून लागू झाल्याबरोबर तो आपणांस लागू करावा म्हणून तारीख १।११।१८८० रोजीं व ८।८।१८८१ रोजीं असे दोन लागोपाठ अर्ज झाले. त्यावर स. ठ. नं. ५१२४ तारीख ५।९।१८८१ च्या ठरावानें, " सर्व्हे आक्टानें दिलेल्या अभिवचनाची ( guarantee ) मुदत चालू असल्यामुळें व सेटलमेंटांत फरक करणें कुळांस आवडेल असें वाटत नाहीं, सबब खोती सेटलमेंट आक्ट लागू करितां येत नाहीं " असें उत्तर मिळालें. सन १८९२।९३ सालीं सेटलमेंटची मुदत संपताच पुन्हां अर्ज झाला; परंतु त्यास नकारार्थीच उत्तर मिळालें. त्यानंतर १८९३ सालीं आबाजी वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट या नांवाचा नं. ३९ सन १८९३ चा ठाणें डि. कोर्टांत दावा याच मुद्यावर चालून ना. हायकोर्टांत नं. ९८।१९०५ चें अपील झालें व त्याचा निकाल १९११ सालीं झाला. अठरा वर्षें त्रास व पैसा खर्च होऊन अखेरीस सेटलमेंटची मुदत ता. १२।६।१८९५ च्या ठरावावरून वाढविली असल्यानें वादीनें दावा केला तेव्हां दाव्यास कारणच घडलें नव्हतें या मुद्यावर ठाणें कोर्टाचा निकाल रद्द करण्यांत आला. त्यानंतरचा महत्वाचा प्रयत्न म्हणजे सन १९१२ सालीं खोती आक्ट दुरुस्तीचें बिल कौन्सिलपुढें आलें त्या वेळीं केला गेला, परंतु त्यासही " सध्यां सरकारला मिळालेल्या सल्ल्यावरून खोती कायद्याची कलमें कुलाबा जिल्ह्याला लागू करणें सरकारास इष्ट वाटत नाहीं " असें उत्तर मिळालें. अशा रीतीनें आजपर्यंत केलेले सर्व प्रयत्न फुकट गेले.

## साष्टी खोती

" साष्टी " हें नांव सासष्टी म्हणजे साठ गांवें असलेला प्रांत, यावरून रूढ झालें आहे. इंग्रजींत यालाच साल्सेट ( Salsette ) असें म्हणतात. साष्टी तालुका ठाणें जिल्ह्यांत आहे. याच तालुक्यांत कान्हेरीचीं लेणीं वगैरें प्रसिद्ध लेणीं असून ठाणें प्रांताच्या इतिहासाला सुरवात व महत्व याच भागामुळें आहे असें म्हटल्यास

चुकीचें होणार नाहीं. इतिहासकाळाच्या सुरवातीपासून ठाणें, सोपारा, कल्याण, संजाण हीं बंदरें पश्चिम हिंदुस्थानच्या व्यापाराचीं केंद्रें असून कोंकणाकडे देशावरील राजांचें लक्ष जाण्यास ह्याच बंदरांचें ऐश्वर्य कारणीभूत झालें. या बंदरांतून ईजिस फिनीशिया, बॅबिलोन (ई. स. पूर्वीं २५०० ते ई. स. पूर्वीं ५००); त्यानंतर ग्रीक (इ. स. पूर्वीं २५० ते इ. स. २५०) इराण, अरबस्थान (इ. स. ७०० ते. १२००); त्यानंतर पोर्टुगीझ, डच, इंग्रज, यांचे बरोबर जोरानें व्यापार चालत असे. हिंदुस्थानचें ऐश्वर्य याच बंदरांतून यूरोपमधील पाश्चिमात्यांना कळलें असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. ठाणें शहराचा इतिहास फार जुना व उज्वल आहे; परंतु तो येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. साष्टीसंबंधाचा जुन्यांत जुना उपलब्ध उल्लेख बेदरचा राजा दुसरा अल्लाउद्दीन यांचे कारकीर्दींत म्हणजे इ. स. १५२० चा आहे. त्यानंतर साष्टीच्या इतिहासास सुरवात पोर्टुगीझ लोकांनीं वसई येथें आपली वखार इ. स. १५२६ मध्यें घातल्यापासून होते. इ. स. १५३४ च्या सुमारें पोर्टुगीझांनीं साष्टी प्रांत जिंकला व तेव्हांपासून त्याची व्यवस्था ते पाहूं लागले. पोर्टुगीझांनीं आपला अंमल हळूहळू वाढवून चौलापासून दमण-पर्यंतचा भाग आपल्या ताब्यांत घेतला व त्याची व्यवस्था नीट ठेवण्याकरितां इ. स. १५३५ त वसईचा किल्ला बांधला. पोर्टुगीझ यांचेकडे साष्टी आल्यानंतर त्यांनीं त्यांतील निरनिराळीं खेडीं व्यवस्थेकरितां व उत्पन्न गोळा करण्या-करितां पोर्टुगीझ अधिकारी व शिपाई यांचेकडे दिलीं. आपल्या ताब्यांतील खेड्यां-बद्दल ते ठराविक मक्ता कांहीं रोख व कांहीं ऐनजिन्नस याप्रमाणें देत. साष्टीप्रांत १५६० च्या सुमारास बराच मोठा असून त्यांत साष्टीबेट व जवळचीं ९९ खेडीं हा एक भाग व ठाणें व त्याच्या ८ "पाखाड्या" हा दुसरा, असे दोन भाग होते. पोर्टु-गीझांची सत्ता चालू होती तोंपर्यंत त्यांनीं ख्रिश्चन धर्माचा प्रसार सक्ती करून केला; परंतु इतर बाबतींत शांतता राहिल्यानें देशाची स्थिति सुधारली. इ. स. १६६२ पासून या प्रांतावर शहाजी, शिवाजी यांनीं हल्ले करण्यास सुरवात केली. पोर्टुगी-झांनीं इंग्रजांस मुंबई शहर दिल्यानंतर, इ. स. १६६५ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत फक्त ११९ इंग्रज मुंबईत दाखल झाले, व तेव्हांपासून इंग्रज व पोर्टुगीझ या दोघांनीं एक विचारें डच लोकांचा हिंदुस्थानांतून उठाव करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांकडे मुंबई शहर आल्यापासून त्याची हळूहळू भरभराट होत गेली. याच सुमारास या प्रांतावर मधून मधून सिद्दी व मराठे व मोंगल यांचे हल्ले येतच होते. समुद्राचे बाजूनें सिद्दी, आंग्रे वगैरेसही तोंड देण्याचा प्रसंग वरचेवर येई. इ. स. १७३१ मध्यें कानोजी आंग्रे मयत झाल्यानंतर आंग्रे घराण्यांत दुही माजली व याचा फायदा पोर्टुगीझांनीं घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचें कांहीं चाललें नाहीं. मराठ्यांनीं इ. स. १७३७ मध्यें साष्टीवर हल्ला केला, घोडबंदर काबीज केलें व ठाणें आणि वसई यांचेमधील संबंध तोडला. पुढें इ. स. १७३९ मध्यें चिमणाजी आप्पानें वसईवर

स्वारी करून तो किल्ला सर केला व या प्रांतांत पेशव्यांचा अंमल बसविला. पोर्तुगीज जमीनदार आपल्या जमिनी सोडून गोव्याकडे पळाले. पोर्तुगीज सत्तेचा बीमोड झाला. इंग्रजांनी पेशव्यांशीं टक्कर देण्याची त्या वेळीं ताकद नव्हती. ह्मणून त्यांनीं आपले वकील पेशव्यांकडे पाठविले व मुंबई शहराभोंवतीं एक खंदक खणला. इंग्रज वकिलांनीं त्यावेळीं लार्डीगोडीनें तह घडवून आणला ह्मणून मुंबई वांचली. इ. स. १७०७ मध्यें आंग्र्यांची सत्ता अजिबात नष्ट झाली व पेशव्यांचाही इ. स. १७६१ त पानिपत येथें मोठा पराभव होऊन महाराष्ट्रांत सर्वत्र हाहाःकार उडाला. इंग्रजांस ही संधी आयतीच मिळाली. त्यांनीं आपली बळकटी करण्यास व सैन्य वाढविण्यास सुरुवात केली. पानपतच्या लढाईनंतर पेशवाईत माजलेल्या दुहीचा फायदा इंग्रजांनीं घेतला व हळूहळू आजुबाजूचे प्रांत जिंकण्यास सुरुवात केली; व इ. स. १७७५ च्या जानेवारी महिन्यांत साष्टी प्रांत घेतला. साष्टी हा प्रांत त्या वेळीं उत्पन्नाला फारच चांगला असल्यामुळें इंग्रजांचा फायदा बराच झाला. साष्टीप्रांत इंग्रजांचे ताब्यांत आल्यापासून इंग्रजांची चलतीच होत गेल्यामुळें तो त्यांचे सत्तेखालीं राहिला. पुढें १८१८ मध्यें पेशवाईचा शेवट होऊन जिकडे तिकडे इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली.

इंग्रजाकडे सत्ता आल्यानंतर इ. स. १७९३ च्या सुमारास साष्टी प्रांतांतील बराचसा भाग ओसाड पडला होता, परंतु पुढें पोर्तुगीजांप्रमाणें मोठमोठ्या इस्टेटी कायम करारानें देऊन या प्रांताची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न इंग्रजांनीं केला. इ० स० १८०१ मध्यें एक जाहिरनामा काढून साष्टींतील जमीनदारांशीं कायमचें सेटलमेंट करण्याचा प्रयत्न सरकारनें केला, परंतु या संधीचा फायदा केवळ चार जमिनदारांनींच घेतला. पुढें १८०८ चा रेग्युलेशन १ पास करण्यांत आला. हा रेग्युलेशन फारच महत्वाचा असून त्यांत एकंदर जुन्या परिस्थितीचें वर्णन केलेलें आहे. या रेग्युलेशनप्रमाणेंच साष्टी तालुक्यांतील व्यवस्था अद्यापही चालू आहे.

साष्टी तालुक्यांत एकंदर १४० गांवें आहेत; परंतु त्यापैकीं फक्त ५० गांवांतच खोती आहे. साष्टींतील खोती, आणि रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यांतील खोती यांत महदन्तर आहे. इसवी सन १८०८ च्या रेग्युलेशन १ कलम १८ मध्यें खोत हे केवळ जास्तींत जास्त दस्त देण्याचें कबूल करून गांव घेणारे तात्पुरते मक्तेदार होत, असें ह्मटलें आहे. "या तालुक्यांतील "खोत" ही संज्ञा ५० गांव धारण करणारांचे बाबतींत चुकीनें लावण्यांत येते. कारण ते सर्व ब्रिटिश सरकारनें, कांहीं मुंबईतील जमिनींचा मोबदला ह्मणून व कांहीं पीक उत्तम यावें याकरितां पैसा खर्च करावा ह्मणून, मोबदल्यानें दिलेले आहेत."* या ५० गावांपैकीं बहुतेक गांवांचा कुर्ला, मालाड, पवई, गोरेगांव, देवनार, वावळा,

* "The Land Revenue of Bombay" by Rogers, P. 230

आणि भांडुप अशा सात इष्टेटींत समावेश होत असून कांहीं गांव स्वतंत्र करारानें दिलेले आहेत. हे गांव सरकारनें कायम कबुलायती करून दिलेले आहेत, व त्याबद्दलचे लेख निरनिराळ्या वेळीं झालेले आहेत.† अशा रीतीनें कबुलायतीनें घेतलेल्या गांवांची व्यवस्था खोतांनीं सन १८२७ चा रेग्युलेशन १७ भाग ६ प्रमाणें ठेवावयाची आहे, व अंमल चालवावयाचा आहे. या खोतांच्या कबुलायतींमुळें कोणत्याही प्रकारें प्रत्यक्ष जमीन धारण करणाऱ्यांच्या हक्कसंबंधांस बाध येत नाहीं. साष्टी तालुक्यांतील खोतांच्या कबुलायतींचा विचार केल्यास त्यांस दस्त वगैरे वसूल करणेचा हक्क दिला असला तथापि जमिनीवर मालकी नाहीं. ते केवळ महसुलाचे मक्तेदार ( Farmers of revenue ) आहेत, रतनजी एदलजी वि. ठाण्याचे कलेक्टर १० मूर्स ई. अ. २९५. या महसूल गोळा करणेच्या हक्कांत माडांवरील पूर्वीं घेण्यांत येत असलेल्या कराचा समावेश होत असून माड अबकारीकडे घेतल्यामुळें होणारें नुकसान सरकारनें भरून देणेंही भाग आहे, अहंमदभाय वि. ठाण्याचे कलेक्टर १८८२ प्रि. ज. ४१४. खोतांच्या कबुलायती केवळ शेतीकरितांच ( agricultural purposes ) दिलेल्या असून सरकारनें घराचे बाबतींत कर बसविण्याचा आपला हक्क केव्हांही सोडलेला नाहीं, हाजी अबदुल्ला वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट ३५ मुं० ४६२=१३ मुं. लॉ. रि. ८८३. याच ठरावांत आणखी असेंही ठरविण्यांत आलें कीं अशा कबुलायतींनीं ( leases ) दिलेल्या जमिनी लँ. रे. कोड कलम ३ (१९) प्रमाणें "दुमाला" नसून कलमाचे भाषेवरून अशा गांवास लँड रेव्हेन्यू कोडाचे सर्व ठराव लागू आहेत.

साष्टी तालुक्याच्या खोती गांवांतील खातेदार अथवा सुतिदार यांचे हक्क काय आहेत याचा विचार न्या. गिब्स व न्या. वेस्ट यांनीं खुरशेटजी वि. कुमुलजान १८७१ प्रिं. ज. १६६ या ठरावांत केला असून त्यांच्या कायमपणास अगर मालकीस कोणत्याही प्रकारचा बाध आलेला नाहीं असें ठरविलें आहे. जमीन धारण करणारांचें आपण सुतिदार आहों असें म्हणणें असल्यास तें शाबीद करण्याची जबाबदारी त्यांचेवर आहे, वामन वि. विनायक १८७९ प्रिं. ज. ४२९; गोपाळ वि. विनायक १८८९ प्रिं. ज. १३६; नसरवानजी वि. नारायण ३ मुं. हा. रि. १२५

---

† याबद्दलची सविस्तर माहिती, लेख, ठराव वगैरे "Collection of information about the rights and privileges of holders of land in the alienated villages in the Salsette Taluka of the Thana District" या पुस्तकांत व "The Law of Salsette Land and Town Development" by J. A. Saldhana B. A. LL. B. या पुस्तकांत मिळेल.

१०. सुतिदार मिरासदारांप्रमाणेंच आहेत, ठाणा ग्याझेटिअर पान ५६४. सुतिदार हे बहुतांशीं धारेकऱ्यांचे तोडीचे असून जमिनीचे मालक आहेत; जमिनी त्यांच्याकडे वंशपरंपरा चालणाऱ्या असून, त्यांस वाटेल त्या वेळीं त्यांचा वर्ग करण्याचा अधिकार आहे; आपल्या जमिनीवरील झाडांवरही त्यांची पूर्ण मालकी आहे, ठाण्याचे कलेक्टर वि. दादाभाई बमनजी १ मुं. ३५२; आत्माराम वि. ठाण्याचे कलेक्टर १८७३ प्रिं. ज. ३७. सुतिदार असें एकदां ठरावीत झाल्यानंतर त्यास आपले खोतास "तिजाई" पेक्षां कांहीं एक ज्यास्त देण्याचें कारण नाहीं, विनायक वि. वासन १८८१ प्रिं. ज. ३३६. सुतिदारांची (प्रवई इस्टेट) मालकी त्यांनीं धारण केलेल्या भात जमिनीवर आहे, परंतु वर्कस व ओसाड जमिनीचे ते मालक नाहींत, व अशा जमिनीवरील झाडांवर त्यांची मालकी नाहीं, हरिश्चंद्र वि. सोराबजी १८९७ प्रिं. ज. ४४४. कुळांचे पूर्वापारचे जे हक्क आहेत ते सरकारनें दिलेल्या देणगीनें (Grant) नष्ट होऊं शकत नाहींत, अहंमदभाय वि. बाळकृष्ण १९ मुं. ३९१; दादाभाय वि. रामजी ६ मुं. हा. रि. ५९. मालाड इस्टेटींतील भाती जमिनीचे बाबतींत लँ. अॅ. आक्टाखालीं नुकसान भरपाईच्या रकमेंत अशा जमिनी धारण करणारांचा हक्क आहे; आत्माराम वि. अहंमद क्रॉस अपीलें नंबर १४९ सन १९०४ व नं. ११ सन १९०४ नि. ता. २९।९।१९०९; अहंमदभाय वि. गजानन क्रॉ. अ. ३५ व ३६ सन १९१२ पहा.

साष्टी तालुक्यांत सर्व्हे सेटलमेंट प्रथम १८६१ मध्यें लागू करण्यांत आलें.

---

## नामदार हायकोर्टाचे ठरावांची सूचि.


| नांव. | पृष्ठ. |
|---|---|
| अंताजी वि. अंताजी २१ मुं. ४८ ... | ११९ |
| | १३०, १३५, १५०, १५१, १५४, १७२, १७६, २४६, २६० |
| अंताजी वि. काशिनाथ ६ मुं. लॉ. रि. ४३३ ... | ५१ |
| अमृता वि. काशिनाथ १८९९ प्रिं. ज. ५८ ... | २१७ |
| अल्लीसाहेब वि. विठल १८९६ प्रिं. ज. ३०९ ... | १३५ |
| अहंमद वि. गणेश २५ मुं लॉ. रि. ५२४ ... | २८, ३९, ४७, २१९, ३०२ |
| अहंमदभाय वि. बाळकृष्ण १९ मुं. ३९१ ... | प्र. ३३ |
| अहंमदभाय वि. गजानन क्रॉ. अ. ३५।३६ सन १९१२ ... | प्र. ३३ |
| अहंमदभाय वि. ठाण्याचे कलेक्टर १८८२ प्रिं. ज. ४१४ ... | प्र. ३३ |
| आत्माराम वि. दत्तात्रय दु. अ. ४९०।१९०८ नि. १६।१।१९१० ... | २२५, २२६ |
| आत्माराम वि. ठाण्याचे कलेक्टर १८७३ प्रिं. ज. ३७ ... | प्र. ३३ |

आत्माराम वि. बाळाजी २५ मुं. लॉ. रि. १०३२ ... ... ९१,९६
आप्पाजी वि. बाळकृष्ण ५ प्रि. ज. २३८ ... ... ... २१९
आबाजी वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट अ. नं ९८ सन १९०५ सन १९११ ... २९
इन् री अंताजी १८ मुं. ६७० ... ... ...२९६,३००,३०२
इब्राहिम वि. कृष्णाजी २६ मुं. लॉ. रि. ४२१ ...९०,११६,२०९,२१७,२२३
इमदाद वि. भगीरथ १० अ. १५९ ... ... ... ३०५
एन्दर वि. लाला ७ मुं. हा. रि. १११ ... ... ... ७८
ओछवलाला वि. गोपाळ ९ मुं. लॉ. रि. १३३२... ... ... ८०
कन्हैलाल वि. इस्माईलभाई. २८ मुं. लॉ. रि. १४९८ ... १३७,२८३
कलेक्टर ऑफ रत्नागिरी वि. रघुनाथ १८७५ प्रि. ज. ३२४... ३००,३०१
कल्याणरायजी वि. माफ्यूझिल कंपनी १४ मुं. ५२६=१७ इं. अ. १०३... २७२
काजी अहंमद वि. काजी गफूर दु. अ. १४१।१९१८ नि. ता. ९।९।१९१९... ३०४
कान्झर्व्हेटर ऑफ फारेस्ट्स वि. नागरदास १८७५ प्रि. ज. ३२५... २९६,३०१
कालिदास वि. भाईजी १६ मुं. ६४६ ... ... ... ५६
काशिनाथ वि. धोंडशेट १८ मुं. लॉ. रि. ७८६ ... ... ... ९५
कॉवसजी वि. होर्मसजी ६ मुं. लॉ. रि. ७८२ ... ... ... २८३
कुलाब्याचे कलेक्टर वि. गणेश १० मुं. २१६ ... ... ... १३
कृपामोई वि. दुर्गा १५ कलकत्ता ८९ ... ... ... ९४
कृष्णराव वि. बाबाजी १ मुं. लॉ. रि. ४८९ ... ... ... ३०४
कृष्णाजी वि. अनंत ५ मुं. लॉ. रि. ९५० ... ... ... ५१
कृष्णाजी वि. कृष्णाजी २१ मुं. ४६७... १३१,१३३,१५३,१५८,१६४,१७२
कृष्णाजी वि. गंगाजी दु. अ. ६०४।१९२४ नि. २४।९।१९२५... १११,११२
कृष्णाजी वि. निळो १८९४ प्रि. ज. ८२ ... १३५,१८२,१८८,२८३
कृष्णाजी वि. मेजर फ्रान्सिस दु. अ. ८९।१८६५ नि. १८।१२।१८६६... २१६
कृष्णाजी वि. रंगो दु. अ. ७०९ स. १९०६ नि. ता. ३०।८।१९०७... ५७
कृष्णाजी वि. रामचंद्र दु. अ. ४८६ सन १९१४ नि. ता. १३।३।१९१६... २०५
कृष्णाजी वि. रामचंद्र १ मुं. ७० ... ... ७२,२१७,२१८,२२२
कृष्णाजी वि. विनायक दु. अ. नं ११५ सन १९२३ नि. ता. १४।१।१९२४... ८९
कृष्णा वि. नल्लपेरुमल २२ मुं. लॉ. रि. ५६८ ... ... ... ३
कृष्णोबा वि. केशव ४ मुं. लॉ. रि. ६०६ ... ... ... ७९
केशव वि. बाळकृष्ण सि. अ. नं. २२९ सन १८९९ नि. ता. २१।६।१९००... २२७
केसो वि. गणेश १८९१ प्रि. ज. ३२३ ... ... ... २२५
कौसल्या वि. गुलाबकुंवर २१ अ० २९७ ... ... ... ३०५
खिमचंद वि. सोभागचंद २५ मुं. लॉ रि. २४५... ... ... २५३

खुरशेटजी वि. कुमुलजान १८७१. प्रि. ज. १६६ ... ... प्र.३२
गंगादास वि. बाईसुरज १४ मुं. लॉ. रि. २५० ... ... ... ३
गंगाधर वि. मोरभट १८ मुं. ५२५ ... ... ... ५१
गंगाधर वि. विनायक १८९६ प्रि. ज. ४१७ ... ... ... २२७
गजानन वि. निळो ६ मुं. लॉ. रि. ८६४ ... ३१,९८,१०५,२०३
गणपती वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं. लॉ. रि. ७५४=४८ मुं. ५११... २६,
१०,१२,२०,२१,२८,३२,४०,११४,१९९,२००,२८७
गणेश वि. रामचंद्र २३ मुं. लॉ. रि १२०९ ... ... १३७,२८३
गणोजी वि. धोंडू १४ मुं. ४५० ... ... ... ... २३५
गोपाळ वि. कृष्णा ३ मुं. लॉ. रि. ४२० ... ... १८२,१८३
गोपाळ वि. त्रिंबक १८९६ प्रि. ज. ७२८ ... ... ... २२५
गोपाळ वि. दशरथशेट २१ मुं. २४४ ... १५३,१५४,१६१,१७१,१७३,१७५
गोपाळ वि. नागेश्वर २१ मुं. ६०८ ... ... ... १३५,१५४,१७६
गोपाळ वि. भागीरथी २० मुं. लॉ. रि. ६८१ ... ... ९४,१०२,११४
गोपाळ वि. विद्याधर दु. अ. ७५८ सन १९०९ नि. ता. ११।२।१९११... ३१
गोपाळ वि. सखोजी १८ मुं. १३३ ... ... ३,१३३,१५२,१७१
गोविंद वि. बाबाजी दु. अ. २८४ स. १९०६ नि. ता. २७।८।१९०७... ९०
गोविंद वि. राघो ८ मुं. ५४३ ... ... ... ... १८०
चंद्री वि. दाजी २ मुं. लॉ. रि. ४९१=२४ मुं. ५०४ ... ८०,८२
चिको वि. शिवनाथ २४ मुं. लॉ. रि. २२६ ... ... ५६,७८
चिंतो वि. पांडुरंग दु. अ. नं. ४०९ सन १९०९ नि. ता. ५।९।१९११ ... २११
चिंतो वि. महादेव २१ मुं. लॉ. रि. ३६१ ... ... १७२,१७६
जगदींद्र वि. सेक्रेटरी ऑ. स्टेट ३० क. २९१=५ मुं. लॉ. रि. १ ... १३९
जगन्नाथ वि. बाब्या दु. अ. न. २८९ सन १९१८ नि. ता. १४।१०।१९. १०७
जवराम वि. नारायण ५ मुं. लॉ. रि. ६५२ ... ... ८८,९२,९७
ठाकुराणी वि. राय जगताल ११ मुं. लॉ. रि. ५१६... ... ... ३
ठाण्याचे कलेक्टर वि. दादाभाई बमनजी १ मुं. ३५२ ... ... प्र.३३
डि. आर. बाम वि. सर्वे कमिशनर ३ मुं. १३४ ... ... ... १८८
डुली वि. हालवे २३ कलकत्ता ५५ ... ... ... ... ३
ताजुबाई वि. कुलाब्याचे सबकलेक्टर ३ मुं. हा. रि. १३२ ... ९,२१,२३,२५,
२७,४७,१९०,१९९
तुका वि. पांडुरंग दु. अ. नं. ६२५ स. १९०२ नि. ता. १।६।१९०५... २१०
त्रिंबक वि. कृष्णाजी दु. अ. नं. २२३ स. १९२० नि. ता. २५।२।१९२१. २२९
दत्तात्रय वि. निळो, १८९८ प्रि. ज, ३७८ ... ... ... ९०

दत्तात्रय वि. रामचंद्र २ मुं. लॉ. रि. ३५४... ३०,१३०,१३८,१७६,१८०,१८७
दादाभाई वि. रामजी ६ मुं. हा. रि. ५९ ... ... ... प्र.३३
दामोदर वि. वासुदेव २२ मुं. लॉ. रि. १०२ ... ...६६,८८,९२,१११
दामोदर वि. सदाशिव दु. अ. ८८१ स. १९०९ नि. ता. १४।१२।१९११. २२८
दिनकरराव वि. नारायण १८९३ प्रि. ज. ५५० ... ... ४०,४३
दीनचंद वि. लोकनाथ ६ मद्रास ३२२ ... ... ... ८१
दुलभदास वि. रामलाल ५ मूर्स इं. अ. १०९ .. ... ... ५
धर्मा वि. बाला मिय्या १३ मुं. लॉ. रि. ९६८ ... ... ... १०४
धोंडो वि. वासुदेव १ मु. लॉ. रि. ४६६ ... ... ... २२८
नरेंद्रनाथ वि. कमलवासिनी २३ इं. अ. १८=२३ क. ५६३... ... ४
नर्सो वि. नागवा २० मु. लॉ. रि. ३५८ ... ... ... १०६
नसरंगजी वि. बाई आचरट २६ मुं. लॉ. रि. १२६४ ... १३८,२८३
नसरवानजी वि. डेप्युटि कमिशनर २ मुं. हा. रि. ८० ... ... २७२
नागरदास वि. कान्झर्व्हेटर ७ इं. अ. ५५=४ मुं. २६४. २४,२८,४१,१९०,३००
नागरदास वि. गणू १८९१ प्रि. ज. १०७ ... ... ९३,११३
नागरदास वि. हरी १८९१ प्रि. १३३ ... ... ... ११४
नागेश्वर वि. गणेश २२ मुं. ला. रि. ५९६ ... ... ... १३९
नारायण वि. गणेश दु. अ. १४६।१९०१ नि. २३।९।१९०१...१३६,१७२,१७६
नारायण वि. धोंडू दु. अ. नं. ६९९ सन १९१९ नि. ता. १३।६।२१ ... ४२
नारायण वि. पांडुरंग २४ मुं. ला. रि. ८३१ ... ... ५७,५८
नारायण वि. बाळाजी २१ मुं. २४८ ... ... ... २२७
नारायण वि. महादेव दु. अ. न. ९६६ स. १९१५ नि. ता. २६।८।१९१८. १०२
नूरबिबी वि. मगनलाल १६ मुं. ५४७ ... ... ... २९८
पंचनंदयन वि. निलकंठयन ७ म. १९१ ... ... ... १३४
पर्शराम वि. गणेश दु. अ. २६।१९०२ नि. ता. २०।८।१९०२.... २३८,२५१
पर्शराम वि. रघुनाथ दु. अ. ४६३।१९२२ नि. ता. २९।६।२३... २२५,२२६
पांडुरंग वि. अनंत ५ मुं. लॉ. रि. ९५६ ... ... ... १३८
पांडुरंग वि. जनार्दन सि. जु. १४३ स. १९०३ नि. ता. २३।२।०४ ... १७७
पुट्टन गौडा वि. निळकंठ १५ मुं. लॉ. रि. ७७३... ... ... २२६
पुनदेव वि. रामसरूप २५ कलकत्ता ८५८ ... ... ... ३
पुरुषोत्तम वि. काशिदास १७ मुं. ६७७ ... ... ... ९१
पुरुषोत्तम वि. गणपती २८ मुं. लॉ. रि. ७५० ...९४,१०२,११४,२१०,२८७
पुरुषोत्तम वि. बाळकृष्ण २८ मुं. २३८=५ मुं. लॉ. रि. ९५० ... २३५
प्रभाकर वि. खंडेराव १० मुं लॉ. रि. ६२५ ... ... ... ५

फकी इस्माइल वि. महंमद इस्माइल १२ मुं. ५९९ ... २७,४२,२१७
फकी वि. सजनाक १८ मुं. २४४ ... ... १७६,१७८,१७९,१८२
फातमा वि. दर्यासाहेब १० मुं. हा. रि. १८७ ... ... ... १४०
बळवंत वि. विष्णू दु. अ. १८६ स. १९११ नि. ता. १।२।१९१२... ९३, ११४
बळवंत वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट ७ मुं. लॉ. रि. ४९७ ...२९३,२९५,२९६
बळवंत वि. हिराचंद २७ मुं. ३३४=५ मुं. लॉ. रि. २१७... ... १०६
बहिरु वि. विनायक १८९२ प्रि. ज. २९८ ... ... ... ८०
बाई उत्तम वि. वलिजी रसूभाई १० मुं. ४२६ ... ... ... १३७
बाईगंगा वि. दुलभराग ५ मुं. हा. रि. १७१ ... ... ... ७७
बादशाहा वि. नारायण ९ मुं. लॉ. रि. ८२९ ... ...१०६,१०७,१०८
बापूजीराव वि. गणू २ मुं. लॉ. रि. ३७६=२४ मुं. ४८९ ... ... २४१
बापू वि. धोंडी १६ मुं. ३५३ ... ... ... ... ३०६
बाबाशेट वि. जिरशेट ५ मुं. हा. रि. ७१ ... ... ... २३५
बाळकृष्ण वि. जगन्नाथ दु. अ. नं. ६७४ स. १९१७ नि. ता. २६।६।१९२१. ११३
बाळकृष्ण वि. विश्वनाथ १९ मुं. ५२९ ... ... ... २१८
बाळशेट वि. हरि. २७ मुं. लॉ. रि. १४८७ ...७३,१५२,२३९,२४०,२५१
बाळाजी वि. गोपाळ ३ मुं. २३ ... ... ... ८०
बाळाजी वि. गोपाळ १८८० प्रि. ज. ५३ ... ... ८०,२२४
बाळाजी वि. बाळ २१ मुं. २३५ ... ... ... २,१५१,१५३
बाळाजी वि. भिकाजी ८ मुं. १६४ ... ... ... ... १०६
बाळाजी वि. रामचंद्र ४ मुं. लॉ. रि. ९७२ ... ... ८०,२३१
ब्रिज भुकण वि. दुर्गादत्त २० अ. २५८ ... ... ... १३४
भागा वि. दोराबजी २२ मुं. लॉ. रि. ११११ ... ... २३७,२८३
भागोजी वि. बापूजी १३ मुं. ७५ ... ... ... ... १४०
भिकाजी वि. राजाराम दु. अ. १२२ स. १९०६ नि. ता. १४।४।१९०८... १३४
भिकाजी वि. अलीखान १८८५ प्रि. ज. १५५ ... ... ... २८७
भिकाजी वि. निजाम अली ८ मुं. ५२५ ... २५,४७,२१०,२८८
भिकाजी वि. सखाराम १८९७ प्रि. ज. ११९ ... ... ... १६८
भिया वि. बाबू २१ मुं. लॉ. रि. ३५०=४३ मुं. ४६९ ... ... १७९
भीमन गौंडा वि. हणमंत ४२ मुं. ६८९=२० मुं. लॉ. रि. ४१२ ... २३५
भुत्या वि. अंबो १३ मुं २९४ ... ... ... ... १०६
भागजी वि. बापूजी १३ मुं. ७५ ... ... ... ... १३८
महंमद वि. अली दु. अ. ८५०।१९१४ नि. १३।७।१९१५...१५३,१७७,१७८
महंमद याकूब वि. महंमद इस्माईल ९ मुं. हा. रि. २७८ ... ७१,२४५

महादेव वि. देवनाक २१ मुं ६९५ .. ६९,१३५,१४०,१७६,१८०,१८१
महादेव वि. कृष्णा १८९२ प्रिं. ज. ९१... ... ... ... ५५
महादेव वि. महादाजी १३ मुं. लॉ. रि. ११५७ ... ८६,८७,९०,९८,१८०
महिपत वि. लक्ष्मण २ मुं. लॉ. रि. २२८... ८१,८२,१७६,१८२,१८३,१८४(इ)
माधवराव वि. कृष्णाजी २४ मुं. लॉ. रि. १३१ ... ... ९३,१११
मुंबई कॉर्पोरेशन वि. वासुदेव ६ मुं. ला. रि. ८९९ ... २६२,२६३
मोरभट वि. गंगाधर ८ मुं. २३४ . ... ... ५१,२६८
मोरो आबाजी वि. नारायण ११ मुं. ६८० ... ... २६,५०
मोहनलाल वि. अमृतलाल ३ मुं. १७४ ... ... ... ८८
म्यु. क्लिऑड वि. बी. बी. सी. आय् रेल्वे ७ मुं. लॉ रि. ६१८ ... ५
म्युनिसिपल कमिशनर वि. मंचरजी १३ मुं. लॉ. रि. ११३० ... ३
येशवंत वि. केशवराव १६ मुं. लॉ. रि. ७२० ... ... ... ८१
येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१=३० मुं. २९० ...५६,६१,६४,६६,
६८,७४,७९,८५,८६,९२,१०६,१११
रघुनाथ वि. बाबू २ मुं. लॉ. रि. ९३ ... ... ... ७५
रघुनाथ वि. वासुदेव १ मुं. लॉ. रि. ४३३... १८,३३,३८,४०,४२,४३,५६,५९,६१
रतनजी वि. ठाण्याचे कलेक्टर ११ मूर्स इं. अ. २९५ ... प्र.३२,२९६
रतनजी वि. सखाराम १८८४ प्रिं. ज. ६८ ... ... ... ५०
रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी १२ मुं. ५३४... २२,२६,२९,४९,११०,
२००,२९६,३०८
रत्नागिरीचे कलेक्टर वि. व्यंकटराव ८ मुं. हा. रि. १... ३९,२२४,३००,३०२
राजा नारसिंग वि. राम कैलासनाथ ९ मूर्स इं अ. ५५ ... ... ९०
राजाराम वि. जगन्नाथ २४ मुं. लॉ. रि. ३२३ ... ...१७६,१७७,१७९
राजा वि. सेत्रुचेर्ला २६ मद्रास ६८६... ... ... ... २०४
रामचंद्र वि. अनंत १८ मुं. ४३३ ... ... ... ५७,७८
रामचंद्र वि. दत्तात्रय ९ मुं. लॉ. रि. ३२० ... ... १०८,११०
रामचंद्र वि. नारायण दु. अ. २६३ सन १९२० नि. ता. २७।९।१९२२. ६०,१५५
रामचंद्र वि. बाळाजी द. अ. ९३०।१८ नि. १५।१०।१९२०... १८४,१८६,१८८
रामचंद्र वि. भाऊराव दु. अ. ८२२ सन १९०९ नि ता. १४।६।१९१०. १०७,१०९
रामचंद्र वि. रघुनाथ २० मुं ४७५ ... ... ६९,१३२'१५३,१५८
रामचंद्र वि. रत्नागिरीचे कलेक्टर ७ मुं. हा. रि. ४१ २४,२७,११०,२८८
रामचंद्र वि. वासुदेव दु. अ. नं. १६० सन १९२४ नि. ता. १।९।२५ ... १५१
रामचंद्र वि. विसाजी १८८० प्रिं. ज. २९७ ... ... २१८,२२५
रामनाथ वि. जमीनदार १६ म. ४०७ ... ... ... ८१

रामा वि. अब्दूल रहीम २२ मुं. लॉ. रि. १२१४ ... ८१,८२
राघजी वि. दादाजी १ मुं. ५२३ ... ... ... २९६,२९७
रावजा वि. बाबाजी दु. अ. २२७।१९२१ नि. २६।११।१९१२ ... ४२
रावजी वि. सयाजीराव १८८९ प्रि. ज. ९१ ... ... ... २८९
लक्ष्मण वि. अंताजी २ मुं लॉ. रि. १०८३ ... ... ... १३७
लक्ष्मण वि. विठू १८ मुं. २२१ ... ... ... ५६,७८
लक्ष्मीनारायण वि. तारा ११ क. ९४४ ... ... ... ३०६
वजुद्दिन वि. नारायण १८९६ प्रि. ज. ७०८ ... ... ... १७२
वसंजी वि. लल्लू ९ मुं. २८५ ... ... ... ... ९८
वामन वि. ठाण्याचे कलेक्टर ६ मुं. हा. रि. १९१ ... ... २९६
वामन वि. रामचंद्र दु. अ. ५५७।१९०१ नि. १६।६।१९०२ ...२३८;२४८,२५१
वामन वि. विनायक १८७९ प्रि. ज. ४२९ ... ... ... प्र.३२
वासुदेव वि. दामोदर ६ मुं. लॉ. रि. ३७० ... ... ... २२६
वासूदेव वि. धाकू दु. अ.८८ सन १९०२ नि. ता. ११।१२।१९०२ ... २१७
वासुदेव वि. लक्ष्मण दु. अ. ४७१ सन १९०९ नि. ता. ८।३।१९१० ९०
वासू वि. माधवराव २४ मुं. लॉ. रि. ११६० ... ... ... ८७
विज भुकणदास वि. ईश्वरदास २५ मुं. लॉ. रि. ४३१ ... ५७,७४
विठ्ठलदास वि. मुंबईचे म्यु० कमिशनर ४ मुं. लॉ. रि. ९१४ ... २६२
विठ्ठल वि. येसा २२ मुं. ९५ ... ...६९,१५२,१७१,१७६,२४५
विठोजी वि. भागोजी १८७४ प्रि. ज. २९८ ... ... ... ५५
विठ्ठल वि. गोपाळ गणेश बिवलकर ४ मुं. हा. रि. १४८ ... ... २३५
विठ्ठल वि. भागीरथीबाई १८४६ बेलासिस रि. ६३ ... ... ४०
विठ्ठल वि. सीताबाई ३ मुं. लॉ. रि. १८१ ... ... ... १८६
विनायक वि. कृष्णाजी ३ मुं. ला. रि. २३९ ... ... ... २२७
विनायक वि. बाबा शाबुद्दिन १३ मुं. ३७३ ... ... ८७,९५
विनायक वि. लक्ष्मण २८ मुं. ९२=५ मुं. लॉ. रि. ७१० ... ५०,५१
विनायक वि. वामन १८८० प्रि. ज. ३३६ ... ... ... प्र.३३
विनायक वि. सिताराम १४ मु. लॉ. रि. ११७३ ... ... ८२,२४२
विश्वनाथ वि. तात्या ६ मुं. लॉ. रि. ६४५ ... ... ... ७८
विष्णुभट वि. बाबल्या १८७७ प्रि. ज. १४६ ... ... ... ७५
विष्णु वि. रामलिंग ३ मुं. लॉ. रि. ४५०=२४ मुं. २५ ... ७३,२४३
विष्णु वि. वासुदेव २० मुं. लॉ. रि. ८२६ ... ... ... ३०६
विष्णु वि. गंगाजी दु. अ. नं. ४६९ सन १९१६ नि. ता. ५।७।१९१७... १५७
विष्णू वि. बाबला २३ मुं. लॉ. रि. ४११. ३२,६१,७२,७७,८२,९६,९७

विष्णू वि. बालू २ मुं. लॉ. रि. ६६ ... ... ... ७१
वैदखान वि. सख्या २० मुं. ७२८ ... ... १३०,१३१,१३३,१४९
व्यासाचार्य वि. विष्णु २२ मुं. लॉ. रि. ७१=४४ मुं. ५६६ ... ... ५७,७५
शिवनाथ वि. चिको २३ मुं. लॉ. रि. ५६३ ... ... ... ७८
शेखमहंमद वि. जमालुद्दिन १९ मुं. लॉ. रि. ३८५ ... ... ... १४१
शेखमहंमद वि. शेख इब्राहिम दु. अ. ५८५।१९१६ नि. १९।१२।१९२२ ... २३१
शेखदाऊद वि. शेखमहंमद ले. प. अ. १९।१९२५ नि. १६।८।१९ ६... १३१
श्रीधर वि. बाबाजी १६ मुं. लॉ. रि. ५८६ ... ८८,८९,९८,१०७,१०८,११९
श्रीपादभट वि. रामा २९ मुं. लॉ. रि. २७४ ... ... ...५७,७८
सदाशिव वि. रामकृष्ण २५ मुं. ५५६=३ मुं. लॉ. रि. १३५ ... ... ५१
सदाशिव वि. से. स्टे. २० मुं. लॉ. रि. १४१ ... ... २९,३००,३०१
सरकार वि. आत्माराम ९ मुं. लॉ. रि. ६८१ ... ... ... ३
सहदेव वि. शंभूराव १ मुं. लॉ. रि. ४९९ ... ... ... ३४
सिताबाई वि. संभू मोनू ३८ मुं. ७१६=१६ मुं. लॉ. रि. ५९५ ... ३०४
सुरजमल वि. ट्रूढन २७ मुं. लॉ. रि. ७७० ... ... ... ९८
सुलैमान वि. येसू १८७४ प्रि. ज. २३ ... ... ... २७४
सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. दत्तात्रय ३ मुं. लॉ. रि. १२३ ... ... ५२
सेक्रे. स्टेट वि. नारायण १ मुं. लॉ. रि. १९ ३,१३२,३८,१९०,३००,३०१,३०२
सेक्रे. ऑ. स्टे. वि. वासुदेव ९ मुं. लॉ. रि. ७१९=३१ मुं. ४५६. २७,३१,१९०,२९५
सेक्रे. स्टेट वि. सखाराम १ मुं. लॉ. रि. ४७२ ... ... १९०,२८८
सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. सदाशिव १४ मुं. लॉ. रि. ७७ ... १४,१९०,१९५
सेक्रे. स्टेट वि. हैबतराव ६ मुं. लॉ. रि. ४३ ... ... ... २९७
सोनशेट वि. विष्णु २० मुं. ७८ ... ... ... ... ७८
सोमेश्वर वि. चुनीलाल २२ मुं. लॉ. रि. ७९० ... ... ... ३०६
हरी येसाजी वि. परशुराम ११ मुं. हा. रि. ३३ ... ... ... ८०
हरि वि. गंगाधर १८ मुं. लॉ. रि. ४४६ ... ... ९३,११४
हरि वि. गणेश दु. अ. नं. ६१ सन १९०८ नि. ता. २०।७।०८ ७४,२६३
हरि. वि. नारायण ६ मुं. हा. रि. ३३ ... ... ... ७५
हरि. वि. बाळाजी दु. अ. नं. १८१।१८९४ नि. १८।११।१८९५. २३८,२४६
हरि वि. बाळाजी १८९५ प्रि. ज. ५१९ ... ... ... २५६
हरि वि. शंकर १९ मुं. ४२० ... ... ... ... ३०६
हरिश्चंद्र वि. सोरावजी १८९७ प्रि. ज. ४४४ ... ... ... प्र.३१
हाजी अबदल्ला वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट ३५ मुं. ४६२=१३ मुं. लॉ. रि. ८८३. प्र.३२
हिराबाई वि. धनजीभाई २ मुं. लॉ. रि. ८४५ ... ... ... २५२

मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल याचा खालीं लिहिलेला आक्ट् आलिजा गव्हर्नर साहेब बहादुर यांनीं ता. १० वी जानेवारी सन १८८० रोजीं मंजुर केला; व आलिजनाब गव्हर्नर जनरल साहेब बहादुर यांनीं ता० २१ वी एप्रिल सन १८८० रोजीं मंजुर केला, तो सर्व लोकांस जाहिर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असेः—

# सन १८८० चा मुंबईचा आक्ट् १ ला.

## खोतांनीं धारण केलल्या गांवांच्या सेट्ल्मेंटासंबंधीं कायदा आहे तो सुधारण्याविषयीं आक्ट्.

ज्यापेक्षां रत्नागिरी जिल्ह्यांत जे गांव खोतांनीं धारण केले आहेत त्या गांवांचें सेट्ल्मेंट् करण्याविषयीं आणि त्यांच्या वसुलाच्या वहिवाटी-विषयीं विशेष ठराव करणें योग्य आहे, त्यापेक्षां खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहेः—

१ विषय प्रवेशः—

कोणताहि कायदा करतांना त्याचा उद्देश व व्याप्ति काय आहे हें जाहिर करणें इष्ट असतें व त्याप्रमाणें प्रत्येक कायद्याचे सुरवातीस विषयप्रवेश करण्याची

पद्धत आहे. त्यास अनुसरून खोती सेटल्मेंट ॲक्टाचा हा विषयप्रवेश आहे. या मथळ्यावरून ध्यानांत येण्यासारख्या गोष्टी आहेत त्याः—

(१) हा कायदा बहुतांशीं रत्नागिरी जिल्ह्यांतील गांवांकरितां आहे.

(२) खोतांनीं धारण केलेल्या गांवांपुरताच या कायद्याचा उपयोग आहे. (भाग १).

(३) खोती गांवचे सेटल्मेंट करण्याकरितां हा कायदा आहे. अगर हा कायदा करून खोती गांवांत सेटल्मेंट अमलांत आणावयाचें आहे, भाग ३ मध्यें हा हेतु साध्य केलेला आहे.

(४) त्याचप्रमाणें सरकारच्या जमीन महसुलाचे वहिवाटीबद्दल विशेष ठराव करणें हाही हेतू आहे. भाग ४ मध्यें हा हेतू साध्य केला आहे. **बाळाजी वि० बाळ २१ मुं० २३५** या ठरावांत या कायद्याचे उद्देशांबद्दल सर न्या. फॉरन् यांनीं असें म्हटलें आहे कीं, "या कायद्याचें विषयप्रवेश व कलम १६ व १७ यांवरून हा कायदा करण्याचा उद्देश असा दिसतो कीं, सेटल्मेंट अंमलदाराचे मार्फत खोती गांवांतील हक्कवाल्या कुळांच्या (priviledged occupants) त्यांच्या जमिनीवरील हक्कांच्या निरनिराळ्या प्रकारांची नोंद करून प्रत्येक हक्कवाल्या कुळानें आपल्या जमिनीचा खंड काय द्यावा, हें नक्की करणें व त्याची मर्यादा कायम करणें." या ठरावावरून हा कायदा कुळांच्या हक्काचा विचार करून त्यांचे हक्काची नोंद करण्याकरितांच आहे.

## (२) हा कायदा होण्यापूर्वींची परिस्थितिः—

हा कायदा होण्यापूर्वींही खोती अस्तित्वांत होती. त्या वेळची परिस्थिति काय होती, याचा विचार प्रस्तावनेमध्यें सविस्तर केला आहेच. परंतु येथेंहि ती थोडक्यांत देणें इष्ट आहे. कोकणप्रांत ब्रिटिश अमलाखालीं १८१८ चे सुमारें आला. त्यानंतर नेहमींच्या ब्रिटिश पद्धतीस अनुसरून खोत व कुळें यांच्या हक्कांचें नियंत्रण करून जमिनीची मोजणी करून जमीन महसूल कायम करावा या हेतूनें ब्रिटिश अंमलदारांचेही प्रयत्न सुरू झाले. जमीन महसुलाचे नियंत्रणाचे बाबतींत प्रथम अमलांत आलेला "**सन १८२७ चा मुंबई रेग्युलेशन १७**" हा कायदा होय. हा कायदा ता. १।१।१८२७ रोजीं गव्हर्नर जनरल यांनीं पास केल्यानंतर अमलांत आला व त्यावरून जमाबंदी ठरविण्याचीं कामें सुरू झालीं. हा कायदा अत्यंत गैरलागू, गैरसोईचा व अपुरा असा वाटल्यामुळें "**१८६५ चा मुंबई आक्ट १**" हा पास करण्यांत आला व त्याचा अंमल ता. २१ जानेवारी १८६५ रोजीं सुरू झाला. १८२७ च्या रेग्युलेशनमध्यें खोतांसंबंधीं विशेष ठराव कांहीं नव्हता, परंतु १८६५ च्या आक्टांत खोतांकरतां म्हणून विशिष्ट दोन कलमें घालण्यांत आलीं. तीं म्हणजे कलमें ३७ आणि ३८. यानंतर हा कायदाहि अपुरा वाटूं लागला व खोत व सरकार यांमध्यें वाद सुरू होऊन पुष्कळ भवति न भवती होऊन अखेर खोती नष्ट करणें

शक्य नाहीं; खोतांचे हक्क महत्वशीर असून त्यांचेकरितां व त्यांचा व कुळांचा संबंध नियंत्रित करण्याकरितां खोती गांवांतील सर्व्हे सेटलमेंट करतांना विशिष्ट प्रकारच्या नोंदी केल्या पाहिजेत व खोती गांवांत वहिवाटी संबंधेंही कायमचा ठराव केला पाहिजे; अशी अवश्यकता भासूं लागून, त्याप्रमाणें हळुहळू विचार होऊन, १८८० सालीं मुं० आक्ट १ हा खोतीचा आक्ट पास करण्यांत आला.

**(३) कायद्याचा विचार करतांना लक्षांत ठेवावयाच्या गोष्टीः—**

कोणत्याही कायद्याचा विचार करतांना कायद्याच्या कलमाच्या भाषेकडे नजर देऊन चालावयाचें असतें. भाषेंतून जो अर्थ निघेल तो ग्राह्य असतो, व होतांहोईलतों कोणत्याही कलमाचा अंमल करतांना त्या कलमाची त्यांतील भाषेच्या दृष्टीनेंच अंमलबजावणी करावयाची असते. कायद्याच्या सुरवातीला विषयप्रवेश असतो, परंतु त्याचा उपयोग कलमाचा अर्थ लावतांना करणें इष्ट नसतें. कलमाचा स्पष्टपणें होणारा अर्थच शक्य तितक्या विस्तारानें घ्यावयाचा असतो. विषयप्रवेशावरून कलमाच्या होणाऱ्या अर्थास आळा घालणें अगदीं अयोग्य आहे. (Maxwell P.63) कायद्यास कलमवारी देतांना त्याचे भाग पाडलेले असून त्यांसही नांव (heading) दिलेलें असतें, व शिवाय प्रत्येक कलमाला समासांत टीप (marginal note) असते. या टीपा अगर पोटभागाचा मथळा यांसही फारशी किंमत द्यावयाची नसून विषयप्रवेशा इतकाच त्यांचा उपयोग करावयाचा असतो. या बाबतींत ना० हायकोर्टाचे स्पष्ट ठराव झालेले असून सामासिक टिपांचा उपयोग कलमाचा अर्थ लावतांना केव्हांही करूंनये, **ठाकराणी वि० जगत्पाल. ११ मुं० लॉ० रि० ५१६;** व सामासीक टीप कितीहि स्पष्ट असली तथापि व्याकरण दृष्ट्या कलमाचा होणारा अर्थ बदलण्याकडे त्याचा उपयोग करूं देणें इष्ट नाहीं, **गंगादास वि० बाई सुरज. १४ मुं० लॉ० रि० २५०;** कलमाचा अर्थ करतांना कांहीं तरी संशय काढून, अगर संशयाचा तर्क करून, सामासिक टीपा अगर पोटभागांचा मथळा याची मदत घेऊं पाहणें हेंही योग्य नाहीं (not permissible) **म्युनिसिपल् कमिशनर वि० मंचरजी १३ मुं. लॉ. रि. ११३०;** असे मुंबई हायकोर्टचे स्पष्ट ठराव आहेत. कलकत्ता हायकोर्टानें तर सामासिक टीप हा कायद्याचा भागच नव्हे असें स्पष्टपणें **डुखी वि० हालवे २३ क० ५५ व पुनर्देव वि० रामसरूप २५ क० ८५८** यांत ठरविलें आहे. इतकेंच नव्हे तर कौंसिलांत कायदा पास करतेवेळीं झालेली चर्चा ही कलमांचा अर्थ करतांना उपयोगांत आणूं नये असें **गोपाळ वि० सखोजी १८ मुं० १३३** त्याचप्रमाणें **कृष्णा वि० नल्लपेरुमल २२ मुं० लॉ० रि० ५६८** मध्यें ठरविलें आहे. कलमाच्या शब्दांचा अर्थ जर कोणत्याही प्रकारें स्पष्ट नसेल अगर त्यांतून संशयित भाग उत्पन्न होत असेल तर मात्र कलमाच्या भाषेच्या बाहेरच्या गोष्टींचा कोर्टाला विचार करतां येईल, **सरकार वि० आत्माराम ९ मुं० लॉ०**

रि० ६८१. दुसरी महत्वाची ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, कायद्याचा अर्थ लावतांना कायदा अमलांत येण्यापूर्वी ना० हायकोर्टाचे ठराव काय होते हें पाहून त्यावरून कलमाचा अर्थ करावयास लागणें हेंही अयोग्य आहे. कायदा पास करतांना मागील ठराव अस्तित्वांत ठेवावयाचे होते असें मानणेंही योग्य नाहीं. कायद्याचे भाषेनुसारच त्याचा अर्थ लावला पाहिजे. **नरेंद्रनाथ वि० कमलवासिनी २३ इं० अ० १८; २३ क० ५६३.** एकंदरींत कलमाच्या शब्दांवरून निघणारा अर्थ घेणें व कलमांच्या भाषेवरून निघणाऱ्या सरळ व विस्तृत अर्थाप्रमाणें चालणें हेंच केव्हांही न्याय्य आहे.

## (४, कायद्याचा अंमल करण्याचें तत्वः —

एखादा कायदा अंमलांत आल्यानंतर त्यांत अनुभवानें चुका, गैरसोई आढळतात त्याचप्रमाणें कालगतीनें कायद्याचें स्वरूप बदलणें भाग होतें व त्या मानानें कायद्यांत दुरुस्ती वेळोवेळीं केली जाते. त्याचप्रमाणें कित्येक वेळां कांहीं नवीन तत्वेंही कायद्यांत घालण्याकरितां दुरुस्ती केली जाते. अशा दुरुस्त्या कितपत गतकालसापेक्ष ( Retrospective ) असतात याचा विचार केला पाहिजे. कारण खोती आक्टामध्यें वेळोवेळीं महत्वाच्या बऱ्याच सुधारणा झालेल्या असून त्या गतकालसापेक्ष आहेत किंवा नाहींत हें प्रत्येक वेळीं ठरवितां आलें पाहिजे.

या बाबतींतील मुख्य तत्व **जनरल क्लॉझेज आक्ट १८९७** चा १० या हिंदुस्थान सरकारच्या कायद्याचें कलम ६ यांत नमूद केलेलें असून या कलमानें "ज्या वेळीं विशिष्ट उद्देश नमूद केलेला नसेल त्या वेळीं रद्द केलेल्या कलमानें खालील गोष्टी घडणार नाहींत.

(अ) ज्या वेळीं कायदा रद्द करण्यांत येईल, त्या वेळीं अमलांत अगर अस्तित्वांत असलेलें कांहींही पुन्हां अस्तित्वांत येणार नाहीं.

(ब) मागील कायद्याचे रद्द होण्यापूर्वींचे अंमलबजावणीवर, किंवा, त्या कायद्याप्रमाणें केलेल्या अगर भोगलेल्या गोष्टींवर, परिणाम घडणार नाहीं.

(क) रद्द केलेल्या कायद्यानें उत्पन्न झालेले हितसंबंध, सवलती ( privi-ledge ) हक्क ( obligation ) अगर जबाबदारी ( liability ) मिळविलेली, प्राप्त झालेली अगर उत्पन्न झालेली असेल ती नष्ट होत नाहीं."

याचप्रमाणें मुंबई सरकारानेंही हीच भाषा मुंबईसरकारचा **जनरल क्लॉझेज आक्ट सन १९०४** चा आक्ट १ यांत उचलली असून मुंबई इलाख्यांतही तेंच तत्व मान्य केलें आहे.

जनरल क्लॉझेज आक्टमध्यें ग्रथित केलेलें हें तत्व अगदीं पूर्वीपासून प्रिव्ही-कौन्सिलनें **दुलभदास वि० रामलाल ५ मूर्से० इं० अ० १०९** या ठरावांत "कायदा हा पुढील गोष्टीसच फक्त लागू आहे असें कायद्याचें अनुमान आहे. (Statutes are prima-facie deemed to be prospective only)" असें प्रतिपादन केलेलें आहे. व त्याप्रमाणेंच आजपर्यंतचे ठरावांचेंही धोरण आहे. कोणताही कायदा हा गतकालसापेक्ष नाहीं असें मानावयाचें असतें. कारण गतकालसापेक्ष करावयाचा असल्यास तसा कायद्यामध्यें स्पष्ट उल्लेख असला पाहिजे.

कोणत्याही नवीन कायद्यानें पूर्वीच्या चालू कायद्याप्रमाणें प्राप्त झालेल्या (vested) हक्कांस बाध येत नाहीं, **माक्लिऑड वि० बि० बि० सी० आय० कंपनी ७ मुं० लॉ० रि० ६१८**; कायद्याचा अर्थ करतांना तो गतकालसापेक्ष आहे असें मानणें हें कायद्याचा अर्थ करण्याचे न्याय्य तत्वास (sound principles of interpreting) अनुसरून नाहीं, **महंमद वि० कुरवान ६ मुं० लॉ० रि० २३८**; एखादा दावा कोर्टामध्यें सुरू असतां निकाल होण्याचे पूर्वीं कायद्यांत दुरुस्ती झाल्यास दावा दाखल करते वेळीं जो कायदा अमलांत होता त्याप्रमाणेंच बजावणी करून त्याचा न्याय दिला पाहिजे, **प्रभाकर वि० खंडेराव १० मुं० लॉ० रि ६२५**; अशाप्रकारें कायदा गतकालसापेक्ष (retrospective) नसून भाविकालसापेक्ष (prospective) आहे व तीच गोष्ट कायद्यामध्यें वेळोवेळीं होणाऱ्या सुधारणांस ही लागू आहे. खोती आक्टाचे बाबतींत व त्यांत वेळोवेळीं झालेल्या दुरुस्त्यांचे बाबतींतही हें तत्व लागू आहे. या करतां कायद्याची अंमलबजावणी केव्हां झाली ही गोष्ट पक्की ध्यानांत ठेविली पाहिजे. खोती आक्टामध्यें वेळोवेळीं निरनिराळ्या कलमांत दुरुस्ती झालेली आहे. त्या दुरुस्त्यांचा काय काय परिणाम आहे तें त्या त्या कलमांखालीं नमूद केलें आहे. तेथें तें पहावें.

# भाग १.

## प्रथमारंभीचे नियम.

कलम १ लहान सरनामा — या आक्टास "सन १८८० चा खोती सेटल्मेंट आक्ट" असें नांव द्यावें.

व्याप्ती — हा आक्ट् रत्नागिरी जिल्ह्यांतील खोतांनीं धारण केलेल्या सर्व गांवास लागू आहे.

गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, मुंबईच्या सरकारी ग्याझिटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, कुलाबा जिल्ह्यांतील सदरहू प्रकारच्या कोणत्याही गांवास या आक्टाचे सर्व अथवा कोणतेही ठराव वेळोवेळीं लागू करण्याचा अधिकार आहे.

### टीपा.

**१ लहान सरनामाः—**

विषयप्रवेशांत नमूद केल्याप्रमाणें हा कायदा मुंबईसरकारनें खोती गांवांच्या सेटल्मेंट म्हणजे हक्क नोंदणी करितां केला असल्यामुळें त्यास "खोती सेट्लमेंट् (हक्क नोंद) आक्ट्" असें नांव दिलें असून तो १८८० मध्यें पास झाला असल्यामुळें त्याला मुंबई सरकारचा १८८० चा आक्ट् १ असें गणण्यांत येतें व या नांवानेंच त्याचा निर्देश करावयाचा असतो.

**२ कायद्याचा अंमल केव्हांपासून व त्यांतील दुरुस्त्या कसकशा झाल्या व त्या केव्हांपासून अमलांत आलेल्या आहेतः—**

१८८० सालामध्यें हा कायदा प्रथम पास झाला. मुंबई सरकारचा कोणताही कायदा अमलांत येण्यापूर्वी हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांची संमत्ति मिळावी लागते. व मुंबई जनरल क्लाझेज् आक्ट् कलम ५ प्रमाणें ज्या दिवशीं तो मुंबई सरकारी ग्याझिटांत प्रथम प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून तो अमलांत आला असें समजावयाचें असून ती तारीख, प्रत्येक आक्ट छापतांना, त्यांत दिलेली असते. व मुं. ज. क्लॉ. आक्टाचें कलम ६ प्रमाणें ही तारीख त्या कायद्याचा भाग धरावयाची असते. या तत्वाप्रमाणें खोती सेटल्मेंट आक्ट मुंबई सरकारनें १० जानेवारी १८८० रोजीं मंजूर केला व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांनीं ता. २१

एप्रिल १८८० रोजीं मंजुरी दिली परंतु तो ता. ६ मे १८८० रोजीं प्रथम मुंबई सरकारी ग्याझिटांत प्रथम प्रसिद्ध झाला; यामुळें तेव्हां पासून त्याचा अंमल सुरू झाला असें समजावयाचें आहे. या कायद्यामध्यें महत्वाच्या दुरुस्त्याही वेळोवेळीं झाल्या आहेत व त्यांचा परिणाम केव्हांपासून हें कळण्याकरितां त्यांच्या अंमलबजावणीच्या तारखाही माहीत असणें आवश्यक आहे.

पहिली दुरुस्ती **सन १९०४ च्या आक्ट ३** याप्रमाणें झाली व त्याचा अंमल तारीख २१ जून १९०४ रोजीं सुरू झाला.

दुसरी व पुष्कळ अंशीं महत्वाची सुधारणा **सन १९१२ चा** आक्ट ८ याप्रमाणें झाली व ही दुरुस्ती **२९ जून १९१२** पासून अमलांत आली.

तिसरी दुरुस्ती **सन १९१३ चा आक्ट ४** याप्रमाणें झाली व या दुरुस्तीचा अंमल २८ मे १९१३ पासून सुरू झाला.

यानंतर अद्यापपर्यंत कांहीं दुरुस्ती नाहीं.

या १८८० च्या आक्ट १ याचे पूर्वी खोतांना १८६५ चा आक्ट १ हा लागू होता व त्याची अंमलबजावणी २५ जानेवारी १८६५ पासून झाली होती.

**३ खोती सेटल्मेंट आक्टाचे पूरक आक्टः—**

खोती आक्टानें फक्त खोतांच्या व कुळांच्या हक्कांचा निर्णय केलेला असून त्यांत सरकार जमा व्यवस्थित रीतीनें वसूल होण्याकरितां लागणारे नियम केले आहेत. खोती आक्टानें जें नियंत्रण केलें आहे त्याचा कलमवार विचार पुढें यावयाचा आहे. परंतु खोती आक्ट कांहीं दृष्टीनें फारच अपुरा असून त्याला सदोदित मुंबई लँड रेव्हेन्यू कोडाची (सन १८७९ चा आक्ट ५) मदत घ्यावी लागते. खोती आक्टच्या कलम ३९ मध्यें लँड रेव्हेन्यू कोडाचीं जीं कलमें लागू नाहींत तीं दाखल केलेलीं आहेत. त्यां व्यतिरिक्त सर्व लागू आहेत व त्यांचा योग्य त्या ठिकाणीं विचार केलेला आहे. याशिवाय अमलांत असणारे सर्व कायदे त्या त्या आक्टाचा ज्या मानानें संबंध असेल त्यामानानें लागू आहेतच. सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा कायदा, स्टँप् आक्ट, रेजिस्ट्रेशन आक्ट इत्यादि आवांतर सर्व कायदे लागू आहेतच. त्यांची अंमलबजावणी थांबविणेंकरितां खोती आक्टांत कोठेंही अट नाहीं. तेव्हां त्याचाही जेथें जेथें आवश्यक वाटलें तेथें तेथें कलमाखालीं टीपा देण्याचा उपक्रम केला आहे तो पहावा.

**४ खोती आक्टाच्या अंमलाचा विस्तारः—**

हा कायदा रत्नागिरी जिल्ह्यापुरताच असला तरी सर्व रत्नागिरी जिल्हा त्यामध्यें येत नाहीं. रत्नागिरी जिल्ह्याचे एकंदर ९ तालुके आहेत. त्यांपैकीं वेंगुर्लें आणि

मालवण या दोन तालुक्यांत खोती पद्धत नाहीं. मालवण तालुक्यांत फक्त १।२ गांवांतच खोती पद्धत आहे. या दोन तालुक्यांशिवाय दापोली, खेड, चिपळूण संगमेश्वर, रत्नागिरी, राजापूर आणि देवगड, त्याचप्रमाणें गुहागर आणि मंडणगड पेटे, यांमध्यें खोती पद्धतीचा अंमल असून तेथें हा कायदा लागू आहे. सर्व जिल्ह्यांत एकंदर गांवें १३०० असून त्यांपैकीं खोती कायदा लागू असलेले १२७५ गांव आहेत. रत्नागिरी जिल्ह्यांत सरकारी गांवसुद्धां वेगळे असून त्याला खोती आक्ट लागू नाहीं.

रत्नागिरी जिल्ह्याचे बाहेरही हा आक्ट अमलांत आणण्याचा अधिकार या कायद्यानें मुंबईसरकारास दिलेला असून तसें करतेवेळीं गव्हर्नर–इन्–कौन्सिल यांणीं सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा द्यावयाचा आहे. अशा रीतीनें कुलाबा जिल्ह्यांतील दाबतकोंड, गावलकोंड, वलतकोंड, लाटवण, कडवण, मोलवली आणि तळेघर या गांवांस खोती सेटलमेंट आक्ट लागू असून ते गांव रत्नागिरी जिल्ह्यांत सामिल केलेले आहेत.

## ५ खोती सत्ता प्रकार व इतर कांहीं भागः—

खोती सत्ता प्रकार इतर कांहीं जिल्ह्यांप्रमाणें कुलाबा जिल्ह्यामध्यें सर्वत्र व ठाणा जिल्ह्याच्या साष्टी भागांत सुरू आहे. या भागांतील खोतांस १८८० चा आक्ट १ लागू नसून खोती गांवांतील व्यवहार १८६५ चा आक्ट १ यांतील कलमें ३७।३८ व लँड् रेव्हिन्यू कोड यांस अनुसरून चालतात. या कलमांचा विचार वेळोवेळीं केलेला आहे. कुलाबा जिल्ह्यांत पेण, रोहा, मांडगांव आणि महाड या तालुक्यांत विशेषतः खोती असून तेथील खोत आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील खोत यांमध्यें फारसा, किंबहुना कांहींच, फरक नाहीं असें म्हटलें असतां चालेल. रत्नागिरी जिल्ह्याप्रमाणें जमिनीवर आपला मालकी हक्क आहे, असें तेथील खोतांचें म्हणणें असून खोती अॅक्टाचा तेथें अंमल सुरू असणें अगदीं अत्यंत आवश्यक आहे. परंतु जोंपर्यंत सरकारनें कायदा लागू केलेला नाहीं तोंपर्यंत सन १८६५ चा आक्ट १ कलमें ३७ व ३८ यांचाच तेथें अंमल असून सरकार व खोत यांचे मधील संबंध दरसालचे कबुलायतीवर अवलंबून असतो.

ठाणें जिल्ह्यांत साष्टी भागांतील खोतांची परिस्थिति मात्र अगदीं निराळी असून त्यांची खोती पद्धत व चाल अगदींच निराळी आहे. या खोतांची सुरवात अगदीं ब्रिटिश अंमदानींत झालेली असून त्यांच्या सनदाही ब्रिटिश अंमदानींतील आहेत व त्या खोतांचें हक्क मर्यादित ठेवण्याची खबरदारी शक्य तितकी प्रथम पासूनच सरकारनें ठेवलेली आहे. सन १८०८ सालचा रेग्युलेशन १ याच्या कलम

१८ पोट कलम १ यांत "खोत" याची व्याख्या करतांना "खोत हा तात्पुरता (Temporary) कसणारा असून त्यास सालोसाल जमिनी भाड्यानें देण्यांत येतात" असें ह्मटलें आहे. याबद्दलचा विचार ताजुबाई वि. कुलाब्याचे सब् कलेक्टर ३ मुं. हा. रि. १३२ या प्रसिद्ध ठरावांत केला आहे.

(६) खोतांनीं "धारण केलेल्या" गांवास:—

खोती प्रकाराचें विशेष हेंच आहे कीं, खोतांनीं आपापल्या गांवांवर बसलेली सरकारीं जमा गोळा करून सरकारास भरावयाची असते. सरकारी गांवांतून जमा वसूल करण्याकरितां सरकारचा पगारी अंमलदार, तलाठी वगैरे असतो. तसा खोती गांवांत नसतो. खोताला आपल्या गांवची जमा वसूल करण्याचा हक्क आहे, व हा हक्क वंशपरंपरा चालावयाचा आहे. अशा रीतीनें ज्या ज्या खोतांनीं हा हक्क धारण केला आहे, ते 'खोत' या शब्दप्रयोगांत येतात. हा हक्क सरकारनें बहाल केलेला नसून वाडवडलांनीं मिळविलेल्या सनदांच्या आधारावर आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या बाहेर जे खोत आहेत त्यांच्या व सरकारच्यां दरम्यान दरसाल कबुलायत व्हावयाची असते, व सरकारला त्यांच्या हक्कांचें नियंत्रण करतां येण्यासारखें असतें. येथें वापरलेल्या "धारण केलेल्या" ह्या शब्दप्रयोगानें "वाडवडिलांनीं मिळविलेल्या सनदांच्या जोरावर, हक्कानें धारण केलेल्या" असा अर्थ ध्वनित होत आहे, असें मानिलें पाहिजे.

---

**कलम २—सन १८६५ च्या मुंबईच्या पहिल्या आक्टाचीं कलमें ३७ व ३८ हीं बदल करणें:—ज्या गांवास हा आक्ट लागू आहे, अथवा यानंतर लागू करण्यांत येईल, अशा कोणत्याही गांवास जितक्या अंशीं मुंबईच्या सन १८६५ च्या सर्व्हे आणि सेटल्मेंट आक्टाचीं कलमें ३७ व ३८ हीं लागू आहेत, तितके अंशीं तीं रद्द केलीं आहेत. मात्र असें ठरविलें आहे कीं, सद्दहु कलमांतील ठरावाप्रमाणें पूर्वी कोणतेंही सेटल्मेंट केलें असेल, आणि त्याविषयीं सद्दहु आक्टाचे कलम २८ प्रमाणें ठरविलेल्या मुदतीपर्यंत सरकारनें अभय दिलें असेल, त्याच्या कायदेशीर पणास सद्दहु रद्द करण्यानें बाध येणार नाहीं.**

## टीपा.

(१) उद्देश व त्यांतील मुख्य गोष्टी:—

कलम १ यांत विचार केल्याप्रमाणें १८८० चा आक्ट १ या पूर्वी १८६५ चा आक्ट १ हाच सर्वत्र लागू होता, व त्याप्रमाणें मोजणी व हक्कनोंदणी

(Survey and Settlement) करण्यांत आली होती, "१८६५ चा आक्ट १ यांनें मोजणी, विभागणी सरकार सारा व सरकारी जमिनीची व्यवस्था या सर्व गोष्टी अमलांत आणण्याबद्दल तजवीज केली व सरकारी जमिन महसूल कायम करण्यांत आला." गणपति वि. सेक्रेटरी ऑफ् स्टेट् २६ मुं. लॉ. रि. ७५४ पान ७६३. पुढें खोती गांवांचे दृष्टीनें १८६५ चा आक्ट १ हा गैरसोईचा वाटल्यामुळें तो काढून टाकून १८८० चा आक्ट १ हा पास करण्यांत आला. नवीन आक्ट लागू करतांना केव्हांही पूर्वीच्या आक्टाचा अंमल यापुढें होणार नाहीं, असें स्पष्ट नमूद करावें लागतें. या नियमास अनुसरून ह्या कलमानें पूर्वी खोतांस लागू असलेलीं १८६५ चा आक्ट १ कलमें ३७ व ३८ हीं, खोती सेट्ल्मेंट आक्ट लागू करण्यांत आलेल्या गांवांपुरतीं, रद्द करण्यांत आलीं असल्याचें या कलमांत स्पष्ट नमूद केलें आहे. बाकी सर्व ठिकाणीं त्याचा अंमल यथापूर्व चालावयाचा आहे.

त्या आक्टाचें कलम २८ प्रमाणें ठराविक मुदतीपर्यंत (३० वर्षांपेक्षां जास्त नाहीं) सरकार सारा वाढविण्यांत येणार नाहीं असें सरकारनें आश्वासन दिलें होतें. तें आश्वासन कायम ठेवलें असल्याबद्दलचा स्पष्ट उल्लेख या कलमानें सरकारनें केला आहे.

**(२) १८६५ चा आक्ट १ याचीं कलमें ३७ व ३८:—**

खोती सेट्ल्मेंट आक्ट व त्या संबंधीं ना. हायकोर्टचे ठराव या मध्यें या कलमांचा हरएक ठिकाणीं संबंध व उल्लेख येत असल्यामुळें ती येथें देणें जरूर आहे.

**कलम ३७ येणेंप्रमाणें:—**

"जेव्हां जेव्हां रत्नागिरी कलेक्टरच्या अंमलाखालीं असलेल्या भागांत, त्याचप्रमाणें, ठाणें कलेक्टरच्या अंमलाखालीं असलेल्या रायगड, राजपुरी आणि साष्टी तालुक्यामध्यें, खोतांनीं धोरण केलेल्या गांवांस अगर इष्टेटीस सर्व्हे सेट्ल्मेंट लागू करण्यांत आलें असेल त्या ठिकाणीं सर्व्हेचे सुपरिंटेंडेंट अगर सेट्ल्मेंट अधिकारी यांस गव्हर्नर–इन्–कौन्सिल यांच्या परवानगीनें ज्या मुदती पुरतें सेट्ल्मेंट कायम धरण्यांत आलें असेल त्या सर्व मुदती पुरती, आजपर्यंत ज्या गांवांची सालोसाल कबुलायत घेण्याची पद्धत आहे, त्या त्या ठिकाणीं, एक कबुलायत घेण्याचा अधिकार देण्यांत येत आहे; आणि असेंही ठरविण्यांत येत आहे कीं सेट्ल्मेंटनें घेतलेल्या कबुलायतीच्या अखेर कायम धारण करण्याच्या बाबत दिलेल्या हक्काचे बाबतींतील कलम ३६ मधील ठराव (provisions) त्या त्या गांवांस अगर इष्टेटीस लागू राहातील".

कलम ३८ येणेंप्रमाणें:—

"वर नमूद केलेल्या अधिकाऱ्यांस असाही अधिकार देण्यांत येत आहे कीं गव्हर्नर–इन्–कौन्सिलच्या परवानगीनें जिल्ह्याचे सर्वसाधारण (general) पाहाणीचे वेळीं कुळांकडून खोतानें काय वसूल घ्यावा हें कायम करावें, आणि अशा रीतीनें ठरविलेल्या अटी, सेट्ल्मेंट ज्या मुदतीबद्दल कायम करण्यांत आलें असेल त्या मुदतीपर्यंत, अबाधित राहातील. परंतु या कुळाकडील वसुलाचे बाबतींत केलेल्या नियंत्रणानें (limitation of demands) कुळाला खरेदी, गहाण वगैरे प्रकारें वर्ग करण्याचा हक्क, जेथें असा हक्क पूर्वीपासून नसेल तेथें प्राप्त होत नाहीं, आणि खोताचेहि सर्व साधारण (general) कबुलायतीचे मुदतींत कुळानें जमीन सोडल्यास ती सर्व जमीन आपलेकडे परत घेण्याचे (reversion) त्याचे हक्कास बाध येत नाहीं."

(३) कलमें ३७ व ३८ यांचा परिणाम (effects):—

१८६५ चा आक्ट १ कलमें ३७ व ३८ यांचा अंमल अद्याप कुलाबा जिल्ह्यामध्यें होत असल्यानें तो आक्ट जरी खोती से. आक्टानें रद्द केला असला तथापि त्या कलमाकडे योग्य लक्ष पुरविलें पाहिजे. या कलमानें अमलांत आणलेल्या गोष्टी येणें प्रमाणें:–

(१) कलम ३७ प्रमाणें खोत हा "वरिष्ठ धारण करणारा" आहे असें ठरविलें.

(२) खोत आणि सरकार यांमधील संबंध सेट्ल्मेंटच्या मुदती पुरते कायम करण्यांत येऊन खोतांकडून दरसाल घेतली जाणारी कबुलायत सेट्ल्मेंटच्या मुदती पुरती एकच घेण्याचा अधिकार सर्व्हेचे सुपरिंटेंडेंट अथवा सर्व्हे कामगार यांस देण्यांत आला. सेट्ल्मेंटची मुदत साधारणपणें ३० वर्षे पर्यंत असते. या मुदतींत तरी निदान सरकार जमेंत व इतर अटींत कांहीं फेर बदल होणार नाहीं अशी खोतांना खात्री वाटू लागली व त्यामुळें एकप्रकारें खोती सत्ताप्रकारास शाश्वती आली.

(३) गांव अगर इस्टेट कायम धारण करण्याच्या (permanent occupancy), याच आक्टाचें कलम ३६ प्रमाणें प्राप्त झालेल्या हक्कांस सेट्ल्मेंटमध्यें होणाऱ्या फरकानें बाध येणार नाहीं, असें स्पष्ट ठरविण्यांत आलें.

(४) कलम ३८ प्रमाणें सेटल्मेंट अधिकाऱ्यांस खोतांची कुळांकडील मागणी कायम करण्याबद्दल अधिकार देण्यांत आला व हें नक्क मागणें सेट्ल्मेंट ज्या

मुदतीपुरतें मंजूर झालें असेल, त्या मुदती पुरतें कायम रहावयाचें, असेंही ठरलें.

(५) कलम ३७ मध्यें ज्याप्रमाणें खोत आणि सरकार यांचेमधील संबंध कायम करण्यांत आला त्याचप्रमाणें कलम ३८ मध्यें खोत आणि कुळें यांचेमधील संबंधासही कायमपणा आणण्याचा अधिकार सेटल्मेंट ऑफिसर यांस देण्यांत आला.

(६) जरी कुळांकडील वसुलास कायमपणा आला ; तथापि कुळाला कोणत्याही प्रकारें गहाण खरेदी वगैरे, हरएक प्रकारें वर्ग करण्यास अधिकार पोंचत नाहीं व खोतांच्या, कुळांच्या जमीनी परत येण्याच्या हक्कास ( reversionery right ) बाध येत नाहीं, असा स्पष्ट ठराव करण्यांत आला.

(७) कुळाला वर्ग करतां येतो किंवा नाहीं, याचेबद्दल १८६५ च्या पूर्वी एकवाक्यता नव्हती. परंतु १८६५ चा आक्ट १ यानें तो निर्बंध कायमचा घालून टाकला व तोच पुढें खोती सेटल्मेंट आक्टाचें कलम ९ यामध्येंही कायम केला गेला आहे.

(८) कुळानें जमीन सोडल्यास, अगर जमिनींतिल कुळाचा नष्टांश झाल्यास, अगर कोणत्याही प्रकारानें कुळाचा जमिनीवरील हक्क नष्ट झाल्यास, ती जमीन परत खोताच्या अंमलाखालीं यावयाची हें तत्वहि कलम ३८ मध्यें १८६५ सालीं कायम करण्यांत आलें. सध्यांच्या खोती सेटल्मेंट आक्टाचें कलम १० यांत हें तत्व ग्रथित केलें आहेच. परंतु जेथें हा आक्ट लागू नाहीं तेथें कलम ३८ प्रमाणें अंमल व्हावयाचा आहे. अगदीं अलीकडील (१९२४) एका ठरावांत सर न्या० मॅक्लिऑड यांनीं १८६५ च्या आक्ट १ चीं कलमें ३७ व ३८ यांचा विचार करतांना असें ह्मटलें आहे कीं "ह्मणून एका हस्तें, खोतांकडून दरसाल घेण्यांत येणाऱ्या कबुलायतीनें सरकारनें कबुलायतींत ठरल्याप्रमाणें खोतांचा कुळांकडील वसूल होवो अगर न होवो आपली जमा येईल अशी व्यवस्था केली; दुसऱ्या हस्तें, कुळांकडलि वसुलाचे बाबतींत कुळास खोतांकडून त्रास न पोहोंचेल अशी व्यवस्था कबुलायतींतलि अटींच्या आधारें करण्यांत आली. १८६५ चे पूर्वी कुळांकडील वसूल गांवशिरस्त्याप्रमाणें ठरविला जात असे. हा गांवशिरस्ता दर गांवास निरनिराळा असल्यामुळें कुळांच्या पुष्कळ तक्रारी येत कीं, खोत गांवशिरस्त्याबाहेर जुलमानें वसुल घेतात. खोत आपल्यापरी, मामूल वहिवाटीच्या पद्धतीचें या आक्टाचें कलम ३८ याणें योग्य प्रकारें केलेलें नियमन अयोग्य आहे, अशी तक्रार करित. परंतु वास्तविक खोतांकडून घेण्यांत येणारी कबुलायत त्या कलमानें घातलेल्या अटींस अनुसरून शिरस्त्यांशीं जुळतीच असली पाहिजे." गणपति वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं. ला. रि. ७५४ (पान ७६५).

याप्रमाणें कलम ३७ व ३८ यांतील मुख्य गोष्टींचा विचार केला असतां असें दिसेल कीं, खोतांना कोणत्याही प्रकारें नवीन हक्क या कायद्यानें प्राप्त झाले नसून उलट, त्यांच्या अबाधित मामूल सत्तेचें नियंत्रण करून त्याचे हक्क काय काय आहेत हें नक्की करण्याचा प्रयत्न करण्यास सरकारी अंमलदारांस मोकळीक देण्यांत आली, खोतांची कुळांवरील अनियंत्रित सत्ता निर्बंधित करण्यांत आली, व कुळांकडील त्यांचें मागणीला निर्बंध घालण्यांत आला. या कलमांत "कूळ" असा जो शब्द वापरला आहे. त्याची व्याख्या १८६५ चा आक्ट १ याचें कलम २ (ल) यांत "वरिष्ठ धारण करणाराकडून त्यांच्या हक्कानें मालकी अगर वारसाचा हक्क नसतां धारण करणारा" याप्रमाणें दिली आहे. याचा फारच विस्तृत अर्थ होणें शक्य असून त्यांत उपरी, एकसाली कुळांचाही समावेश होण्यास हरकत नाहीं.

## (४) सरकारसारा बसविण्याचा सरकारचा अधिकारः-

सरकारला जमा ठरविण्याचे बाबतींत १८६५ च्या आक्टाप्रमाणें कितपत अधिकार आहे याबद्दल कुलाब्याचे कलेक्टर वि. गणेश १० मुं. २१६ या ठरावांत ठरविण्यांत आलें आहे कीं, "१८६५ चा मुंबई आक्ट १ याच्या २५ व्या कलमाप्रमाणें सरकारची जमीन महसूल ठरविण्याचे बाबतींतील सत्ता अगदीं अबाधित आहे असें दिसत नाहीं. कलम २५ व सन १८२७ चें मुंबई रेग्युलेशन १७ याचें कलम ४ पो. क. २ प्रमाणें जेथें कांहीं अंशीं सारामाफीचा हक्क आहे (held partially exempt by right) तेथें सरकारची सत्ता स्पष्टपणें नियंत्रित केलेली आहे. अशा तऱ्हेचे हक्क स्पष्टपणें कायदा पास करून नष्ट करण्याचा अधिकार सरकारला वरील रेग्युलेशनच्या कलम ३ यास अनुसरून ग्रहण करतां येतो. परंतु सरकारला अशा तऱ्हेच्या अधिकाराची अंमलबजावणी विशिष्ट नियमांस अनुसरूनच फक्त करतां येते. तशा तऱ्हेचे "विशिष्ट नियम" १८६५ आक्ट १ यांत नसल्यामुळें १८२७ च्या रेग्युलेशनचें कलम ४ पो. क. २ बाजूस सारून जेथें सारा माफीचा हक्क असेल तेथें तो रेव्हेन्यु कामगारांच्या मर्जीनुरूप त्यांस नष्ट करतां येत नाहीं." यावरून स्पष्ट ठराव केल्याशिवाय साऱ्याचे बाबतींतील हक्क सरकारास नष्ट करितां येत नाहींत, हें उघड आहे.

## (५) सेटल्मेंटची "मुदत" ठरविणें व "मंजुरी" देणें:—

१८६५ चा आक्ट १ कलम ३८ प्रमाणें सेटल्मेंट ऑफिसर यांनी सरकारसारा व कुळांकडील वसूल यांचे बाबतींत ठराव केल्यानंतर तो "ठराव मंजुर होणें" व त्या ठरावाप्रमाणें वागण्याची "मुदत मंजुर करणें" यांत मोठा फरक आहे. खोती गांवांत अशा रीतीनें जर मुदत व ठराव मंजुर झाले असतील तर त्या

मंजुर झालेल्या मुदतींत १८६५ मुंबई आक्ट १ कलम ३८ प्रमाणें कुळाकडील वसुलाचे बाबतींत सर्व मंजुर झालेले नियम, खोतास बंधनकारक असतात.

"मंजुर केलेली मुदत संपवून गेली असतां पूर्वी झालेल्या ठरावांत सुधारणा होईपर्यंत पूर्वीचेंच नियम कायम मानावयाचे असतात. ह्मणजे ठराविक मुदत संपली तथापि मंजुर केलेलें सेटल्मेंट जशाचें तसें कायमच पुढें चालू राहातें. मात्र सरकारला त्यांत वाटेल तेव्हां फिरवाफिरव करण्याचा अधिकार प्राप्त होतो. या तत्वाप्रमाणें कोर्टांनीं चालणें इष्ट आहे. कारण तसें न केलें तर खोतांवर बसलेल्या कमी सरकारसाऱ्याचा फायदा त्यांनां मिळत राहून शिवाय त्यांस कुळांकडून मनमानेल तितका वसूल घेण्यास मोकळीक दिली जाईल. सेटल्मेंटची मुदत संपल्यानंतरही सेटल्मेंटमध्यें १८६५ च्या आक्ट १ कलम ३८ प्रमाणें खोतावर घालण्यांत आलेले निर्बंध कायम राहातात; कारण मदत संपली तथापि सेटल्मेंटचे ठराव सरकार सुधारणा करीपर्यंत कायम राहातात" **सेक्रेटरी ऑफ् स्टेट वि॰ सदाशिव १४ मुं॰ लॉ॰ रि॰ ७७** या ठरावावरून कुलाबा जिल्ह्यांतील खोतांकडून ज्या नेहमीं कबुलायती घेतल्या जातात त्यांतील कलमें ५, ७, व ८ याप्रमाणें खोतांनीं वागलेंच पाहिजे असें ठरविण्यांत आलें आहे.

**(६) १८६५ चा आक्ट १ कलम ३७।३८ यांतील वैगुण्यें:—**

मि॰ ई॰ टी॰ क्यांडी यांनीं "**खोती सत्ताप्रकारचे** बाबतींतील **रिपोर्टांचा गोषवारा**"* या पुस्तकांत १८६५ च्या आक्टामध्यें सुधारणा केली पाहिजे असें प्रतिपादन केलें आहे. त्या ठिकाणीं कलमें ३७।३८ यांचें वैगुण्य दाखवितांना ते लिहितातः—"रास्त बोलावयाचें तर कलम ३७ सनदी खोतांच्या गांवाला लागू पडत नाहीं. कारण अशीं गांवें धारण करण्याचा हक्क सालोसाल द्यावयाच्या कबुलायतीवरून प्राप्त होत नसून तो हक्क सनदेमुळें प्राप्त झालेला असतो. सनदी खोतांकडून सालोसाल ज्या कबुलायती घेण्यांत येतात त्याचा उपयोग फक्त एवढाच कीं, सरकारच्या जमा वसुलीला त्यामुळें बळकटी (Security) येते व गांवची व्यवस्था नीट ठेवतां येते."

"त्याचप्रमाणें सेटल्मेंट कायम केल्यानें सरकारचे हात बांधले जातात. परंतु जमीन धारण करणारास योग्य नोटीस देऊन आपली जमीन सोडण्याची मुभा राहाते सरकारला मात्र कांहीं फेरबदल करतां येत नाहीं. कलम ३८ नें खोतांचे हक्क कमी

---

* Selections from the Records of Government relating to Khoti Tenure No. CXXXIV Page 82. (यापुढें या पुस्तकास खोती सत्ताप्रकार या नांवानें संबोधिलें आहे.)

करण्यांत आले असून कुळांचे हक्क वाढविले गेले आहेत; कारण या कलमानें उपरी कुळांकडून सुद्धां सर्व-कामगारानें ठरविलेला मक्ताच खोताला घ्यावा लागतो. अशा रीतीनें खोत व कुळें यांच्या सत्ताप्रकारांत (Tenure) फरक झाला आहे. १८६५ चा आक्ट १ याचा अशा रीतीनें परस्पर संबंधांत विघात करण्याचा केव्हांही हेतू नव्हता."

यावरून १८६५ च्या आक्ट १ यांतील कलमें ३७ व ३८ हीं खोतांचे निरनिराळ्या हरएक प्रकारच्या हक्काविरुद्ध आहेत, ही गोष्ट खोतांप्रमाणें सरकारलाही पटूं लागली व १८८० सालीं खोती सेटल्मेंट आक्ट पास करण्यांत आला.

---

**कलम ३** – अर्थाचें कलम. या आक्टांत, विषयावरून किंवा संदर्भावरून बाध येत नसल्यास:—

(१) "गांव" या शब्दाचा अर्थ ज्या गांवांत किंवा गांवाच्या भागांत, किंवा हिश्शांत, जितक्या अंशीं खोताचा हक्क किंवा हितसंबंध असेल तितक्या अंशीं तो गांव, किंवा गांवाचा भाग किंवा हिस्सा असा समजावा.

गांव.

(२) "खोत" शब्दांत ज्यांचा समावेश होतो ते येणेंप्रमाणें:—

(अ) ज्या गहाण घेणाराच्या ताब्यांत खोतकी कायदेशीर रीतीनें असेल असा गहाण घेणारा;

खोत.

(ब) खोतकीचे सर्व सहभागिदार;

(३) "खोतकी" या शब्दाचा अर्थ खोताला खोत या नात्यानें प्राप्त झालेले जे हक्क व हितसंबंध त्यांचा समुच्चय;

खोतकी.

(४) "जमा" म्हणजे सरकारास खोतानें द्यावयाचा जमीनमहसूल.

जमा.

(५) "हक्कवाला खातेदार" या शब्दाचा अर्थ—

(अ) धारेकरी, किंवा

(ब) कच्चा धारेकरी, किंवा

(क) "निरंतरचें कूळ";

हक्कवाला खातेदार.

(६) "धारेकरी" या शब्दाचा अर्थ "धारा" या नांवाचा जो सत्ताप्रकार त्या सत्ताप्रकारानें जो जमीन धारण करतो तो;

धारेकरी.

(७) "कच्चा धारेकरी" या शब्दाचा अर्थ परिशिष्टांतील पहिल्या आसनांत (column) लिहिलेल्या प्रकारांपैकीं कोणत्याही प्रकारचा जमीन धारण करणारा.

कच्चा धारेकरी.

(८) "निरंतरचें कूळ" या शब्दांचा अर्थ खोती जमिनीच्या ज्या धारण करणारांस सदरहू प्रकारच्या जमिनींत "निरंतरची कूळवहिवाट" आहे तो.

निरंतरचें कूळ.

(९) "धाऱ्याची जमीन" या शब्दाचा अर्थ धारेकऱ्यानें किंवा कच्च्या धारेकऱ्यानें धारण केलेली जमीन,

धाऱ्याची जमीन.

(१०) "खोती जमीन" या शब्दाचा अर्थ ज्या जमिनीविषयीं खोतास, खोताच्या नात्यानें, कोणताही हक्क किंवा हितसंबंध आहे आणि जी जमीन धाऱ्याची नाहीं अशी जमीन;

खोती जमीन.

(११) "रिकॉर्डिंग कामगार" म्हणजे, सन १८७९ च्या मुंबईच्या जमीन महसुलाच्या कायद्याचें कलम १०८ किंवा या आक्टाचा भाग ३ यांत किंवा याअन्वयें सेट्ल्मेंट रजिष्टरांत किंवा सेट्ल्मेंटच्या इतर कागदपत्रांत नोंदी दाखल करण्याचा किंवा त्या सुधारण्याचा ज्याला योग्य रीतीनें अधिकार देण्यांत आला आहे असा कोणताही कामगार;

रिकॉर्डिंग कामगार.

(१२) ज्या शब्दाची किंवा संज्ञेची व्याख्या सन १८७९ च्या जमीन-महसुलाच्या कायद्यांत केली आहे, व यांत मागें केलेली नाहीं, त्या शब्दाचा किंवा त्यासंज्ञेचा त्या आक्टांत जो अर्थ केला आहे, तोच तिचा अर्थ आहे असें समजावें.

मुंबईच्या जमीन महसुलाच्या कायद्यांत व्याख्या केलेल्या संज्ञा.

( प्यारा ११ सन १९०४ चा आक्ट ३ कलम २ वरून नवीन दाखल केला आहे. )

## टीपा.

(१) उद्देशः—हें कलम फार महत्वाचें असून त्यामध्यें या कायद्यांत येणाऱ्या विशिष्ट शब्दांच्या व्याख्या दिल्या आहेत व त्या समजून घेणें फार महत्वाचें आहे. या कलमामध्यें दिलेल्या व्याख्या कांहीं अंशीं अपुऱ्या आहेत, परंतु मुख्य मुख्य व्याख्या दिल्या असल्यानें त्यावर अवलंबून असणाऱ्या कित्येक व्यावहारिक शब्दांचे अर्थ त्यास अनुसरून लावावयाचे असतात. याकरितां त्यांचे जोडीला हायकोर्टांचे ठरावही पहावे लागतात.

(२) "गांव":—

या सदरांत गांव या शब्दाची 'व्याख्या' दिलेली नसून गांव या शब्दाची 'व्याप्ति' काय याबद्दलचाच फक्त खुलासा केलेला आहे. 'गांव' या शब्दाची व्याख्या अशी कोणत्याही कायद्यानें केलेली नाहीं. कारण गांव हा शब्द सर्वसाधारण प्रत्येकाच्या माहितीचा आहे. "कांहीं समाज एके ठिकाणीं वस्ती करून राहातो" त्यास गांव असें म्हणण्याचा सर्वसाधारण प्रघात आहे. बेडन पॉवेल यांनीं गांव याची व्याख्या आपल्या "Land Revenue and its Administration in India" या प्रसिद्ध पुस्तकांत, पान २१ येथें, "नकाशांत ठराविक विस्तार व नांव असलेला कायमच्या वहिवाटीचा एकेजागीं असलेला समुच्चय" (A group of cultivators of a permanent character in one place, having a known area and a name in the map.) अशी केली आहे. यामुळें "गांव" या संज्ञेनें किती प्रदेश संबोधिला जातो हाच महत्वाचा प्रश्न असून त्याची व्याप्ति ठरविण्याचा अधिकार कलेक्टर अगर सर्व्हेचा अधिकारी यांस मुंबई ल्यांड रेव्हेन्यू कोड १८७९ चा आक्ट ५ कलम १२६ प्रमाणें दिलेला आहे. त्या कलमाप्रमाणें "जमीन धारण करणारांचे हक्क विद्यमान असतील त्या सर्व हक्कांकडे लक्ष देऊन, व सरकारच्या सामान्य किंवा विशेष हुकमां अन्वयें चालून कोणत्या जमिनी, गांवच्या किंवा कसब्याच्या किंवा शहराच्या ठाणांत आहेत हें ठरविण्याचा, आणि त्याच्या हद्दी ठरविण्याचा, व त्या हद्दींत वेळोवेळीं फेरफार करण्याचा अधिकार कलेक्टरास किंवा सर्वेच्या अंमलदारास आहे." "गांव" हा शब्द कायद्यानें "कसबा" अथवा "शहर" यांसही लागतो. लँड रे० कोड कलम ३ पो. क. २१ प्रमाणें "गांव" या शब्दांत "गांव, कसबा अगर शहर आणि गांवांत कसब्यांत अगर शहरांत येणाऱ्या सर्व जमिनींचा समावेश होतो."

**खोती आक्टानें** " गांव " या शद्वाची विशिष्ट व्याप्ति दिलेली आहे. गांव अशी संज्ञा वापरण्यापेक्षां खोती कायद्यानें जो गांव दर्शवावयाचा असेल त्यांस " खोती गांव " असा निर्देश करणें इष्ट व जास्त सोईचे आहे. व व्यवहारांतही ' गांव ' असा शद्व न वापरतां ' खोती गांव ' असाच शद्वप्रयोग वापरण्यांत येतो. ' खोती गांव ' या शद्वानें गांव यास जमीनमहसुलाच्या कायद्यानें दिलेली व्याप्ति नियमित केलेली आहे; त्यामुळें खोती गांवाचा विचार करतांनां **ल्यांड रे० कोडा-प्रमाणें** चालावयाचें नाहीं, हें लक्षांत बाळगले पाहिजे. ह्मणजे सरकारी गांव या व्याख्येंत येत नाहीं. या आक्टांतील व्याख्येनें " गांव " ह्मणजे खोताचा हक्क अगर हितसंबंध असलेला सर्व गांव अगर गांवाचा भाग अगर गांवांतील हिस्सा, असा अर्थ समजावयाचा आहे.

## (३) खोती गांवांचे प्रकारः—

खोती गांव तीन प्रकारचे आहेत. " **निव्वळ खोती** " " **खोती खिचडी** " व " **कुळारगी** " या तिन्ही प्रकारच्या गांवांशीं खोतांचा संबंध असतो. या तिन्ही प्रकारच्या गांवांचा अर्थ **रघुनाथराव वि. वासुदेव १ मुं. लॉ. रि. ४३६** या ठरावांत न्या० क्यांडी आणि क्रो यांनीं मार्मिक रीतीनें केलेला आहे. **निव्वळ-खोती** गांवांत धारेकरी असणें शक्य नाहीं. अशा गांवांतील सर्व जमीन खोती असून त्यांत जमिनीच्या दोन तऱ्हा असूं शकतात. एक **खोती खासगी** ( खोताचें शेत घर ) व दुसरी **खोती निसबत.** खोती खासगी जमिनी ह्मणजे खुद्द खोतांनीं धारण केलेल्या व खोती निसबत ह्मणजे कुळानें धारण केलेल्या जमिनी. ह्या खोती निसबत जमिनींतील बहुतेक कुळें कायम अगर निरंतरची असून कांहींनां, वर्ग करण्याचाही अधिकार असतो."

" **खोती खिचडी** गांवांत खोती, त्याचप्रमाणें धारा अशा दोन्ही प्रकारच्या जमिनी असतात. खोत हिस्सेदारांच्या अशा गांवांत खोती वतनांतील हिश्याशीं संबंध नाहीं अशा धारा जमिनीही असूं शकतात. "

" **कुळारगी** गांवांत खोतीजमीन असणें शक्य नाहीं. कुळारग गांव व खोती गांव या दोन्ही संज्ञा परस्पर विरुद्ध आहेत. कुळारग गांव ह्मणजे धारेकऱ्यांनीं धारण केलेल्या जमिनी ज्यांत आहेत असा गांव. "

या दृष्टीनें वर नमूद केलेला निकाल महत्वाचा व अगदीं स्पष्ट असा आहे. खोती गांवाशिवाय आणखीं एक ध्यानांत ठेवण्यासारखा प्रकार ह्मटलां ह्मणजे सरकारी अगर **खालसा** गांव होय. कांहीं वर्षांपूर्वीं खोती धारा उर्फ कुळारग गांव खोतांच्या संमतीनें त्यांस त्यांचे हक्काबद्दल मोबदला देऊन सरकारनें खालसा केले असून खोतां-

चा सर्व प्रकारचा हक्क नष्ट झाला आहे. असे खालसा गांवही बरेच आहेत. व त्यांची सर्व व्यवस्था देशावरील रयतवारी गांवांप्रमाणें चालते.

(४) जितक्या अंशीं खोताचा हक्क किंवा हितसंबंध असेल तितक्या अंशीः—

खोती गांव याची व्याप्ति दाखविण्याकरितां असा शब्द समुच्चय वापरला आहे. त्याचा अर्थ असा कीं, खोती खिचडी गांवांमध्यें गांवाचा कांहीं भाग धारा असूं शकतो व बाकीचा भाग खोती हक्काचा असतो. त्याचप्रमाणें एखाद्या गांवांत खोतांचा व इनामदारांचा असा दोघांचाही हितसंबंध येतो. कांहीं गांवांत निम्मे खोती हिस्सा व निम्मे इनाम हिस्सा याप्रमाणें हिस्से असतात. अशा वेळीं सर्व गांवावर खोताचा हितसंबंध नसल्यामुळें त्या गांवांत जेवढा खोती हिस्सा असेल तेवढ्यासच खोती गांव असें समजलें पाहिजे.

याहून विस्तृत अर्थ असाही निघतो कीं, खोतहिस्सेदाराचा खोती गांवांत जो हितसंबंध असेल तो त्यानें तुटक करून घेतल्यानंतर जो स्वतंत्र अगर तुटक घडा पडतो तो जरी त्या गांवांतील घडा असला तथापि खोती आक्टाच्या दृष्टीनें एक स्वतंत्र गांवच होतो. कारण अशा रीतीनें हिस्सा तुटक झाल्यानंतर त्या तुटक घड्याचे बाबतींत वहिवाटदार खोत नवीन नेमणें वगैरे सर्व गोष्टी स्वतंत्र गांव असें समजावयाच्या असतात.

(५) खोतः—

या ठिकाणीं खोत याचा अर्थ अगर व्याख्या कांहींच दिलेली नसून येथेंही खोत या शब्दाची व्याप्ति दिलेली आहे. खोत या शब्दप्रयोगांत खोतांचा कबजे गहाणदार व खोतींतील सहहिस्सेदार यांचा समावेश होतो. ऐवढेंच या ठिकाणीं सांगितलेलें आहे. परंतु खोत या शब्दाचा अर्थ काय, कायद्याच्या दृष्टीनें त्याचा अर्थ काय होतो, वगैरे गोष्टींचा खुलासा केलेला नाहीं.

(१) खोत या शब्दाचा अर्थ मोल्स्वर्थ साहेबांच्या शब्द कोषांत "गांव भाड्यानें करणारा;" "सरकारकरतां गांवाचा वंशपरंपरा वसूल जमा करणारा अधिकारी" असा दिला आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील खोतांना हा दुसरा अर्थच कांहीं अंशीं योग्य आहे.

(२) खोत या शब्दाची व्याख्या खोती पद्धत सुरू झाली तेव्हांची काय होती ही माहिती उपलब्ध नाहीं अगर 'खोत' हा शब्द कसा प्रचारांत आला याचाही शोध कोणी अद्याप लावलेला नाहीं. तथापि जुन्या सनदांच्या भाषेकडे नजर दिल्यास

'खोत' या शब्दानें किती गोष्टींचा अर्थबोध त्या काळीं होत असे याची कल्पना करितां येते. सनदांवरून खोती हें वतन असून खोतांस दिलेले गांव " कूळडाळ वेठबेगार फड फर्मास कायदेकानू मानपान जल तरू तृण काष्ठ पाषाण निधि निक्षेप" वगैरे हक्कांसहित त्यांचेकडे वंशपरंपरा चालावयाचे असत. खोतानें 'कूळडाळें मिळवून' आपल्या गांवीं 'महामुरी' करून 'मानपान पुरातन चालत आल्याप्रमाणें' उपभोगून 'सरकारदस्ताची उगवणी' 'मुलुख शिरस्तेप्रमाणें' करून सुखरूप राहावयाचे असे. इतकेंच नव्हे तर त्यांचे हक्कास बाध आणण्याचा कोणी प्रयत्न केल्यास खोतांस "साहाय्य" करावें असे प्रांताधिकाऱ्यांस हुकुमही असत. फार तर काय कोणी खोती नष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास, अगर मूळ खोत कांहीं दिवस गांव सोडून गेला असतां त्याची खोती कोणी बळकावल्यास, अशा इसमांचें कांहीं चालू न देतां खोती गांव मुळचे खोतास योग्य रीतीनें पूर्ववत चालेल असें करून देण्यांत येत असे. इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर खोत या शब्दाचा अर्थ संकोचित करण्यांत येऊं लागून **सन १८०८ च्या मुंबई रेग्युलेशन** मध्यें कलम १८ पो. क. २ यांत खोत याची व्याख्या " दरसाल ज्याला भाड्यानें जमिनी दिल्या जातात असा तूर्तातूर्त उगवणी करणारा ( temparary farmer to whome the lands were let over annually. ) अशी केली आहे. १८०८ मध्यें इंग्रजी अंमल फक्त मुंबईभोवतींच होता. पुढें १८१८ मध्यें इंग्रजांचे ताब्यांत सर्व कोकणप्रांत आल्यानंतर साधल्यास खोती नष्ट करावी असे प्रयत्न सुरू झाले व निरनिराळ्या आफिसरांनीं आपली शिकस्त कशी केली हें प्रस्थावनेंत नमूद केलें आहेच. कुलाबा जिल्ह्यांतील पुष्कळशा खोतांपाशीं सनदा वगैरे नसून खोती मात्र चालू होती; त्यांचे हक्क निश्चितपणें ठरविण्यास योग्य आधार नसल्यामुळें त्यांचेकडून दरसाल कबुलायत घेऊन त्याचे हक्क नियमित करण्याचे सरकारचे प्रयत्न सुरू झाले व हे प्रयत्न अद्यापही चालू आहेत. ह्याचें ताजें उदाहरण **गणपति वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं. ला री. ७५४** या ठरावामध्यें पहावयास सांपडेल.

(३) **सरकारी अंमलदारांनीं** "खोत" याची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे. या व्याख्या मि. इ. टी. क्यांडी यांनीं आपल्या "**खोती सत्ताप्रकारासंबंधें रिपोर्टांचा गोषवारा**" या पुस्तकांत ग्रथित केल्या आहेत. त्यांतील महत्वाच्या येणेंप्रमाणें:—

"१८१८ ते १८२० सालीं **मि. पेली** यांनीं "खोत हा एकंदर सरकारदस्ताची उगवणी करणारा सरकारचा गुमास्ता (agent) आहे. खोत दोन प्रकारचे आहेत. एक वतनदार खोत व दुसरे सरकारी खोत. सरकारी खोतांना सरकारला केव्हांही काढून टाकतां येतें. वतनदार खोत मात्र आपला हक्क वंशपरंपरा-

गत अबाधित असून आपणास काढण्याचा अधिकार नाहीं असें ह्मणतात" असें ह्मटलें आहे. याप्रमाणेंच मि. चॅपलीन व मि. डनडॉप् यांचेंही म्हणणें आहे. मि. ग्लॅास यांनीं १८३७ मध्यें "निवळ खोती गांवांत जमिनीची मालकी खोताची असते" असें म्हटलें असून मि. रॉबट्सन् यांनीं "खोत हे जमिनीचे मालक आहेत. परंतु त्यांची मालकी नियमित (Limited) आहे" असें म्हटलें आहे. न्या. विंगेट साहेबांनीं सुद्धां १८५१ मध्यें "खोतांनीं वंशपरंपरा गांवांची व्यवस्था पाहिली असून रयतेकडून वाटेल तो वसूल गांवशिरस्त्याप्रमाणें व रयतेची मर्जी न बिनसेल अशा रीतीनें करण्याची त्यांस मुभा आहे." असें म्हटलें आहे. या धोरणानेंच पुढील अधिकारी मि कोल्स, टरकांड वगैरे इंग्लिश अधिकाऱ्यांचें मत आहे. याची सविस्तर माहिती प्रस्तावनेंत दिली आहे. मि. अच्युत भास्कर देसाई यांनीं पुण्याच्या जुन्या दप्तरांतील सुमारें १३५ सनदांची स्पेशल नेमलेले अधिकारी या नात्यानें तपासणी करून आपल्या रिपोर्टांत व्याख्या दिली आहे ती अशी—"अशा रीतीनें सनदांचा विचार केल्यानंतर आतां खोती याचें खरें स्पष्टीकरण आपणापाशीं आहे. 'खोती' हा वंशपरंपरागत सरकारदस्ताची उगवणी करून सरकारांत भरण्याचा हक्क आहे व त्या हक्काबरोबरच शेती वाढवून नफा होईल तो घेणें, गांवशिरस्त्याप्रमाणें मानपान व हक्क उपभोगणें या गोष्टीही येतात. सनदांचा विचार केला असतां खोतांचा सर्व गांवांतील सर्व वस्तूंवर प्रत्यक्ष धारण करणारा, ताबा असणारा या नात्यानें, मालक या नात्यानें जरी नसला तथापि, हक्क असतो; परंतु वतनदार या नात्यानें त्याचें मुख्य काम शेतीला उत्तेजन देणें, दस्ताची उगवणी करणें, परमुलखी कूळें आणून माहामुरी करणें व सरकारचा महसूल सरकारांत जमा करणें." याप्रमाणें अधिकाऱ्यांच्या मतानें खोत याची व्याख्या "वंशपरागत गांवचा वसूल करण्याचा हक्क असलेला इसम" मग त्यांत मालकी हक्क असो वा नसो.

(४) **ना. हायकोर्टाचे ठराव**:—सरकारी अंमलदारांच्या रिपोर्टांत कितीही जरी व्याख्या केल्या असल्या तथापि कायद्याचे दृष्टीनें त्यांचें फारसें महत्व नाहीं. कायद्याचे दृष्टीनें ना० हायकोर्टाचे ठरावच फार महत्वाचे आहेत. या बाबतींत पहिला महत्वाचा ठराव ह्मणजे **ताजुबाई वि. सबकलेक्टर कुलाबा ३ मुं. हा. रि. १३२** हा होय. ह्या ठरावांत "खोत हा दस्ताची उगवणी करणारा असून तो हक्क वंशपरंपरेचा झाला आहे" असें नमूद केलें आहे. आजपर्यंतचे झालेले सर्व ना. हायकोर्टाचे ठराव पाहिले असतां असें दिसून येईल कीं, खोती या शब्दाची सरळ व्याख्या अशी कोठेंच केलेली नाहीं. कारण खोती प्रकार एकाच तऱ्हेचा नसून, बाधेकरी खोत, वतनदार खोत, सनदी खोत असे प्रकार आहेत. व त्यांचे हक्कहि निरनिराळ्या प्रकारचे आहेत. **सर. न्या. म्यालिऑड** यानीं **गणपति वि. सेक्रेटरी ऑफ् स्टेट् २६ मुं. ला. रि. ७५४** या ठरावांत असें ह्मटलें आहे कीं

( पान ७६३ ) " खोती रस्ताप्रकार हा शिरस्ताप्रकार १८ व्या शतकांतील अगर पूर्वीचा असून त्या प्रकारचे हक्क संबंध शिरस्त्यावर अवलंबून असतात व ते कोठेंहि निश्चित केलेले नसून ते निरनिराळ्या गांवीं निरनिराळे असतात. ( This Khoti tenure is a customary tenure which dates back from the time of the 18th century or earlier and that its incidents as prescribed by custom are no where difined and differ in different villages. )" ना. हायकोर्टानीं आजपर्यंतच्या ठरावांतून खोत या शब्दाची व्याख्या करण्याचे ऐवजीं खोतांच्या हक्काचें स्वरूप ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. व त्याचाच विचार करणें महत्वाचें आहे ह्मणजे त्यावरून " खोत " याची व्याख्या सहज ध्यानांत येईल.

(६) खोतांचे प्रकारः–

(१) बाधेकरी अगर सरकारी खोत हे केवळ हंगामी ( Temporary ) खोत असून सरकारला वाटेल तेव्हां त्यांना काढून टाकण्याचा अधिकार असतो.

(२) वतनदार खोत मात्र कायम खोत आहेत व बाधेकरी खोतांपेक्षां यांस कायमपणा जास्त आहे. वतनदार खोतांमध्येंही भेद आहेत. कांहींच्या सनदांवरून त्यांस जमिनीचे मालकीहक्कसुद्धां सर्व हक्क सनदेंत दिलेले असतात. अशा खोतास " सनदी, वतनी खोत " असें ह्मणतात. कांहीं वतनी खोतांस वंशपरंपरा खोतीचा उपभोग घेण्याचा, वसूल करण्याचा वगैरे खोती पद्धतींत मोडणारे सर्व हक्क, सनदांच्या जोरावरच प्राप्त झालेले आहेत, परंतु जमिनीचा मालकीहक्क आहे किंवा नाहीं, हें नक्की ठरवितां येत नाहीं. **रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी १२ मुंबई ५३४.**

(७) खोतांचा जमिनीवरील हक्कः—

(१) **सरकारी अधिकाऱ्यांचें मत**—ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर खोतांस जमिनीवर मालकी हक्क आहे किंवा नाहीं याबद्दल निरनिराळ्या अधिकाऱ्यांनीं आपलें मत प्रदर्शित केलें असून त्यांचा १८७३ पर्यंतचा गोषवारा मि. **ई. टी. क्यांडी** यांनीं आपल्या पुस्तकांत दिला आहे. कांहीं अधिकाऱ्यांच्या मतें खोतास मालकी हक्क आहेत व कांहींच्या मतें त्यांस मालकी हक्क नाहींत. बहुतेक अंमलदारांचें " खोतांचा जमिनीवर मालकी हक्क नाहीं. ते केवळ दस्ताची उगवणी करणारे अधिकारी आहेत " असें ठरविण्याचे प्रयत्न जोराचे चालू होते, व त्यावरून सरकारी ठरावही झालेले आहेत. १८५३ सालीं क्या. **विंगेट व कोल्स** यांनीं असा निष्कर्ष काढला कीं " खोती वतनाचा फक्त गांवच्या वसुलाशीं संबंध आहे. व जमिनीच्या मालकीशीं त्याचा कोणत्याहि प्रकारें हक्क संबंध नाहीं;" व त्याप्रमाणें

सरकारी ठराव नं. १९३७ चा ता. ३१।३।१८५३ रोजीं झाला व खोतांना जमिनीवर कांहींएक मालकीहक्क नाहीं असें ठरविण्यांत आलें. परंतु यानंतर खोतांनीं पुष्कळ चळवळ केली व लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दृष्टीस आलें कीं, खोतांच्या सनदांवरून त्यांस गांवच्या वसुलाचाच केवळ हक्क दिलेला नसून गांवच त्यास दिलेला आहे. सनदांमध्यें 'गांव' असा शब्द वापरलेला आहे " गांवचा वसूल" असा शब्द-प्रयोग नाहीं. मि. टरकांड यांनीं आपल्या रिपोर्टांत (१८५५–५६) असें ह्मटलें आहे कीं " ज्या ठिकाणीं धारेकऱ्यांसारखे मालकिहक्क असलेलीं कुळें आहेत तेथें खोत यास मालकीहक्क नाहीं असें ह्मटलें असतां शोभेल, परंतु थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्या ठिकाणीं खोतांनीं गांव वसविलें व आपणच कुळें आणून वस्ती केली अशा ठिकाणीं मला खात्रीपूर्वक असें वाटतें कीं, आपण खोतांस खोत केवळ वसूल करण्यापुरते हक्कदार आहेत असें मानल्यानें योग्य रीतीनें वागविलें असें होणार नाहीं. मला वाटतें त्यांस "मालक" मानणें हेंच मान्य (equitable) आहे. मालक याचा अर्थ अगदीं सर्वस्वी पूर्ण मालक असा नाहीं कारण " सरकार वरिष्ठ जमीनदार (paramount landlord) असल्यामुळें त्या पेक्षां जास्त मालकी हक्क कोणास असू शकणार ?" (ई. टी. क्यांडी " खोती सत्ता प्रकार " पान ६३.) १८५६ सालीं मि० क्यँडी यांनीं असेंही लिहिलें आहे कीं- (' खोती सत्ता प्रकार पान ६४) " कुळांना काढून टाकणें, जमीन सुधारण्या, करितां भांडवल खर्चीं घालणें, कुळांकडून वसुलाचे ऐवजीं मजुरी घेणें, देशमुखीचे सर्व हक्क बजावणें (manorial rights) सरकारास कांहींएक न देतां जमीन कसणें, फणसपटी वसूल करणें, दुष्काळाचे अगर नुकसानीचे वेळीं वसूल माफ करणें वगैरे खोत गाजवीत असलेल्या अधिकाराच्या गोष्टींवरून ते मालक आहेत, असें शाबित होतें. आतां ते पूर्ण मालक नसले तथापि मर्यादित (limited) मालक आहेत खास. " कर्नल फ्रान्सिसनेंही खोतांचे मालकी हक्क मंजूर करावे असेंच १८५९ सालीं सुचविलें. सरकारनें खोतांचे पुष्कळसे हक्क सन १८६० चा ठराव नं. १८३२ व सन १८६१ चा ठराव नं. ३७६५ या सरकारी ठरावांत कबूल केले. परंतु खोतांचा मालकी हक्क स्पष्टपणें कबूल केला नाहीं, व तो प्रश्न मुग्धच राहिला.

(२) ना. हायकोर्टचे ठराव– खोतास मालकी हक्क आहे किंवा नाहीं ह्या प्रश्नाचा उहापोह ताजुबाई वि. सब् कलेक्टर कुलाबा ३ मुं. हा. रि. १३२ या ठरावांत प्रथम केलेला आहे. हा निकाल फुलबेंचनें दिलेला असून त्यापैकीं दोघां न्यायाधिशांचे मत खोत हे जमिनीचे मालक नाहींत असें पडलें व एका न्यायाधिशाचें मत खोत मालक आहेत असें पडलें. या ठरावांत न्या. न्यूटन यांनीं असें म्हटलें आहे कीं "सरकार कसुरी केल्यामुळें काढलेल्या खोताला पुन्हां जागा देतें, यावरून त्या खोताचा हक्क सरकार कबूल करतें असें होत नसून, आजपर्यंत खोती खालसा करणें

सरकारास सोईचें वाटलें नाहीं, असें होत आहे. पडीत अगर अशाच दुसऱ्या, खोताच्या अधिकारांतल्या जमिनी करणें, आपणास फायदेशीर अशा अटींवर त्या दुसऱ्यास करण्यास देणें, या गोष्टी त्याच्या कामगिरीचा मोबदला असेंच समजलें पाहिजे" याच ठरावांत न्या. टक्कर यांनीं लिहिलेला ठराव जरी ग्राह्य नसला तरी त्यांतलि मुख्य भाग फारच महत्वाचा असल्यामुळें येथें नमूद करणें इष्ट आहे. ते लिहितात—"वंशपरंपरागत चालणें, खरेदी विक्री होणें, जमिनीचे विशिष्ट भाग फरोक्त करितां येणें व तात्पुरता त्याग केला असतांही पुन्हां परत घेतां येणें अशा प्रकारच्या जमिनींतील हितसंबंधांत मालकीहक्काला आवश्यक अशा सर्व गोष्टी येतात; आणि अशा तऱ्हेचे प्रकार ज्यांत आहेत त्या जमिनीवरील हक्कांत मालकी हक्काच्या मूलतत्वांचा कोणत्याही प्रकारचा उणेपणा आहे असें म्हणतां येणार नाहीं." न्या० **विंगेटच्या** म्हणण्याचें खंडन करून ते शेवटीं लिहितात "वतनदार खोत, मग त्याची उत्पत्ती कशीहि असो, त्याला कबुलायत देण्याचा वंशपरंपरागत हक्क असून आपल्या प्रकारास (tenure) अनुसरून गांव शिरस्त्याप्रमाणें तो आपली कामगिरी करीत आहे तोंपर्यंत त्याचे हक्काविरुद्ध कोणासहि जातां येणार नाहीं."

**रामचंद्र वि. रत्नागिरीचे कलेक्टर ७ मुं. हा. री. ४१** या ठरावामध्यें गांव जप्तींत असतां त्याच्या खासगी जमिनी बद्दल खोत फायदा घेतां येतो किंवा नाहीं असा प्रश्न होता, व त्यामध्यें असा ठराव झाला कीं "खोतानें जमीन आपण स्वतः कसली तरी त्याला खोतीला अनुसंगित असलेल्या हक्कांपेक्षां जास्त अगर त्याचे व्यतिरिक्त मालकी हक्क प्राप्त होत नाहीं. जास्त कांहीं न देतां जमीन कसणें हें खोतीपासून मिळणारें एक फळ असून खोती चालू आहे तोंपर्यंतच तें चालू रहावयाचें आहे.........यावरून असें सिद्ध होतें कीं, ज्या वेळीं खोती कायमची नष्ट होईल अगर तात्पुरती हातावेगळी होईल, त्या वेळीं कांहीं न देतां जमीन वापरण्याचा हक्कही कायमचा अगर तात्पुरता नष्ट होईल, कारण तो खोती चालू राहाण्यावर अवलंबून आहे. असें असू शकेल कीं, खोतांच्या स्वतःच्या ताब्यांत असलेल्या जमिनीचे बाबतींत त्यांस कुळ असें म्हणतां येणार नाहीं. व अशा जमिनीवर **१८६५ चा आक्ट १** कलम ३८ यानें दिलेला हक्क चालणार नाहीं. अशा जमिनीबद्दल जर खोत फायद्याचें प्रमाण ठराविक नसेल तर, अशा जमिनीवर सर्वेच्या पूर्वीं शिरस्त्याप्रमाणें जें घेतलें जात असे, तें घेतलें जावें."

यानंतर विशेष महत्वाचा ठराव म्हणजे प्रीव्ही कौन्सिलचा **नागरदास वि० कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट आणि कुलाब्याचे कलेक्टर ७ इं० अ० ५५= ४ मुं० २६४** हा ठराव होय. या ठरावामध्यें कलेक्टर (प्रतिवादी) यांनीं कुलाबा जिल्ह्यांतलि एका खेड्यांतलि झाडें तोडलीं. त्या गांवांत नागरदास हा (तीनचतुर्थांश)

तीनचतुर्थांशाचा खोत आणि इझाफतदार होता. करितां त्यानें आपण तीनचतुर्थांश गांवचा मालक असल्यामुळें आपणास गांवांतील तीनचतुर्थांश झाडें मिळावीं ह्मणून फिर्याद आणिली. त्यांत "नागरदास हा वतनी अगर वडिलोपार्जित खोतीमुळें खेड्यांतील जमिनीचा मालक आहे किंवा काय," असा मुख्य मुद्दा निघाला. ठरावांत **ताजुबाई वि० सब् कलेक्टर ३ मुं० हा० रि० १३२** हा ठराव अयोग्य ठरवून न्या. **सर बार्नेस पीकॉक** यांनीं असा अखेर ठराव केला कीं, " कोणत्याहि खोताकडे मालकी हक्क नसतोच अगर असणें शक्य नाहीं याबद्दल मत न देतां, असा मालकी हक्क प्रत्येक खोतालाच असतो असें नाहीं. ( Without expressing any opinion that no khot is or can be the proprietor of the soil, it is sufficient to say that it is clear that the proprietorship is not vested in every khot )." या ठरावानें ताजुबाईच्या निकालांतलि विधानांचें खंडण करण्यांत येऊन कोणत्याच खोताला मालकीहक्क नसल्याबद्दलचा **ताजुबाईचे** ठरावांतील भाग रद्द पाडण्यांत आला. या ठरावानें घातलेलें तत्व अद्याप ना. हायकोर्टानें कायम धरलें आहे.

कुलाबा जिल्ह्यांतील खोत व रत्नागिरी जिल्ह्यांतील खोत यांमधील फरक नमुद करणारा एक ठराव यानंतर झाला आहे. **भिकाजी वि. निजामअल्ली ८ मुंबई ५२५** हा मुकदमा कुलाबा जिल्ह्यांतून हायकोर्टाकडे गेलेला असून त्यांत **न्या. वर्डवुड** यांनीं असा ठराव लिहिला कीं, "रत्नागिरी जिल्ह्यांतलि गांवांत आणि १८८० चा आक्ट १, ह्मणजे खोती से. आक्ट, ज्याला लागू करण्यांत आला आहे अशा कुलाबा जिल्ह्यांतलि गांवांत खोताचा दर्जा वरिष्ट धारण करणारा असा आहे. आणि त्याचा गांव जप्तींत गेल्यास, तो जप्तींतून मोकळा होऊन त्याचे ताब्यांत आल्यानंतर खोती फायद्यासंबंधाचे हक्क लँड रे. कोड कलम १६२ मधील नियमाप्रमाणें चालावयाचे आहेत. ज्या सालीं गांव परत आपले ताब्यांत मिळण्याबद्दल अर्ज आला असेल त्या सालचा खर्च व मागील बाकी वजा घालून जास्त राहाणारा खोत फायदा कलेक्टर त्यांस देईल. त्या पूर्वीचे सालचा फायदा सरकारला मिळेल. खोतानें गांव जप्तींत गेला त्या सालच्या ऑगस्ट महिन्यापासून १२ वर्षांचें आंत अर्ज केल्यास त्यास हा फायदा मिळेल. परंतु ज्या ठिकाणीं खोती से. आक्ट लागू नाहीं त्याठिकाणीं गांव जप्तींत असतां कोणत्याही मुदतीचा खोती फायदा त्यास मागतां येणार नाहीं. १८८० चा आक्ट १ पास होण्यापूर्वीं खोताचे हक्क व अधिकार ( rights and privileges ) कांहीं ठिकाणीं देणग्या ( grant ) वरून व कांहीं ठिकाणीं मुदतीचे कायद्यानें ( prescription ) ठरविले जात असत. इतके निःसंशय आहे कीं, प्रत्येक गांवांत हे हक्क पुराव्यावर अवलंबून असत. रत्नागिरी जिल्ह्यांतलि खोत आणि विशेषतः वतनदार आणि सनदी ह्मणून गणले जाणारे खोत यांचा जमि-

नीवर मालकी हक्क कबुल केलेला (admittedly) आहे. परंतु कुलाबा जिल्ह्यांत ताजुबाईच्या ठरावामुळें एका विशिष्ट गांवाचे बाबतींत कांहीं पुरावा नसतां खोत वतनी अगर सनदी आहे, व त्या खोतास त्या ठरावांत निदर्शित केल्यापेक्षां जास्त हक्क आहेत असें मानणें बाजवी नाहीं."*

वतनी खोत असल्यानें गांवांतील कसल्या जाणाऱ्या जमिनीचा तो मालकच असतो असें नाहीं, असा ठराव **मोरो आबाजी वि० नारायण ११ मुंबई** ६८० या ठरावांत केला आहे. हा ठराव रत्नागिरी जिल्ह्यांतील असून खोत आणि इनामदार यांमध्यें मालकीचा वाद होता. यांत असा ठराव करण्यांत आला कीं, "वतनदार खोत असणें एवढ्यानेंच केवळ शेती जमिनीचा तो मालक असतो असें नाहीं, खोतीचे बरोबर मालकीची कल्पना आवश्यक येतेच असें नाहीं. केवळ थल घेतली म्हणजे मालकी हक्क प्रस्थापित होत नाहीं."†

याच प्रकारचा ठराव **रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी लक्ष्मण १२ मुंबई** ५३४ या रत्नागिरी जिल्ह्यांतील ठरावांत नमूद केलेला आहे. त्यांत असें

---

* "In Ratnagiri District and those villages (if any) in the Kolaba District to which the Act has been extended, the khot enjoys the position of a superior holder; and in the event of the attachment of his village, his rights in respect of his khoti profits on resuming the management of his village, would be regulated by the provisions of Sec. 162 L. R. Code......................In many villages in Ratnagiri District the khots, especially those known as watandar and Sanadi khots admittedly possessed a proprietory interest in the soil. But in Kolaba District since the decision in Tajubai's case it would not be safe to hold in the case of particular village in the absence of evidence that the khot is a sanadi or a watandar khot that his rights are of a higher order than were found te belong to the khot of Pegodah."

† "That the mere fact of the defendants, being watandar khots, did not make them proprietors of the cultivated land in the vlllage; that proprietory rights were not essential to the conception of khotship; that in levying thal on the lands tilled by the plaintiffs, the defendant did not necessarily assert, they did not certainly establish, a proprietory right to the soil as against the inamdars."

ठरविण्यांत आलें आहे कीं "सनदेमध्यें प्रत्यक्ष तसा हक्क दिल्याचा स्पष्ट उल्लेख नसेल तर जमिनीवर, शेती असलेल्या अगर ओसाड जमिनीवर, केवळ वतनदारी खोती दिल्यानें मालकी हक्क प्राप्त होत नाहीं" त्याचप्रमाणें "वतनी खोती दिल्यानें खोत गांवांतील धारा जमिनीशिवाय बाकी जमिनीचा सरकारचा कायमचा कूळ होतो असें नाहीं." **सर न्या. सार्जंट** यांनीं आपले ठरावांत ह्मटलें आहे कीं "या मुकदम्यांत हजर केलेल्या सनदांवरून असें दिसतें कीं त्यामुळें खोती प्रकारांत कांहीं फेरबदल न होतां केवळ बाधेकरी खोतापेक्षां खोती हक्कास जास्त कायमपणा आला आहे, आणि त्यांत गांवची शेती वाढवून सरकारदस्ताची उगवणी करण्याबद्दल खोती दिलेली आहे. त्या सनदांत सरकारचा जमिनीवरचा मालकी हक्क देण्यांत आला आहे असें दाखविणारा एकही शब्द नाहीं. मालकी द्यावयाची असा जर हेतु असता तर "जल तरु तृण काष्ट पाषाण निधि निक्षेप" अशा सारखे शब्द वापरलेले असते. सनदांचा विचार करतांना सरकारला फायदेशीर अशा दृष्टीनें त्यांचा विचार करावयाचा असतो व त्यामुळें सनदेमध्यें अगदीं स्पष्ट असा अर्थ नसतां सरकारचा मालकी हक्क गेला नाहीं असेंच धरलें पाहिजे. आणखी, खोतांचा जमिनी कसण्याचा हक्क व इतर अधिकार हे खोतांनीं आपलीं कर्तव्यें बजावण्यावर अवलंबून असतात असें ताजुबाईच्या आणि **७ मुं. हा को. रि. ४१** या दोन ठरावांत मानण्यांत आलें आहे. या नियमास अनुसरून सेट्लमेंट अस्तित्वांत असेपर्यंत सरकारचा व खोतांचा कायमचा संबंध प्रस्थापित झालेला असून खोतांच्या सल्ल्याशिवाय त्यांत ढवळाढवळ करतां येणार नाहीं."

**फकी इस्माइल वि. महंमद इस्माइल १२ मुंबई ५९५** या कुलाबा जिल्ह्यांतील ठरावांत ताजुबाईचे ठरावास अनुसरून न्या. बर्डवुड यांनीं असें ठरविलें आहे कीं "खोती पद्धतीवरून उत्तरकोंकणांतही खोती इष्टेटींत असणाऱ्या ओसाड व टाकलेल्या जमिनीचा आपणच धारणकरणारा होण्यास खोतास अधिकार आहे."

सेक्रेटरी ऑफ् स्टेट् वि० **वासुदेव ९ मुं. ला. रि. ७१९ = ३१ मुं. ४५६** या ठरावांत नदींत गाळानें तयार झालेली जमीन खोताची आहे किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित झाला असतां न्या. चंदावरकर यांनीं असें ह्मटलें आहे कीं "जेव्हां नदींचें पात्र गाळामुळें कोरडें पडतें त्या वेळीं तो ओसाड भाग पडजमीनच गणली पाहिजे. अशी जमीन ज्यावेळीं सर्व गांवच, गांवांतील पड व ओसाड जमीन वहिवाटीस आणण्याच्या हक्कासह, वंशपरंपरा खोतास देण्यांत आला त्यावेळींच त्यांस देण्यांत आली असें मानलें पाहिजे. लँ. रे. को. कलम ३७, सरकार मालक आहे असें सांगतें खरें. परंतु तें सरकारचा हक्क कायम प्रस्थापित करणारे नसून खोतांनीं मिळविलेले हक्क त्यामुळें नष्ट करतां येतात असें नाहीं."

अगदीं अलीकडील ठरावांत सुद्धां वरील ठरावांत आलेलें तत्व ग्राह्य धरलेलें आहे. कुलाबा जिल्ह्यांतून ना. हायकोर्टाकडे गेलेल्या **अहंमद वि. गणेश २५ मुं. लॉ. रि. ५२१** या ठरावांत खोती खासगी आणि खोत निसबत जमिनींत वाढणाऱ्या इंजली झाडांचे १८२४ च्या डन्लॉपच्या जाहीरनाम्यावरून खोत मालक आहेत असें ठरविलें आहे. **सर न्या. ना. मॅक्लिऑड** साहेबांनीं वरील ठरावांचा आधार देऊन व विशेषतः **नागरदास वि. कॉंझरव्हेटर ऑफ फॉरेस्ट** ठरावाचे जोरावर आपल्या ठरावांत ह्मटलें आहे कीं, " असा कांहीं सर्वसाधारण नियम नाहीं कीं, कोणत्याही वतनदार खोताला जमिनीवर आपली मालकी सांगतां येत नाहीं. खात्रीपूर्वक मला असें दिसतें कीं, खोती खासगी आणि खोत निसबत जमिनींचा तो बहुतांशीं मालकच आहे."

याच तत्वाचा अनुवाद **गणपति वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट् २६ मुं. लॉ. रि. ७५४** या कुलाबा जिल्ह्यांतील एका ठरावांत १९२४ सालीं केलेला आहे. ह्या ठरावांत सरकारला खोतांवर कोणत्या प्रकारच्या अटी दरसालच्या कबुलायतींत लादतां येतील याचा स्पष्ट खुलासा केलेला असून खोतांनीं फक्त मामूल वहिवाटीप्रमाणें १८६५ चा आक्ट १ कलम ३७।३८ यांतील कायद्यास अनुसरून कबुलायत द्यावी, वाटेल त्या अटी कलेक्टर वगैरे अधिकाऱ्यांस लादतां येणार नाहींत, असा स्पष्ट ठराव केलेला आहे. या ठरावाचा विशेष खुलासा पुढें केला आहे.

वरील सर्व ठरावांवरून खोतांचा जमिनीवर मालकी हक्क त्यांच्या जवळच्या पुराव्यावर अवलंबून आहे, असें कोणासही दिसून येईल. बाधेकरी खोतांची जमिनीवर मालकी नाहीं परंतु वतनी खोतांची मालकी नसेलच असें नाहीं. सनदेमध्यें जल तरू तृण काष्ट पाषाण निधि निक्षेप असे शब्द असल्यास तो सनदी खोत पूर्ण मालक असें मानण्यास हरकत नाहीं. रत्नागिरी जिल्ह्यांतील बहुतेक गांवांतील वतनदार आणि सनदी खोत यांस जमिनीवर मालकी हक्क आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु कुलाबा जिल्ह्यांत मात्र असें उघडपणें मानतां येत नाहीं. त्याठिकाणीं विशिष्ट पुरावाच पाहिजे.

(८) खोत आणि देशावरचे पाटील—

इंग्रजी अंमल सुरू झाल्या नंतर पुष्कळशा इंग्रजी अधिकाऱ्यांनीं खोती पद्धतीची इतर देशांतील निरनिराळ्या पद्धतीशीं तुलना केली आहे. क्यांडी साहेबांनीं आपल्या " **खोती सत्ताप्रकार** " या पुस्तकांत विलायतेंतील " **फ्यूड्ल** " पद्धतीशीं तुलना करून खोती गांव हा " **म्यानोरिअल ग्रूप्** " शी बराचसा जुळता आहे ( a near approach to the form of the manorial group )

(पान ३९) असें ह्मटलें आहे. विशेष महत्वाची तुलना ह्मणजे मि. कोल्स व इतर अधिकाऱ्यांनीं देशावरच्या पाटलांशीं केलेली तुलना होय. कोल्ससाहेब ह्मणतात-- "ज्याप्रमाणें रयतांशीं त्यांचे मर्जीप्रमाणें ठराव करून सरकारचा जमीन महसूल भागविण्याची जबाबदारी पाटिलांवर होती त्या प्रमाणेंच येथील स्थिती आहे; फरक इतकाच कीं देशावर जमाबंदी दरसाल नवीनवी ठरविण्यांत येत असे. अशा रीतीनें पाटील फक्त वार्षिक वसूल करणारा (farmer from year to year) असे, आणि कोंकणांत जमाबंदी १० वर्षातून एकदां कदाचित बदलत असे आणि त्या मुदतींत खोताकडेच गांव असत." याचप्रमाणें मि. पेली, चापलीन, डनलॉप्, डॉवेल् विंगेट, टरनॉड वगैरे अधिकाऱ्यांनीं खोत आणि पाटील हे सारखे नाहींत असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी लक्ष्मण १२ मुंबई ५.३४ या ठरावांत सर न्या. सार्जंट यांनीं असें ह्मटलें आहे कीं "चौकशी अंतीं ब्रिटिश सरकारला असें दिसून आलें कीं ऐतिहासिक दृष्ट्या आणि वास्तविक (in fact) खोतांची स्थिति (position) देशावरील पाटलांपेक्षां अगदीं निराळी आहे. हा फरक कोंकणांत विशेषतः खोतीं गांव पुष्कळ असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यांतील जमीन निकस दरिद्री असल्यामुळें, तेथें शेतीची वाढ करून गांव भरभराटीस आणण्यास भांडवल खर्चीं घालावें लागतें, यामुळें आहे." यावरून खोत व पाटील हे भिन्न असून खोतांचे हक्क पाटलांच्या हक्कांपेक्षां उच्च दर्जाचे आहेत यांत शंका नाहीं.

(९) खोत शब्दाची व्याप्ति—

या कलमामध्यें खोत याची व्याख्या न देतां खोत याची व्याप्ति दिलेली आहे, हें मागें सांगितलेंच आहे. एका गांवांमध्यें एक अगर अनेक खोत असूं शकतील. अनेक खोत असतां प्रत्येकाचा गांवामध्यें ठराविक हिस्सा असतो. अशा सर्व हिस्सेदारांस खोतहिस्सेदार असें म्हणतात, व त्यांचा खोत या शब्दांत समावेश होतो. खोतहिस्सेदारांचे कबजेगहाणदार, ज्यांच्या ताब्यांत स्वतंत्र गांवाची अगर गांवचे तुटक हिश्शाची वहिवाट कायदेशीर रीतीनें गेलेली असेल, असे गहाणदार धनकोही खोत या सज्ञेंत येतात.

येथें "कायदेशीर रीतीनें वहिवाट ताब्यांत गेलेला गहाणदार" या शब्दाचा अर्थ स्पष्ट करणें जरूर आहे. ट्रान्फर ऑफ् प्रॉपर्टी आक्टा प्रमाणें कबजे गहाणदाराकडे प्रत्यक्ष कबजा द्यावा लागतो. परंतु नुसता कबजा देऊनही भागत नाहीं. त्या गहाणदाराचें नांव सरकारकागदीं दाखल झाल्याशिवाय त्यास कबुलायत वगैरे देतां येणार नाहीं व पूर्ण कायदेशीर कबजा झाला असें म्हणतां येणार नाहीं. याकरितां सरकारकागदीं नांव दाखल करणें, गहाणदाराची कबुलायत होणें वगैरे गोष्टी "कायदेशीर कबजा" या शब्दानें ध्वनित केलेल्या आहेत.

खोती गावांत वहिवाटदार खोत म्हणून नेमणूक करणें ती "**ब पत्रकांत**" ज्याचें नांव व हिस्सा दाखल आहे अशा हिसेदारांचीच करतां येते. "ब पत्रक" अगर अन्य कोणत्याही सरकार कागदीं नांव दाखल करणें वगैरे गोष्टी या आक्टाचा भाग ३ प्रमाणें चालतात. कलम १६ मध्यें ज्या नोंदी कराव्या असें सांगितलें आहे. त्यामध्यें खोत हिस्सेदाराचे गहाणदाराचा कोठेंही उल्लेख नाहीं. "खोत" या शब्दाचे व्याप्तींत "खोतकीचा कायदेशीर कबजा असलेला गहाणदार मोडतो; ह्मणजे स्वतंत्र खोताकडून कबजा प्राप्त झालेला गहाणदार होय, खोत हिस्सेदाराचा गहाणदार नव्हे. ह्या बाबतींत **दत्तात्रय वि० रामचंद्र २ मुं० लॉ० रि० ३५४** या ठरावांत खोत हिस्सेदाराचा गहाणदार मोडत नाहीं, असा स्पष्ट ठराव ना. हायकोर्टानें केलेला आहे. ठरावांत न्या. पार्सन्स यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "या (खो. से. आक्ट) कायद्यानें सर्वे कामगारांस, सेटल्मेंट रजिस्टर तयार करतांना खोतकीमधील कांहीं हिशाचा गहाणदार ह्मणून जे आपला हक्क सांगतात त्यांच्या हक्काची चौकशी अगर विचार करण्याचें कारण नाहीं; आणि अशीं गहाणें अस्तित्वांत आहेत किंवा सुटून गेलीं याचा विचार करण्याचें त्याहूनही कारण नाहीं."

हा ठराव कलम १६ व इतर खोती आक्टाची कलमें यांचा विचार करून दिलेला असल्यामुळें खोत हिसेदारांचे गहाणदारांचीं नांवें 'ब पत्रकास' दाखल करणेचा सर्व्हे कामगारांस अधिकार नाहीं. त्यांस स्वतंत्र खोतांचा गहाणदार असेल व त्याचेकडे "कायदेशीर कबजा" गेलेला असेल तरच त्याचा विचार करून त्याप्रमाणें नोंद करावयाचा अधिकार आहे. कांहीं ठिकाणीं "ब पत्रकास" ज्या खोत हिस्सेदारांचीं नांवें दाखल आहेत, मग ते तुटक धडे पडून असोत अगर आणेवारीनें असोत, अशा खोत हिस्सेदारांऐवजीं त्याचे गहाणदारांचीं नांवें दाखल करण्यांत येतात इतकेंच नव्हे तर कबुलायत देणेंच्या वगैरे सर्व सवलती त्यांस देण्यांत येतात. अशा तऱ्हेनें साध्या खोत हिस्सेदारांचे गहाणदारांचीं नांवें दाखल करणें बेकायदेशीर असून कायद्याचे अज्ञानामुळें अशा नोंदी झाल्या व होत आहेत हें उघड आहे.

## (१०) खोत "शेतकरी" आहे काय ?—

एखादा इसम खोत असल्यास तेवढ्यावरूनच तो **शेतकरी ऋणमुक्त कायद्याप्रमाणें (१८७९ चा मुंबई आक्ट १७)** "शेतकरी" होतो किंवा काय हा मुद्दा प्रत्येक मुकदम्यांतील पुराव्यावर अवलंबून असून ठोकळमानानें त्याचें उत्तर देता येणें शक्य नाहीं. असेंही असूं शकेल कीं, खोत केवळ सरकारदस्ताची उगवणी करणाराच असल्यास शेतकरी ह्मणून त्याला या कायद्याचा फायदा घेतां येणार नाहीं. खोताचें खोत या नात्यानें शेतीवर जीवित अवलंबून असल्यास त्यांस शेतकरी ह्मणतां येईल. खोताकडे बहुतकरून खासगी जमिनी असल्यामुळें त्याचेकडे शेती

असतेच. तथी खासगी जमीन असल्यास त्यास शेतकरी असें मानावें लागेल. कांहीं झालें तरी हा प्रश्न पुराव्यावर अवलंबून ( question of fact ) आहे. **गोपाळ बल्लाळ दामले वि० विद्याधर गणेश दामले.** दु. अ. ७५८ सन १९०९ नि. ता. २१।२।१९११.

**(११) खोतकी—**

खोतास जे हक्क व हितसंबंध आहेत त्यांचा समुच्चय खोतकी या शद्बानें दर्शविला जातो. खोतकी या शब्दांत येणारा खोतांचे हक्क व हितसंबंधाचा समुच्चय कोणता हें पाहूं गेल्यास खोतांना पुढील हक्क या कायद्यानेंच दिलेले आहेत.

(१) खोताला आपला गांव, सरकारास जमा देणें, येवढ्याच अटींवर कायमचा धारण करतां येतो. ( कलम ४ )

(२) खोतांना आपला गांव अगर हिस्सा कोणत्याही प्रकारें वर्ग करण्याचा पूर्ण अधिकार आहे. ( कलम ९ )

(३) खोती वंशपरंपरा चालण्याचा हक्क असून वारसाचे हक्क त्यास लागू आहेत. ( कलम ९ )

(४) धारेकरी व कच्चेधारेकरी यांच्या जमिनी बेवारशी झाल्यास अगर थल न दिल्यानें खालसा झाल्यास त्या खोताकडे येतात. ( कलम १० ) अशा जमिनी खोती जमिनी ह्मणून गणल्या जातात.

(५) निरंतरचे कुळानें आपल्या जमिनीचा राजिनामा दिल्यास, अगर असें खातें गतकुळीं झाल्यास, अथवा खंड न दिल्यानें खातें खालसा झाल्यास, अगर अशा कुळानें खोताचे संमतीशिवाय, बेकायदा, वर्ग केल्यास ती जमीन खोताकडे येते. (कलम १०) व अशा जमिनीवर खोतांचा खासगी जमिनीप्रमाणेंच ताबा असतो. **गजानन वि० निळो ६ मुं० लॉ० रि० ८६४.**

(६) सरकारचे हक्कांस बाध येऊं न देतां खोतास कोणत्याही कुळास हक्कवाल्या खातेदारांपैकीं कोणत्याही वर्गाचे कूळहक्क देण्याचा अधिकार आहे. (कलम ११).

(७) खोतास सर्व हक्कवाल्या खातेदारांकडून थल वसूल करण्याचा हक्क आहे. (कलम ३२).

(८) खातेदारांकडून खोतफायदा घेणेचा खोतास हक्क आहे. "-मोबदला—किंमत" ठरल्यास खोत फायद्याबद्दल पट ठरवून मिळणेचा हक्क आहे. (कलम ३३)

(९) खोतास पड आणि ओसाड जमीन, त्यांचप्रमाणें नदीच्या पात्रांत तयार झालेली जमीन खोती जमीन म्हणून लागवडीखालीं आणण्याचा अधिकार आहे. **सेक्रेटरी ऑफ स्टेट वि० वासुदेव ९ मुं० ला० रि० ७१९.**

(१०) खोत हा खोती खासगी जमिनीचा मालक आहे. **सेक्रेटरी ऑफ स्टेट वि० नारायण १ मुं० ला० रि० १९.**

(११) डनलॉपच्या १८२४ च्या जाहिरनाम्यानें खोतांना आपल्या मालकीच्या जमिनींतील झाडांवर पूर्णपणें मालकी उत्पन्न झालेली आहे. आणि हा हक्क खोतांच्या संमत्तीवांचून कोणासही काढून घेतां यावयाचा नाहीं. सेक्रेटरी ऑफ स्टेट वि० नारायण १ मुं० ला० रि० १९.

(१२) कुलाबा जिल्ह्यांतील खोतांला दरसालची कबुलायत मामूल वहिवाटीप्रमाणें व १८६५ चा आक्ट १ कलम ३७।३८ यांस अनुसरून देण्याचा हक्क आहे. गणपति वि० सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं० लॉ० रि० ७५४.

(१३) रत्नागिरी अगर कुलाबा जिल्ह्यांतील खातेदार कुळाला खोताचे संमतीवांचून वर्ग करण्याचा अधिकार नाहीं.

(१४) सरकारनें ओसाड खोती जमिनीमध्यें अरण्य राखल्यास त्यामुळें सरकारला होणाऱ्या फायद्यांत खोताचा एकतृतीयांश हक्क आहे. ( कलम ४२ )

(१५) खोतांचे विरुद्ध, कुळाचा विरुद्ध कबजा होत नाहीं. विष्णू वि. बाबला २३ मुं. ला. रि. ४११.

(१२) खोताच्या जबाबदाऱ्या—

(१) जमा भरलीच पाहिजे. नाहींतर लँड रे. कोडाप्रमाणें जमा वसुलीची पुढील व्यवस्था होईल.

(२) हिशोब कलम ४० खालील नियम ई. (६) प्रमाणें योग्य प्रकारें ठेवले पाहिजेत. ( कलम १५ )

(३) महालकऱ्याचे हुद्यापेक्षां कमी नाहीं, अशा अंमलदारास त्यानें मागितल्यास हिशेबाचे कागद दाखविले पाहिजेत.

(४) कुळाला पावती दिली पाहिजे.

(वरील नं. २।३।४ च्या गोष्टी न केल्यास १०० रु.चे आंत दंड होईल. (कलम १५).

(५) गांव समाईक असतां पाळीप्रमाणें अगर आपसांतील समजुतीप्रमाणें अगर कलेक्टराच्या हुकमाप्रमाणें कोणीतरी गांवची कबुलायत दिली पाहिजे. (कलम २६ ) नाहींतर गांव जप्तींत जाईल.

(६) खोतानें वेठ, फसकी वगैरे कुळांकडून घेतां नये. (कलम ३५ ).

(७) खोतानें लोकलफंड जमा करून दिला पाहिजे (कलम ३६ ).

(८) अरण्याचे बाबतींत सरकार फर्मावील त्याप्रमाणें चाकरी केली पाहिजे.

(१३) जमा—

सरकारांत खोताला जो ठरावीक महसूल भरावा लागतो त्यास जमा असें म्हणतात. लॉ. रे. को. कलम १०० प्रमाणें सर्व्हे अधिकाऱ्यांनीं जमिनीची मोजणी करून ही जमा त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणें नियमानुसार ठरवावयाची आहे.

सरकारचा दस्त जमिनीच्या मगदुरावर अवलंबून असून प्रतीप्रमाणें ठराविक प्रमाणांत दस्त वाढविला जातो. ज्या ठिकाणीं मोजणी होत नाहीं त्या ठिकाणीं सरकार दस्त ठरविण्याचा कलेक्टर यांस **लँ. रे. को. कलम ५२** प्रमाणें अधिकार आहे. सरकार दस्त हा जमिनीवरील "पहिला बोजा" (paramount charge) असून सरकार दस्त न दिल्यास दुसऱ्या कसल्याही बोजाची पर्वा न करतां, जमीन, जमिनीवरील झाड, माड, घरें व इतर सर्व प्रकारचे हक्क संबंध विकून दस्त वसूल करण्याचा सरकारला अधिकार आहे (**लँ. रे. को. कलम ५६**). ही जमा खोतांचे बाबतींत कशी ठरवावी हें **कलम २४** मध्यें सांगितलेलें असून "गांवचे जमिनीचे सर्वे आकाराच्या एकंदरींतून, प्रत्येक प्रसंगीं जितके टक्के सरकार ठरवितील (जर ठरवितील तर) तितके टक्के वजा करून बाकी राहील ती होय" असें ठरविलें आहे. ही जमा सर्व्हे सेटल्मेंटची रिव्हिजन होईपर्यंत कायम राहाते.

## (१४) हक्काला खातेदार—

हक्काला खातेदार "या शब्दांत धारेकरी, कच्चा धारेकरी व 'निरंतरचें' अगर खातेदार कूळ" अशा तिन्ही प्रकारचे खातेदारांचा समावेश होतो. 'खातेदार' या शब्दाची व्याख्या **लँ. रे. को. कलम ३ पो. क. १६** यांत केली असून तेथें त्याची व्याख्या, "खातेदार या शब्दाचा अर्थ, कूळ खेरीज करून, दुमाला नसणाऱ्या जमिनीचा प्रत्यक्ष कबजा धारण करणारा असा समजावा. मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, जेव्हां प्रत्यक्ष कबजा धारण करणारा कूळ असेल तेव्हां, प्रसंगाप्रमाणें जमीनदार किंवा वरिष्ठ जमीनदार खातेदार आहे असें समजलें पाहिजे." अशी केलेली असून तीच येथेंही ग्राह्य आहे, कारण या कायद्यानें खातेदार या शब्दाची व्याख्या केलेली नाहीं. न्या. क्यांडी आणि क्रो यांनीं **रघुनाथ वि. वासुदेव १ मुं. लॉ. रि. ४३६** या ठरावांत "खातेदार कूळ" याची व्याख्या केली असून ती फार महत्वाची आहे. ते लिहितात "खातेदार कूळ याचा अर्थ काय? हा एक कुळानें आपल्या वरिष्ठ धारण करणाराचे विरुद्ध प्रस्थापित केलेला, आपल्याकडून कायदेशीर रीतीनें वेळोवेळीं ठरलेला खंड पोंचत असतां आपल्या जमिनी निरंतर धारण करण्याचा हक्क होय. (What is an occupancy tenant? It is a right established by a tenant against his superior holder to hold his land in perpetuity conditionally on the payment of rent from time to time lawfully due by him to the superior holder.)" खातेदार आणि कूळ हें दोन कायद्याचे दृष्टीनें भिन्न प्रकार आहेत हें नेहमीं ध्यानांत बाळगलें पाहिजे. कुळ याची व्याख्या **लँ० रे०को. कलम ३ (१४)** यांत "कूळ म्हणजे पट्टयानें घेणारा, मग तो दस्तैवजाअन्वयें जमीन धारण करीत असो किंवा तोंडच्या कबुलायतीनें धारण करीत असो, व त्या शब्दांत,

कुळाचे हक्क कबजासहित गहाण घेणाराचा समावेश होतो; परंतु त्यांत सरकाराकडून परभारें पट्ट्यानें जमीन धारण करणाराचा समावेश होत नाहीं " अशी आहे. "कुळा" चा कबजा दस्तऐवजावर अगर तोंडी कबुलायतीवर अवलंबून ठराविक मुदती पुरताच असतो. परंतु "खातेदारां" चा कबजा तोंडी अगर लेखी करारावर अवलंबून नसून कायमचा असतो. खातेदारांस विशिष्ट हक्क व अधिकार या कायद्यानें दिले आहेत ते—

(१) या खातेदारांना आपल्या नांवावर, आपल्या खात्यांत, जमिनी ठेवण्याचा हक्क आहे. (कलम १६).

(२) त्यांना आपल्या खात्यांतील जमिनी कायमपणें, निरंतर, आपल्याकडे ठेवण्याचा हक्क आहे.

(३) धारेकरी व कच्चा धारेकरी यांस जमिनी वर्ग करण्याचा हक्क आहे.

(४) खातेदारांस अथवा निरंतरचे कुळांस कलम ९ तील शर्तीस अनुसरून वर्ग करण्याचा अधिकार आहे. एकसाल पुरता कसणुकीचा हक्क दुसऱ्यास देण्यास केव्हांही प्रत्यवाय नाहीं.

(५) धारेकऱ्यांना सरकार दस्तच फक्त देऊन आपली जमीन धारण करण्याचा हक्क आहे. (कलम ३३)

(६) कच्च्या धारेकऱ्यांस परिशिष्टांत नमूद केल्याप्रमाणें खोतांस थल देऊन जमीन धारण करण्याचा अधिकार आहे. (कलम ३३)

(७) निरंतरच्या कुळांस बोटखतांतील नोंदीप्रमाणें ठराविक खंड अगर मोबदला किंमत देऊन आपल्या जमिनी धारण करण्याचा हक्क आहे. (कलम ३३)

(८) हक्कवाले खातेदारांस वारसाचे हक्क लागू आहेत. (कलम ९).

(९) थल देत असेपर्यंत जमीन धारण करण्याचा हक्क आहे, (कलम ७).

(१०) धारेकऱ्यांस आपले जमिनीवरील **डनलॉपच्या जाहिरनाम्या** प्रमाणें झाडें तोडणेचा हक्क आहे. (१८६८ व १८८७ मध्यें या बाबतींत सरकारी ठराव झालेले आहेत.)

(११) खातेदारांस अथवा "निरंतरचे कुळांस" स्वतःचे उपयोगाकरितां झाडें तोडणेचा व शेतीकरितां झाडांचें कवळ तोडणेचा हक्क आहे. **सहदेव वि० शंभूराव १ मुं० लॉ० रि. ४९९**

(१२) खातेदार कुळांस थल दिल्याबद्दल पावती मिळणेचा हक्क आहे. (कलम १५ क)

(१३) खातेदारानें खोतास वेठ वगैरे बाबी देणेंचें कारण नाहीं. (कलम ३५)

## १५ धारेकरी—

धारा या सत्ताप्रकाराचा (tenure) जमीन धारण करणारा असा अर्थ

आहे. धारा या सत्ताप्रकाराचें स्वरूप समजण्यास अगदीं सरळ आहे. "धारा" या शब्दाचा कोशार्थ मोल्सवर्थ यांच्या कोशांत - "(१) (विक्री भाडें खंड मजुरी व कर या बाबतींत) नेहमींची रक्कम अगर नेहमींचा दर (२) (सतत द्यावा लागणारा) शेत व लागवड यांवरील कर" असा अर्थ दिला आहे. यावरून "धारा" याचा थोडक्यांत अर्थ "जमिनीवरील सतत द्यावा लागणारा कर" असा होतो. धारा या सत्ताप्रकाराचा विशेष इतकाच कीं, धारा प्रकारानें जमीन धारण करणारा जमिनीचा पूर्ण मालक असून त्यास फक्त सरकारदस्तच खोताला द्यावा लागतो. खोताचा त्याचेवर दस्त घेण्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा ताबा नसतो. पूर्वीच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं धारेकऱ्यांची तुलना देशावरच्या मिरासदाराशीं केली आहे. मि० पेली यांनीं आपल्या रिपोर्टांत १८१९।२० सालीं असें ह्मटलें आहे कीं, "धारेकरी बहुतांशीं दक्षिणेंतील मिरासदारांप्रमाणें असतात. कारण तो देशाच्या शिरस्त्याप्रमाणें आपलें देणें जोपर्यंत देत आहे, तोंपर्यंत त्याला कोणासही काढून टाकतां येत नाहीं. आणि त्याला जरी प्रत्यक्ष जमीन विकतां येत नसली तरी त्याला निःसंशय आपली मिळकत गहाण टाकतां येते. त्याला ती फरोक्त सुद्धां करण्याचा अधिकार आहे असें मानतात." (खोतीसत्ता प्रकार पान ८) त्याचप्रमाणें क्या० ओव्हान्स यांणीं १८२० सालीं आपल्या पत्रांत असें ह्मटलें आहे कीं, "धारेकरी हे गांवचे कायमचे राहाणारे असून वंशपरंपरा जमिनी कसण्याचा हक्क असलेले वतनदार आहेत. (The Dharekaries are the permanent inhabitants of the villages, and are watandars possessing the right of cultivation by inheritance" खोतीसत्ता प्रकार पान ११). क्या. विंगेट साहेबांनीं आपल्या १८५१ सालच्या रिपोर्टांत धारेकऱ्यांचे संबंधें असें ह्मटलें आहे कीं "कुळारगी गांवांतून सर्व पिकं देणारी जमीन गांवच्या समाजानें आपल्या हाताखालीं घेतली, आणि प्रत्येकाच्या हाताखालची जमीन मागें जेव्हां मोजणी झाली तेव्हां त्यानें आपल्या नांवावर चढवून घेतली आणि ती त्याप्रमाणें बहुतेक अद्याप त्यांचेकडेच चालू आहे. या प्रत्येक धाऱ्यांवर पूर्वीच्या मोजणीच्या वेळीं जो दस्त बसला तो सालोसाल, सरकार पुन्हां मोजणी करून दस्ताची फेरबदल करीपर्यंत सरकार घेतें" यांवरून धारा या सत्ताप्रकाराचें स्वरूप काय आहे हें ध्यानांत येईलच.

## (१६) धारेकरी आणि खोत यांचा संबंध—

खोत हा धारेकऱ्यांचे बाबतींत सरकारदस्त वसूल करणारा अधिकारी आहे. याच कायद्याच्या कलम ३३ प्रमाणें धारेकऱ्यानें फक्त ठराविक सरकारदस्तच खोताला द्यावयाचा असतो; व खोतास तो सरकारांत भरावा लागतो. यामुळें खोताला धारेकऱ्यांकडून इतर खातेदारांप्रमाणें कांहीं फायदा मिळत नाहीं.

धारेकरी अगदीं स्वतंत्र मालक असून त्यास आपल्या जमिनीचा वाटेल त्या तऱ्हेनें वर्ग करण्याचा अधिकार आहे. खोताच्या संमतीचें कांहीं कारण नाहीं. (कलम ९) धारेकरी यांस मालकी असून खोत हे केवळ वसूल करणारे आहेत. या पेक्षां जास्त कांहीं अधिकार खोतांस नाहीं; परंतु खोताला एकच फायदा कलम १० प्रमाणें आहे. तो असा कीं, धारेकऱ्याची जमीन गतकुळी झाल्यास अगर तो दस्त देण्यास चुकल्यामुळें जमीन खालासा झाल्यास धारेकऱ्याची जमीन खोताकडे येते.

(१७) कच्चा धारेकरी—

परिशिष्टांत दिल्याप्रमाणें दसपटकरी, दीडपटकरी वगैरेंचा यांत समावेश होतो. कच्चाधारेकऱ्याचे सर्व हक्क व अधिकार धारेकऱ्यासारखेच आहेत. मात्र त्यांस धारेकऱ्यांप्रमाणें दस्त देऊनच भागत नाहीं, आणखी खोताला फायदा द्यावा लागतो. कच्चे धारेकरी पूर्वीं धारेकरीच असावे असें पुष्कळ अधिकाऱ्यांचें मत असून खोतांनीं त्यांचे हक्क खरेदी घेतले असावे असें कांहींचें ह्मणणें आहे. कांहीं असलें तरी खोतांचा त्यांचेकडून दस्तापेक्षां जास्त वसूल घेण्याचा हक्क कायद्यानें ठरविला असून परिशिष्टांत काय द्यावें हें ठरविलें आहे. कच्चे धारेकरी खेड आणि दापोली या तालुक्यांतच बहुत करून आहेत. त्यांस आपले जमिनीचा वर्ग करणेचा अधिकार आहे. (कलम ९) गतकुळी झाल्यास अगर दस्त न दिल्यानें त्यांच्या जमीनी खालसा झाल्यास त्या खोताकडे येतात.

(१८) "निरंतरचें कूळ"—

याची व्याख्या पाहिली असतां या कुळांचा संबंध खोती जमिनीशीं असून या जमिनींत त्यांची निरंतरची कूळ हक्कानें वहिवाट असली पाहिजे. कूळ या शब्दाची व्याख्या वर टीप १४ यांत दिली आहे. त्यावरून या कुळांचा जमिनींवर मालकीं हक्क नाहीं हें स्पष्टच आहे. या कुळांना बोटखतांतील शेऱ्याप्रमाणें, आपसांतील कराराप्रमाणें अगर पट (मोबदला किंमत) ठरली असल्यास पटाप्रमाणें वसूल देऊन आपल्या ताब्यांतील जमीन निरंतर भोगण्याचा हक्क आहे. (कलम ७). आपल्या ताब्यांतील जमिनी सरकारकागदीं त्यांस आपल्या खात्यांत दाखल करून घेतां येतात. कुळें हा कायदा होण्यापूर्वीं कायम अशी गणलीं जात नसून, त्यांच्याकडे वहिवाटीस असलेल्या शेताची पाहणी करून गांवशिरस्त्याप्रमाणें अर्धेल, तिर्धेल खोत घेत असत. इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून अधिकाऱ्यांचें धोरण कुळांना जास्त अधिकार देऊन स्वतंत्र करावें असें होतें व त्याप्रमाणें खोतानां मोबदला देऊन कुळांस स्वतंत्र करावे असा विचार चालूहि होता; परंतु निरनिराळ्या कारणांनीं तो विचार मागें पडला; तथापि कुळांना कायम वहिवाटीचे हक्क द्यावयाचें धोरण कायम राहिलें व या कायद्याचें कलम ५।६

प्रमाणें १८४५।४६ हें मुलकी साल सुरू होण्यापूर्वीपासून ज्यांचा आपल्या जवळच्या खोती जमिनीच्या उपभोगांत खंड पडलेला नाहीं अशा कुळांस "निरंतरचें कूळ" समजावें असा ठराव करण्यांत आला. कुळांचे हक्क काय काय आहेत याचा सांगोपांग साधार विचार पुढें योग्य वेळीं केला आहे.

## (१९) निरंतरचें कूळ, खातेदार कूळ व कायम कूळ—

कायद्याचें व्यवहारांत कुळांचे बाबतींत हीं तीन अभिधानें नेहमीं वापरण्यांत येतात. यांमध्यें कांहीं फरक असल्यास पाहणें जरूर आहे. "निरंतरचें कूळ" (permenant tenant) ही संज्ञा या कायद्यांत घालण्यापूर्वी त्याच ठिकाणीं "खातेदार कूळ" (occupancy tenant) ही संज्ञा दिलेली होती. "निरंतरचें कूळ" हे शब्द १९१३ च्या दुरुस्तीच्या कायद्यानें घालण्यांत आले, परंतु हे शब्द वापरण्यापलीकडे कोणताही फेरबदल कायद्यांत सुचविलेला नाहीं. यावरून "निरंतरचें कूळ व "खातेदार कूळ" हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत. कलम ३ पो. क. ८ त्याचप्रमाणें कलम ५।६ यांत "खातेदार कूळ" हे शब्द काढून टाकून लँ० रे० कोडाशीं जुळण्याकरितां त्याचे ऐवजीं "निरंतरचें कूळ" हे शब्द घातलेले आहेत. "कायम कूळ" ह्या संज्ञेत लँ. रे. कोड कलम ८३ प्रमाणें कायम ठरलेलीं अगर ठरणारीं कुळें, त्याचप्रमाणें निरनिराळ्या कायद्यांचे जोरावर अगर मालकांशीं केलेल्या ठरावांचे जोरावर ज्यांस कायमपणा प्राप्त झाला आहे अशीं कुळें येतात. "कायम कूळ" या संज्ञेत ज्या कुळांस हरएक प्रकारें कायम कूळहक्क प्राप्त झाला आहे त्यांचा समावेश होतो. "खातेदार कूळ" अगर "निरंतरचें कूळ" या संज्ञेत फक्त कलम ५।६ यांचे कक्षेत येणारीं कुळें येतात. "कायम कूळ" व "निरंतरचें कूळ" त्यांचमध्यें खोतीआक्टाप्रमाणें बराच फरक असून तो पुढें विशद केला आहे.

## (२०) खोत आणि निरंतरचें कूळ यांचा संबंध—

खोत आणि निरंतरचीं कुळें यांचे या कायद्यानें प्रस्थापित केलेले संबंध थोडक्यांत खालीलप्रमाणें आहेत:—

(१) कुळाला वारसाचे हक्क असून खोतास खंड वेळचेवेळीं दिल्यास त्यांचेकडे जमीन कायम वंशपरंपरा चालावयाची.

(२) कुळाला खोताचे संमतीवांचून वर्ग करण्याचा अधिकार नाहीं.

(३) कुळानें राजिनामा दिल्यास, खंड वेळीं न दिल्यानें खातें खालसा झाल्यास, अगर खातें विनवारशी झाल्यास, सर्व खातें खोताकडे येतें.

(४) खोतास या कायद्याचें कलम ३३ प्रमाणें थल दिली पाहिजे.

(५) थली ऐवजीं "मोबदला किंमत"—पट—ठरेल ती दिली पाहिजे.

(६) खात्यांतील जमिनींतील झाडांचें कवळ तोडण्याचा व स्वतःचे गरजे-करितां झाडें तोडण्याचा निरंतरचे कुळास हक्क आहे.

(२१) खोती जमीन–

गांव या शब्दाचा विचार करतांना वर खोती गांव आणि कुळारग गांव यांचा विचार आलाच आहे. कुळारग गांवांत फक्त या कलमाचें पोटकलम ९ मध्यें वर्णन केलेली धाऱ्याची जमीन असते. खोती गांवांत फक्त खोती जमीनच असते, **रघुनाथ वि. वासुदेव १ मुं. ला. री. ४३६.** खोती जमिनीची व्याख्या या पोटकलमांत केलेली आहे. ज्या जमिनीवर खोत या नात्यानें खोतांचा हक्क, कोण-त्याही प्रकारचा कां असेना, असतो, त्या जमिनीस खोती जमीन असें मानतात. धाऱ्याची जमीन खोती जमिनींत येत नाहीं असें स्पष्ट नमूद करण्याचें कारण इत-केंच कीं धारेकऱ्यांचे जमिनीवर, वर नमूद केल्याप्रमाणें, खोतांचा थोडा हक्क असतोच व त्यामुळें धारा जमीनही खोती जमीन होऊं शकेल. तसें होऊं नये ह्मणून असा स्पष्ट अपवाद नमूद केला आहे. खोती जमीन दोन प्रकारची असते – **खोती खासगी** आणि **खोती निसबत.**

मि. क्यांडी यांनीं "**खोती सत्ता प्रकार**" पुस्तकांत ह्मटलें आहे कीं "खोती गांवांतील सर्व जमीन, धारा जमिनी शिवाय करून खोती असलीच पाहिजे. खोतानें स्वतः अगर मजूरदारामार्फत कसलेली जमीन हिला खोती खासगी जमीन ह्मणतात आणि बाकीच्या सर्व जमिनीला खोत निसबत जमीन असें म्हणतात. आणि ती निरंतरच्या कुळांकडे अगर तात्पुरत्या कुळांकडे असूं शकते" ही व्याख्या **सेक्रेटरी ऑफ स्टेट् वि. नारायण १ मु. लॉ. रि. १९** या ठरावांत **न्या. रानडे** यांनीं गृहीत मानून ठराव केलेला आहे. त्याचप्रमाणें **रघुनाथ वि. वासुदेव १ मुं. लॉ. रि. ४३६** या ठरावांत **न्या क्यांडी** आणि **क्रो** यांनीं असें मानिलें आहे कीं खोती खासगी जमीन खोताचे घरशेत (house farm) आहे व त्या स्वतः खोतांनीं धारण केलेल्या जमिनी होत. खोत निसबत जमिनी कुळांकडे असतात. व त्यांपैकीं बहुतेक कुळें "खातेदार" असून त्यास वर्ग करण्याचा सुद्धां अधिकार असूं शकतो. आतां हें अगदीं स्वयंसिद्ध आहे कीं जर खोती खासगी ठिकाणें खोती व्यतिरिक्त अन्य तऱ्हेनें मिळविलीं असतील तर तीं खोती खासगी होणार नाहींत. तीं जर खोती मिळविण्यापूर्वीच मिळविलीं असतील तर तीं वास्तविक धाराच होय. जर तीं त्या जमिनीच्या खातेदार कुळांकडून खोती हक्क मिळविल्यानंतर मिळविलीं असतील तर तीं खातेदार कुळांप्रमाणेंच "खोती निसबत" राहातील. आणि तीं "खोती निसबतचीं" "खोती खासगी" करण्यास सर्व खोत हिस्सेदारांची कबुली लागेल. **न्या. पार्सन्स्** यांनीं **सेक्रेटरी वि. नारायण १ मुं. लॉ. रि. १९** या

ठरावांत लिहिलेलें आपलें मत एका खोताकडे सर्व खोती वतन आहे अशा परिस्थितीचे बाबतींत दिलें असून अशा परिस्थितीसच त्यांचें ह्मणणें लागू आहे, हें उघड आहे व असें आह्मांस मानण्यास त्यांची संमतीही आहे. अर्थात् अशा तऱ्हेचा खोत [ स्वतंत्र ] जर आपल्या गांवांतील पडजमीन लागवडीस आणील तर ती त्याला खासगी ह्मणून मानतां येईल. त्या जरी खातेदार कूळ गतकुळी होऊन त्याचेकडे आल्या तरीही त्या त्यास " खोती खासगी " जमिनी मानतां येतील. आणि जर खोती नष्ट होईल तर आणि गांव खालसा होईल तर, अशा जमिनी खोताकडे साधा सर्वेचा खातेदार ह्मणून चालतील. "

अगदीं अलीकडील ह्मणजे १९२३ सालचा या बाबतींत एक महत्वाचा कुलाबा जिल्ह्यांतून गेलेला ठराव, अहंमद वि. गणेश २५ मुं. लॉ. रि. ५२१ हा होय. ह्या ठरावांत खोती सेटल्मेंट आक्टापूर्वी खोतांची स्थिति काय होती, याचें फार चांगलें वर्णन केलें आहे. न्या. क्रंप आपल्या ठरावांत लिहितात. ( पान ५२४) " आतां या केसमध्यें असें शाबीत झालें आहे कीं, सर्वे सेटल्मेंट सुरू होण्याचे पूर्वी खोत. आपल्या जमिनी सालोसाल वार्षिक कबुलायतीनें अगर मक्त्यानें देत असत. हीच गांवांतील सर्वसाधारण पद्धत होती आणि खोतनिसबत जमिनी इतर खोती जमिनीपेक्षां कांहीं निराळ्या तऱ्हेच्या अटींवर दिल्या जात, असें दाखविण्यास कोणत्याही प्रकारचा आधार नाहीं. जर असें आहे तर सर्वेसेटल्मेंट सुरू होण्यापूर्वी खोतांशिवाय जमिनींचा निरंतरचा धारण करणारा दुसरा कोणी होता असें मानतां येत नाहीं. किंवा जास्त लौकिक भाषेत बोलावयाचें ह्मणजे सदाशिव वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २० मुं. लॉ. रि. १४१ या ठरावांत डनलॉप्च्या जाहिरनाम्याचे बाबतींत मानल्याप्रमाणें खोत हाच खातेदार मानला पाहिजे, खोताचा खोत या नात्यानें जमिनींशीं संबंध सततचा होता; आणि खोतनिसबत जमिनीच्या बाबतींत त्याला निदान जणूं मालकीहक्क, असा हक्क असून त्यांच्या तर्फे डन्लॉपचा जाहिरमामा लागू आहे असें मानण्यास पुरेसा आहे." याच ठरावांत सर न्या. मॅक्लिऑड यांनीं लिहिलें आहे कीं, "मला असें खचित वाटतें कीं, खोती खासगी आणि खोती निसबत जमिनीच्या बाबतींत खोत हा बहुतांशीं मालकच आहे. आणि याप्रमाणें, रत्नागिरीचे कलेक्टर वि. व्यंकटराव ८ मुं. हा. को. रि. १ या ठरावांतहि ठरविलेलें आहे."§

---

§ "Certainly it would appear to me that with regard to khoti khasgi and khoti Nisbat lands, he is very much in the position of an owner. It was so held in Collector of Ratnagiri V. Vyankatrao I."

**गणपति वि० सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं० लॉ. रि० ७५४.** या कुलाबा जिल्ह्यांतून ना. हायकोर्टाकडे गेलेल्या ठरावांत खोती जमिनीबद्दल विचार करतांना सर न्या. मॅक्लिऑड यांनीं असें ह्मटलें आहे कीं "धान्याशिवाय ज्या जमिनी असतात त्यांस बहुतकरून खोती जमिनी असें ह्मणतात व त्या खोती खासगी अगर खोत निसबत असतात. **खोत निसबत** जमिनी वारसाचा हक्क असलेल्या परंतु वर्ग करण्याचा अधिकार नसलेल्या, निरंतर कुळांकडे तरी असतात अगर उपरी कुळांकडे तरी वहिवाटीस असतात; आणि या सर्वांस कबुलायतींत ठरल्याप्रमाणें सरकारदस्ताचे बाहेर खोतफायदा द्यावा लागतो. **खोती खासगी** जमिनी या खोताच्या खासगी मालकीच्या असून त्या मुळच्या सर्वेच्या वेळीं नांवावर लागल्या ह्मणून अगर खोत या नात्याव्यतिरिक्त अन्य रीतीनें सर्वेनंतर खरेदीनें अगर अन्य कायदेशीर रीतीनें मिळविलेल्या अगर प्रथम खोत निसबत खात्यांत सामील असलेल्या परंतु नंतर खोतानें स्वखर्चानें वहिवाटींत आणलेल्या अशा जमिनी होत." या ठरावावरून खोती निसबत जमिनी कोणत्या व खोती खासगी कोणत्या हें अगदीं स्पष्ट झालें आहे. खोती खासगी जमिनी या खोतांच्या पूर्ण मालकीच्या जमिनी असून खोत निसबत जमिनी याही खोतांच्या मूळ मालकीच्या आहेत. खोती खासगी जमीन खोतानें विकल्यास ती पुन्हां खोत निसबत होऊन खरेदीदाराची खातेदार कूळ हक्काची होते, (कलम ४० र. ई कानू (१)) खोती खासगी जमिनींचा खोत खातेदार कूळ असें मानतां येत नाहीं. खोतानें आपली खोतीतक्षीम विकल्यास त्याचे बरोबर खासगी ठिकाणेंही जातात, व मुळचे खोताचा त्यांत कबजा राहिल्यास तो केवळ एकसालीं कूळ होतो, व त्यांस इतर कुळाप्रमाणें थल द्यावी लागते. **दिनकरराव वि. नारायण १८९३ प्रिं. ज. ५५० व रघुनाथ वि. वासुदेव १ मुं. लॉ रि. ४३६.**

## (२२) जमिनीचे इतर सत्ताप्रकार—

इकडच्या गांवांतून वर नमूद केलेल्या जमिनीच्या सत्ता प्रकाराबाहेर आणखी कौली जमीन व सर्वे सत्ताप्रकार वगैरे बरेच सत्ताप्रकार आहेत. त्यांतील कांहीं—

**(१) इजाफती खोती**—हा खोतीचा प्रकार कुलाबा जिल्ह्यांत फार आहे. वास्तविक इजाफती खोती याचा अर्थ मूळच्या खोती हक्कांत व मोबदल्यांत घातलेली भर असाच आहे. "इजाफत" हा पर्शियन शब्द असून त्याचा अर्थ "वाढ" असा आहे. **विठ्ठल वि. भागीरथीबाई १८४६ बेलासिस् रिपोर्ट ६३. बेडन् पॉवेल** यांनीं आपल्या **ब्रिटिश हिंदुस्थानांतील जमीन पद्धति** ( Land systems of British India ) या पुस्तकांत असें वर्णन केलें आहे कीं "ईजाफतदार हा इनाम पावणारा अगर मुक्त्यारीनें हक्क मिळालेला इसम असून त्याला स्वत:पुरता,

अगर आपल्या मिळकतीची वाढ ह्मणून, तो महसूल, फायदा ह्मणून घेण्याची परवानगी असे. मूळ कसेंही असलें तथापि सध्यां त्याला खंड वाढविण्याची परवानगी नसून बेवारशी अगर सोडून दिलेल्या जमिनी आपलेकडे घेण्याचा त्याला हक्क नाहीं. तथापि अटींमध्यें पुष्कळ फरक असतो. कांहीं ठिकाणीं इजाफतदार ठराविक रकम देऊन वास्तविक जी जमा गोळा होते ती सर्व तो घेतो; आणि कांहीं ठिकाणीं भात जमिनीचा सरकारदस्त तो देतो आणि वर्कस जमिनीवरील खंड वगैरे सर्व स्वतःस घेतो."* "इजाफत सत्ताप्रकार हें एक प्रकारचें वतन असतें, कारण इजाफतदार मयत झाल्यानंतर त्याचे हक्क हिंदु अगर मुसलमान वारस पद्धतीनें चालू राहतात. परंतु ते बहुतकरून सनदेच्या जोरावर दिलेले अगर धारण केलेले नसतात. इजाफती गांव सरकारला आपल्या मर्जीनुरूप केव्हांही परत घेण्याचा अधिकार आहे."† नागरदास वि० कॉन्झरव्हेटर ऑफ फॉरेस्ट ४ मुंबई २६४ या ठरावांत "इजाफती हक्काबरोबर मालकीहक्क येत नसे" (The Izafati title did not carry with it the proprietory right) असें मिव्ही कौन्सिलनें ठरविलें आहे. इजाफती खोतीला सन १८६५ चा आक्ट १ कलमें ३७।३८ लागू असतात.

(२) "कौल" या शब्दाचा अर्थ मोलस्वर्थ साहेबांनीं जमिनीच्या कसणाराला सरकारनें दिलेलें लेखी वचन (assuarance), करार (agreement), अगर कबुली (engagement) असा दिला आहे. इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर इंग्रज सरकारनें कांहीं जमिनीबद्दल अर्थी करारपत्रें (कौलनामे) लिहून दिलेले आहेत व त्यांवरून कौलनाम्याप्रमाणें त्यांस हक्क प्राप्त झाले आहेत. अशा जमिनींस कौलीजमिनी असें म्हणतात.

---

* "The Izafatdar is a grantee or assignee, allowed to take the revenue as a personal benefit or increase to his income. Whatever the origin, the izafatdar has now no right to increase the rent of any cultivator, nor is he personally entitled to lands that lapse or are abandoned. The terms, however, vary; in some cases the izafatdar pays fixed sum and gets the benefit of all actual revenue payment (by increased cultivation or otherwise) above that. In others, again, he pays the revenue on rice lands, and appropriates whatever rents he can get on warkas."

Baden Powell's Land Systems in British India Vol III Page 295.

† Government Selection No. 96 (new series) Page 94.

(३) **सर्वेसत्ताप्रकारच्या** जमिनी सरकारच्या खालसा जमिनी असून देशावरलि रयतवारी गांवाप्रमाणेंच त्यांचा सर्व कारभार चालतो. **फकी वि. महंमद, १२ मुं. ५९५**

(४) **हिंदीबुंदी** सत्ताप्रकार या प्रकारांत जमिनीचा सर्वेनंबरवार दस्त ठरविलेला नसून एकदम दस्त अमूक एक द्यावा असें ठरविलेलें असतें. **फकी वि. महंमद.**

(५) **माफी इस्तावा प्रकार**— या प्रकारांत कांहीं ठराविक वर्षेंपर्यंत सरकारदस्त माफ करून देऊन नंतर हळूहळू ठराविक रकमेपर्यंतच वाढवीत जातात. **फकी वि. महंमद.**

(६) **अर्ध–मांडणी** प्रकार—यांत मालक आणि कुळें यांचे दरम्यान निम्मेनिम उत्पन्न घेण्याचा ठराव असून कुळें निरंतरचीं असतात. **नारायण वि. धोंडू दु. अ. नं. ६९९ सन १९१९ नि. ता. १३।६।२१.**

(२३) खोतीतक्षीम—

खोती गांवांतून "खोतीतक्षीम" असा शब्द वापरण्यांत येत असतो. "**खोतीतक्षीम**" या शब्दांत खोतांचे सर्व प्रकारचे हक्क व अधिकार, आणि खोती जमिनी–खोतीनिसबत व खोतीखासगी, या सर्व गोष्टींचा समावेश होतो, खोताला आपली मिळकत गहाण खरेदी करण्याचा हक्क आहे, हें मागें आलेंच आहे. त्याप्रमाणें गहाण खरेदी वगैरे व्यवहार करतांना नुसता "खोतीतक्षीम" असा शब्द वापरल्यास सर्व खोती खासगी ठिकाणें, इतर सर्व हक्क वगैरे सर्व कांहीं त्यांत येतें. ज्या वेळीं कांहीं भाग वेगळा करून आपला हक्क विकावयाचा असेल त्या वेळीं तसें आपल्या दस्तैवजांत स्पष्टपणें म्हटलें पाहिजे. खोती खासगी जमिनी न देतां खोती द्यावयाची असेल तर "खासगी ठिकाणें शिवाय करून खोती तक्षीम" असा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे. याबद्दल **रघुनाथराव वि. वासुदेव २३ मुंबई ७६९=१ मुं. लॉ. रि. ४३६** या ठरावांत स्पष्ट खुलासा झालेला आहे. त्याचप्रमाणें **रावजी वि. बाबाजी दु. अ. नं. २१७, ३७२, ३७३ सन १९११ नि. ता. २६।११।१९१३** या दुसऱ्या अपिलाचे ठरावांत, "कांहीं जमीन अगर बाब वेगळ केल्याचा स्पष्ट खुलासा नसून नुसतें खोती तक्षीम असें ह्मणून मिळकत विकली असेल तर त्यामध्यें खासगी ठिकाणें सुद्धां येतात." असें **न्या० हीटन** आणि **शहा** यांनीं स्पष्ट नमूद केलें आहे. या ठरावांत दुसरी महत्वाची गोष्ट ठरविण्यांत आलेली येथें नमूद करणें जरुर आहे. दस्तैवजांत "खोती कमाविशी तक्षीम" असा शब्द वापरला असतां त्याचा अर्थ सर्व तक्षिम असा होत असून "कमाविशी" या शब्दानें कांहीं फरक होत नाहीं. "कमाविशी असा सहज शब्द वापरल्यानें मिळकतीची मर्यादा (extent) अगर प्रकार (character) कोणत्याहि प्रकारें बदलत नाहीं."

आतां खोतीतक्षीम खरेदी दिली असून खासगी ठिकाणें जर मुळचे खोताचे कबजांत राहतील तर त्याचा काय परिणाम होतो हें पाहाणें जरूर आहे. याचे बद्दलचा स्पष्ट ठराव दिनकरराव वि. नारायण. १८९३ प्रिं.ज.५५० या ठरावांत झालेला आहे. तेथें असें ठरविण्यांत आलें आहे कीं "अशा परिस्थितींत जर कांहीं स्पष्ट ठराव नसेल तर ज्याचेकडे कबजा असेल तीं साधीं एकसाली कुळें ह्मणून गणलीं जातील आणि त्यांना इतर कुळांप्रमाणें थल द्यावीं लागेल." रघुनाथराव वि. वासुदेव १ मुं. लॉ. रि. ४३६ या टरावांत वर नमूद केलेल्या ठरावास अनुसरून असें ठरविण्यांत आलें आहे कीं, "जमीन सोडण्याबद्दलची योग्य नोटीस देऊन अशा कुळांना जमिनींतून काढतां येतें." खोती खासगी जमिनींत खोताचा खातेदार कूळहक्क नसून खोती तक्षीम वर्ग झाल्यास तो त्या जमिनीचा केवळ एकसाली कूळ होतो.

## ( २४ ) "रिकॉर्डिंग कामगार"—

या शद्वाचा अर्थ देतांना लँ. रे. कोड कलम १०८ याखालीं "सेट्ल्मेन्ट-पत्रक" करण्याचा अधिकार असलेले अधिकारी व याच आक्टाचा भाग ३ यांत जे सेट्ल्मेन्टचे कागद सांगितलेले आहेत त्यांची नोंद करण्याचा योग्य अधिकार ज्यांस आहे असे अधिकारी येतात. लँ. रे. कोड कलम १०८ "सेट्लमेन्टपत्रक" तयार करण्यासंबंधें असून "जमीनमहसूल आकारण्याचा किंवा तपासून पुन्हां आकारण्याच्या प्रसंगीं प्रत्येक सर्वेनंबराचें क्षेत्रफळ व आकार, व ठरविण्यांत येईल असा इतर कोणताही तपशील हीं ज्यांत दाखविलीं असतील असें एक पत्रक व दुसरे कागदपत्र, सरकार वेळोवेळीं हुकूम करतील त्या हुकुमाअन्वयें" सेट्ल्मेन्टपत्रक तयार करावयाचें असतें. सेटल्मेंटपत्रक यांचा अर्थ "लावणी फैसल पत्रक" असा रा. जोगळेकर यांच्या लँ. रे. कोडांत दिलेला आहे. खोती गांवांत सर्वेसेट्ल्मेंट् पेक्षां जे आणखी कागद असतात, त्यांत "बोटखत" वगैरे कागद येतात. या आक्टाचा भाग ३ ह्मणजे कलम १६ ते २२ याप्रमाणें हे कागद तयार करावे लागतात.

सर्वे कामगार कोणाला ह्मणावें. याचा खुलासा लँ. रे. कोड कलम १८ यांत स्पष्ट केला असून त्यांत खालील अधिकारी येतात. गव्हर्नर–इन्–कौन्सिल यांनीं नेमलेले (१) सर्वेचे कमिशनर. (२) सर्व्हेचे सुपरिंटेंडंट् (३) सर्वेसेट्ल्मेंट् ऑफीसर आणि (४) असिस्टंट्. खोती गांवांचे बाबतींत अगर रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांत "खोती सेट्लमेंट्चे" अधिकार कलेक्टर व डिस्ट्रिक्ट् डेप्युटी कलेक्टर ऊर्फ "प्रांत" यांस दिलेले असून शिवाय सर्वेचे कामाचे अधिकारी "डिस्ट्रिक्ट् इन्स्पेक्टर लँड रेकॉर्ड्स" हे असतात.

(२५) व्याख्या व लँड रेव्हेन्यू कोड–

खोती सेटलमेंटआक्टांत ज्या शब्दांच्या व्याख्या दिलेल्या नाहींत त्यांच्या व्याख्या लँड रेव्हेन्यू कोड कलम ३ प्रमाणें आहेत असें समजावयाचें आहे. खोती आक्टांत दिलेल्या व्याख्यांचे बाहेर लँड रेव्हेन्यू कोडांत महत्वाच्या पुष्कळ व्याख्या दिलेल्या आहेत. त्या पुढें वेळोवेळीं ज्या ज्या ठिकाणीं आवश्यक वाटल्या त्या त्या ठिकाणीं दिल्या आहेत.

# भाग २.

## खोत आणि त्यांचे कनिष्ठ धारण करणारे यांसंबंधीं साधारण ठराव

— खोत —

खोतांचे गांव जमा भरतील तोंपर्यंत चालतील

कलम ४—या आक्टाचे आणि सन १८७९ चा मुंबई महसुलाचा कायदा याचे जे ठराव, आणि या आक्टावरून किंवा सदहू कायद्यावरून केलेल्या ज्या वेळेस ज्या कानू अमलांत असतील त्या कानूंचे जे ठराव त्या प्रमाणें खोत आपल्या गांवच्या जमेबद्दल द्यावयाच्या रकमा देत असतील तर आणि त्यांच्या सत्ताप्रकारास कायद्याप्रमाणें जोडलेली किंवा लागू असणारी दुसरी कोणतीही शर्त किंवा जबाबदारी पुरी करीत राहतील तर त्यांचे गांव त्यांकडे चालतील.

### टिपा

(१) उद्देश—

या भागांत वरिष्ठधारणकरणारे खोत व त्यांची कनिष्ठधारण करणारीं कुळें यांच्या व्याख्या, जबाबदाऱ्या वगैरे नमूद केलेलें आहे, व या कलमांत खोताची जबाबदारी काय आहे, हें सांगितलें आहे. खोताला आपली खोती आपणाकडे रहावी, अशी इच्छा असल्यास त्यानें या कलमास अनुसरून वागणें अगदीं आवश्यक आहे. या कलमामध्यें सांगितल्याप्रमाणें खोतांचे गांव खोताकडे खालील अटींवर चालतील:—

(१) खोती से. आक्ट व त्याचेखालीं केलेले नियम याप्रमाणें खोत सरकारी जमा नियमित वेळीं देतील तर,

(२) लँ. रे. कोड व त्या खालीं केलेले नियम यांप्रमाणें खोत सरकारी जमा देतील तर,

(३) खोती सत्ताप्रकारास कायद्यानें लागू असलेली कोणतीही शर्त किंवा जबाबदारी पुरी करीत राहातील तर

**(२) गांवची जमा—**

गांवची जमा ठरविण्याचे बाबतींत **लँ. रे. कोड** हा मुख्य कायदा असून सर्व गोष्टी त्याप्रमाणें चालतात. लँ. रे. कोड **कलम** ४५ प्रमाणें " सर्व कोणतीही जमीन मग ती शेतकीच्या कामास लाविलेली असो किंवा इतर कोणत्याही कामास लावलेली असो आणि ती कोठेंही असली तरी या आक्टांत पुढें ठरविलेल्या कानूप्रमाणें जमीन-महसूल सरकारास देण्यास पात्र आहे; मात्र सरकारशीं केलेल्या कोणतेही विशेष करा-रांतील किंवा ज्या वेळीं जो कायदा चालू असेल त्या कायद्यांतील ठरावाअन्वयें ज्या जमिनीस अगदीं माफी असेल ती जमीन पात्र नाहीं." याप्रमाणें प्रत्येक जमीन सरकारदस्त देण्यास पात्र असल्यामुळें ही सरकारजमा लँ. रे. कोड **कलम** ४८ प्रमाणें जमिनीच्या उपयोगाच्या तऱ्हेवर सरकारनें महसूल कोणत्या प्रमाणांत बसवावा या बाबतींत केलेल्या नियमांस अनुसरून बसविली जाते. एका प्रकारची जमीन असतां दुसऱ्या प्रकारचा उपयोग केल्यास सरकारनें आप-णांस वाटेल तेव्हां महसूल वाढविण्याची मुभा ठेविलेली आहेच. ही सरकारजमा ठरविण्याची सर्व कामगिरी सर्वेकामगारांवर लँ. रे. कोड **कलम** १०० प्रमाणें सोंपविलेली असून त्यांनीं सर्वेनंबरवार मोजणी करून प्रतवार कोणत्या जमिनी-वर किती सरकारदस्त बसवावयाचा हें ठरविल्यानंतर लँ. रे. कोड **कलम** १०२ प्रमाणें सरकार त्यास मंजुरी देते. सरकारच्या मंजुरीशिवाय महसूल कायम झाला असें होत नाहीं. गव्हर्नर–इन्–कौन्सिलला हा सरकारदस्त ३० वर्षांपेक्षां जास्त नाहीं अशा मुदतीपर्यंत शेती जमिनीवरील, व ९९ वर्षांपेक्षां जास्त नाहीं अशा मुदतीपर्यंत इतर जमिनीवरील, कायम करतां येतो. याप्रमाणें सरकारनें दस्त कायम करून त्याप्रमाणें योग्य रीतीनें सरकारनें जाहीर केल्यानंतर सरकारदस्त कायम केला जातो व तो प्रत्येक जमीन धारणकरणाऱ्या खातेदाराला द्यावाच लागतो.

**खोती** आक्टाचें **कलम** २३ प्रमाणें खो. से. आक्ट पास झाल्यानंतर प्रत्येक गांवाचे बाबतींत गव्हर्नर-इन्-कौन्सिलनें सरकारदस्त मंजूर करून सरकार दस्त कायम राहण्याची मुदत जाहीर करावी लागते. अशा रितीनें जाहीर केल्या-नंतर मग सरकारदस्त लागू झाला असें समजावयाचें असतें. खोताची जमा ह्मणजे काय हें खो. से. आक्टाचें **कलम** २४ मध्यें सांगितलेलें असून " गांवचे जमि-नीचे सर्वे आकाराच्या एकंदरींतून, प्रत्येक प्रसंगीं जितके टक्के सरकार ठरवितील (जर ठरवितील तर) तितके टक्के वजाकरून बाकी राहील ती" जमा होय. ही जमा सर्वे आकारणी ज्या मुदती करितां ठरविलेली असेल त्या मुदतीपुरतीच ठरवावयाची असते, व अशा रीतीनें गांवची जमा खोतानें सरकारला या कलमा-प्रमाणें द्यावयाची असते.

## (३) खोत जमा भरीत असेपर्यंत गांव त्यांचेकडे राहतील.

ह्या कलमानें ठरविलेली जबाबदारी नवीन नाहीं. लँ. रे. कोड **कलम** ५६ प्रमाणें सरकार दस्त हा सर्वात पहिला बोजा होय. सरकार दस्त ठरावाप्रमाणें कोणीं न दिल्यास त्याची स्थावर, जंगम, मिळकत जप्तकरून विकून पैसे वसूल करण्याचा सरकारास पूर्ण अधिकार आहे. सरकार दस्ताची उगवणी करण्याचे बाबतींत सरकारला कोणते अधिकार दिलेले आहेत याबद्दल लँ. रे. कोडचा **भाग ११ कलमें** १३६ ते १८७ यांत उल्लेख आहे. खोती सेटल्मेंट आक्ट लागू असलेले गांवचे बाबतींत मात्र कलम ३९ मध्यें लँ. रे. कोडाचीं १५० ब व १५३ हीं कलमें लागूं नाहींत. असें ठरविलें असल्यानें खोतानें जमा दिली नाहीं म्हणून खोती खालसा करतां येत नाहीं. खोती से. आक्टाचा भाग ४ यांत, खोताकडून जमा वेळीं दिली जाणार नाहीं, अगर जमेची जबाबदारी घेणारा वहिवाटदारखोत कोणी तयार होत नाहीं, असें दिसतांच कलेक्टरनें गांवची वहिवाट आपणाकडे घ्यावी, असें सांगितलें आहे. खोती से. आक्ट लागू नसलेल्या खोतांचे बाबतींत मात्र सर्व व्यवस्था लँ. रेव्हेन्यु कोडा प्रमाणें चालते व सरकार जमा न दिल्यास गांव जप्तींत जातो. व लँ. रे. **कोड** कलम १६२ प्रमाणें १२ वर्षेपर्यंत गांव जप्तीतून मोकळा करून घेण्याची खटपट वेळीं अर्ज वगैरे करून न केल्यास गांव खालसा होतो. जप्ती दूर झाल्यास खर्चवेच जाऊन बाकी फायदा खोतास परत मिळतो. **भिकाजी वि० निजामअली ८ मुंबई** ५२५ या ठरावांत खोतफायद्यासंबंधें असें स्पष्टपणें ठरविण्यांत आलें आहे कीं, " खोती से. आक्ट जेथें लागू करण्यांत आलेला आहे, तेथें खोत हा वरिष्ठ धारण करणारा आहे व ह्मणून जर गांव जप्तींत गेला तर खोत फायद्यासंबंधें लँ. रे. कोड कलम १६२ त्यास लागू आहे. व त्याप्रमाणें सर्व व्यवस्था चालेल. परंतु हा नियम कुलाबा जिल्ह्याला जेथें खोती से. आक्ट लागू नाहीं तेथें खोत वतनदार अगर सनदी नसले तर लँ. रे. कोड कलम १६२ लागू नाहीं. " कुलाबा जिल्ह्यांतील खोतांचे बाबतींत ताजुबाईचे मुकदम्यांतील ठरावच लागू आहे. **ताजुबाई वि. कुलाब्याचे सब् कलेक्टर ३ मुं. हा. को. रि.** १३२ या ठरावांत **न्या. न्यूटन** यांनीं असें ठरविलें कीं, " खोती गांव जप्त झाल्यानंतर खोताला पुन्हां गांव दिला जातो तो त्याचा हक्क ह्मणून नसून गांव खालसा करणें आजपर्यंत सोईचें नव्हतें ह्मणून होय. " **अहंमद वि. गणेश २५ मुं. लॉ. रि.** ५२१ या ठरावांत "कुलाबा जिल्ह्यांतील खोतांनीं एकादे वेळीं कबुलायत न दिल्यास खोताला फक्त त्यासालीं गांवची वहिवाट करण्याचा हक्क नाहींसा होतो; परंतु त्यामुळें इतर कोणत्याही खोतीहक्कांस बाध येत नाहीं," असें ठरविलें आहे. खोतांनीं आपला गांव १२ वर्षांचे आंत जप्तींतून सोडविण्याची व्यवस्था ठेविलीच पाहिजे.

### (४) जमेला सर्व खोत हिस्सेदार जबाबदार आहेत.—

सरकारजमा न दिल्यास गांव जप्त होतो ही गोष्ट खरी, परंतु हा नियम ज्यावेळीं गांवचा एक स्वतंत्र खोत असेल, त्यावेळीं योग्य आहे. तथापि ज्यावेळीं खोती हिसेदार पुष्कळ असतील त्यावेळीं ही जबाबदारी कोणावर आणि त्यांपैकीं एकावर जबाबदारी असून त्यानें जमा न दिल्यास त्याचा परिणाम कोणाला भोगावा लागणार हा एक फार महत्वाचा प्रश्न आहे.

खोती से. आक्टाचें कलम २६ प्रमाणें खोती गावांत बरेच हिस्सेदार असतील त्यावेळीं ते "सर्व एकाजर्थी एकामतीं व प्रत्येकीं" ह्मणजे सर्व एकदम अगर एकएकटे जमेला जबाबदार होतील असें स्पष्ट ठरविलें आहे. व त्याप्रमाणें "जमा" सरकारला देण्याची जबाबदारी सर्वांवर सारखी पडते. परंतु कुळांकडून वसूल करून जमा देणारा असा एक जबाबदार "वहिवाटदार खोत" नेमण्याबद्दलही त्याच कलमांत ठरविण्यांत आलें आहे. "वहिवाटदार खोत" कलेक्टरच्या मंजुरीनें नेमला गेल्यानंतर तो "रजिष्टर" म्हणजे नोंदलेला खातेदार समजावा, असें १९१३ पूर्वीच्या कलमामध्यें स्पष्टपणें घातलेलें होतें व त्यावरून वहिवाटदार खोत हाच सर्व जमिनीचा मालक समजून जबाबदार धरला जात असे, परंतु १९१३ चे दुरुस्तीपासून ते शब्द गाळण्यांत आले आहेत. यामुळें सध्यांच्या कायद्याप्रमाणें "वहिवाटदार खोत" यास एकट्यास जबाबदार धरण्यास सरकार तयार नाहीं, असें स्पष्ट दिसतें. चालू कायद्याप्रमाणें "वहिवाटदार खोत" हा एक प्रकारें नेमिलेला फक्त व्यवस्थापकच होय. इतकी गोष्ट खरी कीं तो सरकारची जमा देण्यास मुख्यतः (primarily) जबाबदार आहे; परंतु त्यानें न दिल्यास सर्व खोत हिसेदार सारखे जर्थी मतीं व प्रत्येकीं जबाबदार आहेत. लँ. रे. कोड कलम १३६ प्रमाणें वरिष्ठ धारण करणारावर "दुमाला जमिनीच्या" बाबतींत दस्त देण्याची सर्व जबाबदारी आहे; व ज्यावेळीं सहभागीदार असतात त्यावेळीं ते सर्व "एका जर्थी एका मतीं व प्रत्येकीं" जबाबदार आहेत. त्याच कलमांत जमीन धारणकरणाऱ्या कोणाकडूनही महसूल वसूल करावा असें नमूद केलेलें आहे. यावरूनच इतर खोत हिसेदार हे सरकार जमा भरण्यास जबाबदार आहेत. त्यांना "वहिवाटदार खोत" जबाबदार आहे असें म्हणून चालावयाचें नाहीं. वहिवाटदार खोतानें दुसऱ्याचें नुकसान करण्याचे हेतूनें, लबाडीनें जमा देण्याचें टाळल्यास लँ. रे. कोड कलम ८० प्रमाणें खोती हिसेदारांसच काय पण गहाणदारांस, खातेदारांस अगर ज्या कोणाचा त्यांत हितसंबंध आहे अशा कोणासही जमा भरतां येते व तशी घेण्यास कलेक्टर यास पूर्ण अधिकार आहे. अशी रकम कोणी भरल्यास त्याचेबद्दल लँ. रे. को. कलम ८६ प्रमाणें त्यास मदत मिळूं शकते. या कलमाप्रमाणें इतर खोतहिस्सेदारांनीं अगर त्यांपैकीं कोणीही सरकारजमा भरून गांव जप्त होऊं देऊं नये व मग वहिवाटदार

खोतावर मदत दावा करून अगर अन्य तऱ्हेनें त्याचेकडून भरावी लागलेली रकम वसूल करून घ्यावी. कोणीच जमा न भरल्यास गांव जप्त होईल व लँड रे. कोडाप्रमाणें सर्व परिणाम भोगावे लागतील. सरकारदस्ताप्रमाणें लोकलफंड वसूल करून देण्याची जबाबदारीही खोतांवरच आहे ( कलम ३६ ).

**(५) खोतांनीं जमा केव्हां द्यावी—**

खो. से. आक्ट कलम ४० रकम फ. कानू ६ यांत खोतानें जमा सरकारांत केव्हां भरावी हें ठरविण्यांत आलें आहे. जमा दोन हप्त्यांनीं म्हणजे प्रत्येक वर्षाच्या ५ फेब्रुवारी व ५ एप्रील या दोन तारखांस भरणा केलाच पाहिजे. या तारखा तारीख १६ मे १९२२ च्या सरकारी ठराव नं ४५२७—फ वरून ठरविण्यांत आल्या असून त्याचेपूर्वी वर्षातून चार वेळ म्हणजे १५ डिसेंबर, १ फेब्रुवारी, १५ मार्च, व १ मे, अशा तारखा ठरविलेल्या होत्या.

**(६) खोती आणि वतन आक्ट—**

"खोती वतन" असा शब्दप्रयोग करण्याची पद्धत असल्यामुळें तिचा "वतन आक्टाशीं" संबंध असावा असें वाटण्याचा बराचसा संभव आहे, परंतु तशी वस्तुस्थिति नाहीं. मुंबईचा १८७४ चा आक्ट ४ (हेरिडिटरी ऑफिसेस आक्ट) या कायद्याचे कलम ४ यांतील "वतन प्रापर्टी" ची व्याख्या देतांना "वंशपरंपरा चालत आलेल्या कामगारांस त्यांच्या कामगिरीबद्दल मोबदला म्हणून तोडून दिलेली, अगर मिळविलेली, अगर धारण केलेली, स्थावर अगर जंगम मिळकत" अशी व्याख्या दिली आहे. खोती वतन हा "सत्ताप्रकार" असून कोणत्याही प्रकारें वतन आक्टाखालीं येणारें वतन नाहीं, त्यामुळें खोतीतक्षीम या व्याख्येंत येत नाहीं. खोतीचा कायदा वेगळा असून त्याप्रमाणेंच सर्व व्यवस्था चालावयाची आहे. वतन असा शब्दप्रयोग असला तथापि खोताला मिळणारा फायदा हा वतनावर अवलंबून नसून त्यानें केलेल्या कष्टाचा व खर्चिलेल्या द्रव्याचा मोबदला आहे. रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी १२ मुं. ५३४ या मुकादम्यांत सर न्या. सार्जंट यांनीं म्हटलें आहे कीं "ब्रिटिश सरकारला चौकशी अंतीं असें कळून आलें आहे कीं कोकणांतील खोतांचा दर्जा ऐतिहासिक दृष्ट्या व खऱ्या भावानें (in fact) देशावरच्या पाटिलांपेक्षां अगदीं निराळा आहे आणि हा फरक बहुशः कोकणांतील आणि त्यांतले त्यांत रत्नागिरी जिल्ह्यांतील नापिक जमिनीमुळें व अशा जमिनीस सुस्थितीस आणण्यास भांडवल लागत असल्यामुळें आहे." यावरून खोतांचें हक्क त्यांनीं स्वकष्टानें मिळविले आहेत, हें स्पष्ट होईल.

**(७) खोत आणि इनामदार—**

कांहीं खोती गांव इनाम असल्यामुळें खोतांचा व इनामदारांचा नेहमीं

संबंध येतो, त्यामुळें त्याचा येथें विचार करणें जरूर आहे. अशा ठिकाणीं खोत आणि इनामदार यांचा परस्पर संबंध ज्या मानानें सनद असेल त्याप्रमाणें राहील. इनामदार हा ज्यावेळीं "जल तरु तृण काष्ठ पाषण निधि निक्षेप" वगैरेचा इनामदार असेल त्यावेळीं तो जमिनीचा पूर्ण मालक असल्यामुळें खोतास केवळ गांवचा वसूल करण्याचा अधिकार असतो. अशा-वेळीं खोताची जमिनीवर मालकी नसते. इनामदाराची जमिनीवर पूर्ण मालकी असून त्याचा जंगलावरसुद्धां पूर्ण हक्क आहे, **मोरो आबाजी वि. नारायण, ११ मुं. ६८०.** इनामदार आणि खोत यांचा संबंध सर्वस्वीं एकमेक ज्या सनदांच्या जोरावर आपला हक्क सांगतात त्या सनदांवर अवलंबून आहे. कित्येक गांवांत खोतांस इनाम हक्कही आहेत.

इनामदार व खोत यांचा जमेच्या बाबतींतील संबंध सरकार आणि खोत यांचे संबंधापेक्षां अगदीं वेगळा आहे. लँ. रे. को. कलम ५६ प्रमाणें सरकारला आपला महसूल दुसऱ्या कोणत्याही हक्काचा विचार न करितां वसूल करण्याची मुभा आहे; तसा अधिकार इनामदारांस नाहीं. इनामदारांस मिळणाऱ्या जमेचे बाकीचा बोजा जमीन धारणकरणाऱ्या खोतांचे खात्यांतील जमिनीवर नसतो, **विनायक वि. लक्ष्मण २८ मुं. ९२ = ५ मुं. लॉ. रि. ७००.** जमा न दिल्यास सरकार-प्रमाणें, लँ. रे. कोड क. ५६ आणि १६२ प्रमाणें, आपण होऊन जमीन खालसा करण्याचा अगर विक्री करण्याचा त्यांस हक्क नाहीं, अगर तसा दिवाणी कोर्टा-कडून निवाडा मिळणेंही शक्य नाहीं. त्यांस फक्त पैशाचा निवाडा (Money decree) मिळूं शकेल, **रतनजी वि. सखाराम, १८८४ प्रिं. ज. ६८; विनायक वि. लक्ष्मण, ५ मुं. लॉ. रि. ७००.** नंतर दरखास्त देऊन खोतानें पैसे न भर-ल्यास त्याची जमीन अगर जमिनीवरील हक्क लिलांवास काढून विकतां येईल. अर्थात् इतरांचे बोजे कायम रहाणारच. "इनामदाराचें देणें देण्याची जबाब-दारी ही जातीवरची (personal) आहे. त्याचा खात्याशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं व याकरितां खातेदाराचा खरेदीदार मागील बाकी-बद्दल केव्हांही जबाबदार नाहीं" असा स्पष्ट ठराव **विनायक वि. लक्ष्मण २८ मुं. ९२ = ५ मुं. लॉ. रि. ७००** या ठरावांत केलेला आहे. हा ठराव सर्व प्रकारच्या जमीन धारणकरणारांस इनामदार वरिष्ठ असेल तेव्हां लागू आहे.

**(८) मुदतीचा प्रश्नः—**

खोतानें वेळीं जमा न दिल्यास, किंबहुना वहिवाटदार खोत वेळीं नेमिला न गेल्यास अगर कबुलायत वेळीं न दिल्यास गांव जप्त करण्याचा अधिकार सरकारला आहे. गांव जप्त करून तलाठी वगैरे अंमलदारांकडून जमा वसूल केली जाते. बारा

वर्षाचे आंत जप्ती उठविण्याचा अर्ज न केल्यास खोतांचा वहिवाटीचा हक्क नष्ट होतो; हें आपण वर पाहिलेंच आहे. इनामदारानें खोतावर करावयाची फिर्याद मात्र ठराविक मुदतीचे आंतच केली पाहिजे. या बाबतींतील मुदत, कनिष्ठ-धारणकरणारा हा खंड देणारें कूळ आहे किंवा धारेकऱ्याप्रमाणें फक्त जमिनमहसूल (assessment) देणारें आहे, यावर अवलंबून असतें. इनामदाराला कनिष्ठधारणकर-णारांकडून खंड घेण्याचा हक्क असेल तर मु. का. आर्टिकल ११० प्रमाणें तीन वर्षांचे आंत फिर्याद केली पाहिजे. परंतु इनामदार यांस फक्त सारा घेण्याचा हक्क असल्यास मु. का. आर्टिकल १२० प्रमाणें सहा वर्षांचे आंत फिर्याद आणिली पाहिजे. हीं तीन अगर सहा वर्षें जेव्हां खंड अगर सारा कायदेशीर रीतीनें येणें झाला त्या दिव-सापासून मोजावयाची, सदाशिव वि. रामकृष्ण २५ मुं. ५५६ = ३ मुं लॉ. रि. १३५; विनायक वि० लक्ष्मण २८ मुं. ९२ = ५ मुं. लॉ. रि. ७००; अंताजी वि. काशिनाथ ६ मुं. लॉ. रि. ४२३. येथें एका ठरावाकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. मोरभट वि. गंगाधर ८ मुं. २३४ या मुकदम्यांत इनामदारानें खोताविरुद्ध करावयाचें मागणें तीन वर्षांचे आंत केलें पाहिजे असा ठराव झाला आहे.

## ( ९ ) पेन्शनचे आक्टाचा ( १८७१ चा आक्ट २३ ) बाध—

गंगाधर वि. मोरभट २८ मुं. ५२५ या ठरावांत खोतावर वसूलीकरितां फिर्याद आणतेवेळीं पेन्शन आक्टाप्रमाणें आगाऊ सर्टिफिकेट घेण्याचें कारण नाहीं असें ठरलें असून अंताजी वि० काशिनाथ ६ मुं. लॉ. रि. ४२३ या ठरावांत खातेदा-राविरुद्ध दस्ताच्या बाकीबद्दल फिर्याद करणें झाल्यास इनामदारानें पेन्शनआक्टाचे कलम ९ प्रमाणें सर्टिफिकेट घेण्याचें कारण नाहीं असें ठरविलें आहे. पेन्शनचा कायदा जेथें इनामदाराला फक्त सरकारदस्तच इनाम असतो तेथें लागू असून त्या कायद्याप्रमाणें सारा वसुली करितां फिर्याद आणणेपूर्वी कलेक्टरचें सर्टिफिकेट घेतलें पाहिजे, जिजाजी वि. बालकृष्ण १७ मुं. १६९. मात्र एकदां सर्टिफिकेट घेतल्या-नंतर पुन्हां दर वेळीं सर्टिफिकेट घेण्याचें कारण नाहीं, कृष्णाजी वि. अनंत ५ मुं. लॉ. रि. ९५०

## (१०) सरकारदस्ताची वाढ केव्हां करतां येते—

कलम २४ प्रमाणें खोताची जमा ठरविली ह्मणजे ती सेटलमेंटच्या मुदती-पर्यंत कायम राहाते व नंतर ती तपासण्यांत येऊन सरकारदस्ताची वाढ होते. ही वाढ सरकार दस्ताचें प्रमाण वाढविण्यांत येतें त्या प्रमाणानें होते. एक महत्वाची गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ती अशी कीं, ही वाढ जमिनीचा मगदूर वाढला ह्मणून वाढीव मगदुराच्या प्रतीचा आकार बसवून केव्हांही कराव-याची नसते. लँ. रे. कोड कलम १०६ प्रमाणें सरकारदस्त कायम

करतेवेळीं जमिनीची जी मगदुराची प्रतबंदी ठरविली असेल ती कायम राहील. जमिनदारानें स्वखर्चानें, व स्वकष्टानें जमिनीचा मगदूर वाढविल्यास सरकार-दस्ताची वाढ ही प्रतबंदी बदलून सरकारास करतां येत नाहीं. वर्कस जमीन ह्मणून एकदां प्रत लागल्यानंतर मालकानें त्या जमिनींत भातशेत पाडल्यास अगर बागायत तयार केल्यास जमिनीची प्रतबंदी "खरीप" धरून दस्तवाढ करण्याचा सरकारला अधिकार नाहीं. ठराविक मुदतीनंतर वाढ व्हावयाची ती वर्कस जमिनीच्या प्रतबंदीवर जें वाढीचें प्रमाण ठरलें असेल त्याचप्रमाणें व्हावयाची असते. या बाबतींत एक महत्वाचा ठराव सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. दत्तात्रय ३ मुं. लॉ. रि. ९२३ हा असून त्यामध्यें ना. हायकोर्टानें असा ठराव केला आहे कीं, "ज्यावेळीं मालकाच्या उत्तेजनानें अगर हक्क देण्यामुळें जमिनींत बराच पैसा खर्च करून दुरुस्त्या केल्या असतील व त्यामुळें जमिनीचा मगदूर वाढवून सरकार सारा वाढविण्याचा प्रश्न उद्भवेल त्यावेळीं अशा जमिनीवर मूळच्या ठरावा बाहेर कांहीं बोजा बसू न देणें हें न्याय्य होय." हा ठराव लक्षांत ठेवून, सरकार-दस्त वाढेल अशी भीती बाळगून जमिनीचा मगदूर वाढविण्याचा प्रयत्न न करणें, केव्हांही इष्ट नव्हे, हें कोणाच्याही ध्यानांत येईल. जमीनीचा मगदूर वाढला येवढ्यावरून जमेमध्यें केव्हांहीं फारशी वाढ होणें शक्य नाहीं.

## — कनिष्ठ धारण करणारे. —

कोणत्या धारण करणारास "निरंतरचें कूळ" समजावें.

**कलम ५—ज्यानें मुलकी साल १८४५।४६ हें प्रारंभ होण्याच्या पूर्वीचे कोणत्याही वेळापासून सतत खोती जमिनीचा वस्तुतः उपभोग घेतला आहे किंवा लावणी केली आहे तसल्या खोती जमिनीच्या प्रत्येक धारणकरणारास, याप्रमाणें उपभोग घेतलेल्या किंवा, लावणी केलेल्या जमिनीवर "निरंतरची कूळ वहिवाट" आहे.**

**ज्या बापापासून किंवा दुसऱ्या मनुष्यापासून हल्लींच्या धारणकरणारास वारशावरून हक्क प्राप्त झाला असेल त्या बापानें अथवा, दुसऱ्या मनुष्यानें केलेला जो भोगवटा किंवा जी लावणी तीं, आणि वारशाहून इतर रीतीनें दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोग्या 'निरंतरच्या कूळवहिवाटी" असतील तर ज्या पहिल्या धारणकरणाऱ्याच्या योगानें हल्लींचा धारणकरणारा हक्क सांगत असेल तशा पूर्वींच्या धारणकरणाराचा जो भोगवटा किंवा जी लावणी,**

अथवा हल्लींच्या किंवा पूर्वींच्या धारणकरणारानें ज्याला गहाण दिलें असेल अथवा पट्ट्यानें दिलें असेल त्या गहाणदाराचा अथवा पट्टेदाराचा जो भोगवटा अथवा जी लावणी ती या कलमाच्या अर्था-अन्वयें हल्लींच्या धारणकरणाराचा भोगवटा अथवा लावणी होय असें समजलें पाहिजे. (९)

आणि नियमित वेळानें जी जमीन पड राहते त्या जमिनीच्या-बाबद, पडीत राहिल्याचीं वर्षें या कलमाच्या अर्थाअन्वयें भोगव-ट्याचीं किंवा लावणीचीं वर्षें आहेत असें मानलें पाहिजे.

(या कलमांतील "निरंतरचें कूळ," "निरंतरची कूळवहिवाट," हे शब्द सन १९१३ चा आक्ट ४ च्या आक्टानें नवीन घालण्यांत आले आहेत.)

## टिपा.

(१) उद्देश व महत्वाच्या गोष्टी

या कलमानें खोती जमिनींत असलेल्या कुळांपैकीं "निरंतरचें कूळ" कोणाला म्हणावें हें ठरविलें आहे. कलम ३ यांतील ८ व्या व्याख्येंत "निरंतरचें कूळ" या शब्दाचा अर्थ "खोती जमिनीच्या ज्या धारण करणारास सदरहू प्रकारच्या जमिनींत "निरंतरची कूळवहिवाट" आहे तो, असा दिला आहे; (कलम ३ टीप १८ पहा). परंतु "निरंतरची कूळवहिवाट" कशाला म्हणावें ह्याबद्दलचा ठराव तेथें दिलेला नसल्यामुळें या कलमांत दिलेला आहे व कोणाकोणाची वहिवाट ग्राह्य धरितां येते याचाही निर्णय केला आहे. हें कलम केवळ खोती कुळां-पुरतेंच लागू आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. "निरंतरची कूळवहिवाट" आहे असें समजण्यास खालील गोष्टी या कलमाप्रमाणें अगदीं आवश्यक आहेत,—

(१) १८४५-४६ या मुलकी सालाचे पूर्वीपासून जमिनीचा उपभोग घेत-लेला पाहिजे अगर लावणी केलेली पाहिजे.

(२) अशी वहिवाट सततची पाहिजे. सततचे वहिवाटींत खालील गोष्टींचा समावेश होतोः—

(अ) बापाची अगर ज्याचेकडून वारसा आला त्याची वहिवाट.

(ब) वर्ग करण्यास पात्र जमिनीच्या मूळ मालकाची वहिवाट.

(क) जमीन पड टाकण्यासारखी असल्यास पड ठेवावयाचीं वर्षें.

(३) वहिवाट वस्तुतः अगर प्रत्यक्ष पाहिजे.

(४) खोती जमीन पाहिजे.

इतक्या गोष्टी ज्या कुळाचे बाबतींत लागू असतील त्यास "निरंतरचें कूळ" ह्मणावें असें या कलमानें ठरविलें आहे.

## (२) जुनें कलम व नवीन कलम—

जुन्या कलमामध्यें पहिल्या प्यान्याचे शेवटीं "खात्याचा हक्क" असे शब्द होते; परंतु आतां १९१३ सालापासून "निरंतरची कूळवहिवाट" असे घालण्यांत आले आहेत. इतकेंच नव्हे तर पूर्वी ज्या ज्या ठिकाणीं "खात्याचा हक्क", "खातेदार", असे शब्द वापरलेले होते त्या त्या ठिकाणीं १९१३ चे दुरुस्तीपासून "निरंतरची कूळ वहिवाट" व "निरंतरचें कूळ" अशी सुधारणा करण्यांत आली आहे. या सुधारणेमुळें कायद्याचे स्वरुपांत कोणत्याही प्रकारची दुरुस्ती झालेली नसून खोती आक्टाखालच्या कलम ५।६ प्रमाणें होणाऱ्या कायम कुळास "निरंतरचें कूळ" ही निराळी संज्ञा देण्यांत आली आहे. सरकारी गांवांत लँ. रे. कोडाप्रमाणें "खातेदार" असतात. तेंच नांव खोती आक्टांतही असल्यामुळें "खोती खातेदार" आणि "सर्व्हे खातेदार" यांचे हक्कसंबंध एकच आहेत असा गैरसमज होण्याचा संभव होता. सर्व्हेखातेदार याचे हक्कसंबंध खोतीखातेदार याचेपेक्षां अगदीं भिन्न असल्यामुळें संज्ञाभेद करणें इष्ट वाटल्यावरून ही दुरुस्ती करण्यांत आलेली दिसते. मात्र खोती आक्टाच्या दृष्टीनें १९१३ पूर्वीचे शब्द व १९१३ नंतरचे शब्द यांचे अर्थांत अगर वापरांत कांहींच फरक नाहीं. "सर्व्हे खातेदार" यांचेमधील फरक. त्याचप्रमाणें "निरंतरचें कूळ" आणि "कायम कूळ" यांचेमधील फरक पुढें दिले आहेत ते नीट लक्षांत बाळगावे.

## (३) खोती से० आक्टापूर्वीची स्थिति—

खोती आक्ट अंमलांत येण्यापूर्वी खोतांची सत्ता कुळांचे बाबतींत अनियंत्रित होती. जें कांहीं नियंत्रण असे तें गांव शिरस्त्याचें! कुळें दोन प्रकारचीं असत. बाधेकरी अगर उपरीं कुळें व दुसरीं अर्धेल, तिर्धेल देणारीं कुळें. बाधेकरी अगर उपरी कुळें हीं केवळ हंगामी कुळें असून गांवांतील अगर बाहेर गांवांहून तात्पुरतीं आलेलीं असत. त्यांचा हंगामी शेतीपुरताच जमिनीशीं संबंध असे. अर्धेली व तिर्धेली कुळांची गोष्ट निराळी होती. हीं कायमची वस्ती करून राहिलेलीं कुळें असून त्यांना आपआपल्या ठराविक जमिनी दरसाल खोताला आगाऊ न विचारतांसुद्धां करण्याची मुभा असे. त्यांचेकडून खोतानें गांवशिरस्त्याप्रमाणें पाहणी करून उत्पन्नाची अर्धेल अगर तिर्धेल घ्यावयाची असे. हीं "अर्धेली व तिर्धेली" कुळें जरी कायमचीं असत तथापि खोताला त्यांस केव्हांही कोणत्याही सबबीवर काढून टाकण्याची पूर्ण मुभा असे. इंग्रजी अंमल सुरू

झाल्यानंतर जमिनीची सर्व्हे सुरू झाली व ज्या जमिनी अर्धेली तिर्धेली कुळांकडे चालत असत त्या जमिनीस त्या कुळाचें नांव सर्व्हे कागदीं दाखल करून ठेवण्यांत येऊं लागलें. सन १८२६ मध्यें ले. डॉवेलची पाहणी रत्नागिरी तालुक्यापुरती झाली ( रत्नागिरी तालुका त्यावेळीं फारच मोठा होता ). हीच " डुबल् पाहणी" ह्मणून प्रसिद्ध आहे. तेव्हांपासून कुळांचीं नांवें मोजणीच्या कागदीं दाखल करण्यास सुरुवात झाली. नंतर (सर्व्हे से० आक्ट), १८६५ चा आक्ट १, अंमलांत आणून कुळांनीं खोताला काय द्यावें, हें ठरविण्याचा हक्कही सरकारनें आपणाकडे घेतला, कायमचा खंड ठरवावयाचा ह्मणजे कुळास कायमपणा पाहिजे व अशा तऱ्हेचें कायम; ह्मणजेच खातेदार, कूळ कोणाला ह्मणावें, किती वर्षें सारखी वहिवाट असल्यास खातेदार समजावें, याबद्दल पुष्कळ वाद सुरू झाला व अखेरीस १८६५ च्या पूर्वी २० वर्षे सततची वहिवाट असेल त्यांची नोंद करून थल कायम करावी, असें साधारणपणें ठरलें. कुळांचा यामुळें फायदा झाला खरा, परंतु खोतांच्या निरनिराळ्या हक्कांस बाध येऊं लागला व त्यामुळें सरकार व कुळांविरुद्ध पुष्कळ दावे झाले, व ओरडहि पुष्कळ झाली. अखेर हा कायदा रत्नागिरी जिल्ह्याच्या दृष्टीनें तरी निदान अगदीं अयोग्य वाटूं लागला व खोती सेटल्मेंट आक्ट पास करण्यांत आला. (क. २ टी. ६ पहा). १८६५ च्या आक्टाखालीं नोंदी करितांना जी वीस वर्षांची वहिवाट पहाण्याचें ठरलें, तेंच तत्व या कलमामध्यें कुळांना दिलेले हक्क कायम राहावे व केलेल्या नोंदींत फारसा फरक पडूं नये, याकरितां १८६५ चे पूर्वी वीस वर्षें ह्मणजे १८४५।४६ पासूनची वहिवाट असावी असें ठरविण्यांत आलें. १८८० च्या आक्ट १ नें खोत व निरनिराळ्या प्रकारचीं कुळें यांचेमधील संबंध कायम करण्यांत आले. खोतांची सत्ता नियंत्रित करण्याचा जरी प्रयत्न केला गेला तरी या कलमानें ज्या कुळांची १८४५।४६ चे पूर्वीपासूनची सतत व प्रत्यक्ष वहिवाट शाबीत असेल तेवढ्यांनाच " निरंतरचीं कुळें " असें ठरविलें असल्यामुळें त्यानंतरच्या कोणत्याहि कुळाला " निरंतरचें कूळ " असें मानितां येणार नाहीं; व त्यामुळें अशा कुळांशिवाय करून बाकीचीं कुळें हीं उपरीं, खोताच्या मर्जीवर अवलंबून राहणारीं कुळें होत. क. फ्रान्सिसनें आपल्या रिपोर्टांत ( १८७५ ) ह्मटलें आहे कीं " या सेटलमेंटचे वेळीं ज्यांचीं नांवें कायमकुळें ह्मणून लागलीं आहेत त्यांसच फक्त फेर पाहणीचे वेळीं कायम कुळें ह्मणून गणलें जाईल ". विठोजी वि. भागोजी, १८७४ प्रिं. ज. २९८ या ठरावांत असें स्पष्ट नमूद केलें आहे कीं " वर लिहिलेल्या सर्व गोष्टी शाबीद झाल्याशिवाय सर्व्हे झाली एवढ्यानेंच कोणत्याहि कुळास कायम कूळ मानितां येणार नाहीं. " त्याचप्रमाणें महादेव वि. कृष्णा १८९२ प्रिं. ज. ९१ या ठरावांत १८४५।४६ चे पूर्वी ज्या कुळाची बारा वर्षांवर वहिवाट असून त्यानें खोतास प्रत्यक्ष खंड न देतां खोताचे वहिवाटदारास दिला, असें कूळही निरंतरचें कूळ असें मानण्यांत आलें आहे.

**(४) खातेदाराचे विशिष्ट हक्क—**

"खातेदार" या शब्दाची व्याख्या **रघुनाथराव वि० वासुदेव १ मुं. लॉ रि. ४३६** ठरावांत स्पष्टपणें केली असून **येसा वि० सखाराम ७ मुं० लॉ. रि० १४१ = ३० मुं० २९०** या ठरावांत खातेदाराचे हक्काचा विचार करितांना न्या० **बॅटि** यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "कायद्यानें ठरलेला खंड देत असतां (१) खंड-वाढ करितां न येतां, आणि(२)कालगतीनें अगर नोटीस देऊन काढितां न येतां, सत्ता-प्रकार सुरक्षित (कायम) राहाणें, हे हक्क होत" ( Those rights are the security of Tenure on payment of statutary rent which exempts them from liability (i) to enhanced rent and (ii) to a determination of Tenancy by efflux of time or on notice given )."

अशा रीतीनें खातेदाराचा हक्क ठराविक कायदेशीर खंड देऊन कायमची जमीन धारणकरणेचा असून त्यास आपल्या खंडांत वाढ होण्याची अगर नोटिस वगैरे देऊन काढून टाकला जाण्याची भीति नसते. मात्र ज्या ठिकाणीं वर्ग करण्यास पात्र नाहीं असा बौटखतास शेरा असेल, त्याठिकाणीं कलम ९ मधील अटींस अनुसरून बेकायदा वर्ग झाल्यास कुळाचे हक्कास बाध येऊं शकतो.

**(५) लॅंड रे० कोड कलम ८३ व कलम ५ यांची तुलना—**

लॅं. रे. कोड कलम ८३ हें कुळांचे बाबतींत फार महत्वाचें आहे. त्या कलमाप्रमाणें "कूळवहिवाट पुरातन काळापासून असल्याच्या सबबेमुळें ती केव्हां सुरू झाली याविषयीं खात्रीलायक पुरावा सांपडत नसेल, आणि ती कूळवहिवाट किती मुदतीपर्यंत चालू रहावयाची ती मुदत, जमिनदार व कूळ यांच्या दरम्यान, ठरली असल्यास त्या मुदतीविषयीं खातरीलायक कोणताही पुरावा नसेल, किंवा सदरहु प्रकारच्या कूळ वहिवाटीच्या मुदतीबाबद स्थानिक कोणताही रिवाज नसेल तेव्हां ती कूळ वहिवाट सदरहू प्रकारच्या जमीनदाराच्या व त्याच्या संबंधानें ज्यांस हक्क प्राप्त होतो त्यांच्या सत्ताप्रकाराच्या मुदतीबरोबर आहे असें, कुळाचा प्रत्यक्ष जमीन-दार असेल त्याच्या विरुद्ध ग्रहण केलें पाहिजे." या कलमामध्यें कुळाच्या बाजूचें पुराव्याचें अनुमान कायद्यानें ठरविलेलें आहे. यावरून लॅं० रे० कोड कलम ८३ चा फायदा ज्या वेळीं कुळपणाचे सुरुवातीचा व कुळपणाचे मुदतीचा पुरावा पुरातनपणामुळें होणें शक्य नसतें अशा वेळींच घेतां येतो. केवळ ४० वर्षांवरील कूळ आहे, एवढ्यानें या कलमाचा फायदा घेतां येत नाहीं, **कालिदास वि० भाईजी १६ मुं० ६४६; लक्ष्मण वि० विठू, १८ मुं० २२१. चिको वि० शिधनाथ २४ मुं० लॉ० रि० २२६** या ठरावांत जर अमूक एका वर्षापासून कुळपणाला सुरुवात झाली असें दाखवितां येत असेल, तर

कुळपणा फार जुना असला, तथापि कलम ८३ लागू पडत नाहीं. नारायण वि० पांडुरंग २४ मुं. लॉ. रि. ८३१; विजभुकनदास वि. इश्वरदास ३५ मुं. लॉ. रि. ४३१; इत्यादि ठराव पहा. अगदीं अलीकडचा एक महत्वाचा ठराव श्रीपादभट वि. रामा २९ मुं. लॉ. रि. २७४ हा असून त्यांत १०० वर्षांपासूनची कूळ वहिवाट असतां शंभर वर्षांचा काळ या कलमाच्या अर्थात कूळपणा आणण्यास भरपूर व समाधानकारक पुरावा असतो असें मानण्यांत आलें आहे. या शिवाय कोणत्याही प्रकारचा गांव शिरस्ताही (Local usage) असतां उपयोगी नाहीं, रामचंद्र वि. अनंत १८ मुं. ४३३. या कलमाचा फायदा कोणासही घेतां येण्यासारखा आहे. खोती आक्टाचें कलम ५ चा फायदा घ्यावयाचा असल्यास मात्र कुळानें आपण १८४५।४६ पूर्वीपासून कूळ असल्याचें शाबीत केलें पाहिजे. लँ. रे. को. कलम ८३ व खोती. से. आक्ट कलम ५ या दोन्ही कलमांचा परस्पर विरोध नसून खोती कूळ कायम कूळ ठरविण्यास कलम ८३ प्रमाणें निघणारें अनुमान जेथें निघेल तेथेंहि तें "कायमकूळ" मानण्यास हरकत नाहीं; ह्मणजे खोती कुळानें आपला पुरातनपणा, सुरवातीचे अगर मुदतीचे बाबतींत पुरावा नाहीं असें दाखवून, शाबीद केल्यास तें कायमकूळ मानण्यास हरकत नाहीं. कृष्णाजी वि. रंगो दु. अ. ७०९ सन १९०६, नि. ता. ३०-८-१९०७ या ठरावांत न्या. हीटन यांनीं असें म्हटलें आहे कीं, "कबजाचे बाबतींत प्रत्यक्ष आणि निर्णायक पुरावा दिलाच पाहिजे असें नाहीं. जमीन धारणकरणारास कलम ८३ प्रमाणें निघणाऱ्या अनुमानावर अवलंबून राहण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण खोती आक्टाचा या कलमाशीं विरोधी संबंध नाहीं; मात्र प्रथम कूळपणाचा पुरातनपणा शाबीत केला पाहिजे." यावरून कलम ८३ व खो. से. आ. कलम ५ यांतून ज्याचा फायदा घेणें शक्य असेल तो घेण्यास हरकत नाहीं. कलम ८३ च्या आधारें धरलें जाणारें "कायम कूळ" व खो. से. आ. क. ५ प्रमाणें गणलें जाणारें "खातेदार अगर निरंतरचें कूळ" यांतील फरक इतकाच कीं, खातेदार कुळाचा खंड वाढवितां येत नाहीं; कायम कुळाचा खंड वाढवितां येतो. व्यासाचार्य वि. विष्णु ३२ मुं. लॉ. री. ७१ = ४४ मुं. ५६६ यांत ८३ कलमाप्रमाणें ठरलेलें कायमकूळ, खातेदार कूळ नसेल तर खंड वाढविण्याची जमिनीचे मालकास नेहमींच्या रीतीप्रमाणें हक्क आहे, "(In the case of a permanent tenant not an occupancy tenant, the landlord has the right by usage to enhance the rent)." असें ठरविण्यांत आलें आहे. याच ठरावांत ८३ कलमाप्रमाणें कायमकूळ ठरणाऱ्या कुळास मिरासीचे हक्क प्राप्त होत नाहींत, असेंही ठरविण्यांत आलें आहे. याच तत्वावर खोती गांवांत सुद्धां ८३ कलमाप्रमाणें कूळ कायम ठरेल; परंतु तेव्हढ्यावरूनच ते धारेकरी, कचा धारेकरी, अगर खातेदार अथवा "निरंतरचें कूळ" आहे असें धरतां येणार नाहीं, व हक्कवाल्या खातेदाराचे हक्क त्यास प्राप्त होणार नाहींत.

(६) सतत वस्तुतः उपभोगः—

कुळाची "सततची वस्तुतः वहिवाट" या शब्दप्रयोगांत काय गोष्टींचा समावेश होतो, हें पाहणें जरूर आहे. याबद्दलचा स्पष्ट खुलासा या कलमांतच केलेला आहे. वस्तुतः स्वतःची वहिवाट याचा अर्थ एकाच मनुष्याची कायमची स्वतःची वहिवाट असा नसून त्यांत त्याच्याकरितां केलेल्या दुसऱ्याचे वहिवाटीचाही समावेश करतां येतो. अशा रीतीनें वस्तुतः सततचे वहिवाटींत ज्याचा समावेश करितां येतो, त्याचे चार प्रकार करतां येतात.

(१) कुळाला ज्यांच्याकडून वारशानें जमीन प्राप्त झाली असेल, त्यांस आपल्या पूर्वजांची वहिवाट आपल्या वहिवाटीस जोडतां येते. हा वारशाचा हक्क सरळ वारशानें प्राप्त झालेला असो, अगर सहहिस्सेदार ( coparcener) ह्मणून प्राप्त झालेला असो. (परिशिष्ट पहा).

(२) ज्यावेळीं खातें वर्ग करण्यासारखें असतें अशावेळीं पूर्वीच्या मालकाचा जो कबजा तोही जोडून सततचे वहिवाटींत घेतां येतो.

(३) वर्ग करण्याचा अधिकार असतां गहाणदार धनकोकडे जो कबजा असतो अगर कबुलायतीनें जमीन दिली असल्यास कबुलायतदाराचा जो कबजा तो आपलाच कबजा असें मानतां येतें.

(४) जी जमीन पड टाकावी लागते, त्या जमिनीचीं पड असलेलीं वर्षे कबजाचींच वर्षे धरावयाचीं असतात.

याप्रमाणें सततचा कबजा शाबीद करतांना स्वतःचा कबजा असल्यास शाबीद करून त्याचे भरीस आपल्या पूर्वजांचा, अगर दुसऱ्या मालकाचा, गहाणदार धनकोचा अगर कबुलायतदाराचा कबजा शाबीद करणें जरूर आहे. पडणाचीं वर्षे वहिवाटींतच मोडतात. पडणाचेबद्दलचा मुद्दाम स्पष्ट उल्लेख करण्याचें कारण मुदतीचे कायद्याअन्वयें कोणत्याही प्रकारचा मध्यंतरीं खंड ग्राह्य नसतो. पड टाकणें हा वहिवाटींत खंड पडतोसा दिसत असल्यानें अपवाद येऊं नये याकरितां स्पष्ट उल्लेख कायद्यांत केला आहे.

(७) मुलकी साल—

लॅं. रे. कोड कलम ३ पो. क. २२ प्रमाणें मुलकी साल आगष्ट १ तारखेपासून ३१ जुलईपर्यंत असें ठरविण्यांत आलें आहे. तेव्हां या कलमाचा फायदा घेण्यास १ आगष्ट १८४५ च्या पूर्वींची वहिवाट दाखविली पाहिजे.

(८) खातेदार अगर निरंतरचा कुळहक्क कोणत्या जमिनीवर प्रस्थापित करितां येतो—

कलमाचे सुरवातीस जमीन खोती जमीन पाहिजे असें स्पष्ट सांगितलें आहे,

खोती जमीन कोणाला ह्मणावें याचा विचार कलम ३ खालीं केला आहे. खोती जमिनीमध्यें धारा जमिनी येत नाहींत. धारा जमिनी धारणकरणारे "हक्कवाले खातेदार" असल्यानें खातेदाराचे सर्व हक्क, ह्मणजे जमीन कायमची धारण करणें, वर्ग करणें, वारशानें प्राप्त होणें वगैरे, त्यांस असतात. खोती जमिनीचे दोन भाग असतात, (१) खोती निसबत जमिनी व (२) खोती खासगी जमिनी. यांमधील खोतनिसबत जमिनी ह्या बहुतकरून कुळांकडेच असल्यानें अशा जमिनींत खातेदार कुळहक्क प्राप्त होऊं शकतो. खोती खासगी जमिनीमध्यें मात्र हा हक्क प्राप्त करून घेतां येत नाहीं. खोती खासगी जमिनी बहुशः खोताकडे अगर खोती हिस्सेदारांकडे असतात. अशा वेळीं कायम कुळहक्काचा प्रश्नच उद्भवत नाहीं. रघुनाथ वि. वासुदेव १ मुं. लॉ. रि. ४३६ या मुकादम्यांत न्या. क्यांडी व क्रो यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "यावरून खोती खासगी जमिनींत खातेदार कूळहक्क असणें शक्य नाहीं असें दिसतें. सर्व्हे खात्यानें सुद्धां डेक्कन रयतवार पद्धत कोकणांत लागू करण्याचा प्रयत्न केला तेव्हां खोती खासगी जमिनींतील प्रत्यक्ष वहिवाट करणारास उघडपणें सर्व्हे खातेदार मानण्याचें नाकारलें. सर्व खोतनिसबत जमिनीबद्दल मात्र वहिवाट करणारा, जुना असो वा नवा असो, खातेदार असें मानलें. खोती खासगी जमिनी मात्र खोताच्या (एक अगर अनेक) अबाधित सत्तेंत ठेविल्या. खोती आक्टाचे कलम ५ मध्यें खोती जमिनींत (यांत खासगी जमीनहि येऊं शकेल) कांहीं अटींस अनुसरून खातेदार कुळहक्क प्राप्त करून घेतां येतो, असें सांगितलें आहे ही गोष्ट खरी; परंतु तें "कनिष्ठ धारणकरणार" ह्या मथळ्याखालीं येत असून वरील कलम ४ यास खाते असा भिन्नभाव (contradistinction) दाखविणारा मथळा आहे, तेव्हां ज्याच्या हिशांत हें ठिकाण घातलें असेल त्या खोत हिस्सेदाराच्या विरुद्ध खोती खासगी ठिकाणच्या प्रत्यक्ष वहिवाटदारास फारतर खातेदार कूळहक्क सेटलमेंट कामगारांस देतां येईल. हें कायद्याच्या अक्षरावरून जरी खरें असलें तथापि कायदा करणारांच्या हेतूच्या उघडपणें विरुद्ध आहे, आणि हा जर पुन्हां कधीं मुद्दा उपस्थित झाला तर त्याचा फार काळजीपूर्वक विचार करावा लागेल."* या ठरावावरून इतकें स्पष्ट आहे कीं, खोती खासगी जमिनींत खोताचा खातेदार कूळहक्क उत्पन्न होत नाहीं, त्याचप्रमाणें खोती खासगी जमिनींत बहुशः खोताचीच सतत

---

* "This shows that there can not be an occupancy right in khoti khasgi lands. The Survey Department, even when it attempted to apply Deccan Ryatwari System to the villages of the konkan, did not overtly assert a right to make the actual cultivator of a khoti khasgi field a survey occupant of that field, whether the cultivator was of old standing or recent. But the khoti khasgi thikans were ap-

वहिवाट असल्यामुळें अन्य कोणासही खातेदार कूळ हक्क प्रस्थापित करण्यास जी वहिवाट शाबीत करावी लागते ती करणेंच शक्य नाहीं, ह्मणून हा प्रश्न उपस्थित होणेंच शक्य नाहीं; व कायद्याचें धोरणही तसें नाहीं. खोतानें आपली खासगी जमीन दुसऱ्यास खरेदी दिल्यास मात्र खरेदीदारास खातेदार कूळ हक्क प्राप्त होतो, (कलम ४० रकम ई कानू १). मात्र अशा जमिनीचें " खासगी " हें स्वरूप ताबडतोब नष्ट होऊन तिला " खोत निसबत " जमिनीचें स्वरूप प्राप्त होतें. खोतानें खोती तक्षिम विकल्यास त्यांत येणाऱ्या खासगी जमिनीचें स्वरूप कायम राहून त्या " खोती खासगी " स्वरूपानेंच खरेदीदाराकडे चालतात. खोत हिस्सेदार होण्यापूर्वी ज्या जमिनी खोतानें खातेदार कूळहक्कानें मिळविल्या असतलि त्या त्याचेकडे खातेदार या नात्यानें चालण्यास हरकत नाहीं. " **खोताहिस्सेदार खातेदार कूळ** " अशी नोंद असल्यास खोत हिस्सेदार असून शिवाय खातेदार कूळ आहे असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं असें **रामचंद्र वि. नारायण दु. अ. २६३ सन १९२० नि. ता. २७।९।१९२२** यांत ठरविलें आहे.

**(९) सर्वे खातेदार व खोती खातेदार कूळ यांची तुलना—**

**लँ. रे. कोड कलम ७३** प्रमाणें सर्वे खातेदार कुळाचे हक्क वारसाचे नियम लागू असलेले व वर्ग करण्यास पात्र असे धरण्यांत आले आहेत. सर्वे खातेदार कुळास या नियमाप्रमाणें आपल्या जमिनीवर पूर्ण हक्क असतो. इतकेंच नव्हे तर तो आपल्या जमिनीचा मालक, " वरिष्ठ धारणकरणारा ", असतो. खोती गांवांतील खातेदार कुळाचे हक्क मात्र खो. से. आक्टानें बरेच नियमित केलेले आहेत. खोती

---

parently left in the uncontrolled ownership of the khot, to whose taxim they were allotted, or of a whole body of khots, if there had been no such partition or allotment,

"It is true that Sec 5 of Bombay Act I of 1880 speaks of the holder of "khoti land" (which would include khasgi) acquiring under certain conditions occupany rights. But that comes under the heading "Inferior Holders" in contradistinction to the heading "Khots" above Sec 4, and therefore it would only empower the Settlement Officer at the most to give an occupancy right to the actual cultivators of a khoti khasgi thikan against the khoti sharer, to whose share this thikan had been allotted. This, even if within the letter of the Statute, would be distinctly opposed to the intention of the makers of the statute and the point, if ever it arises, will require careful consideration."

खातेदार कूळ जमिनीचा मालक नसून तो " कनिष्ठ धारणकरणारा " आहे. मात्र त्यानें खो. से. आक्ट कलम ७ प्रमाणें योग्य कायदेशीर रीतीनें ठरलेला खंड दिल्यास त्यास जमीन कायमची धारण करतां येते. कलम ३३ प्रमाणें ठरलेला खंड कोणासही वाढवितां येत नाहीं, व निरंतरचें कूळ असल्यामुळें कालगतीनें अगर नोटीस देऊन कोणासही काढतां येत नाहीं. **रघुनाथ वि. वासुदेव १ मुं. लॉ. रि. ४३६; येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१.** खोतीखातेदार अगर निरंतरचे कुळास वारशाचे नियमाचा फायदा मिळतो. परंतु कलम ९ प्रमाणें त्यास खोताचे संमत्तीशिवाय आपली जमीन वर्ग करण्याचा अधिकार नसतो. वर्ग करण्याचा अधिकार कोणत्या परिस्थितींत प्राप्त होतो तें कलम ९ मध्यें स्पष्ट केलें आहे.

### (१०) सर्वे कागदांतील नोंदी—

या कायद्याचे भाग तीनमध्यें कलम २० अन्वयें खातेदार कुळास वर्ग करण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं व थळ काय द्यावी यासंबंधानें जी सर्वे कागदांत नोंद केली असेल ती निर्णायक व अखेरचा पुरावा असें ठरविण्यांत आलें आहे. परंतु अमूक एक कूळ खातेदार आहे किंवा नाहीं या बाबीसंबंधें केलेली नोंद निर्णायक व अखेरची नसून ती कलम २१ प्रमाणें दिवाणी कोर्टाचे ठरावानें बदलतां येते म्हणजे " खातेदार " ह्मणून कुळाचें नांव दाखल झालें असल्यास तें अयोग्य आहे असें, अगर तसें दाखल झालें नसल्यास "खातेदारकूळ"—"निरंतरचेंकूळ" आहे असें कोणासही दिवाणी कोर्टाकडे जाऊन ठरवून घेतां येईल. ( कलम २०।२१ पहा. )

### (११) निरंतरचा कूळहक्क व विरुद्ध कबजा—

विरुद्ध कबजा याचा अर्थ मुदतीचे कायद्याचे आर्टिकल १४२ व १४४ प्रमाणें १२ वर्षांपेक्षां जास्त, दुसऱ्याचे हक्कास न जुमानतां, उघडपणें, कबजा असणें हा होय; अशा तऱ्हेच्या विरुद्ध कबजानें मूळ मालकाचे सर्व हकसंबंध विरुद्ध कबजेदारास प्राप्त होतात. खोती जमिनींत " निरंतरचा कूळहक्क " या कायद्याचीं ( खो. से. आक्टाचे ) कलमें ५,६,११ आणि ४० इ १, याप्रमाणें मिळवितां येतो हें स्पष्ट आहे, परंतु विरुद्ध कबजानें हा हक्क मिळवितां येतो किंवा काय हा एक महत्वाचा प्रश्न असून अजून निश्चित ठराव या बाबतींत झालेला नाहीं. " **विरुद्ध कबजा** " हा एकप्रकारचा वर्ग आहे. त्यामुळें ज्या खातेदार कुळाचे बाबतींत कलम ९ प्रमाणें वर्ग करण्याचा अधिकार नाहीं त्या खात्याचे बाबतींत एखाद्याचा खातेदाराविरुद्ध " विरुद्ध कबजा " होऊनही खातेदार कूळ हक्क प्राप्त होत नाहीं. कारण त्याचा खोताशीं संबंध असल्यामुळें खातेदाराविरुद्ध झालेल्या विरुद्ध कबजाचा खोताविरुद्ध परिणाम घडत नाहीं, **विष्णु वि. बावल्या २३ मुं. लॉ. रि. ४११.** खातेदारास वर्ग करण्याचा अधिकार असल्यास विरुद्ध कबजानें खातेदार कूळ हक्क प्राप्त होऊं

शकेल असें वाटतें परंतु या बाबतींत अद्याप स्पष्ट असा ठराव नाहीं. खोती खासगी जमिनींत खोताविरुद्ध " विरुद्ध कबजा " होणें शक्य असून असा खासगी जमिनीचा कबजेदार खातेदार कूळ होऊं शकेल, या बाबतींतही स्पष्ट ठराव अद्याप झालेला नाहीं.

जेव्हां जमीन अन्यायानें दुसऱ्यास प्राप्त करून दिली असेल तेव्हां " निरंतरची कुळवहिवाट "

कलम ६—" जी निरंतरची कुळवहिवाट " वारशाच्या रीतीहून इतर रीतींनें प्राप्त करून देतां येत नाहीं " ती निरंतरची कुळवहिवाट " तशा इतर रीतींनें दुसऱ्यास प्राप्त करून दिली असेल तर, त्या जमिनींचा जो वस्तुतः धारण करणारा असेल त्यास तिचें कूळ मानलें पाहिजे, आणि जर त्यानें, किंवा त्याच्या बापानें किंवा, दुसऱ्या ज्या मनुष्यापासून वारशाच्या रीतीनें त्यास हक्क प्राप्त झाला आहे त्यानें, मुलकीसाल १८४५।४६ हें सुरु होण्यापूर्वीं कोणत्याही वेळापासून त्या जमिनींचा सतत भोगवटा केला असेल किंवा, तिची लावणी केली असेल तर त्यास तिजसंबंधीं " निरंतर कुळवहिवाट " मिळेल.

मात्र असें ठरविलें आहे कीं, जो वस्तुतः धारणकरणारा असेल त्याच्या कबजांत जमीन जर नुसत्या गहाणघेणाराच्या किंवा, पट्टेदाराच्या नात्यानें असेल तर या कलमाच्या व ५ व्या कलमाच्या कारणाकारितां त्याचा भोगवटा अथवा लावणी, गहाणदेणाराचा किंवा पट्ट्यानें देणाराचा भोगवटा अथवा लावणी आहे असें समजलें पाहिजे, आणि जर सदहू गहाणदेणाराचा अथवा पट्ट्यानें देणाराचा जमिनींत खातेहक्क असेल तर त्या " निरंतरच्या कुळवहिवाटीच्या हक्कास " गहाणाचा बोजा दूर होण्यांत येई किंवा पट्ट्यानें घेणाऱ्याच्या पट्ट्याची मुदत संपेतोंपर्यंत, सदहू गहाणाचा बोजा किंवा पट्टा, ९ वे कलमांतलि ठराव कसेही असेल तरी लागू राहील.

(ह्या कलमांतील " निरंतरची कुळवहिवाट " हे शब्द १९१३ चा आक्ट ४ नें नवीनं घालण्यांत आले.)

## – टीपा –

**(१) कलमाचा उद्देश व मुख्य गोष्टी—**

या कलमामध्यें वर्ग करण्यास पात्र नाहीं अशा खात्याचा वर्ग झालेला असल्यास अशा गहाणदारांची व खरेदीदारांची स्थिति काय यांचा विचार केलेला आहे. या कायद्याचें कलम ९ व १० यामध्यें वर्ग करण्याचा अधिकार नसतां वर्ग केला तर काय अवस्था होते हें सांगितलें आहे. कलम ६ व कलमें ९ व १० यांचा पुष्कळ वेळां घोटाळा केला जातो. कलम ६ चा उद्देश केवळ १८४५।४६ सालापूर्वी झालेले बेकायदा वर्ग बचावण्याचा आहे. कलम ६ घालण्यांत आलें नसतें तर १८४५ च्या पूर्वी ज्यानीं व्यवहार केले त्यांचे कलम ९ प्रमाणें नुकसान झालें असते या करितां हें कलम घालण्यांत आलें आहे. कलम ६ मध्यें मुद्याच्या गोष्टी आहेत त्या येणेंप्रमाणें—

(१) वर्ग करण्यास पात्र नाहीं असें खातें पाहिजे.

(२) वारशाशिवाय अन्यरीतीनें खातें वर्ग झालें असलें पाहिजे.

(३) अशा रीतीनें वर्ग झाल्यानें ज्याचा वस्तुतः कबजा आहे अशा इसमास "कूळ" गणावें.

(४) अशा कुळाकडे बेकायदा वर्ग होऊन प्राप्त झालेल्या खात्याची वहिवाट वस्तुतः जर मुलकी साल १८४५।४६ सुरु होण्यापूर्वी पासूनची असेल तर त्यास "निरंतरचा कूळहक्क" प्राप्त होतो.

(५) हा कबजा जर निरंतरचे कुळाचा १८४५।४६ पूर्वीपासूनचा गहाणदार अगर पट्टेदार या नात्यानें असेल तर तो कबजा निरंतरचे कुळा करितांच आहे असें समजावें.

(६) अशा गहाणदाराचा बोजा अगर पट्टा कलम ९ चा बाध न येतां कायम राहील.

इतक्या गोष्टी या कलमांत सांगितल्या असून हें कलम, कलम ५ यांत यांत भर घालण्याचे उद्देशानें घातलें आहे.

**(२) कलम ५ व ६ यांची तुलना—**

कलम ५ यांत केवळ वारशानें ज्या कुळांस हक्क प्राप्त होतात अशा कुळांस "निरंतरचा कुळहक्क" कोणत्या परिस्थितींत प्राप्त होतो हें सांगितलेलें असून, या कलमामध्यें बेकायदा वर्ग केल्यामुळें वहिवाट प्राप्त झालेल्या कुळाला "निरंतरचा कूळहक्क" केव्हां प्राप्त होतो हें सांगितलें आहे. कलम ६ हें या दृष्टीनें कलम ५ चें केवळ पूरक आहे, असें स्पष्ट दिसून येईल. कलम ५ च्या अर्थाप्रमाणें ज्यांची मुलकी साल १८४५।४६ चे पूर्वीपासूनची वहिवाट शाबीत नाहीं असें कूळ एक

साली कूळ समजावयाचें. त्याचप्रमाणें ज्यांस बेकायदा वर्गानें अगर पट्टयानें वहिवाट मिळाली असून १८४५।४६ मुलकी सालापूर्वीपासूनची सततची वहिवाट शाबीत करतां येत नसेल अशासही एकसाली कूळ मानावयाचें आहे.

**(३) कलम ६ फक्त १८४५ च्या पूर्वीचे व्यवहारास लागू आहे**—

कलम ६ चा हेतू नीट ध्यानांत येण्यास कोणत्या व्यवहाराकरितां हें कलम या कायद्यांत घातलें आहे हें पक्कें ध्यानांत आलें पाहिजे. या बाबतींत **येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१** या खातेदार कुळांसंबंधीच्या प्रसिद्ध ठरावांत **न्या. बॅटी** यांनीं या कलमाचा विचार करतांना असें लिहिलें आहे कीं "गहाण अगर पट्याशिवाय, ज्या गोष्टीमध्यें मुळच्या हक्कदाराचे खातेहक्क शिल्लक नसल्यामुळें, वर्ग घेणारा, वर्ग करणारावर उलटतां येत नसल्यानें, या कलमाचे पहिले वाक्यांतील विशेष ठराव नसता तर साधें कूळ सुद्धां होऊं शकला नसता, अशा गोष्टी कलम ६ च्या पहिल्या भागानें विचारांत घेतल्या आहेत, हें उघड आहे. अशा वर्ग घेणाराचा वंशपरंपरागत भोगवटा, १८४५ चे पूर्वीपासूनचाच फक्त असेल तर त्यास खातेहक्क प्राप्त होतो असें त्यांत ठरविलें आहे. गहाण देणाराचा अगर पट्टादेणाराचा कूळ हक्क शिल्लक असतां गहाण घेणाराला अगर पट्टाघेणाराला भोगवट्याचा हक्क असतो ही गोष्ट निःसंशय ठरवून, कलम ९नें आळा घातल्यामुळें अशा ठिकाणीं आपल्या अधिकाराबाहेर आहे असें म्हणून वर्ग करणाराला वर्ग नाकबूल करतां येऊं नये, याकारितां "विशेष ठराव" घालणें आवश्यक वाटलें असावें असें दिसतें. तथापि त्यामुळें वर्गकरणाराचा कुळहक्क नष्ट झाल्यानंतर त्याचा खातेहक्क शिल्लक राहाणें कायदेशीर होत नाहीं. कारण ते खातेहक्क अशावेळीं कलम १० मुळें नष्ट होतात. वर्गकरणाराचे खातेहक्क शिल्लक आहेत तोंपर्यंत बोजा अगर पट्टा शिल्लक राहील इतकेंच फक्त त्यानें ( विशेष ठरावानें ) ठरविलें आहे. हा ठराव, आक्ट अंमलांत आल्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या गहाणांस अगर पट्टयांसच केवळ लागू आहे असें सुचविणारें त्यांत कांहीं नाहीं. त्यानंतरच्या गहाणानें अगर पट्टयानें खोताकडे हक्क खालसा होऊन जावा असा जर हेतू असता तर आम्हांस वाटतें तसा स्पष्ट उल्लेख केला गेला असता; आणि शिवाय गहाणदाराला भोगणें शक्य असलेला जमिनीचा सर्व नफा खातेदार कुळास दुसऱ्यास देतां न येण्यासारखें कांहीं नसल्यामुळें असा हेतू उघडपणें अगदीं निष्फळ झाला असता."*

* The first part of Sec. 6 manifestly contemplates cases, not being cases of mortgages or leases, in which the occupancy right no longer subsists in the person originally entitled thereto and consequently the transferee, having no right in the transferor to fall back upon, would not even be

या ठरावावरून कलम ६ नें १८४५ च्या पूर्वी ज्यांचेकडे वर्ग होऊन जमीन आली त्याचा कबजा सतत असल्यास मूळ खोतदाराचा हक्क शिल्लक नसतांही त्यास खातेदार कूळहक्क प्राप्त होतो; त्याचप्रमाणें मूळ खातेदाराचे खातेहक्क शिल्लक असतां गहाणदार अगर कबुलायतदार यांचा भोगवटा असल्यास तें गहाण अगर ती कबुलायत बेकायदेशीर न ठरतां त्यांचा गहाणाचा बोजा अगर वहिवाटीचा हक्क कायम राहतो व तो त्यांचा भोगवटा मूळ खातेदारांचाच असतो असें ठरविलें आहे, हें उघड आहे. या कलमामध्यें १८८० नंतर झालेल्या गहाणानें अगर कबुलायतीनें बेकायदा वर्ग होऊन खातें खोतास खालसा करतां येतें असें दाखविणारा कांहीं ठराव नाहीं, इतकेंच नव्हे तर तसा हेतूही नाहीं. १८४५।४६ च्या पूर्वीचे गहाणाचे अगर कबुलायतीचे बाबतींत मूळ खातेदाराचे हक्क नष्ट झाल्यास कलम १० प्रमाणें ते गहाणाचे बोजे अगर वहिवाटीचे हक्क नष्ट होतात असें या ठरावांत स्पष्ट ठरविलें आहे.

---

an ordinary tenant but for the special provision in the first sentence of the section. Hereditary occupation by such a transferee is there declared to confer occupancy rights only if dating from a time previous to 1845. The proviso in removing all doubt as to the right to occupation by a mortgagee or a lessee, whose mortgagor's or lessor's tenancy is still subsisting, appears to have been deemed necessary to make it clear that the transferor could not repudiate the transfer in such cases as one beyond his powers as restricted by Sec. 9. It does nct validate however, the survival of occupancy rights after the extinction of the transferor's tenancy. For they would then be extinguished by Sec. 10. It only declares that the lien or lease shall subsist so long as the occupancy rights of the transferor continue. There is nothing that suggests that these provisions only apply to mortgages and leases subsisting when the Act came into force. Had it been intended that subsequent mortgages and leases would work a forfeiture in favour of the khot, that intention would, we think, have been clearly expressed. Moreover such an intention would obviously be liable to frustration as nothing could prevent an occupancy tenant from giving another all profits of the land which a mortgagee could enjoy."

**(४) खो. से. आक्ट कलम ९ व हें कलम परस्परविरोधी नाहींत—**

या कलमामध्यें वर्ग करण्याचा अधिकार नसतां वर्ग करण्यामुळें कोणत्या परिस्थितींत बाध यैत नाहीं एवढेंच सांगितलें आहे. या कलमाप्रमाणें १८४५।४६ मुलकी सालापूर्वींपासूनची वर्ग घेणाराची वंशपरंपरागत वहिवाट असेल तर व्यवहार १९१२ पूर्वींचा केव्हांचाही असला तरी चालेल. याचें कारण न्या. बॅटि यांच्या मताप्रमाणें वर्ग करणारा निदान सावें कूळ तरी होतोच व अशा कुळाची १८४५।४६ पूर्वींपासूनची सतत स्वतःच्या हक्कानें वहिवाट चालीत असल्यानें त्यास कलम ५ प्रमाणें निरंतरचें कूळ ह्मणण्यास हरकत नाहीं. पूर्वींचें कलम ९ व १९१२ च्या दुरुस्तीनंतरचें कलम ९ यांत पुष्कळ तफावत आहे. १९१२ नंतरच्या कलमाप्रमाणें बेकायदा जमिनीचा वर्ग केल्यास तें खातें खोतास खालसा होऊन मिळतें कलम ६ नें १८४५।४६ चे पूर्वींचे गहाण, पट्टे वगैरे वर्ग वांचविले आहेत. १८४५।४६ पूर्वींपासूनचे गहाण घेणाराचे अगर पट्टा घेणाराचे हक्क, बेकायदा वर्ग असला तथापि, कलम ९ चा बाध न येतां शिल्लक राहतात; ह्मणजे १८४५।४६ पासून १८८० मध्यें खोती से. आक्ट पास झाल्यानंतर सुद्धां खातेदाराचा खातेहक्क शिल्लक असतां जी गहाणें अगर पट्टे अस्तित्वांत असतील ते जरी कलम ९ मधील ठरावाप्रमाणें बेकायदा दिसत असले तथापि योग्य आहेत, असा विशेष ठराव केलेला आहे. कलम ९ प्रमाणें सुद्धां १८६५ चे पूर्वींचे तीस वर्षांतील वर्ग योग्यच आहेत. परंतु शंकेला जागा राहूं नये या करितां कलम ६ मधील विशेष ठराव घातलेला आहे. १८६५ नंतरचे सर्व वर्गास मात्र १८८० चे आक्टांतील कलम ९ चे सर्व ठराव लागू पडतात, परंतु असे वर्ग, १९१२ सालीं कलम ९ मध्यें दुरुस्ती होईपर्यंतचे असल्यास, मूळ खातेदाराचा हक्क शिल्लक असतां, खोताविरुद्धच केवळ रद्द ( Null and Void ) ठरतात; न्या. बॅटि यांचे भाषेमध्यें बोलावयाचें ह्मणजे, " खातेदार कुळास जमिनीचा सर्व नफा दुसऱ्यास न देतां येण्यासारखें काहीं नसल्यामुळें ", वर्गापासून मिळणारा फायदा खातेदार कुळास वर्ग घेणारास देतां येतो, **येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१.** १९१२ चे दुरुस्तीनंतर कोणत्याहि प्रकारें निरंतरचे कुळानें वर्ग केल्यास खातें खोतास खालसा होऊन मिळतें **दामोदर वि. वासुदेव २२ मुं. लॉ. रि. १०२,** यावरून कलम ९ व कलम ६ ही परस्पर विरुद्ध नाहींत हें उघड होईल.

**(५) वर्ग करण्यास पात्र कीं नाहीं याविषयीं सरकारकागदींची नोंद व कलम—**

या कलमाप्रमाणें कांहीं विशेष हक्क प्राप्त होतो किंवा काय याचा विचार करितांना बोटखताचे शेऱ्याचाही विचार केला पाहिजे. १८४५।१८४६ चे पूर्वींपासून ज्यांची वहिवाट आहे तीं कुळें खातेदार म्हणून धरून त्याप्रमाणें खातीं सरकारकागदीं पडलेलींच आहेत व बोटखतास ज्या कुळाचें खातें नाहीं अशा कुळाला

"निरंतरचें कूळहक्क" प्राप्त होणें बहुतेक अशक्यच आहे. या नोंदीप्रमाणेंच वर्ग करण्यास पात्र आहे किंवा नाहीं याविषयीं बोटखतास शेरा देतांना १८६५।६६ चे मुलकी सालापूर्वीचे ३० वर्षांत वर्ग केला होता किंवा नाहीं याचा विचार करूनच नोंद केलेली आहे; कारण वर्ग करण्याचा अधिकार खोताचे संमतीनें अगर कलम ९ प्रमाणें १८६५।१८६६ चे पूर्वी ३० वर्षांत वर्ग केला असेल तरच प्राप्त होतो. वर्ग करण्याचे बाबतींतील ठराव कलम २० प्रमाणें अखेरचा आहे. याचा सविस्तर विचार पुढें केला आहे. बोटखतास खातें असून वर्ग करण्यास पात्र आहे असा शेरा असतां वर्ग झाल्यास सर्व गोष्टी कायदेशीरच आहेत. मात्र बोटखतास खातें असून वर्ग करण्यास पात्र नाहीं असा शेरा असतां कलम ६ प्रमाणें वर्गाचा परिणाम होतो; म्हणजे १९१२ पूर्वीचा वर्ग असल्यास व वर्ग करून घेणाराची १८४५।१८४६ पूर्वींपासूनची वहिवाट शाबीत असल्यास वर्ग करून घेणारास खातेदाराचे सर्व हक्क मिळतात. १८४५।१८४६ चे पूर्वींपासून ज्याची वहिवाट आहे त्यांचीं नांवें बोटखतास अगर सरकारकागदीं दाखलच असल्यानें अशा तऱ्हेची परिस्थिति उद्भवणेंच शक्य नाहीं. मात्र बोटखतास कसलाच शेरा नसतां, खातेदारकूळ ही नोंद अखेरची [ final ] नसल्यामुळें व खातेदारास आपल्या खात्याचें उत्पन्न दुसऱ्यास घेऊं देण्याची पूर्ण मुभा असल्यामुळें अशी परिस्थिति उद्भवणें शक्य आहे.

**कलम ७ — हक्कवाले खातेदार यांचे सत्त्वप्रकार चालविणें — खोतास किंवा जमिनीचा पैसा ज्या दुसऱ्या मनुष्यास घेण्याचा हक्क आहे त्यास हक्कवाले खातेदारांनीं वेळोवेळीं कायद्याप्रमाणें द्यावयाचें असेल तें थळ देत राहिलें असतां त्यांच्याकडे जमिनी राहातील.**

## टिपा

(१) उद्देश व मुख्य गोष्टी—

हक्कवाले खातेदारांचा हक्क कोणकोणत्या गोष्टी केल्या असतां अबाधित राहील हें या कलमांत सांगितलें असून, या कलमाप्रमाणें, हक्कवाले खातेदार —धारेकरी, कचा धारेकरी अगर निरंतरचें कूळ—वागतील तर त्यांस आपले खातेहक्कावर गदा येईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. या कलमानें, हक्कवाल्या खातेदारांस, वेळोवेळीं कायद्याप्रमाणें द्यावयाचें थळ देत गेल्यास, त्यांचे हक्क कायम राहतील असें आश्वासन देणेंत आलें आहे. या कलमानें करावयास सांगितलेल्या गोष्टी:—

(१) हक्कवाल्या खातेदारानें कायद्याप्रमाणें द्यावयाची थळ दिली पाहिजे.

(२) अशी थळ वेळचेवेळीं दिली पाहिजे.

(३). थळ खोतास अगर ज्यास ती घेण्याचा अधिकार आहे अशासच दिली पाहिजे.

## (२) खातेदार कुळें व साधीं कुळें यांची तुलना—

या कायद्याचें कलम ७ व ८ यांमध्यें हक्कवाले खातेदार व साधीं कुळें यांचे हक्काचा विचार केला आहे. या बाबतींत **येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१** या ठरावांत न्या. बॅटि यांनीं फारच मार्मिक विचार केला आहे. ते लिहितात " हक्कवाल्या खातेदारांस सर्व साधारण व भेदसूचक असा हक्क (privilege) कलम७ मध्यें दिला असून तो ह्मणजे कायदेशीरपणें देणें असलेला खंड देऊन जमीन धारणकरणें हा होय. अशा तऱ्हेचा हक्क कोणत्या परिस्थितींत प्राप्त होतो हें कलम ५,६ व ११ यांत सांगितलें आहे. साधीं कुळें आणि हक्कवाले खातेदार यांचेमधील महत्वाचे फरक कलम ७,८ यांत सांगितले आहेत. त्या कलमांवरून असें दिसतें कीं, हक्कवाले खातेदारांचे बाबतींत त्यांचा सत्ताप्रकार त्यांचेकडे चालू राहण्यास त्यांनीं कायद्यानें ठरविलेल्या (defined) व निश्चित केलेल्या (ascertained) बंधनानें (obligations) चाललें पाहिजे. तेंच दुसऱ्या, ह्मणजे साध्या कुळांचे बाबतींत त्यास आपसांतील करारांतील अटीप्रमाणें तरी चाललें पाहिजे, अगर करार नसेल त्यावेळीं एक वर्षापुरताच कूळहक्क असून खंड गांवशिरस्त्याप्रमाणें जास्तींत जास्त जो असेल तो दिला पाहिजे. ह्या शेवटच्या प्रकारचीं कुळें लँ. रे. को. कलम ८४ च्या ठरावांत येत असून त्यांचा हक्क कायद्यानें सांगितलेली तीन महिन्यांची नोटीस देऊन नष्ट करतां येतो. हक्कवाल्या खातेदारांचा हक्क आहे तो ह्मणजे, कायद्यानें ठरलेलें देणें दिलें असतां, खंडाची वाढ न होतां, कालगतीनें अगर नोटिसीनें कूळहक्क नाहिंसा न होतां, आपला सत्ताप्रकार कायम धारण करणें हा होय."* या ठरावांत केलेली तुलना फार महत्वाची व ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

---

* " The privilege common to the class and distinctive of it as a whole, is declared in Sec 7 and consists of the right to hold land conditionally on payment of rent lawfully due thereon. The circumstances by which the privilege is acquired and ascertained are laid down in Secs. 5, 6, and 11. ( All these three subdivisions are within the definition in sec 3 (14) of L. R. Code. )

" The essential distinctions between the two main classes, privileged occupants aud ordinary tenants, are to be found in secs 7 & 8. Those sections show that while in the 1st. class, viz. privileged occupant, the continuance of the tenure is dependant solely on the fulfilment of

(३) कायद्याप्रमाणें द्यावयाची थल—

"थल" या शब्दाचा अर्थ मोल्सवर्थ यांचे शब्दकोशांत "शेताचे पिकांतील भाग" असा दिला आहे, व ना. हायकोर्टाचे ठरावांत त्याचा अर्थ "पिकाचे किंमतीपैकीं भाग" असा केला आहे, **रामचंद्र वि. रघुनाथ २० मुं. ४७५. माधवराव वि. देवनाक २१ मुं. ६९९** या ठरावांत थल याचा अर्थ "शिरस्त्याप्रमाणें गल्ल्यांत द्यावयाचा खंड ("rent") असा केला आहे. ही थल तिन्ही प्रकारच्या हक्कवाल्या खातेदारांनीं काय काय द्यावी याचा निर्णय या कायद्याचें **कलम ३३** मध्यें सांगितला आहे. धारेकऱ्यानें फक्त सरकारसारा द्यावयाचा आहे, व सरकार सारा हीच त्याची थल समजली पाहिजे. कच्चे धारेकरी यांनीं सरकारदस्त देऊन परिशिष्टांत ठरविल्याप्रमाणें जास्त पैसे अगर धान्य दिलें पाहिजे. खातेदार कुळानें मात्र ३३ कलमांतील कानूस अनुसरून ठरविलेली थल दिली पाहिजे. खातेदार कुळाचे बाबतींत खातेदारानें खोतास काय द्यावें याचा ठराव रेकार्डिंग कामगारानें करावयाचा असून, खातेदार कुळानें कांहींच देऊं नये असा ठराव करण्याचा त्यास अधिकार नाहीं. खातेदार कुळानें आपल्या जमिनीबद्दल कांहींतरी दिलेंच पाहिजे. **विठ्ठल वि. येसा २२ मुं. ९५** या ठरावांत असें नमूद केलें आहे कीं "खातेदार कुळानें ठराविक रक्कम अगर ठराविक भाग दिलाच पाहिजे. हेंहि देऊं नये आणि तेंहि देऊं नये, म्हणजे कांहींच देऊं नये, असें ठरविणें सर्वे कामगाराच्या अधिकाराबाहेरचें आहे"† कलम ३३ प्रमाणें केलेले थलीचे ठरावाची नोंद बोटखतास असते व तो ठराव **कलम २०** प्रमाणें अखेरचा व निर्णायक असल्यामुळें त्याप्रमाणें थल दिलीच पाहिजे. हीच कायद्यानें ठरलेली थल असून या बाहेर कलम ३६ प्रमाणें धारेकरी व कच्चे धारेकरी यांनीं लोकलफंड द्यावयाचा असतो. खातेदार कुळें यांचे वर लोकल फंड देण्याची जबाबदारी नसते.

---

obligations defined by and ascertained under the act, the 2nd class or ordinary tenants are subject to terms settled by agreement or in the absence of agreement have only a yearly tenancy, on rents, determined subject to a specified maximum, by local usage. Last class of ordinary tenants come within the provisions of Sec. 84 of the Bombay Land Revenue Code and their holdings are terminable by three months' notice therein prescribed."

† "Thus occupancy tenant must pay either a fixed amount or a fixed share and a determination that he shall pay neither one nor the other, in fact that he shall pay nothing at all, is clearly beyond the jurisdiction of the Survey Officer."

## (४) थल देण्याची वेळ व मुदतीचा कायदा—

थल देण्याच्या तारखा ठरविण्याचा गव्हर्नर–इन–कौन्सिल यांस या कायद्याचें कलम ३४ प्रमाणें अधिकार दिलेला आहे. व त्याप्रमाणें कलम ४० रकम "फ" कानू ६ स अनुसरून खालील तारखांस द्यावयाची आहे. थल देणेच्या तारखाः—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| धारेकरी— | १५ डिसेंबर, | १ फेब्रुवारी, | १५ मार्च, | १ मे |
| कच्चा धारेकरी— | ” | ” | ” | ” |
| दुप्पटकरी— | ” | ” | ” | १ जून |
| खातेदार कूळ— | ” | ” | ” | ” |
| ” ” मक्ता देणें असेल तेव्हां | ” | ” | ” | (हा हप्ताच नाहीं.) |

या तारखांबद्दल, कोणत्या प्रकारची थल केव्हां द्यावी याविषयीं, विशेष माहिती कलम ४० र. (फ.) कानु ६ याखालीं पहा. या तारखांस अनुसरून खोतास कुळानें थल अगर मक्ता द्यावयाचा असल्यानें कुळाकडे फिर्याद करून मागणें करणें झाल्यास खोतानें खंड येणें झाल्या दिवसापासून तीन वर्षांचे आंत मु० का० आर्टिकल ११० प्रमाणें फिर्याद केली पाहिजे. थल अगर मक्ता देण्याच्या या तारखा सरकारनें ठरविल्या असल्यामुळें या तारखांसच थल अगर मक्ता येणें होतो; करितां या तारखांपासूनच कायदेशीर मुदत सुरू होते, व तेव्हांपासून तीन वर्षांचे आंत मागणें केलेंच पाहिजे. तीन वर्षें होऊन गेल्यास त्या वर्षांचे थलीचें मागणें करतां येणार नाहीं. खोतानें आपली सरकार जमा केव्हां द्यावी हेंही ठरविलेलें आहे, परंतु त्याचा हक्कवाल्या खातेदाराशीं कांहीं एक संबंध नाहीं.

## (५) थल कोणास द्यावी—

खोती गांवांत कुळानें थल खोतासच दिली पाहिजे. गांवचा अगर तुटक धड्याचा स्वतंत्र खोत असेल त्यावेळीं त्यासच थल दिली पाहिजे. ज्यावेळीं खोतकींत हिस्सेदार असतात त्यावेळीं सरकारनें याच कायद्याचें कलम २६ अन्वयें वहिवाटदार खोत नेमला असतो त्या वहिवाटदार खोतास, अगर कलम ३१ (अ) प्रमाणें त्यानें नेमिलेल्या मुखत्यारास, थल दिली पाहिजे. कोणीही खोतहिस्सेदार वहिवाटदार खोत होण्यास पुढें न आल्यानें अगर अन्य कारणानें गांव जप्तींत गेल्यास थल कलेक्टरानें नेमिलेल्या जप्तीदाराकडे दिली पाहिजे. जप्तीदार नेमलेला असतां खोताकडे थल देणें बेकायदेशीर आहे. खोताला, मग तो स्वतंत्र खोत असो अगर वहिवाटदार खोत असो, आपला उत्पन्नवसुली पुरताच हक्क विकतां येत

नाहीं, किंबहुना त्यानें विकला तरी तो कुळावर बंधनकारक होणार नाहीं, कारण कलम ३१ प्रमाणें वहिवाटदार खोताशिवाय दुसऱ्या कोणासही मदत मागण्याचा अधिकार ठेविलेला नाहीं. स्वतंत्र खोत मात्र कलम ३० प्रमाणें वहिवाटदार खोत समजावयाचा असतो. इनाम गांवांत खोत असतां कुळानें खोतासच थल दिली पाहिजे. विष्णु वि. बाळू २ मुं. लॉ. रि. ६६ या ठरावांत इनामदारानें कुळांना खोतास खंड न घालण्याबद्दल सांगितल्यामुळें आपलें नुकसान झालें तें इनामदाराकडून भरून देववावें अशाबद्दल खोतानें फिर्याद केली असतां ना. हायकोर्टानें असा ठराव केला कीं " इनामदारानें जुडी, सर्वेदस्त वगैरेबद्दल सरकारास द्यावयाच्या रकमेइतकीच रकम कुळांकडून वसूल केली असल्यामुळें खोताला इनामदाराकडून कांहींएक वसूल करण्याचा हक्क नाहीं. ज्या ठिकाणीं खोत आणि कुळें यांचेमध्यें जुळलेला (contractual) संबंध सूचित नसेल त्यावेळीं खोतानें असें शाबीद केलें पाहिजे कीं (१) आपण आणि कुळें यांचेमध्यें असा कायदेशीर संबंध आहे कीं कुळाकडून खंड घेण्याचा, जरूर तर दावा करून वसूल करण्याचा, आपणास हक्क आहे; (२) अशा तऱ्हेच्या कायदेशीर संबंधांत इनामदारांनीं, कुळास खोतास खंड न घालण्याबद्दल मुद्दाम सांगून, आपलें नुकसान केलें आहे; (३) व त्यामुळें आपलें नुकसान झालें आहे. इतक्या गोष्टी खोतानें शाबीत केल्यास खोतास नुकसानी भरून मिळेल; एरवीं मिळणार नाहीं." कुळाकडून वसूल घेण्याचा खोताचा हक्क साधारणपणें ठराविक असल्यामुळें इनामदारांनीं त्यांत ढवळाढवळ करूं नये हें इष्ट आहे. खोती धारकरी गांवांचे बाबतींत धारेकरी आणि कचे धारेकरी यांनीं आपली थल खोतासच दिली पाहिजे. अलीकडे बरेचसे धारेकरी गांव खालसा झाले असून त्यांचा वसूल सरकारी अंमलदार--तलाठी वगैरे-यांचेमार्फत होतो. अशा ठिकाणीं धारेकऱ्यांनीं आपला सरकारदस्त, व लोकलफंड तलाठी अगर योग्य त्या सरकारी अधिकाऱ्यापाशींच दिला पाहिजे.

### (६) थल देण्यास पात्र नाहीं असें शाबिदीच्या पुराव्याचा बोजा—

महंमद याकूब वि. महंमद इस्माईल ९ मुं. हा. को. रि. २७८ या ठरावांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं "खोती जमीन धारणकरणारास, गांव शिरस्त्याप्रमाणें तो खंड देण्यास पात्र नाहीं, असें शाबीद केलें पाहिजे." या ठरावाप्रमाणें खंडाच्या दाव्यामध्यें, आपण खंड देण्यास पात्र नाहीं, अमुकच खंड द्यावयाचा वगैरे गोष्टींची शाबिदी करण्याची जबाबदारी सर्वस्वीं कुळावर असते.

### (७) खंड देण्याची जबाबदारी कोणावर—

खंड हक्कवाल्या खातेदारांपैकीं ज्याच्या नांवावर खातें असेल त्यानेंच वास्तविक सर्व खंड देऊन पावती घेतली पाहिजे, परंतु ज्याच्याकडे प्रत्यक्ष वहिवाट असेल

अशा पोट हिस्सेदार अगर अन्य इसमानें खंड दिल्यास हरकत नाहीं. या बाबतींतील एक महत्वाचा ठराव कृष्णाजी वि. रामचंद्र १ मुं. ७० हा असून त्यांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं " खंड देण्याची जबाबदारी वहिवाट व उपभोग यांचेवर असून राजा अगर राजाचे प्रतिनिधी यांनीं माफ केला नसेल तर खंड दिलाच पाहिजे. (" The liability to pay adheres to the occupation and enjoyment and can not be got rid of, except through its resignation by the sovereign or the sovereign's representatives "). या तत्वास अनुसरून हक्कवाल्या खातेदाराचे कबजे गहाणदारावर खोताचें देणें देण्याची जबाबदारी आहे असें या ठरावांत ठरविण्यांत आलें आहे. धारेकरी, कचे धारेकरी व वर्ग करण्यास पात्र असलेलीं कुळें यांनीं आपल्या जमिनी कबजेगहाण दिल्यास खोताचें देणें देण्याची जबाबदारी कबजेदारावरच आहे. कबुलायतीनें वहिवाट घेतली असेल त्याठिकाणीं हाच नियम लागू धरण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

(८) खातेदार कूळ आणि विरुद्ध कबजा—

खातेदाराचे विरुद्ध दुसऱ्याचा विरुद्ध कबजा झाल्यास त्याचा खोता विरुद्ध कांहीं परिणाम घडत नाहीं. मात्र खातेदारास आपल्या जमिनीचा प्रत्यक्ष कबजा आपणाकडे घेतां येत नाहीं. कुळानें आपल्या जमिनीचा खोतास वर्ग केल्यास अगर राजिनामा दिल्यास विरुद्ध कबजेदारास आपला कबजा सोडावा लागेल. विष्णु वि. बाबल्या २३ मुं लॉ. रि. ४२१ या ठरावांत खातेदार १८९८ मध्यें मयत झाल्यानंतर खोती जमिनीचा कबजा त्याचे मामेभावानें घेतला, व मूळ खातेदाराचे पुतण्याविरुद्ध बारा वर्षापेक्षां जास्त वर्षें आपणाकडे ठेविला. तेव्हां खोतानें कबजेदार मामेभावावर कबजाचा दावा केला. यामध्यें अखेर असें ठरलें कीं, " मामेभावाचा खातेदाराचे वारसांचे विरुद्ध विरुद्ध कबजा झाला असला तथापि त्यामुळें फक्त खातेदाराचे प्रत्यक्ष कबजाचा प्रश्न नाहींसा होतो, परंतु त्यामुळें त्याचा खातेदार कूळहक्क नाहींसा होऊं शकत नाहीं, व त्याला आपला हक्क खोताला देतां येतो. "* विरुद्ध कबजेदारास खातेदाराचे हक्क प्राप्त होत नाहींत. विरुद्ध–कबजा बेकायदा वर्ग किंवा कसें वगैरे संबंधें कलम ९ खालीं विचार केला आहे.

---

* " It follows therefore from this that, defendant 1's adverse possession against Babu only operates to extinguish Babu's right to the actual possession of the land and does not operate to annihilate his occupancy Tenants right which he could therefore transfer to the Khot. "

(९) खंड आणि रेसज्युडिकेटा—

रेसज्युडिकेटा ह्मणजे उभय पक्षकारांमधील जो मुद्दा एकदां एखाद्या योग्य अधिकार असलेल्या कोर्टानें निर्णित केला तोच मुद्दा त्याच पक्षकारांचे दरम्यान पुन्हां उपस्थित करतां येत नाहीं असें दिवाणी कायद्याचे (Civil Procedure Code) कलम ११ नें ठरविलेलें तत्व होय. या तत्वाप्रमाणें खंडाचे बाबतींत पूर्वी कोर्टाचा ठराव झाला असतां तो ठराव पुन्हां खंडाचें मागणें करते वेळीं आड येऊं शकत नाहीं असें विष्णु वि. रामलिंग २ मुं. लॉ. रि. ४५० या ठरावांत ठरलें आहे. या मुकदम्यांत खोतानें १८९७–९८ सालास कुळांकडून थल वसूल करण्याकरितां पोफळींचे झाडांबद्दल थलीचें मागणें करून दावा केला. खोतानें त्यांत दरवर्षी अशी थल घेण्याचा आपणास हक्क आहे असें विधान केलें नव्हतें. कुळांची तक्रार पोफळींबद्दल थलीचें मागणें करण्याचा खोतास अधिकार नाहीं, वगैरे होती, परंतु त्याचा कांहीं विचार न होतां खोताला पोफळीचीही थल वसूल करण्याबद्दल हुकुमनामा मिळाला. खोतानें पुन्हां १८९८।९९ सालीं पोफळीचे झाडांवर थल मागणेंबद्दल दावा केला. तेव्हां प्रतिवादींनीं पुन्हां पोफळींबद्दल थल मागणेंचा वादीस अधिकार नाहीं, अशी तक्रार केली. उलट खोतानें तक्रार केली कीं, दि० का० कलम ११ प्रमाणें हें निर्णित तत्व असल्यामुळें रेसज्युडिकेटाचे तत्वाचा बाध येतो. परंतु ना. हायकोर्टानें या परिस्थितींत रेसज्युडिकेटा होत नाहीं असें ठरविलें. सदर ठरावांत न्या. फुलटन यांनीं असें ह्मटलें आहे कीं "पूर्वीचे दाव्यांत थल अथवा पोफळीचें उत्पन्न चुकीनें देवविलें असलें तरी त्यामुळें कायद्यानें ठरविलेल्या गोष्टी त्यास फिरवितां येत नाहींत, आणि ह्मणून अशा परिस्थितींत रेसज्युडिकेटा होण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं." न्या. चंदावरकर यांनींही याचप्रमाणें आपले ठरावांत लिहिलें आहे. याच ठरावांत बोटखताला पोफळींबद्दल कांहीं द्यावें असा ठराव नसल्यानें कूळ देण्यास जबाबदार नाहीं असें ठरविलें आहे.

(१०) थल आणि रेकार्डिंग आफिसराचा ठराव—

थलीचे बाबतींत खो० से० आ. कलम ३३ अन्वयें केलेला ठराव निर्णायक व अखेरचा पुरावा असतो, (कलम २० ब). मात्र ज्यावेळीं खोत आणि कूळ यांचे दरम्यान कांहीं करार झाला असेल त्यावेळीं कुळानें त्या करारप्रमाणें खोतास खंड दिला पाहिजे. १९०४ चे दुरुस्तीपासून मात्र असे करार रेकार्डिंग कामगाराचे समक्ष खोत व कुळें या उभयतांचे कबुलीनें नोंदविले, असल्यासच ते बंधनकारक होतात. नाहींपेक्षां बोटखताचा ठराव हाच कायम ठराव असून त्याप्रमाणेंच थल दिली पाहिजे. बाळशेट वि. हरि. २७ मुं. लॉ. रि. १४८७ या ठरावांत ही गोष्ट सर न्या. मॅक्लिऑड यांनीं स्पष्टपणें नमूद केली आहे. कलम ३३ मध्यें झालेली दुरुस्ती गतकालसापेक्ष नसल्यामुळें १९०४ चे पूर्वीचे आपसांतलि

कायदेशीर करारांस कांहीं बाध येत नाहीं. थलीचे बाबतींत बोटखताचा शेरा कायमचा असतो, त्याचे बाहेर खोतास त्याची वाढ करतां येत नाहीं. येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१. त्याच प्रमाणें कमीही करतां येत नाहीं. हरि वि. गणेश दु. अ. नं. ६१ सन १९०८ नि. ता. २०।७।१९०८ या अप्रसिद्ध ठरावांत न्या. बॅचेलर आणि चौबळ यांनीं असें ठरविलें आहे कीं, "याठिकाणीं शिरस्त्याप्रमाणें ठरलेला खंड असल्यामुळें तो कमी करण्याचा अगर वाढविण्याचा खोतास अधिकार नाहीं. पुरामुळें जमिनीचा मगदुर कमी झाला असें ह्मणणें आहे. परंतु हें ह्मणणें, खरें असलें तरी खोतास द्यावयाचे थळीचे बाबतींत अगदीं निरुपयोगी आहे."* या ठरावाप्रमाणें एकदां थल ठरल्यानंतर निरंतरचे कुळानें तितकी थल खोतास दिलीच पाहिजे.

## (११) "निरंतरचें कूळ" व खंडचिट्ठी—

निरंतरचा कुळहक्क असतां खोतानें एखादी खंडचिट्ठी लिहून घेतली तर तेवढ्यानें त्या कुळाचा निरंतरचा कुळहक्क नष्ट होऊं शकत नाहीं. कुळाला आपला निरंतरचा कुळहक्क शाबीद करण्याची पूर्ण मुभा आहे. लँ. रे. कोड कलम ८३ यांतील तत्वाप्रमाणें ज्याचा कूळपणा पुरातनचा आहे त्यानें खंडचिठी लिहून दिल्यास त्याचा पुरातन पासूनचा कुळहक्क तेवढ्यानें नष्ट होत नाहीं. हें तत्व विजभुकणदास वि. ईश्वरदास २९ मुं. लॉ. रि. ४३१ या ठरावांत नां. हायकोर्टानें कायमचें ठरविलें आहे. "ज्या ठिकाणीं वहिवाट इतक्या वर्षांची आहे कीं तिची सुरवात केव्हां झाली हे ठरवितां येत नाहीं अशा वेळीं अशा रीतीनें वहिवाट चालू असतां कुळानें एक, एकसाली कूळ आहे असें दाखविणारी, कबुलायत लिहून दिली, एवढ्यावरून त्याला पुष्कळ वर्षांच्या वहिवाटीनें मिळालेला हक्क त्याची कबुलायतीनंतरही पुष्कळ वर्षें वहिवाट असेल तर नष्ट होत नाहीं." असें ठरविलें असून, प्रत्येक वेळीं परिस्थितीचा योग्य विचार केला पाहिजे असें ठरविलें आहे. खातेदार अगर "निरंतरचे कुळाचे" बाबतींतही हेंच तत्व ग्राह्य धरण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

## (१२) कायमकुळाची खंडवाढ करतां येते—

खातेदार अथवा निरंतरचे कुळाचे बाबतींत खंडवाढ करतां येत नाहीं;

---

* "The rent in this case is customary rent which it is not in the power of the plaintiff to reduce or to enhance; it is said that the land has deteriorated in value owing to floods, but that circumstance, if true, is no answer to the khot's demand for rent."

परंतु लँ. रे. कोड कलम ८३ प्रमाणें ठरलेलें कायमकूळ असेल तर अशा कुळाचा खंड जमीनदारास-खोतास-वाढवितां येतो. कायमकुळपणाचा खंडवाढीशीं कांहीं विरोधी संबंध नाहीं, कायमकूळपणास कायम खंडच पाहिजे असें नाहीं. ही गोष्ट हरी वि. नारायण ६ मुं. हा. को. रि. २३, विष्णुभट वि. बाबल्या १८७७ प्रिं. ज. १४६, रघुनाथ वि. बाबु २ मुं. लॉ. री. ९३, व्यासाचार्य वि. विष्णु २२ मुं. लॉ. रि. ७१७, या ठरावांत अगदीं स्पष्टपणें नमूद केलेली आहे. खंडाची वाढ करतां येत असली तथापि, असेंही ठरविण्यांत आलें आहे कीं, कायम कुळाचे बाबतींत ही वाढ कायदेशीर मार्गानें व न्याय्य व रास्त अशीच केलेली असली पाहिजे. जमीनदाराच्या मर्जीवर कोणत्याही प्रकारें अवलंबून नसून ती न्याय्य अशीच वाढ असली पाहिजे. खातेदार कुळाचे बाबतींत वाढ करतां येत नाहीं हें वर आलेंच आहे.

**कलम ८—"निरंतरच्या कुळा" शिवाय दुसरीं जीं कुळें त्यांच्या आणि खोतांच्या दरम्यान ज्या शर्ती आणि करार झाले असतील, अथवा यापुढें होतील, त्यांस अनुसरून त्यांच्या जमिनी त्यांकडे चालतील, आणि तीं दुसरीं कुळें सदरहू प्रकारचा कोणताही विशेष करार नसेल तेव्हां ज्या गांवांमध्यें "निरंतरच्या कुळानें" धारण केलेल्या जमिनी असतील त्या गांवामध्यें ते ज्या दरांनीं थल देतात त्याच दरांनीं खोतास थल देण्यास पात्र असणारीं वार्षिक कुळें आहेत असें मानलें पाहिजे; मात्र सदहू दर, कलम ३२ रकम (क) यांत मोठ्यांत मोठे दर सांगितले आहेत त्यांहून अधिक नसावे.**

सामान्य कुळ

("निरंतरचें कूळ" हे शद्ब सन १९१३ चा मुं. आक्ट ४ वरून दाखल केले आहेत.)

## टिपा.

(१) उद्देश व मुख्य गोष्टी—

मागील कलमांत कनिष्ठ धारणकरणारांपैकीं "निरंतरचे कुळाचा" कायमपणा कशावर अवलंबून आहे हें सांगितलें आहे. आतां या कलमामध्यें दुसऱ्या तऱ्हेचीं ह्मणजे ज्यांना उपरींकुळें, बाधेकरी अगर एकसालीकुळें, सामान्य कुळें वगैरे प्रकारांनीं संबोधण्याचा प्रघात आहे अशीं कुळें कोणास समजावें, त्यांनीं खंड काय द्यावा, वगैरे गोष्टी या कलमामध्यें स्पष्ट केल्या आहेत. या कलमाकरितां

(१) खातेदार अगर "निरंतरचे कुळा" व्यतिरिक्त कुळें पाहिजेत.

(२) अशा कुळांकडे खालील अटींवर जमिनी चालावयाच्या—

(अ) खोत आणि कुळें यांच्या दरम्यान करार होऊन ज्या शर्ती व अटी ठरलेल्या असतील त्यांस अनुसरून कुळें चालतील तर,

(आ) करार नसेल तर ही कुळें एकसालीं कुळें समजून कलम ३३ (क) ऱ्या पेक्षां जास्त नाहीं अशी खातेदार कुळास द्यावी लागणारी थल नियमित देतील तर,

कुळें या अटींस अनुसरून वागतील तर जमिनी त्यांचेकडे वार्षिक, सामान्य, कूळ म्हणून चालू राहातील.

(२) उपरी कुळाबद्दलची जुनी माहिती—

कॅ. ग्रांट (सन १८२०) यांनीं धारेकरी व बाधेकरी यांची तुलना करून बाधेकरी कुळाबद्दल असें म्हटलें आहे कीं– "बाधेकरी हे तूर्तातूर्त (Temporary) कसणारे असून, ते या गांवाहून त्या गांवाला आपले बिऱ्हाड मर्जीप्रमाणें उठवून नेतात आणि बहुतेक अर्धेल अगर खंडीच्या मानानें थल देतात." (खोतीसत्ताप्रकार पान ११). त्याचप्रमाणें खुद्द सरकारनें आपल्या नंबर ३३ ता. १०।१।१८२५ च्या उत्तरांत ह्मटलें आहे कीं "उपरी अथवा अर्धेली कुळें यांचेकडे जमिनीचे कसणुकीचाहि हक्क असल्याचें दिसत नाहीं. इतकेंच नव्हे तर ते आपल्याला अनुकूल अशा सवलती जेथें मिळतील तेथें या ठिकाणाहून त्या ठिकाणीं जातात." ("Uparis or ardhelis do not appear to possess even a usufructuary right to the soil which they cultivate, but to change from place to place as they are invited by favourable terms" [खोतीसत्ताप्रकार पान १६] यावरून सरकारी अंमल सुरू झाला त्याचे पूर्वीपासून अशा तऱ्हेची कायमपणा नसणारीं "उपरी", बाधेकरी अथवा अर्धेली कुळें असून त्यांचा जमिनीवर कोणत्याही प्रकारचा कसणुकीचा देखील हक्क नव्हता इतकेंच नव्हे तर अशा प्रकारचीं कुळें कायमपणें एके ठिकाणीं राहतही नसत असें दिसतें.

(३) एकसालीं कूळ कोणास ह्मणावें—

"कूळहक्क" याची व्याख्या रा. दांडेकर यांनीं आपल्या "जमिनीचे सत्ताप्रकार" (Law of Land Tenure) या पुस्तकांत (पान ४०६) "दुसऱ्या एखाद्याची स्थावर मिळकत उपभोगण्याचा हक्क मोबदल्याकरितां दुसऱ्याकडे अगर दुसऱ्याचे कबजांत दिलेला जेव्हां आढळतो आणि हा हक्क कर्जफेडीकरितां कर्जास आधार ह्मणून दुसऱ्याकडे ठेवलेला नसतो, तेव्हां अशा तऱ्हेचा असलेला,

उद्भवणारा अगर अस्तित्वांत आणलेला जो संबंध तो कूळहक्क समजावा."* अशी केली आहे. या तत्वास अनुसरून खोती गांवांत एकसाली कूळ कोणास म्हणावें हें याच कलमांत सांगितलें आहे. खातेदार अगर "निरंतरचे कुळाशिवाय" खोती जमिनींतील जीं कुळें तीं सर्व एकसालीं कुळें होत. अशी कुळें आहेत तीं—

(१) सन १८४५।१८४६ चे पूर्वींपासूनची आपली वहिवाट आहे असें मागील कलम ५।६ प्रमाणें ज्यांस शाबीत करितां येत नाहीं अशीं;

(२) खंडचिठी अगर कबुलायत चिठ्ठी करून घेऊन जमीन ज्यांस वहिवाटीस दिली आहे अशीं कुळें.

(३) कलम ९ प्रमाणें खातेदार कुळांनीं आपले जमिनीचा सन १९१२ चे दुरुस्तीपूर्वी बेकायदा वर्ग केला असतां, वर्ग घेणारा, मुळच्या कुळाचा हक्क अन्यकारणानें नष्ट होतांच, एकसाली कूळ होतो.

(४) खातेदाराचा हक्क नष्ट होतांच खातेदार कुळाविरुद्ध विरुद्ध-कबजानें ज्यांस हक्क प्राप्त झाला आहे असें कूळ **विष्णु वि. बाबला २३ मुं. लॉ. रि. ४२१.**

(५) खोती खासगी जमिनींत असलेलीं कुळें.

(६) खोती तक्षीम विकल्यानंतर खासगी जमिनीची वहिवाट करणारे खोतहिस्सेदार.

(७) खोतांच्या खोतनिसबत खात्यांतील जमिनींत असणारीं कुळें.

(८) उपरी, बाधेकरी अगर अर्धेली कुळें.

(९) खंडचिठ्ठींतील मुदत संपल्यानंतर वहिवाट आपलेकडे ठेऊन खंड देणारीं कुळें. ( Tenants holding over ).

## (४ "एकसाली" कूळ असें कायद्याचें अनुमान—

लँड रे. कलम ८३ मध्यें एकसाली कुळाच्या मुख्य खुणा दिल्या असून कायमकूळ असें कायद्याचें अनुमान केव्हां निघतें तें सांगितलें आहे. ( क. ५ टी. ५ पहा ). केवळ बरेच वर्षे कुळाकडे जमीन असल्यानेंही तो एकसाली कूळच राहतो. जमिनदार व कुळें यांचे संबंधांत कायद्याचें मुख्य अनुमान 'कूळ एकसाली आहे' असें आहे. "भरपूर पुरावा नसेल अगर जोरदार विरुद्ध अनुमान निघण्यासारखें नसेल त्यावेळीं एकसाली कूळ आहे असें कायद्याचें अनुमान निघतें," असें **बाईगंगा वि. दुलभपराग ५ मुं. हा. को. रि. १७९** या ठरावांत नमूद

---

* "Tenancy is the relation which exists, arises or is brought into existence, when the right to enjoy the immovable property of one person is found to be in, or transferred to another person for consideration, but not by way of security for the satisfaction of a debt."

केलें आहे. ज्या ठिकाणीं कुळास कोणत्या सत्ताप्रकारानें मूळ मालकाकडून आपण जमीन धारण करतों हें दाखवितां येत नसेल त्यावेळीं तो एकसाली कूळ असें समजावें, **एन्दुर वि. लाला ७ मुं. हा को. रि. १११.** ४० वर्षांची वहिवाट असली तथापि त्याचा कांहीं उपयोग न होतां अशीं कुळें एकसालीच मानलीं पाहिजेत, **लक्ष्मण वि० विठु १८ मुं० २२१.** कूळपणाला केव्हां सुरवात झाली हें दाखविणारा समाधानकारक पुरावा नाहीं, एवढेंच कलम ८३ प्रमाणें निघणारें अनुमान काढण्यास पुरेसें नसून, असा पुरावा नसण्याचें कारण पुरातनपणाच आहे असें शाबीद झालें पाहिजे, **विश्वनाथ वि. तात्या ६ मुं. लॉ. रि. ६४५.** अमुक एका वर्षापासून अगर कांहीं सालांच्या दरम्यानच्या काळांत कूळपणाला सुरवात झाली असें दाखवितां आल्यास कायमकूळ असें अनुमान निघत नाहीं, असें **चिको वि. शिधनाथ २४ मुं. लॉ. रि. २२६,** आणि **नारायण वि. पांडुरंग २४ मुं. लॉ. रि. ८३१,** ह्या ठरावांत धरलें असून १८०५ सालांत कूळपणास सुरवात झाली असें दाखविल्यानें कायम कूळ असें अनुमान काढतां येत नाहीं, असें **शिधनाथ वि. चिको २३ मुं. लॉ. रि. ५३३** या ठरावांत नमूद केलें आहे. याच ठरावांचे बरोबर हेंही लक्षांत बाळगलें पाहिजे कीं ८० वर्षांचे मागेपासून आपण सतत कूळ आहों असें शाबीद करणारास तो कायमकूळ मानण्यास हरकत नाहीं असें **रामचंद्र वि. अनंत १८ मुं. ३३** या ठरावांत ठरलें असून अगदीं अलीकडे **श्रीपादभट वि. रामा २९ मुं. लॉ. रि. २७४** या ठरावांत **न्या. पाटकर** यांनीं "१०० वर्षे कूळपणा असल्याचा पुरावा हा लँ. रे. कोड कलम ८३ प्रमाणें कायमकूळ मानण्यास भरपूर पुरावा आहे" असें ठरविलें आहे.

कांहीं असलें तरी "एकसाली कूळ" असें कायद्याचें मुख्य व प्रथमचें अनुमान असल्यानें ज्याचें आपण "कायमकूळ" आहों असें म्हणणें असेल त्याचेवर पुराव्याचा बोजा असतो.

**(५) एकसाली कुळांस वर्ग करण्याचा हक्क आहे—**

कलम ९ प्रमाणें खातेदार कुळास जसा आपल्या खालांतील जमीन खोतांचे संमतीशिवाय वर्ग करण्याचा अधिकार नाहीं, तसा निर्बंध साध्या कुळावर नसून त्यानें आपला हक्क वर्ग करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. **सोनशेट वि. विष्णु २० मुं. ७८** या ठरावांत **न्या. फुलटन** यांनीं असें नमूद केलें आहे कीं "कांहीं ठराविक परिस्थितीशिवाय खातेदाराच्या जमिनी खोती आक्टाप्रमाणें वर्ग होण्यास पात्र नाहींत; परंतु त्यांत साध्या कुळानें वर्ग करण्यास कांहीं प्रत्यवाय ठरलेला नाहीं. हा भेद असण्याचें कारण उघड आहे. एकसाली कुळाचे बाबतींत खोताला कुळास नोटिस देऊन वाटेल तेव्हां काढण्याचा अधिकार आहे. परंतु तसाच जर खातेदाराचे जमि-

नीचा वर्ग होईल तर वाटेल तें, खोताला न आवडणारें, व नोटिशीनें न काढतां येईल असें कूळ त्यास खोतावर लादतां येईल. " यावरून असें स्पष्ट आहे कीं, एकसाली कूळ या सदराखालीं येणाऱ्या प्रत्येकाला आपला कूळहक्क वर्ग करण्याचा पूर्ण हक्क आहे. हेंच तत्व येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१ यांत ग्रहीत मानलें आहे.

**(६) एकसाली कुळानें खंड काय द्यावा—**

या कलमांत सामान्य कुळानें काय खंड द्यावा याबाबतही ठराव केला आहे. खंडाची जास्तींत जास्त रक्कम खोती से. आक्टाचें कलम ३३ रकम (क) यांत केलेल्या ठरावाचें बाहेर असूं नये. खोत आणि कूळ यांचे दरम्यान जर कांहीं ठराव नसेल; तर गांवांतील खातेदार कुळें जो खंड देतात, त्याच्या मानानें त्यांस खंड दिला पाहिजे. खातेदार कुळांचे बाबतींत अर्धेल, तिर्धेल अगर चौथल देण्याबद्दल बोटखतास जमिनीचे मानानें शेरा असतो, त्याच मानानें देण्यास सार्धे कूळ जबाबदार आहे. गांवांत खातेदार कूळ नसलें, तर कोणत्या तत्वावर खंड आकारावा असा प्रश्न उद्भवतो यावद्दल लॅं० रे० को० कलम ८३ मध्यें पहिल्या पारिग्राफाचे शेवटीं सांगितलें आहे कीं,-"कबुलायत अगर रिवाज नसेल तर त्या प्रकरणाच्या हकीगतीकडे लक्ष देऊन जो खंड वाजवी व योग्य असेल त्या खंडासाठीं धारण करतो असें ग्रहण केलें पाहिजे." यावरून करार अगर गांवशिरस्ता असेल तेव्हां त्याप्रमाणें चालावें, अगर तसें नसेल त्यावेळीं " वाजवी व योग्य " खंड कोणता याचें अनुमान करून खंड द्यावा. खोती गांवांतही ज्यावेळीं खंड ठरविणेचा प्रश्न उद्भवेल त्यावेळींही याच तत्वानें चालावें. हा " योग्य " खंड काय यांचा निर्णय आपसांत न लागल्यास कोर्ट मार्फत लावून घ्यावा. कोर्टानें कोणत्या तत्वावर खंड देववावा या बाबतींत कृष्णाबा वि. केशव ४ मुं. लॉ. रि. ६०६ या ठरावांत असें ह्मटलें आहे कीं, " ज्या ठिकाणीं खातेदार कुळाची थल सेटलमेंट कामगारांनीं ठरविलेली असेल आणि खातेदाराव्यतिरिक्त इतर कुळें यांच्या दरम्यान कांहीं ठराव नसेल तेव्हां कलम ८३ खालीं, कोर्टाला खातेदारांचे ठरावाइतका खंड देववितां येईल." यावरून इतर ठिकाणीं खातेदार कूळ त्याच प्रतीचे जमिनीचा जो खंड देतो तोच वाजवी व योग्य खंड होय.

**(७) अप्रत्यक्ष परवानगीचें कूळ ( Tenant Holding over )—**

खंडचिठ्ठीच्या अथवा कबुलायतीच्या आधारें कूळ जमिनींत ठेवलें असतां त्यास ती जमीन खंडचिठ्ठींतील मुदती इतकीच आपले वहिवाटीस ठेवण्याचा हक्क आहे. त्यानंतर जर वहिवाट त्याचेकडे असेल तर ती बगरहक्क वहिवाट समजून जमीनदारानें त्या कुळास काढून टाकण्याची बारा वर्षांचे आंत खटपट केली पाहिजे. बारा वर्षांचे आंत त्यांस काढून टाकण्याची तजवीज न होईल तर जमीनदाराचे

विरुद्ध कुळाचा विरुद्ध कबजा होईल, **चंद्री वि. दाजी २ मुं. लॉ. रि. ४९१** परंतु कूळ ठरल्याप्रमाणें खंड देत असेल व जमीनदार तो खंड घेत असेल तर अशा कुळाचे वहिवाटीस जमिनदारानें अप्रत्यक्ष संमत्ती दिल्यासारखें होतें व तें कूळ " **अप्रत्यक्ष परवानगीचें कूळ** " असें गणलें जाऊन " एकसाली कूळ " या प्रमाणें त्याची गणना होते. जमीनदारानें कोणत्याहि रीतीनें कुळाचे कबजास संमत्ती दिली तरी चालेल. संमत्ती असल्याचें शाबीद करितां आलें ह्मणजे झालें, **बालाजी वि. रामचंद्र ४ मुं. लॉ. रि. १७२.** अशा कुळास काढण्याकरितां दावा आणण्या-पूर्वी वहिवाट सोडण्याबद्दल तीन महिन्याची, डिसेंबर अखेरचे आंत, नोटीस दिली पाहिजे. नोटीस न देतां दावा केल्यास कबजा निघणार नाहीं, **ओछवलाल वि. गोपाळ ९ मुं. लॉ. रि. १३३२.**

(८) **खंड वाढ करणें**—

साध्या एकसाली कुळाचे बाबतींत जमीनदाराला खंडाची वाढ करण्याचा अधिकार आहे. आपसांतील करारानें ज्यावेळीं खंड ठरला असेल, त्यावेळीं त्या कराराचे बाहेर वाढ करितां येणार नाहीं, परंतु कबुलायतीची मुदत संपल्यानंतर जमीनदारास खंड वाढवितां येतो. खंडाची वाढ करणें अगर न करणें जमीनदारा-च्या मर्जीवर अवलंबून राहाते. खोती गांवांत ही वाढ किती करावी हें याच कलमांत सांगितलेलें असून खातेदार कुळाचे बाबतींत **कलम ३३ रकम ( क )** अन्वयें जी थल ठरली असेल तीतकीच जास्तींत जास्त वाढवितां येईल.

केव्हांही खंडाची वाढ करण्यापूर्वी कुळास तीन महिन्यांची आगाऊ नोटीस दिली पाहिजे, **बहिरु वि. विनायक १८९२ प्रि. ज. २९८.** शिरस्त्याचे कुळाचे बाबतींत सहा महिन्यांची आगाऊ नोटीस दिली पाहिजे, **हरी येमाजी वि. परशुराम ११ मुं. हा. को. रि. २३.** नोटीशींत वाढीबद्दलचा स्पष्ट उल्लेख असून वाढीप्रमाणें खंड देणें नसल्यास जमीन स्वाधीन करावी असाही स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. खोती गांवांत सुद्धां हा नियम लागू असून खोतानेंही नोटीस दिली पाहिजे. खोत ह्मणजे एखादा खोतहिस्सेदार नसून खोतकींतील सर्व हिस्सेदार असा अर्थ आहे. नोटीस एका हिस्सेदारानें देऊन चालणार नाहीं. **बाळाजी वि० गोपाळ ३ मुं. २३** या ठरावांत " दोन समाईक खोत हिस्सेदारापैकीं एकानें खंडवाढीची नोटीस कुळास दिली, परंतु त्यास दुसऱ्या हिस्सेदाराची संमत्ती घेतलेली नव्हती, अशा स्थितींत खोत हिस्सेदारास कुळाची खंडवाढ करण्याचा हक्क नाहीं. " असें ठर-विण्यांत आलें. त्याचप्रमाणें **बाळाजी वि. गोपाळ १८८० प्रि. ज. ५३** या ठवावांत वरील बाळाजी वि० गोपाळ या ठरावास अनुसरून वहिवाटदार खोतास इतर सर्व खोत हिस्सेदारांच्या कबुलीशिवाय खंड वाढ करितां येत नाहीं असें स्पष्ट ठरविण्यांत आलें आहे, स्वतंत्र एकटा खोत अगर स्वतंत्र धड्याचा मालक खोत

असेल तर त्याला नोटीस देऊन वाढ करितां येईल.

**(९) सामान्य कुळांकडून कोणत्या परिस्थितींत जमीन काढतां येते—**

सामान्य अगर एकसाली कुळाला काढून टाकण्याचा खोताला अधिकार आहे. हा अधिकार खालील गोष्टी घडल्यास प्राप्त होतो—

(१) कराराची अगर कबुलायतीची मुदत संपतांच.

(२) योग्य कायदेशीर कोणतेही वर्षाचे डिसेंबरचे आंत पोंचेल अशी तीन महिन्यांचे आंत जमीन सोडण्याबद्दलची लेखी नोटीस दिल्यास, तीन महिने भरल्यानंतर, म्हणजे मार्च अखेर.

(३) कूळ आपली मालकी जमिनीवर सांगूं लागेल तर, **महिपत वि. लक्ष्मण २ मुं. लॉ. रि. २२८=२४ मुं. ४२६.**

(४) मक्ता अगर खंड न दिल्यास कबजा घ्यावा असा करार अगर अट कबुलायतींत असून कूळ खंड देण्यास चुकेल तर.

(५) कूळ जमिनीची वस्तुस्थिति ( character of holding ) बदलून टाकील तर **रामनाथन वि. जमीनदार १६ मद्रास ४०७.**

(६) मुख्य कुळाला नोटीस वगैरे देऊन काढून टाकल्यानंतर, त्याच्या पोट कुळांचाही सर्व हक्क आपोआप नाहींसा होतो, व त्यांस काढतां येतें. **तिमाप्पा वि. रामा २१ मुं. ३११.**

खालील बाबतींत कुळाला नोटीस दिल्याशिवाय केव्हांही काढतां येत नाहीं.

(१) जमीन पड टाकिली तर, **दीनचंद्र वि. लोकनाथ ६ मद्रास ३२२.** (खोती आक्ट कलम १४ पहा).

(२) कुळानें फक्त खंड न दिला एवढ्यावरूनच त्याला काढतां येत नाहीं, **येशवंत वि. केशवराव १६ मुं. लॉ. रि. ७२०.**

(३) कुळानें आपण कायम कूळ आहों असें म्हणण्यास सुरवात केल्यास, **रामा वि. अब्दुलरहीम २२ मुं. लॉ. रि. १२१४.**

**(१०) कायदेशीर नोटीस—**

लँ. रे. कोड कलम ८४ मध्यें एकसाली कुळाला, करार नसतां, मुलकी साल सुरु होण्यापूर्वी, ह्मणजे ३१ मार्च पूर्वी, तीन महिने नोटीस दिली पाहिजे, असें सांगितलें आहे; ह्मणजे ३१ डिसेंबरचे आंत कुळाला नोटिस पोंचली पाहिजे. नोटीसींत कोणती जमीन कुळानें सोडावयाची याचा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे. अशा रीतीनें योग्य कायदेशीर रीतीनें लिहिलेली नोटीस योग्य रीतीनें कुळावर बजावली पाहिजे व पोंचल्याची त्याची स्वतःची पावती पाहिजे. कुळानें घेत नाहीं असें म्हणून नोटीस परत केल्यास हरकत नाहीं. पोष्टाचा " मालक घेत नाहीं सबब

परत," असा शेरा असल्यास ती बजावणी योग्य असते. कुळानें जमीनीवर आपली मालकी सांगितल्यास नोटीस देण्याचें कारण नाहीं. नोटीस देणें व मालकी सांगणें या बाबतींत **न्या. रानडे** यांचा **महिपत वि. लक्ष्मण २ मुं. लॉ. रि. २२८,** यांतील ठराव महत्वाचा आहे. "जमीन सोडण्यास नोटीस देण्याची जरुरी होती कीं काय असा एक प्रश्न आहे. हा प्रश्न रिस्पाँडंट आपल्या जमीनदाराची मालकी नाकबूल करतो किंवा काय यावर अवलंबून राहील. जर मालकी सांगितली नाहीं असें असेल तर त्याला नोटीस देणें भाग होतें. तथापि, सेट्लमेंट आफीसराकडे अर्ज करून आपलें नांव मालक ह्मणून बोटखतास दाखल करून घेतलें यावरून जमीनदाराचा मालकी हक्क त्यानें नाहीं असें म्हटलें असें होतें." **न्या. रानडे** यांनीं या ठरावांत एकसाली कुळानें आपण कायम अगर मिराशी कूळ आहों असें ह्मणणें हें सुद्धां जमीनदाराची मालकी नाकबूल केल्यासारखें होतें असें म्हटलें आहे. परंतु **रामा वि. अबदुल रहीम २२ मुं. लॉ. रि. १२१४** या ठरावांत एकसाली कुळानें कायमकूळ हक्क सांगणें ह्मणजे मालकी नाकबूल करणें नव्हे, असें ठरविलें असून, अशा कुळाला नोटीस दिली पाहिजे, असें ठरविलें आहे.

### (११) कूळ व विरुद्धकबजा—

कुळानें आपल्या वहिवाटीस असलेल्या जमिनीचा खंड दिला नाहीं येवढ्यानेंच त्याचा विरुद्धकबजा होत नाहीं. जमिनदाराच्या मालकीशीं कांहींतरी विसंगतपणाचें कृत्य उघडपणें केलें असून बारा वर्षें कबजा सतत कुळाकडे राहिल्यास मात्र कुळास विरुद्धकबजानें मालकी हक्क प्राप्त होतो, **विनायक वि. सिताराम १४ मुं. लॉ. रि. ११७३.** जमिनदाराच्या मालकीशीं विसंगत अशी कृत्यें म्हणजे—आपण कूळ म्हणून राहाण्यास तयार नाहीं अशी मालकास लेखी नोटीस देणें; जमिनदाराची मालकी कोठेंतरी जमिनदाराला उघड होणें शक्य आहे अशा रीतीनें नाकबूल करून आपली मालकी सांगणें; खंड न देतां व मालकाच्या हरकतीस न जुमानतां रहाणें; वगैरे कृत्यें होत. कुळाची कबुलायतींतील मुदत संपल्यानंतर कूळ तसेंच जमिनीचे वहिवाटीबद्दल मालकास कांहीं एक न देतां राहातें, अशावेळीं हा त्याचा कबजा बगरहक्क कबजा wrongful) असतो. असा बगरहक्क कबजा कबुलायतीची मुदत संपल्यापासून बारा वर्षें सतत उघडपणें असेल तर तो विरुद्धकबजानें मालक होईल, **चंद्री वि. दाजी २४ मुं. ५०४.** खोती गांवांत खातेदार कुळाचे विरुद्ध दुसऱ्या कोणाचा विरुद्धकबजा असल्यास ज्यास विरुद्धकबजानें वहिवाटीचा हक्क प्राप्त झाला आहे तो मूळ खातेदाराचा हक्क नष्ट झाल्यानंतर ( १९१२ पूर्वींची गोष्ट असल्यास) एकसाली कूळ होतो, **विष्णु वि. बाबला २३ मुं. लॉ. रि. ४२१.** खोती खासगी जमिनींतील कुळाचा खोताचे विरुद्ध विरुद्धकबजा होणें शक्य आहे असें वाटतें.

कलम ९. —खोतांचे, धारेकऱ्यांचे आणि कच्या धारेकऱ्यांचे हक्क वारशानें प्राप्त होण्याजोगे आणि दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगे आहेत.

कोणते हक्क दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगे आहेत,

"निरंतरचे कुळवहिवाटीचे हक्क" वारशानें प्राप्त होण्याजोगे आहेत, परंतु खोताच्या संमतिशिवाय दुसऱ्या रीतीनें दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगे नाहींत; मात्र कोणत्याही प्रसंगीं, असा दुसऱ्यास प्राप्त करून देण्याचा हक्क मुलकी साल सन १८६५।६६ हें सुरू होण्याच्या लगत पूर्वीच्या तीस वर्षांच्या मुदतींतील कोणत्याही वेळीं खोताचे संमतीशिवाय स्वतंत्र रीतीनें आपल्या खात्याच्या जमिनीच्या संबंधानें चालविण्यांत आला आहे, असें कुळाकडून शाबीद करण्यांत येईल तर, अथवा कलम ११ अन्वयें खोतानें "निरंतरची कूळवहिवाट" दिलेली असून, ती तशी दुसऱ्यास प्राप्त करून देण्याचा हक्क खोत देईल तर, तो हक्क दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगा होईल असें समजावें.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, "निरंतरचे कुळास" खोताचे संमतीशिवाय एक वर्षाहून अधिक नाहीं इतक्या मुदतीचा पट्टा देण्याचा अधिकार आहे.

(हें कलम सन १९१२ चा मुं. आक्ट ८ कलम २ वरून दाखल केलें आहे.)

—जुनें कलम—

खोतांचे, धारेकऱ्यांचे आणि कच्या धारेकऱ्यांचे हक्क वारशानें प्राप्त होण्याजोगे आणि दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगे आहेत.

खातेदार कुळांचे हक्क वारशानें प्राप्त होण्याजोगे आहेत, परंतु दुसऱ्या रीतीनें दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगे नाहींत. मात्र कोणत्याही प्रसंगीं, कूळ

दुसऱ्यास प्राप्त करुन देण्याचा सदहूं हक्क मुलकी साल १८६५।६६ हें सुरू होण्याच्या पूर्वीच्या तीस वर्षांच्या मुदतींत कोणत्याही वेळीं, खोतांचे संमतीशिवाय स्वतंत्र रीतीनें, त्याच्या खात्याच्या जमीनीच्या संबंधानें चालविला आहे, असें शाबीद करील तर, अथवा कलम ११ अन्वयें खोतानें खात्याचा हक्क दिलेला असेल तेव्हां तो दुसऱ्यास तसा प्राप्त करून देण्याचा हक्क खोत देईल तर तो हक्क दुसऱ्यास प्राप्त करुन देण्याजोगा आहे.

## — टिपा —

**(१) उद्देश व मुख्य गोष्टीः—**

"**मालकीहक्क**" या शब्दानें वहिवाट करणें, विक्री करणें, वारशानें प्राप्त होणें, पट्ट्यानें देतां येणें, वगैरे हक्कांचा समुचय ध्यानांत येतो. हे हक्क खोती गावांत पूर्णत्वानें कोणास आहेत व संकुचित कोणाला आहेत व संकुचित असल्यास ते कोणत्या बाबतींत, याचा या कलमांत विचार केला आहे. खोती गावांत, खोत, धारेकरी, कच्चाधारेकरी, "निरंतरचीं" अथवा खातेदार कुळें, आणि सामान्यकुळें, इतके हक्कदारांचे प्रकार असतात. त्यापैकीं खोत, धारेकरी व कच्चाधारेकरी यांस मालकीला आवश्यक सर्व हक्क आहेत. कुळांचे बाबतींत मात्र निर्बंध घातलेले आहेत. लँ. रे. कोड कलम ७३ प्रमाणें सरकारी अथवा खालसा गांवांतील खातेदारांस आपल्या जमिनीचा वर्ग करण्याचा अधिकार देण्यांत आलेला आहे. व त्याच कलमांत वर्ग करण्याचा हक्क सरकारी हुकुमानें काढून घेण्याची सत्ता राखून ठेविलेली आहे. खोतीगावांत हा वर्ग करण्याचा अधिकार, पूर्वापारचे वहिवाटीमुळें, या कलमाचे जोरावर नियंत्रित केला आहे. सामान्यकुळास जरी वर्ग करण्याचा अधिकार असला तथापि तो अधिकार असून नसून सारखाच, कारण त्यास केव्हांही काढून टाकण्याचा खोतास हक्क आहे. (कलम ८ टीप ९ पहा). खातेदार अथवा "निरंतरचे कुळाचे" बाबतींत खोताचा जमिनीशीं खंड घेण्याव्यतिरिक्त कांहीं हक्क पोंचत नाहीं, परंतु खातेदार अगर निरंतरचे कुळास त्याचे संमत्तीशिवाय अगर दुसऱ्या अटी सांगितल्या आहेत त्या असल्याशिवाय वर्ग करतां येत नाहीं.

निरंतरचे अथवा खातेदारकुळास खालील गोष्टी असल्यास वर्ग करतां येतो—

(१) खोताची संमत्ती असल्यास;

(२) मुलकीसाल १८६५।१८६६ चे पूर्वींच्या तीस वर्षांत खोताचे संमत्तीवांचून आपल्या खात्यांतिल जमिनीचा वर्ग केला असें दाखवितां आल्यास;

(३) खोतानें खो. से. आक्ट कलम ११ प्रमाणें हक्क देऊन बनविलेल्या खातेदारास वर्ग करण्याचा अधिकार दिला असल्यास;

वर्ग करण्याचा अधिकार नसल्यास निरंतरचे अथवा खातेदारकुळास फक्त एक वर्षापुरता पट्टा करण्याचा हक्क आहे.

## (२) जुनें कलम आणि नवें कलम—

१८८० चे आक्टांतील कलमामध्यें १९१२ चा आक्ट ८ यानें फेरबदल झालेला असून पूर्वीच्या कलमामध्यें व हल्लींच्या कलमामध्यें थोडा फरक करण्यांत आला आहे. पूर्वी "खोताचे संमतीशिवाय" असे शब्द "दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगे नाहींत" या शब्दाचे पूर्वी नव्हते, ते नव्या कलमानें घातले आहेत. यामुळें महत्वाचा फरक असा झाला आहे कीं, पूर्वी कोणत्याहि परिस्थितींत वर्ग करण्याचा अधिकार नव्हता तो नवीन कलमांप्रमाणें खोताच्या संमतीनें प्राप्त होणें शक्य झालें आहे. याशिवाय नवीन कलमांतील विशेष ठरावानें एक वर्षापुरता पट्टा करण्याचा निरंतरचे कुळास हक्क देण्यांत आला आहे. पूर्वीच्या कलमांत ही सवलत नव्हती. या महत्वाच्या सर्व सुधारणा येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१ या ठरावामुळें घडवून आणण्यांत आल्या. कलम ९ मधील या सुधारणांचा विशिष्ट परिणाम कलम १० मध्यें दिला आहे

## (३) वारशानें प्राप्त होण्याजोगे आहेत—

वारशानें खात्याचा हक्क प्राप्त होणें म्हणजे खातें कायदेशीर हक्कसंबंधीं नातेवाईक वारसाकडे जाणें होय. ज्याप्रमाणें खातेदाराचा धर्म असेल त्या धर्मशास्त्रांप्रमाणें त्याचे वारस कोण हें पहावयाचें असतें. खातेदार हिंदु असल्यास हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें, मुसलमान असल्यास मुसलमानधर्मशास्त्राप्रमाणें वारस ठरवावयाचे असतात. खातेदार मयत झाल्यानंतर त्याचे कायदेशीर वारसांचें, अगर इतरांच्या कबुलीनें एकाचें, नांव मयत खातेदाराऐवजीं योग्य तो पुरावा घेऊन दाखल केलें जातें, व खातेदाराचे सर्व हक्कसंबंध व जबाबदाऱ्या नवीन खातेदारावर येतात. वारसांबद्दलची माहिती परिशिष्टांत दिली आहे ती पहा.

## (४) खातेदार कुळास वर्ग केव्हां करतां येतो—

कलम ९ प्रमाणें खातेदारास खोताचे संमत्तीशिवाय आपल्या खात्यांतलि जमिनीचा वर्ग करण्यास एका बाबतींत सवड ठेविलेली आहे. खातेदार कुळानें जर असें शाबीत केलें कीं– (१) खात्यांतलि जमिनीचा वर्ग "स्वतंत्र रीतीनें" झालेला आहे. (२) असा वर्ग १८६५।६६ हें मुलकी साल सुरु होण्याचे पूर्वी ३० वर्षांचे आंत म्हणजे १८३५।३६ चे मुलकी साल सुरू झालें त्या नंतर केलेला

आहे. (३) असा वर्ग कोणत्याही प्रकारें खोतांची संमती न घेतां झालेला आहे,—तर त्यास वर्ग करण्याचा हक्क प्राप्त होतो. वर्ग म्हणजे कोणत्या प्रकारचा हें या कलमांत कोठेंही सांगितलेलें नाहीं. परंतु आजपर्यंतच्या एकंदर ठरावांकडे दृष्टी दिल्यास वर्ग या शब्दानें खरेदी, गहाण, एकवर्षापेक्षां जास्त मुदतीचा पट्टा, वगैरे हरएक प्रकारच्या व्यवहारांचा समावेश होतो. १८६५।६६ च्या मुलकी सालापूर्वीं वर्ग झाला होता किंवा नाहीं हें ठरविणें कठीण आहे. तथापि खातें वर्ग करण्यास पात्र आहे किंवा नाहीं याबद्दल खोती आक्टानंतर जी पहाणी झाली त्यावेळीं चौकशी झाली असून त्याप्रमाणें खातें वर्ग करण्यास पात्र आहे, किंवा नाहीं याबद्दलचे बोटखतास शेरे झाले आहेत. खोती सेंट्लमेंट आक्ट **कलम २० पोट क. १ (अ)** प्रमाणें हा शेरा निर्णायक व अखेरचा पुरावा असेंही ठरविण्यांत आलें आहे. त्यामुळें ज्या खात्यांबद्दल बोटखताचे वेळीं शेरा मारण्यांत आला आहे, त्यांविरुद्ध आतां कांहीं पुरावा करितां येणें शक्य नाहीं. ज्या ठिकाणीं अशी चौकशी होण्याचें राहून गेल्यानें कांहींच शेरा नसेल त्या वेळीं वर्ग करण्यास पात्र आहे किंवा नाहीं अशाबद्दचा पुरावा देतां येईल.

## (५) बेकायदा वर्ग कोणते—

कलम ९ प्रमाणें खातेदार कुळाचे बाबतींत वरील टिपेंत सांगितलेल्या विशिष्ट अटी शिवाय करून आपला हक्कसंबंध (interest) वर्ग करणें बेकायदेशीर सांगितलें आहे. खातेदारांचा हक्कसंबंध ह्मणजे काय याचा खुलासा न्या. बॅटि यांनीं **येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१ = ३० मुं. २०१** या ठरवांत केला आहे. " कायद्यानें ठरलेला खंड देत असतां (१) खंडवाढ करितां न येतां, आणि (२) कालगतीनें अयर नोटीस देऊन काढतां न येतां सत्ताप्रकार सुरक्षित (कायम) रहाणें हे हक्क होत. आणि साधे कुळाचे हक्काबाहेर हे जे खातेदाराचे हक्क यांसच वर्ग करण्याचे बाबतींत निर्बंध घातलेला आहे. याप्रमाणें विचार केल्यास कलम ९ स बाध न आणतां कायमच्या खातेदार कूळहक्काव्यतिरिक्त दुसऱ्यास नुसता उपभोग घेऊं देण्यास हरकत नाहीं. त्यास खंड वाढ न होणें व नोटीसीनें काढून टाकतां न येणें हे हक्क मात्र देतां येणार नाहींत."* (क० ५ टी. ४ पहा).

या विचारसरणीप्रमाणें खालील वर्ग बेकायदेशीर मानिले आहेत:—

(१) खरेदीखत, महादेव वि. महादाजी १३ मुं. लॉ. रि. ११५७.

(२) कबजेगहाणखत.

---

* "Those rights are the security of tenure on the payment of statutory rent which exempts them from liability (i) to enhanced rent and (2) to a determination of tenancy

(३) तारणगहाणखत—वासु वि. माधवराव २४ मुं. लॉ. रि. ११६०.
(४) कोर्ट मार्फतची विक्री, महादेव वि. महादाजी १३ मुं. लॉ. रि. ११५७.
(५) एक वर्षापेक्षां जास्त वर्षाची कबुलायत, रजिस्टर अगर अनरजिस्टर.
(६) इतर खोतहिस्सेदारांची समती न घेतां एकाच खोताला दिलेला राजिनामा श्रीधर वि. बाबाजी १६ मुं. लॉ. रि. ५८६.
(७) मोबदल्यासह राजिनामा, श्रीधर वि. बाबाजी;

**(६) हें कलम गतकालसापेक्ष नाहीं—**

खोती सेटलमेंट आक्ट हा ६ मे १८८० रोजीं अंमलांत आला व त्यांत जुनें कलम ९ घालण्यांत आलें. त्याचे पूर्वीं सर्वेसेटलमेंट आक्ट १८६५ चा आक्ट १, हा लागू असून त्यांतील ३८ व्या कलमामध्यें "पूर्वीं असा हक्क नसेल तर कुळास गहाण खरेदी वगैरे करण्याचा अधिकार नाहीं"† असा उल्लेख आहे, यावरून या "कलमांत १८६५।६६ च्या पूर्वीं तीस वर्षें वर्ग केला असें दाखवितां येत नसेल तर" अशी अट घालण्यांत आली आहे. १८८० च्या आक्टाच्या ९ व्या कलमामध्यें सन १९१२ चा आक्ट ८ यानें सुधारणा करण्यांत आली व या सुधारणेचा अंमल २९।६।१९१२ पासून सुरु झाला.

कायद्याचा अंमल कोणत्या रीतीनें करावयाचा हें पूर्वीं सांगितलेंच आहे-(पान ४।५ पाहा). तेथें सांगितल्याप्रमाणें कोणत्याही कायद्याचा, तसा त्या कायद्यांत स्पष्ट उल्लेख नसेल तर, गतकालावर अंमल करूं नये असा नियम आहे. हें तत्व या कलमालाही लागू आहे असें ना. हायकोर्टानें ठरविलें आहे. विनायक वि. बाबाशाबुद्दीन १३ मुं. ३७३ या ठरावांत सर. न्या. सार्जंट यांनीं असें ह्मटलें आहे कीं "कलम ९, सबजज्यांचे ह्मणण्याप्रमाणें गतकालसापेक्ष नाहीं." त्याच-

---

by efflux of time or on notice given. It is these rights alone which Sec 9 declares to be non-transferable save by inheritance. Prohibition then is only as to the transfer of the occupancy right distinctive of an occupancy tenant and leaves untouched the right of ordinary tenancy. The occupancy tenant can therefore without infringing Sec 9 allow another to enjoy such of his rights as involve no transfer of the permanent occupancy on the statutary rental.' What he cannot give is his immunity from enhanecment and ejectment on three months' notice."

† "But this limitation of demand on the tenant shall not confer on him any right of transfer by sale, mortgage or otherwise, where such did not exist before."

प्रमाणें जयराम वि. नारायण ५ मुं. लॉ. रि. ६५२ या ठरावांत न्या. चंदावरकर यांनींही "हें कलम गतकालसापेक्ष नाहीं" असें ठरविलें आहे. हेंच धोरण दामोदर वि. वासुदेव २२ मुं. लॉ. रि. १०२ यांत गृहित मानण्यांत आलें आहे. यावरून या कलमाची बजावणी करतांना हें कलम अगर कलमांतील दुरुस्ती केव्हां अंमलांत आली हें पाहून त्याप्रमाणेंच अंमलबजावणी केली पाहिजे.

### (७) वर्ग करण्याचा अधिकार व शिरस्ता—

खोताचे संमत्तीवांचून वर्ग करण्याचा शिरस्ता असणें शक्य नाहीं. श्रीधर वि. बाबाजी १६ मुं. लॉ. रि. ५८६ या ठरावांत न्या. बीमन यांनीं लिहिण्याच्या ओघांत असें ह्मटलें आहे कीं, "विशेष महत्वाचे अटीचा विचार करावयाचा ह्मणजे खोताची संमत्ती घेतली आहे किंवा नाहीं, कारण हा वर्ग खोताचे संमत्तीशिवाय वर्ग करण्याचा शाबीद झालेला एखादा शिरस्ता असल्यामुळें कायदेशीर होऊं शकतो असें ह्मणणें नाहीं."

या ठरावांत "शिरस्ता" असा जो शब्द वापरला आहे त्याचा अर्थ कलमांत सांगितल्याप्रमाणें १८६५ चे पूर्वीं ३० वर्षांत वर्ग केला असल्यास त्यानें प्राप्त झालेला हक्क होय. या व्यतिरिक्त कोणताही शिरस्ता वर्ग करण्याचे बाबतींत अधिकार प्राप्त करून देऊं शकत नाहीं. कारण एक तर अशा तऱ्हेचा खोती गांवांत शिरस्ता असणेंच शक्य नाहीं व दुसरें, कोणत्याही पास झालेल्या कायद्याविरुद्ध शिरस्त्याचा कांहीं उपयोग नाहीं, असे ना. हायकोर्टाचे ठरावही आहेत. मोहनलाल वि. अमृतलाल ३ मुं. १७४.

### (८) खोताची संमति कोणत्या स्वरूपाची पाहिजे—

या कलमांत खोताची संमति पाहिजे इतकेंच सांगितलें आहे. ती लेखी अगर रजिस्टर पाहिजे असा कांहींच निर्बंध घातलेला नाहीं. त्यामुळें खोताची संमति, तोंडी, लेखी, मोबदल्याची अगर बिनमोबदल्याची, कशीहि असली तरी चालेल. वर्ग करतांना गहाण खरेदी वगैरे खतांवर खोताची साक्ष असल्यास तेवढ्यावरून त्याची संमति आहे असें गृहीत मानतां येत नाहीं. त्या विशिष्ट व्यवहारास संमति असल्या-

---

* "The essential condition which we have to consider is whether the consent of the khot was obtained, for it is not alleged that this transfer could be validated on the ground of any custom proved, authorising a tenant so to alienate his occupancy rights without the consent of the khot."

बद्दलचा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. साधे पत्रावर, चिठीवर वगैरे लिहिलेली संमत्ति असल्यासही हरकत नाहीं.

(९) कुळाच्या संमतीचें कारण नाहीं—

वर्ग करण्यास ज्याप्रमाणें खोताची संमति पाहिजे, त्याप्रमाणें खात्यांतील जमिनी वर्ग करतांना कुळाची संमति घेण्याचें कारण नाहीं. खोतानें कुळावरील पैशाच्या निवाड्यावरून दरखास्त देऊन खातें अगर खात्यांतील जमिनी लिलांवास काढल्या व त्याची विक्री केली, अशा वेळीं कुळाची संमति घेण्याचें कारण नाहीं, असा ना. हायकोर्टानें स्पष्ट ठराव केला आहे. **कृष्णाजी वि. विनायक दु. अ. नं. ११५ सन १९२३ नि. ता. १४।१।१९२४** या ठरावांत **न्या. मॅक्लिऑड आणि शहा** यांनीं असें ठरविलें आहे कीं " सर्व खोती हिस्सेदारांची संमत्ती मिळाल्यानंतर कलम ९ प्रमाणें खातें वर्ग करण्यास पात्र होतें हें अगदीं निश्चित आहे. वर्ग योग्य होण्यास कुळानें संमत्ती दिलीच पाहिजे असें नाहीं. "* यावरून कुळाने संमत्तीचे कांहींएक कारण नाहीं हें उघड आहे.

(१०) संमत्ती देण्याचा अधिकार कोणत्या खोतास आहे—

"खोताची संमत्ती" असा उल्लेख कलमांत आहे. खोत या शब्दानें सर्व खोत हिस्सेदार असा अर्थ ध्वनित आहे; व त्यामुळें सर्व १६ आणे खोत हिस्सेदारांची संमत्ती पाहिजे. तुटक घडे पडले असतील त्यावेळीं घडेवाल्या खोतहिस्सेदारांची संमत्ती पाहिजे, असें पूर्वीं स्पष्ट मत होतें, व त्याप्रमाणें खोतांच्या संमत्तीचा प्रश्न आला असतां सर्व खोतांची संमत्ती पाहिजे असें धोरण ठेविलेलें होतें. **श्रीधर वि. बाबाजी १६ मुं. लॉ. रि. ५८६** या ठरावांत कुळानें खोतांपैकीं एकास राजिनामा दिला. राजिनाम्याला मोबदलाही पोंचलेला होता. पुढें खोत आणि कूळ यांच्यामध्यें वाद उपस्थित होऊन प्रकरण ना. हायकोर्टकडे गेलें. त्यांत हा राजिनामा उर्फ खरेदी योग्य नव्हे अशी तक्रार होती. **न्या. बमिन** यांनीं आपल्या ठरावांत असें म्हटलें आहे कीं, "असें कबूल करण्यांत आलें आहे कीं, आणखी खोत असून त्यांच्या कबुलीची आवश्यकता आहे. ही कबुली घेतलेली होती हे सूचितही केलेलें नाहीं. अशा वेळीं कलम ९ प्रमाणें हा व्यवहार बेकायदेशीर ठरतो." या ठरावांत एका खोताशींच व्यवहार असतां इतर

---

* "It is quite clear that when the khot sharers gave their consent to the sale, the occupany rights became transferable under Sec. 9 of K. S. Act and it was not essential in order to make the property transferable that the tenants should give their consent."

खोतांची समत्ती नाहीं, या तत्वावर वर्ग बेकायदेशीर मानण्यांत आला आहे. परंतु इब्राहीम वि. कृष्णाजी २६ मुं. लॉ. रि. ४२१ या ठरावांत सर न्या. मॅक्लिऑड यांनीं अशी संमत्ती देण्याचा अधिकार वहिवाटदार खोतास आहे असें ठरविलें आहे. ते आपल्या ठरावांत लिहितात, "विरुद्ध बाजूकडून सर्व खोत हिस्सेदारांची संमत्ती पाहिजे अशी तक्रार करण्यांत आली आहे. या ह्मणण्याप्रमाणें स्थिती आहे असें मानल्यास निरंतरचे कुळास वर्ग करण्याची बहुतेक मुभा मिळणारच नाहीं, कारण सर्व खोत हिस्सेदारांचा सल्ला सर्वसाधारणपणें मिळणेंच शक्य नाहीं. वहिवाटदार खोताच्या नेहमींच्या कर्तव्यांमध्यें निरंतरचे कुळास वर्ग करण्यास द्यावयाचे संमत्तीचा समावेश कां करूं नये हें कांहीं कळत नाहीं. ( कलम २६ उध्दृत करून ) तेव्हां यावरून त्यास निरंतरचे कुळास वर्ग करण्यास संमत्ती देण्याचा हक्क आहे." ही संमत्ती ज्या सालीं वर्ग केला त्याच सालच्या वहिवाटदार खोताची असणें आवश्यक आहे.

## (११) संमत्ती केव्हां घेतली पाहिजे—

या कलमाच्या भाषेवरून संमत्ती कोणत्याही व्यवहाराचे पूर्वीं घेतलेली पाहिजे हें स्पष्ट होत आहे. व्यवहार झाल्यानंतर संमत्ती घेतल्यास त्यामुळें व्यवहार योग्य ठरणेंच शक्य नाहीं. महादेव वि. महादाजी १३ मुं. लॉ. रि. ११५७ या ठरावांत न्या. चंदावरकर यांनीं "कलम ९ यांत व्यवहारानंतर दिलेल्या संमत्तीस कोठेंच जागा नाहीं" असें ह्मटलें आहे. या ठरावाप्रमाणेंच, वासुदेव वि. लक्ष्मण दु. अ. ४७१ सन १९०९ नि. ता. ८।३।१९१० गोविंद वि. बाबाजी दु. अ. २८४ सन १९०६ नि. ता. २७।८।१९०७ त्यांतही मागाहून घेतलेली संमत्ती कांहीं उपयोगाची नाहीं असें ठरविण्यांत आलें आहे.

## (१२) कोर्टमार्फत लिलांव—

कोर्टमार्फत खातेदाराचे जमिनीचे लिलांव होण्यापुर्वीं खोताची आगाऊ संमत्ती नसल्यास अशा वर्गासही बाध येतो, असें याच कलमानें ठरलेलें आहे. दत्तात्रय वि. निळो १८९८ प्रिं. ज. ३७८ या ठरावांत न्या. पार्सन्स आणि रानडे यांनीं "खोताची संमत्ती नसल्यास खातेदाराच्या जमिनी कोर्टमार्फत विकल्या गेल्या तथापि अशी विक्री रद्द व बातल आहे, आणि त्यावरून लिलांवदाराला कबजा करण्याचा हक्क व अधिकार नाहीं" असें ठरविलें आहे. महादेव वि. महादाजी १३ मुं. लॉ. रि. ११५७ या ठरावांत "'दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगे नाहींत' ( shall not )या शब्दांचा अर्थ मोठा असून त्यावरून खातेदारांचे हक्क विकले जाणें शक्य नाहीं असा कायद्याचा हेतू आहे, असें स्पष्ट होत आहे. आणि ही गोष्ट खासगी खरेदीस जितकी लागू आहे, तितकीच कोर्टमार्फतचे विक्री-

सही लागू आहे" असें ठरविलें आहे त्याचप्रमाणें **आत्माराम वि. बालाजी २५ मुं. लॉ. रि. १०३२** या ठरावांतही हेंच तत्व गृहीत मानलें आहे.

या ठरावांवरून कोर्टमार्फत विक्री झाली तथापि खोताच्या संमत्तीशिवाय ती रद्द बातल आहे हें अगदीं निश्चित झालें आहे. परंतु एका बाबतींत मात्र थोडी सबड **पुरुषोत्तम वि. काशिदास १७ मुं. ६७७** या ठरावांत ठेवली असून, "दाव्याच्या गहाणखताला खोताची संमत्ति असल्यामुळें व लिलांव होणें हें अगदीं ओघानेंच प्राप्त असल्यामुळें अशा गहाणाचे निवाड्यावरून झालेली विक्री योग्य आहे", असें ठरविण्यांत आलें आहे. यावरून मुळचे गहाणाचे व्यवहारास योग्य संमत्ति असल्यास त्या गहाणाचे परिणामासही संमत्ती आहे असें समजावयास हरकत नाहीं.

## (१३) एका विशिष्ट व्यवहारास संमत्ति मिळाल्यास पुढील व्यवहारांस पुन्हां संमत्ति घेतली पाहिजे—

या कलमाचा अर्थ एकदां संमति घेतली म्हणजे मग वाटेल तेवढे व्यवहार करावे असा नाहीं. वाटेल तितके व्यवहार करण्यास संमत्ति घेतली असल्यास मग मात्र पुन्हां घेण्याचें कारण नाहीं. परंतु एका विशिष्ट व्यवहारासच संमत्ति घेतली असल्यास त्या व्यवहारावरून होणाऱ्या परिणामापर्यंतच त्याचा उपयोग असतो, जास्त कांहीं उपयोग नाहीं. **पुरुषोत्तम वि. कालिदास १७ मुं. ६७७** या ठरावांत **न्या. क्यांडी** यांनीं असें म्हटलें आहे कीं—"खरेदीदारांस मुळच्या कुळांपेक्षां कांहीं जास्त हक्क नसतो आणि म्हणून त्याला आणखी वर्ग करतां येत नाहीं. संमत्तिही फक्त पहिला व्यवहार आणि त्याचे आवश्यक परिणाम एवढ्यापुरतीच आहे. विशिष्ट व्यवहाराला संमत्ति दिली असें मानिलें आणि त्याचा आवश्यक परिणाम म्हणून त्या गहाणखतावरून फिर्याद झाली आणि त्या निवाड्यावरून कोर्टमार्फत विक्री झाली एवढ्यावरून आणखी वर्ग करण्याचा अधिकार पोंचत नाहीं."

## (१४) १८८० च्या, त्याचप्रमाणें १९१२ पूर्वीच्या, व्यवहाराचे परिणाम—

हें कलम गतकालसापेक्ष ( retrospective ) नाहीं हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तेव्हां १८८० मध्यें खोती सेटलमेंट आक्ट पास होण्यापूर्वीचे व्यवहारांचा परिणाम काय, हें नीट ध्यानांत आणलें पहिजे. १८८० च्या आक्टापूर्वीं १८६५ चा आक्ट १ हा लागू असून त्यांतील कलम ३८ मध्यें "पूर्वीं ज्या ठिकाणीं नव्हता त्या ठिकाणीं कुळाला खरेदी गहाण वगैरे करण्याचा अधिकार येत नाहीं" असें ठरलें आहे. यामध्यें संमत्ति घ्यावी, अगर संमत्ति घेतली असतां व्यवहार योग्य होतो असा उल्लेख नाहीं. त्यामुळेंच १८८० च्या पूर्वीच्या वर्गाचे बाबतींत संमत्तीचा प्रश्नच येत नाहीं. १८८० च्या आक्टांतील कलम ९ मध्यें संमति पाहिजे असें घालण्यांत आलें असल्या-

मुळें १८८० च्या पूर्वीच्या व्यवहाराला संमति पाहिजे असें ह्मणतां येत नाहीं. तसा वर्ग करण्याचा हक्क पूर्वीच बजावलेला असला ह्मणजे झालें. **जयराम वि. नारायण** ५ मुं. लॉ. रि. ६५२ यांतील न्या. **चंदावरकर** यांचे ठरावांत "१८७१ मध्यें कांहीं अटींवर वर्ग करतां येत होता ही गोष्ट नाकबूल नाहीं. तक्रार फक्त एवढीच आहे कीं प्रतिवादीनें, कुळाचे बापानें, वर्ग करण्याचा हक्क मिळविला होता किंवा काय हें दाखवितां येत नाहीं. कुळाला कांहीं झालें तरी खोताच्या संमत्तीनें योग्य प्रकारें वर्ग करतां येत होता, आणि असें जर आहे तर गहाणदाराचे विरुद्ध तो अगर त्याचे वारस यांस "एस्टॉपेल"च्या तत्वाप्रमाणें अशी संमत्ती घेतली नव्हती असें ह्मणतां येत नाहीं. १८७१ मध्यें गहाणाचा व्यवहार झाला असल्यामुळें त्यास कलम ९ लागू पडत नाहीं." असें ठरलें आहे

**येसा वि. सखाराम** ७ मुं. लॉ. रि. ९४१ या सुप्रसिद्ध ठरावांत न्या. बॅटि यांनीं असें ह्मटलें आहे कीं कलम ९ प्रमाणें "वर्ग करण्याचा कोणताही प्रयत्न रद्द बातल (null & void) आहे. वर्ग करून घेणारास कलम ९ प्रमाणें खोता-विरुद्ध या व्यवहारानें हे हक्क प्राप्त झाले असें ह्मणतां येणार नाहीं." या ठरावावरून २९ जून १९१२ पूर्वीचा व्यवहारच फक्त रद्द बातल ठरतो व त्याचा कूळहक्कावर कांहीं परिणाम घडत नाहीं. न्या. बॅटि पुढें ह्मणतात "कलम ९ मध्यें असें कांहीं नाहीं कीं ज्यामुळें खातेदार कूळहक्काचा अनधिकारी बेकायदा वर्ग केल्यानें शेवट होतो."

**दामोदर वि. वासुदेव** २२ मुं. लॉ. रि. १०२ या ठरावांतही असाच प्रश्न होता. या ठरावांतील तारखाहि फार महत्वाच्या आहेत. १२ जानेवारी १९१२ रोजीं खातेदार कुळानें खोताचे संमत्तिवांचून प्रतिवादी नं० १ यास आपलें खातें विकलें. मे १९१२ मध्यें प्रतिवादी नं० २ यानें राजिनामा दिला, व प्रतिवादी नं० १ यानें रेव्हेन्यूकामगारांचे पुढें त्या जमिनीबद्दल कबुलायत दिली. खोती आक्टामध्यें २९ जून १९१२ रोजीं दुरुस्ती झाली. खोतानें १९ जुलै १९१५ ला आपली संमत्ति न घेतल्यानें वर्ग बेकायदेशीर आहे, करितां खातें खालसा झालें असा ठराव होण्या-करितां दावा आणिला. यावर ठराव लिहिला त्यांत सर न्या. मॅक्लिऑड यांनीं **येसा वि. सखाराम** ७ मुं. लॉ. रि. ९४१ या ठरावावर भर देऊन पुढें असें ह्मटलें आहे कीं,—"हा दावा १८८० चा आक्ट सुधारण्यापूर्वीच उत्पन्न झालेला आहे. पूर्वीच्या कायद्यांत, ज्यामुळें खातेदार कुळानें आपलें सर्व हक्क वर्ग केल्यास त्याचे सर्व हक्क अजिबात नष्ट होतात असें कांहींएक नाहीं. हें फक्त नवीन कल-मांत गोवलेलें आहे. याप्रमाणें इतकें स्पष्ट आहे कीं, न्या. बॉटे यांनीं ७ मुं. लॉ. रि. ९४१ मध्यें ठरविल्याप्रमाणें १८८० च्या आक्टांत बेकायदा वर्गाचा

कांहीं अमुक एक परिणाम घडतो असें दिलेलें नसून तो व्यवहारच केवळ रद्दबातल आहे असें ठरविणें इतकाच त्याचा परिणाम होतो." शेवटीं या दाव्यांत प्रतिवादी नं० १ याचा व्यवहार रद्दबातल असला तथापि मुळचीं कुळें, प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे हक्क कायम राहतात असें ठरविलें आहे. या ठरावाचे शेवटीं सर न्या. मॅक्लिऑड यांनीं असें म्हटलें आहे कीं, "असले व्यवहार झाले असले तथापि खोताचे कुळाविरुद्ध सर्व हक्क अबाधित राहतात." यावरून इतकें स्पष्ट होतें कीं, बेकायदा वर्ग जर २९ जून १९१२ पूर्वींचा असेल तर तो व्यवहारच फक्त रद्द बातल असून बाकी कुळाचा हक्क कायम रहातो, त्याचप्रमाणें खोत आणि कूळ यांचे दरम्यानचे हक्कही अबाधित राहातात. २९ जून १९१२ नंतरचे व्यवहारानें मात्र खातें खालसा करण्याचा हक्क खोताला पोंचतो.

**माधवराव वि. कृष्णाजी** २४ मुं. लॉ. रि. १३१ या फारच महत्वाचे ठरावांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, १९१३ च्या दुरुस्तीनें खात्यांतील जेवढ्या जमिनीचा बेकायदा वर्ग केलेला असेल तेवढ्याच जमिनी खालसा होतात. सर्व खातें खालसा होत नाहीं. (कलम १० खालीं पहा).

## (१५) कुलाबा जिल्ह्यांतील कुळांसही खोताचे संमत्तीशिवाय वर्ग करितां येत नाहीं—

कुलाबा जिल्ह्यांतील ज्या गांवास हा कायदा लागू नाहीं अशा खोती गांवांत सुद्धां हेंच तत्व ग्राह्य मानलें आहे. कुलाबा जिल्ह्याला अद्यापही १८६५ चा आक्ट १ मधील कलमें ३७-३८ लागू ठेवण्यांत आली असून कलम ३८ मध्यें, वर्ग करण्याचा अधिकार कुळास प्राप्त होत नाहीं, असें स्पष्ट ठरविलेलें आहे. याच कलमाचे जोरावर **नागरदास वि. गानु** १८९१ प्रिं. ज. १०७ या ठरावांत न्या. **जार्डिन्** आणि **पार्सन्स** यांनीं असें ठरविलें आहे कीं "जर कोणतेंही कूळ बिगरपरवाना आपल्या जमिनी विकील व त्याकरितां खरेदीदारास कबजा सोडून देईल तर खरेदीदारास काढून टाकण्याचा खोतास हक्क आहे." "अशा रीतीनें खरेदी करणें म्हणजे खोताचे हक्क घालवणें असल्यामुळें खोतास कबजा करण्याचा हक्क आहे" असें **बळवंत वि. विष्णु** दु. अ. १८६ सन १९११ नि. ता. १।२।१९१२ यांत ठरविलें आहे. **हरि वि. गंगाधर** १८ मुं. लॉ. रि. ४४६ या ठरावांत कुलाबा जिल्ह्यांतील खातेदार कुळानें जर खोताचे संमत्तीशिवाय वर्ग केला तर वर्ग घेणाराच्या हक्काचा विचार न करितां जमिनी आपले ताब्यांत घेण्यास खोतास हरकत नाहीं असें ठरविलें आहे. **सर न्या. स्कॉट** यानीं आपल्या ठरावांत असें म्हटलें आहे कीं "१८८० चा कायदा पास होण्यापूर्वीं कोणताही खोत केवळ जमीनमहसूल

वसूल करणारा होता, कारण त्याला अमुक एक महसूल सरकारला देणें भाग होतें, असें जरी मानलें तरी ज्या खातेदार कुळांस त्या महसुलाचा कांहीं-तरी भाग देणें असतें त्यानें जर आपली जमीन खोताला पसंत नाहीं, अशा मनुष्यांस दिली तर खोताचा उपाय इतकाच कीं, त्यानें त्या जमिनी-वर जाऊन सर्व पीक आपणच गोळा करून सरकार देणें वारावें." या ठरावा-प्रमाणेंच **गोपाळ वि. भागीरथी २० मुं. लॉ. रि. ६८१** या ठरावांत **न्या. बॅचेलर** यांनीही असेंच ठरविलें असून हें तत्व सर्व कुलाबा जिल्ह्याला लागू आहे असें ठरविलें आहे. या बाबतींत अगदीं अलीकडील ठराव **पुरुषोत्तम वि. गणपती २८ मुं. लॉ. रि. ७५०** हा असून तो फारच महत्वाचा आहे. या ठरावांत गांव जप्तींत असला तरी खोताला आपल्या संमतीशिवाय वर्ग केल्यानें जमिनीचा कबजा मागणेचा हक्क आहे. गांव तात्पुरता जरी जप्तींत असला तरी त्यामुळें गांवची वसूल करण्याव्यतिरिक्त वर्ग करण्यास संमत्ती देणें वगैरे जे हक्क आहेत ते अबा-धित राहतात, असें ठरविलें आहे. या ठरावांत **न्या. फॉसेट** यांनीं मागील पुष्कळ ठरावांचा सांगोपांग विचार केला असल्यामुळें त्यांचा ठराव फारच महत्वाचा आहे. आतां खोती जमिनींतील खातेदार कुळास आपल्या जमिनींचा वर्ग खोताचे संमत्ती-शिवाय करितां येत नाहीं, हें तत्व अगदीं निश्चित झालें आहे.

### (१६) पुराव्याचा बोजा—

जमीन वर्ग करण्यास पात्र आहे हें दाखविण्याचा पुराव्याचा बोजा खोती सेटल्मेंट आक्ट जेथें लागू आहे तेथें कुळावर आहे, हें अगदीं कलमावरूनच स्पष्ट आहे. कलमावरून पुराव्याचा बोजा वर्ग करण्याचा आपणास अधि-कार आहे, असें ह्मणणाऱ्या कुळावर आहे व त्यानें काय शाबीद केलें पाहिजे हेंहि त्यांत सांगितलें आहे. पुराव्याचा बोजा कोणावर आहे या बाबतींत **पुराव्याचा आक्ट, १८७२ चा १, कलमें १०२, १०३ १०४** हीं अगदीं स्पष्ट आहेत. **कृपामोई वि. दुर्गा १९ कलकत्ता ८९** या ठरावांत वर्ग करण्याचा अधिकार आहे असें म्हणणाऱ्या प्रतिवादीवर पुराव्याचा बोजा आहे असें ठरविणेंत आलें आहे. याबाबतींत **पुरुषोत्तम वि. गणपती २८ मुं. लॉ. रि. ७५०** हा अलीकडील ठराव फार महत्वाचा असून त्यांत असें ठरविणेंत आलें आहे कीं, "कुलाबा जिल्ह्यांतील खोतनिसबत जमिनीचे बाबतींत वर्ग करण्यास खोताची परवानगी पाहिजे हें कायद्याचें अनुमान असून वर्ग करण्याचा अबाधित शिरस्ता असल्याचें जो म्हणतो त्याचेवर पुराव्याचा बोजा आहे." हा ठराव जरी कुलाबा जिल्ह्यांतील असला तरी त्यांतील ठराविक तत्व खोती गांवास सार्वत्रिक लागू आहे. वर्ग करण्याचा कोणत्याही सबबीवर हक्क आहे असें कुळाचें ह्मणणें असेल तर पुराव्याचा बोजा त्या कुळावरच असतो.

**(१७) कायम खंडचिठ्ठीनें धारण करणाऱ्या कुळास हें तत्व लागू नाहीं—**

कायम खंडचिठ्ठीच्या आधारें ज्या कुळांस कायमपणा आलेला असतो, तीं कुळें व निरंतरचीं अथवा खातेदार कुळें यांत फरक आहे. अशाप्रकारें कायम झालेल्या कुळास हें कलम लागू नसून त्यास वर्ग करण्याचा हक्क पोंचतो किंवा नाहीं हें कबुलायतींतील करारावर अवलंबून राहील. कबुलायतींतील "आपण पुत्रपौत्रादि वंशपरंपरनें उपभोग घ्यावा" या शब्दांनीं वर्ग करण्यास पात्र नाहीं असा अर्थ होत नाहीं असें प्रिव्ही कौन्सिलनें **राजानारसिंग वि. रामकैलासनाथ** ९ मूर्स इं. अ. ५५ यांत ठरविलें असून, त्यास अनुसरून **विनायक वि. बाबाशाबुद्दीन** १३ मुं. ३७३ या ठरावात ना. हायकोर्टानेंहि "निरंतरची कबुलायत असून तींत वर्ग न करण्याबद्दल कांहीं करार नाहीं, गांवशिरस्ता असल्याबद्दलचा पुरावा दिलेला नाहीं, १८८० च्या खोती आक्टावरून अशा प्रकारचा कांहीं शिरस्ता आहे असें अनुमान निघत नाहीं, अशा परिस्थितींत वर्ग करण्यास पात्रता आहे असें खास दिसतें" असें ठरविलें आहे. तेव्हां कायम खंडचिठीच्या आधारें झालेल्या निरंतरचे कुळास कलम ९ ची बाधा नाहीं हें उघड आहे.

**(१८) वर्ग करण्याचे बाबतींतील बोटखतांतील शेरा—**

खोती से. आक्टाचे कलम २० पो. क. १ (अ) प्रमाणें निरंतरच्या कुळांचा हितसंबंध वारशाशिवाय इतर रीतीतें दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगा आहे किंवा नाहीं याबद्दलचा बोटखताचा शेरा अगदीं निर्णायक व अखेरचा (final and conclusive) पुरावा होय. याकरितां ज्या ठिकाणीं असा शेरा असेल त्या ठिकाणीं त्या शेऱ्याचे विरुद्ध कोणासही कसलाही पुरावा करितां येणार नाहीं.

**(१९) रेस्ज्युडिकेटा—**

दि० का० कलम ११ प्रमाणें एकदां ज्या मुद्याचा निकाल लागला तोच मुद्दा पुन्हां उपस्थित करतां येत नाहीं; एकदां निर्णित झालेली गोष्ट पुन्हां विचारांत घेतां येत नाहीं, हें तत्व कलम ९ चे बाबतींतही लागू आहे. **काशिनाथ वि. धोंडशेट** १८ मुं. लॉ. रि ७८६ या ठरावांत निरंतरचे कुळानें ह्मणजे निवाड्यांतील रिणकोनें आपली जमीन वर्ग होण्यास पात्र आहे असें कबूल करून विक्रीला काढूं दिली व त्याप्रमाणें लिलांव होऊन एकानें मिळकत खरेदी घेतली. त्यानंतर त्याच रिणकोनें पुन्हां लिलांव झालेली मिळकत विक्रीस पात्र नाहीं, करितां तिचा कबजा आपणास मिळणेकरितां दावा केला. तेव्हां रेस्ज्युडिकेटाच्या तत्वाप्रमाणें असें त्यास करतां येत नाहीं असें ठरविण्यांत आलें. न्या. बीमन यांनीं आपल्या ठरावांत असें म्हटलें आहे कीं "आमचें मत असें आहे कीं

हा कायद्याचे मुद्याविरुध्द रेस्ज्युडीकेटा नसून हा पुराव्याचे [facts]चे बाबतींतीलच रेस्ज्युडीकेटा आहे" यावरून इतकें स्पष्ट होत आहे कीं वर्ग करण्यास पात्र आहे किंवा नाहीं हा प्रश्न पुराव्याचा असून त्यास रेस्ज्युडीकेटाचे तत्व लागू आहे; मग तो प्रश्न कूळ व तिन्हाईत यांचेमधील असो अगर खोत आणि कूळ यांचेमधील असो.

## (२०) विरुध्दकबजा वर्ग आहे—

**मु. का. आर्टिकल** १४२ व १४४ प्रमाणें स्थावर मिळकतीच्या कबजाचा दावा १२ वर्षांचे आंत केला पाहिजे. तसें न केल्यास ज्याचा राजरोस उघडपणें प्रत्यक्ष बारा वर्षांहून जास्त वर्षे कबजा असेल तो त्या जमिनीचा मालक होतो. यालाच "**विरुद्ध कबजा**" असें ह्मणतात. अशा तऱ्हेचा विरुद्धकबजा खोताचा खातेदाराविरुद्ध होऊं शकतो. **आत्माराम वि. बाळाजी २५ मुं. लॉ. रि. १०३२** या मुकदम्यांत अशी परिस्थिति होती कीं, खातेदार कुळाचे एका हिस्सेदारावर खोतानें पैशांचा निवाडा मिळविला. खातेदार हिस्सेदारांच्या दरम्यान वांटप होऊन जी जमीन निवाड्यांतील रिणको हिस्सेदाराच्या (धनाच्या) हिशास आली ती खोतानें कोर्टमार्फत विक्रीस काढली, व लिलांव होऊन १८९९ सालीं लिलांवदाराचे कबजांत गेली. ती लिलांवदारानें पुन्हां खोताला १९०१ सालीं दिली व तेव्हांपासून १९१६ पर्यंत निर्वेधपणें खोताकडे कबजा चालला. १९१६ सालीं खातेदार हिस्सेदारापैकीं एकानें [ह्मणजे धनाच्या पुतण्यानें]दांडगाईनें खोताकडून कबजा काढला. तेव्हां १९१९ मध्यें खोतानें कबजा परत मागणेकरितां दावा आणला; व त्यांत त्या खातेदार हिस्सेदारानें कोर्टमार्फत झालेली विक्री बेकायदेशीर आहे वगैरे तक्रारी केल्या. या कामीं **न्या. कोयाजी** यानीं असा ठराव दिला कीं "जरी खो. से. आक्टाचे कलम ९ प्रमाणें कोर्टमार्फत लिलावानें झालेली विक्री रद्द मानली तथापि खोताचा, मालकी नसतां, सुमारें १५ वर्षेपर्यंत कबजा होता. माझ्या मतें हा पुष्कळ वर्षांचा कबजा, प्रतिवादी नं. ३ यास काढून टाकण्यास पुरेसा आहे. ह्या विरुद्धकबजानें धनाचा (ज्या खातेदाराच्या हिश्यांत या जमिनी आल्या त्याचा) जमिनीचे प्रत्यक्ष कबजाचा हक्क नष्ट झाला आहे. ह्यामुळें खातेदारकूळहक्क जर कांहीं असले तर नष्ट करतां येत नाहींत, व ते खोताकडे वर्ग करणें शक्य होतें, असें असूं शकेल, (**विष्णु वि. बाबला २३ मुं. लॉ. रि. ४११**). तथापि खोत उत्पन्न वसूल करीत होता आणि धनानेंच कबुलायतीनें जमीन घेतली होती ही गोष्ट नाकबूल नाहीं. यावरून इतकें अगदीं उघड आहे कीं जर त्याचे हक्क १८९९ मध्यें कांहीं शिल्लक असले तर त्याचा कलम १० च्या अर्थानुरूप त्यानें राजिनामा दिला असें होत आहे. परंतु धनासंबंधें आज येथें प्रश्न नाहीं." या ठरावांत खातेदाराची स्वतःची तक्रार नसल्यामुळें कलम ९ चा परिणाम अशा परिस्थितींत खातेदाराविरुद्ध व इतर खोत हिस्सेदाराविरुद्ध काय

झाला असता, याचा विचारच झालेला नाहीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. वर नमूद केलेल्या विष्णु वि. बाबला या ठरावानें खातेदाराविरुद्ध झालेल्या तिसऱ्याच इसमाचे विरुद्धकबजानें मूळ खातेदाराचे हक्क नष्ट होत नाहींत असें ठरलें आहे. परंतु या ठरावांत तसा प्रश्न नसून खोताचाच खातेदाराचे हिस्सेदाराविरुद्ध विरुद्धकबजा होता. अशा परिस्थितींतही मूळ खातेदाराचे हक्क नष्ट होत नाहींत असें न्या. कोयाजी यांचे ठरावावरून ध्वनित होत आहे.

(२१) एस्टॉपेल पु० आ० कलम ११५—

एकादा मनुष्य जेव्हां आपल्या, बोलण्यानें, कृत्यानें अगर न करण्यानें हेतुपुरस्सर दुसऱ्यास एकादी गोष्ट खरी आहे असा विश्वास उत्पन्न करून त्या विश्वासावर एखादी गोष्ट करावयास लावतो तेव्हां तो अगर त्याचे हक्कदार याचे दरम्यान चाललेल्या दाव्यांत अगर कामांत त्या गोष्टीचा खरेपणा त्यास नाकबूल करतां येणार नाहीं.* हें कायद्याचें तत्व पु. आ. कलम ११५ मध्यें दिलेलें असून त्याचा अंमल खोती से० आक्टाचे बाबतींतही होतो. जयराम वि. नारायण ५ मुं० लॉ. रि. ६५२ या ठरावांत हाच प्रश्न खोती जमिनीचे बाबतींत उपस्थित झाला होता. १८७१ सालीं खातेदारानें आपली ज़मीन गहाण दिली. त्यावेळीं कांहीं परिस्थितींत खातेदाराला वर्ग करण्याचा अधिकार होता ही गोष्ट नाकबूल नव्हती. धनकोनें गहाण मिळकत विकून रकम वसूल करण्याकरितां दावा केला. त्यांत रिणकोच्या मुलांनीं बापाला वर्ग करण्याचा अधिकार होता असें दाखविण्यास कांहीं नसल्यामुळें गहाणाचा व्यवहार बेकायदेशीर आहे अशी तक्रार केली. परंतु या ठिकाणीं एस्टापेलचें तत्व लागू धरून गहाणाचा व्यवहार १८७१ मध्यें, खो. से. आ. कलम ९ अस्तित्वांत येण्यापूर्वींचा, असल्यामुळें गहाण मिळकत विक्रीस पात्र आहे असें ठरविलें. गहाणदार रिणकोला गहाण टाकलेली मिळकत गहाण टाकण्यास पात्र नव्हती असें एस्टापेलच्या तत्वाप्रमाणें ह्मणतां येत नाहीं, असें ठरलेलें आहे. या ठरावाचे बाबतींत इतकें ध्यानांत ठेवावें कीं, यांत कोर्टमार्फत खरेदी घेणाराचा हक्क योग्य ठरेल किंवा काय याचा निर्णय लागलेला नाहीं. परंतु या ठरावांतील व्यवहार १८७१ चे पूर्वींचा होता, व त्यावेळीं खातेदार कुळास मूळचा अधिकार असल्याशिवाय वर्गच करितां येत नव्हता; १८६५ चा मुं. आक्ट १ कलम ३८.

---

* Sec 115:- When one person has, by his declaration, act or omission, intentionally caused or permitted another person to believe a thing to be true and to act upon such belief, neither he nor his representative shall be allowed in any suit or proceedings between himself and such person or his representative, to deny the truth of that thing.

एस्टॉपेलचें तत्व ज्या ठिकाणीं उघड कायदा आहे तेथें लागू पडत नाहीं. कायद्यानें ठरविलेल्या गोष्टींविरुद्ध कोणालाही एस्टॉपेलचें तत्व अंमलांत आणतां येत नाहीं. १८८० च्या खो. से. आ. चें कलम ९ मधील " खातेदार कुळांचे हक्क दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगे नाहींत " हे शब्द, खातेदाराचे कुळहक्क विकले जाऊं नयेत असा कायद्याचा हेतु होता, हें स्पष्टपणें दर्शवितात," **महादेव वि. महादाजी १३ मुं. लॉ. रि. ११५७.** हा हेतु जितका कुळाला बंधनकारक आहे तितकाच विकत घेणारासही आहे. वर्ग देणारास व वर्ग घेणारास कायदा सारखाच बंधनकारक असल्यामुळें कोणासही एस्टॉपेलचें तत्व येथें लागू करतां येणार नाहीं. **श्रीधर वि. बाबाजी १६ मुं. लॉ. रि. ५८६** या ठरावांमध्यें कायद्याविरुद्ध एस्टापेलचें तत्व लागू नाहीं, असा ठराव केलेला आहे. वर्ग करण्यापूर्वी कलम ९ प्रमाणें खोताची संमती घेणें आवश्यक कायद्यानेंच धरलें असल्यामुळें खोताची संमति होती ही गोष्ट कोणासही शाबीत केलीच पाहिजे. कायद्यानें आवश्यक सांगितलेली गोष्ट शाबीद करण्याची जबाबदारी उभयपक्षावर आहे असेंही ठरविलें आहे. " कायद्याविरुद्ध गोष्ट आहे असें केव्हांही कोर्टाच्या नजरेस आणलें जातांच कोणत्याही कोर्टानें त्याचा विचार केलाच पाहिजे, " असें **सुरजमल वि. ट्रिटन २७ मुं. लॉ. रि. ७७०** या ठरावांत ठरलें आहे.

" एस्टॉपेलचें तत्व एकाद्या पक्षाविरुद्ध लागू करण्यास त्या पक्षाचे बोलणें, कृत्य, अगर न करणें असंदिग्ध (unambiguous) आणि असंशयित (unequivocal) असलें पाहिजे इतकेंच नव्हे तर एस्टॉपेलचें तत्व केवळ व्यक्तिशः लागू आहे. " **गजानन वि. निळो ६ मुं. लॉ. रि. ८६४** या ठरावांत न्या० **चंदावरकर** यांनीं वरील तत्व प्रतिपादून " कोर्ट मार्फत झालेली विक्री, कोर्टमार्फत झालेल्या खरेदीदाराचे विरुद्ध अगर बाजूनें कोर्टामार्फत ज्याचा हक्क दावा संबंध विकत घेतला त्याचे तर्फे अगर विरुद्ध, एस्टॉपेलचें तत्व लागू करूं शकत नाहीं, कारण, न्या. **सार्जंट** यांनीं **वसंजी वि. लल्लू ९ मुं. २८५** या ठरावांत ठरविल्याप्रमाणें, कोर्ट खरेदीदार आपले हक्क, निवाड्यांतील रिणकोचे बाबतींत त्याचे मर्जीविरुद्ध असे (in invitum) आहेत अशा कोर्टाच्या कामांतून मिळवितो. जर निवाड्यांतील रिणकोचे बाबतींत त्याचे विरुद्ध एस्टॉपेलचें तत्व लागू नाहीं. तर त्याचेतर्फे कोर्ट खरेदीदाराविरुद्धहि एस्टॉपेल होत नाहीं, कारण परस्परता (mutuality) ही एस्टॉपेल होण्यास एक अगदीं आवश्यक गोष्ट आहे. शिवाय कोर्टानें दिलेला विक्रीचा दाखला हा खरेदी घेतलेल्या हक्काचे बाबतींत अगर त्यांत नमूद केलेल्या गोष्टीचे बाबतींत निर्णायक होत नाहीं, **बलवंत वि. हिराचंद २७ मुं. ३३४ = ५ मुं. लॉ. रि. २१७.** कोर्टाला निवाड्यांतील रिणकोचा हक्क असेल तेवढाच विकतां येईल आणि खरेदीदारासही जास्त हक्क प्राप्त होणार नाहींत " असें ठरविलें आहे व यावरून कोर्टाचे विक्रीचे बाबतींत एस्टॉपेलचें तत्व लागू पडत नाहीं, हें सिद्ध आहे.

१९१२ च्या दुरुस्तीनंतर झालेल्या वर्गाचे बाबतींत ते मुळपासूनच बेकायदेशीर असल्यामुळें त्या बाबतींत एस्टॉपेलचें तत्व लागू पडत नाहीं, कारण १९१२ नंतर वर्ग झाल्यास आपसूकच खातें खोताकडे खालसा होतें.

**(२२) कलम ९ व कलम १० यांचा संबंध—**

या कलमांत खातेदारास आपल्या खात्यांतील जमिनीचा वर्ग करतां येत नाहीं असें ठरविण्यांत आलें आहे. परंतु असा वर्ग केल्यास त्याचा परिणाम काय होतो याबद्दल यांत कांहींच उल्लेख केलेला नाहीं. त्याचप्रमाणें वारसानें हक्क जातो परंतु वारस कोणीच नसल्यास त्याचा परिणाम काय होतो या संबंधेंही या कलमांत कांहीं उल्लेख नाहीं. त्याबद्दल स्पष्ट खुलासा कलम १० मध्यें केला आहे. कलम ९ व १० हीं या दृष्टीनें परस्परावलंबी आहेत.

हक्कवाल्या खातेदारांच्या जमिनींचा राजिनामा, त्या गतकुळी होणें किंवा, खालसा होणें.

**कलम १०—जर हक्कवाल्या "खातेदारानें धारण केलेली जमीन" वारस नसल्यामुळें गतकुळी होईल किंवा त्या जमिनीबद्दल द्यावयाचें थळ खातेदार देण्यास चुकल्यामुळें ती खालसा होईल किंवा, जर कोणतेंही "निरंतरचें कूळ" "आपल्या जमिनीचा किंवा आपल्या जमिनीच्या कोणत्याही भागाचा" राजिनामा देईल तर, किंवा "आपली" जमीन अगर तिचा कोणताही भाग किंवा, तींतील कोणताही हितसंबंध, खोताच्या संमत्तीशिवाय (९ व्या कलमांत ठरलेल्या बाबतींखेरीज करून) दुसऱ्यास प्राप्त करून देण्यादाखल कोणतेंही कृत्य करील तर, "आपली" जमीन, सरकारास हितकारक असे उत्पन्न झालेले किंवा, विद्यमान असलेले लियन किंवा, बोजे यांखेरीज दुसऱ्या सर्व बोजांतून मोकळी होऊन खोती जमीन म्हणून खोताकडे जाईल.**

**परंतु खोताच्या संमत्तीवांचून हक्कवाला खातेदार कोणत्याही वेळीं आपल्या सगळ्या खात्यापैकीं कांहीं भागाचाच राजिनामा देईन म्हणेल तर तो देण्याचा अधिकार त्याला नाहीं; आणि हक्कवाल्या खातेदाराची जमीन थळ न दिल्यामुळें खालसा होणें ती कलेक्टरानें खालसा झाल्याविषयीं दाखला दिल्याशिवाय खालसा झाली असें समजूं नये.**

( हें कलम सन १९१२ चा मुं. आक्ट ८ कलम २ वरून व सन १९१३ चा मुं. आक्ट ४ कलम ८७ पो. क. २ वरून दुरुस्त केलें गेलें आहे. )

—जुनें कलम—

हक्कवाला खातेदार आपल्या खात्यांतील जमिनीचा किंवा जमिनीच्या कोणत्याही भागाचा राजिनामा देईल तर अथवा सदहू प्रकारच्या कोणत्याही खातेदाराची जमीन वारस नसल्यामुळें अथवा ज्यास तिजवर हक्क आहे असें दुसरें कोणी नसल्यामुळें गतकुळी होईल, अथवा जमिनीबद्दल अगर जमिनीच्या भागाबद्दल द्यावयाचें थळ खातेदार देण्यास चुकल्यामुळें खालसा होईल, तेव्हां याप्रमाणें राजिनामा दिलेली, गतकुळी झालेली, अथवा खालसा झालेली जमीन, सरकारास हितकारक असे उत्पन्न झालेले किंवा विद्यमान असलेले लियन किंवा बोजे यांखेरीज दुसऱ्या सर्व बोजांतून मोकळी होऊन खोती जमिनीप्रमाणें तिची व्यवस्था करण्याचें खोताकडे येईल.

परंतु खोताच्या संमत्तीवांचून हक्कवाला खातेदार कोणत्याही वेळीं आपल्या सगळ्या खात्यापैकीं कांहीं भागाचाच राजिनामा देईन ह्मणेल तर तो देण्याचा त्याला अधिकार नाहीं; आणि वर लिहिलेल्या प्रकारची हक्कवाल्या खातेदाराची जमीन खालसा झाल्याविषयीं कलेक्टरनें दाखला दिल्याशिवाय थळ न दिल्यामुळें खालसा झाली ह्मणून समजूं नये.

## टिपा

**(१) उद्देश व मुख्य गोष्टी.—**

मागील कलम ९ मध्यें खंड दिला पाहिजे, वर्ग करूं नये वगैरे गोष्टी सांगितल्या; परंतु तसें केलें तर त्याचा परिणाम काय होतो हें या कलमांत सांगितलें आहे. वारसानें प्राप्त होण्याचा हक्क प्रत्येक प्रकारचे कुळाला असतो परंतु खातेदार बेवारशी झाल्यास त्याचा खात्यावर काय परिणाम होतो; खंड, थळ, मक्ता वगैरे खोताचें देणें वेळीं न दिल्यास त्याचा परिणाम काय होतो; कलम ९ मध्यें सांगितलेल्या अटींस अनुसरून बेकायदा वर्ग असेल तर त्याचा परिणाम काय होतो; व खातेदारानें राजिनामा दिल्यास त्याचा काय परिणाम होतो, हें या कलमांत सांगितलें आहे. या गोष्टींचा परिणाम इतकाच कीं सरकारचें बोजे व लियन कायम राहून इतर सर्व बोजाविरहित खोती जमीन ह्मणून ती खोताकडे येते.

सरकारच्या बोजाखेरीज इतर बोजा विरहित जमीन खोताकडे खालील परिस्थितींत येते.—

(१) वारस नसल्यानें खातें गतकुळी होईल तर.

(२) खातेदार थळ देण्यास चुकेल तर व खालसा करण्याबद्दल कलेक्टर सर्टिफिकीट देईल तर.

(३) " निरंतरचें कूळ " आपल्या खात्यांतील सर्व जमिनीचा राजिनामा देईल तर.(भागाचा अगर कांहीं जमिनींचाच फक्त राजिनामा देणें झाल्यास खोताची संमत्ति पाहिजे.)

(४) " निरंतरचें कूळ " आपली जमीन अगर तिचा कोणताही भाग किंवा तींतील हितसंबंध खोताच्या संमतिशिवाय दुसऱ्यास प्राप्त करून देण्यादाखल कृत्य करील तर.

इतक्या परिस्थितींत खोताकडे हक्कवाल्या खातेदाराची जमीन सरकारचे बोजे व लियन खेरीजकरून बाकी बिनबोजा बिनलियन खोती जमीन ह्मणून येतें.

(२) जुनें आणि नवें कलम—

हें कलम फारच महत्वाचें असल्यामुळें या कलमामध्यें वेळोवेळीं फारच महत्वाच्या सुधारणा झालेल्या आहेत व त्या सुधारणा गतकालसापेक्ष नसल्यामुळें बरोबर लक्षांत ठेवणें आवश्यक व इष्ट आहे. या दुरुस्त्या १९१२ व १९१३ सालीं झाल्या आहेत, त्या—

(१) १८८० च्या आक्टानें कोणत्याही " हक्कवाल्या खातेदारास "— धारेकरी, कच्चा धारेकरी, खातेदार वगैरे यांस—आपल्या खात्यांतील सर्व जमिनीचा अगर खोताच्या संमत्तीनें जमिनीच्या कोणत्याही भागाचा राजिनामा देतां येत होता, परंतु १९१२ च्या दुरुस्तीनें फक्त " खातेदार " कुळासच राजिनामा देणेचा हक्क आहे असें ठरविण्यांत आलें आहे. १९१३ च्या दुरुस्तीनें " खातेदार कूळ " या शब्दाऐवजीं " निरंतरचें कूळ " असे समानार्थी शब्द घालण्यांत आले.

(२) १८८० च्या आक्टामध्यें " खातेदार कूळ आपली जमीन अगर तिचा कोणताही हितसंबंध खोताच्या संमत्तीशिवाय ( ९ व्या कलमांत ठरलेल्या बाबती खेरीज करून ) दुसऱ्यास प्राप्त करून देण्यादाखल कोणतेंही कृत्य करील तर " हा भाग घातलेलाच नसून तो १९१२ च्या दुरुस्तीनें घातला गेला. १९१३ च्या दुरुस्तीनें " खातेदार " याचे ऐवजीं " निरंतरचें कूळ" हे शब्द घालण्यांत आले.

(३) १८८० च्या कलमांत हक्कवाल्या खातेदाराचा वारस नसल्यामुळें या शब्दांपुढें " ज्यास तिजवर हक्क आहेत असे दुसरे कोणी नसल्यामुळें " असे शब्द होते. परंतु ते १९१२ च्या दुरुस्तीमध्यें अजिबात कमी करण्यांत आले आहेत.

(४) १९१२ च्या दुरुस्तींत " अशी जमीन अगर जमिनीचा कोणताही

भाग " असे शब्द होते यांतील " अशी " या ठिकाणीं " आपली " असा शब्द १९१३ च्या दुरुस्तीनें घालण्यांत आला.

या सुधारणांचा परिणाम काय होतो याचा सांगोपांग विचार खालीं केला आहे. परंतु वेळोवेळीं झालेल्या सुधारणा गतकालसापेक्ष नसल्यामुळें, प्रत्येक दुरुस्ती केव्हांपासून अंमलांत आली आहे हें नीट ध्यानांत ठेवलें पाहिजे. दुरुस्त्या कोणत्या वेळीं अंमलांत आल्या हें मागें सांगितलें आहे. ( पान ७ पाहा. )

### (३) कलम १० गतकालसापेक्ष नाहीं—

विषयप्रवेश टीप ४ येथें कोणत्याही कायद्याचा अंमल गतकालसापेक्ष केव्हां असतो हें खलासेवार सांगितलें असून कलम ९ गतकालसापेक्ष नाहीं असें त्या कलमाखालीं (पान ८७) साधार दाखविलें आहे. त्याच ठरावांस अनुसरून हें कलमही गतकालसापेक्ष नाहीं. नारायण वि. महादेव दु. अ. नंबर ९६६ सन १९१५ नि. ता. २६।८।१९१८ या ठरावांत न्या. शहा यानीं " १९१२ चो दुरुस्ता गतकालसापेक्ष नाहीं. "( " The Amending Act of 1912 has no retrospective operation ", असें ठरविलें आहे व तोच नियम १९१३ चे दुरुस्तीसही लागू आहे.

### (४) कलम १० व लँड रेव्हेन्यू कोड—

कलम १० मध्यें ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्याच सरकारी गांवांकरितां कलम ७२।७३।७४ व १५३ यांत सांगितल्या आहेत. खो. से. आक्ट जेथें लागू आहे तेथें हीं कलमें लागू नाहीं असें याच कायद्याचें कलम ३९ यांत स्पष्ट सांगितलेलें आहे. परंतु खोती आक्ट लागू नाहीं अशा बऱ्याच गांवांत खोती असल्यामुळें त्यांचा येथें विचार करणें जरूर आहे. कलम ७२ प्रमाणें सर्वेखातेदार कुळाची जमीन बेवारशी झाल्यास त्याच्या जमिनी कलेक्टरानें विकाव्या असें ठरविलें आहे. कलम ७३ मध्यें सर्वेखातेदाराला आपल्या जमिनीचा वर्ग करण्याचा अधिकार आहे असें सांगितलें आहे. व हें कलम जेथें जेथें खोती आहे तेथें तेथें तें लागू नाहीं असें ना हायकोर्टानें ठरविलें आहे, गोपाळ वि. भागीरथी २० मुं. लॉ. रि. ६८१ व पुरुषोत्तम वि. गणपती २८ मुं. लॉ. रि. ७५०. कलम ७४ मध्यें सरकारी खातेदाराला सरकारास राजिनामा देतां येतो असें सांगितलें असून त्या जमिनीवरील हक्क, सत्ताप्रकार व बोजे कायम राहतात असा स्पष्ट ठराव आहे. कलम १५४ मध्यें महसूल न दिल्यास खातें खालसा करावें असें ठरविलें आहे व पुढील कलमांत तें कसें करावें, काय काय गोष्टी केल्या पाहिजेत, तें सांगितलें आहे.

सदर्हू कलमें आणि कलम १० यांची तुलना केली असतां असें दिसेल कीं रयतवारी गांवांत जे सरकारचे हक्क आहेत तेच कांहीं दुरुस्तीनें खोतास कलम १० नें दिलेले आहेत. बेवारशी खातें विकलें न जातां खोताकडे येतें, बेकायदा वर्ग झाला असतां वर्ग केलेली जमीन तावडतोब खोताकडे येते वगैरे खोताचे हक्क या कलमांत जास्त घातलेले आहेत.

## (५). हक्कवाल्या खातेदारांच्या गतकुळी जमिनी खोताकडे येतात—

" हक्कवाला खातेदार " या संज्ञेंत धारेकरी कच्चा धारेकरी व ' निरंतरचीं कुळें ' यांचा समावेश होतो, [ कलम ३ - ५ ]. या तिघांच्या बाबतींत बेवारशीपणा आल्यास त्या जमिनी खोती ह्मणून खोताकडे जातात. बेवारशी अथवा गतकुळी याचा अर्थ खातेदाराचा नष्टांश होणें ह्मणजे त्याच्या वंशातला अगर वारसाचा हक्क सांगण्यासारखा कोणीही वारस न उरणें होय. वारस ज्या धर्माचा खातेदार असेल त्या धर्मशास्त्राप्रमाणेंच पहावयाचे असतात. हिंदु खातेदार असल्यास त्याचे वारस हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें पहावयाचे असतात. खातेदार मुसलमान असल्यास त्याचा वारसा मुसलमानधर्मशास्त्राप्रमाणें पहावयाचा असतो. [ परिशिष्ट पहा ]

१९१२ च्या पूर्वींच्या कलमांत " ज्यास तिजवर हक्क आहे असे दुसरे कोणी " असे शब्द होते व त्यामुळें खात्यांतील जमिनीवर गहाणदार, पट्टेदार, खरेदीदार, अशांचा त्यांच्या हक्कापुरता संबंध शिल्लक रहावयाचा होता. परंतु १९१२ च्या दुरुस्तीनें हे शब्द गाळलेले आहेत. त्याचा परिणाम असा होणार कीं, १९१२ च्या पूर्वी जर खातें गतकुळी झालें असेल तर खोती आक्टाच्या इतर कलमांस बाध न येतां इतर हक्कदारांचे हक्क कायम राहून त्यांचे बोजासह जमिनी खोतास मिळतील. परंतु खातें १९१२ नंतर जर गतकुळी होईल तर सरकाराशिवाय इतरांचे सर्व बोजे नष्ट होऊन बिनबोजा खातें खोताकडे येईल. बोजा पूर्वींचा असून खातें १९१२ नंतर गतकुळी झाल्यास त्याचा परिणाम काय होईल, त्याचा निर्णय अद्याप लागलेला नाहीं. परंतु अशा परिस्थितींत बोजे कायम रहाणें योग्य होईल.

## (६). थळ द्यावयास चुकेल तर खालसा— कलेक्टरचें सर्टिफिकेट—

हक्कवाल्या खातेदारांपैकीं तिघांसही हा भाग लागू आहे. त्यामुळें धारेकरी, कच्चा धारेकरी व " निरंतरचीं कुळें " या सर्वांस वेळेवर थळ न दिल्यास खातें खालसा होण्याची भीति आहे. निरंतरचे कुळाचे बाबतींत याच आक्टाचे कलम ४० रकम " फ " कानू १ यांत तो ओळीनें दोन वर्षे थळ देण्यास चुकेल तर खालसा झाल्याचा दाखला द्यावा; कूळ अज्ञान असल्यास तें सज्ञान झाल्यानंतर ओ-

ळीनें दोन वर्षेपर्यंत खंड देण्यास चुकेल तर खालसा झाल्याचा दाखला द्यावा, असा स्पष्ट ठराव आहे. त्याप्रमाणें धारेकरी व कच्चा धारेकरी यांचे बाबतींत कांहीं नियम नाहीं. त्यांनीं आपली थल "वेळोवेळीं" दिलीच पाहिजे (कलम ७). व ते तशी देण्यास चुकल्यास खातें खालसा झाल्याचा दाखला कलेक्टरला देणें भाग आहे. "निरंतरचे कुळा" कडे खोताचें मागणें सरकारदस्ताहून थोडें जास्त असतें. यामुळें त्याला जास्त सवलत दिलेली असावी. खोती व्यतिरिक्त जे सरकारी गांव आहेत तेथें अशा रीतीनें थळ न दिल्यास खातीं लँ. रे. कोड कलम १५३ प्रमाणें खालसा करून विकलीं जातात. परंतु खोती गांवांत तें कलम लागू नसल्यामुळें त्याप्रमाणें चालावयाचें नसतें. तरी पण धारेकरी व कच्चेधारेकरी यांनीं खोतास केव्हां देणें द्यावें यांच्या तारखा ठरल्या असल्यामुळें, (कलम ७ टी. ४), त्या तारखांपैकीं अखेरची तारीख निघून गेल्यानंतर, कलेक्टरकडे अर्ज करण्यास हरकत नाहीं. कलेक्टरकडे अर्ज केल्यानंतर तो रीतीप्रमाणें खात्याच्या जमिनी खालसा कां करूं नये वगैरे ठराविक प्रकारची नोटीस हक्कवाल्या खातेदारास काढतो व त्यानंतर खातेदाराची कांहीं विरुद्ध तक्रार न आल्यास, अगर तक्रार अयोग्य आहे, असें दिसल्यास, खातें खालसा करण्याबद्दल दाखला देतो. अशा रीतीनें दाखला मिळाल्याशिवाय खोताला खातेदाराच्या जमिनीचा कबजा करण्याचा हक्क नाहीं. कलेक्टरनें दाखला दिल्यानंतर कुळानें थलीची रक्कम भरल्यास एकदां दिलेला दाखला रद्द करतां येत नाहीं. निरंतरचे कुळानें दोन वर्षे सतत थल न दिल्यास, पैसे भरण्यास ठराविक तारखेचे बाहेर मुदत देण्याचा अगर दाखला न देण्याचा अधिकार कलेटरला असल्याचें कोठेंहि नमूद केलेलें नसल्यानें तसें करण्याचा त्यास अधिकार नाहीं; लँ. रे. कोड मध्यें सरकारदस्त देणेस चुकणाऱ्या रजिस्टर खातेदाराचे खात्याच्या जमिनी खालसा करण्याचा अधिकार कलेक्टरकडे कलम ५६ प्रमाणें ठेवणेंत आला आहे. याप्रमाणें एकदां खातें खालसा करून दुसऱ्याकडे दिल्यानंतर तें खातें मूळ खातेदाराला परत देण्याचा कलेक्टरला अधिकार नाहीं,धर्मा वि. बाला मिग्या १३ मुं. लॉ. रि. ९६८. या बाबतींतील कलक्टरचे हुकुमाविरुद्ध लँ. रे. को. कलम २०३ प्रमाणें कमिशनरकडे अपील करण्याची कोणासही पूर्ण मुभा आहे. सर्व थल न देतां कांहीं विशिष्ट ठिकाणाचीच थल दिल्यास बाकी ठिकाणेंच खालसा व्हावयाचीं किंवा कोणत्याही परिस्थितींत सर्वे खातें खालसा व्हावयाचें असा प्रश्न आहे. रा. अं. ग. देसाई यांनीं आपल्या खोती आक्टावरील पुस्तकांत (पान ५०) सर्व खातें खालसा केलें पाहिजे असें मत दिलें आहे. परंतु या मुद्याचा समाधानकारक निकाल अद्याप कोठेंच लागलेला नाहीं. इतके खरें कीं जर कुळाला खात्यांतील कांहीं जमिनीचा खोताचे संमत्तीवांचून राजिनामा देतां येत नाहीं तर अशा रीतीनें कांहीं जमिनीचीच थल न देतां तेवढीच जमीन खालसा करावयास लावणेंचा आपला हेतु त्याला कसा साधतां येईल?

(७) गतकुळी अगर खालसा जमिनीवरील खोताचे हक्काचें स्वरूप—

खोताकडे गतकुळी होऊन अगर खालसा होऊन आलेल्या जमिनीवर खोताचा हक्क कोणत्या स्वरूपाचा असतो याचें उत्तर या कलमांत अशा जमिनी "खोती" समजाव्या इतकेंच आहे. इतकी गोष्ट निर्विवाद आहे कीं, अशा जमिनीवर खोताची पूर्ण सत्ता आहे. खोताला स्वतः वहिवाट करण्यास, एकसाली कुळास वहिवाटीस देण्यास व त्याच्या मर्जीस वाटल्यास अशा जमिनींत कायम कूळ ठेवण्यास त्यास पूर्ण अधिकार आहे. ह्मणून अशा जमिनी खोती खासगी स्वरूपाच्या खोत निसबत जमिनी होत. गजानन वि० निळो ६ मुं. लॉ. रि. ८६४ या ठरावांत न्या. बॅटी यांनींही गतकुळी होऊन खोताकडे आलेल्या जमिनीबद्दल असेंच ठरविलें आहे. "गतकुळी झालेल्या जमिनीची अशी व्यवस्था आहे कीं, खोताला त्या आपलेकडे कायमच्या ठेवण्याचा, थोडक्या मुदतीकरितां दुसऱ्यास देण्याचा अगर कायम कुळास देण्याचा पूर्ण अधिकार आहे. हा अधिकार कलम १० मध्यें नमूद असून तेथें असें ह्मटलें आहे कीं, अशा तऱ्हेनें गतकुळी झालेली जमीन खोती जमीन ह्मणून खोताकडे राहील. यावरून गतकुळी झालेली जमीन खोताच्या कायमच्या ताब्यांत असणाऱ्या खोती खासगी जमिनीप्रमाणें वापरण्यास हरकत नाहीं. आमच्या मतें जोंपर्यंत कायमपणें दुसऱ्यास देण्याचा हक्क खोताकडे कायम असतो, आणि जोंपर्यंत तो एखाद्या कायम कुळाला देऊन टाकलेला नसतो, तोंपर्यंत अशा जमिनींत आणि नेहमींच्या खोती खासगी जमिनींत कांहीं फरक नाहीं असें मानलें पाहिजे. कारण एकसाली अगर कांहीं मुदतीच्या कुळांकडून आपल्या मर्जीनुरूप जमिनी काढण्याचा त्याला हक्क आहे. खंडानें दिलेली जमीन मुदत संपल्यानंतर खोताला आपलेकडे ठेवावयांची असें ठरवितां येईल, पुन्हां एकसाली कुळाकडे ठेवतां येईल, अगर पुन्हां आपलेकडे घेतां येईल."* अशा रीतीचा गतकुळी जमिनीवरील खोतांच्या हक्काचे बाबतींत ठराव आहे. यावरून अशा जमिनी खोती खासगी स्वरूपाच्या खोतनिसबत जमिनी आहेत. त्याच प्रमाणें खालसा जमिनीची अगर या कलमाप्रमाणें अन्य गोष्टीमुळें खोताकडे येणाऱ्या जमिनीची व्यवस्था मानण्यास हरकत नाहीं. मात्र खोतहिस्सेदारांमध्यें वाटपाचा प्रश्न आल्यास अशा जमिनी खोतनिसबत म्हणून निराळ्या समजून हिशाप्रमाणें वाटप व्हावयाचें असतें.

---

* "We think that as long as the khots' power of permanent disposal rests with him and has not been alienated to a tenant with privileged occupancy rights, the land must be regarded for all purposes as undistinguishable from ordinary khoti khasgi, the right remaining with the khot at pleasure to recover the land on the determination of any yearly or short term Tenancy. etc."

(८) राजिनामा—

"राजिनामा" या शब्दाची व्याख्या या कायद्यांत अगर दुसऱ्या कोठेंही केलेली नाहीं. येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१ या ठरावांत न्या. बॅटी यांनीं त्याची व्याख्या इंग्लंडमधील पद्धतीप्रमाणें "returning fee by a vassal into the hand of a superior" ह्मणजे "कुळानें आपली जमीन वरिष्ट धारण करणाराचे हातांत देणें" अशी केली आहे. यावरून राजिनामा याचा अर्थ कुळानें आपली ज़मीन मालकाच्या ताब्यांत करणें असा होतो. बाळाजी वि० भिकाजी ८ मुं० १६४ या ठरावांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, जमीन सोडणें व जमिनींत पीक न काढणें एवढ्यानें राजिनामा दिल्यासारखें होत नाहीं, व कुळाची त्याचे ठराविक देण्यांतून मुक्तता होत नाहीं. त्याचप्रमाणें त्याचे उलट राजिनामा दिल्यानंतर कुळानें आपल्याकडे कबजा ठेविल्यास राजिनामा निरुपयोगी होतो असेंही नाहीं. भूत्या वि. अंबो १३ मुं० २९४ या ठरावांत राजिनामा दिल्यानंतर कुळाकडे कबजा असला तरी कबजा काढतां येतो, असें ठरविण्यांत आलें आहे. राजिनामा देणें हा कुळाचा जन्मसिद्ध हक्क आहे. "जमिनींचा राजिनामा दिल्या-बद्दलची एकदां नोटीस दिल्यानंतर मग त्या वेळीं कबजा सोडलेला असो अगर नसो जमिनी मालकाकडे येतात व त्यास कबजा काढतां येतो." बलियाराम वि. वासुदेव २२ मुं. ३४८

(९) राजिनाम्याला आवश्यक गोष्टी—

लँ. रे. कोड कलम ७४ प्रमाणें सरकारी गांवांतील खातेदार कुळाला राजिनामा देण्याची मुभा आहे. परंतु तसें करतांना ३१ मार्चचे आंत त्यानें मामलेदार अगर महालकरी यांस नोटिस दिली पाहिजे. परंतु तें कलम याच कायद्याचें कलम ३९ प्रमाणें खोती गांवास लागू नसल्यामुळें लँ. रे. कोडाप्रमाणें राजिनामा देतांना नोटीस देण्याचें कारण नाहीं. कलम १० मध्यें राजिनामा केव्हां द्यावा व कसा द्यावा हें सांगितलें नाहीं. त्यामुळें राजिनामा मुलकी साल अगर पिकाचा हंगाम सुरू होण्यापूर्वींच देतां येतो असें नाहीं. राजिनामा वर्षांतून कोणत्याही वेळीं देतां येतो. इतकेंच नव्हे तर राजिनामा लेखीच झाला पाहिजे असें नाहीं. मात्र राजिनाम्यानें खातेदारकुळाचा हक्क कायमचा नष्ट होत असल्यामुळें तोंडी राजिनामा दिला असें ह्मणणें असेल त्यावेळीं फार काळजीपूर्वक त्याची सत्यता पटवून दिली पाहिजे. एखाद्या ठिकाणीं राजिनामा झाला आहे किंवा नाहीं हें प्रत्येक मुकदम्याच्या परिस्थितीवर अवलंबून राहील, असें सर न्या. जेंन्किन्स यांनीं बादशहा वि. नारायण ९ मुं. लॉ. रि. ८२९ या ठरावांत ह्मटलें आहे. राजिनाम्याचा कागद रजिष्टर केला पाहिजे असेंही नाहीं. नर्सो वि. नागवा २० मुं. लॉ. रि. ३५८ या ठरावांत लँ. रे. कोडप्रमाणें राजिनामा दिल्यास तो रजिष्टर करण्याचें कारण नाहीं असें ठरविलें आहे. खाते-

दारानें आपल्या वारसांची संमत्ती घेतली पाहिजे असेंही नाहीं, दवलता वि. बेरु ४ मुं. हा. को. रि. १९७. कलम १० नें मात्र एक दोन गोष्टी आवश्यक ठरविल्या आहेत. एकतर, राजिनामा देणें तो खोतासच दिला पाहिजे, असें बादशहा वि. नारायण ९ मुं. लॉ. रि. ८२९ या ठरावांत सर न्या. जेन्किन्स यांनीं स्पष्टपणें नमूद केलें आहे. ते त्या ठरावांत ह्मणतात. "खोताची संमत्ती जरी राजिनाम्याला लागत नसली तरी राजिनामा खोतासच दिला पाहिजे, कुळाला खोतासच फक्त राजिनामा देतां येणें शक्य आहे." दुसरी आवश्यक गोष्ट ह्मणजे राजिनामा सर्व खात्याचा दिला पाहिजे. खात्यापैकीं कांहीं भागाचाच द्यावयाचा असल्यास खोताची आगाउ संमत्ती घेतली पाहिजे. श्रीधर वि. बाबाजी १६ मुं. लॉ. रि. ५८६ यांत दर्शविल्या प्रमाणें पुष्कळ खोतहिस्सेदार असतां एकासच राजिनामा देतां येणार नाहीं. सर्वांची संमत्ती पाहिजे. याच ठरावांत आणखी असेंही ठरविलें आहे कीं मोबदला घेऊन राजिनामा होत नाहीं. मोबदला घेतला असतां तो व्यवहार खरेदीचा मानला पाहिजे. नुसतें "सोडपत्र" ह्मणून एकादा कागद करून घेतला म्हणजे राजिनामा होत नाहीं, तर तो राजिनामा आहे किंवा नाहीं, हें ठरवितांना त्यांतील अटी पाहिल्या पाहिजेत असें न्या. चंदावरकर यांनीं रामचंद्र वि. भाऊराव दु. अ. ८२२ सन १९०९ नि. ता. १४।६।१९१० या ठरावांत ह्मटलें आहे. या दृष्टीनें जगन्नाथ वि. बाब्या दु. अ. नंबर २८९ सन १९१८ नि. ता. १४।१०।१९१९ हा ठराव सुद्धां फार महत्वाचा असून, यांत खोत आणि कूळ यांचे दरम्यान झालेला दस्तैवज राजिनामा आहे कीं, गहाणखत आहे असा प्रश्न होता. खोताची तक्रार तो राजिनामा आहे अशी होती व कुळाची तक्रार, खोतानें फसवून राजिनामा करून घेतला असल्यास मजला कबूल नसून मी खोतास माझ्याकडेच जमिनी मरेपर्यंत चालविण्याचें खोतानें कबूल केल्यामुळें गहाणखत लिहून दिलें आहे, अशी होती. राजिनाम्यांत खोतानें खातेदार कूळ असा उल्लेख करून न घेतां "बेळंब गांवांत माझ्या नांवानें खोती जमिनीचें खातें असून, पुष्कळ वर्षें माझ्याकडे जमिनी मक्त्यानें असल्यामुळें माझे नांवावर लागलें आहे. गांवचें वांटप झालें त्यावेळीं मी आपलें कूळ ह्मणून लागलें असून दरवर्षीं तुह्मांस फायदा देत आलों आहे. मजला जमिनी कसण्याची ताकद नसल्यामुळें मी त्या तुह्मांस सोडून दिल्या आहेत. मी तयार केलेल्या झाडांबद्दल ५० रुपये रोख घेतले आहेत," असा उल्लेख करून घेतला. यावरून न्या. मॅक्लिऑड यांनीं असें मानिलें कीं, "हा दस्तैवज राजिनामा असावा असें दिसत नाहीं." न्या. हीटन ह्मणतात."दस्तैवज वाचला ह्मणजे बिनचूक असें दिसतें कीं, तो दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा कागद असो, परंतु कलम १० खालीं येणारा राजिनामा नव्हे. इतकेंच नव्हे तर याला कोणत्या तरी प्रकारचा राजिनामा ह्मणतां येईल किंवा काय याबद्दल मला शंकाच आहे." या ठरावावरून इतकें उघड होतें कीं, कुळाकडून कांहीं तरी राजिनामा ह्मणून

लिहून घेतल्यास तो राजिनामा होत नसून कुळानें आपल्या खातेदार कुळहक्काचा योग्य व पुरे समजुतीनें आपखुशीनें, बिनमोबदला राजिनामा दिला पाहिजे.

## (१०) राजिनामा आणि खरेदी—

कलम १० प्रमाणें राजिनामा दिला असतां खोताकडे बिनबोजा जमिनी यावयाच्या असतात व त्यामुळें सावकारांचें पुष्कळ वेळां नुकसान होण्याचा संभव असतो. याकरितां अमुक एक व्यवहार राजिनामा आहे किंवा इतर कोणता व्यवहार आहे हें काळजीपूर्वक पहावें लागतें. **रामचंद्र वि. दत्तात्रय ९ मुं. लॉ. रि. ३२०** या ठरावांत खरेदीचा जरी व्यवहार असला तरी तो राजिनाम्याचे स्वरूपाचा आहे, अशी तक्रार होती. त्या ठिकाणीं **सर न्या. जेन्किन्स** यांनीं असें ठरविलें आहे कीं, "आमच्या मतें खरेदीखतानें ज्यावेळीं एकादा आपल्या जमिनीचा वर्ग करितो, त्यावेळीं नेहमींच्या भाषापद्धतीप्रमाणें त्यानें राजिनामा दिला असें म्हणतां येणार नाहीं. आपली जमीन खातेदार कुळानें खरेदीनें वर्ग केली असतां कलम १० प्रमाणें राजिनामा दिला असें होत नाहीं." याच ठरावानुसार **बादशहा वि. नारायण ९ मुं लॉ. रि. ८२९** या ठरावांत असें म्हटलें आहे कीं, "राजिनामा हा खोतासच दिला पाहिजे. एकादा व्यवहार राजिनामा आहे किंवा नाहीं हें ठरविणें प्रत्येकाच्या परिस्थितीवर अवलंबून असतें." याच ठरावाप्रमाणें **श्रीधर वि. बाबाजी १६ मुं. लॉ. रि. ५८६** या ठरावाचेंहि धोरण आहे. एका खोत हिस्सेदारास इतर खोतांच्या संमतीशिवाय मोबदला घेऊन राजिनामा देणें हा योग्य स्वरूपाचा राजिनामा नसून कलम ९ प्रमाणें बेकायदा वर्ग आहे, असें त्यांत ठरविण्यांत आलें आहे. या दोन्ही ठरावांवरून विशिष्ट व्यवहार राजिनामा आहे कीं वर्ग आहे हें लक्षपूर्वक प्रत्येक व्यवहाराच्या वेळच्या परिस्थितीचा विचार करून ठरविलें पाहिजे.

## (११) राजिनामा आणि ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी आक्ट कलम ५३—

कलम १० प्रमाणें राजिनामा दिला असतां सावकाराचे सर्व बोजे नष्ट होत असल्यानें खोत आणि कूळ यांनीं संगनमत करून सावकारास बुडविण्यास हरकत नाहीं. **ट्रा. प्रॉ. आक्टाचें कलम ५३** प्रमाणें "स्थावर मिळकतीचे, होणाऱ्या अगर झालेल्या मोबदल्यानें वर्ग घेणारास, सहभागिदारास, अगर त्या मिळकतींत ज्याचा हितसंबंध आहे अशा दुसऱ्या इसमास बुडविण्याकरितां, अगर वर्ग करणाराच्या सावकारांस बुडविण्याकरितां, अगर लांबविण्याकरितां, केलेले, प्रत्येक स्थावर मिळकतीचे वर्ग, फसविला अगर लांबविला जाणाऱ्या इसमाचे मर्जीनुरूप

निरर्थक असतात."* याच तत्वानुसार सावकारास बुडविण्याकरितां राजिनाम्याचा उपयोग केला जाणें शक्य आहे. कारण "राजिनामा" ट्रा० प्रॉ० आक्टाप्रमाणें "वर्ग" या सदराखालीं येत नाहीं. तेव्हां "राजिनामा" कोणता आणि "वर्ग" कोणता हें दस्तैवजांतील भाषा व व्यवहार काळजीपूर्वक पाहून ठरविलें पाहिजे. न्या. चंदावरकर यांनीं रामचंद्र वि. भाऊराव दु. अ. ८२२ सन १९०९ नि. ता. १४।६।१९१० या अप्रकाशित ठरावांत असें ह्मटलें आहे कीं, "या मुकदम्यांतील तक्रारीची मदार असलेला कागद "सोडपत्र" म्हणून म्हटलेला आहे, ही गोष्ट खरी; परंतु हें खरोखरच "सोडपत्र" आहे कीं नाहीं हें ठरवितांना पक्षकारानें दिलेल्या नांवाकडे न पाहतां कागदांतील अटींकडे विशेष काळजीपूर्वक लक्ष दिलें पाहिजे. कलम १० खालील राजिनामा अगर सोडपत्र हें खरेदीपासून भिन्न आहे, कारण राजिनाम्यानें राजिनामा देणाराचे बोजे वगैरे नाहींसे होतात. त्याचे उलट खरेदी असेल, तर ते सर्व खरेदी घेणारावर येऊन पडतात. या दस्तैवजाच्या अटीवरून हा खरेदीचा व्यवहार दिसतो. मोबदल्याचे रु. २५० खोताचे कुळानें देणें असलेले खोतानें सोडले व कुळानें खोताला जमीन सोडली. मला वाटतें, ज्या ठिकाणीं तिसऱ्या हक्कदारांचा प्रश्न आहे त्या ठिकाणीं असले दस्तैवजांचा अर्थ फारच कसोशीनें (construed strictly)लाविला पाहिजे, आणि या कलमांखालीं ज्या तऱ्हेचा व्यवहार यावा असा कायद्याचा हेतु आहे त्या वर्गांतून बाहेर ओढण्यासारखे जर शब्द वापरलेले असतील तर असले दस्तैवज कलम १० खालीं येतील अशा रीतीनें त्यांचा उपयोग होऊं देतां कामा नये."† न्या. हीटन यांनींही

---

* "Every transfer of Immovable property, made with intent to defraud prior or subsequent transferees thereof for consideration, or co-owners or other persons having an interest in such property or to defeat or delay the creditors of the transferor, is voidable at the option of any person so defrauded or delayed."

† "But it is not the mere name given by the parties to the deed, but the terms of it which must be looked to in determining its exact nature and effect in law. Resignation or relinquishment within the meaning of Sec. 10 of the Khoti Act is different from sale, because in case of the former all the rights and liabilities of the resignor are extinguished whereas in a sale they are transfered to the purchaser. The terms of this document are in the nature of a sale. In consideration of Rs. 250, which the occupancy tenant owed to the khot, but which the khot released, the land was made

याच तऱ्हेचें आपलें मत या ठरावांत व्यक्त केलें असून " सोडपत्र " " खरेदीपत्र " आहे असें ठरविलें आहे. याचप्रमाणें रामचंद्र वि. दत्तात्रय ९ मुं. लॉ. रि. ३२० या ठरावांत मानलें. श्रीधर वि. बाबाजी १६ मुं. लॉ. रि. १५६ या मुकदम्यांत कुळानें मोबदला घेऊन राजिनामा दिला होता. हा व्यवहार राजिनामा म्हणावयाचा किंवा खरेदी म्हणावयाचा असा प्रश्न आला असतां न्या. बीमन यांनीं असें ठरविलें आहे कीं " मोबदला असतां राजिनामा म्हणून जरी म्हटलें असलें तथापि तो व्यवहार "वर्ग" म्हणून गणला पाहिजे. ही गोष्ट आतांपर्यंतच्या पुष्कळ ठरावांनीं आतां ठाम ठरली असून तो कायम कायदाच मानला पाहिजे." यावरून "राजिनामा" अगर "सोडपत्र" अगर तसलाच एकादा शब्द वापरल्यानें राजिनामा होत नसून प्रत्यक्ष व्यवहार काय आहे हें पाहिलें पाहिजे व त्यावरून उभयपक्षाचा हेतु ध्यानांत आणून राजिनामा आहे कीं वर्ग आहे हें ठरविलें पाहिजे.

(१२) राजिनाम्याचा परिणाम—

वर आपण पाहिलेंच कीं योग्य प्रकारच्या राजिनाम्यानें खातेदाराच्या हरएक बोजाविरहित खातेदाराचें खातें खोतास मिळतें. कूळ आणि खोत यांनीं सावकारांस अगर पूर्वीच्या अगर होणाऱ्या वर्गदारांस बुडविण्याकरितां अशा तऱ्हेचा व्यवहार केल्यास, अगर मोबदला देऊन राजिनामा झाला असल्यास तो वर्ग या सदराखालीं येऊन हक्कवाल्या खातेदारानें उत्पन्न केलेले सर्व बोजे शाबूद राहतात. १९१२ च्या पूर्वीं धारेकरी यांस आपल्या जमिनीचा खोतास राजिनामा देण्याचा हक्क होता व राजिनामा दिलेल्या जमिनी खोताकडे येत असत. परंतु आतां १९१२ च्या दुरुस्तीनें तो हक्क मान्य केलेला नसल्यानें, त्यांस राजिनामा देणें झाल्यास खोताकडे लँ. रे. कोड क. ७४ प्रमाणें व्यवस्था करावी लागून त्यांचे सर्व बोजे अगर "लिअन्स" कायमच राहतील. राजिनामा योग्य प्रकारचा होऊन खोताकडे आलेली जमीन खोती खासगी स्वरूपाची खोत निसबत जमीन होते.

(१३) कलम ९ प्रमाणें बेकायदा वर्ग करण्याचा परिणाम—

"निरंतरचे कुळानें" अगर खातेदार कुळानें आपले "निरंतरचे कुळ-

---

over by the tenant to the khot. That is not a mere resignation of the occupancy rights I think that such deeds must be construed strictly in preservation of rights where those rights concern third parties, and we should not give effect to any document so as to bring it within Sec. 10 of the Khoti Act, if there are words in it which will take it out of the category of the deeds contemplated by the section.

वहिवाटीचे हक्कां" चा वर्ग करूं नये व करणें झाल्यास कोणत्या परिस्थितींत तो त्यास करतां येतो याचा विचार कलम ९ खालील टीपांत केला आहे. बेकायदा वर्ग झाल्यास त्याचा कांहीं विशिष्ट परिणाम होईल असें १९१२ च्या दुरुस्तीचे पूर्वीचे कायद्यांत सांगितलेलें नसल्यानें बेकायदा वर्ग तेव्हढेच रद्द समजले जात, व मूळचे खातेदाराचे सर्व हक्कसंबंध कायम राहात. परंतु १९१२ च्या दुरुस्ती पासून ही परिस्थिति बदलली असून दुरुस्त कलमांत, "अशा जमिनी खोती ह्मणून खोताचे ताब्यांत जातील" असे शब्द घालण्यांत आले व त्यामुळें १९१२ चे दुरुस्तीनंतर कुळानें बेकायदा वर्ग केल्यास त्या कुळाचे सर्व हक्क नष्ट होतात. येसा वि. सखाराम ७ मुं. लॉ. रि. ९४१ या ठरावांत न्या. बॅटी यांनीं "कायद्यानें, बेकायदा वर्ग केला तर अमुक एक परिणाम होईल असें सांगितलेलें नाहीं. वर्ग मात्र रद्दबातल निरुपयोगी होतात," इ. स्पष्ट ठराव केला आहे. (क. ९ टी. १४). त्याचप्रमाणें १९१२ चे पूर्वीचे कायद्यास अनुसरून झालेला एक महत्वाचा ठराव ह्मणजे दामोदर वि. वासुदेव २२ मुं. लॉ. रि. १०२ हा होय. या ठरावांत सर न्या. मॅक्लिऑड यांनीं असा ठराव दिला की, "१९१२ चे दुरुस्तीपूर्वी कुळानें केलेला वर्ग खोताविरुद्ध रद्दबातल असून मूळचीं कुळें खातेदार कुळें ह्मणून कायम राहातात." यावरून २९ जून १९१२ रोजीं दुरुस्ती अंमलांत येण्यापूर्वीच्या बेकायदा वर्गानें खातेदार कुळाचें कांहीं नुकसान न होतां वर्ग घेणाराचें मात्र नुकसान होतें; कारण न्या. बॅटी यांनीं ह्मटल्याप्रमाणें वर्ग घेणाराचें अस्तित्व सर्वस्वीं खातेदार कुळाचे अस्तित्वावर अवलंबून आहे. खातेदारानें राजिनामा देऊन अगर १९१२ नंतर बेकायदा वर्ग करून, अगर अन्य कोणत्याही कारणानें, आपला कुळहक्क नष्ट होईल असें कृत्य केल्यास वर्ग घेणारा खोताचें केवळ एकसाली कूळ होईल व त्यास नोटीस देऊन खोतास काढतां येईल. २९ जून १९१२ नंतरच्या वर्गानें मात्र कूळ आणि वर्ग घेणारा या दोघांचेही हक्क नष्ट होतात व खोती जमीन ह्मणून खोताकडे खात्यांतील सर्व जमिनी येतात. याच दृष्टीनें माधवराव वि. कृष्णाजी २४ मुं. लॉ. रि. १३१ या ठरावांत १९१४ सालीं झालेले तारणगहाणखतानें कुळाचे व गहाणदाराचे हक्क नष्ट होतात असें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें कृष्णाजी वि. गंगाजी दु. अ ६०४ सन १९२४ नि. ता. २४।९।१९२५ यांतही मानण्यांत आलें आहे.

### (१४) १९१३ चे दुरुस्तीचा परिणाम—

१९१३ चे दुरुस्तीनें "अशा" या शब्दाचे ऐवजीं "आपली" असा शब्द घालण्यांत आलेला व त्यामुळें असा परिणाम झाला कीं १९१२ च्या कायद्यानें सर्व खातें नष्ट होत होतें, तें आतां बदलून जेवढ्या जमिनीचा बेकायदा वर्ग होईल तेवढ्याच खोताकडे यावयाच्या असें ठरलें आहे. माधवराव वि. कृष्णाजी २४

मुं. लॉ. रि. १३१ या ठरावांत या दोन शब्दांचा पूर्ण विचार न्या. शहा यांनीं केलेला असून शेवटीं जेवढ्या जमिनी अगर जेवढ्या जमिनीचा भाग अगर खात्यांतील हिस्सा बेकायदा वर्ग केलेला असेल, तेवढ्याच जमिनी, भाग, अगर हिस्सा खोताकडे येतो असें ह्मटलें आहे. त्या ठरावांत याच मुद्याचा न्या. शहा आणि प्रॅट् यांनीं सांगोपांग भरपूर विचार केला असून ठराव फारच लांब असल्यामुळें येथें सर्व देतां येणें शक्य नाहीं. न्या. प्रॅट् यांनीं आपले ठरावाचे अखेर "आपली जमीन" वगैरे या कलमांतील हानिकारक शब्दयोजनेचा अर्थ खात्यांतील वर्ग करण्याचा हेतु असलेली जमीन अगर ज्यांमधील हितसंबंध वर्ग करण्याचा हेतू आहे अशी जमीन" असें ठरविलें आहे.* हेंच तत्व पुढें चालवून कृष्णाजी वि. गंगाजी दु. अ. नंबर ६०४ सन १९२४ नि. ता. २४।९।१९२५ या ठरावांत सर न्या. मॅक्लिऑड आणि कोयाजी यांनीं ठरविलें आहे कीं, कुटुंबाच्या कर्त्यानें जर बेकायदा वर्ग केला तर त्याचा परिणाम कुटुंबांतील इतर हक्कदारांच्या हिशावर न होतां फक्त त्या एकट्याचाच हक्क नष्ट होतो. "आपल्या" याचा अर्थ "त्याच एकट्याचा" असा करावयाचा."§ या मुकदम्यांत तर बापानें वर्ग केला होता, व त्याचा परिणाम वडिलोपार्जित इष्टेट असल्यामुळें मुलांच्या हिश्यावर होत नाहीं असें ठरविण्यांत आलें. तेव्हां १९१३ च्या दुरुस्तींत घातलेल्या "आपली" याचा अर्थ, आपली एकट्याची व जेवढी बेकायदा वर्गाच्या दस्तैवजांत नमूद असेल तेवढीच," असा करावयाचा आहे.

---

* "The phrase "His land" in the penal part of the section means the portion of the land in the holding which is purported to be transfered or in which an interest is purported to be transfered."

§ "This highly penal enactment was passed in the interest of the khot and it must be construed strictly. We do not think that it was intended that if the manager of a joint family mortgage the interest of the family in property held under khoti tenure, the interest of all the remaining members of the family should be forfeited.

"By the amendment, the word "His" was substituted for the word 'Such.' That appears to be an important amendment and shows that the legislature intended that only the interest of the occupant purporting to transfer the land should be at the disposal of the khot, if the khot's consent to such transfer had not been obtained"

**(१५) खातेदार कूळहिसेदारांचे आपसांतील वर्ग बेकायदेशीर नाहींत—**

खातेदारानें आपल्या जमिनी तिसऱ्याच इसमास वर्ग केल्यास त्याचा परिणाम काय होतो हें वर ठरलें. त्याचे उलट खातेदार कुळाचे पोटहिसेदारांमध्यें आपसांत जर वर्ग झाला, म्हणजे एका हिसेदारानें आपला खात्यांतील हिस्सा दुसऱ्या त्याच खात्यांतील हिसेदारास वर्ग केला तर असा वर्ग बेकायदेशीर होत नाहीं; इतकेंच नव्हे तर असा वर्ग खोती से. आक्टाचे क्षेत्रांतही येत नाहीं. बाळकृष्ण वि. जगन्नाथ दु. अ. नं. ६७४ सन १९१७ नि. ता. २६।६।१९२१ या ठरावांत खातेदारांपैकीं एका हिसेदारानें आपला एक दशांश हिसा दुसऱ्या हिस्सेदारास विकला व दुसऱ्या एका हिस्सेदारानें आपला हक्क मृत्युपत्रानें तिसऱ्या हिस्सेदारास दिला. तेव्हां न्या. मॅक्लिऑड व न्या. शहा यांनीं असें ठरविलें कीं "खातेदार कुळहक्काचा वर्ग करण्याविरुद्ध असलेल्या खोती आक्टांतील अटी मोडल्या गेल्या नसून खात्याची फोड होईपर्यंत मिळकत एक आहे असें समजलें पाहिजे. खात्यांतील हिस्सेदारांनीं आपले हिस्से त्याच खात्यांतील दुसऱ्या हिस्सेदारांस वर्ग केले ह्यावर बेकायदा वर्गावर होणारा परिणाम घडणारा नाहीं."* यावरून खात्यांतील हिस्सेदारांत आपसांत वर्ग झाल्यास त्यास कायदेशीर बाध येत नाहीं व त्यामुळें असा वर्ग झाला असतां तो योग्य असतो. खोतासही कोणत्याही प्रकारें कांहीं हक्क प्राप्त होत नाहीं.

**(१६) कुलाबा जिल्ह्यांतील बेकायदा वर्गाचा परिणाम—**

या बाबतींत कायद्याचें मुख्य कलम ह्मणजे १८६५ चा मुं. आक्ट १ चे ३८ कलमाचा दुसरा भाग होय; व यास धरूनच कुलाबा जिल्ह्यांतील कुळांस आपल्या जमिनीचा वर्ग करतां येत नाहीं असें ठरविण्यांत आलें. [ कलम ९ टी. १५ पहा ]. आतां या वर्ग करण्याचा परिणाम काय होतो; याबद्दल विचार केला असतां अगदीं जुन्या ठरावांपासून अलीकडील ठरावांपर्यंतचें धोरण एकच असें दिसतें कीं, अशा बेकायदा वर्ग करून दुसऱ्याच्या कबजांत दिलेल्या जमिनींचा खोतास कबजा करण्याचा अधिकार आहे. नागरदास वि. गानु १८९१ प्रि. ज. १०७ या ठरावांत न्या. जार्डाईन व न्या. पार्सन्स यांनीं असें मानलें आहे कीं, "बेकायदा जर कोणी कूळ आपल्या जमिनीचा वर्ग करील तर त्यामुळें जमिनी खोतांकडे "जप्त"

* No provisions of the Khoti Act were infringed prohibiting the transfer of occupancy rights; until the occupancy holding is divided it must be considered as one property. The fact that the sharers inside the occupancy have transfered their shares to those who have also an interest in the occupancy holding, cannot operate as a transfer such as is prohibited."

म्हणून येतील व त्यास कबजा करितां येतील." हेंच तत्व पुढें बलवंत वि. विष्णु दु. अ. १८६ सन १९११ नि. ता. १।२।१९१२ या ठरावांत न्या. चंदावरकर व न्या. बॅचेलर यांनीं योग्य धरून "१८६५ पूर्वी गहाण खरेदी वगैरे करण्याचा ज्याला अधिकार नाहीं, अशा कुळानें परक्याला आपली जमीन विकल्यास त्याचें हें करणें खोताचे हक्काची पायमल्ली (ouster) करण्यासारखें असल्यामुळें खोताला अशा जमिनींचा कबजा करतां येतो." याच तत्वास अनुसरून हरि. वि. गंगाधर १८ मुं. लॉ. रि. ४४६, गोपाळ वि. भागीरथी २० मुं. लॉ. रि. ६८१, त्याचप्रमाणें गणपती वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं. लॉ. रि. ७५४ यांत बेकायदा वर्ग केलेल्या जमिनी खोताकडे येतात असें मानलें आहे. या बाबतींत आजपर्यंत झालेल्या सर्व ठरावांचे योग्य प्रकारें परीक्षण करणारा अलीकडचा ठराव म्हणजे पुरुषोत्तम वि. गणपती २८ मुं. लॉ. रि. ७५० हा असून न्या. फॉसेट व न्या. मडगांवकर या उभयतांनीं बेकायदा वर्ग केला असतां काय होतें? "जप्त" (forfeiture) होतें असें मानावें किंवा कुळानें त्याग (abandonment) केला असें मानावें या प्रश्नाचा ऊहापोह फारच उत्तम रीतीनें केला आहे; व असें ठरविलें आहे कीं, "जप्त" म्हणण्यापेक्षां "त्याग" हीच संज्ञा योग्य आहे व जमिनींचा खोताला कबजा करण्याचा अधिकार आहे.

या एकंदर ठरावांवरून रत्नागिरी जिल्ह्याप्रमाणेंच कुलाबा जिल्ह्यांतही बेकायदा वर्ग करण्याचा परिणाम होतो. मात्र फरक इतकाच आहे कीं, १९१२ पूर्वीचा ज्याप्रमाणें बेकायदा वर्ग तेवढाच अयोग्य ठरून खातेदार कुळाचे हक्क कायम रहातात, त्याचप्रमाणें कुलाबा जिल्ह्यांतील कुळानें अयोग्य वर्ग केला परंतु कबजा आपलेकडेच ठेविला, अशी परिस्थिति ज्यावेळीं असेल त्यावेळीं वर्गाचा व्यवहार रद्द ठरून कुळाचे हक्क कायम राहतात, नागरदास वि. हारे १८९१ प्रिं. ज. १३३. परंतु जर कबजा बेकायदा वर्ग घेणाराकडे गेला तर मात्र अशा जमिनी खोताकडे येतात. कुलाबा जिल्ह्याचे बाबतींत खात्याच्या सर्व जमिनी खोताकडे येतात, किंवा फक्त ज्या जमिनींचा बेकायदा वर्ग झाला असेल तेवढ्याच येतात, याबद्दल ठराव नाहीं. परंतु रत्नागिरी जिल्ह्याचेंच तत्व ग्राह्य मानलें जाणें योग्य होईल.

## (१७) सरकारचा बोजा व लियन—

लँ. रे. कोड कलम ५६ प्रमाणें सरकारदस्ताचा जमिनीवरील पहिल्या प्रतीचा बोजा आहे. व ह्या बोज्याचा जमिनीशीं संबंध असतो त्यामुळें या बोज्यावर बेकायदा वर्गाचा अगर इतर कोणत्याही व्यवहाराचा कांहीं परिणाम घडत नाहीं. सरकारला दस्त न दिल्यामुळें जमिनी विक्रीस काढाव्या लागल्यास त्यास इतर कोणत्याही व्यवहारानें बाध येत नाहीं. त्याचप्रमाणें सरकारचे "लियन" म्हणजे "तारणहक्क" जर कांहीं असतील तर त्यासही बेकायदा वर्गानें बाध येत नाहीं. लियन याचा

अर्थ प्रत्यक्ष तारण लावून न देतां येण्याचा बोजा, त्या जमिनीवर, वस्तूवर अगर हक्कावर पडणें, व त्या जमिनीचे, वस्तूचे अगर हक्काचे विक्रींतून त्याची भरपाई करून घेतां येणें. या कलमानें सरकारच्या अशा प्रकारच्या "तारणहक्कांस" बाध येत नाहीं असें स्पष्ट ठरविलें आहे.

## खोतांनीं हक्कवाल्या खातेदारांचे हक्क देणें.

**कलम ११—कोणत्याही कुळास कोणत्याही वर्गाच्याहक्कवाल्या खातेदाराचा हक्क, कोणत्याही वेळीं देण्यास, अथवा एका वर्गाच्या हक्कवाल्या खातेदारास श्रेष्ठ वर्गाच्या हक्कवाल्या खातेदाराचा हक्क कोणत्याही वेळीं देण्यास खोत मुखत्यार आहे मात्र असें ठरविलें आहे कीं, सदरहु प्रकारचा कोणताही हक्क खोतानें दिल्यामुळें जी जमीन सदरहु देणगीचा विषय असेल त्या जमिनीविषयींचा अथवा त्या जमिनीवरील झाडें किंवा दुसरें जंगलाचें उत्पन्न याविषयींचा सरकारचा जो कोणताही हक्क त्यास बाध येणार नाहीं.**

खोतांनीं हक्कवाल्या खातेदाराचे हक्क देणें.

## टिपा.

(१) उद्देश—

खोतांचे खोतीगांवावरील प्रभुत्व ह्या कलमानें सरकारनें ग्राह्य मानलें आहे. खोती गांवावर सर्वस्वीं खोताचा हक्क असल्यानें त्यास आपल्या हाताखालच्या कुळांना कोणत्याही प्रकारचे उच्च दर्जाचे हक्क देतां येतात. साध्या कुळास, निरंतरचें कूळ, कच्चा धारेकरी, धारेकरी, यांपैकीं कोणतेही हक्क खोतास देतां येतात. त्याचप्रमाणें निरंतरचे कुळास कच्चाधारेकरी अथवा धारेकरी; कच्चाधारेकरी यास धारेकरी याप्रमाणें श्रेष्ठ दर्जाचे हक्क देतां येतात. कलम ९ मध्यें खोतास जमीन बगी करण्याचा अधिकार ज्याप्रमाणें देतां येतो, त्याचप्रमाणें हक्कवाल्या खातेदाराचे हक्कही आपल्या गावांतील कुळास देतां येतात. हें तत्व या कलमांत स्पष्टपणें सांगितलें आहे.

(२) "खोत मुखत्यार आहे"—

हक्कवाल्या खातेदारांचे हक्क देण्याचा अधिकार ह्या कलमानें फक्त खोतासच दिला आहे. "खोत" ह्या शब्दांत याच आक्टाचें कलम ३ (२, ब) यांत खोतकीचे सहभागिदार यांचाही समवेश होतो. यावरून एका खोतहिस्सेदारास एकट्यास हा हक्क देण्याचा अधिकार नाहीं, सर्व हिस्सेदारांची त्यास संमति पाहिजे. त्यांतून

दिल्यास त्यामुळें इतर हिस्सेदाराचें जें नुकसान होईल त्याची सर्व जबाबदारी त्याचे एकट्याचे हिश्यावर पडेल. इब्राहीम वि. कृष्णाजी २६ मुं. लॉ. रि. ४२१ या ठरावाच्या तत्वावर वहिवाटदार खोतास हा अधिकार आहे असें म्हणणें शक्य आहे, परंतु तें तत्व येथें लावणें इष्ट नाहीं. या कृत्यास सर्व खोतहिस्सेदारांची संमति पाहिजेच. स्वतंत्र धडा पडलेला असल्यास त्या धडेवाल्या खोतास असे अधिकार देण्याचा हक्क या कलमानें प्राप्त होईल. परंतु स्वतंत्र हिस्सेदार नसतां जर असे हक्क दिले, तर ते इतर हिस्सेदारांस बंधनकारक नसून त्याच्या हिश्यापुरतेच ते योग्य ठरतील. 'खोत' या शब्दानें कबजेवाला, गहाणदार असाही अर्थ येतो, असें कलम ३ [ २ अ ] यांत आहे, परंतु पुढील १२ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, कबजेगहाणखतांत असा हक्क देण्याचा अधिकार स्पष्टपणें दिलेला पाहिजे; तरच कुळांना उच्च हक्क देतां येतात. तसें नसेल तर हक्क देतां येत नाहींत. त्याचप्रमाणें खोतानें हक्क दिल्यानंतर त्याचे विरुद्ध खोताचे गहाणदारास वागतां येत नाहीं, कृष्णाजी वि. मेजर फ्रान्सिस दु. अ. नं. ८९ सन १८६५ नि. ता. १८।१२।१८६६.

## (३) कुळास हक्क देणें—

या कलमांत कुळास श्रेष्ठ हक्क देणें असा शब्दप्रयोग असून "कूळ" या शब्दांत एकसाली कूळ, "उपरी कूळ", "खातेदार" अथवा "निरंतरचें कूळ" कच्चा धारेकरी, व धारेकरी, एवढ्यांचा समावेश होतो. या कलमानें द्यावयाचे हक्क चढत्या पायरीनें द्यावयाचे आहेत. म्हणजे साध्या कुळास खातेदार कुळाचे हक्क, याप्रमाणें. परंतु त्याचे उलट कोणाचेही हक्क कमी करण्याचा त्यास अधिकार नाहीं. खोतास आपणास कांहींएक न देतां मोफत जमिनी चालाव्या अशी व्यवस्था करण्याचाही अधिकार आहे. मात्र खोताला स्वतःला जे हक्क आहेत त्याचे बाहेर, त्याचे अतिक्रमण करून, आपल्याजवळ जें नाहीं तें दुसऱ्यास देण्याचा अधिकार नाहीं. कोणास असें वाटण्याचा संभव आहे कीं, जास्त हक्क देण्याचा ज्याअर्थीं खोतास अधिकार आहे, त्या अर्थीं ते हक्क कमी करण्याचाही त्यास हक्क आहे, परंतु तसें नसून कोणत्याही प्रकारें कुळांचे हक्क कमी करण्याचा खोतास अधिकार नाहीं.

## (४) खोतास हे हक्क स्वतःचे स्वतःस घेतां येत नाहींत—

खोत हा गांवाचा जवळ जवळ मालक असल्यामुळें कुळानां त्यास हक्क देतां येतो, तसा त्याला स्वतःला कांहीं हक्क घेतां येत नाहीं, अगर खोतहिस्सेदारांपैकीं कोणासही कसलेच हक्क देतां येत नाहींत. खोतास आपण स्वतः धारेकरी होतां येणार नाहीं. खोताची जी सत्ता मूळपासून कागदोपत्रीं दाखल आहे तेवढीच कायम रहावयाची. जास्त आपली आपण मिळविणें शक्य नाहीं. सरकारानें हक्क दिल्यास गोष्ट निराळी.

(५) लेख पाहिजे असें नाहीं.—

या कलमाखालीं जे अधिकार खोतास देतां येतात त्याजबद्दल लेख पाहिजेच असें नाहीं. तोंडींसुद्धां हक्क देतां येतात. कांहीं लेख झालेला असल्यास त्यास स्टांप दिला पाहिजे अगर रजिष्टर केला पाहिजे असेंही नाहीं. केला तरी हरकत नाहीं. तितकें जास्त चांगलें. मात्र कलम १२ प्रमाणें कलेक्टरकडे अर्ज करून दिलेले हक्क लगेच नोंदून घेणें बरें, म्हणजे निरुत्तर पुरावा होतो.

(६) सरकारचे कोणतेही हक्कास बाध येत नाहीं—

लँ. रे. कोडाप्रमाणें अगर अन्य कित्येक कायद्यांनीं सरकारनें आपलेकडे कांहीं हक्क राखून ठेवलेले आहेत. उदाहरणार्थ– जमीनमहसूल जमिनीबरोबर राहतो. जमीन कोणाच्या कोणत्याही हक्कानें ताब्यांत असो, जमीनमहसूल वसूल करण्याकरितां वाटेल तें करण्याचा सरकारास अधिकार आहे, (कलम ५६); जमिनी खालीं खाण सांपडल्यास तिचेवर सरकारचा हक्क असतो, (कलम ६९); झाडांचे बाबतींत कांहीं प्रतींच्या झाडांवर सरकारचा हक्क आहे (कलम ४०) वगैरे. हे व अशा तऱ्हेचे जे जे सरकारचे हक्क आहेत ते सर्व कायमच रहावयाचे आहेत. हे हक्क खोताकडे सुद्धां येत नसल्यानें त्यास ते देतां येत नाहींत हें उघड आहे. परंतु कलमामध्यें स्पष्ट उल्लेख केलेला आहे इतकेंच.

देणगी दिल्याचा लेख.

**कलम १२— ४० वे कलमाप्रमाणें करावयाच्या कानूंत लिहिण्यांत येईल त्या नमुन्याप्रमाणें खोताकडून लेखी अर्जी पोंचल्यावर, जो लेख याविषयीं ठेवण्यास सरकार फर्मावील त्या लेखांत कलेक्टरानें, सदहु शेवटल्या कलमाप्रमाणें खोतानें दिलेल्या हक्काबाबद नोंदून ठेवावें, आणि याप्रमाणें यथायोग्य नोंद केली असेल आणि कलेक्टराच्या सहीनें खरी केली असेल ती, तींत लिहिलेल्या गोष्टींबद्दल निरुत्तर पुरावा होय.**

**परंतु असें समजू नये कीं, खोतकी कायदेशीर रीतीनें कबजांत असलेल्या गहाणदारास या कलमांतील किंवा कलम ११ यांतील कोणताही ठराव लागू आहे; मात्र गहाण घेणाराला गहाण देणारानें स्पष्ट रीतीनें सदहू कलमावरून दिलेले अधिकार चालविण्यास अखत्यार दिला असला तर लागू होईल.**

## टिपा.

**(१) उद्देश व मुख्य गोष्टी—**

खोतांनीं कुळांना हक्क दिले तरी ते हक्क दिले असें समजण्यास कायदेशीर आधार काय हा प्रश्न उद्भवतोच; कारण मागील ११ व्या कलमाखालील ५ व्या टिपेंत सांगितल्याप्रमाणें अशा तऱ्हेचे हक्क देतांना कोणत्याही प्रकारें कायद्यानें सांगितलेली, इतर गहाण खरेदी वगैरे व्यवहारांचे बाबतींत लागते तशी, कायदेशीर व्यवस्था (legal technicality) केलीच पाहिजे असें नाहीं. परंतु खोतानें दिलेल्या अधिकारास अगदीं निरुत्तरपणा यावा याकरितां काय करावें, हें या कलमांत सांगितलें आहे. त्या गोष्टीः—

१ खोतानें कलम ४० रकम फ० कानू ४ प्रमाणें कलेक्टरकडे लेखी अर्ज करणें;

२ कलेक्टरनें त्याची योग्य त्या कागदीं नोंद करणें;

३ कलेक्टरनें अशा नोंदीवर योग्य असल्याबद्दल सही करणें;

या गोष्टी झाल्या असतां ती नोंद, त्यांत नोंदलेल्या गोष्टींचा निरुत्तर पुरावा होय.

**(२) खोताकडून लेखी अर्ज पोंचल्यावर—**

हा अर्ज खोतानें कलम ४० रकम "फ" कानू ४ प्रमाणें लिहून कलेक्टरकडे करावयाचा असतो. हा अर्ज करण्याचा या कलमानें फक्त खोतासच अधिकार दिला आहे. कुळानें अमुक एक हक्क खोतानें आपणास दिला आहे, असा अर्ज करून चालणार नाहीं. कारण कलमामध्यें "खोताकडून" असे स्पष्ट शब्द आहेत. "खोताकडून" यामध्यें "सर्व खोतहिसेदारांकडून" असा अर्थ आहेच. व कलम ४० रकम "फ" कानू ४ खालीं सर्व खोतहिस्सेदारांच्या सह्या पाहिजेत, असें स्पष्टपणें नमूद केलेलेंही आहे. असा अर्ज खोतानें केलाच पाहिजे असें नाहीं. कुळाला हक्क आपणास दिल्याचा पुरावा वेळ येईल तेव्हां करण्याची कायद्यानें मुभा दिलेली आहे. मात्र तशी नोंद होणें चांगलें; कारण नोंद झाल्यास ती अगदीं निरुत्तर पुरावा होते.

**(३) नोंद कोठें करतात—**

खोती गांवांत, कुळाचे हक्क, खोती, खोत हिस्सेदार वगैरे दाखविणारा "बोटखत", हा मुख्य कागद आहे. या कागदावरच ही नोंद व्हावयाची असून फेरबदल होणें तो याच कागदावर होतो. (बोटखताबद्दलची माहिती कलम १७ खालील टीपेंत पहा).

**(४) नोंद निरुत्तर पुरावा होयः—**

खोती से. आक्टानें कलम १६ ते २१ खालीं सर्व कागदांतल्या कित्येक

नोंदीं अखेरच्या व निर्णायक पुराव्याच्या, असें ठरविलें आहे. त्याप्रमाणें अशा रीतीनें दिलेल्या हक्काची नोंद कलेक्टरच्या सहीनें योग्य त्यां कागदांत, "खोट खतांत," झाल्यास ती अगदीं निरुत्तर पुरावा मानली जाते. निरुत्तर पुरावा याचा अर्थ, नोंदीच्या विरुद्ध खोतास अगर कोणासही उलट पुरावा करतां येणार नाहीं. अंताजी वि. अंताजी २१ मुं. ४८० या ठरावांत सर न्या. फॅरन यांनीं कलम ११ व १२ यांचा उल्लेख करून असें ह्मटलें आहे कीं, कलम १२ मध्यें त्यास अनुसरून केलेली नोंद, नोंदलेल्या बाबीबद्दल निरुत्तर पुरावा असते असें स्पष्टपणें नमूद केलें आहे. "अशा वेळीं खोती कूळ कोणत्या सत्ताप्रकारानें जमीन धारण करतो याबद्दलचा निर्णय करण्याचा अधिकार कोर्टाकडून काढून घेतलेला आहे; अथवा अगदीं बरोबर बोलावयाचें ह्मणजे कोर्टाला कलेक्टरनें केलेल्या नोंदीचे मागें जाण्याची मनाई केलेली आहे."*

**कलम १३–(१८८० चा आक्ट १ यांत असलेलें हें कलम १९०४ चा आक्ट ३ कलम ३ वरून रद्द करण्यांत आलें आहे.)**

जुनें कलम.

हक्कवाला खातेदार, कूळ किंवा सहभागिदार यांच्यापासून थळ वसूल करण्याबद्दल मदत मिळण्याकरितां सन १८७९ चा जमीनमहसुलाचा कायदा कलम ८६ याप्रमाणें जेव्हां जेव्हां कलेक्टरास अर्ज करण्यांत येईल आणि ज्या थळाबद्दल मागणें असेल, तें थळ ऐनजिनसी असेल तेव्हां कलेक्टरास योग्य वाटेल तर सदर्हू थळाचे किंमतीचा पैसा वसूल करण्याविषयींचा हुकूम करण्याचा अधिकार त्यास आहे. आणि सदर्हू प्रसंगीं ज्या वर्षाबद्दल सदर्हू थळ द्यावयाचें झालें असेल त्या वर्षाबद्दल मोबदल्याचा जो दर कलेक्टर ठरवील त्या मोबदल्याच्या दरानें पैशाची रक्कम आकारावी.

टीप.

१९०४ च्या दुरुस्तीचे पूर्वी थलीचे बाबतींत योग्य नियम नव्हते, व त्यामुळें

---

* "In such a case the determination of the tenure upon which a khoti tenant holds, is withdrawn from the cognizance of the court, or more correctly speaking, the court is forbidden to go behind the entry made by the Collector and is concluded by it."

या कलमानें कलेक्टरास कलम ८६ प्रमाणें अर्ज करण्यांत येईल तेव्हां, ह्मणजे मदत दावा होईल त्यावेळीं ऐनजिनसी थलीबद्दल मोबदला–किंमत ठरवून देवविण्याचा अधिकार दिलेला होता. परंतु १९०४ च्या दुरुस्तीनें कलम ३३ यांत पुष्कळच सुधारणा करण्यांत येऊन "मोबदला–किंमत" ठरविण्याबाबद नियम करण्यांत आल्यामुळें हें कलम अगदीं निरुपयोगी झालें व त्याचमुळें १९०४ च्या दुरुस्तीनें हें कलम रद्द करण्यांत आलें आहे. आतां यापुढें मदत दाव्याचे वेळीं ऐनजिनसी थलीची किंमत ठरविण्याचा अधिकार कलेक्टर अगर त्याचे हाताखालील अधिकाऱ्यांस नाहीं. मदत दाव्यांत केलेले मागण्याप्रमाणें शाबिदी झाल्यानंतर उत्पन्न देवविलेंच पाहिजे.

## थळांचे वसुलांबद्दल.

ज्या जमिनीची लावणी करण्यास खातेदार कूळ हयगय करील त्या जमिनीचें थळ.

कलम १४— निरंतरचें कूळ आपल्या धारण केलेल्या कोणत्याही जमिनींत पीक करण्याची हयगय करील, आणि तींत पीक केलें असतां तो त्या उत्पन्नाचा हिस्सा त्या जमिनीच्या थळाबद्दल खोतास देण्यास पात्र होईल अशी ती जमीन असेल तर पीक केलें असतां जें थळ खोतास मिळतें तेंच त्या कुळाकडून घेण्याचा हक्क खोतास आहे.

या कलमाअन्वयें थळ देणें झालें असेल त्याच्या रकमेविषयीं तक्रार उत्पन्न होईल त्या प्रसंगीं ती रकम कलेक्टरानें ठरविली पाहिजे; परंतु जर खालीं लिहिल्याप्रमाणें कूळ कलेक्टराची खात्री करील तर खोतास सदहू प्रकारचें थळ वसूल करतां येणार नाहीं; ती अशी कीं, ज्या वर्षाबद्दल सदहू प्रकारच्या थळाचें मागणें आहे, त्या वर्षांत त्याच वर्गाच्या जमिनींविषयीं त्या गांवांतील वहिवाटीवर नजर दिली असतां, सदहू जमीन पड ठारं देणें योग्य होतें.

### टिपा.

(१) उद्देश—

निरंतरचे कुळाकडील जमिनीचें पीक बोटखतांतील नोंदीस अनुसरून पहाणीनें घ्यावयाचें असेल तेव्हां कुळानें आभावणीप्रमाणें थळ द्यावयाची असते.

खातेदारानें एखादी जमीन विनाकारण पड टाकल्यास खोताचें नुकसान होऊं नये याकरितां हें कलम घातलें आहे.

(२) या कलमाप्रमाणें आवश्यक गोष्टी—

(१) "खातेदार" अथवा "निरंतरचे कुळाची" जमीन पाहिजे.

(२) खातेदारानें आपल्या खातेदार कूळहक्काची जमीन वहिवाटण्याची हयगय केली असली पाहिजे.

(३) गांवशिरस्त्याप्रमाणें अगर मगदुराप्रमाणें जमीन पड टाकणें आवश्यक नसलें पाहिजे.

अशा परिस्थितींत खोतास अशा पड टाकलेल्या जमिनीची वहिवाट केली असतां जें उत्पन्न मिळणें शक्य होतें तें घेण्याचा अधिकार आहे.

(३) खोतानें घ्यावयाचें उत्पन्न—

खोतानें वास्तविक पाहणीप्रमाणें उत्पन्न घ्यावयाचें असतें, परंतु पीकच जमिनींत केलेलें नसल्यास पाहणी करणें शक्य नसतें. अशा वेळीं कोणत्या तत्वावर उत्पन्न आकारावयाचें ? वास्तविक मागील सालच्या अभावण्यांच्या सरासरीमानानें उत्पन्न घेणें योग्य होईल. परंतु कूळ आणि खोत यांचेमध्यें तंटा उपस्थित झाल्यास कलेक्टर ठरवील ती रक्कम कायम धरिली पाहिजे. कलेक्टर या शद्बांत कलेक्टरनें अधिकृत केलेले मामलेदार वगैरे अधिकारी यांचाही समावेश होतो, त्यामुळें ते अधिकारी जें उत्पन्न ठरवितील तें उत्पन्न कायम धरून त्याप्रमाणें खोतानें वसूल केला पाहिजे. मामलेदार, महालकरी वगैरे कलेक्टरचे हाताखालील अधिकाऱ्यांनीं केलेले ठरावाविरुद्ध कलेक्टरकडे अपील करण्याचा कोणासही अधिकार आहे. कारण कलमांत कलेक्टर यासच तो मुख्यत्वेंकरून अधिकार ठेविलेला आहे.

(४) जमीन वाहिवाटण्याची हयगय केल्यास—

"हयगय" या शब्दानें कार्य अर्थ निघतो हें पाहिलें पाहिजे. "**हयगय**" या शब्दानें "मुद्दाम जाणूनबुजुन कोणतीही गोष्ट करण्याचें टाळणें" असा अर्थ होतो. परंतु त्यामध्यें अपरिहार्य अडचणीमुळें, अगर खातेदाराचे नाइलाजामुळें पड राहिल्यासही "हयगय" असें ह्मणतां येईल किंवा काय ? या कलमाला जो विशेष ठरावाचा (proviso) भाग जोडला आहे त्याप्रमाणें पड टाकणें ज्या वर्षीं आवश्यक असेल तेवढ्याच वर्षाबद्दल जमीन पड टाकली असतां खोतास कांहीं मिळावयाचें नाहीं, असें ठरविलें आहे. पडणाअन्वयें पड न राहातां कुळाचे अपरिहार्य अडचणीमुळें, राब न मिळाल्यास, शेतीचीं साधनें बैल वगैरे आयत्यावेळीं दगावल्यास, कूळ स्वतः आजारी झाल्यास, वगैरे हरएक कारणानें जमीन पड राहिल्यास कुळाची "हयगय"

ह्मणणें इष्ट होणार नाहीं. कारण अशा वेळीं खोतास खोतनिसबत जमिनीप्रमाणें स्वतःच अशा जमिनी कसण्याचा अधिकार कलम ४० रकम फ कानु ३ प्रमाणें दिलेला आहे. त्याचा त्यानें उपयोग करावयाचा आहे. खोतानें आपल्याला दिलेला अधिकार बजावण्यास हयगय केल्यास कुळाला जबाबदार धरणें योग्य होणार नाहीं. मात्र "हयगय" आहे किंवा नाहीं हें प्रत्येक प्रश्नाचे वेळीं विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून राहील.

(५) जमिनी पड टाकणें—

कोकणप्रांत नापीक आहे ही गोष्ट सर्वश्रुत आहे. जमीन इतकी नापीक आहे कीं कांहीं जमिनी तर १० वर्षानंतर एकदां पीक देऊं शकतात. जमिनी पड टाकाव्या लागतात ही गोष्ट सरकारी अंमलदारांनींसुद्धां ताडून पाहिलेली आहे. साधारणपणें प्रत्येक गावांत अशा जमिनी ठराविक असून त्या किती वर्षें पड टाकावयाच्या हेंही ठरलेलें असतें. त्या शिरस्त्यास अनुसरून ज्या वर्षीं जमीन पड टाकावयाची असेल त्या वर्षीं खोतास उत्पन्न मागतां येणार नाहीं. हीं पडणाचीं वर्षें वहिवाटीचीं वर्षें धरावीं असें कलम ५ खालीं सांगितलें आहेच.

—हिशोब—

## कलम १५—खोतानें

(अ) सरकारच्या हुकुमांवरून कलेक्टर जे हिशोब ठेवण्याचें वेळोवेळीं फर्मावील ते हिशोब ठेविले पाहिजेत, किंवा ठेवविले पाहिजेत; आणि

खोतानें हिशोब ठेवावे.

(ब) ज्या ज्या वेळेस कलेक्टरास किंवा महालकऱ्याचे हुद्यापेक्षां कमी नाहीं अशा कलेक्टराचे ताब्यांतील कोणत्याही अंमलदारास लागतील त्या त्या वेळेस, ते हिशोब हजर केले पाहिजेत; आणि

आणि ज्या वेळेस लागतील त्या वेळेस ते हजर करावे.

(क) त्यास जें थळ किंवा जमीनमहसूल देण्यांत येईल, मग तो हक्कवाले खातेदारानें दिलेला असो किंवा कुळानें, किंवा त्याच्या खोतकीच्या सह-

आणि लेखी पावत्या याव्या.

भागिदारानें दिलेला असो, त्या प्रत्येक थळाबद्दल किंवा जमीनमहसुला-बद्दल लेखी पावती दिली पाहिजे.

या कलमाप्रमाणें यथायोग्य केलेला कोणताही हुकूम अमान्य केल्याबद्दल, किंवा या कलमाचे ठराव तोडल्याबद्दल कलेक्टरापुढें, किंवा ज्या तालुक्यांत सदहू गांव आहे त्या तालुक्याचा चार्ज असणारा असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर यापुढें सदहू गोष्टींची शाबिदी झाली असतां शंभर रुपयांपेक्षां जास्त नाहीं अशी रकम दंड देण्यास तो पात्र होईल, आणि तो दंड जमेच्या बाकीप्रमाणें वसूल करतां येईल.

दंड.

## टिपा.

(१) उद्देश व आवश्यक गोष्टी—

खोतास पाहणी करणें, कुळांकडून, हक्कवाल्या खातेदारांकडून, सहहिस्सेदार वगैरेकडून उत्पन्न घेणें, वगैरे पुष्कळ व्यवहार करावा लागतो. तो नीट केला जावा, पुन्हां भानगडी उपस्थित होऊं नयेत या करितां खोताच्या व्यवहाराचे कागद कसे ठेवावे व ते कोणी तपासावे, वगैरे गोष्टी ठरविण्याकरितां हें कलम घालण्यांत आलें आहे. या कलमानें करावयास सांगितलेल्या गोष्टी करण्याची जबाबदारी खोतावर आहे. इतकेंच नव्हे तर त्यानें त्या योग्य प्रकारें न केल्यास तो १०० रुपये पर्यंत दंडास पात्र होईल. या कलमानें खोतास करणें आवश्यक असलेल्या गोष्टी—

(१) कलेक्टर फर्मावील त्याप्रमाणें हिशेब ठेवणें.

(२) महालकऱ्यापेक्षां हुद्दा कमी नाहीं अशा अंमलदारास तो मागेल तेव्हां हिशोबाचे कागद दाखविणें.

(३) हक्कवाल्या खातेदारास, कुळास, अगर सहहिस्सेदारास, थल अगर महसूल दिल्याबद्दल पावती देणें.

(२) खोतानें हिशोब ठेविले पाहिजेत—

हिशोब ठेवण्याचे बाबतींत, हें कलम, कलम ४० रकम अ व ई कानु ६।७, आणि या बाहेर कलेक्टरचा कांहीं हुकूम होईल तर तो, या प्रमाणें वागलें पाहिजे. कलम ४० रकम ई कानु ६ प्रमाणें खोतानें तीन प्रकारचे हिशोबाचे कागद ठेवले पाहिजेत. ते—(१) अभावणी पत्रक, (२) खतावणी, (३) रयतेच्या पावती चोपड्या. ह्यांपैकीं अभावणी कशी असावी व कशी करावी हें कलम ४० (अ)

खालील कानूंत सांगितलें असून ती त्याचप्रमाणें केली पाहिजे. खतावणी व पावती चोपड्या कलम ४०–ई–६ प्रमाणें योग्य रीतीनें लिहिलेल्या पाहिजेत. कानूखालीं स्पष्ट विवेचन केलें आहे तें पहा.

## (३) अभावणी—

अभावणी कशी ठेवावी याची सविस्तर माहिती कलम ४० (अ,) यांत सांगितली आहे. त्यांतील विशेष लक्षांत ठेवावयाच्या गोष्टी ह्मणजे

(१) ज्या वर्षाची अभावणी करावयाची असेल त्याच वर्षाचे जुलै महिन्यांत अभावणी कलेक्टरनें ठरवून दिलेल्या नमुन्याप्रमाणें आंखून मामलेदार अगर महालकरी यांचेकडून शिक्के करून घेतली पाहिजे.

(२) पिकांच्या हंगामास अनुसरून कानू १ मध्यें ठरविलेल्या तारखांचे आंत अभावणी केली पाहिजे.

(३) अभावणीचा दिवस ठरवून तो सर्वांस लेखी नोटिसीनें ७ दिवस पूर्वी जाहीर करून; पोलीसपाटिलामार्फत प्रसिद्ध ठिकाणीं जाहीरनामा लावून, दंवंडी पिटवून, कळविला पाहिजे.

(४) कोणत्याही योग्य कारणानें ठरलेल्या दिवशीं पाहाणी न झाल्यास पुनः सर्व नोटिसा, जाहीरनामा, दंवंडी, वगैरे केलें पाहिजे.

(५) अभावणी शेतांत जाऊन केली पाहिजे.

(६) दोन संभावित साक्षिदार बरोबर घेतले पाहिजेत.

(७) पाहणी होतांच साक्षिदारांच्या सह्या घेतल्या पाहिजेत.

(८) कूळ अगर गुमास्ता अभावणीवेळीं हजर असल्यास त्याचवेळीं तेथल्यातेथें अभावणींतील नोंदीची सहीनिशीं नक्कल त्यास दिली पाहिजे.

(९) कूळ पाहणीच्या वेळीं हजर नसेल तर त्यास २४ तासांचे आंत अभावणीचे नोंदीचा उतारा लेखी दिला पाहिजे.

यापेक्षां जास्त माहिती कलम ४० (अ) खालीं पहावी. आभावणीं नियमास अनुसरून योग्य प्रकारें न केल्यास ती बेकायदेशीर, अग्राह्य ठरून कूळ कबूल करील तितकेंच उत्पन्न खोतास कलम ४० रकम (अ) कानू ८ प्रमाणें, घेणें भाग होईल.

ज्याप्रमाणें अभावणी योग्यप्रकारें करण्याची जबाबदारी खोतावर आहे त्याचप्रमाणें ती योग्य करून घेण्याची जबाबदारी कुळावरही आहे. योग्य रीतीनें अभावणी खोतानें न केल्यास सात दिवसांचे आंत मामलेदार अगर महालकरी यांस लेखी कळवून त्यांचेमार्फत आपली अभावणी योग्यप्रकारें करून घेतली पाहिजे. तसें न केल्यास खोतानें केलेली अभावणी कलम ४०–अ.–६ प्रमाणें कूळ हजर असतां निर्णायक व अखेरचा पुरावा असें मानलें पाहिजे, व कुळाचे पश्चात् केलेली अभावणी विरुद्ध पुरावा येईपर्यंत गृहीत मानली पाहिजे.

(४) खातेवही (खतावणी)—

ही वहीसुद्धां खोतानें मामलेदार अगर महालकरी यांचेकडून शिक्केकरून आणविली पाहिजे. व त्यांत बोटखतास ज्या अनुक्रमानें खातीं असतील त्या अनुक्रमानें लिहिलीं पाहिजेत. प्रत्येक खात्यास येण्याचा तपशील अभावणींच्या तारखांपासून १५ दिवसांचे आंत नावेंच्या बाजूस लिहून, थल आल्यानंतर जमेच्या बाजूस लिहिली पाहिजे.

(५) रयतेचीं पावती बुकें—

ही वही कुळानें घालून जून १ तारखेचे आंत खोतापाशीं देऊन ती खोतानें मामलेदार अगर महालकरी यांचे कडून शिक्के करून आणली पाहिजे. व त्यावर नांवेकडे लिहावयाच्या येण्याचा तपशील पहाणीप्रमाणें येणें असल्यास अभावणी झाल्यापासून १ महिन्याचें आंत लिहिला पाहिजे. धारेकरी, कच्चा धारेकरी यांचे बाबतींत १ सप्टेंबरच्या आंत नांवेचा तपशील लिहिला पाहिजे. व येणें पोंचतांच तें जमेच्या बाजूला लिहून खोतानें सही करून दिली पाहिजे. ही चोपडी नेहमीं कुळापाशीं रहावयाची आहे.

(६) खोतावरील आणखी जबाबदारी.

कलम ४०—ई—६ यांत सांगितल्याप्रमाणें खोतानें आपल्या खर्चानें एक बोटखताची नक्कल आपलेपाशीं ठेविलीच पाहिजे. त्याचप्रमाणें त्यानें सुडाचा व फाळणीबुकाचा उतारा घेतला पाहिजे. बोटखत अगदीं ताजें ठेविलें पाहिजे, ह्मणजे वेळेविळीं ज्या दुरुस्त्या होतील, त्या आपले नकलेंत खोतानें करून ठेविल्या पाहिजेत. हे उतारे सहीसूद पाहिजेत असें नसून साधे असले तरी चालतात. हे तीनही उतारे खोतांनीं ठेविलेच पाहिजेत असा जरी निर्बंध असला, तरी तसे न ठेविल्यास खोत दंडास पात्र होणार नाहीं.

(७) खोताच्या या जबाबदारीचें खरें स्वरूप—

वतन आक्टाखालीं खोती वतन येत नसून कोणत्याहि प्रकारें या कलमांत सांगितलेल्या गोष्टींवर खोती वतन अवलंबून नाहीं. या कलमांत सांगितल्याप्रमाणें वागल्यासच खोती वतन खोताकडे चालेल असा अर्थ नाहीं. खोताला दंड करतां येईल, व तो दंड लँ. रे. कोडाप्रमाणें वसूल करतां येईल. या बाहेर सरकारास खोताविरुद्ध कांहीं करतां यावयाचें नाहीं. कुळकर्णी अगर त्याच प्रकारचीं कामगिरी वतनें, ज्याप्रमाणें कामगिरी योग्य प्रकारें न बजावल्यास खालसा करतां येतात, त्याप्रमाणें खोती वतनें सरकारास खालसा करतां येत नाहींत. मात्र खोतानें आपलीं कामें योग्य रीतीनें करावीं याकरितां दंडाचें शासन ठेविलें आहे. खोतानें आपलीं कर्तव्यें

योग्य प्रकारें केलींच पाहिजेत नाहीं तर जास्तींत-जास्त १०० रुपये पर्यंत दंडास तो पात्र होईल.

खोतास कोणत्याही प्रकारें आपला अंमल सरकारी अंमलदारावर चालविण्याचा अधिकार नाहीं. त्याचप्रमाणें सरकारी अंमलदारासहि खोतावर नियमाबाहेर अंमल गाजवितां येणार नाहीं.

## (८) जप्तीदारानें ठेवावयाचे हिशोब —

गांव जप्तींत असतां सरकारी अधिकाऱ्यामार्फत गांवचा वसूल व्हावयाचा असतो. बहुतकरून तलाठीच जप्तीदार असतो. गांव जप्तींत असतां जप्तीदारानेंही, अभावणी, कच्ची खतावणी, आकारणी अथवा जमाबंदी, इतके हिशोबाचे कागद ठेवावयाचे असतात.

## (९) तालुक्यास ठेवावयाचे हिशोब—

खोती गांव अगर धडा जप्तींत गेल्यास जप्तीदाराचे हिशोबास अनुसरून मामलेदार अगर महालकरी यांच्याकडे खालीलप्रमाणें हिशोब ठेवतात.

(१) नफातोटा पत्रक, (२) जप्तीचा खर्च, (३) खोती फायदा पत्रक (४) रोजकीर्द अगर कीर्द, (५) सजेवारी ( यांत कलेक्टरनें मंजूर केलेला खर्च लिहिलेला असतो ) (६) तालुक्याचा नमुना नंबर १९—ब, थलीची बाकी दाखविणारा कागद.

## (१०) हिशोबाचे कागद पाहण्याचा अधिकार महालकरी अगर त्याचे दर्जापेक्षां जास्त दर्जाचे अंमलदारासच आहे—

खोतांस कायद्याचें भरपूर ज्ञान नसल्यामुळें पुष्कळ वेळां वाटेल तो हिशोबाचे कागद पाहण्यास मागतो. मामलेदारपेक्षां खालच्या दर्जाचे कामगार लोक खोताचे हिशोब तपासण्यास पुष्कळ वेळां मागतात, परंतु तसें त्यांस करण्याचा काडीमात्र अधिकार नाहीं, हें या कलमानें स्पष्टपणें सांगितलें आहे. मामलेदार अगर महालकरी, डिस्ट्रिक्ट डेप्युटी अगर असिस्टंट कलेक्टर उर्फ प्रांतसाहेब, व कलेक्टर, ह्या हुद्यांच्या अंमलदारांनीं हिशोबाचे कागद पहावयास मागतांच ते खोतानें हजर केले पाहिजेत. त्यांत अंतर करूं नये.

## (११) दंड करणें—

कलेक्टरनें योग्य अधिकारांत योग्य प्रकारें हुकूम करून हिशोबाचे कागद ठेवण्याबद्दल सांगितलें असतां ते न ठेवल्यास अगर योग्य अधिकाऱ्यानें पहावयास मागितलें असतां न दिल्यास खोत १०० रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल. दंड कर-

ण्याचा अधिकार कलेक्टर अगर असिस्टंट अगर डेप्युटी कलेक्टर यांसच असून, त्यांचेपुढें चौकशी होऊन, खोतानें हुकूम तोडल्याबद्दलची योग्य प्रकारें कायद्यास अनुसरून शाबिदी झाल्यास त्यांस दंड करण्याचा अधिकार आहे. खालील दर्जाचे अधिकाऱ्यास हा अधिकार नाहीं. चौकशी होणें ती योग्य प्रकारें खोतास पुरावा करण्याची संधि देऊन प्रोसीजरच्या नियमास अनुसरून झाली पाहिजे. दंडाचे हुकुमावर लॅ० रे. कोडाप्रमाणें अपील करण्याची खोतास पूर्ण मुभा आहे.

# भाग ३.

## सर्वे अॅण्ड् सेटल्मेंट.

### सेटलमेंटाचे कागदपत्र.

खोती गांवाचे सेटल्मेंटाचें पत्रक तयार करणें.

कलम १६–ज्या गांवास हा आक्ट लागू आहे, त्या गांवाचे जमीनमहसुलाचें सर्वे सेटल्मेंट करण्यांत येईल, किंवा सन १८७९ चे मुंबईच्या जमीनमहसुलाच्या कायद्याचे ८ व्या बाबेच्या ठरावाप्रमाणें सुधारण्यांत येईल तेव्हां, सदर्हु कायद्याच्या १०८ व्या कलमाप्रमाणें तयार केलेले सेटल्मेंटाचे पत्रकांत प्रत्येक सर्वे नंबरचें क्षेत्रफळ आणि आकार दर्शविला पाहिजे, आणि तसेंच सदर्हु सर्वे नंबर हक्कवाल्या खातेदारानें धारण केला आहे किंवा नाहीं, हेंहि दर्शविलें पाहिजे.

"एकादा सर्वेनंबर एका किंवा अधिक हक्कवाल्या खातेदारांनीं धारण केला असेल तर सदर्हु रजिस्टरांत ज्या सत्ताप्रकारानें तो नंबर धारण केलेला असेल तो सत्ताप्रकार, त्या नंबराच्या खातेदारांचीं नावें आणि एखाद्या कायमच्या कुळानें सर्वे नंबर धारण केला असेल त्या बाबतींत त्याच्या त्यांतील हितसंबंध वारशाच्या रीतीखेरीज इतर रीतीनें दुसऱ्यास प्राप्त करून देतां येतो किंवा नाहीं हेंही निर्दिष्ट केलें पाहिजे."

हक्कवाल्या खातेदारानीं धारण केले नाहींत असे सर्वे नंबर खोताचे नांवानें सदर्हु पत्रकांत दाखल केले पाहिजेत, अथवा जर खोतकीचे विभाग झाले असतील तर, ज्या सहभागिदाराचे ते निरनिराळे विभाग असतील त्या सहभागिदाराचीं नांवें दाखल केलीं पाहिजेत.

आणि त्याचप्रमाणें आणखी एकाच खोतानें आपल्या एकट्या स्वतःच्या हक्कानें गांव धारण केला नसेल तर, सदर्हु पत्रकांत खोतकीच्या सगळे भागिदारांची याद असली पाहिजे, आणि सदर्हू प्रकारच्या प्रत्येक सहभागिदाराचा खोतकींतील हितसंबंध कितपत आहे तें लिहिलें पाहिजे.

( या कलमांतील प्यारा २ हा सन १९१३चा मुं. आक्ट ४ कलम ८८ वरून नवीन दाखल केला आहे. )

## जुनें कलम.

या कलमाच्या प्यारा दोन मध्यें दुरुस्ती करण्यांत आली असून बाकी भाग पूर्वींचाच आहे, सुधारणा होण्यापूर्वींचा दुसरा प्यारा असा होता—

जर कोणताही सर्वेनंबर एका किंवा अधिक हक्कवाल्या खातेदारांनीं धारण केला असेल तर, सदर्हु पत्रकांत, ज्या सत्ताप्रकारानें तो नंबर धारण केला असेल तो सत्ताप्रकार, त्या नंबराच्या नोंदलेल्या खातेदाराचें नांव, आणि खातेदारकुळानें सर्वेनंबर धारण केला असेल तर त्यांतील त्याचा हितसंबंध वारश्याच्या रीती खेरीज दुसऱ्या रीतीनें प्राप्त करून देतां येतो किंवा नाहीं इतकेंही लिहिलें पाहिजे.

## टिपा

**(१) उद्देश—**

जमीनमहसूल ठरविण्याकरितां सरकारला सर्वे करून जमिनीचे तुकडे पाडून प्रत्येक तुकडा अथवा सर्वे नंबर किती व कोणाच्या मालकीचा आहे हें ठरवावें लागतें व त्याप्रमाणें कागद तयार करावे लागतात. हीं सर्वे, त्यांतील नोंदी वगैरे, लँ. रे. कोडाप्रमाणें होत असून त्यांचे कागद लँ. रे. कोड कलम १०८ प्रमाणें ठेवावयाचे असतात. या कागदाला "सेटलमेंट पत्रक" असें ह्मणतात. या पत्रकांत सरकार आपल्याला जरूर तेवढ्याच नोंदी करतें. खोती प्रकारामध्यें बऱ्याच भानगडीच्या गोष्टी असल्यामुळें त्यासंबंधें नोंदी ठेवण्याकरितां "सेटलमेंट पत्रकांत" बऱ्याच नोंदी जास्त करणें आवश्यक वाटल्यावरून खोती गांवांकरितां ह्मणून हा तिसरा भाग या कायद्यांत घालण्यांत आला आहे. कलम १६ मध्यें अशा कांहीं विशिष्ट नोंदीचा उल्लेख आहे.

(२) कलम १६ प्रमाणें करावयाच्या मुख्य नोंदी—

कलम १६ नें नोंदी करावयास सांगितल्या आहेत त्याः—

(१) सर्वे नंबर, पोटनंबर, फाळणी नंबर;

(२) जमिनीचें प्रत्येक नंबरवार क्षेत्रफळ, खराब्यासुद्धां;

(३) आकार–सरकारदस्त–किती तें;

(४) सर्वे नंबर हक्कवाल्या खातेदारानें धारण केला आहे किंवा नाहीं;

(५) सत्ताप्रकार; ह्मणजे ज्या प्रकारांत धारण करणारा येत असेल तो. उ०– धारा, कच्चा धारा, इत्यादि;

(६) सर्वे नंबराच्या खातेदाराचें नांव;

(७) खातेदार–" निरंतरचें कूळ "–असेल तर त्यांतील हितसंबंध वारशाशिवाय अन्य रीतीनें वर्ग करण्यास पात्र आहे किंवा काय याबद्दल शेरा;

(८) जे सर्वे नंबर हक्कवाल्या खातेदारानें धारण केलेले नसतात त्यास खोताचें नांव दाखल करणें;

(९) खोतकीचें वांटप झालें असेल तर प्रत्येक खोतहिस्सेदाराचें त्याच्या हिश्यांतील सर्वे नंबरास नांव दाखल करणें;

(१०) गांव समाईक असून एक खोत नसेल त्या वेळीं खोत हिस्सेदारांचीं नांवें दाखल करणें;

(११) अशा खोतहिसेदारांचा प्रत्येकीं हिस्सा किती तें दाखल करणें;
(दत्तात्रय वि. रामचंद्र २४ मुं. ५३३=२ मुं. लॉ. रि. ३५४ ह्या महत्वाचे ठरावांत न्या. पार्सन्स यांनां स्पष्टपणें नमूद केलें आहे कीं " खोतहिस्सेदार " यांत त्याचे गहाणदाराचा समावेश होत नसून अशा खोतहिस्सेदाराचे गहाणदाराची नोंद करण्याचें कारण नाहीं.)

कलम १६ प्रमाणें काय काय नोंदी करावयाच्या असतात याचा स्पष्ट उल्लेख **अंताजी वि. अंताजी २१ मुं. ४८०** या फुलबेंच ठरावांत **सर न्या. फॅरन** यांनीं केलेला आहे.

(३) लॅ. रे. कोड कलम १०८ व हें कलम—

कलम १०८ मध्यें सांगिल्याप्रमाणें " सेंटल्मेंट पत्रक " तयार करावयाचें असतें. यांत " प्रत्येक सर्वे नंबराचें क्षेत्रफळ, आकार, ठरविण्यांत येईल असा कोणताही तपशील, सरकार हुकूम करील त्याप्रमाणें " नोंदावयाचा असतो. या " सेंटलमेंट पत्रका " पेक्षां खोती सेंटलमेंटांत बऱ्याच जास्त नोंदी करावयाच्या असतात. कलम १६ बाहेर आणखीही नोंदी पुढील कलमांत सांगितल्या आहेत. अशा तऱ्हेचे जास्त नोंदीचे पत्रकाला कलम १०८ मध्यें सांगिल्याप्रमाणें तयार केलेलें " पत्रक " असें म्हणतां येईल किंवा नाहीं असा प्रश्न होता. परंतु **वैद्खान वि. सख्या**

२० मुं. ७२८ या ठरावांत न्या. जार्डाईन यांनीं असें ठरविलें आहे कीं, " अशा प्रकारच्या जास्त नोंदी त्या कागदांत असल्या तथापि ज्या सर्वे कामगारानें या विशिष्ट नोंदी केल्या, त्यानें लँ. रे. कोड कलम १०८ प्रमाणें आपलें कर्तव्य केलें नाहीं असें म्हणतां येणार नाहीं."* याप्रमाणें ठरविलें असल्यामुळें कलम १६ व १७ खालीं तयार केलेलें पंत्रकं कलम १०८ खालीं केलें असून जास्त माहिती आंत दिली आहे, असें समजावयाचें आहे. ह्याच तत्वावर कृष्णाजी वि. कृष्णाजी २१ मुं. ४६७ यामध्यें न्या. क्यांडी यांनीं कलम १०८ प्रमाणें सांगितलेल्या सेटलमेंट पत्रकांत कलम १६ प्रमाणें खोती गांवांकरितां विशिष्ट माहिती नोंदावयाची अशा प्रकारें उल्लेख केला आहे. यावरून या भागांत सांगितलेल्या नोंदी कलम १०८ खालीं केलेल्या " सेटलमेंट पत्रकाच्या " पूरक आहेत असें मानलें पाहिजे.

(४) १८६५ चा आक्ट १ व खोती से० आक्ट—

खोती से० आक्ट १८८० मध्यें अंमलांत येण्यापूर्वीं, त्याचप्रमाणें लँड रेव्हेन्यू कोड, १८७९ चा मुं. आक्ट ५, पास होण्यापूर्वीं खोती गांवांतून मोजणीला सुरवात झालेली होती व खोती सत्ताप्रकार ग्राह्य धरलेला होता. ही मोजणी सर्वेसेटल्मेंट आक्ट, १८६५ चा आक्ट १, या खालीं करण्यांत येत असून त्याचेपूर्वीं १८२७ चा रेग्युलेशन १७ प्रमाणें कारभार चालत होता. १८६५ च्या कायद्यानें सांगितलेलें " सेटल्मेंट पत्रक " त्यांतील कलम २७ प्रमाणें तयार करीत असून त्यांत प्रत्येक सर्वे नंबराची जमीन व आकार दाखवून शिवाय " जमिनीच्या सत्ताप्रकारासंबंधें हक, अधिकार, व हितसंबंध व समाजांतील निरनिराळ्या जातीसंबंधें परिस्थिति यासंबंधें जरूर ती सर्व माहिती "§ इतक्या गोष्टी दाखवावयाच्या होत्या. या नोंदीशिवाय कलम ३८ प्रमाणें कुळानें खोताला काय द्यावें हेंही नक्की ठरवावयाचें होतें. १८६५ च्या आक्ट १ खालीं केलेल्या नोंदीसंबंधें शेखदाऊद वि. शेखमदंमद,

---

* "It cannot reasonably be said that the Survey Officer, who puts on record the special matter, has failed in his duty under Sec. 108 of the Bombay Act V of 1879 or Sec 17 of the Khoti Act, if the other records he compiles as additional columns of the register or as a separate statement or schedule appended thereto."

§ Sec. 27 of Act I of 1865–"Record showing the area and assessment of each field, and containing all necessary information in regard to landed tenures, and the obligations, rights, interests, and circumstances of the various classes of the community."

लेटर्स पेटंट अपील नंबर २९ सन १९२५ नि. ता. २६।८।१९२६ या ठरावांत न्या. फॉसेट यानीं असें म्हटलें आहे कीं "सर्वे सेटलमेंट आक्टाखालीं केलेल्या नोंदी यांस खोती आक्टाखालीं जास्त विस्तृतपणें केलेल्या चौकशीइतकें महत्व नाहीं. सर्वे सेटलमेंट आक्ट याचा हेतू सर्वेनंबरचा दस्त देण्यास मुख्यतः जबाबदार कोण हें दाखविण्यापुरताच होता, आणि मला वाटतें कीं, नंतरच्या खोती आक्टाखालीं झाली तितकी तपशीलवार चौकशी अगर तपशीलवार नोंदही त्यावेळीं झाली नाहीं हें माझें म्हणणें बरोबर आहे."* या ठरावावरून १८६५ चा आक्ट १ या सर्वे सेटलमेंट आक्टानें केलेल्या नोंदी खोती आक्टाखालीं केलेल्या नोंदीइतक्या ग्राह्य मानतां येणार नाहींत.

## (५) खातेदार कूळ अगर "निरंतरचें कूळ" अशी नोंद—

कलम १६ प्यारा २ यांत सत्ताप्रकारची नोंद करण्याबद्दल लिहिलें आहे. हा सत्ताप्रकार ह्मणजे खोत, धारेकरी, कचाधारेकरी अगर खातेदार कूळ यांपैकीं प्रकार होय. ही नोंद साधें एकसाली कूळ असतांना केव्हांही करावयाची नसते. कारण त्याचा विशिष्ट सालचे वहिवाटीशिवाय जमिनींत कोणत्याही प्रकारें हितसंबंध नसतो अशा साधें कुळांकडे वहिवाटीस असलेल्या सर्व जमिनी खोतांच्या नांवावर नोंदावयाच्या असतात. नुसती "खातेदार कूळ" अशी नोंद केली असतां पुरे; "खोती खातेदार कूळ" अशी नोंद करण्याचें कारण नाहीं. "कारण खातेदार कूळ, हें ऑक्युपन्सी टेनन्ट ( Occupancy Tenant ) या इंग्रजी शब्दाचें भाषांतर असून त्याची व्याख्या खोती जमिनीचा निरंतरचा कुळहक्क असलेला धारण करणारा, अशी आहे. सरकारी नमुन्यांत ही नोंद मासल्याकरितां (as a sample) उपयोगांत आणलेली आहे. आणि अशा रीतीनें स्पष्टपणें व पूर्णपणें व्याख्या केलेली असल्यामुळें कायद्याला धरून नोंद करण्याच्या दुसऱ्या चांगल्या मार्गाची कल्पना येत नाहीं." असें न्या. जार्डाईन यांनीं रामचंद्र वि. रघुनाथ २० मुं. ४७५ या ठरावांत ह्मटलें आहे.

---

* "The entries under the Survey Settlement Act have not the same weight as the more detailed enquires made under the Khoti Act. The Survey Settlement Act was only intended to contain entries as to the particular persons who would be primarily responsible for paying the assessment in regard to survey numbers and I think I am correct in saying that there were no detailed inquiries and certainly no detailed entries, such as were made under the later Khoti Act."

(६) बोटखताचें महत्व—

"बोटखत" या नांवाचा एक सर्व्हेचा कागद सर्वांचे माहितीचा आहे. या बोटखतांत खोती आक्टानें सांगितलेल्या सर्व नोंदी येतात. परंतु या बोटखताला लँ. रे. कोड कलम १०८ खालीं अगर कलम १६ खालीं सेटलमेंट रजिस्टर ह्मणता येईल कीं, काय असा प्रश्न होता, व वैदखान वि. सखा २० मुं. ७२९ या मुकदम्यांत तसें तें सेट्लमेंट् रजिस्टर धरावें अशी तक्रारही करण्यांत आली होती, परंतु न्या. जार्डाइन यांनीं आपले ठरावांत असें लिहिलें आहे कीं, "निशाण ७ (बोटखत) यांतील मजकूर (Contents) पाहिला तर वर नमूद केलेल्या दोन्ही कलमांत (१०८ व १६) सांगितल्यापेक्षां पुष्कळ गोष्टी त्यांत आहेत, व त्यांत आणखी ज्या बाबी दाखल केल्या आहेत त्या खो. आ. चे कलम १७ यांत सांगितल्याप्रमाणें आहेत. ह्मणून तो कागद १७ कलमांतील "दुसरे कागद" या सदरांत येतो व त्याला गोपाळ वि. सखोजी १८ मुं. १३३ हा ठराव लागू पडतो" यावरून "बोटखत" या कागदांतील, कलम १७ प्रमाणें जास्त करावयास सांगितलेल्या नोंदी या लँ. रे. कोड कलम १०८ अगर कलम १६ खालील "सेटलमेंट पत्रक" यांत येत नसून त्या कलम १७ खालील दुसऱ्या कागदपत्रांत मोडतात.

(७) सेटलमेंट पत्रक व इतर पत्रकें—

कृष्णाजी वि. कृष्णाजी २१ मुं. ४६७ या ठरावांत न्या. क्यांडी यांनीं नमूद केल्याप्रमाणें चार प्रकारची पत्रकें आहेत. (१) सेटलमेंट, (२) दुसरें कागदपत्र (other records), (३) गांवचे कागदपत्र, व (४) हिशोबाचे कागद. या चार प्रकारच्या कागदांमधील फरक ध्यानांत ठेवणें अगदीं आवश्यक आहे. "सेटलमेंट पत्रक" ह्मणजे लँ. रे. कोड कलम १०८ व खोती आक्ट क. १६ प्रमाणें ठेवलेला कागद होय. हा कागद "सर्वांस (all parties) बंधनकारक" असा असतो. दुसरे कागदपत्र यांत कलम १७ व या आक्टाची इतर कलमें याप्रमाणें ज्या नोंदी करावयास सांगितल्या आहेत त्या येतात. त्यापैकीं निरुत्तर पुरावा कोणता याचेबद्दल माहिती कलम १७ खालीं पहावी. गांवचे कागदपत्र यामध्यें "अभावणी" व त्यासारखे अन्य कागद यांचा समावेश होतो. हिशोबाचे कागद या सदरांत खोतानें ठेवावयाच्या खतावण्या, कुळाच्या चोपड्या अशा प्रकारचे कागद येतात. या कागदाच्या महत्वाविषयीं पुढें वेळोवेळीं विचार केलेला आहे.

(८) खोत हिस्सेदारांबद्दलची नोंद व हक्कस्थापनेचा दावा—

या कलमाच्या शेवटच्या भागांत खोतीगांवांत खोत एकटा स्वतंत्र मालक

नसतो तेव्हां सर्व खोतहिस्सेदारांची नोंद करावी व त्या प्रत्येकाचा हिस्सा नमूद करावा असें सांगितलें आहे. ही नोंद करणें, ज्यावेळीं सहहिस्सेदारांत वांटप होऊन ज्याचा त्याचा हिस्सा ठराविक झालेला असेल त्यावेळीं, सोपें आहे, परंतु ज्यावेळीं हिस्सेदारांत वांटप नसून मिळकत समाईक असेल त्यावेळीं कठीण आहे. सर्व हिस्सेदारांत एकी असून सर्वांची प्रत्येकाला हिश्शाबद्दल कबुली मिळाल्यास प्रश्नच नाहीं. परंतु प्रत्येक हिस्सेदाराची कबुली न मिळाल्यास ही नोंद होणें कठीण आहे व ज्या हिस्सेदारांचीं नांवें दाखल नाहींत त्यांनीं काय करावें हा मोठा प्रश्न आहे. वांटपाचा दावा आणून तुटक ठरवून घेणें हा मार्ग आहेच; परंतु मिळकत " समाईक ठेवून हिस्सेवार नांव दाखल होण्याकरितां काय करावें ? अशा परिस्थितींत हक्कस्थापनेचा दावा तरी आणतां येईल किंवा नाहीं, असा एक प्रश्न आहे. या बाबतींत **भिकाजी कृष्णाजी वि. राजाराम दु. अ. नं. १२२ सन १९०६ नि. ता. १४।४ १९०८** या ठरावांत न्या. बॅचलर आणि हीटन यांनीं असें ह्मटलें आहे कीं " वादीनां प्रतिवादीशीं एकत्र कुटुंबांतील हिस्सेदार [ Coparcener ] ही स्थिति कायम ठेवून समाईक कुटुंबांतील खोती तक्षिमेंतील हिस्सा ठरवून मागणेचा हक्क स्थापनेचा दावा कोर्टात आणतां येणार नाहीं. त्या मागण्यास वांटपाचा दावा आणणेंच योग्य आहे."* या निकालाशीं विसंगत असे **पंचनंदयन वि. निलकंठयन ७ मद्रास १९१, ब्रिजभुकण वि. दुर्गादत्त २० अलहाबाद २५८** हे ठराव आहेत. मद्रासचे ठरावांत एकत्र हिंदुकुटुंबांतील तीन भावांपैकीं एका भावानें त्या कुटुंबांतील उत्पन्नापैकीं तिसरा हिस्सा आपणास मिळणेचा हक्क आहे असा दावा आणला असतां अशा तऱ्हेचा हक्कस्थापनाचा दावा योग्य आहे असें ठरवून त्यावरून तिसरे हिश्शाचे उत्पन्न घेण्याचा त्यास हक्क आहे असा ठराव झाला. अलाहाबादचे ठरावांत वडिलोपार्जित मिळकतींत कुटुंब एकत्र असून तिसरा हिस्सा आहे असा ठराव होणेकरितां हक्कस्थापनेचा दावा आणला असतां असा दावा योग्य असून एकत्र कुटुंब आहे व त्यांत वादीचा एकतृतीयांश हिस्सा आहे असा ठराव होण्यास कांहीं कायदेशीर बाध नाहीं असा ठराव झाला.

या वरून हिस्सा ठरवून घेण्याकरितां दावा आणण्यास हरकत येईल असें दिसत नाहीं. रा. अ. ग. देसाई यांचेंही असेंच मत असून त्यांच्या मतें (खो. आ. पान ७० ) " निस्संशय असा हक्कस्थापनाचा दावा एक प्रकारें वांटपाचा (partial partition) दावाच असें दिसतें व ह्मणून वाटपाचें दाव्यांत समा-

* " Plaintiffs, while retaining their character as joint co-parceners with the defendants, were not entitled to ask the Court to declare them entitled to any fixed share in the joint ( khoti ) taxim "

ईक कुटुंबाची सर्व मिळकत आली पाहिजे असा जो निर्बंध आहे त्याचे विरुद्ध ही गोष्ट दिसते. तथापि कलम १६ चा शेवटचा भाग या बाबतींत स्पष्ट दिसतो आणि कलम २१ प्रमाणें आणखी असेंही दिसतें कीं, जर अशा तऱ्हेची नोंद एकादा सहहिस्सेदार तशीच कायम राहूं देईल तर कांहीं काळानंतर नोंदीची सत्यता त्यास नाकबूल करितां येणार नाहीं." यावरून खोत हिस्सेदारास आपला अमुक एक हिस्सा असून त्यास आपलें नांव लागण्याचा हक्क आहे असा हक्कस्थापनेचा दावा आणतां येईल असें वाटतें.

**(९) या कलमांतील नोंदी शेवटच्या व निरुत्तर आहेत किंवा काय—**

या मुद्याचा विचार करतांनां पुढील कलमें १८ व २० ही लक्षांत आणिलीं पाहिजेत. कलम १८ नें दुरुस्त्या करून घेण्याची मुभा ठेविली आहे, तर कलम २० नें वर्ग करण्यास पात्र आहे किंवा नाहीं यांबद्दलची नोंद (टी. २ (७) पहा) त्याचप्रमाणें थलीचा ठराव, हे निर्णायक व अखेरचे आहेत असें ठरविलें आहे. या कलमानें निरनिराळ्या प्रकारच्या ११ नोंदी केल्या जातात. या नोंदीपैकीं वरील टी. २ (७) या नोंदी शिवाय करून निर्णायक व अखेरची अशी एकही नोंद नाहीं. सर्वेनंबर, एकर, आकार वगैरे सर्व प्रकारच्या या कलमाखालीं आलेल्या नोंदी संबंधें कांहीं चूकभूल असेल तर ती चूक कलेक्टरचे अगर योग्य अधिकाऱ्यांचे नजरेस आणून दुरुस्त करून घेतां येते, या रीतीनें दुरुस्ती न झाल्यास कलम २१ प्रमाणें दिवाणी कोर्टाचा अवलंब करून नोंद बदलून घेतां येते. या बाबतींत कृष्णाजी वि. निळो १८९४ प्रिं. ज. ८२, अली साहेब वि. विठ्ठल १८९६ प्रिं. ज. ३०९, अंताजी वि. अंताजी २१ मु. ४८०, गोपाळ वि. नागेश्वर २१ मुं. ६०८, माधव वि. देवनाक २१ मुं. ६९५, ह्या ठरावांचें धोरणही हेंच दिसेल.

**(१०) वर्ग करण्यास पात्र आहे किंवा नाहीं ही नोंद—**

खातेदाराची जमीन वर्ग करण्यास पात्र आहे किंवा नाहीं, ही नोंद या कलमाखालींच करावयाची असते. ही नोंद निर्णायक व अखेरचा पुरावा आहे हें १९०४ च्या दुरुस्तीनें या आक्टाच्या २० व्या कलमांत घालण्यांत आलें. १९०४ सालीं दुरुस्ती होण्यापूर्वी ही नोंद निर्णायक आहे असें कायद्यानें ठरलेलें नव्हतें. १९०४ चे दुरुस्तीपासून मात्र एकादी "खातेदार" अथवा "निरंतरचे कूळ"—हक्काची जमीन वर्ग करण्यास पात्र आहे किंवा नाहीं, या बाबतींतील नोंद, कलम २० प्रमाणें ठराव झाल्या दिवसापासून एक वर्षाचे आंत गव्हर्नर-ईन्-कौन्सिलकडे अर्ज करून ती फिरवून न घेतल्यास अखेरची व निर्णायक समजावयाची आहे. जमिनीचे सत्ताप्रकाराचे बाबतींत दिवाणींत काम चालवितां येतेंच. जेव्हां सत्ताप्रकारांत फेरबदल होईल तेव्हां वर्ग करण्याचे बाबीची नोंद आपसूकच रद्द पडेल. सत्ताप्रकारांत फेर-

बदल नसेल तेव्हां ही नोंद कायम आहे किंवा नाहीं असा एक प्रश्न आहे. कलम २०।२१ यांत १९०४ मध्यें दुरुस्ती होण्यापूर्वींचा अप्रसिद्ध असा एक ना. हायकोर्टाचा ठराव आहे. नारायण वि. गणेश दु. अ. नं. १४६ सन १९०१ नि. ता. २३।९।१९०१ या ठरावांत न्या. जेन्किन्स आणि न्या. चंदावरकर यांनीं असा ठराव दिला आहे कीं, "वादीचा दावा कलम २१ मध्यें दिलेल्या मर्यादेपर्यंत 'खातेदार कूळहक्क वर्ग करतां येत नाहीं' ही नोंद बंधनकारक आहे या तत्वावर आहे. परंतु तें कलम वादाचा निकाल करण्यासंबंधें जीं कलमें आहेत, त्यांपैकीं एक आहे; आणि कलम २१ मध्यें सांगितलेले कायदेशीर परिणाम वाद होऊन निकाल झाला असेल तरच होतात. ह्या ठिकाणीं वर्ग करण्याचे बाबतींत कांहीं वाद नव्हता, व त्यामुळें कलम १६ प्रमाणें ही नोंद झाली असली पाहिजे. परंतु अशा तऱ्हेच्या नोंदीच्या आंगीं तितकें बंधनकारकत्व नसतें."* या ठरावावरून असें स्पष्ट होतें कीं ही नोंद झाली त्यावेळीं वाद उपस्थित होऊन जर निकाल झाला असेल तर कलम २१ मधील शर्तीस अनुसरून तीस बंधनकारकत्व येईल. परंतु तसा निकाल नसतां नुसती नोंदच असेल तर मात्र नोंद बंधनकारक होणार नाहीं. १९०४ च्या दुरुस्तीनें या भागांतील सर्व कलमांत फेरबदल झालेला आहे; व त्या दुरुस्तीवरून ही नोंद कलम २० प्रमाणें निर्णायक पुरावा असें ठरविलें आहे. १९०४ चे पूर्वींच नोंद झाली असल्यास ती निर्णायक आहे किंवा काय असा प्रश्न आहे. रा. अ. ग. देसाई यांच्या मतें "दुरुस्तकलमाखालीं वादाअंतीं झालेली असो वा नसो, वरील प्रकारची नोंद अखेरचा (final) पुरावा होईल" असें दिसतें. (खो. आ. पान ८८). आमच्या मतें १९०४ ची दुरुस्ती या बाबतींत गतकालसापेक्ष होणार नाहीं. कारण नुसत्या नोंदीनें वर्ग करण्यास पात्र आहे, किंवा नाहीं या महत्वाचे हक्कास बाध येतो. योग्य वादाअंतीं न झालेल्या नोंदीस जर वर नमूद केलेल्या ठरावाप्रमाणें फारसें महत्व नाहीं, तर १९०४ चे पूर्वीं वाद न होतां केलेली नोंद आतां निर्णायक पुरावा कशी होऊं शकेल? शिवाय दुरुस्तीचा तसा हेतु असावा असेंही दिसत नाहीं. कारण कलम ९ प्रमाणें १८६५ चे पूर्वीं आपण खोताचे संमत्तीशिवाय वर्ग केला अशी परिस्थिति असतां, म्हणजे हक्क उत्पन्न झाला असतां, वर्ग करण्यास पात्र नाहीं असा शेरा असल्यामुळें तसा

---

* "Sec. 21 is one of a catena of sections dealing with the determination of disputes and it is only if there is a dispute that the legal consequences in Sec. 21 follow. Here there was no dispute as to the tranferability and the entry in reference to that matter must have been made in obedience to Sec. 16. But such an entry does not carry with it the same binding consequences.

कांहींच पुरावा करणें शक्य होणार नाहीं, व हक्कास बाध येईल. त्याचप्रमाणें कलम २० प्रमाणें जर नोंद निर्णायक असती, तर कलम ९ मध्येंही त्या धोरणानें दुरुस्ती करणें इष्ट होतें; परंतु तसें केलेलें नाहीं. त्या अर्थी कलम ९ तील शर्तीप्रमाणें आपणास वर्ग करण्याचा हक्क आहे असें दाखवितां आल्यास १९०४ चे पूर्वी वाद न होतां झालेली नोंद निर्णायक व अखेरचा पुरावा असें मानतां येणार नाहीं.

## (११) सर्वेनंबरच्या चतुःसीमा व कलेक्टरचा ठराव—

पुष्कळ वेळां जमिनीच्या हद्दीसंबंधें वाद उपस्थित होतात, व हद्दीचा ठराव कलेक्टरनें कायम केल्यानंतर तो अगदीं निर्णायक मानला जातो. या बाबतींत लँ. रे. कोडाचें कलम १२१ हें मुख्य असून त्या कलमाप्रमाणें " हद्दीचा ठराव होईल तो, (अ) हद्दीची रेषा अथवा हद्दीच्या खुणांची खरी जागा, तिचा, आणि (ब) हद्द ठरविली असेल तिच्या दोहों बाजूंवरील जमीन धारण करणाराचें जे, त्यांनीं प्रत्येकीं धारण केलेल्या जमिनींत निवाड्याची जमीन येते किंवा नाहीं असें ठरविलें असेल, त्या निवाड्याच्या जमिनीविषयीं हक्क, या गोष्टींचा निर्णायक आहे." इतकेंच नव्हे तर कलेक्टरला दुसऱ्याच्या नांवें लागलेल्या सर्वेनंबराची हद्द ठरविल्यानंतर जर शेजारच्या सर्वेनंबरवाल्याचा कबजा आहे असें आढळेल तर त्यास काढून टाकण्याचाही कलम १२१ नें अधिकार दिलेला आहे. यास अनुसरून हद्दींचा ठराव अगदीं निर्णायक मानण्यांत येत असे. बाई उत्तम वि. वलिजी रसूभाई १० मुं. ४५६, लक्ष्मण वि. अंतार्जा २ मुं. लॉ. रि. १०८३ आणि भागा वि. दोराबजी २२ मुं. लॉ. रि. ११११ या ठरावांत हद्दीबद्दलचा कलेक्टरचा ठराव निर्णायक असला तथापि विरुद्ध कबजाची तक्रार करतां येईल असें ठरविलें आहे. गणेश वि. रामचंद्र २३ मुं० लॉ. रि. १२०९ या ठरावांत हद्दीचा ठराव कायम असला तथापि दोन्ही बाजूंच्या जमीनदारांच्या इतर कोणत्याही हक्कास बाध येत नाहीं असें ठरलें आहे. या सर्व निकालांचें धोरण एकच असून कलेक्टर जो हद्दीचा ठराव करील तो इतर हक्कास बाध न येतां निर्णायक मानण्यांत आला आहे. परंतु कन्हैलाल वि. इस्माईल भाई २८ मुं. लॉ. रि. १४९८ या ठरावांत सर न्या. मार्टिन आणि न्या. मडगांवकर या उभयतांनीं भरपूर विचार करून असें ठरविलें कीं " ज्या ठिकाणीं दावा दाखल केल्यानंतर मुलकी कामगारांनीं हद्दीचा ठराव केला असेल, त्या ठिकाणीं शेताच्या चतुःसीमा ठरविण्याचा दिवाणी कोर्टास अधिकार आहे." या ठरावांत सर न्या. मार्टिन यानीं " सीमा " याचा अर्थ करतांना असें म्हटलें आहे कीं (पान १५०१) "सीमा ही केवळ नकाशावरील रेघ नव्हे, अगर शेतांत अगर कुंपणाचे बाजूनें काढलेली रेघ नव्हे, ज्या ठिकाणी वाद असतो त्या ठिकाणीं विव-

क्षित जमीन अची किंवा बची असा प्रश्न असतो."* हा ठराव पूर्वीच सर्व ठरावांचा विचार करून दिलेला असून फारच महत्वाचा व विचारपरिप्लुत आहे. सर न्या. मार्टिन आणि न्या. मडगांवकर यांनीं हद्दीचे बाबतींत याप्रमाणें केलेला ठराव कायम आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

## (१२) नोंद व मालकी—

सर्वे सेटल्मेंटच्या कागदीं नांव दाखल झालें एवढ्यानें मालकी सिद्ध होते कीं काय असाही एक प्रश्न आहे. परंतु ह्या प्रश्नाचें उत्तर, अशा तऱ्हेचा मालकीचा विचार करण्याचा अधिकार सेटलमेंट कामगारास आहे किंवा काय, या प्रश्नावर अवलंबून आहे. दत्तात्रय वि. रामचंद्र २ मुं. लॉ. रि. ३५४=२४ मुं. ५३३ या ठरावांत न्या. पार्सन्स यानीं असें म्हटलें आहे कीं, सर्वे कामगारांस खोतकींत कोणा-कोणाची मालकी आहे, वगैरे मालकीच्या प्रश्नाचा विचार करण्याचा अधिकार नाहीं. भोगी वि. बापुजी १३ मुं. ७५ हा ठराव याच सारखा आहे. पांडुरंग वि. अनंत ५ मुं. लॉ. रि. ९५६ या फुलबेंच ठरावांत न्या. चंदावरकर व न्या. जेकब यांनीं "कलेक्टरच्या कागदांत कांहीं विशिष्ट जमिनी एका विशिष्ट मनुष्याच्या नांवा-वर नोंदल्या आहेत, ही गोष्ट त्या मनुष्याची त्या जमिनीवरील मालकी शाबीत कर-ण्यास एकटीच पुरेशी नाहीं. ती इतर गोष्टींबरोबर घेतली असतां फक्त त्या मनुष्या-च्या मालकीचा पुरावा होऊं शकेल" असें ठरविलें आहे. याच ठरावांत न्या० ॲस्टन यांनीं विरुद्ध मत असें दिलें आहे कीं, "हा पुरावा अगदीं निर्णायक जरी नसला, तरी महत्वाचा (material) आहे असें मानावें." याच तत्वाप्रमाणें अलीं-कडील नसरंगजी वि. बाई आव्व २६ मुं. लॉ. रि. १२६४ या ठरावांत असें ठरलें आहे कीं "सर्वे आफिसरानें एकाद्या सर्वे नंबरच्या मालकीच्या बाबतींत कांहीं ठराव केल्यास त्यांत दोन गांवच्या हद्दीचा वाद नसेल तर दिवाणी कोर्टाला हात घालण्याचा पूर्ण अधिकार आहे. अशा परिस्थितींत लँ० रे० कोड कलम १२१ ची कांहींएक बाधा येत नाहीं." यावरून सर्वेनंबरापुढें एकाद्याचे नांवाची नोंद आहे एवढ्यावरून त्याची मालकी सिद्ध होते असें नाहीं.

## (१३ सेटलमेंटच्या कागदांचे पुराव्याच्या कायद्याचे दृष्टीनें महत्व—

कोर्टांत फिर्याद दाखल केल्यानंतर पुराव्याला दिलेल्या कागदांचेबद्दल नेहमीं हे पुराव्यास कितपत ग्राह्य आहेत व त्यांचें महत्व काय, याचा विचार करावा लागतो. सर्वेचे कामीं निरनिराळ्या प्रकारचे कागद असतात. हे सर्व पुराव्याच्या—एव्हिडन्स

---

* "A boundary does not merely mean a line on the map or through a field or along a fence. In a disputed case it involves the question whether certain land belongs to A or B."

आक्टाचे दृष्टीनें कितपत ग्राह्य आहेत? या बाबतींत पु० आ० कलम ३५ ग्राह्याग्राह्य ठरविणारें कलम होय. या कलमांत "सरकारी अगर दुसऱ्या आफीसच्या पुस्तकांत, रजिस्टरांत अथवा रेकार्डांत, मुद्याच्या प्रश्नासंबंधें अगर मुद्याच्या प्रश्नास धरून असलेली, आणि सरकारी नोकरानें आपलें काम बजावीत असतां केलेली अगर देशांतलि कायद्याप्रमाणें रजिस्टरांत अगर रेकार्डांत ठराविक कामावर असलेल्या दुसऱ्या एखाद्या मनुष्यानें केलेली नोंद, ही स्वतःच पुराव्यास ग्राह्य अशी गोष्ट आहे."* या कलमाचा अर्थ इतकाच कीं, अशा तऱ्हेचे कागद पुराव्यांत ग्राह्य आहेत. परंतु त्यांचें महत्व काय अगर त्यास निर्णायकत्व कितपत आहे हा प्रश्न अगदीं निराळा आहे. या कलमावरून खो० से० आक्ट, त्याचप्रमाणें लँ० रे० कोड, या दोन कायद्यांप्रमाणें सरकारी अंमलदारांनीं सेटलमेंटचे कागद तयार केलेले असल्यामुळें ते पुराव्यांत केव्हांही ग्राह्य आहेत. परंतु ते निर्णायक पुरावा नव्हत. जगदीन्द्र वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट ३० कलकत्ता २९१=३० इं. अ. ४४ या ठरावांत प्रिव्ही कौन्सिलनें या बाबतींत सर्व ठरावांचा विचार करून असें ठरविलें कीं, "हिंदुस्थानांत जमीनमहसुलाचे कामीं तयार केलेले नकाशे व सर्वेचे कागद हे सरकारी कागद असून ते योग्य लायक मनुष्यांनीं, सार्वजनिक रीत्या आणि त्यांच्याशीं ज्यांचा संबंध आहे, अशांस नोटिशीनें कळवून तयार केलेले असल्यामुळें पुराव्यांत ग्राह्य असून ते ज्या वेळीं तयार केले त्या वेळीं त्यांत नमूद असलेली परिस्थिति होती असें दाखविणारा मौल्यवान पुरावा होय. हे निर्णायक पुरावा नसून ते चुकीचे आहेत असें दाखवितां येईल. परंतु विरुद्ध पुरावा नसेल तर ते न्यायाच्या दृष्टीनें पुराव्यांत ग्राह्य मानले पाहिजेत."† त्याचप्रमाणें अगदीं अलिकडचा प्रिव्हीकौन्सिलचा ठराव म्हणजे नारोश्वर वि. गणेश २२ मुं लॉ. रि. ५९६ हा होय.

---

* "Evidence Act Sec. 35. An entry in any public or other official book, register or record, stating a fact in issue or relevant fact, and made by a public servant in the discharge of his official duty or by any other person in performance of a duty specially enjoined by the law of the country in which such book, register or record is kept, is itself a relevant fact"

† "Maps and surveys made in India for revenue purposes are official documents prepared by competent persons and with such publicity and notice to persons interested as to be admissible as valuable evidence of the state of things at the time they are made. They are not conclusive and may be shown to be wrong; but in the absence of evidence to the contrary they may be judicially received in evidence,

ह्या ठरावांत लॉ. शॉ.यांनीं असें लिहिलें आहे कीं, " अशा तऱ्हेचे कागद ( record ) मुकदम्यांतिल पुरावा ह्मणून आपली जागा घेतात. जास्त कांहीं करीत नाहींत. त्याच्या महत्वांत परिस्थित्यनुरूप फरक पडेल. आणि त्यांत ज्या गोष्टी नमूद केलेल्या असतात त्याबद्दलचा ते स्वतःच निरुत्तर पुरावा असें हिंदुस्थानच्या कायद्यांतील कोणत्याही भागांत नाहीं. ते मुकदम्यांतील इतर पुराव्यास धरून आहेत असें असूं शकेल; ते त्यामधील गौणपणा भरून काढीत असतील आणि थोडक्यांत बोलावयाचें ह्मणजे त्यांत नमूद असलेल्या गोष्टींबद्दलचा अगदीं हलका नाहीं असा पुरावा त्यांतून मिळेल. परंतु यापेक्षां त्यास जास्त महत्व दिल्यानें अन्यायाचा एक मार्ग मोकळा केल्यासारखें होईल. न्या. वर्डवुड यांनीं भागोजी वि. बापूजी १३ मुं. ७५ या ठरावांत असें ह्मटलें आहे कीं, "फातमा वि. दर्यासाहेब १० मुं. हा.को. रि. १८७ या ठरावांत कलेक्टरचीं बुकें हीं जमीनमहसुलाचे कामाकरितां ठेविलेलीं असतात, मालकी दाखविण्याकरितां नसतात. एकाद्या जमिनीचा खातेदार ह्मणून एकाद्याचें नांव कलेक्टरच्या बुकांत दाखल आहे, एवढ्या गोष्टीवरूनच केवळ त्या मनुष्याची मालकी शाबीत होते, अथवा दुसऱ्या एकाद्याची मालकी नाहींशी होते असें नाहीं." या ठरावावरून असे सर्वेचे कागद विरुद्ध पुरावा येईपर्यंत ग्राह्य असतात; विरुद्ध पुरावा आल्यास ते कोणत्याही गोष्टीचा निर्णायक पुरावा करूं शकत नाहींत.

या बाबतींत या जिल्ह्यांतलिच एक ठराव आहे. तो देणें येथें जरूर आहे. महादेव वि. देवनाक २१ मुं. ६९५ या ठरावांत सर न्या. फॅरन यांनीं असें ह्मटलें आहे कीं, " सेटल्मेंट कामगारास जमिनीवरील दस्त ठरवावयाचा असून वहिवाटदाराचें नांव आणि सरकारदस्त कोणीं द्यावा हें नक्की करावयाचें असल्यामुळें या बाबतींतिल त्याचें विधान खरें व पुराव्यास ग्राह्य मानलें पाहिजे. परंतु असें करतांना तो जीं कारणें देतो, तीं जरी समकालीन (collateral) गोष्टिसंबंधें असलीं, तथापि त्यांचेबद्दल चौकशी करण्याचें त्याचें काम नसल्यामुळें तीं पुराव्यांत ग्राह्य नाहींत." या ठरावावरून असें दिसेल कीं, एकाद्या कागदांत जरी पुष्कळ माहिती असली तथापि ती कामगारानें योग्य कायदेशीर अधिकारांत केलेली पाहिजे. अधिकाराचे बाहेर लिहिलेली कोणतीही गोष्ट पुराव्यास ग्राह्य नाहीं.

(१४) मु० आ० कलम १९ व सेटलमेंटचे कागदांतील शेरा—

मु. आ. कलम १९ प्रमाणें ज्यावेळीं मुदत भरण्याचे पूर्वीं व्यवहारास अगर हक्कास, लेखावर सही करून त्यासंबंधें रिणको कबुली देतो, त्यावेळीं त्या सही असलेल्या लेखापासून त्या व्यवहारास पुन्हां मुदत सुरू होते. या कलमास अनुसरून एखादी जमीन गहाण अशाबद्दल जर सर्वेच्या कागदांस शेरा असेल तर त्यावरून कलम १९ खालीं येणारी कबुली होते किंवा काय असा प्रश्न आहे. गहाणदारानें

नोंद करतेवेळीं अमुक एक जमीन खोताकडे गहाण असल्याबद्दल सांगितलें व व त्याप्रमाणें ती जमीन खोताचे नांवावर गहाण म्हणून चढली आणि ही नोंद ज्या पत्रकांत झाली त्या रजिस्टरावर जर खोत या नात्यानें त्यानें सही केली, तर ती योग्य प्रकारची गहाणास कबुली होते. शेख महंमद वि. जमालुद्दिन १० मुं. लॉ. रि. ३८५ ह्या ठरावांत मालकानें अमुक एक इसम आपला गहाणदार धनको असल्याबद्दल जबाब दिला व तो बरोबर असल्याबद्दल धनकोनें सही करून कबुली दिली. ही कबुली योग्य धरून तेव्हांपासून मुदत पुन्हां सुरू होते असें धरण्यांत आलें. याच ठरावांत असें स्पष्ट ठरविण्यांत आलें कीं, अशा प्रकारची व्यवहारास मिळालेली कबुली कोणत्या परिस्थितींत, कोणत्या कारणास्तव आहे हें बघण्याचें कारण नाहीं. केवळ सहिनिशीं कबुलीचा लेख असला म्हणजे झालें. या बाबतींत पुष्कळ ठराव झालेले आहेत. त्या सर्वांत हेंच धोरण कायम धरण्यांत आलें आहे.

## (१५) सर्वे सेट्लमेंट रेकॉर्ड्स—

सर्व्हे सेट्ल्मेंट्चे कागद काय असतात, व त्याचप्रमाणें खोती सेट्ल्मेंट्चे कागद काय असतात याची माहिती पुष्कळांना नसते. त्यामुळें आपला हक्क शाबीत करण्याकरितां पुराव्याचे कागद पत्र काय मिळतील ह्याची कल्पनाच नसते व पुष्कळ वेळां नुकसान होतें, या करितां खालील त्रोटक माहितीकडे लक्ष पुरविणें अगदीं आवश्यक आहे. सर्वे सेट्लमेंट्चे कागद कोणते याचा स्पष्ट खुलासा मि. गॉर्डन यांच्या "सर्वे अँड सेटलमेंट मॅन्युअल" भाग २ पान ४२६ येथें केला आहे. व ते मुख्य मुख्य खालीलप्रमाणें आहेत:—

(१) थिओडोलाइट फील्ड बुक (Theodolite Field Book)—यामध्यें दुर्बिण युक्त कोन, उंचसखलपणा वगैरे मोजतां येणाऱ्या यंत्रानें पहाणी केली त्या वेळच्या जागा दाखवून आंतील व बाहेरील कोन दाखवून अशा एका जागेपासून दुसऱ्या जागेपर्यंतचें सारवळ्यांनीं घेतलेलें अंतर, नद्या, नाले, डोंगर वगैरे सर्वेअरला नकाशा काढण्यास उपयुक्त अशा विशेष स्थलवर्णनाबद्दल टिपा दिलेल्या असतात.

(२) ट्राव्हर्स (विस्तार) पत्रक (Traverse Patrak) यांत पहाणीकरितां फिरतांना गांवच्या चतुःसीमेंत काय काय येतें ह्याची मोजणी दिलेली असते.

(३) कंटूर (पारिघ) नकाशा (Contour map)—हा नकाशा वरील नंबर २ वरून तयार केलेला असून त्यांत गांवच्या सीमा असून नद्या, नाले डोंगर वगैरे थिओडोलाईट मोजणी करितांना लक्षांत घेतलेलें विशेष स्थलवर्णन असतें.

(४) टिपण बुक (Rough Field Book)—यामध्यें (१) सर्वेनंबरची कच्ची आकृती काढलेली असून त्यामध्यें मोजणी जेथें जेथें केली तेथील मोजमापें दिलेलीं असतात. (२) त्यांतील भात, बागायत वगैरे शेतीची नक्की मोजमापें

शेतांच्या कडेला असणाऱ्या नदी नाले अगर रस्ते यांच्या लांबीरुंदीची मापें, दिलेलीं असतात. यांत फक्त शेताचें क्षेत्रफळ किती आहे याचा निर्णय केलेला नसतो व त्यास "चालते" नंबर दिलेले असतात. यांत वर्कस बद्दल मोजणी नसते; परंतु दोन खरीप नंबरांपैकीं लहान लहान वर्कसचे तुकडे मोजून त्याचे फाळणी नंबर पाडले, त्याची माहिती असते; मोठ्या मोठ्या नंबरांची कची मोजणी केलेली नसते.

(५) क्षेत्रबुकः—[ Fair Field Book ] यांत प्रत्येक सर्वेनंबरचा अगदीं स्केलावर काढलेला नकाशा असून त्याचें नक्की क्षेत्रफळ कसें ठरविलें याची माहिती दिलेली असते. आंतील मापें दिलेलीं नसून फक्त बाहेरची हद्द दाखविलेली असते.

(६) वसलेवार अगर गुणाकार बुकः—[ Area Book ] सर्वे नंबरचे विस्ताराचे गणित केलेलें असते. ( हा कागद जळावांत गेलेला असल्यामुळें फारसा उपलब्ध नाहीं ).

(७) कच्चा नकाशाः—[ Rough Village Map ] मोजणीचे मापास अनुसरून स्केलावर काढलेला नकशा चालते नंबर व पक्के नंबर दोन्ही दाखविलेले असतात. पक्के नंबर पुढील कागदांत गृहीत मानलेले असतात.

(८) पक्का नकाशा (Fair Village Map):—कच्च्या नकाशावरून स्केलावर काढलेला नकाशा असतो व त्यांत पक्का सर्वेनंबर दिलेला असून त्या सर्वेनंबराच्या चतुःसीमेंत व बाहेर असलेले नद्या नाले रस्ते वगैरे दाखविले असतात.

(९) प्रत बुक ( Classification Book )—यांत सर्वेनंबरचे ज़मिनीच्या मगदुरवारी जी प्रत लाविलेली असते ती, जमिनीचा मगदूर, पाण्याची सोय पाट वगैरे दिलेलें असतें व अशा प्रत्येक पोटविभागाची जमीन किती व वहिवाटीची किती व खराबा किती हेंही दिलेलें असतें. या शिवाय यांत जमिनीच्या मालकाचें नांव, खातेदार कुळाचें अगर वहिवाट करणाराचें नांव वगैरे माहिती असते.

(१०) बागायत तक्ता ( Register of Bagayat Lands )—यांत पाटस्थळ, पाणथळ, जमिनी झाडें किती व कोणत्या प्रकारचीं याची माहिती, बागायताला पाणी कोठून येतें, पाट आहेत किंवा विहिरी आहेत वगैरे सर्व माहिती असते व सेटल्मेंट् ऑफिसरानें स्वतः ठरविलेला आकार दिलेला असतो. बागायतापुरताच हा तक्ता असतो.

(११) कच्चा सुड—यांत सर्वे नंबर व त्याचे पोटनंबर, सत्ताप्रकार, क्षेत्रफळ, जमिनीचा मगदुर, प्रकार (वर्कस खरीप अगर बागायत) व त्याचे वर्गवारीप्रमाणें ठरविलेला दस्त वगैरे माहिती दिलेली असते.

(१२) पाहणी सुड—यांत प्रत्येक शेताचें क्षेत्रफळ, जुना नंबर, व नवा नंबर व धारण करणाराचें नांव अशी माहिती दिलेली असते. ( हें पत्रक सर्व कोकणांत नसून कुलाब्यांत आहे. )

(१३) दरवारी– निरनिराळ्या जमिनीच्या प्रकाराप्रमाणें वर्गीकरण (क्रकून दराच्या अनुक्रमानें जमिनी एकत्र आणलेल्या असतात. प्रत्येक प्रकारच्या जमिनीस निराळें दरवारी पत्रक असतें.

(१४) मुड–(पक्का मुड) यांत प्रत्येक सर्वेनंबरचा पक्का नकाशा सर्वे नंबरचे पोटनंबर व त्यांचें क्षेत्रफळ व आकार दिलेला असतो.

(१५) धारेपत्रक–यांत सर्वेच्या पूर्वींचे जमिनीचे खातेदार कोण होते, त्यांच्या जमिनी कोणत्या अगर जमिनी कोणाच्या नांवें दाखल कराव्या वगैरे माहिती असते.

(१६) फाळणी बुक–वर्कस–फाळणी-नंबराचें क्षेत्रफळ व आकार, ठिकाणांचीं नांवें, मालकाचें व कधीं कधीं वहिवाटदाराचें नांव, नंबराचा नकाशा वगैरे गोष्टी असतात.

(१७) जंगल खर्डा–यांत सर्वेनंबर, पोटनंबर, फाळणीनंबर, ठिकाणाचें नांव सत्ताप्रकार, मालकाचें नांव, खातेंनंबर, खरीप, बागाईत, वर्कस वगैरे जमिनीच्या मगदुराप्रमाणें निरनिराळा एकर आकार व एकूण आकार यांप्रमाणें माहिती असते.

(१८) हक्क नोंदणी पत्रक (Record of Right)–लँ. रे. को. कलम १३५ (ब) प्रमाणें केलेला कागद यांत (कुळें खेरीज करून जमिनीचे धारण करणारे मालक, खातेदार, गहाणदार वगैरे कोणत्या प्रकारचा व किती हक्कसंबंध आहे तें व क्षेत्रफळ आकार वगैरे माहिती असते. (हें पत्रक खालसा धारेकरी गावांतच फक्त असतें, खोती गांवांत नसतें.)

(१९) फेरफाराचें रजिष्टर–यांत रेकॉर्ड ऑफ राइट्स मध्यें मालकाचें नांव नंबर वगैरेंत करावयाचे फेरफार कसे केले हें लिहिलेलें असतें.

(२०) तक्रारी रजिष्टर–तक्रार असल्यास ती नोंदून तिचेबद्दल काय निकाल झाला हें थोडक्यांत दिलेलें असतें.

(२१) आकार फोड पत्रक–पोटहिस्सा मोजणीचेवेळीं मागील पोट, फाळणी नंबराला कोणता पोटहिस्सा नंबर दिला तें दाखवून त्यांत मालकाचें नांव क्षेत्रफळ आकार वगैरे माहिती दिलेली असते.

(२२) पोटहिस्सा मोजणीचें टिपण बुक–पोटहिस्सा मोजणी करतेवेळीं शंकू सांखळीनें घेतलेलीं मापें वगैरेचें टिपण असतें.

(२३) गट्बुक— प्लान टेबल मोजणीनें हिस्से मोजणी केलेली असते, त्याची माहिती असते.

वरील सर्व कागद जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं कलेक्टरच्या सर्वे रेकार्डांत ठेविलेले असतात. या कागदांपैकीं सर्वच कागद अस्तित्वांत आहेत असें नाहीं. परंतु चौकशी केली असतां कोणकोणते कागद आहेत हें समजतें. रेकार्ड अधिकाऱ्याकडे प्रत्येक प्रकरणास आठ आणे प्रमाणें फी दिल्यास कागद पाहावयास मिळतात. सहीसूद नकला घेणें झाल्यास डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर लँड रेकॉर्डस यांचे नांवे अर्ज केल्यास नकला मिळूं शकतात.

(१६) खोती सेटलमेंटचे कागद—

खोती सेटलमेंट आक्ट पास झाल्यापासून, किंबहुना तो पास होणार असें दिसूं लागल्यापासून खोती हक्कासंबंधें खो. से. आक्ट भाग ३ प्रमाणें नोंदी करण्याकरितां चौकशी सुरु झाली, व त्याकरितां स्पेशल सेटलमेंट आफिसर नेमण्यांत आले. या चौकशीमध्यें तयार झालेल्या कागदांस "स्पेशलचें कागद" असें ह्मणण्याचा प्रघात आहे. खोती सेटलमेंटाबाबद कागद तयार करण्यांत आले ते येणें प्रमाणें:—

(१) "अ" पत्रक— खोतांपाशीं सनद असल्यास त्याच्या नकला यांत ठेवलेल्या आहेत.

(२) "ब" पत्रक— गांवांतील खोत हिस्सेदार किती आहेत. व त्यांचा प्रत्येकीं खोतकींत हिस्सा किती हें नमूद केलेलें असतें.

(३) "क" पत्रक— चौकशीचें प्रोसीडिंग, यांत गांव कोणत्या प्रकारचा, निवळ खोती, खोतीखिचडी, कुळारग वगैरे प्रकार सांगून, चौकशींत तयार झालेल्या निशाणांची यादी असते.

(४) "ड" पत्रक—कुळाचे हकीगतीबद्दलचें रजिस्टर यांत कुळाचा प्रकार काय हें, कुळ व खोत यांच्या तक्रारी ऐकून, ठरविलेलें असतें. त्यांत रेकार्डिंग कामगाराचा या बाबतींतील निकाल असतो, व शेवटीं थलीचा ठराव दिलेला असतो. हें पत्रक कुळांच्या हक्काच्या दृष्टीनें फार महत्वाचें आहे.

(५) "ई" पत्रक—खोत व कुळें यांस केलेली नोटीस यांत गांवांतील प्रत्येक खोताची व कुळाची शक्य तोंवर नोटीस पोंचल्याची सही घेतली आहे.

(६) "फ" पत्रक—पालटाची यादी. यांत कबुलायत देण्याचे कामीं खोतांनीं आपसांत ठरविलेला क्रम, सालवारी वगैरे असून खालीं खोतांच्या सह्या घेतलेल्या आहेत. (हा कागद कांहीं ठरावांतून आहे).

(७) "ग पत्रक—मक्त्याबद्दल तेरीज; यांत खात्याचे अनुक्रमानें खातेदाराचें नांव नोंदून त्याच्या खात्यांतील सर्व नंबरवार आपसांत जो मक्ता नक्त रुपये अगर ऐनजिनसी ठरलेला असतो, तो नोंदलेला असून त्याचेवर खोतांच्या सह्याही घेतलेल्या आहेत.

(८) "ह" पत्रक—तक्रारी प्रकरणें, यांत ज्या ज्या हरएक बाबतींत तक्रार उत्पन्न झाली, त्या कामीं खोत, कुळें, साक्षीदार वगैरेंचे जाबजबाब, कागदोपत्री पुरावा हजर केला. त्यांतील अस्सल कागद अगर खऱ्या केलेल्या नकला वगैरे सर्व किरकोळ कागद असतात. प्रत्येक प्रकरण निरनिराळें ठेविलेलें असून त्याची निशाणवारी त्याचे सोबत असते. हे कागद अत्यंत महत्वाचे आहेत.

(९) "आय्" पत्रक—दुरुस्तीची यादी. (हा कागद फारच थोड्या गांवांत आहे).

(१०) "के" पत्रक—कुळांचे वर्गवारीचें पत्रक. यांत "ड" पत्रकांत जीं खातेदार कुळें असल्याचें ठरलें त्यांचा खातेनंबर, नांव व त्यांच्या हक्काची स्थिति नोंदलेली असते.

(११) "एल्" पत्रक—खोतांचा थलींचे शिरस्त्याबद्दलचा जबाब.

(१२) "एम्" पत्रक—रयत लोकांचा थलीचे शिरस्त्याबद्दलचा जबाब.

(१३) "एन्" पत्रक—थलीचे शिरस्त्याबद्दलचा ठराव. (वरील तीन कागद कांहीं गांवांतून आहेत)*

(१४) बोटखत—हा कागद खोती गांवांत अत्यंत महत्वाचा असून यांत खोती गांवासंबंधीं सर्व प्रकारची माहिती असते; प्रत्येक खातें अनुक्रमानें लिहिलेलें असून त्यांतील सर्वेनंबर, ठिकाणाचें नांव, जमीन, आकार वगैरे दिलेलें असतें. खोतांच्या खासगी जमिनी निराळ्या दाखल असून खोतनिसबत खातेंही निराळें घातलेलें असतें. थलीचा शिरस्ता, वर्ग करण्यास पात्र आहे किंवा नाहीं, वगैरे बद्दलचे शेरेही असतात.

(१५) कमीजास्ती पत्रक—बोटखतांत वेळेविळीं होणारा फरक यांत नमूद केलेला असून त्याप्रमाणें बोटखतांत दुरुस्ती होत असते.

(१६) वारसतपास—खातेदार, खोत, धारेकरी वगैरे मयत झाल्यानंतर त्यांचे वारसाबद्दल चौकशी होऊन वारसांची नांवें दाखल करण्यांत येतात. ही चौकशी या कागदांत नमूद केलेली असते.

वरील शेवटचे तीन कागद तालुक्यास असून त्याच्या प्रती हुजुर रेकार्डांतही असतात. सहीसूद नकला हुजुर रेकार्डांत अगर तालुक्यास मिळतात.

(वरील सर्व कागदांपैकीं महत्वाच्या सर्व कागदांचे नमुने शेवटीं दिले आहेत ते पहावे.)

## (१७) सर्वे सेटलमेंट, तपासणी व खोती सेटलमेंट केव्हां झालें—

सर्वे सेटलमेंट प्रथम लागू केव्हां करण्यांत आलें, त्याची तपासणी (revision) केव्हां झाली व पुढील केव्हां व्हावयाची, त्याचप्रमाणें खोती सेटलमेंटचें काम प्रत्येक तालुक्यांत केव्हां झालें याची माहिती खालील कोष्टकावरून मिळेल.

---

* हे एपेन्डिक्स सर्व कागद रत्नागिरी येथील हुजूर रेकार्डांत असून हुजूर डेप्युटी कलेक्टर यांच्या ताब्यांत असतात. या कागदांच्या सहीसूद नकला त्यांचेकडे अर्ज केला असतां मिळतात. वरील कागदांपैकीं कोणताही कागद व "ह" पत्रकांतील कोणतेंही प्रकरण ८ आणे फी दिली असतां वाचावयास मिळतें.

## रत्नागिरी जिल्हा.

| तालुका अगर पेटा. | सर्वे सेटलमेंट. | | | | खोती सेटलमेंटची चौकशी गांवीं झाली ती. |
|---|---|---|---|---|---|
| | मूळचें | पहिली तपासणी | दुसरी तपासणी | होणारी तपासणी | |
| दापोली ... | १८६८।६९ | १८९८।९९ | १९०४।५ | १९३३।३४ | १८७८ ते ८० |
| मंडणगड ... | १८६६।६७ | १८९५।९६ | १९२५।२६ | १९५५।५६ | १८७८ ते ८० |
| खेड ... | १८६८।६९ | ” | ” | ” | १८८२ ते ८४ |
| चिपळूण ... | १८७१।७२ | १९०३।०४ | ... | १९३२।३३ | १८७८ ते ७९ |
| गुहागर ... | १८७२।७३ | १९०३।०४ | ... | ” | १८७९ ते ८० |
| संगमेश्वर ... | १८८५।८६ | १९१६।१७ | ... | १९४५।४६ | १८८४ ते ८५ |
| रत्नागिरी | १८२६।२७ डुबलपहाणी १८६८।६९ | १८९७।९८ | १९१६।१७ | १९४५।४६ | १८८० ते ८१ |
| राजापूर ... | १८९०।९१ | १९२५।२६ | ... | १९५५।५६ | १८८६ ते ८७ |
| देवगड ... | १८९२।९३ | ” | ... | ......... | १८८८ ते ९० |
| मालवण ... | १८८३।८४ | १९१४।१५ | ... | १९४३।४४ | खोती नाहीं. |
| वेंगुर्ला ... | १८७५।७६ | १९०६।०७ | ... | १९३५।३६ | खोती नाहीं. |

## कुलाबा जिल्हा.

| तालुका. | मूळचें | पहिली तपासणी | दुसरी तपासणी | पुढील होणारी. |
|---|---|---|---|---|
| कर्जत ... | १८८९।९० | १९२२।२३ | ...... | १९५१।५२ |
| खालापूर पेटा. | १८९६।९७ | ” | ...... | ” |
| पनवेल ... | १८९३।९४ | १९२३।२४ | ...... | १९५२।५३ |
| पेण ... | १८९४।९५ | १९२५।२६ | ...... | १९५५।५६ |
| अलिबाग ... | १८९४।९५ | १९२५।२६ | ...... | ” |
| रोहा ... | १८९८।९९ | ...... | ...... | १९२७।२८ |
| माणगाव ... | १८६१।६२ | १८९१।९२ | १९०३।०४ | १९३२।३३ |
| महाड ... | १८६५।६६ | १८९२।९३ | ” ” | ” |

**कलम १७—दुसऱ्या कागदपत्रांत काय दाखल करावें—**

सदर्हु कलमाअन्वयें तयार केलेल्या दुसऱ्या कागदपत्रामध्यें खालीं लिहिल्याप्रमाणें तपशील असावाः—

हक्कवाल्या खातेदारांचीं थळें.

(अ) प्रत्येक हक्कवाल्या खातेदारानें कलम ३३ याच्या ठरावांअन्वयें खोतास कांहीं थळ द्यावयाचें असल्यास त्या थळाचा ऐवज आणि प्रकार; आणि

आणि खोतकीचे विभाग झाले नसतील तेव्हां सहभागिदारांचे परस्परांचे हक्क.

(ब) जर खोतकीचे विभाग झाले नसतील तर—

(१) प्रत्येक सहभागिदाराच्या कबजांत असलेले सर्व नंबर, आणि त्याबद्दल अशा सहभागिदारानें द्यावयाचें थळ; आणि

(२) सहभागिदारांनीं किंवा त्यांपैकीं कोणींही आपआपली जबाबदारी निश्चित करण्याविषयीं कोणतीही लेखी कबुलायत करून दिली असेल, अगर सदर्हु कागदपत्र तयार करतेवेळीं करून देतील त्या लेखी कबुलायतीच्या शर्ती व तपशील; आणि

(३) कलम २७ यांतील ठरावांअन्वयें गांवची वहिवाट ज्या पाळीच्या क्रमानें करण्याविषयीं सदर्हु सहभागिदार लेखी कबूल करतील ( असें त्यांनीं कबूल केल्यास ) त्या पाळीचा क्रम; किंवा

किंवा खोतकीचे विभाग झाले असतील तेव्हां प्रत्येक भाग निरनिराळा मागावा.

(क) जर वांटप झालेलें असून, खोतकीचे सहभागिदार आपआपले विभाग पृथक् पृथक् धारण करीत असतील तर,—

(१) अशा प्रत्येक पृथक् भागांची लांबी, रुंदी व हद्दी; आणि

(२) अशा दरएक भागाचे अनेक पोटभागिदार असल्यास

**त्यांच्या संबंधाचा, खोतकीचे विभाग झालेले नसतील तेव्हां सर्व सहभागिदारांसंबंधानें रकम (ब) अन्वयें जो तपशील देणें जरूर आहे, तो तपशील.**

**(हें कलम सन १९०४ चा मुं. आक्ट ३ कलम ४ वरून दाखल केलें आहे.)**

### जुनें कलम.

हक्कवाले खातेदारांचीं थळें ठरविणें—सदहु कलमाप्रमाणें तयार केलेल्या दुसऱ्या कागदपत्रांत या आक्टाचे ३३ वे कलमाच्या ठरावाप्रमाणें प्रत्येक हक्कवाले खातेदारानें खोतास द्यावयाचे थळाचा प्रकार आणि रकम, हें लिहिलें पाहिजे, आणि या कलमाप्रमाणें कोणत्याही कागदपत्रांत यथायोग्य दाखल केलेला मजकूर, त्यावरून ठरविलेल्या पात्रतेबद्दल निरुत्तर व शेवटचा पुरावा आहे.

### टिपा.

(१) उद्देश व मुख्य गोष्टी—

खोती गांवांचें सर्वे सेंटलमेंट करतानां लँ. रे. कोडांबाहेर बऱ्याच नोंदी कराव्या लागतात. सरकारी अगर खालसा गांवांत जमीन धारण करणारांचा प्रत्यक्ष संबंध सरकारशीं असतो, त्यामुळें लँ. रे. कोड, कलम १०८ प्रमाणें "सेंटलमेंट पत्रक" ठेवलें असतां पुरे होतें. परंतु खोती गांवांत सरकार व प्रत्यक्ष वहिवाट करणारे यांच्यामध्यें खोत असल्यामुळें बरेच भानगडीचे प्रश्न असतात व त्यामुळें तितक्या जास्त नोंदी ठेवणें अगदीं आवश्यक आहे; व त्याकरितांच खोती आक्टांत हा भाग दाखल करण्यांत आला आहे. या कलमानें करावयास सांगितलेल्या आणखी नोंदी येणेप्रमाणें—

(१) हक्कवाल्या खातेदारानें कलम ३३ प्रमाणें खोतास द्यावयाचे थळीचा प्रकार आणि ऐवज.

(२) समाईक खोतहिस्सेदारांच्या ताब्यांत असलेले सर्वे नंबर व त्या सर्वे नंबराबद्दल त्यांनीं काय थल द्यावयाची ती.

(३) समाईक हिस्सेदारांत लेखी कबुलायत झाली असल्यास, अगर कागद तयार करतेवेळीं झाल्यास, त्यांतील शर्ती व तपशील नमूद करणें.

(४) पाळीची यादी झाली असल्यास अगर आपसांत तोंडी ठरलें असल्यास त्याप्रमाणें पाळीचा क्रम.

(५) तुटक झालेल्या सहभागिदारांचे ताब्यांतील जमिनी.

(६) तुटक धक्यांतील सहभागिदारासंबंधें वरील प्यारे २ ते ४ प्रमाणें माहिती.

अशा रीतीनें खोती गांवांसंबधें सर्व आवश्यक अशी माहिती नोंदावयाची असते.

**(२) जुनें कलम आणि नवें कलम—**

जुनें म्हणजे १९०४ पूर्वीचे कलम व चालू कलम यांत पुष्कळ फरक आहे. पूर्वीच्या कलमानें हकवाल्या खातेदारानें खोतास द्यावयाचे थळीची नोंद करणें, एवढीच गोष्ट ठरलेली होती; व तिला याच कलमानें निरुत्तर व शेवटच्या पुराव्याचें स्वरूप देण्यांत आलें होतें. परंतु आतां या कलमांत जुन्या कलम १८ व १९ या दोन्हीं कलमांचा समावेश करण्यांत आला असून निरुत्तरपणासंबंधाचें कलम २० नवीन घालण्यांत आलें आहे. याप्रमाणें या कलमांत मोठा फरक करण्यांत आला आहे. तथापि पूर्वीचा उद्देश मात्र कायम ठेवलेला दिसतो. पूर्वी कलम १८ व १९ प्रमाणें केलेल्या व करावयाच्या सर्व नोंदी आतां या कलमाखालीं व्हावयाच्या आहेत.

**(३) "दुसरे कागदपत्र"—**

"बोटखत" या संज्ञेचा एक कागद खोती गांवांत ठेवलेला असतो व त्यामध्यें इतर नोंदींबरोबर कलम १७ प्रमाणें करणेच्या सर्व नोंदी दाखल केलेल्या असतात. "बोटखत" हा कागद "सेटलमेंटपत्रक" समाजावयाचें कीं "दुसरे कागदपत्र" समजावयाचें असा एक प्रश्न आहे. या प्रश्नाचा ऊहापोह वैद्खान वि. सख्या २० मुं. ७२९ या ठरावांत न्या. जार्डाइन यांनीं केला असून अखेर असें ठरविलें आहे कीं, "बोटखत" हा कागद "दुसऱ्या कागदपत्रांत" मोडतो. या मुकादम्यांत 'दुसरे कागदपत्र' याचा अर्थ वेगवेगळे दस्तऐवज असा करून यांतील नोंदी सर्व सेटलमेन्टचे कागदांतलि केवळ जास्त माहितीच्या नोंदी आहेत व त्यांतील निकाल ग्राह्य नाहींत, अशी तक्रार पुढें आली होती. याचें समर्पक उत्तर न्या. जार्डाईन यांनीं असें दिलें आहे कीं. "१७ रकान्यांचा कागद सेटलमेंट पत्रकाचा भाग मानणें म्हणजे जे सिद्ध करावयाचें तेंच गृहीत मानल्यासारखें होणार, असें आम्हांस वाटतें. तेव्हां हा कागद दुसऱ्या कागदपत्रांत मोडतो असें दिसतें. सर्व कामगार, ज्यास ही विशेष प्रकारची माहिती नमूद करावयाची असते ती त्यानें पत्रकाचे पुरवणी रकाने, वेगळें विधान अगर फेरिस्त, म्हणून जरी नोंदलें असलें तरी तो लँड रेकोर्ड कलम १०८ व खोतीआक्ट कलम १७ प्रमाणें आपलें कर्तव्य करण्यास चुकला

असें न्याय्य विचाराअंतीं ह्मणतां येणार नाहीं."* यावरून बोटखतांतील लँ. रे. कोड कलम १०८ चे बाहेर केलेल्या नोंदी, विधानें अगर फेरिस्तें हीं सर्व खोतीआक्टास धरून योग्य अशींच असून तीं "दुसऱ्या कागदपत्रांत" मोडतात. हेंच तत्व कृष्णाजी वि. कृष्णाजी २१ मुं. ४६७ या ठरावांतही ग्राह्य मानलें आहे. त्याच प्रमाणें अंताजी वि. अंताजी २१ मुं. ४८० या फुलबेंच ठरावांतही हेंच तत्व ग्राह्य मानलें आहे.

येथें इतकें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हे सर्व ठराव १९०४ ची दुरुस्ती होण्यापूर्वीचे आहेत; व त्यावेळीं कलम १७ नें फक्त थल व थलीचा प्रकार नमूद करावा इतकेंच सांगितलें होतें. दुरुस्त कलम १७ प्रमाणें पुष्कळ सुधारणा झालेली असून त्यांत पूर्वीच्या कलम १८।१९ प्रमाणें करावयाच्या नोंदी कराव्या अशी भर घातली आहे. परंतु खोती आक्टानें करावयास सांगितलेल्या नोंदी ह्या सर्वच 'दुसरे कागदपत्र' यांत येतात असें मानण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

(४) बोटखतांतील सर्व नोंदी पुराव्यांत ग्राह्य आहेत परंतु निर्णायक नाहींत—

बोटखत हें "सेटलमेंटपत्रकाचें" तोडीचें आहे, यांत शंका नाहीं. आणि मागील कलमांत (क. १६ टी. १२) यांत पुराव्याचे धोरणाचें जें प्रतिपादन केलें आहे तेंच येथेंही लागू आहे. बोटखत हा कागद पु० आ० कलम ३५ प्रमाणें ठेविलेला कागद असल्यामुळें तो पुराव्यास केव्हांही ग्राह्यच मानला पाहिजे. ज्याप्रमाणें सर्व सेटलमेंट पत्रक हा निरुत्तर पुरावा नव्हे त्याचप्रमाणें बोटखतांतील नोंदीही निर्णायक पुरावा नव्हे, अंताजी वि. अंताजी २१ मुं. ४८० या फुलबेंच ठरावांत न्या. रानडे यांनीं स्पष्टपणें ह्मटलें आहे कीं, "बोटखत हा दुसरे कागदांपैकीं कागद असून त्यांतील नोंदी पुराव्यास ग्राह्य आहेत, परंतु त्या निर्णायक व अखेरचा पुरावा नव्हेत."†

---

* "It appears to us that it would be begging the question to hold that the statement of 17 columns is a part of the register; the document thus appears to be one of the "Other Records." It cannot reasonably be said that the Survey Officer who puts on record the special matter has failed in his duty under Sec. 108 of the Bombay Act V of 1879 or Sec. 17 of the Khoti Act, if the other records he compiles are compiled as additional columns of the register or as a separate statement or schedule appended thereto."

† "The entries are admissible in evidence but not conclusive or final."

त्याचप्रमाणें रामचंद्र वि. वासुदेव दु. अ. नंबर ११० सन १९२४ नि. ता. ११९।२५ या ठरावांतही न्या. मॅक्लीऑड आणि कोयाजी यांनींही ठरविलें आहे. ते ह्मणतात—"आह्मांस वाटतें कीं, मुन्सफ यांनीं बोटखताची नोंद निकाला-अंतीं झालेली नसल्यामुळें अखेरची नाहीं असें मानलें आहे तें अगदीं बरोबर आहे."*

(५) हक्कवाल्या खातेदारानें द्यावयाचे थलीबद्दल नोंद—

कलम ३३ खालीं हक्कवाल्या खातेदारांनीं खोतास काय द्यावें, हें सांगितलें असून त्यांपैकीं खातेदार कुळानें द्यावयाची थल कशी ठरवावी वगैरेही सांगितलें आहे. त्याप्रमाणें ठरलेली थल कलम १७ प्रमाणें नोंदावयाची असते. जुने कलमामध्यें "Nature" (जात) असा इंग्रजी शब्द वापरला होता, त्याचे ऐवजीं आतां "description" (वर्णन) असा शब्द घातला असून तोच जास्त उचित आहे. अंताजि वि. अंताजी २१ मुं. ४८० या ठरावांत न्या. जार्डाइन यांनीं "Nature" "जात" या शब्दाचा अर्थ करतांना असें ह्मटलें आहे कीं "एकंदरींत मला असें दिसतें कीं "नेचर" ह्या शब्दाचा सत्ताप्रकाराकडे संबंध नसून खंडाचा स्वाभाविक इतिहास व प्रकार, रुपये, आणे, पै या जातींकडे, त्याचप्रमाणें पीक आणि धान्य यांचे जातींकडे संबंध आहे."§ नवीन कलमांत घातलेल्या वर्णन (description) या शब्दानें हाच अर्थ होत असून तोच योग्य आहे. या कलमाच्या या भागांत करावयाची नोंद कलम ३३ ला धरून नसेल तर ती योग्य नव्हे, व विक्रा तितका निरुत्तरपणा आहे असें मानतांही यावयाचें नाहीं. रेकार्डिंग कामगाराला या बाबतींत पूर्ण अधिकार असून त्यानें केलेला निकाल, अपील वेळीं न केल्यास, अखेरचा व निर्णायक पुरावा मानला जातो. बाळाजी वि. बाळ २१ मुं. २३५ या ठरावांत परिस्थिति अशी होती कीं, रेकार्डिंग आफिसरानें कलम ३३ प्रमाणें उत्पन्नाची अर्धेल तिर्धेल याप्रमाणें उत्पन्नांचा भाग अशी नोंद न करितां कांहीं सर्वेनंबर मोफत, व कांहीं बद्दल नक्त खंड अशी नोंद केली; ही योग्य किंवा अयोग्य असा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हां त्यावर ना. हायकोर्टानें ही नोंद कलम ३३ प्रमाणें असून कलम १७ खालीं निर्णायक पुरावा होय असें ठरविलें आहे. या

---

* "We think the judge was right in holding that the entry in Botkhat was not final as it was not made after a decision."

§ "Nature does not refer to tenure but to the natural history, quality of rent, the species of coins Rupees, Annas and Pies, the species of grain and produce."

ठरावाशीं विसंगत व नंतरचा असा विठ्ठल वि. येसा २२ मुं. ९५ हा ठराव असून त्यांत ठरविण्यांत आलें आहे कीं, सर्वेनंबर मोफत भोगावयाचा ही नोंद कलम १७ खालीं येत नसून तिचे विरुद्ध दिवाणी कोर्टांत कलम २१ प्रमाणें पुरावा करून ती रद्द करून अगर फेरबदल करून घेतां येईल. न्या. पार्सन्स यांनीं ह्मटलें आहे कीं "याप्रमाणें खातेदार कुळानें नक्त खंड अगर उत्पन्नाचा ठराविक हिस्सा (अर्धेल–तिर्धेल) यां प्रमाणेंच दिला पाहिजे आणि त्यानें हेंही देऊं नये आणि तेंही देऊं नये, अर्थात् कांहींच देऊं नये, असें ठरविणें हें सर्वे कामगाराच्या अधिकाराच्या अगदीं उघडपणें बाहेरचें आहे." ह्या ठरावानें वरील २१ मुं. २३५ हा ठराव रद्द केलेला नसून त्यांत एक भेद दाखविला आहे.

एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, १९०४ चे पूर्वीच्या कायद्यानें खोत आणि कुळें यांच्या दरम्यान खंडाचे बाबतींत करार करून कायम खंड अगर कोणतीही खंड देण्याची रीत ठरविण्याची त्यांस मुभा होती; व अशीं करारपत्रें रेकार्डिंग कामगारापुढें उभयपक्षानें नेऊन नोंदून घेतलीं पाहिजेत अशी सक्तीही नव्हती. त्यामुळें १९०४ च्या पूर्वी जर खोत आणि खातेदार कुळें यांचे आपसांत कांहीं करार झाले असतील, तर नोंदीचा विचार न करितां त्या कराराप्रमाणेंच चालावें लागेल. १९०४ नंतरचे करार मात्र कलम ३३ प्रमाणें रेकार्डिंग कामगारापुढें नेऊन नोंदून न घेतल्यास बोटखताची नोंदच कायम मानली जाईल व करारपत्राचा कांहींएक उपयोग होणार नाहीं. बाळशेट वि. हरी २७ मुं लॉ. रि. १४८७ या ठरावांत ही गोष्ट सर न्या. मॅक्लिऑड यानीं ठरविली असून त्यांत ते म्हणतात, "खोती सेटलमेंट आक्ट कलम ३३ याचा एकंदर हेतु खोतास कुळाशीं बोटखताचे विरुद्ध गैरहुकमी कोणतीही व्यवस्था करूं देऊं नये असा दिसतो." या ठरावांत खासगी करार योग्य रीतीनें नोंदलेला नसल्यामुळें बोटखताचा शेराच कायम मानण्यांत आला आहे.

**(६) खंडाची नोंद अखेरचा व निर्णायक पुरावा होय—**

जुन्या १७ कलमातच खंडाची नोंद अखेरचा व निर्णायक पुरावा आहे असें सांगितलें होतें; व तीच गोष्ट आतां कलम २० मध्यें सांगितली आहे. ना. हायकोर्टाचे या बाबतींतील बहुतेक ठराव जुन्या कलमवारीला धरूनच असल्यामुळें या गोष्टीचा ऊहापोह या कलमाखालींच करणें इष्ट आहे. जुन्या कलमांत "त्यावरून ठरलेल्या पात्रतेबद्दल ( liability ) निर्णायक व अखेरचा पुरावा होय" असे शब्द आहेत. या शब्दांचा अर्थ गोपाळ वि. सखोजी १८ मुं. १३३ (१८९३) या ठरावांत सर न्या. सार्जंट यांनीं "पात्रतेसंबंधें निर्णायक व अखेरचा या शब्दाचा व्यवहारिक व व्याकरणाप्रमाणें अर्थ पाहिल्यास या बाबतींत अन्य पुरावा

दिवाणी कोर्टांत देतां न येणें असाव होतो." * तेव्हां या महत्वाच्या ठरावाप्रमाणें खंडाची नोंद पुराव्यास हजर केल्यानंतर कोणत्याच पक्षाला इतर पुरावा कोर्टापुढें देतां येणार नाहीं. हेंच तत्व रामचंद्र वि. रघुनाथ २० मुं. ४७५ (१८९५), बाळाजी वि. बाळ २१ मुं. २३५ (१८९५), गोपाळ वि. दशरथशेट २१ मुं. २४४ व कृष्णाजी वि. कृष्णाजी २१ मुं. ४६७ (१८९६) या ठरावांतून कायम केलें आहे. ही खंडाची नोंद योग्य फॉर्मवर केली नाहीं एवढ्यानें अयोग्य होत नाहीं, बाळाजी वि. बाळ १२ मुं. २३५. मात्र ती कलम ३३ प्रमाणचें केलेली असली पाहिजे, कृष्णाजी वि. कृष्णाजी ही थलीची नोंद निर्णायक पुरावा कोठपर्यंत असते हेंही ध्यानांत आणलें पाहिजे. ही नोंद फक्त खातेदार अथवा निरंतरचें कूळ असेल तेव्हांच निर्णायक पुरावा होईल. महंमद इब्राहीम वि. अल्ली दु. अ. नंबर ८५० सन १९१४ नि. ता. १३।७।१९१५ या अप्रसिद्ध परंतु महत्वाच्या ठरावामध्यें सर न्या. स्कॉट आणि न्या. शहा यांनीं असें ठरविलें आहे कीं, "केवळ अपिलेंटच्या बाजूची नोंद आहे एवढ्यावरून ती अखेरचा व निर्णायक पुरावा आहे असें आह्मांस वाटत नाहीं, कारण हकवाल्या खातेदारांच्या मात्रतेबद्दल (liability) किंवा खातेदार कुळाच्या हितसंबंधाबद्दल नोंद करण्याचा हेतु असेल त्यावेळींच फक्त कलम २० खालील नोंद अखेरचा व निर्णायक पुरावा होऊं शकते."† पण कूळच ज्यावेळीं अन्य प्रकारचें असेल, त्यावेळीं ही नोंद निर्णायक नाहीं इतकेंच नव्हे तर अगदीं निरुपयोगी आहे.

(७) सत्ताप्रकार आणि खंडाची नोंद—

खातेदार कुळाचें बाबतींत खंडाची नोंद निर्णायक व अखेरची असली, तथापि खातेदार कूळ अथवा निरंतरचें कूळ ही नोंद तशी निर्णायक नाहीं. ती कलम २१ प्रमाणें योग्य कोर्टाकडे जाऊन फिरवून घेतां येते. अंताजी वि.

---

* "The words "conclusive and final evidence of the liability" must in the ordinary and grammatical meaning have the effect of shutting out any other evidence on the subject which might be adduced before the civil court."

† "We do not think that the mere fact of an entry being in favour of Isub is final and against the other side, for entries are to be conclusive and final evidence under Sec. 20, when they purport to record certain facts with regard to the interest of occupancy tenants or with regard to the liability of the privileged occupant."

अंताजी २१ मुं. ४८० या फुलबेंच ठरावांत न्या. जार्डाईन यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "सत्ताप्रकाराचे नोंदींत फेरबदल करूं देण्याचा एक परिणाम खंडाचा ऐवज आणि प्रकार बदलूं देणें असा होऊं शेकल. कारण ज्याप्रमाणें अपूर्णांकाची किंमत त्याच्या छेदाप्रमाणें फिरते त्याचप्रमाणें खंडाचा ऐवज आणि प्रकार हेंही सत्ताप्रकाराची नोंद जशी बदलेल त्याप्रमाणें बदलतात. कारण थांबल्यानंतर कायद्याचा अंमलही थांबतो ("cessat ratio cessat lex") या कायद्याचे तत्वांतत्व यास उत्तर आहे. कोर्टानें सत्ताप्रकार निराळा आहे असा ठराव केल्यास त्या सत्ताप्रकारास अनुसरून केलेले खंडाचा प्रकार आणि ऐवज यांबद्दलचा ठराव निरर्थक आणि रद्दबातल होईल. सर्वे कामगारांनीं केलेला सत्ताप्रकाराबद्दलचा निकाल अखेरचा नाहीं." याच ठरावांत सर न्या. फॅरन् यानीं असें ह्मटलें आहे कीं, "सत्ताप्रकार बरोबर रीतीनें ठरविला आहे व नोंदला आहे या समजुतीवर खंडाचे नोंदीचा निर्णायकपणा अवलंबून असतो. सत्ताप्रकारासंबंधे निर्णय केल्यानंतर कोर्टाचें काम पुरे होतें व नंतर खंडाचे बाबतींत कराव्या लागणाऱ्या जरूर त्या दुरुस्त्या करण्याचें काम सर्वे कामगारांवर कलम २२ ( जुन्या ) प्रमाणें पडतें."

या फुलबेंच ठरावांत सत्ताप्रकार आणि खंडाचे नोंदीचा, व नोंदीचें निर्णायकत्व यांचे परस्पर संबंधाचा, विचार पूर्णपणें झालेला असून सत्ताप्रकाराची नोंद कोर्टाला बदलतां येते असा निकाल कायमचा लागला आहे. त्याचप्रमाणें सत्ताप्रकाराची नोंद बदलल्यास खंडाची नोंद बदलणें अगदीं भाग आहे, हें तत्व गोपाळ वि. नागेश्वर २१ मुं. ६०८ या ठरावांतही गृहीत मानलें आहे व आतां हे कायद्याचें तत्व अगदीं ठाम व कायम झालें आहे.

**(८) खंडाची नोंद आणि कलेक्टरचा अधिकार—**

खोती सेटलमेंन्ट आक्ट सन १८८० मध्यें अमलांत येण्यापूर्वीं १८६५ चा आक्ट १ यांतील कलम ३८ प्रमाणें खंडाची नोंद करण्याचा सर्वे कामगारास अधिकार होता. तोच अधिकार या कायद्यानें पुढें चालू केला आहे. १८८० च्या खो. से. आक्टांत सर्वे कामगारांचे खंडाचे ठरावावर अपील आहे किंवा नाहीं याबद्दलचा कांहींच स्पष्ट उलगडा नाहीं; तथापि लँ. रे. कोड कलम २११ प्रमाणें ज्या रेव्हेन्यूकामगारानें ठराव केला असेल त्याचे वरिष्ठाकडे, ह्मणजे चढत्या पायरीनें गव्हर्नर-इन-कौन्सिलपर्यंत, अपील करण्याचा कोणासही अधिकार आहे. व अशा वरिष्ठ अधिकाऱ्यास ती नोंद बेकायदा अगर अयोग्य वाटल्यास फिरविण्याचाही अधिकार आहे, हें तत्व खोती आक्टासही लागू असल्याबद्दलची मान्यता गोपाळ वि. दशरथ २१ मुं. २४४ या ठरावांत दिलेली असून त्यांत कलेक्टरनें फिरविलेली

नोंद ग्राह्य मानली आहे. या ठरावांत स्पष्टपणें असें नमूद केलें आहे कीं खंडाचे बाबतींत सर्वे आफिसराचा "निकाल" निर्णायक व अखेरचा नसून त्याबद्दलची "नोंद" हा निर्णायक पुरावा होय. न्या पार्सन्स यांनीं या ठरावांत असें नमूद केलें आहे कीं "१८८० चे आक्टांत तपासणीचा अगर अपिलाचा अधिकार दिलेला नाहीं. तथापि आपल्याला अशा तऱ्हेचा अधिकार दिलेला आहे किंवा नाहीं हें लँ. रे कोडावरून ठरवितां येईल. कलम २०३ प्रमाणें सर्वसाधारण रेव्हेन्यूकामगारांच्या निकालावर, त्याचप्रमाणें हुकुमावर त्याच्या वरिष्ठाकडे कायद्यांत अपील नाहीं असा स्पष्ट उल्लेख नसेल तर, अपील करण्याचा अधिकार आहे. तेव्हां अपील नाहीं असें कोठेंही नमूद केलें नसल्यामुळें क. ३३ प्रमाणें केलेल्या ठरावावर अपील आहे आणि अशा तऱ्हेच्या महत्वाचे बाबतींत केव्हांही असें अपील असणें इष्ट आहे. अपीलच आहे असें नव्हे, तर लँ. रे. कोड क. २११ प्रमाणें त्यांत सांगितलेल्या अधिकाऱ्यास तपासणी करण्याचाही अधिकार आहे." याप्रमाणें १८८० च्या खोती सेटलमेन्ट आक्टांत अपिलासंबंधें कांहीं उल्लेख नसल्यामुळें वरिष्ठाकडे अपील करण्याचा लँ. रे. कोडाप्रमाणें अधिकार होता. १९०४ च्या दुरुस्तीनें खंडाचे निकालाचे बाबतींत अपील करण्यासबंधें स्पष्टपणें खुलासा केला आहे. कलम २० मध्यें खंडाचा ठराव अखेरचा व निर्णायक आहे असें ठरवितांना हक्कवाल्या खातेदाराचे खंडाचे निकालाविरुद्ध एका वर्षाचे आंत गव्हर्नर-इन-कौन्सिल यांचेकडे अपील करण्याची मुभा ठेवलेली आहे. अशा रीतीनें एक वर्षाचे आंत अपील करून खंडाची नोंद फिरवून न घेतल्यास ती अखेरचा व निर्णायक पुरावा होईल.

## (९) "खोतहिस्सेदार खातेदार कूळ" नोंद व तिचा अर्थ—

बोटखताला पुष्कळ वेळां नुसती खातेदार कूळ अशी नोंद नसून "खोत हिस्सेदार खातेदार कूळ" अशी नोंद असते. या नोंदीचा अर्थ काय होतो याचा ऊहापोह **रामचंद्र वि. नारायण दु. अ. नंबर २६३ सन १९२० नि. ता. २७।९।२२** या निकालांत न्या. शहा आणि न्या. क्रंप यांनीं केला आहे. "बोटखतांतील रिस्पॉन्डंट याचेकडे खोत हिसेदार खातेदारकूळ या हक्कानें जमिनी आहेत असा जो शेरा आहे तो आमच्या मतें रिस्पॉंडंटच्या आपण खोत हिस्सेदार असून शिवाय या जमिनीचे खातेदार आहों या ह्मणण्याच्या बाजूचा आहे. अपिलंट तर्फेचें या जमिनी केवळ खोती खासगी जमिनी ह्मणून धारण केलेल्या आहेत असें जें ह्मणणें आहे तें ग्राह्य मानतां येत नाहीं. तक्रार अशी आहे कीं खोत हिस्सेदारांस "खातेदारकूळ" या सदराखालीं येणारें खातेदारकूळ होतांच येणार नाहीं. परंतु हें म्हणणें आम्हांस ग्राह्य मानतां येणें शक्य नाहीं. ज्यानें खोतीमध्यें हिस्सा मिळविला त्यानें तत्पूर्वी अगर त्या हक्काव्यतिरिक्त विशिष्ट जमिनीबद्दल खातेदारकूळहक्क मिळविला नाहीं असें दाखविण्यास कांहीं साधन नाहीं. तेव्हां ही नोंद रेस्पॉंडंटच्या बाजूचीच

आहे."* या वरून "खोत हिस्सेदार खातेदारकूळ" या नोंदीचा अर्थ खोत हिस्सेदार असून शिवाय त्या जमिनीचा खातेदारकूळ आहे असा करावयाचा आहे.

(१०) अविभक्त अगर विभक्त सहहिस्सेदारांची नोंद—

ह्या प्रकारच्या सर्व नोंदी, "ब" पत्रक, व बोटखत यांत असतात ( क. १६ टी १६ पो. टी. २।१४ पाहा), खोत हिस्सेदारांमध्यें तुटक वांटप होऊन कलेक्टरमार्फत हिस्से निराळे झाले असतील त्यावेळीं त्या वाटपतक्त्याप्रमाणें बोटखताला नोंद होते व स्वतंत्र धडा दाखल केला जातो. स्वतंत्र धड्याची व्यवस्था निराळा खोती गांव असें समजून करावयाची असते; कारण कलम १७ (क) प्रमाणें तुटक, धड्यांतील जमिनी वेगळ्या दाखल कराव्या लागतात. तुटक धड्यांतील सहहिस्सेदारांची निराळी यादी, हिस्से वगैरे सर्व नोंदी कलम १७ (ब) यांत सांगितल्याप्रमाणें कराव्या लागतात. त्याचप्रमाणें आपसांत तुटक वाटप झाल्यास, त्याप्रमाणें कलेक्टरकडे अर्ज करून बोटखतांत फेरबदल करावा लागतो.

गांवचे वहिवाटीची आपसांत सभजुतीनें पाळीची यादी—लेख—झाला असल्यास तीही नोंदून सहहिस्सेदारांमध्यें ज्या अटी वागणुकीसंबंधें ठरल्या असतील त्याही नोंदल्या पाहिजेत.

(११) "ब" पत्रकांतील नोंद निर्णयक व अखेरचा पुरावा नाहीं.—

वर सांगितल्याप्रमाणें "ब" पत्रकाला व बोटखताला खोतकींतील हिस्सेदाराची नोंद असून त्याच्या ताब्यांतील खासगी ठिकाणांची नोंद असते; व त्यांचा

---

* "The entry in the Botkhat that the lands are held by the respondents as "Khot Hisedar khatedar kul" so far as we can see, is in favour of the contention of the respondents that they were occupancy tenants while being sharers in khotki. We are unable to accept the contention urged on behalf of the appellants that this entry means that the lands are held merely as khoti khasgi lands. The contention is that a "Khot Hisedar" cannot be a "Khatedar kul" in the sense of being an occupancy tenant; we are however unable to accept that contention; there is nothing to show that a khot who has acquired a share in the khoti may not have been either prior to or independently of the acquisition of a right in the khotki, a "khatedar kul" i. e. an occupancy tenant in respect of particular lands. This entry therefore is in favour of the defendant's contention."

प्रत्येकीं हिस्सा किती तेंही नोंदिलेलें असतें. ही नोंद अखेरचा व निर्णायक पुरावा नाहीं, असा स्पष्ट ठराव विष्णु वि. गंगाजी दु. अ. नंबर ४६९ सन १९१६ नि. ता. ५।७।१९२७ यांत असून त्यांत ही हिस्सेवारीची नोंद कलम २१ प्रमाणें बंधनकारक व निरुत्तर आहे अशी तक्रार होती. यावर आपल्या ठरावांत न्या. स्कॉट आणि बीमन यांनीं असें म्हटलें आहे कीं "बोटखताचे नोंदीला काय महत्व द्यावें या बाबतींत खालील कोर्टानें कांहीं चूक केली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. नोंदीचा अर्थ काय आणि त्याचा अर्थ सहहिस्सेदारांच्या दरम्यान वाटप झालें असा मानावयाचा किंवा नाहीं, यांकडे त्याचें सर्व लक्ष होतें. बोटखतांत बाह्यात्कारें दिसणाऱ्या तुटकपणाचे गुणधर्मांचा त्यानें विचार केला आहे. खालील कोर्ट असें दाखवितें कीं त्या नोंदींत दाखल केलेले हिस्से इतके पुष्कळ आहेत कीं वाटप झालें असावें असें मानणें अगदीं अशक्य आहे. असें असल्यामुळें आम्हांस असें वाटतें कीं खालील कोर्टाच्या हुकुमांत कांहीं कायदेशीर चूक झालेली नाहीं. खालील कोर्टाचा निकाल घडलेल्या गोष्टीचे बाबतींतील निकाल असल्यामुळें आम्ही खालिल कोर्टाचा हुकूम कायम करितों."* या ठिकाणीं खालील कोर्टानें "प्रत्येक हिस्सेदाराचे भागासंबंधें केलेली नोंद अखेरची व निर्णायक असणें शक्य नाहीं" असें मानलें; व तेंच ना० हायकोर्टानें कायम केलें. यामुळें "ब" पत्रकांतील हिशाची नोंद अखेरची व निर्णायक नाहीं, हें सिद्ध झालें आहे.

## (१२) खोत हिस्सेदारांनीं काय द्यावें याबद्दलची नोंद निरुत्तर नाहीं—

बोटखताला खोत हिस्सेदारांनीं आपल्या ताब्यांतील जमिनीबद्दल काय द्यावें, याबद्दलचीहि या कलमाप्रमाणें नोंद करावयाची असते; परंतु या नोंदीचे परिणामांत आणि खातेदारकुळाचें बाबतींतील नोंदीचे परिणामांत महदंतर आहे. हक्कवाल्या खातेदाराची नोंद निरुत्तर असते, तर खोतहिस्सेराची नोंद निरुत्तर नसते. कृष्णाजी

*"We do not think that the learned judge in the court below has made any mistake as to the weight to be given to an entry in the Botkhat. The question to which he addressed his mind was what the entry meant. Did it mean that there had been a partition between the khoti co-shares or did it not? He discusses the nature of the separation which the Botkhat entry apparently evidences. He points out that the shares mentioned in that entry is so various that it is impossible to draw the conclusion that there has been a partition. That being so, it appears to us that there is no error of law in the judgement of the lower appellate court. His finding is a finding of fact."

वि. कृष्णाजी २१ मुं. ४६७ या ठरावांत खोतहिस्सेदारांनीं काय द्यावें याबद्दलची नोंद अखेरचा व निर्णायक पुरावा नव्हे, असें स्पष्ट ठरविलें आहे. इतकेंच नव्हे तर हा मुद्दा पुराव्याचा मुद्दा ( question of fact ) असल्यामुळें त्याचा खोतकींतील सहहिस्सेदारांच्या दरम्यानची रीत (practice) आणि शिरस्ता ( custom ) यांकडे लक्ष देऊन निकाल केला पाहिजे असें ठरविलें आहे. ही नोंद निर्णायक पुरावा कां नाहीं याबद्दलचा भरपूर ऊहापोह या ठरावांत केलेला आहे.

**(१३) या कलमाखालीं केलेल्या नोंदीचे पुराव्याचे दृष्टीनें महत्व—**

या कलमाचे तीन भाग आहेत. (अ) भागांतील नोंद कलम ३३ प्रमाणें योग्य रीतीनें केली असल्यास १९०४ च्या पूर्वीचें कलम आणि नवें ३३ कलम यांचे गतकालसापेक्षत्वाचा विचार करून त्याप्रमाणें नोंद असल्यास ती अखेरचा व निर्णायक पुरावा होय. तसें नसेल तर मात्र तो निर्णायक पुरावा नव्हे. बाकी "ब" व "क" या पोटकलमांखाली ज्या नोंदी केलेल्या आहेत त्या निर्णायक पुरावा नसून कलम २१ प्रमाणें दिवाणी कोर्टास फिरविण्याचा अधिकार आहे. **रामचंद्र वि. रघुनाथ २० मुं. ४७५** या ठरावांत न्या. जार्डाइन यांनीं असें नमूद केलें आहे कीं " पुराव्याचें अनुमान असें असतें कीं सर्वे कामगारांनीं आपलें काम योग्य प्रकारें केलें आहे. " यावरून नोंद चुकीची आहे असें ज्याचें ह्मणणें असेल, त्याचेवर शाबिदीचा बोजा विशेष असतो. अशी चूक शाबीद होईपर्यंत कागदीं असलेली नोंद योग्य असेंच मानून चालावयाचें असतें.

## कागदपत्रांचा ताबा आणि त्यांची सुधारणा; तक्रारींचा निकाल करणें.

**कलम १८— (१)** ज्या कोणत्याही गांवास हा आक्ट लागू असेल, त्या गांवाचें सर्वे सेटलमेंट पुरें झालें ह्मणजे सेटलमेंट रजिस्टर आणि त्या संबंधाचे दुसरे कागदपत्र कलेक्टरानें ठेविले पाहिजेत.

सर्वे सेटलमेंट पुरें झाल्यावर कलेक्टरनें कागदपत्र ठेवावें.

(२) जोंपर्यंत सेटलमेंट रजिस्टर आणि दुसरे कागदपत्र सर्वेच्या अंमलदाराच्या ताब्यांत असतील, तोंपर्यंत सदर्हू अंमलदारास आणि तदनंतर कलेक्टरास किंवा या बाबतींत गव्हर्नर-इन-कौन्सिल हे वेळोवेळीं ज्या दुसऱ्या कोणत्याही अंमलदाराला अधिकार देतील त्यास

पक्षकाराच्या लेखी कबुलीनें कागदपत्रांत सुधारणा करण्याचा रिकार्डिंग कामगाराचा अधिकार.

पोट कलम (३) यांत निर्दिष्ट केलेल्या बाबतींत परंतु नोंदींशीं संबंध असलेल्या पक्षकारांनीं रिकार्डिंग कामगारासमोर कबुली दिल्यावांचून इतर बाबतींत नव्हे, कोणत्याहि वेळीं अशा रजिस्टरांतील किंवा कागदपत्रांतील कोणतीही नोंद जरूर असेल त्याप्रमाणें, त्या नोंदींत जास्त मजकूर वाढवून किंवा तींत मजकूर दाखल करून किंवा ती नोंद रद्द करून अगर तींत दुसरा फेरफार करून सुधारण्याचा किंवा तींत सुधारणा करविण्याचा अखत्यार आहे; आणि त्याप्रमाणें सुधारली असल्याशिवाय आणि सुधारण्यांत येई तोंपर्यंत दाखल केलेली प्रत्येक नोंद ती ज्या सर्व सटलमेंटासाठीं करण्यांत आली तें सर्व सेटलमेंट अमलांत असे तोंपर्यंत, उल्लेख केलेल्या जमिनीस लागू राहील.

(३) पोटकलम (२) यांत उल्लेख केलेल्या बाबती खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत; त्या येणें प्रमाणें:--

(अ) कोणतीहि हस्तदोषाची चूक किंवा जी कोणतीहि चूक झाली आहे असें तिच्याशीं संबंध असणारे पक्षकार कबूल करतील ती चूक दुरुस्त करण्याचा अखत्यार आहे.

आणि दुसऱ्या कांहीं बाबतींत अधिकार

(ब) जी कोणतीहि नोंद चुकीनें दाखल करण्यांत आली आहे किंवा कपटानें किंवा खोटी समजूत घालून किंवा आपण भलतेच असामी आहों असें दर्शवून किंवा हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करविण्याच्या कायद्याअन्वयें गुन्हा होईल अशा दुसऱ्या उपायांनीं दाखल करविण्यांत आली आहे अशी रेकार्डिंग कामगाराची खात्री होईल ती नोंद रद्द करण्याचा आणि तिच्या ऐवजीं रिकार्डिंग कामगार ठरवितील तशी दुसरी नोंद (असल्यास) दाखल करण्याचा अखत्यार आहे;

(क) जी कोणतीही नोंद, तत्संबधीं हवाल्यांच्या कोणत्याही फेरबदलामुळें किंवा तत्संबंधीं हक्क अगर इतर हक्कसंबंध दुसऱ्याकडे

गेल्यामुळें गैरलागू किंवा चुकीची झाली असेल, तो, रिकार्डिंग कामगारास योग्य वाटेल त्याप्रमाणें रद्द करण्याचा किंवा दुरुस्त करण्याचा अखत्यार आहे.

(ड) "निरंतरचे कुळानें" द्यावयाच्या थळाच्या प्रकाराची व एवजाची नोंद, कलम ३३ रकम (क) या खालील कानू ४ आणि ५ यांच्या ठरावांपैकीं कोणत्याही ठरावाअन्वयें दाखल करण्याचा किंवा बदलण्याचा अखत्यार आहे.

(इ) कलम २० याच्या ठरावांस पात्र राहून ज्या कोणत्याही नोंदीच्या संबंधानें, ती ज्या पक्षकारांस लागू असेल, त्यांनीं आपसांत कलम २१ अन्वयें योग्य हुकमत असलेल्या कोर्टाचा अखेरचा हुकूमनामा मिळविला असेल ती नोंद, रेकार्डिंग कामगाराकडे अशा हुकूमनाम्याची सहीमूद नक्कल जोडून दुरुस्तीबद्दल योग्य प्रकारें अर्ज करण्यांत आल्यास त्या हुकूमनाम्यांवरहुकूम सुधारली पाहिजे.

(हें कलम दुरुस्तीचा मुंबई आक्ट, सन १९०४चा आक्ट ३, कलम ४ प्रमाणें दाखल केलें.)

जुनें कलम.

जर खोतकीचे विभाग झाले नसतील तर, सदरहू कागदपत्रांत खालीं लिहिलेल्या गोष्टींचाहि निर्देश पाहिजे.

(अ) प्रत्येक सहभागिदाराच्या कबजांतील सर्वेनंबर आणि त्याबद्दल सहभागिदारानें द्यावयाचें थळ, आणि

(ब) सहभागिदारांनीं अथवा त्यांपैकीं कोणीं आपापल्या जबाबदाऱ्या निश्चित करण्याविषयीं कोणताही लेखी करारनामा करून दिला असेल, अथवा सदर्हू कागदपत्र तयार करतेवेळीं करून देतील त्या करारनाम्याच्या शर्ती आणि हकीगती; आणि

(क) या आक्टाचें कलम २७ यांतील ठरावांप्रमाणें गांवची वहिवाट ज्या पाळीच्या क्रमानें करण्याविषयीं सदर्हू सहभागिदार लेखी कबूल करतील, असें ते कबूल करतील तर, त्या पाळीचा क्रम.

## टिपा.

### (१) उद्देश–

हें कलम १९०४ च्या मुं. आक्ट ३ कलम ४ प्रमाणें अगदीं नवीन दाखल केलें आहे. पूर्वीच्या १८ वे कलमाचा समावेश १७ व्या कलमांत केलेला असून या व कलम १९ नें १९०४ पासून नवीनच एक भाग खोती आक्टांत घालण्यांत आला आहे. पूर्वीचे आक्टाप्रमाणें सर्वे सेटलमेंटचे कागदांत सुधारणा करण्याचा अधिकार कोणास आहे किंवा काय व तसा असल्यास तो कोणकोणत्या बाबतींत याबद्दल कांहीं एक उल्लेख नव्हता, व गोपाळ वि. दशरथशेट २१ मुं.२४४ या ठरावांत सांगितल्याप्रमाणें लँ. रे. कोडाकडे लक्ष द्यावयास लागत असे; ती गैरसोय आतां दूर झाली असून रेकार्डाचा ताबा कोणाकडे, दुरुस्त्या कोणीं, केव्हां व कोणकोणत्या बाबतींत कराव्या हें सर्व या व कलम १९ या दोन अगदीं नवीन घातलेल्या कलमांत गोंवलेलें आहे.

### (२) सर्वे सेटलमेंटचे कागद कलेक्टरानें ठेविले पाहिजेत—

कोणत्याही गांवाला सर्वे सेटलमेंट लागू करून त्याची मोजणी, नोंदणी वगैरे करून लँ. रे. कोड कलम १६ व १७ यांत सांगितल्याप्रमाणें सर्व कागदपत्र पुरे होतांच गव्हर्नर–इन कौन्सिलनें मंजूर केले ह्मणजे ते कायम झाले असें समजावयाचें. मंजूर होण्यापूर्वी हे सर्व कागदपत्र सर्वे सेटलमेंट कामगाराचे ताब्यांत असतात. मंजूर झाल्यानंतर त्या सर्व कागदावर कलेक्टरचा ताबा राहून ते त्यानें व्यवस्थित ठेवावयाचे आहेत. सेंटलमेंटची तपासणी व्हावयाची असेल त्यावेळीं ते कागद पुन्हां सेटलमेंट कामगाराच्या हातांत जातात. परंतु तें काम पुरें होतांच त्याचा अधिकार संपून कलेक्टरच्या ताब्यांत येतात. खोती सेटलमेंटचे सर्व स्पेशल कागद जिल्ह्याच्या हुजूर रेकार्डांत असतात. (क. १६ टी. १६ पहा.)

### (३) रिकार्डिंग कामगार व त्यांचा अधिकार—

"रिकार्डिंग कामगार" याची व्याख्या या आक्टाचें कलम ३ पो. क. ११ यांत १९०४ चे आक्टानेंच घातली असून "लँड रेव्हेन्यू कोड कलम १०८ प्रमाणें किंवा खोती सेटलमेंट आक्ट, तिसरा भाग, यांत अगर या अन्वयें सेटलमेंट रजिस्टरांत किंवा सेटलमेंटच्या इतर कागदपत्रांत नोंदीं दाखल करण्याचा किंवा त्या सुधारण्याचा ज्याला योग्य रीतीनें अधिकार देण्यांत आला आहे असा कोणताही कामगार" अशी व्याख्या दिली आहे; यावरून सर्वे अंमलदार व कलेक्टर हे दोघेही रिकार्डिंग आफिसरच होत. सेटलमेंट पुरें झाल्यानंतर मात्र कलेक्टर, अगर गव्हर्नर–इन–कौन्सिल ज्याला असा अधिकार देईल तो, हेच रिकार्डिंग आफि

सर होत. कलम १८ चे पो. क. (२)नें रिकार्डिंग आफिसराला सुधारणा करण्याचा अधिकार दिला आहे. परंतु तो कांहीं दृष्टीनें अगदीं नियमित आहे. कारण कोणतीही सुधारणा त्यास आपण होऊन करतां येत नसून त्या नोंदीशीं संबंध असलेल्या सर्व इसमांनीं लेखी कबुली दिली तर दुरुस्ती अगर फेरफार करण्याचा या कलमानें अधिकार दिला आहे. सर्व इसमांच्या कबुलीनें व्हावयाची दुरुस्ती सुद्धां वाटेल त्याबाबतींत नसून याच कलमाचें पोट कलम ३ यांतील कलमाप्रमाणें जेथें परिस्थिति असेल तेथेंच अधिकार आहे.

## (४) जुना कायदा व त्यांतील दोष—

कलम १८ व १९ ही दोन कलमें १९०४ मध्यें अस्तित्वांत येण्यापूर्वी सेटल्मेंट कागदांत जी कांहीं सुधारणा कारितां येत असे, ती जुनें कलम २२ प्रमाणें होय; कलम २२ मध्यें एकाद्यानें, एकाद्या नोंदींत दिवाणी कोर्टाचा निवाडा हजर करून त्याप्रमाणें सुधारणा करण्याबद्दल अर्ज केल्यास, सुधारणा करण्याचा सर्वेकामगारास किंवा कलेक्टरास अधिकार दिलेला होता. या बाहेर कोणत्याही प्रकारें कलेक्टर अगर इतर कोणासही साधी, उघड चूक असली तरी सुद्धां सुधारणा करण्याचा अधिकार नव्हता. व त्यामुळें क्षुल्लक गोष्टीकरितां सुद्धां कोर्टांत जाण्याची पाळी येत असे. त्याकरितां ही सुधारणा अमलांत आणणें भाग झालें; व ती झाल्यानें पुष्कळ सोय झाली आहे.

## (५) हस्तदोषाची चूक—

हस्तदोषाची चूक याचा अर्थ कागद तयार करतांना आंकडा, नांव अगर इतर कांहीं गोष्टी नजर चुकीनें पडून जातात त्या चुका होत. जसें टिपणबुक, सुड वगैरे सर्वेच्या कागदांप्रमाणें एकाद्या सर्वेनंबरची जमीन कांहीं एकर ठरली असतां ती सेटलमेंट पत्रकांत अगर बोटखतांत कमी अगर जास्त लागणें, आकार चुकीचा पडणें, जमीन धारण करणाराचे नांवात कांहीं चूक होणें, वगैरे अशा प्रकारच्या हस्तदोषाच्या चुका सर्व पक्षकारांच्या लेखी कबुलीनें सुधारतां येतात.

## (६) कपटाची अथवा खोटी नोंद—

दिवाणी कायद्यांत कांहीं परिस्थितींमध्यें झालेले व्यवहार बेकायदेशीर, रद्द-बातल असतात असें ठरविलें आहे. **कॉन्ट्रॅक्ट आक्ट, सन १८७२ चा हिं. आक्ट ९**, भाग २ कलमें १५।१६।१७।१८ व २० यांत या पांच गोष्टी सांगितल्या आहेत. त्या अनुक्रमानें (१) इंडिअन पीनल कोड मधील एकादा गुन्हा होईल अशा तऱ्हेचें कृत्य करून अगर करण्याची धमकी देऊन अगर दुसऱ्याची इष्टेट त्याचे हक्काविरुद्ध आपले ताब्यांत ठेऊन कोणतीहि गोष्ट बलात्कारानें (coercion)

करावयास लावणें; (२) एकाचा दुसऱ्यावर ताबा चालेल अशा तऱ्हेच्या आपसांतील संबंधाचा फायदा घेऊन कोणतीही गोष्ट **गैरअंमलानें** (undue influence) करविणें, (३) खोटसाळ गोष्ट असतां खरी आहे असें सुचवून एकादी महत्वाची गोष्ट लपवून ठेवून, कधींही पुरें न करण्याच्या हेतूनें वचन देऊन, अगर हरएक अन्य मार्गानें फसवून **ठकबाजीनें** (fraud) गोष्ट करविणें; (४) गैर, खोटी अगर भलतीच गोष्ट, **विपर्यास** (misrepresentation) असणें; (५) उभय पक्षीं झालेली **चूक** (mistake) असणें; या पांच गोष्टी पैकीं कोणत्याही प्रकारानें व्यवहार झाला असल्यास तो ज्याच्या विरुद्ध असा प्रकार केल्यानें झाला असेल, त्याच्या विरुद्ध त्याच्या मर्जीप्रमाणें रद्दबातल असतो. नोंदींचे बाबतींतही वरील पांच प्रकारानें नोंदी सर्व कागदीं केल्या जाण्याचा संभव असतो, अशा वेळीं रेकार्डिंग आफिसराकडे अर्ज करून वरील पांच प्रकारांपैकीं ज्या प्रकारामुळें नोंद झाली असेल त्याचा पुरावा घेऊन रिकार्डिंग कामगाराची खात्री झाल्यास अशी नोंद बदलण्याचा अधिकार त्यास दिला आहे. १९०४ चे पूर्वींच्या कायद्यांत हा अधिकार नव्हता व त्यामुळें अशा प्रत्येक, उघड अन्यायाच्या गोष्टींत सुद्धां, दिवाणी कोर्टाकडे जावें लागत असे.

(७) फौजदारी गुन्हा करून झालेली नोंद—

वरील पांच दिवाणीस्वरूपाच्या गुन्ह्यांमुळें झालेली नोंद ज्याप्रमाणें बदलतां येते त्याचप्रमाणें, इंडियन पीनल कोड–हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याचा कायदा–अन्वयें गुन्हा करून जर नोंद केली गेली असेल तर तीही सुधारण्याचा या कलमाप्रमाणें अधिकार दिला आहे. असे गुन्हे म्हणजे ठोकळमानानें—

(१) खोटसाळ पुरावा करणें अगर असलेला पुरावा नाहींसा करणें–इं. पी. कोड कलम १९१, १९२, १९६, २०४, २०५ इत्यादि.

(२) माराची वगैरे अपराध होईल अशा तऱ्हेचें कृत्य करण्याकरितां धमकी देणें, इं. पी. कोड कलम ३५० इ.

(३) फसविणें इं. पी. कोड कलम ४१५, ४१६, इ.

(४) बनावट कागद करणें इं. पी. कोड ४६३, ४६४, ४७०, ४७१ इ० इत्यादि गुन्ह्यांपैकीं गुन्हा अगर गुन्हे करून नोंद झाली असल्यास तीही फिरविण्याचा या कलमानें रेकार्डिंग आफिसरला अधिकार दिलेला आहे. १९०४ चे पूर्वींचे कायद्यांत ही सवड नव्हती व त्यामुळें अगदीं उघड अन्यायानें झालेली नोंद फिरवून घेण्यासही दिवाणी कोर्टांत जावें लागत असे. आतां तसें करण्याचें कारण नाहीं, व अशा तऱ्हेच्या नोंदीचे बाबतींत उभयपक्षाची कबुली असण्याचेंही कारण नाहीं.

## (८) परिस्थित्यंतरामुळें व वर्गकेल्यामुळें करावयाची दुरुस्ती—

या कलमामध्यें परिस्थितींत फरक झाल्यास अगर वर्गामुळें फरक झाल्यास रेकार्ड कागदीं सुधारणा करण्याचा अगर नव्या नोंदी करण्याचा अधिकार रिकार्डिंग कामगारास दिलेला आहे. असे परिस्थितींत फरक याच कायद्यानें मानले आहेत ते—

(१) कलम १० मध्यें सांगितल्याप्रमाणें–हक्कवाल्या खातेदाराचें खातें (१) गतकुळी होणें (२) जमिनीचा राजिनामा देणें (३) बेकायदा वर्ग करणें (४) खंड न देणें (५) अन्यकारणानें खालसा होणें.

(२) कलम ११ प्रमाणें–खोतानें एकाद्या कुळास हक्कवाल्या खातेदाराचे हक्क देणें.

(३) कलम १६ मध्यें सांगितल्याप्रमाणें–(१) ज्याचे नांवें खातें दाखल असेल तो खातेदार मेल्यानंतर त्याच्या वारसांची नांवें दाखल करणें (२) खोतकीच्या विभागांत फेरबदल झाल्यास तो नमूद करणें (३) खोतकीचा सर्व हक्कसंबंध कबजेगहाण दिल्यास त्या गहाणदाराचें नांव दाखल करणें (४) खोती तक्षिम विकल्यास त्या खरेदीदाराचें नांव दाखल करणें (५) खोतानें खासगी ठिकाणें विकल्यास खातेदार कुळ म्हणून खातें दाखल करणें कलम (४०–ई–१).

(४) कलम १७ प्रमाणें—(१) सहभागिदारांचे वारस दाखल करणें अगर मयत विनवारसी असल्यास त्याचे नांव कमी करणें (२) गांव समाईक असतां आपसांत समजुतीनें वांटप केलें तर त्याप्रमाणें फेरफार करणें (३) कलेक्टरमार्फत वांटप झाल्यास तें नमूद करणें (४) पुन्हां धड्यांचे वगैरे वांटप झाल्यास तें नमूद करणें (५) पाळीची यादी नमूद करणें व त्यांत वेळेविळीं होणारा फेरबदल नमूद करणें (५) धारेकऱ्यांनीं अगर कच्चे धारेकऱ्यांनीं गहाण, खरेदी वगैरे व्यवहार केल्यास गहाणदार अगर खरेदीदार यांचें नांव दाखल करणें (६) कोर्टमार्फत अगर कलेक्टर मार्फत विक्री झाल्यास अशा लेलांवदाराचें नांव दाखल करणें वगैरे हरएक प्रकारें कायदेशीर रीतीनें होणाऱ्या परिस्थित्यन्तरानुरूप नोंदींत फेरबदल करण्याचाहि या कलमानें रेकार्डिंग ऑफिसरास अधिकार देण्यांत आला आहे.

## (९) निरंतरचे कुळानें द्यावयाचे थर्लीत फेरफार करणें.—

१९०४ चे पूर्वींचे कायद्याप्रमाणें खातेदार कुळाचे थलीच्या ठरावांत फेरबदल कोणासही करतां येत नव्हता. कृष्णाजी वि. कृष्णाजी २१ मुं. ४६७ या ठरावांत न्या. पार्सन्स आणि क्यांडी यांनीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, खंडाचे नोंदींत

फेरबदल करण्याचा कोणासही अधिकार नाहीं. परंतु १९०४ पासून या कलमानें कलम ३३ पोटकलम ४।५ प्रमाणें होणाऱ्या "मोबदला–किंमतीचे" उर्फ पटाचे ठरावास अनुसरून निरंतरचे कुळानें द्यावयाच्या थलीचे नोंदींत फरक करण्याचा अधिकार दिलेला आहे. कलम ३३ पो० क० ४ व ५ मध्यें सांगितलेल्याप्रमाणें खालील गोष्टींत ही नोंद सुधारावयाची असते.

(१) थलीची नोंद सेटलमेन्टच्यावेळीं करावयाची अजिबात राहून गेली असल्यास.
(२) मूळच्या ठरावांत दिवाणी कोर्टाच्या हुकुमानें फरक करावा लागल्यास.
(३) जमीन वाहून गेल्यास.
(४) जमिनीचा दस्तवाढ झाल्यास, त्या मानानें खोतफायदा वाढावा म्हणून फेरबदल करावा लागल्यास.
(५) कुळाला पट ठरवून दिल्यास ती नोंदणें.
(६) खोत आणि खातेदार अगर निरंतरचीं कुळें यांचे दरम्यान करार झाल्यास व उभय पक्षानें रेकार्डिंग आफिसर यांचे समोर जाऊन कबुली दिल्यास.
(७) खोताची कामगिरी करणारें कूळ काम करीनासें झाल्यास कामगिरी-करितां कमी असलेली थल वाढविणें इत्यादि बाबतींत रेकार्डिंग आफिसरास नोंद सुधारतां येते.

(१०) दिवाणी कोर्टाचा ठराव—

कलम २१ प्रमाणें ज्या बाबतींत दिवाणी कोर्टांत जाऊन आपला हक्क ठरवून घेण्याचा अधिकार दिलेला, आहे त्या बाबतींत एखाद्यानें दिवाणी कोर्टाकडे जाऊन आपल्या म्हणण्याप्रमाणें निवाडा मिळविल्यास त्याप्रमाणें नोंद सुधारणें आवश्यक आहे. तशी सवड याच कलमांत ठेवलेली असून त्यानें फैसला मिळविला असेल त्यानें फैसल्याची सहीसूद नक्कल सोबत जोडून त्याप्रमाणें फेरबदल होण्याबद्दल अर्ज दिला पाहिजे. म्हणजे त्या निवाड्याप्रमाणें रेकार्डिंग आफिसरास सुधारणा करावी लागते.

रिकार्डिंग कामगारानें तक्रारी निकाल करणें

**कलम १९—(१) जर रिकार्डिंग कामगारास, त्याला लिहून ठेवणें भाग आहे अशा कोणत्याही गोष्टी संबंधानें, किंवा कलम १८ अन्वयें करावयाची योजिलेल्या कोणत्याही सुधारणेसंबंधें कोणतीही तक्रार असल्या-**

चें आढळून येईल, तर त्यास, तक्रार करणाऱ्या पक्षकारांपैकीं कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून, किंवा आपण होऊन, अशा तक्रारीची चौकशी करून निकाल करण्याचा किंवा सुधारण्याचा अखत्यार आहे.

पक्षकारांस त्यांचे ह्मणणें ऐकून घेण्याबद्दलची नोटीस व संधि द्यावी.

(२) असा कोणताही निकाल सेटलमेंट रजिस्टरांतील किंवा इतर कागदपत्रांतील कोणत्याही नोंदीची कोणतीही सुधारणा, तो निकाल किंवा ती सुधारणा ज्या पक्षकारांस लागू असेल त्या पक्षकारांस योग्य नोटीस देण्यांत येईल तोंपर्यंत आणि तिच्या संबंधानें त्यांचें काय ह्मणणें आहे तें ऐकून घेण्याबद्दलची त्याला संधि दिल्याशिवाय करतां कामा नये.

विशेष ठराव.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, असा कोणताही निकाल किंवा कोणत्याही नोंदीची अशी कोणतीही सुधारणा, सदर्हुप्रमाणें नोटीस किंवा संधि दिली नाहीं एवढ्याच केवळ कारणावरून अव्यवहारोपयोगी होते असें समजूं नये.

ज्या कोणत्याही संबंध असलेल्या पक्षकारास असलेल्या पक्षकारास अशी कोणतीही नोटीस किंवा संधी देण्यांत येणार नाहीं. त्यानें करावयाचा इलाज.

(३) परंतु ज्या कोणत्याही मनुष्याचा अशा कोणत्याही निकालाशीं किंवा सुधारणेशीं संबंध असून त्याला सदर्हू प्रकारची नोटीस किंवा संधि देण्यांत आली नसेल त्यास त्या प्रकरणाच्या हकीगतीवरून जरूर असेल त्याप्रमाणें तो निकाल किंवा ती सुधारणा रद्द करण्याविषयीं किंवा बदलण्याविषयीं रिकार्डिंग कामगारांकडे अर्ज करण्याचा अखत्यार आहे; आणि पोटकलम (२) याच्या ठरावास पात्र राहून, रिकार्डिंग कामगारानें त्या प्रकरणाची पुन्हां चौकशी केली पाहिजे, आणि त्यास योग्य वाटल्यास त्याप्रमाणें तो निकाल किंवा सुधारणा रद्द करण्याचा त्याला अखत्यार आहे.

(हें कलम सन १९०४ चा मुं. आक्ट ३ कलम ४ वरून नवीन दाखल केलें आहे.)

—जुनें कलम—

जर विभाग झाले असतील आणि खोतकीचे सहभागिदार आपआपले निरनिराळे विभाग पृथक् पृथक् धारण करीत असतील तर, सदर्हु कागदपत्रांत खालीं लिहिलेल्या गोष्टींचा निर्देश असला पाहिजे—

(अ) सदर्हू प्रत्येक निरनिराळे भागाची लांबी, रुंदी आणि हद्दी; आणि

(ब) खोतकींचे विभाग झाले नसतील तेव्हां सदर्हु मागील कलमाप्रमाणें सर्व सह भागिदाराविषयीं ज्या हकीकती देणें अवश्य आहेत तशा सदर्हू प्रत्येक भागाचे निरनिराळे पोटभागिदाराविषयीं ( पोटभागिदार असल्यास ) हकीगती.

टिपा.

(१) उद्देश—

कलम १८ प्रमाणें जुनें कलम १९, कलम १७ यांत समाविष्ट केलें आहे. नवीन १९ व्या कलमामध्यें कलम १८ मध्यें सांगितलेल्या दुरुस्त्या करितांना रेकार्डिंग कामगारानें काय काय गोष्टी कराव्या, कोणत्या पद्धतीनें चौकशी चालवावी, व त्या गोष्टी त्यानें न केल्यास त्याचा काय परिणाम होईल व अशा वेळीं ज्याचे हिताविरुद्ध कागदपत्रांत फेरबदल झाला असेल, त्यानें काय करावें वगैरेचा स्पष्ट खुलासा केला आहे.

(२) रिकार्डिंग कामगाराचा अधिकार व त्यानें करावयाच्या गोष्टी—

रिकार्डिंग कामगारास नमूद करावयास सांगितलेल्या बाबतींत कांहीं तक्रार आहे असें आढळल्यास, अथवा कलम १८ प्रमाणें दुरुस्ती अगर फेरबदल करीत असतां एकाद्या गोष्टीबद्दल वाद आहे असें नजरेस आल्यास त्यास वाद सांगणाऱ्या पक्षाच्या अर्जावरून अगर स्वतः आपण होऊन, त्या मुद्याची चौकशी करतां येईल; व त्याप्रमाणें नोंदही बदलतां येईल. अर्ज आल्यास त्या अर्जावरून काम चालवावयाचें असतेंच; परंतु आपण होऊन वादाचे मुद्याची चौकशी करून दुरुस्ती करण्याचा अधिकार रिकार्डिंग कामगार यास आहे.

चौकशी करतेवेळीं त्या नोंदीशीं संबंध असलेल्या इतर इसमांस योग्य प्रकारें, हजर होऊन आपल्या तक्रारी मांडण्याबद्दल नोटीस दिलीच पाहिजे. नोटीस देऊन त्यांचे ह्मणणें ऐकून घेण्याकरितां रिकार्डिंग कामगारानें त्यास संधि ही दिलीच पाहिजे.

अशा रीतीनें नोटीस काढून ह्मणणें ऐकून घेऊन जें मत होईल त्याप्रमाणें निकाल देऊन कागदांत दुरुस्ती करावी.

रिकॉर्डिंग कामगारानें नोटीस व तक्रारी ऐकून घेण्याची संधि दिलीच पाहिजे असा निर्बंध घातला आहे; परंतु "विशेष ठरावांत" (proviso) अशा रीतीनें नोटीस न काढल्यास अगर संधि न दिल्यास तेवढ्यामुळेंच ती नोंद अयोग्य होत नाहीं, असें सांगितलें आहे. परंतु या विशेष कलमाचा सरसास नोटीस न काढण्याकडे उपयोग करावयाचा नसतो. हा "विशेष ठराव" काळजीपूर्वकच वापरला पाहिजे. एकाद्या नोंदीशीं कोणाकोणाचा संबंध आहे याची योग्य माहिती रिकॉर्डिंग आफिसरास लागली नाहीं आणि त्यानें एकाद्या इसमास नोटीस काढली नाहीं, अशा प्रसंगीं तेवढ्यानेंच ती नोंद अयोग्य होणार नाहीं, इतकीच सोडवणूक ठेविलेली आहे. रिकॉर्डिंग कामगाराच्या उपयोगाकरितां, विशेष ठराव नाहीं, असें समजूनच सर्व व्यवस्था त्यानें केली पाहिजे. त्यांतून कांहीं व्यंग राहिल्यास केलेल्या नोंदीस बाधा येऊं नये अगर कोणा इसमाचें नुकसान होत असल्यास तसें होऊं नये याकरितां या विशेष ठरावाचा उपयोग आहे.

### (३) नोटीस काढली नाहीं अशा इसमाचा इलाज—

या कलमाच्या पोटकलम ३ मध्यें नोटीस काढली नाहीं अगर योग्य संधि दिली नाहीं, अशा मनुष्यास आपल्या विरुद्ध झालेली नोंद बदलून घेण्याकरितां अर्ज करण्याची सवलत ठेवलेली आहे. अशा रीतीनें अर्ज आल्यानंतर रेकार्डींग कामगारानें पुन्हा चौकशी केलीच पाहिजे आणि चौकशी अंतीं केलेली दुरुस्ती अयोग्य वाटल्यास त्याप्रमाणें ती नोंद रद्द अगर दुरुस्त केली पादिजे.

### (४) विरुद्ध निकाल झाल्यास इलाज—

वरीलप्रमाणें रेकार्डींग ऑफिसरानें निकाल दिल्यानंतर त्याचे विरुद्ध काय इलाज करितां येईल याबद्दलचा खुलासा या कलमांत केलेला नाहीं. परंतु ज्यावेळीं कलम २० प्रमाणें रेकार्डींग कामगाराची नोंद अखेरची व निर्णायक असें ठरविणेंत आलें असेल त्यावेळीं त्याच कलमांत सांगितल्याप्रमाणें गव्हर्नर–ईन्–कौन्सिल कडे एक वर्षाचे आंत अपील केलें पाहिजे. एक वर्ष होऊन गेल्यास ती नोंद अखेरची व निर्णायक अशी असते. कलम २१ प्रमाणें ज्या नोंदी फिरेपर्यंत कायम असतात त्याचें विरुद्ध मुदतीचे कायद्यास अनुसरून दिवाणी कोर्टांत जाऊन योग्य निवाडा मिळविल्यास त्याप्रमाणें रेकार्डींग कामगारास दुरुस्ती केलीच पाहिचे. याप्रमाणें हे दोन उपाय आहेत.

या कलमानें सांगितलेल्या आपल्याच निकालाची तपासणी करण्याचा अधिकार १९०४ पासूनच घालण्यांत आला आहे. त्याचे पूर्वी तो नव्हता. भिकाजी वि. सखाराम १८९७ प्रि. ज. ११९ हा ठराव पहा.

(५) कलेक्टरचा अपील अधिकार—

सुपरिन्टेन्डेंट ऑफ सर्वे याच्या खालच्या दर्जाच्या सर्वे ऑफिसराच्या निकाला विरुद्ध अगर हुकुमाविरुद्ध जिल्ह्याच्या कलेक्टरकडे अपील करण्याचा व त्यास त्याचा निकाल करण्याचा अधिकार आहे. असा अधिकार कलेक्टर यास, गव्हर्नर-इन्-कौन्सिलनें लँड रेव्हेन्यू कोड कलम १९ खालीं दिलेल्या अधिकारान्वयें दिलेला असून तो तारीख २५।६।१९१५ रोजच्या नं० ६८८४ या सरकारी ठरावांत आहे, (तारीख १।७।१९१५ रोजचे सरकारी मुंबई ग्याझेट भाग १).

(६) चौकशीच्या कामीं वकील देतां येतो—

कागदांतील नोंदी बदलून घेणें व त्याकरितां रेकार्डिंग कामगाराकडे अर्ज करणें, कलेक्टर अगर गव्हर्नर-इन्-कौन्सिलकडे अपील करणें वगैरे मुलकी खात्याकडील कामें वकीलमार्फत चालविण्याची पूर्ण मोकळीक आहे. याबद्दल सरकारी ठरावही झालेला आहे.

कलम २०—(१)

काहीं बाबतींत रिकार्डिंग कामगाराचा निकाल अखेरचा असणें.

पोटकलम (२) अन्वयें अपिलांत केलेल्या हुकुमांस व पोटकलम (३) याच्या ठरावांस पात्र राहून, सेटलमेंट रजिस्टरांत किंवा इतर कागदपत्रांत कलम १६, १७ किंवा १८ या अन्वयें रिकार्डिंग कामगारानें दाखल केलेली जी कोणतीही नोंद—

(अ) कोणत्याहि "निरंतरचे कुळाचा" हितसंबंध, वारशाशिवाय इतर रीतीनें दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगा आहे किंवा नाहीं या गोष्टींबद्दल, किंवा

(ब) दाखल केलेल्या प्रकारचें व ऐवजाचें थळ देण्याबद्दलच्या दरएक हक्कवाल्या खातेदारांच्या पात्रतेबद्दल,

ह्मणून असेल, ती नोंद कलम १८ ह्यांतील ठरावांस पात्र राहून त्याप्रमाणें दाखल केलेल्या त्या गोष्टींबद्दल किंवा पात्रतेबद्दल निर्णायक व अखेरचा पुरावा असेल असें समजावें.

(२) अशा कोणत्याहि नोंदीमुळें तोशीस पोंचलेल्या कोणत्याहि मनुष्यास, ती नोंद दाखल केल्यापासून एका वर्षाच्या आंत, ती फिरवून घेण्याकरितां गव्हर्नर-इन् कौन्सिल यांकडे अपील करण्याचा अधिकार आहे; आणि त्या अपिलावर झालेल्या हुकुमांमध्यें ती नोंद फिरविण्याविषयीं फर्माविलेलें असल्यास ती त्याप्रमाणें फिरविली पाहिजे. आणि अशा हुकुमांस अनुसरून याप्रमाणें फिरविलेली नोंद, पोट कलम (१) यांत दर्शविलेल्या रीतीनें आणि अंशीं निर्णायक व अखेरचा पुरावा असें समजावें.

अशा निकालावर गव्हर्नर-इन्-कौन्सिल यांकडे अपील चालेल

(३) ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून, हें कलम अमलांत येण्याच्या वेळीं कोणत्याही दिवाणी कोर्टांत जें काम चालू असेल त्यास बाध येणार नाहीं.

चालू दिवाणी कामांचा बचाव

## जुनें कलम

तकरारींचा निकाल करणें—जो सर्वेचा अंमलदार सदहु पत्रक अथवा दुसरे कागदपत्र तयार करितो त्या अंमलदारास जर असें वाटेल कीं, जी तकरार त्याला लिहून ठेवणें भाग आहे तशी तकरार एखाद्या गोष्टीविषयीं आहे तर त्यानें तकरार करणारे पक्षकारांपैकीं कोणत्याही पक्षकारानें अर्ज केल्यावरून, अथवा आपण होऊनच, सदहु तकरारींची चौकशी करून निकाल करावा आणि त्याप्रमाणें सदहु पत्रक किंवा दुसरे कागद तयार करावे.

## टिपा.

(१) उद्देश—

हें कलम १९०४ च्या दुरुस्तीच्या कायद्याप्रमाणें नवीन घालण्यांत आलें असून जुने कलमाचा समावेश चालू कलम १९ यांत केला आहे. निरुत्तर नोंदी कोणत्या हें पूर्वीपेक्षां या कलमांत स्पष्ट रीतीनें ठरविण्यांत आलें आहे. जुन्या १७

त्या कलमाप्रमाणें १९०४ चे पूर्वी खंडाचे बाबतींतील नोंदच फक्त निर्णायक पुरावा, असें ठरविलें होतें, परंतु आतां या कलमानें खंडाचे बाबतींत, त्याचप्रमाणें वर्ग करण्याच्या अधिकाराचे बाबतींत केलेली नोंद निर्णायक पुरावा असें ठरविण्यांत आलें आहे. अशा तऱ्हेची नोंद झाल्यापासून एक वर्षाचे आंत ती बदलून घेण्याकरितां गव्हर्नर–इन–कौन्सिलकडे अपील करण्याची मोकळीक ठेविलेली असून अपिलाचे निकालाप्रमाणें ती नोंद फिरवावयाची असते. अशा नोंदी जरी निर्णायक असल्या, तथापि कलम १८ मध्यें सांगितलेल्या गोष्टीस अनुसरून जर एकादी नोंद झाली असेल तर ती मात्र कलम १८ प्रमाणें बदलतां येईल. या गोष्टी नवीन असून पूर्वींचे कायद्यांत नव्हत्या.

## (२) निर्णायक व अखेरचा पुरावा—

सर्वेच्या कागदांचे पुराव्याच्या दृष्टीनें काय महत्व आहे याचा विचार मागें आह्मीं केलाच आहे, परंतु त्यातून कांहीं नोंदी कायद्याच्या स्पष्ट कलमानें निर्णायक व अखेरचा पुरावा आहे असें ठरविलेलें असतें. थलीचे बाबतींत, " निर्णायक व अखेरचा पुरावा " या शब्दांचा अर्थ **गोपाळ वि. सखोजीराव १८ मुं १३३** या ठरावांत **सर न्या. सार्जंट** यांनीं " या शद्वांच्या सरळ व व्याकरणप्रमाणें होणाऱ्या अर्थाचा परिणाम दिवाणी कोर्टासमोर देतां येण्यासारखा दुसरा कोणताही पुरावा बंद करणें असा होतो " असा केला आहे, त्याचप्रमाणें **गोपाळ वि. दशरथशेट २१ मुं. २४४** यांत कलेक्टरनें केलेली दुरुस्ती ही निर्णायक व अखेरचा पुरावा असल्यामुळें " ज्या कारणानें खंडाची रक्कम ठरविण्यांत आली, त्या कारणांचा कायदेशीरपणा किंवा अन्य गोष्टींची चौकशी करण्याचा दिवाणी कोर्टास अधिकार नाहीं, " असें स्पष्ट ठरविलें आहे. यावरून " निर्णायक व अखेरचा पुरावा " याचा अर्थ थोडक्यांत " दुसरा विरुद्ध पुरावा देतां न येईल असा पुरावा " असा करावयाचा आहे. अशी नोंद दिवाणी कोर्टांनीं असेल तशी ग्राह्य मानली पाहिजे.

## (३) खंडाबद्दलची नोंद निर्णायक व अखेरची नसते अशा गोष्टी–

खंडाबद्दलची नोंद जरी निर्णायक व अखेरची सांगितली असली तथापि ती खालील परिस्थितींत निर्णायक व अखेरचा पुरावा होत नाहीं.

१ कलम ३३ प्रमाणें योग्य नोंद नसेल तर.

२ हक्कवाल्या खातेदाराकडे फुकट जमीन चालावी असें ठरविलें असेल तर, **विठ्ठल वि. येसा २२ मुं. ९५.**

३ सत्ताप्रकाराची नोंद चुकीची असेल त्यावेळीं, अंताजी वि. अंताजी २१ मुं. ४८०

४ खरा खातेदार नसतां भलत्याच इसमास खातेदार समजून नोंद केली असल्यास, वजुद्दिन वि० नारायण १८९८ प्रिं. ज. ७०८.

५ खोतहिस्सेदारानें काय खंड द्यावा ही नोंद, कृष्णाजी वि. कृष्णाजी २१ मुं. ४६७.

(४) वर्ग करण्याचे अधिकाराची नोंद–

१९०४ चे दुरुस्तीनें कायद्यांत सुधारणा होण्यापूर्वी या बाबतींतील कायद्याचें स्वरूप फारच निराळें होतें. कारण वर्ग करण्याचे बाबतींतील नोंद १९०४ चे पूर्वी निर्णायक व अखेरची नव्हती. नारायण वि. गणेश दु. अ. नं. १४६ सन १९०१ नि. ता. २३।९।१९०१ या ठरावांत न्या. जेन्किन्स आणि चंदावरकर यांनीं असा स्पष्ट ठराव दिला आहे कीं, " या ठिकाणीं वर्ग करण्याच्या प्रश्नासंबंधीं कांहींएक वाद नव्हता आणि त्या बाबतींतील नोंद ही कलम १६ प्रमाणें केली असली पाहिजे. परंतु अशा तऱ्हेची नोंद ही त्या इतकी (कलम २१ प्रमाणें होणारी) बंधनकारक नाहीं." * नवीन कलमाप्रमाणें वर्ग करण्याचे बाबतींतील नोंद निर्णायक व अखेरचा पुरावा मानली आहे. चिंतो वि. महादेव २१ मुं. लॉ. रि. ३६१ या ठरावांत सर न्या. स्कॉट यांनीं असें म्हटलें आहे कीं, "खोती सेटलमेंट आक्ट कलम २० मध्यें खातेदार कुळाचा हितसंबंध वर्ग करण्यास पात्र नाहीं अशा नोंदीचे बाबतींत जो पुराव्याचा नियम घातला आहे, तो नियम ज्या वेळीं आपसांतलि निवाड्यामुळें खातेदार कूळ नाहीं असें ठरलें आहे, तेथें लागू होणार नाहीं. कारण त्या नोंदीनें व्यक्तीचा सत्ताप्रकार निर्णायक होतो असें ठरलेलें नाहीं." §

---

* " Here there was no dispute as to the transferability and the entry in reference to that matter must have been in obedience to Sec 16. But such an entry does not carry with it the same binding consequences "

§ " The rule of evidence laid down in Sec. 20 of the Khoti Settlement Act that the entry in the Settlement Register purporting to record the fact, that, the interest of any occupancy tenant is not transferable shall be conclusive evidence, cannot apply where, according to judgment inter-parties the person relying on the section is not an occupancy tenant for the fact of the tenancy of the individual is not conclusively settled by the entry.

(५) वर्ग करण्याबद्दलचे नोंदी विरुद्ध अपील व मुदत.—

१९०४ चे पूर्वीचे कायद्यांत अपिलासंबंधें कांहींच उल्लेख नव्हता. त्यामुळें त्या बाबतींत सर्व गोष्टी लँ. रे. कोड कलम २०३ प्रमाणें चालत असत. हें तत्व गोपाळ वि. दशरथशेट २१ मुं. २४४ या ठरावांत गृहीत मानलें आहे. १९०४ च्या दुरुस्तीपासून ह्या बाबतींत अगदीं स्पष्ट ठराव केला गेला असून आतां या बाबतींत गव्हर्नर–इन्–कौन्सिलकडे अपील करावें असें ठरविलें आहे. कलेक्टर अगर अन्य कोणासही हा अधिकार ठेविलेला नाहीं. गव्हर्नर–इन्–कौन्सिलकडे अपील करणें तें नोंद झाल्यापासून एक वर्षाचे आंत करावयाचें आहे. एक वर्षाची मुदत घालून दिली असल्यामुळें एक वर्षावर काम गेल्यास मुदतीचे कायद्याचे सर्व नियम या बाबतींतही लागू होऊन अपील करतां यावयाचें नाहीं व त्यास मुदतीचे कायद्याचा बाध येईल.

(६) चालू दिवाणी कामांचा बचाव—

हें कलम २१ जून १९०४ ला अंमलांत आलें. त्याचे पूर्वीं कलम १७ प्रमाणें फक्त खंडाचा ठरावच निर्णायक होता. वर्ग करण्याचे अधिकाराचे बाबतींतील नोंद निर्णायक नव्हती. या धोरणानें जे दिवाणी कोर्टाकडे ही दुरुस्ती अंमलांत येण्याचे वेळीं दावे चालू असतील त्यांस ह्या दुरुस्तीची बाधा होऊं नये, असें स्पष्ट ठरविण्यांत आलें आहे. कारण कुळास वर्ग करण्याचा अधिकार नाहीं अशी तक्रार त्या वेळच्या दाव्यांत चालू असल्यास ह्या कलमाप्रमाणें सर्व तक्रार बंद पडून नोंदच फक्त निर्णायक व्हावयाची. अशा करितां हा विशेष ठराव जोडण्यांत आला आहे. या कलमाप्रमाणें ही दुरुस्ती अमलांत येण्यापूर्वीचे चालू असलेले दाव्याचे कामीं जो निकाल होईल त्याप्रमाणें दुरुस्ती केली पाहिजे. कलम २० गतकालसापेक्ष आहे किंवा नाहीं हा अनिर्णीत प्रश्न आहे. शिवाय या कलमाचे भागावरून तें तसें असावें असा हेतूही दिसत नाहीं. यावरून गतकालसापेक्ष आहे असें धरणें योग्य होणार नाहीं असें वाटतें. (क. १६ टी. ९ पहा.)

रिकार्डिंग कामगाराचा निकाल अखेरचा नसेल तेव्हां तो फक्त कोर्टाच्या हुकूमनाम्यानेंच रद्द होईल.

**कलम २१—इतर कोणत्याही बाबतींत, सदहू रिकार्डिंग कामगाराच्या निकालावर अपील चालणार नाहीं. व तो निकाल अधिकार असलेल्या कोर्टाचा अखेरच्या हुकूमनाम्यावरून रद्द केला किंवा बदलला जाईपर्यंत, तो ज्या पक्षकारांस तो लागू असेल त्या सर्वांना बद्धक होईल.**

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं—

(अ) कोणत्याही मनुष्याला, कोणत्याही दिवाणी कोर्टांत, प्रतिवादीच्या किंवा इतर नात्यानें, सदहू प्रकारचा निकाल किंवा नोंद चुकीची किंवा आपणास बद्धक नाहीं अशी तक्रार, ज्या दाव्यांत सदहू प्रश्न निघेल तो दावा करण्याचे तारखे रोजीं त्या मनुष्यास जर त्यावेळीं अंमलांत आलेल्या मुदतीचे कायद्याअन्वयें, तो निकाल किंवा ती नोंद रद्द करण्याकरितां किंवा बदलण्याकरितां किंवा त्या उद्देशानें दावा करण्याची मनाई असेल तर प्रत्यक्ष किंवा परोक्ष रीतीनें करूं दिली जाणार नाहीं; आणि

दावे करण्यास अटकाव करण्याकरितां विशेष ठराव.

( ब ) (१) जो कोणताही निकाल किंवा जी कोणतीही नोंद तपासलेल्या सर्वे सेटलमेंटच्या कारणासाठीं किंवा तशी सेटलमेंट होत असतांना केलेला अगर केलेली असेल, किंवा

(२) जी कोणतीही नोंदीची सुधारणा कलम १८ ह्यांतील कोणत्याही ठरावाअन्वयें केलेली असेल,

त्या निकालावरून किंवा नोंदीवरून अगर त्या नोंदीच्या सुधारणेवरून त्याच विषयासंबंधाच्या पूर्वीच्या निकालाच्या किंवा नोंदीच्या मतलबांत फेरबदल होत नसेल तर, त्या निकालाच्या किंवा नोंदीच्या अगर त्या सुधारणेच्या संबंधानें दाव्याचें नवीन कारण उत्पन्न होतें असें समजूं नये.

(हें कलम सन १९०४ चा मुंबई आक्ट ३ कलम ४ वरून नवीन दाखल केलें आहे.)

—जुनें कलम—

सदहू कोणत्याही गोष्टीविषयीं सदहू सर्वे अंमलदाराचा फैसला जेव्हां शेवटचा नसेल तेव्हां अधिकार असणाऱ्या कोर्टाच्या अखेरच्या हुकुमनाम्यावरून तो फैसला फिरे तोंपर्यंत अगर त्यांत कंपेश होई तोंपर्यंत तो लागू असणारे सर्व पक्षकारांस त्याप्रमाणें चालावें लागेल.

## टिपा.

(१) उद्देश—

कलम १८ यांत कोणकोणत्या बाबतींत रेकार्डिंग कामगारास नोंदींत फेरफार करतां येतात हें सांगितलें असून कलम १९ मध्यें चूक आढळल्यास अगर तक्रारी अर्ज आल्यास त्याचा निकाल कसा करावा हें सांगितलें आहे. कलम १९ मध्यें सांगितलेल्या रेकार्डिंग आफिसराचे ठरावांपैकीं कलम २० मध्यें सांगितलेल्या दोन नोंदीं शिवाय करून अवांतर नोंदीचे ठरावाचे बाबतींत त्याचा या कलमांत विचार केला असून दिवाणीकोर्टाचे निवाड्यानें नोंदीत फरक करतां येतो. तोंपर्यंत ती नोंद कायम असते, असें ठरविणेंत आलें आहे. या कलमानें या तिसऱ्या भागांतील कलमांतून जो उणेपणा राहिला तो भरून काढिला आहे.

(२) इतर कोणतीही बाबत—

या शब्दांचा अर्थ कलम २० चे संबंधानें करावयाचा आहे. कलम १६ व १७ यांत पुष्कळ प्रकारच्या नोंदी करण्याविषयीं या कायद्यांत सांगितलें आहे. त्या नोंदींपैकीं कलम २० यांत खंडाचे बाबतींतलि ठराव व वर्ग करण्याचे बाबतींतलि नोंदी निर्णायक व अखेरचा पुरावा असें ठरविण्यांत आलें आहे. या दोन नोंदी शिवाय-करून बाकीच्या ज्या नोंदी व निकाल राहतात त्यांचे पुराव्याच्या दृष्टीनें महत्व कोठपर्यंत व त्यांवर अपील आहे किंवा नाहीं, असल्यास कोणाकडे, व फिरवून घेणेंझाल्यास काय उपाय योजावे वगैरे सर्व गोष्टी या कलमांत सांगितल्या आहेत.

(३) अपील चालणार नाहीं किंवा तपासणी होणार नाहीं. दिवाणी दाव्याचें स्वरूप—

ही गोष्ट जुन्या कलमांत नसून १९०४ च्या दुरुस्तीच्या कायद्यानें नवीन घातलेली आहे. या दुरुस्तीनें रेकार्डिंग कामगाराचे निकालाविरुद्ध तो कितीही चूक अगर बेकायदेशीर असला, तथापि कोणाकडेही अपील अगर तपासणी अर्ज चालावयाचा नाहीं, असें ठरविणेंत आलें आहे. असा निर्बंध जोंपर्यंत घालण्यांत आलेला नव्हता, तोंपर्यंत या बाबतींत लॅ. रे. कोड कलम २०३ व २११ यांचा अवलंब करतां येत असे; व अशा रीतीनें सुधारलेली नोंद कायम मानण्यांत येत असे. गोपाळ वि. दशरथशेट २१ मुं. २४४ या ठरावांत कलेक्टरनें अपील अर्जावरून केलेली दुरुस्तीच ग्राह्य मानली आहे. १९०४ च्या दुरुस्तीनें मात्र ती सवलत आजिबात काढून टाकली असून एकदां रेकार्डिंग कामगारानें केलेला निकाल योग्य कोर्टाचे निवाड्याशिवाय फिरणें शक्य नाहीं. दिवाणी कोर्टांत तो निकाल ज्याच्या फायद्याचा झालेला असेल त्याचे विरुद्ध दावा करून फैसला मिळविला

पाहिजे. दावा करणें तो (१) एकदम अशा निकालामुळें झालेली नोंद नुसती फिरवून अगर सुधारून मिळावी अशाबद्दल हक्कस्थापनाचा दावा करावा, माधवराव वि. देवनाक २१ मुं ६९५; गोपाळ वि. नागेश्वर २१ मुं. ६०८, दत्तात्रय वि. रामचंद्र २ मुं. लॉ. रि. ३५४; अगर (२) झालेला निकाल चुकीचा आहे असा ठराव होणेकरितां हक्कस्थापनाचा दावा करावा, फकी वि. सजनाक १८ मुं. २४४, अंताजि वि. अंताजी २१ मुं. ४८०; अगर (३) अनायासें ज्यांत नोंदीचे योग्यायोग्यतेबद्दल विचार होईल अशा तऱ्हेचा अन्यस्वरूपाचा-थलीबद्दल,-कृष्णाजी वि. कृष्णाजी २१ मुं, ४६७, विठ्ठल वि. येसा २२ मुं. ९५;—कबजा मिळणेंबद्दल महिपत वि. लक्ष्मण २ मुं. लॉ. रि. २२८, चिंतो वि. महादेव २१ मुं. लॉ. रि. ३६१; राजाराम वि. जगन्नाथ २४ मुं. लॉ. रि. ३२३; त्याचप्रमाणें ताकिदीचा रामचंद्र वि. बाळाजी दु. अ. नं. ९३० सन १९१८ नि. ता. १५।१०।१९२०. अशा प्रकारें प्रत्येक वेळीं परिस्थितीचा विचार करून योग्य त्या स्वरूपाचा दावा आणतां येतो, मग तो सरळ निकालाविरुद्ध अथवा पर्यायानें त्याची चौकशी करणारा असो. कोर्टाचा निवाडा होईल त्याची नक्कल रेकार्डिंग कामगारासमोर नेल्यानंतर त्यास त्या निवाड्याप्रमाणें नोंद बदललीच पाहिजे. कारण निवाडा झाल्यापासून तो ज्यांस बंधनकारक आहे अशा इसमांस ती नोंद निरुपयोगी अशीच आहे. रामचंद्र वि. बाळाजी दु. अ. नं. ९३० सन १९१८ नि. ता. १५।१०।१९२०.

## (४) "निकाल" याचा अर्थ व तो केव्हां झाला असें ह्मणावें—

सर्व साधारण व्यवहारांत कोणत्याही गोष्टीबद्दल वाद उपस्थित झाल्याशिवाय त्या वादाचा 'निकाल' झाला असें कोणी ह्मणत नाहीं. वादच नसेल तर निकाल देण्याचें अगर ठराव लिहिण्याचें कांहीं कारण नाहीं. हेंच तत्व या ठिकाणीं ध्यानांत ठेवावयाचें आहे. या कलमांत "निकाल" असा जो शब्द वापरला आहे त्याचा अर्थ "वादा अंतीं झालेला निकाल" असा करावयाचा आहे. फकी वि. सजनाक १८ मुं. २४५ या ठरावांत सर न्या. सार्जंट यांनीं कलम २० व २१ यांची पहाणी करून असें ह्मटलें आहे कीं, "ह्मणून दिवाणी कोर्टाला फिरवतां येणारा निकाल पक्षकारांच्या प्रतिस्पर्धी हक्कांचे बाबतींत झालेला ठराव होय." ("It is therefore the decision on the rival claims of the parties which is open to reversal by the civil court."). यावरून रेकार्डिंग ऑफिसरानें दोन किंवा अधिक प्रतिस्पर्धी तक्रारींचा केलेला निकाल असा "निकाल" याचा अर्थ आहे. नारायण वि. गणेश दु. अ. नं. १४६ सन १९०१ नि. ता. २६।९।१९०१ या ठरावांत न्या. जेन्किन्स आणि चंदावरकर यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "ज्यावेळीं वाद असेल त्याच वेळीं कलम २१ मध्यें सांगितलेले परिणाम (consequences) घडतात." अशा

तऱ्हेचा वाद होता असें कागदी पुराव्यावरून शाबीद झालें पाहिजे. नुसत्या तोंडीं ह्मणण्याचा कांहीं उपयोग नाहीं. पांडुरंग वि. जनार्दन सि. जु. १४३ सन १९०३ नि. ता. २३।२।१९०४ या ठरावांत सर न्या. जेन्किन्स आणि न्या. ब्याटि यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "रेकार्डिंग ऑफिसराचा निकाल वादाअंतीं झालेला आहे किंवा काय हें न्यायाधिशानें विशेष लक्षपूर्वक कागदांवरून पाहिलें पाहिजे. नुसत्या वकिलाच्या पुरशीसीवरून मानतां येणार नाहीं."*

जुन्या कायद्याप्रमाणें मानलेलें हें तत्व नवीन कायद्याप्रमाणेंही ग्राह्य मानलेलें आहे. महंमद वि. अल्ली दु. अ. नंबर ८५० सन १९१४ नि. ता. १३।७।१९१५ या ठरावांत "निकाल" याबद्दल लिहितानां सर न्या. स्कॉट यानीं असें ह्मटलें आहे कीं—"आह्मांला असें अगदीं स्पष्ट दिसतें कीं निकाल या शब्दानें वादाचा निर्णय असा अर्थ होत आहे; मग तो निर्णय कलम १९ मध्यें सांगितल्याप्रमाणें पक्षकारांच्या समक्ष असो वा नसो."† त्याचप्रमाणें राजाराम वि. जगन्नाथ २४ मुं. लॉ. रि. ३२३ या ठरावांत हेंच तत्व न्या. कोयाजी यांनीं ग्राह्य मानलें आहे. "रेकार्डिंग कामगारानें नमूद करावयाच्या कोणत्याहि बाबीसंबंधें ज्या वेळीं वाद उपस्थित होतो त्यावेळींच कलम १९ पो. क. २ यांत सांगितल्याप्रमाणें त्यास चौकशी करावयाची असते. अशा चौकशीचा परिणाम ह्मणून त्यास निकाल द्यावा लागतो."‡ या एकंदर ठरावांवरून "निकाल" या शब्दाचा अर्थ "प्रतिस्पर्धी तक्रारींवरून रेकार्डिंग कामगारानें दिलेला निकाल" असा करावयाचा आहे. कलम २१ नें दिवाणी कोर्टाचा हुकूमनामा होईपर्यंत जो बद्धक ह्मणून ठरविलें आहे तो या प्रकारचाच फक्त "निकाल" होय.

---

* "Whether there was a "dispute" prior to a "decision" must be determined by carefully scrutinizing the Revenue Record and not by simply relying on the purshis of the pleaders."

† "It seems to us quite clear that the word "decision refers to a determination of a dispute either in the presence or not in the presence of the parties such as is referered to in Sec. 19."

‡ "It is only when a dispute arises that he proceeds to investigate it in the manner provided in SubSec. 2 of Sec. 19; as a result of such a dispute he arrives at his "decision.""

**(५) नोंद आणि निकाल—**

या कलमानें दिवाणी कोर्टाचा निवाडा होईपर्यंत रेकार्डिंग कामगाराचा "निकाल" उभयपक्षीं बंधनकारक धरलेला असून त्यामध्यें नोंदीचा समावेश होत नाहीं. नोंद आणि निकाल या दोन भिन्न गोष्टी आहेत. कारण नोंद ही वादाअंतीं झालेली असेल अगर नसेल. नोंद फिरविण्याचा अगर फेरबदल करण्याचा अधिकार दिवाणी कोर्टाला नसून तो केवळ रिकार्डिंग कामगार यास आहे. दिवाणी कोर्टाला फक्त निकाल फिरवितां येणार आहे. निकालाचे बाबतींत झालेल्या निवाड्याप्रमाणें रिकार्डिंग कामगारानें नोंद फिरविली पाहिजे (क. १८ क. ३ (इ)). फकी वि. सजनाक २१ मुं. २४५ या ठरावांत हें तत्व प्रतिपादिलेलें आहे. दुसरी गोष्ट पक्की ध्यानांत ठेवली पाहिजे ती अशी कीं कलम २० (जुनें कलम १७) यांत निर्णायक व अखेरच्या अशा "नोंदी" सांगितल्या आहेत, तेथें "निकालाचा प्रश्नच नाहीं. कलम १८ मध्यें सांगितल्याप्रमाणें कलम १६ व १७ प्रमाणें करावयाच्या इतर नोंदीच्यावेळीं "निकाल" करण्याचा प्रश्न उद्भवतो. अशा ठिकाणीं वादाअंती केलेला निकाल बंधनकारक आहे, नोंदीचा कांहीं संबंध नाहीं. महंमद वि. अली दु. अ. नं. ८५० सन १९१४ नि. ता. १३।७।१९१५ या ठरावांत हा फरक सर न्या. स्कॉट् यांनीं स्पष्टपणें दाखविला आहे. त्या ठरावांत ते लिहितात कीं "निकाल या शब्दानें वादाचा निकाल असा अर्थ होतो. या दाव्यांत रेकार्डिंग कामगारानें निकाल देण्यासारखा कांहीं प्रश्न उपस्थित झाला होता असें दिसत नाहीं. एकाच्या बाजूनें केवळ नोंद आहे, ही गोष्ट दुसऱ्या बाजूविरुद्ध अखेरची व निर्णायक नाहीं. कारण नोंदी फक्त कलम २० प्रमाणें ज्यावेळीं खातेदार कुळाचे हितसंबंधाचा अगर हकवाल्या खातेदाराच्या जबाबदारीचा प्रश्न असतो अशाच वेळीं निर्णायक व अखेरचा पुरावा असतो. केवळ कलम २१ च्या विशेष ठरावांत "नोंद" असा शब्द घातला एवढ्यानें "नोंद" या शब्दाला कांहीं जास्त अगर विस्तृत अर्थ द्यावा असें आम्हांस वाटत नाहीं."* या ठरावाप्रमाणें

---

* "It seems to us quite clear that the word "decision" refers to a determination of a dispute either in the presence of the parties such as is referred to in Sec. 19 and there is no indication that any such dispute had arisen for the decision of the Recording Officer. We do not think that the mere fact of an entry being in favour of Isub is final and against the other side; for entries are to be conclusive and final evidence under Sec. 20 when they purport to record certain facts with regard to the interest of occupancy tenants or with regard to the liabitity of the privileged occupants,

भिवा वि. बाबू २१ मुं. लॉ. रि. ३५० या ठरावांत न्या. हेवर्ड यानीं असें ह्मटलें आहे कीं "मागील कलमाकडे लक्षपूर्वक पाहिलें असतां मला असें स्पष्ट दिसतें कीं रेकार्डिंग कामगाराच्या 'निकालांत' एखाद्या माणसाच्या नांवाची खातेदार अशी नोंद याचा समावेश होत नाहीं. निर्णायक असे जे निकाल ध्यानांत आणले होते ते ह्मणजे सत्ताप्रकारासंबंधें व खोतांच्या गुंतागुंतीचे हक्कसंबंधाचे निकाल होत." † त्याचप्रमाणें अगदीं अलीकडे राजाराम वि. जगन्नाथ २४ मुं. लॉ. रि. ३२३ या ठरावांत न्या. कोयाजी यानीं असें स्पष्ट ठरविलें आहे कीं "कलम २१ प्रमाणें रिकार्डिंग कामगाराचा निकाल बंधनकारक धरला असून सेटलमेंट रजिस्टरांत एखाद्या मनुष्याच्या नांवांची नोंद ही बंधनकारक नाहीं." या ठरावांत वर नमूद केलेल्या दोन्हीं ठरावांचा आधार घेतलेला आहे. या एकंदर ठरावावरून "नोंद" व "निकाल" या दोन गोष्टी अगदीं भिन्न असून कलम २१ मध्यें नोंदीचा समावेश होत नसून ती केव्हांही बंधनकारक होत नाहीं. दिवाणी कोर्टानीं फिरवीपर्यंत मात्र "निकालास" बंधनकारत्व दिलेलें आहे.

(६) सर्वे कामगाराला "हुकूम" देतां येत नाहीं—

"निकाल" आणि "नोंद" यामध्यें ज्याप्रमाणें फरक आहे त्याचप्रमाणें "निकाल" आणि "हुकूम" यामध्येंही फरक आहे. या कलमानें "निकाल" बंधनकारक केला असून सर्वे कामगाराचा हुकूम त्यांत येत नाहीं. फकी वि. सजनाक १८ मुं. २४५ या ठरावांत सर न्या. सर्जंट यानीं असें म्हटलें आहे कीं "आणि असेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं या कलमानें सर्वे कामगारानें हुकूम करावा असें ही दर्शविलेलें नाहीं." (It is further to be remarked that the section does not contemplate any order being made by

---

We do not think that any further and more extended meaning of the word " Entry " can be given to it by reason of its introduction into the proviso of Sec. 21."

† " Now the section makes conclusive certain decisions of the officer defined as the Recording Officer. What those decisions are is to be gathered from the preceding sections and a perusal of those preceding sections seems to me to make it clear that the mere entry of the name of some particular person as occupant was not intended to be included among those decisions of the Recording Officer. What were contemplated as conclusive were decisions as to the class of tenure and as to the complicated rights of the Khots."

the Survey officer ) या ठरावावरून सर्वे कामगाराच्या हुकमाचा या कलमांत समावेश होत नसून असा हुकूम केला असल्यास त्यास कोणत्याहि प्रकारें बंधनकारकत्व नाहीं, हें उघड आहे.

**(७) सर्वे कामगारानें अधिकाराचे बाहेर केलेले निकाल—**

सर्वे कामगारानें कोणत्या गोष्टींत निकाल करावे हें कलम १८ मध्यें स्पष्टपणें सांगितलें आहे. त्या बाहेर त्यानें आपला अधिकार गाजविल्यास त्यानें दिलेला निकाल कोणासही बंधनकारक होणार नाहीं व त्याप्रमाणें केलेली नोंदही बंधन कारक नाहीं. **दत्तात्रय वि. रामचंद्र २ मुं. लॉ. रि. ३५४=२४ मुं. ५३३** या ठरावांत खोत हिस्सेदाराच्या गहाणदाराच्या नावांची नोंद अनधिकारी आहे असें मानलें आहे. **न्या. पार्सन्स** यांनीं आपल्या ठरावांत असें ह्मटलें आहे कीं, " कायद्यानें सर्वेकामगारास, पूर्णपणें अगर अटीवर खोतकीतील हिशाची मालकी गेलेली नसून जे फक्त एका खोतकींतील हिशाचेच गहाणदार आहेत, अशांच्या हक्काबद्दल चौकशी करण्याचा व निकाल देण्याचा कोठेही अधिकार दिलेला नाहीं आणि अशी गहाणें सुटलीं किंवा अस्तित्वांत आहेत याचा निकाल करण्याची गोष्ट तर दूरच !! * याच ठरावानुसार **महादेव वि. महादाजी १३ मुं. लॉ. रि. १४५७** या ठरावांतही अधिकारातिक्रमणाचे निकाल बंधनकारक नाहींत असें ठरविलें आहे.

**(८) निकालांत नमूद केलेल्या आजुबाजूच्या गोष्टींचे पुराव्याचे दृष्टीनें महत्व—**

" निकाल " लिहितांना पुष्कळ वेळां रेकार्डिंग कामगारानें निरनिराळ्या आजुबाजूच्या परिस्थितीच्या गोष्टी आपल्या निकालांत लिहिलेल्या असतात. निदान अशा गोष्टी लिहिणें शक्य आहे. अशा मुख्य मुद्याच्या गोष्टीव्यतिरिक्त लिहिलेल्या गोष्टी कोणासहि बंधन कारक नाहींत. इतकेंच नव्हे तर त्या पुराव्यांत ग्राह्यही नाहींत. **महादेव वि. देवनाक ११ मुं. ६९५** या ठरावांत **न्या. फॅरन्** यांनीं **गोविंद वि. राघो ८ मुं. ५४३** यांतील **न्या. वेस्ट** याचे ठरावाचा आधार देऊन, असें ह्मटलें आहे कीं—" धारेपत्रकाच्या शेऱ्याच्या सदरांतील मुद्याच्या गोष्टीबद्दल केलेलें

---

* " The law nowhere gives the Settlement Officer authority to investigate and determine the title of persons to whom no share of the Khotki has been transferred either absolutely or conditionally, but who claim as mortgagees only of a share in the Khotki; still less can he decide whether any of these alleged mortgages have been redeemed or are still subsisting."

विधान पुराव्यास ग्राह्य आहे; परंतु त्याच बाबतींत त्याचें चौकशी करण्याचें काम नाहीं अशा खऱ्या वस्तुस्थितीबद्दलच्या आजुबाजूच्या गोष्टीबद्दलचे उल्लेख सरकारी कागदांत सरकारी अंमलदारानें आपल्या कामावर असतांना केलेली नोंद म्हणून पुराव्याच्या कायद्याच्या दृष्टीनें केव्हांहि ग्राह्य नाहींत."* या ठरावावरून फक्त अगदीं विशिष्ट नोंदीला जरूर तेवढेंच उल्लेख पुराव्यांत ग्राह्य असून इतर परिस्थितीबद्दलचे उद्गार पुराव्याचे आक्टाचें कलम ३५ चे ठरावाचे क्षेत्राबाहेरील असल्यामुळें अग्राह्य आहेत.

## (९) पुराव्याचा बोजाः—

कलम २१ प्रमाणें रेकार्डिंग कामगाराचा निकाल दिवाणी कोर्टाच्या निवाड्यानें फिरेपर्यंत कायम असतो. दिवाणी कोर्टाकडे गेल्यानंतर रेकार्डिंग कामगाराचा निकाल चुकीचा आहे ही गोष्ट कोणीं शाबीत करावयाची असा प्रश्न उपस्थित होतो. या बाबतींत केव्हांही सरकारनें केलेली नोंद बरोबर आहे असें मानून त्याचे उलट ती खोटी अगर चुकीची आहे असें ज्याचें म्हणणें असेल त्याचेवरच पुराव्याचा बोजा पडणार हें उघड आहे. महादेव वि. देवनाक २१ मुं. ६९५ या ठरावांत असें ठरविलें आहे कीं, "अशा वेळीं पुराव्याचा बोजा ज्या पक्षकाराला रिकार्डिंग कामगाराचा ठराव बदलावयाचा असतो त्याचेवर पडतो." ("The burden of proof in such a case lies on the party seeking to vary the decision.")

## (१०) मुदत किती—

दिवाणी कोर्टांत कोणताही दावा करतेवेळीं दाव्यास कारण ज्या दिवशीं घडलें तो दिवस फिर्याद ज्या दिवशीं दाखल केली त्या दिवसाचे पूर्वीं मुदतीचे कायद्यानें, (१९०८ चा आक्ट ९) ठरविलेल्या मुदतीच्या दिवसांचे आंत आहे किंवा नाहीं हें पाहणे अत्यंत आवश्यक असतें. सरकारी कागदपत्रांत केलेल्या नोंदीविरुद्ध फिर्याद करणें ती सुद्धां मुदतीचे कायद्यानें ठरलेल्या व तीस लागू अशा

---

* "Statement of facts made by a Settlement Officer in the column of remarks in Dharepatrak, but not his remarks for the same even though they may consist of colateral facts which it was no part of his duty to inquire into, are admissible evidence as being entries in a public record stating facts and made by a public servant in the discharge of his official duty within the meaning of Sec. 35 of the Evidence Act."

मुदतीचे आंत केली पाहिजे. कोणत्याही सरकारी कागदांतील नोंदीविरुद्ध फिर्याद करणें ती मुदतीचे आक्टाचें आर्टिकल १२० प्रमाणें सहा वर्षांचे आंत केली पाहिजे. फिर्याद करणें ती आर्टिकल १४ प्रमाणें सरकारी कामगारांचा निकाल जेव्हां झाला तेव्हांपासून एका वर्षाचे आंत केली पाहिजे, अशी कांहींची तक्रार होती; परंतु आतां त्या प्रश्नाचा कायमचा निकाल लागला असून कलम २१ प्रमाणें करावयाच्या फिर्यादीस आर्टिकल १२० लागू असून ६ वर्षांची मुदत आहे असें नक्की ठरलें आहे. या प्रश्नाचा ऊहापोह फकी वि० सजनाक १८ मुं. २४५ या ठरावांत केलेला असून तेथें आर्टिकल १४ प्रमाणें फिर्याद एक वर्षाचे आंत करावयास पाहिजे अशी तक्रार होती. परंतु त्यामध्यें असें ठरलें कीं आर्टिकल १२० प्रमाणें दाव्यास कारण घडल्यापासून सहावर्षांचे आंत फिर्याद असल्यामुळें ती मुदतींत आहे. कलम २१ प्रमाणें सर्वेकामगारानें अथवा रेकार्डिंग कामगारानें केलेली नोंद कमी करण्याकरितां अगर बदलण्याकरितां करावयाची फिर्याद मुदतीचे कायद्याचे आर्टिकल १२० प्रमाणें सहा वर्षांचे आंत केली पाहिजे. हा आतां अगदीं ठराविक कायदा झाला असून तो पुढें कृष्णाजी वि. निळो १८९४ प्रि. ज. ८२, महिपत वि. लक्ष्मण २ मुं. लॉ. रि. २२८, व गोपाळ वि. कृष्णा ३ मुं. लॉ. रि. ४२० या ठरावांत अनुसरलेला आहे. १९०४ मध्यें या कलमांत दुरुस्ती झाली असली तथापि मुदतीच्या कायद्याचे दृष्टीनें कांहीं एक फरक पडत नाहीं. अशा रीतीनें मुदतीचे आंत फिर्याद करून निकाल बदलून न घेतल्यास झालेल्या निकालाविरुद्ध कांहीं तक्रार करितां येणार नाहीं व तो अखेरचा व निर्णायक पुरावा होईल.

(११) मुदतीची सुरवात व पुराव्याचा बोजा —

मु. आ. आर्टिकल १२० प्रमाणें मुदत केव्हां सुरू होते हें समजणें फार महत्वाचें आहे. आर्टिकल १२० प्रमाणें दाव्याचे कारण "दावा करणेचा हक्क ज्या वेळीं उत्पन्न झाला तेव्हां पासून सुरू होतें असें ठरविलें आहे. परंतु दावा करणेचा हक्क केव्हां सुरू झाला असें समजावयाचें? आजपर्यंतच्या एकंदर निकालांचा विचार केला असतां "नोंद अगर निकाल झाल्याची ज्या दिवशीं माहिती लागली" त्या दिवशीं दावा करणेचा हक्क सुरू झाला असें समजावें असें ठरलें आहे. फकी वि. सजनाक १८ मुं. २४४ या ठरावांत "सर्वे कामगारांनीं केलेला "निकाल" दिवाणी कोर्टाकडे जाऊन फिरवून घ्यावयाचा असल्यामुळें व निकाल झाल्या दिवसापासून सहा वर्षांचे आंत दावा असल्यामुळें तो मुदतींत आहे. कलमामध्यें "हुकमाचा" संबंध नाहीं अगर "पत्रक बनविण्याचाही" संबंध नाहीं." असें ठरविलें आहे. कृष्णाजी वि. निळो १८९४ प्रि. ज. ८२ या ठरावांत वरील ठरावाचे आधारावर १८८४ मध्यें कुळ सर्वे-दस्त लोकलफंड देणारें कूळ आहे

असा निकाल केला; आणि १८८६ मध्यें स्पेशल सर्वे कामगारानें वरील ठराव कायम केल्याबद्दल खोताला यादी लिहिली व खोतानें १८८८ मध्यें दावा आणला तो यादीपासून १ वर्षाचे आंत नसला तरी ६ वर्षाचेआंत असल्यामुळें मुदतींत आहे असें ना. हायकोर्टानें ठरविलें. महिपत वि. लक्ष्मण २ मुं. लॉ. रि २२८ या ठरावांत निकालापासून याचा अर्थ काय करावा याचा ऊहापोह केला असून न्या. पार्सन्स यांनीं असें ह्मटलें आहे कीं "तो (निकाल) त्याच्या (सर्वे कामगाराच्या) डेस्कांत तीन वर्षेपर्यंत सुद्धां पडून राहूं शकेल. निकालाची माहिती अमुक वेळीं लागली या गोष्टीच्या शाबिदीचा काय परिणाम होईल याचा येथें खल करण्याचें कारण नाहीं. परंतु इतकें ह्मटलें असतां पुरे आहे कीं निकालाला तो पुकारल्याशिवाय अगर कोणत्याना कोणत्यातरी मार्गानें निदर्शनास आणल्याशिवाय कांहीं एक जोर येणें शक्य नाहीं; सध्यांच्या दाव्यांत बोटखत तयार होऊन सही होईपर्यंत असें घडलें असें दाखविण्यांत आलेलें नाहीं; ह्मणून ज्या दिवशीं हें घडलें त्या दिवशीं मुदत सुरू होते असें ह्मटलें पाहिजे"* या ठरावावरून निकाल केव्हां लिहिला हा महत्वाचा प्रश्न नसून तो केव्हां पुकारल गेला अगर पक्षकारास त्या निकालाची केव्हां समज मिळाली त्या दिवसापासून मुदत सुरू होते असें ठरलें आहे. गोपाळ वि. कृष्णा ३ मुं. लॉ. रि. ४२० या ठरावांत वरील ठरावाचा खुलासा केला असून न्या. फुल्टन आणि चंदावरकर यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "आमच्या मतें, मुख्यत्वें करून (prima facie) कायद्याचें अनुमान, लँड रे. कोड कलम १९६ पो. क. २ मध्यें सांगितल्याप्रमाणें पक्षकारांस योग्य नोटीस देऊन जाहीरपणें निकाल दिला असें असून निकालाची माहिती पुढें कांहीं दिवसांनीं लागली असें जो ह्मणतो त्याजवर आहे. महिपत वि. लक्ष्मण या ठरावांत विशिष्ट परिस्थितीचा विचार झालेला असल्यामुळें तो सर्व ठिकाणीं आधार ह्मणून घेतां येणार नाहीं. या ठरावावरून इतकेंच होतें कीं, निकालावरची तारीख ही कायद्याप्रममाणें तो ज्यावेळीं जाहीर केला त्याचीच तारीख असें निर्णायक मानतां यावयाचें नाहीं. गैरशिस्तपणा (irregularity) हा अनुमानावयाचा नसून तो आहे असें ज्याचें ह्मणणें आहे, त्यानें तो शाबीत

---

* "It is not necessary to discuss what effect the proved communication of the decision might have; it is sufficient to say that the decision can have no force until it is pronounced or in some way brought to the notice of the parties, and as this is not shown to have been done in the present case till the Botkhat was framed and signed, the date when this was done should be taken as the starting point of limitation."

करावयाचा आहे."† या ठरावावरून निकाल ज्या तारखेस झाला ती तारीख रिकार्डिंग कामगाराने निकाल लिहिला त्या दिवशींचीच असावी याकरितां गृहीत मानली पाहिजे. मात्र त्या तारखेला माहिती लागलेली नाही असें शाबीत करण्याची विरुद्ध पक्षास मोकळीक आहे. रामचंद्र वि. बाळाजी दु. अ. नं. ९३० सन १९१८ निकाल तारीख १५।१०।१९२०. या अप्रसिद्ध परंतु महत्वाच्या ठरावांत आणखी एक महत्वाची गोष्ट पुढें आली आहे. न्या. शहा. आणि न्या. क्रंप यांनीं आपल्या ठरावांत असें ह्मटलें आहे की "आमच्या समोर असें प्रतिवादण्यांत आलें आहे कीं वास्तविक १८९८ मध्यें झालेल्या पत्रकांतील नोंदीची माहिती आपणास नव्हती असें दाखविण्याच्या पुराव्याचा बोजा वादींवर आहे. ज्या अर्थी ते नोंदीची आपणास माहिती नाहीं असें कोठेंही ह्मणत नाहींत त्या अर्थी नोंद ज्या तारखेस झाली त्या तारखेची त्यास माहिती होती असें मानिलें पाहिजे, असें प्रतिपादण्यांत आलें आहे. परंतु ही तक्रार मला गृहीत मानतां येत नाहीं. कैफियतींत मुदतीची सबब नुसती लिहिली होती; परंतु ती कशावर अवलंबून आहे याचें दिग्दर्शन सुद्धां केलेलें नाहीं, फिर्याद मुदतीबाहेर गेली असें ज्या गोष्टीवरून दाखवितां येणार ती गोष्ट प्रतिवादीनें शाबीत करावयास पाहिजे होती. या दाव्यांत तारखेपूर्वीं सहावर्षांचे आंत अशा तऱ्हेचे (नोंदीचे तारखेचे) ज्ञान होतें असा दाखविणारा कांहीं पुरावा दिलेला नाहीं, आणि माझ्या मतें अशा तऱ्हेचें ज्ञान होतें असें मानतां यावयाचें नाहीं. १८९८ मध्यें वादांतील नोंद करण्यापूर्वीं वादीस नोटीस दिली गेली होती असें कसें मानतां येईल हेंच मला कळत नाहीं. याकरितां मुदतीची तक्रार रद्द

---

† "The period of limitation would be six years under Article 120 of the Limitation Act as determined in 18 Bom 341. We think too that *prima facie* the presumption is that the decision was duly delivered after notice to the parties as prescribed by clause 2 of Sec. 196 of the Land Revenue Code, but it appears to us that if as a matter of fact, no notice was given to the appellant and he did not become aware of the decision till some later date, it would be open to him to prove it. The decision in Mahipat V. Laxman (2 Bom. L. R. 228) dealt with special circumstances and can not be cited as an authority of general application except as showing that the date borne by the decision is not conclusive evidence of the date on which it was pronounced according to law. Irregalarity is not to be presumed but a party alleging such irregularity is at liberty to prove it."

झाली पाहिजे*" या ठरावांवरून नोंदीची माहिती सहा वर्षांपूर्वीं विरुद्ध पक्षाला होती असें ज्याचें ह्मणणें असेल त्यानें तें शाबीत केलें पाहिजे.

एकंदरींत वरील सर्व ठरावांवरून सर्वे कामगाराचे ठरावाची ज्या वेळीं माहिती लागली तेव्हां पासून ६ वर्षांचे आंत ती नोंद रद्द करण्याकरितां दावा केला पाहिजे असें सिद्ध झालें आहे. माहिती सहा वर्षांपूर्वीं होती सबब दावा मुदतीबाहेर आहे असें ज्याचें ह्मणणें असेल त्यानें तें शाबीत केलें पाहिजे, असेंही ठरलें आहे.

## (१२) बेकायदेशीर निकालाचे बाबतींत मुदतीचा प्रश्नच नाहीं—

खोती से. आक्टाचे कलम १६ व १७ यांत सांगितलेल्या नोंदीच फक्त करण्याचा सेटलमेंट आफिसरास अधिकार आहे. त्याचे अधिकाराबाहेर त्यानें कांहीं नोंदी अगर निकाल केले असल्यास ते केव्हांही कोणासही बंधनकारक होणार नाहींत. मुळांतच बेकायदेशीर अशी नोंद असल्यास ती केव्हांही केलेली असली तरी ती मुदतीच्या कायद्यानें योग्य होत नाहीं, इतकेंच नव्हे तर एकादी चुकीची नोंद मुदतीचे कायद्याचे बाहेर बरेच दिवस राहिली एवढ्यानें इतर निराळ्या हक्कांसही बाध येत नाहीं. दत्तात्रय वि. रामचंद्र २ मुं. लॉ. रि. ३५४ या ठरावांत तर हें तत्व स्पष्टपणें न्या. पार्सन्स यांनीं प्रतिपादिलें आहे. "खोती आक्टानें खोताची व्याख्या केली आहे त्यांत कायदेशीरपणें खोतकी ज्याच्या

* "It is urged, however, on behalf of the defendant that the onus of proving that the plaintiffs had knowledge of the register which was in fact made in the year 1898 lay upon them. As they do not state anywhere that they were ignorant of the entry they must be presumed to have knowledge of such entry almost from the date on which the entry was made. I am however unable to accept this argument. The plea of limitation was simply mentioned in the written statement, but no indication was given as to the ground upon which it was based. It was for the defendants to establish the facts which would render the suit time-barred. He gave no evidence in the suit to show that the plaintiffs or any of them had any such knowledge more than six years prior to the date of the suit and such knowledge in my opinion cannot be assumed ........ ........., I cannot see how it could be assumed that the plaintiffs were given notice before the entry in question was made in the year 1898. The plea of limitation must therefore fail.

कबजांत आहे असा गहाणदार असें ह्मटलें असून खोतकी याचा अर्थ खोत ह्मणून खोताचे जे हक्क व हितसंबंध ते, असा दिला आहे. आक्टानें मान्य केलेला गहाणदार ह्मणजे खोतकी ज्याच्या कबजांत आहे तो. खोतकींतील हिस्सेदार याची व्याख्या दिलेली नाहीं, तोंपर्यंत हिस्सेदाराचे गहाणदाराचा त्या शद्बांत समावेश होतो असें मानतां येत नाहीं. अशा तऱ्हेची स्थिति असल्यामुळें खोतकींतील हिस्सा एखाद्याला अजिबात अथवा अटीवर दिलेला नसून केवळ खोत हिस्सेदाराचा गहाणदार ह्मणून हक्क सांगणाऱ्या इसमांच्या हक्काची चौकशी अगर निकाल करण्याचा अधिकार सर्वेकामगारास या कायद्यानें कोठेंच दिलेला नाहीं, आणि गहाण सुटलें आहे अगर अस्तित्वांत आहे हें पहाण्याचा तर त्यास मुळींच अधिकार नाहीं. या बाबतींतील सर्वे कामगाराचा निकाल त्याचे अधिकाराबाहेरचा असल्यामुळें तो निरर्थक ( nullity ) आहे व खोती आक्टाखालचा बंधनकारक असा निकालच नव्हे असेंच मानलें पाहिजे." यावरून अधिकाराबाहेर केलेली नोंद बेकायदेशीर असून तिच्यावर कोणासही अवलंबून राहातां येत नाहीं. त्याचप्रमाणें एखादा इसम खोती ताक्षिमेंत मालकच नसतां मालक ह्मणून दाखल झाला व ती नोंद मुदतीचे कायद्याचे बाहेर तशीच राहिली एवढ्यानें तो इसम मालक होणार नाहीं व अशा ठाकाणीं मुदतीचा प्रश्नही उपस्थित होणें शक्य नाहीं, असें स्पष्टपणें **रामचंद्र वि. बाळाजी दु. अ. न. ९३० सन १९१८ नि. ता. १५।१०।१९२०** यांत गृहीत मानलें आहे. यावरून सर्वे कामगारानें अधिकाराबाहेर केलेला निकाल अगर नोंद, निरर्थक व निरुपयोगी ( null & void ) अशीच मानली पाहिजे. अशा परिस्थितींत मुदतीचे कायद्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं.

**(१३) एकदां मुदत सुरू झाल्यानंतर केवळ नोंद नंतर झाली एवढ्यावरून नोंदीचे तारखेपासून नवीन मुदत सुरू होत नाहीं—**

**मुदतीचे कायद्याचें** सर्वसाधारण तत्व असें आहे कीं एकदां मुदतीचे कायद्यानें मुदत सुरू झाल्यानंतर मग मध्यंतरीं ती कोणत्याही कारणानें थांबवितां येत नाहीं. **मु० का० कलम ९** मध्यें हें तत्व सांगितलें असून एकदां कायद्याप्रमाणें "मुदत सुरु झाल्यानंतर ती सारखी चालू राहाते अयोग्यता व असमर्थता यांमुळें तीस खंड पडूं शकत नाहीं." असें ठरविलें आहे. अयोग्यता व असमर्थता यांचा अर्थ सांगून त्याचा मुदतीवरती काय परिणाम होतो हेंही त्या कायद्यांत सांगीतलें आहे. असमर्थता व अयोग्यता जर मुदत थांबवूं शकत नाहीं तर नंतरची नोंद वगैरे कारणें तर मुदत थांबविण्यास खात्रीनें निरुपयोगी आहेत. **विठ्ठल वि. सिताबाई ३ मुं. लॉ. रि. १८१** या ठरावांत परीस्थिति अशी होती कीं, १३।६।१८८६ मध्यें वादीनें पांच चतुर्थांश पै खोती ताक्षिमेचें प्रतिवादी नंबर १।२ यांचेकडून गहाणखत

करून घेतलें. व त्यांत अशी अट घातली कीं, नरहर याचें कागदोपत्रीं नांव आहे व त्यामुळें त्याची कबुलायत होते, करितां तें कमी करूं, व तुमचें नांव दाखल करून तुमचें नांवें कबुलायत होण्याची तजवीज करूं. परंतु नरहरनें आपली कबुली न दिल्यामुळें प्रतिवादी नं. ११२ यांस ठरावाप्रमाणें नांव दाखल करून देतां आलें नाहीं. १८९० सालीं सर्वे सेट्लमेंट कामगारांनीं गांवाची सर्वे केली त्यावेळीं वादीनें पांच चतुर्थांश तक्षिमेला गहाणदार म्हणून आपलें नांव लागावें असा अर्ज केला. परंतु नरहरनें कबुली न दिल्यामुळें नांव दाखल करणेंत आलें नाहीं. मामलेदारानें नांव दाखल करणेंत येत नाहीं ही गोष्ट २।८।१८९३ ला वादीला कळविली. वादीनें या तारखेवर आपली दाव्याची रचना करून १८९६ च्या मार्च महिन्यांत दावा आणला. यावर ना. हायकोर्टानें असें ठरविलें कीं "दावा चालणें शक्य नाहीं. कारण नरहरचें नाकारणें १८८६ मध्यें सुरू झालें. खोती आक्टाचें कलम २०।२१ मुळें पूर्वींच हक्कसंबंध नाकबूल केला असल्यामुळें नवीन कारण उपस्थित होत नाहीं; कलम २१ मध्यें जरी खोत हिसेदारांची व त्याच्या हितसंबंधाची नोंद करावी असें सांगितलें असलें, तरी नोंद करण्यापूर्वींपासूनच हा हक्क नाहींसा केला असल्यानें दाव्यास कारण नोंदी पासून नवीन उपस्थित होत नाहीं. सर्वे कागदीं नोंद केली एवढ्यानें पुन्हां मुदत सुरू झाली असें म्हणतां येणार नाहीं." यावरून कोणत्याही अन्य कारणानें एकदां मुदत सुरू झाली असल्यास खोती आक्टांत करावयास सांगितलेल्या नोंदी करण्यानें, अगर निकालानें पुन्हां मुदत नवीन सुरू होऊं शकत नाहीं.

### (१४) तपासलेल्या सर्वे सेट्लमेंटांतील नोंदीमुळें नवीन मुदत सुरू होत नाहीं.

सर्वे सेटल्मेंट एकदां झाल्यानंतर पुन्हां तीस वर्षांनीं त्याची तपासणी (revision) होत असते. अशा वेळीं सर्व कागद नवीन व्हावयाचे असून त्यावेळीं नोंदी पुन्हां लिहावयाच्या असतात. अशा वेळीं नवीन नोंद लिहिली एवढ्यावरून नवीन कारण उपस्थित झालें असें कदाचित् ह्मणतां आलें असतें. परंतु त्याचा खुलासा कलम २१ चे "ब" भागांत स्पष्ट केला आहे. सरळ विचार केल्यास नोंद केवळ पुन्हां लिहिणें, व नोंदीबद्दल चौकशी करून निकाल देणें, या गोष्टी अगदीं भिन्न आहेत, हें कोणीही कबूल करील. नोंद पुन्हां लिहिली एवढ्यानें पुन्हां मुदत सुरू होत नाहीं.

### (१५) १८६५ चा आक्ट १ खालीं केलेले निकाल—

१८८० च्या खोती सेट्लमेंट आक्टानें जे अधिकार सर्वे कामगारास दिलेले आहेत, ते अधिकार त्या पूर्वींच्या १८६५ च्या कायद्यानें दिलेले नव्हते. १८६५ च्या कायद्यानें सर्वे कामगारांचें या बाबतींतील क्षेत्र कलम २७ प्रमाणें अगदीं मर्या-

दित असून त्या कलमाप्रमाणें केलेली चौकशी व निकाल यांस कांहीं एक महत्व दिलेलें नव्हतें, व त्यामुळें त्यावेळीं जरी कांहीं नोंदी केल्या गेल्या असल्या तरी त्यांस कांहीं महत्त्व नाहीं हें स्पष्ट आहे. १८८० चा आक्ट १ अंमलांत येण्यापूर्वीच्या डि. आर. बाम वि. सर्वे कमिशनर ३ मुं. १३४ या ठरावांत ही गोष्ट उघडपणें ठरविलेली आहे. तेथें असें ठरविलें आहे कीं, " सरकारी कागदांत खोताचीं कुळें, खातेदार कुळें, अशीच फक्त नोंद असल्यामुळें जमीनदाराच्या हक्काला कोणत्याही प्रकारें बाध येत नाहीं. सरकारच्या प्रजेच्या दरम्यानचे हक्कास बाध आणण्यासारखें सर्वे आक्टाच्या कलमांत अगर त्याखालीं केलेल्या नियमांत कांहीं नसल्यामुळें खोतांस आपला हक्क शाबीत करितां येत असल्यास त्यास कांहीं बाध आणतां येत नाहीं." या ठरावावरून १८६५ च्या आक्टाखालीं केलेल्या नोंदीचें महत्व काय हे ध्यानांत येईल. हेंच तत्व कृष्णाजी वि. निळो १८९४ प्रि. ज. ८२ या ठरावांतही नक्की केलेलें आहे. त्यांत १८६५ च्या आक्टाला सत्ताप्रकार पाहाण्याचें कारण नाहीं व कलम २७ प्रमाणें जी चौकशी करण्याबद्दल सांगितलेलें आहे ती न्याय्य स्वरूपाची नसून त्यामुळें कोणाच्याही खासगी हक्कास बाध येत नाहीं असें ठरविलें आहे.

## (१६) कोर्टाच्या अखेरच्या हुकूमनाम्यावरून रद्द केला किंवा बदलला जाईपर्यंत बद्धक होईल–

कोणतीहि कलम २० खालीं न येणारी नोंद कलम २१ प्रमाणें दिवाणी कोर्टामार्फत रद्द करून अगर बदलून घेतली पाहिजे, तसें न केल्यास ती बंधनकारक आहे असें या कलमानें सांगितलें आहे. कोर्टाकडे जाऊन निकाल करून घेतला परंतु नोंद बदलणेंची राहिली तर ती नोंद बंधनकारक व्हावी असें कलमाच्या भाषेवरून वाटण्याचा संभव आहे. परंतु याचा योग्य निकाल रामचद्रं वि. बाळाजी दु. अ. नं. ९३० सन १९१८ नि. ता. १५।१०।१९२० या ठरावांत न्या. शहा आणि न्या. क्रंप यांनीं केला असून, कोर्टाचा निकाल झाल्यानंतर जरी नोंद शिल्लक राहिली असली तरी ती निरुपयोगी आहे असें ठरविलें आहे. ठरावांत सदर न्यायमूर्ती ह्मणतात " १९०६ मध्यें झालेला वांटपाचा दावा या दाव्यांतील पक्षकारास बंधनकारक असून तो " ब " पत्रकाची नोंद रद्द करण्याकरितां होता. इतकें खरें कीं अशा तऱ्हेचा स्पष्ट उल्लेख फिर्यादींत नव्हता. परंतू त्याचा अपेक्षित परिणाम " ब " पत्रकांतील नोंद फिरविणें अगर बदलणें असाच होता. सन १९०८ मध्यें झालेल्या निवाड्याचा जर असा परिणाम आहे तर प्रतिवादींना आतां त्याच नोंदीचा अवलंब करितां येणार नाहीं, कारण ती कलम २१ प्रमाणें योग्य अधिकार असलेल्या कोर्टाच्या अखेर हुकुमानें फिरे अगर बदलेपर्यंतच बंधनकारक आहे. त्याचे विरुद्ध खोती आक्टाप्रमाणें पत्रकांतील नोंद निवाड्याप्रमाणें बदलून घेण्याची

कांहीं तजवीज केलेली नाहीं असें म्हणणें हें योग्य उत्तर नव्हे. " ब " पत्रकांतील नोंद यथाविधि (formally) बदलली अगर न बदलली तरी १९०८ च्या निवाड्याचा परिणाम ती नोंद फिरविणें असाच होतो. तेव्हां या दाव्याचे वेळीं असलेली " ब " पत्रकाची नोंद पक्षकारास बंधनकारक नाहीं " या ठरावावरून इतकें स्पष्ट झालें आहे कीं नोंदीविरुद्ध निवाडा झाल्यानंतर नोंद जरी कागदीं फरक न होतां राहिली तरी त्याचा परिणाम कांहींएक शिल्लक राहत नाहीं. अशी नोंद असून नसून सारखीच.

**कलम २२ — सरकारावर किंवा सरकारी अंमलदारावर दावा करण्याची मनाई—**

**सर्वेच्या अंमलदारानें किंवा इतर रिकार्डिंग कामगारानें या भागाअन्वयें कोणताही निकाल किंवा हुकूम रद्द करण्याबद्दल सरकाराविरुद्ध, किंवा सरकारच्या कोणत्याही अंमलदाराविरुद्ध दावा चालणार नाहीं.**

**(हें कलम सन १९०४ चा मुं. आक्ट ३ कलम ४ वरून नवीन दाखल केलें आहे.)**

**—जुनें कलम—**

सदर्हु सर्वे अम्मलदाराविरुद्ध किंवा सरकाराविरुद्ध सर्वे अम्मलदाराचा सदर्हू फैसल्ला रद्द करण्याबद्दल फिर्याद चालणार नाहीं; परंतु पक्षकार आपल्यामध्यें जो हुकूमनामा करून घेतील त्या हुकूमनाम्याप्रमाणें आणि सदर्हू सर्वे अंमलदारास किंवा कलेक्टरास त्या हुकूमनाम्याचे दाखले नकलेसहित त्यांनीं यथायोग्य अर्ज केला असतां सदर्हु सर्वे अंमलदारानें, अथवा जेव्हां सर्वेचा ठराव करणें पुरें झालें असेल तेव्हां कलेक्टरानें, वेळोवेळीं कागदपत्रांत शोध घातला पाहिजे.

**टिपा.**

(१) उद्देश—

सर्वेचे अमर रेव्हेन्यूचे कामगारांवर सर्वे सेटलमेंटचें मोठ्या जबाबदारीचें काम सोंपविलेलें असतें. अशावेळीं योग्य अधिकारांत त्यांचे हातून कांहीं चूक

झाल्यास त्याचे विरुद्ध किंवा सरकाराविरुद्ध दावे घालण्यांत येऊं नयेत म्हणून हें कलम मुद्दाम सरकारनें या कायद्यांत घालून ठेविलें आहे. या कलमाप्रमाणें सरकाराविरुद्ध अगर सरकारी अम्मलदाराविरुद्ध दावा न होण्यासारख्या गोष्टी म्हणजे केवळ या भागांत सांगितलेले सर्वे सेटलमेंटचे कामीं केलेले निकाल किंवा हुकूम होत.

(२) जुनें व नवें कलम—

जुन्या कलमांतील सरकाराविरुद्ध फिर्याद करण्याचे बाबीशिवायचा भाग कलम १८ मध्यें १९०४ सालीं समाविष्ट केला असून, त्यामध्यें दुरुस्त्या केव्हां कराव्या वगैरे सविस्तर माहिती दिली आहे. नवीन कलमांतील प्रथमचे भागांत नवीन शब्द " हुकूम " असा घातला आहे. रेकॉर्डिंग कामगार अथवा सर्वे कामगार यांनीं या भागाखालीं केलेल्या हुकुमाविरुद्धही या कलमाप्रमाणें आतां दावा चालावयाचा नाहीं असें ठरविणेंत आलें आहे. हुकूम व निकाल यांचे मधील फरक मागें सांगितला आहे. (पान १७६) या भागाच्या कलम २०।२१ प्रमाणें हुकूम ग्राह्य मानलेले नाहींत, हेंही मागें सांगितलें आहेच.

(३) सरकार विरुद्ध दावे—

सरकारविरुद्ध दावा करण्याचा हक्क या कलमानें अजिबात काढून घेतला आहे असें नाहीं. या कलमाचा सर्वे सेटलमेंटचे बाबतींत केलेल्या निकालाविरुद्ध अगर हुकुमाविरुद्ध दावा चालावयाचा नाहीं, इतकाच फक्त हेतु आहे. कारण हे निकाल दोन पक्षकारांचे दरम्यानचे असून त्यांस दिवाणी कोर्टाचा निवाडा मिळविण्याची पूर्ण मुभा ठेविलेली आहे. निवाड्याप्रमाणें रेकार्डिंग कामगारानें दुरुस्ती केलीच पाहिजे. परंतु याशिवाय सरकार व खोत यांच्या दरम्यान पुष्कळ प्रश्न उपस्थित होत असतात. त्याबद्दल अर्थातच सरकारविरुद्ध दावा करणें भाग येणार. सरकारनें जप्त केलेल्या गांवासंबंधें नफा आकारण्याबावत, **रामचंद्र वि. रत्नागिरीचे कलेक्टर ७ मुं. हा. रि. ४१**, झाडांचे हक्काबाबत **नागरदास वि. कॉन्सर्व्हेटर आफ फॉरेस्ट ४ मुं. २६४ प्रि. कौ.**; खोतांचे मालकी हक्काचे बाबतींत **ताजुबाई वि. कुलाब्याचे सबकलेक्टर ३ मुं. हा. रि. १३२, रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी, व सेक्रेटरी ऑफ् स्टेट वि. नारायण १ मुं. लॉ. रि. १९**; खोतकीचा कबजा परत मागण्याकरितां **सेक्रेटरी ऑफ् स्टेट वि. सखाराम १ मुं. लॉ. रि. ४७२**; नदी कांठीं तयार झालेल्या जमिनीचे बाबतींत **सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. वासुदेव ९ मुं. लॉ. रि ७१९**; सरकारसारावाढीचे बाबतींत, **सेक्रेटरी ऑफ स्टेट वि० सदाशिव १४ मुं. लॉ. रि. ७७**; वगैरे हरएक प्रकारच्या महत्वाच्या प्रश्नांत सरकार व सरकारी अधिकारी यांचे विरुद्ध दावे

करण्याचा आजपर्यंत प्रसंग आलेला आहे. अशा विशिष्ट हक्कांचे बाबतींत या कलमाचा बाध येणें शक्य नाहीं.

**(४) सरकार विरुद्ध दावे करण्याची पद्धत—**

सरकार विरुद्ध दावा करावयाचा झाल्यास दिवाणी कायद्याचें (Civil Procedure Code) कलम ७९, ८०, ८१, व ८२ याप्रमाणें व ऑर्डर २७ प्रमाणें सर्व गोष्टी चालवयाच्या असतात. त्यांतील विशेष लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी ह्मणजे कोणतीही सरकार विरुद्ध असलेली फिर्याद सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचे विरुद्ध केली पाहिजे (कलम ७९), दावा करण्यापूर्वी दाव्यास कारण कसें उपस्थित झालें, सरकार विरुद्ध दाद कोणती मागणार वगैरे सर्व गोष्टी सविस्तर लिहून दोन महिन्याची नोटीस आगाऊ स्थानिक सरकारचे सेक्रेटरी किंवा जिल्ह्याचे कलेक्टर यांस दिली पाहिजे व दावा करतांना अशी नोटीस दिल्याचें नमूद केलें पाहिजे. व त्यानंतर दाव्याचे काम कसें चालवावें वगैरे गोष्टी ऑर्डर २७ मध्यें स्पष्टपणें नमूद केलेल्या आहेत.

# भाग ४

## या आक्टाप्रमाणें केलेल्या सर्वे सेट्ल्मेंटाचे वहिवाटीविषयीं

कलम २३— ज्या गांवाला हा आक्ट लागू होतो तशा कोणत्याही गांवाला ह्या भागाचे ठराव हा आक्ट ठरल्यानंतर गव्हर्नर-इन्-कौन्सिल हे प्रथम, सदर्हु गांवाचें सर्वे सेट्ल्मेंट मंजुर करीत तोंपर्यंत, आणि त्या सर्वे सेट्ल्मेंटावरून कांहीं वर्षांच्या मुदतीपर्यंतच्या ठरलेल्या आकारण्या, सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा कलम १०२ याप्रमाणें कायम केल्या असें ठरवीत तोंपर्यंत, लागू होणार नाहींत.

या भागाचे ठराव केव्हां लागू होतील याविषयीं

सदर्हु वेळापर्यंत, सर्व पक्षकारांचे हक्क आणि जबाबदाऱ्या या भागांमध्यें सांगितलेल्या गोष्टींविषयीं जितक्या असतील तितक्या, हा भाग आक्टांत ठरविला नसता तर जशा चालत्या तशा चालू राहातील.

### टिपा.

(१) उद्देश—

या भागांत गांवच्या वहिवाटीसंबंधाच्या निरनिराळ्या प्रश्नांचा विचार केलेला असून त्याप्रमाणें गांवची जमा कोणीं द्यावी, वहिवाटदार खोताची जबाबदारी काय, त्याचे अधिकार काय, विभक्त व अविभक्त खोतहिसेदारांचे हक्क व अधिकार काय, खातेदार कुळांनीं थळ काय द्यावी, वेठ वगैरे बाबी कायदेशीर कोणत्या, बेकायदेशीर कोणत्या, लोकलफंड कोणीं द्यावा, वगैरे गोष्टींबद्दल ठराव केलेला असून त्याचा अंमल या कायद्यानें केव्हां झाला असें समजावयाचें, हें या कलमांत स्पष्ट सांगितलें आहे. या भागांत सांगितलेल्या सर्व गोष्टी सर्वे सेट्ल्मेंट कायम होण्यावर अवलंबून असल्यामुळें सेट्ल्मेंटास कायमपणा येईपर्यंत त्या यथापूर्वच चालणें भाग असल्यामुळें तीच गोष्ट या कलमांत सांगितली आहे.

(२) लँड रेव्हेन्यू कोड कलम १०२ व सर्वे सेटल्मेंट—

या कायद्याच्या तिसऱ्या भागानें खोती गांवचे सर्वे सेटलमेंट कागदांत काय नोंदी करावयाच्या वगैरे सांगितलें असून त्यापैकीं निरुत्तर कोणत्या, दिवाणी कोर्टा-च्या निवाड्यापर्यंत कायम कोणत्या वगैरे सांगितलें आहे. हे कागदपत्र तयार झाले, तथापि कोणतेही गांवाला सर्वेसेटलमेंट लागू व्हावयाचें ह्मणजे लँ. रे. कोड कलम १०२ प्रमाणें गव्हर्नर–इन्–कौन्सिलनें तें मंजुर करावें लागतें. कलम १०२ मध्यें–"सर्वेचा चार्ज ज्या अंमलदाराच्या स्वाधीन असेल त्यानें ठांस केलेला जो आकार तो सरकारच्या मंजुरीवांचून वसूल करूं नये. गव्हर्नर–इन्–कौन्सिल यांस असा अधिकार आहे कीं त्यांनीं सदर्हु प्रकारचे आकार, त्यांस योग्य वाटतील तें फेरफार करून शेतकीच्याच कारणांसाठीं उपयोग केलेली जमीन असेल तेव्हां पराकाष्ठा तीस वर्षांच्या मुदतीपर्यंत व दुसऱ्या सर्व जमिनीबाबद पराकाष्ठा नव्याणव वर्षांच्या मुदती पर्यंत ठांस केला असें जाहीर रीतीनें फर्मावावें"—असें ठरविलें आहे, व हें कलम खोती गांवासहि लागू आहे. तेव्हां साहजिकच गांवचें सेटलमेंट कायदेशीर रीतीनें गव्हर्नर–इन्–कौन्सिलनें कायम झाल्याचें जाहीर केल्याशिवाय दस्ताशीं संबंध असलेले वहिवाटीचे प्रश्नही कायदेशीर होणें शक्य नाहीं, ही गोष्टच या कलमांत सांगितली आहे. रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यांत सेटलमेंट केव्हां मंजुर झालें, तपासण्या केव्हां झाल्या, खोती सेटलमेंट केव्हां झालें हें समजण्याकरितां तालुकेवार सनवारीचें कोष्टक, कलम १६ टी. १७ येथें दिलें आहे तें पाहावें. सर्व तालुक्यांतून ३० वर्षांची मुदत मंजुर करण्यांत आली असून पुढील तपासणी कोणते सालीं प्रथम होणें शक्य आहे तेंहि सदर कोष्टकांत दिलें आहे, तें पाहावें.

(३) सर्वे सेटलमेंट मंजुर होईपर्यंतची स्थिति–

लँ० रे० कोड अंमलांत येण्यापूर्वीं १८६५ चा मुं. आक्ट १ व त्याचे पूर्वीं मुंबई रेग्युलेशन १७ सन १८२७ चा, असे कायदे अंमलांत होते, व त्याप्रमाणें आकारणी केली जात असे. १८२७ च्या रेग्युलेशनचे कलम ३ प्रमाणें प्रत्येक गांवावर पूर्वींच्या साधारण मानानें गांवशिरस्ता व आपसांत कलेक्टरशीं केलेली तोड, या मानानें दस्त बसवून तो गांवचे "वरिष्ठ धारण करणार" ( highest holder ) या नात्यानें खोतांकडून वसूल केला जाई. वसूल करणें तो कांहीं पैशाचे रूपानें व कांहीं गल्ल्याचे रूपानें होई. रेग्युलेशन कलम २० प्रमाणें गांवचा वसूल करण्याची कबुलायत देण्याचाही अधिकार कलेक्टरला होता व त्यास अनुसरून खोतांकडून कबुलायत घेतली जात असे. त्यानंतर १८६५ च्या आक्ट १ नें गांववार मोजणी व पाहणी करून प्रत्येक सर्वेनंबर, त्याचा मगदूर, त्यावरील दस्त, वगैरे गोष्टी कायम करून त्या प्रत्येक सर्वेनंबरच्या कायदेशीर धारण करणाराकडून वसूल करण्याचें तत्व अमलांत आलें, व जेथें जेथें मोजणीचें काम करणेंत

आलें, तेथें तेथें हा आक्ट लागू करणेंत आला. १८६५ च्या आक्टाचेंच पुढें १८७९ चा आक्ट ५ ह्मणजे लँड रेव्हेन्यु कोड यांत रूपांतर झालें व आतां त्याचाच अंमल सुरू आहे. खोती से. आक्ट लागू होण्यापूर्वी उपरिनिर्दिष्ट आक्टा-प्रमाणें व जुन्या शिरस्त्याप्रमाणें खोती गांवची वहिवाट चालत असे. सेटलमेंटची मुदत व मंजुरी यांबद्दल विशेष खुलासा क. २ टी. ५ येथें पहा.

## खोतांची जमा.

जमा कशी आकारावी

**कलम २४ — सरकारास खोतानें द्यावयाची जमा गांवचे जमिनींचे सर्व आकाराच्या एकदरींतून, प्रत्येक प्रसंगीं जितके टक्के सरकार ठरवितील ( जर ठरवितील तर ) तितके टक्के वजा करून बाकी राहील ती होय.**

कांहीं मुदतीपर्यंत रकम ठरविणें.

**ज्या मुदतीकरितां सर्वेच्या आकारण्या ठरविल्या असतील त्याच मुदतीकरितां वेळोवेळीं सदहू जमेची रकम ठरविली पाहिजे.**

## टिपा.

(१) उद्देश—

पूर्वीच या आक्टाचें कलम ४ मध्यें खोतानें जमा दिली असतां गांव त्याचे-कडे चालतील असें सांगितलें आहे. या कलमांत जमा किती व कशी आकारावी, किती मुदतीपर्यंत ती कायम राहावयाची हें सांगितलें आहे.

(२) जमा कशी आकारावयाची—

गांवची लँड रेव्हेन्यू कोडाप्रमाणें सर्व्हेनंबरवार मोजणी व पहाणी झाल्यानंतर प्रत्येक सर्वे नंबरचा जमिनीच्या मगदुराप्रमाणें दस्त ठरतो. अशा रीतीनें आकारणी होऊन सर्व गांवावर सरकारदस्ताची आकारणी किती होते, तें काढून त्याच्या मधून सरकारनें दरशेकडा कांहीं सूट द्यावयाची ठरविल्यास तितकी सूट घालून सबंध गांवची जमा एकदम कायम केली पाहिजे; व ती सर्व सेटलमेंटच्या मुदतीपर्यंत कायम राहण्याबद्दल लँड रेव्हिन्यू कोड कलम १०२ प्रमाणें मंजूरहि केली पाहिजे. अशा रीतीनें ठरविलेली जमा खोतानें ठरल्या तारखेचे आंत सरकारांत भरलीच पाहिजे. त्यांत मग एकादी जमीन ओसाड राहिली, कुळानें राजिनामा दिला, धारे-कऱ्यानें जमीन सोडली वगैरे कोणत्याहि कारणाकरितां सूट मिळावयाची नाहीं. सेट-

लमेंटची तपासणी झाल्यास त्याचे पुढील मुदतीकरितांही याप्रमाणें जमा नक्की केली पाहिजे. जमा ठराविक मुदतीपर्यंत कायम ठेवण्यास सरकार बांधलेलें आहे.

(३) जमा द्यावयाच्या तारखा—

जमा केव्हां द्यावी त्या तारखा कलम ४० रकम फ कानु ६ यांत दिल्या आहेत; त्यांत सरकारी ठराव नं. ४५२७ फ तारीख १६।५।१९२२ वरून सुधारणा झालेली आहे (मुं. स. ग्याझेट १८ मे १९२२ पान ११३२) त्यास अनुसरून दरवर्षी जमेचा भरणा ५ फेब्रुवारी व ५ एप्रिल या तारखांस केला पाहिजे. १९२२ मध्यें दुरुस्ती होण्यापूर्वी १५ डिसेंबर, १ फेब्रुवारी, १५ मार्च, व १ मे अशा तारखा होत्या. जमेप्रमाणेंच लोकल फंड सेस ठरलेला असतो व तो नेहमीं पहिल्या हप्त्याबरोबरच दिला पाहिजे असा सरकारी ठराव आहे.

(४) कुलाबा जिल्ह्यांतील खोतांची जमा—

कुलाबा जिल्ह्यांत ज्या गांवांना खोती से. आक्ट लागू नाहीं त्यांचे सर्व कारभार लँड रेव्हेन्यू कोड, व १८६५ चा आक्ट १ चीं कलमें ३७।३८ प्रमाणें चालतात. कलम ३७ प्रमाणें सेटलमेंटची मुदत नक्की ठरवून त्या मुदतीकरितां खोतांकडून एकदम कबुलायत घेण्यांत येते व त्या कबुलायतींतील शर्तींप्रमाणें सेटलमेंटच्या मुदतीपर्यंत ही जमा द्यावयाची असते. जमेमध्यें सेटलमेंटच्या मुदतीपर्यंत सरकारला फेरफार करितां येत नाहीं. मुदत संपल्यानंतर ठरलेली जमाच चालू राहाते; परंतु त्यानंतर सरकार बांधलेलें नसून सरकारला आपल्या मर्जीप्रमाणें ती तपासण्याचा केव्हांही अधिकार आहे, सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. सदाशिव. १४ मुं. लॉ. रि. ७७; (कलम २ टिपा २, ३ व ५). १८६५ चा आक्ट १ याला, त्या आधारें कबुलायती घेतल्या जात असल्यामुळें, कबुलायतीबाबद आक्ट असेंही ह्मणण्यांत येतें.

(५) इनामदार व खोत—

कांहा इनाम गांवांत खोत असून ते दरसाल इनामदारास कबुलायत देतात. इनाम गावांत सरकारला जुडी वगैरे जें कांहीं सरकार देणें तें देण्यास इनामदार जबाबदार आहेत. सरकारचा खोतांशी कोणत्याही प्रकारचा संबंध येत नाहीं. मात्र इनामदारानें आपलें देणें न दिल्यास व गांव जप्त करण्याचा प्रश्न आल्यास मात्र खोताचा सरकारशीं संबंध येतो. ज्यावेळीं निम्मे गांव इनाम व निम्मे गांव सरकारी अशी स्थिति असते, त्या ठिकाणीं खोतानें सरकारला व इनामदारांना दोघांसही कबुलायत द्यावी लागते. गांवचें वांटप झालें असून सरकारच्या भागाबद्दल खोतानें जमा न दिल्यास सरकारी गांवाचे भागांत जप्ती वगैरे करून सरकार जमा वसूल

करते. जेव्हां गांव समाईक असेल तेव्हां खोतानें कबुलायत न दिल्यास इनामदाराच्या सल्ल्यानें सर्व गांव जप्त करण्याचा सरकारला अधिकार आहे.

### वहिवाटदार खोताविषयीं.

**कलम २५:—खोत आजपर्यंत कबुलायती करून देत आले आहेत तशा त्यांच्याकडून पुढें घेऊं नयेत. मात्र असें ठरविलें आहे कीं, या मनाईवरून खोतांचे सत्ताप्रकाराविषयींची कोणतीही शर्त पुरी करण्याच्या अथवा जें काम करणें त्यांस आतां भाग आहे तें काम बजाविण्याच्या किंवा करण्याच्या त्यांच्या जबाबदारीस, अथवा आतां जें कृत्य न करणें त्यांस भाग आहे तें कृत्य न करण्याच्या, त्यांच्या आवश्यकतेस बाध येतो असें समजूं नये.**

खोतांच्या कबुलायती रद्द करणें.

### टिपा.

(१) उद्देश—

हा प्रांत सरकारच्या ताब्यांत आल्यापासून दरसाल खोती गांवचा मुख्य अधिकारी या नात्यानें खोतांकडून कबुलायत करून घेऊन ठरलेली गांवची जमा योग्य वेळीं देण्याचे करारानें गांव त्यांचे वहिवाटीस ठेवण्यांत येत असे, व ही वहिवाटदार खोत नेमण्याची पद्धत खोती गांवांतून अद्याप चालू आहे. जेथें हा आक्ट लागू आहे तेथें निरनिराळ्या प्रकारच्या अटींनें युक्त-अशी प्रत्येक खोताकडून घेतली जाणारी कबुलायत घेण्याचें या कलमानें बंद करण्यांत आलें. हा आक्ट जेथें लागू नाहीं तेथें ह्मणजे कुलाबा जिल्ह्यांत अशी कबुलायत अद्याप घेतली जाते; कारण सरकार आणि खोत याचे मधील संबंध या कबुलायतींवर अवलंबून असतो. सध्यां सुद्धां खोती से. आक्ट लागू असलेल्या गांवांतून स्वतंत्र खोत नसेल तेव्हां हिसेदारापैकीं कोणाच्या तरी एकाचे नांवानें कबुलायत होते. परंतु ही कबुलायत ह्मणजे पूर्वी घेण्यांत येत असे तशी नसून केवळ वसूल करण्याचा व सरकारांत जमा भरण्याचा एका विशिष्ट खोताला अधिकार दिला इतकें दाखविण्यापुरतीच असते.

(२) कबुलायत व तिचा इतिहास—

मि० क्यांडी यांनीं "खोती सत्ताप्रकार" या पुस्तकांतील ७९।८० पानांवर दरसाल घ्यावयाच्या कबुलायतींचा थोडक्यांत इतिहास दिला आहे, व तो

महत्वाचा असल्यामुळें येथें थोडक्यांत देणें जरूर आहे. १८१८।१८१९ मध्यें ज्यावेळीं सर्व रत्नागिरी जिल्हा सरकारी अंमलाखालीं आला, त्यावेळीं दरसाल दर गांवची ठराविक जमा देण्याबद्दलची कबुलायत घेण्याचा प्रघात पाडण्यांत आला. अशा कबुलायतीवर ठराविक खंड कबुलायतदारानें न दिल्यास जबाबदार असणाऱ्या एका जामिनाचीही सही घेतली जात असे. याव्यतिरिक्त कबुलायतींत कांहीं मजकूर नव्हता. कलेक्टरला गांवचे जमेची जबाबदारी कोण घेतो हें कळावें, इतकाच त्याचा हेतु होता. १८२५ पासून या कबुलायतींत पांच कलमें घालण्यांत आलीं; तीं थोडक्यांत अशीं:—(१) दरमहाचे दरमहा विसावे तारखेस याप्रमाणें सालाबाद वहिवाटीअन्वयें नक्त व ऐनजिनसी गल्ला देईन. (२) दस्ताशिवाय जे कर द्यावयाचे ते बिनबोभाट देईन. (३) शिरस्त्याप्रमाणें गांवची वहिवाट करीन, जुलूम करणार नाहीं, तक्रार असल्यास बोलावणें होईल तेव्हां हजर होईन. (४) सर्व हप्ते १५ नवंबर ते १५ जून यांचे आंत "अस्मानी सुलतानी जाळित रोग यांचा तपशील जरा, एक न सांगता" देईन. (५) घरेकरी अथवा अर्धेली गांव सोडून गेला, मेला किंवा शेती न करण्याइतकी त्यास गरिबी आली वगैरे सबबी न सांगतां शेतें वहिवाटीस योग्य राखून दस्त देईन. अशीं पांच कलमें असून शिवाय पूर्वीप्रमाणें त्यावर जामिनाचा शेरा घेतला जाई. १८२९।१८३० मध्यें खोत हिस्सेदार जबाबदार असल्याबद्दलचें एक कलम जास्त घालण्यांत आलें. १८३१।१८३२ नंतर बरींच कलमें जास्त घालण्यांत येत व कमी करण्यांत येत; परंतु तीं इतकीशीं महत्वाचीं नसत. १८४०। १८४१ मध्यें "कौल" दिल्यास त्याजबद्दल जास्त दस्त देईन असें एक कलम जास्त घालण्यांत आलें. १८४८।१८४९ सालीं (१) कुळांनीं थल दिल्याबरोबर त्यांचे वहीवर थल पोंचल्याचें मांडून देईन, पावती चोपड्या कुळांनीं न आणल्यास त्यांस सुट्या कागदावर खंडाची पोंच मांडून देईन, (२) वहिवाटीसंबंधें सरकारी हुकूम होतील त्यांच्या नकला ठेवीन व त्या पुढील वर्षाच्या वहिवाटदारास देईन. (३) कलेक्टरचे हुकुमाप्रमाणें हजर होईन अशीं नवीं जास्त कलमें घालण्यांत आलीं. १८५८।१८५९ सालीं गांव खर्चाबद्दलचें एक कलम नवीन घालण्यांत आलें.

याप्रमाणें जरी कलमवार कबुलायत असे, तरी ती निरनिराळ्या खोताला अगर गांवाला निरनिराळी घेतली जात नसून जिल्ह्याच्या एका भागाकरितां एकच असून त्याखालीं प्रत्येक गांवचे खोत आपापल्या गांवासमोर आपल्या सह्या करीत असत. रेव्हेन्यू सर्वे होईपर्यंत कबुलायतींचीं कलमें खालील प्रमाणें असत:—

कबुलायत रा०...............याची गांव.........ची ऐसाजे. मी चालू सालीं सदरीं नमूद केलेल्या गांवच्या सर्व खोतीची वाहिवाट करण्याचें कबूल केलें आहे. जमा वसूल करण्याचे करार येणेंप्रमाणें—

(१) दरसालचे शिरस्त्याप्रमाणें मी सर्व जमाबंदी पैसे अगर धान्य देण्यास कबूल आहें. मी आठ हप्ते नवंबर पासून जूनपर्यंत दरमहिन्याच्या २० तारखेचे

आंत याप्रमाणें देईन. ( नंतर गल्ला कोणत्या जातीचा किती व त्याची किंमत काय हें लिहिलेलें असे. )

(२) प्रत्येक इसमाचे बाबतींत खंडचिठीप्रमाणें अगर सरकारी हुकुमाप्रमाणें जर दस्त जास्त ठरेल तर तसा भरपूर दस्त कलम १ प्रमाणें देईन.

(३) जमाबंदी हिशोबांत दाखल न केलेल्या अशा सर्व बाबी मी देईन आणि कोणत्याही प्रकारें तक्रार येऊं देणार नाहीं.

(४) कोणत्याही प्रकारें कोणाची तक्रार येऊं न देतां व जुलूम न करितां, मागील सालाप्रमाणें गांवची बिनतक्रार वहिवाट करीन. तक्रार उत्पन्न झाल्यास सरकार सांगेल त्याप्रमाणें १०० रुपये पर्यंत दंड देईन.

(५) कलम १ यांत ठरल्याप्रमाणें जाळपोळ, पूर इत्यादींची सबब न सांगतां सर्व दस्त देईन.

(६) एखादें कूळ मेल्यास, गांव सोडून गेल्यास अगर दरिद्री झाल्यास त्याची सबब न सांगतां सर्व जमाबंदी देईन.

(७) इनामदाराचें देणें वगैरे देईन.

(८) माझ्या नांवें कबुलायत आहे परंतु माझ्या मुखत्यारानें कांहीं लबाडी वगैरे केल्यास त्यास मी जबाबदार राहीन.

(९) मी कुळांचे रसीट चोपड्यांत त्यांच्याकडून मिळालेली थल मांडून देईन. तसें करण्यास चुकल्यास १०० रुपये पर्यंत, सरकारी हुकुमाप्रमाणें सरकार सांगेल तो दंड देईन.

(१०) झालेल्या अगर होणाऱ्या सरकारी हुकुमाप्रमाणें मी वहिवाट करीन व त्याच्या नकला ठेवीन, व देईन.

(११) सहहिस्सेदारांच्या जबाबदाऱ्या.( भरीस आणखी कलमें असत. )

(१२) सरकार बोलावील त्यावेळीं मी सबब न सांगतां हजर होईन. न झाल्यास ५० रुपये पर्यंत दंड देईन.

(१३) ग्रामखर्चा संबंधें.

(१४) झाडां संबंधें.

याप्रमाणें साधारणपणें जुन्या भाषेंत विस्तृत कबुलायतीचा नमुना असे. १८६५ चा आक्ट १ च्या ३७ कलमानें सेटलमेंटच्या मुदतीपर्यंतची, दरसालच्या कबुलायती ऐवजीं, एक कबुलायत घेण्याचा अधिकार देण्यांत आला व त्याप्रमाणें पुढील कबुलायत सेटलमेंटच्या मुदती पुरती एकच घेण्यांत येऊं लागली. १८८० च्या खोती सेटलमेंट आक्टानें तो आक्ट लागू असलेल्या गांवास या कलमानें कबुलायतीचें कारण नाहीं असें या कलमानें १८८० पासून ठरविण्यांत आलें आहे. कुलाबा जिल्ह्याचे बाबतींत कबुलायत घेण्याची पद्धत आज तागायत चालू आहे.

सध्यां घेण्यांत येत असलेल्या कबुलायतीचा नमुना गणपती वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं. लॉ. रि. ७५४ (७५७) येथें इंग्रजींत सविस्तर दिला आहे.

(३) कबुलायत व खोताची मालकी—

मि. क्यांडी यांनीं उपरिनिर्दिष्ट कबुलायतींचें महत्व काय या प्रश्नाचा विचार करितांना असें ह्मटलें आहे कीं, (खोती सत्ताप्रकार पान ८२) "यावरून खोत हे कबुलायतीच्या जोरावर आपला गांव धारण करीत नाहींत हें उघड आहे. त्यांचा मालकीहक्क दाखविणारा अर्थात् सनद हाच कागद होय. कबुलायत ही केवळ सरकार दस्त देण्याची व सार्वभौम राजाचा प्रतिनिधि या नात्यानें कलेक्टरनें घालून दिलेल्या जमीन महसुलाच्या योग्य व्यवस्थेच्या तत्वानुसार गांवची वहिवाट करण्याबद्दलची खोतानें घेतलेली हमी होय.*" ताजुबाई वि. सब्कलेक्टर ऑफ कुलाबा ३ मुं० हा० रि० १३८ या ठरावांत जाईंट जज्जानें असें लिहिलें आहे कीं "खोतांस दरसाल द्याव्या लागणाऱ्या कबुलायतीच्या वहिवाटीकडे त्याच्या मालकीहक्कास कांहीं बाध येतो या दृष्टीनें कोर्ट पाहात नाहीं. दरसाल नवी कबुलायत द्यावी लागते यावरून अशा तऱ्हेची कबुलायत घेण्याची वहिवाट कां पडली यांचें कारण पूर्णपणें दिसत आहे. कबुलायतीवरून आणखी असें दिसतें कीं, खोताला एकदम सरकारशीं ठराव करण्याचा हक्क आहे. आणि आपणांस पुन्हां खोतीवर घ्यावें असा अर्ज करण्याचा जो ठराविक नमुना आहे, त्यावरून त्यानें केलेली मागणी ही कबुलायत देण्याच्या हक्काची बजावणीच आहे." याच ठरावांत न्या. ठक्कर यांनीं आपल्या ठरावांत वरील जाईंट जज्जाचें मत योग्य मानून असें ह्मटलें आहे कीं, "दरसालच्या कबुलायत देण्याच्या वहिवाटीनें जरी ती एक विशिष्ट पद्धत (incident) असली, तथापि खोताच्या इस्टेटीचें मालकीहक्काचें स्वरूप बद्दलत नाहीं." त्याच प्रमाणें रावजी नारायण मंडलिक वि. रत्नागिरीचे कलेक्टर (खोतीसत्ताप्रकार पान ८२) या मुकदम्यांत असिस्टंट जज्ज मि. लिऑन यांनीं एका इंग्लिश ठरावाचा आधार देऊन कबुलायती संबंधें असें ह्मटलें आहे कीं, "जमिनीवरील देणें वसूल करण्याकरितां अंम-

---

* "It is thus clear that the Khot does not hold his village on the strength of his kabulayat. His title deed is of course his Sanad. The Kabulayat is merely his security for payment of the Government assessment, and that he will manage the village according to the principles of sound revenue administration, as laid down by the Collector, representing the State or Paramount Landlord."

त्यांत आणलेले सरकारी वसुलासंबंधीचे नियम या पेक्षां त्यांत जास्त काहीं नाहीं"* रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी १२ मुं. ५३४ (१८८८) या ठरावांत सर न्या. सार्जंट यांनीं असें म्हटलें आहे कीं, "आमचें खालील कोर्टाप्रमाणेंच मत असून रत्नागिरीच्या खोतांनीं द्यावयाच्या कबुलायती फक्त ठराविक खंड ठराविक वेळीं योग्यरीतीनें देण्याबद्दल खोतांनीं केलेले, दोन जामीन असलेले औपचारिक करार होत." यावरून कबुलायत घेण्याची पद्धत ही केवळ योग्य रीतीनें गांवचा दस्त वसूल व्हावा एवढ्याकरितांच असून तिचा खोतांचे इतर कायदेशीर हक्क व हितसंबंध यांविरुद्ध परिणाम नाहीं, हें उघड आहे. खोती आक्टानें रत्नागिरी जिल्ह्याचे बाबतींत या कबुलायती घेणें रद्दच केलें आहे. कुलाबा जिल्ह्यांतही जरी कबुलायती घेण्यांत येत असल्या, तथापि वरील तत्वच मान्य असून अगदीं अलीकडच्या गणपती वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं. लॉ रि. ७५४ या ठरावांत तें ग्राह्य मानलें आहे.

**(४) कबुलायतींतील शर्ती व त्या ठरविण्याचा सरकारचा अधिकार—**

कुलाबा जिल्ह्यामध्यें अद्याप दरसाल कबुलायत देण्याची पद्धत आहे. व त्या कबुलायतींत सरकारी अधिकारी वेळोवेळीं कसकसे फरक करीत आले, तें आपण वर पाहिलेंच आहे. अशा रीतीनें कोणकोणत्या अटी सरकारी अधिकाऱ्यांस खोतांवर लादतां येतात, या बाबतींत सरकारचे अधिकारक्षेत्र काय याबद्दलचा विचार गणपती वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं. लॉ. रि. ७५४ (१९२४) या कुलाबा जिल्ह्यांतील ठरावांत केला आहे. सर न्या. मॅक्लिऑड यांनीं जुन्या कबुलायती व त्यांवरील निरनिराळे ठराव वगैरे हरएक प्रकारें सांगोपांग विचार करून असें ठरविलें आहे कीं, "परंतु माझ्या मतें सरकार खोतांजवळून ज्या कबुलायतींवर सही करून मागतें ती, त्या कलमाप्रमाणें (१८६५ चा आक्ट १ कलम ३८) तितक्या पुरताच फेरबदल केलेली शिरस्त्यास अनुसरून असलीं पाहिजे" आणि या अटीवरच खोतास सही करण्यांस भाग पाडतां येईल. जर सरकारनें शिरस्त्यानुरूप व कायद्यानुरूप अटी नसलेली नव्या नमुन्याची कबुलायत पुढें केली तर खोतानें तिच्यावर सही करणें नाकारल्यास चालेल. त्याचें नाकारणें योग्य कीं अयोग्य हें ठरविणें वरिष्ठ अधिकाऱ्यावर अवलंबून राहील."† यावरून कबुलायत घेण्याचे बाबतींत सरकारची

---

* "Spoke of a kabulayat as being nothing more than a fiscal regulation introduced for the purpose of collecting the tribute to which the land is subject."

† "But in my opinion the kabulayat, which Government asked the khots to sign was bound to conform to the custom except as altered by that section, and subject to that condi-

सत्ता अगदीं अनियंत्रित नसून सरकारनेंही अटी घालणें त्या शिरस्ता व १८६५ चा आक्ट १ कलम ३८ यांचें उल्लंघन न होईल अशाप्रकारेंच घातल्या पाहिजेत. तसें असेल तर खोतास कबुलायतीवर सही केली नाहीं तरी त्याचे हक्कास कोणत्याही प्रकारें बाध येणार नाहीं.

**(५) खोतीआक्ट लागू असलेल्या गांवांतील कबुलायत—**

रत्नागिरी जिल्ह्यांत, जेथें खोती से. आक्ट लागू आहे तेथें खोती गांवांत खोत हिस्सेदार असतील त्यावेळीं कलम २७ प्रमाणें वहिवाटदार खोत नेमावयाचा असतो. यास परिभाषिक शद्ब कबुलायत देणें असाही आहे. परंतु ही कबुलायत व कुलाबा जिल्ह्यांतील कबुलायत यांत महदंतर आहे. रत्नागिरी खोतांची कबुलायत म्हणजे कलम २९ प्रमाणें गांवचा वसूल करणें व सरकारांत भरणें इतकाच आहे. बाकी खोतांची वागणूक खोती आक्टाचे ठरावावर अवलंबून असते. कुलाबा जिल्ह्यांतील कबुलायतीवर खोतांच्या वागणुकीचे सर्व प्रश्न अवलंबून असतात. खोती से. आक्ट अमलांत येण्यापूर्वीं सर्वत्र एकच परिस्थिति होती. परंतु खोती आक्टानें पूर्वींप्रमाणें कबुलायती घेण्याचें कारण नाहीं असा ठराव याच कलमानें केला आहे. या जिल्ह्यांतील कबुलायत म्हणजे एक नेमणुकीचा दाखला होय.

**(६) पड जमिनी व तिचा शेतकीव्यतिरिक्त उपयोग—**

खोताला खोतीनिसबत पड जमीन लागवडीस आणण्याचा हक्क आहे हें मागें सांगितलेंच आहे. परंतु अशा पडित जमिनीचा उपयोग त्यानें लागवडीकरितांच केला पाहिजे. शेतकीशिवाय अन्य रीतीनें तिचा उपयोग केल्यास कुलाबा जिल्ह्यांतील खोतांचे बाबतींत त्यांचे कबुलायतींत तशी शर्त नसल्यामुळें दंड अगर शिक्षा करितां येणार नाहीं. परंतु खोतानें खोतनिसबत पडित जमीन जर त्यानें घरें वगैरे बांधण्याच्या कामीं उपयोगांत आणली तर त्याला बगरहक्क कबजेदार (trespasser) समजून काढण्यास हरकत नाहीं; त्याचप्रमाणें त्याच्या कुळांस काढण्यासही हरकत नाहीं; कारण मालकाला जो हक्क नाहीं तो त्यास कुळास देतां येणेंच शक्य नाहीं. (अशा अर्थाचा कुलाबा जिल्ह्यापैकीं एक सरकारी ठराव १९२६ सालीं झालेला आहे). हेंच तत्व रत्नागिरी जिल्ह्यांतील खोतांसही लागू केलें जाण्याचा संभव आहे.

---

tion the khot would be obliged to sign the kabulayat. If Government presented a new form of kabulayat which contained terms not prescribed by custom or by statute, then the khot might refuse to sign it, and it would depend upon the decision of a higher authority whether such refusal was justified or not."

(७) खोतांवरील जबाबदाऱ्या कायम आहेत—

या कलमानें खोतांकडून कबुलायत घेणें रद्द करण्यांत आलें, तथापि या आक्टानेंच निरनिराळ्या अटी खोतांवर घालण्यांत आल्या आहेत. या आक्टाबाहेर शिरस्त्याप्रमाणें पडणाऱ्या जबाबदाऱ्याही असतात. कबुलायती नष्ट झाल्या तरी त्या सर्व नाहींशा झाल्या असें नसल्यामुळें तसा स्पष्ट उल्लेख या कलमांत केला आहे. याप्रमाणें आक्टाबाहेर अन्य तऱ्हेनें पडणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची जबाबदारी खोतावर आहे. खोतांच्या जबाबदाऱ्या कलम ३ टीप १२ खालीं दिल्या आहेत त्या पाहाव्या. याबाहेर शिरस्त्यानें पडणाऱ्या जबाबदाऱ्या—(१) आपल्या रयतेचे कल्याणाची कृत्यें करणें, (२) गांवची सुस्थिति राहाण्याकरितां शक्य ते प्रयत्न करणें, (३) रयतेस संकटकाळीं मदत करणें, (४) गांवच्या हद्दीच्या खाणाखुणा कायम राखणें, (५) गांवांतील तंटेबखेडे गांवांतल्या गांवांत मोडण्याचा प्रयत्न करणें—वगैरे आहेत; त्याही खोतानें पार पाडल्या पाहिजेत. खोतीसत्ताप्रकारास अनुरूप असणारीं सर्व कृत्यें खोतांनीं केलींच पाहिजेत.

"वहिवाटदार खोताची" नेमणूक.

**कलम २६—जेव्हां एक गांव दोघां किंवा अधिक सहभागिदारांनीं समाईक धारण केला असेल तेव्हां, ते भागिदार जमेबद्दल एका जर्थी एका मर्थी जबाबदार होतील, परंतु त्यांचे संख्येपैकीं एक मनुष्य कनिष्ठ धारण करणाराकडून थळ घेण्याकरितां, सरकारचीं देणीं देण्याकरितां, आणि या आक्टाप्रमाणें किंवा दुसऱ्या कोणत्याहि कायद्याप्रमाणें, किंवा कायद्यप्रामाणें जिचा अंमल चालतो अशा दुसऱ्या कोणत्याहि कानूप्रमाणें साधारणपणें करावयाचीं सर्व कामें करण्याकरितां दरसाल नेमला पाहिजे.**

**याप्रमाणें नेमलेल्या भागिदारांस "वहिवाटदार खोत" असें नांव द्यावें.**

(ह्या कलमाचे शेवटचे प्याऱ्यांत सन १९१३ चा मुं. आक्ट ४ कलम ८९ वरून दुरुस्ती केलेली आहे.)

## जुनें कलम. (शेवटचा प्यारा.)

याप्रमाणें नेमलेल्या भागिदारास "वहिवाटदार खोत" असें नांव द्यावें आणि त्यास सन १८७९ चा मुंबई जमीनमहसुलाचा कायदा यांतील कारणा-

कारितां हक्कवाले खातेदारांनीं धारण केलेले नाहींत अशा गांवांतील सगळ्या सर्वे नंबरांच्या नोंदलेल्या खातेदाराप्रमाणें समजावें.

## टिपा.

(१) उद्देश—

खोती गांवांतून कांहीं ठिकाणीं गांवचा अगर तुटक धंद्याचा स्वतंत्र असा एक खोत असतो; परंतु बहुतांशीं खोतीमध्यें हिस्से पडलेले असून खोतकी खोत हिस्सेदारांत विभागलेली असते. असें असल्यामुळें जमा वसूल करण्यास व भरण्यास जबाबदार असा कोणी तरी एक इसम नेमणें सरकारास आवश्यक वाटूं लागलें; व त्यामुळें असा वहिवाटदार खोत नेमणेचा अधिकार कायद्यांत घालण्याबद्दल सूचनाही आली. १८७३ सालीं खोती आक्टाचा एक मसुदा तयार करून त्याचेवर निरनिराळ्या आफिसरांचीं मतें घेण्यांत आलीं. त्यावेळीं नेमणुकीचा अधिकार सरकारनें आपलेकडे घ्यावा अशी सूचनाही नव्हती, अगर मतही नव्हतें. फक्त खोत हिस्सेदारांपैकीं एकानें आपलेवर जमा भरण्याची जबाबदारी घेतलीच पाहिजे अशा तऱ्हेचा निर्बंध घालण्यांत यावा, अशी सूचना होती. (खोतीगांवच्या सर्वेसेटलमेंटाबाबद रिपोर्टांचा गोषवारा.* मि. क्यांडी याचें मत प्यारा २०, गोषवारा प्यारा १०१ पहा) लोकमतही वहिवाटदार खोत नेमण्याचा अधिकार सरकारनें आपलेकडे घ्यावा असें नव्हतें. ना. मुरारजी गोकुळदास सारख्या कौन्सिलरांनीं सुद्धां वहिवाटदार खोत सरकारनें नेमणेचें कारण नाहीं असेंच आपलें मत दिलें. परंतु अखेर सरकारनें हा अधिकार आपलेकडे घेण्याचें ठरवून हें कलम पास करण्यांत आलें.

(२) भागिदार एका जथीं एका मथीं जबाबदार होतील—

या शब्दांचा अर्थ पुष्कळ वेळां न समजल्यामुळें पुष्कळांस वहिवाटदार खोतच सर्वस्वीं सरकारदेणें देण्यास जबाबदार आहे असें वाटत असतें. वहिवाटदार खोतावर गांवचा वसूल करून सरकारांत जमा भरणेची जबाबदारी आहे ही गोष्ट खरी; परंतु त्यानें न दिल्यास सरकार केवळ त्याचेकडूनच आपली जमा वसूल करण्यास बांधलेलें आहे असें नाहीं. सरकारदेणें देण्याची जबाबदारी प्रत्येक हिस्सेदारावर व्यक्तिशः आहे, त्याचप्रमाणें सर्वांवर सारखी (joint and several liability) आहे, ह्मणजे सरकारजमेची बाकी थकल्यास सरकारला कोणत्याही एका हिस्सेदाराकडून त्याची मालमत्ता, स्थावर इष्टेट वगैरे लँड रेव्हेन्यू कोडाप्रमाणें विकून सर्व रकम वसूल करण्याची मुभा आहे. त्याच-

* "Summary of reports etc. on the pr posed Survey and Settlement of Khoti Villages; 1873."

प्रमाणें सर्वांकडून अगर कांहींकडून त्यांची स्थावरजंगम इस्टेट विकून एकदम वसूल करण्याचा हक्क आहे. अमुक एका हिस्सेदाराकडून अगोदर वसूल करा असें ह्मणण्याचा कोणासही अधिकार नाहीं. यामुळें जरी एक हिस्सेदार वहिवाटदार खोत झाला, तथापि इतर हिस्सेदारांनीं तो आपलें काम बरोबर करितो किंवा नाहीं, सरकार देणें वेळवर देतो किंवा नाहीं, हें वेळीं पाहिलें पाहिजे. वहिवाटदार खोत मुद्दाम अगर दुष्टबुद्धीनें, ठकबाजीनें अगर इतर कोणत्याही कारणानें जमा करण्याचें चुकवील तरीही सर्व हिस्सेदार जमेस जबाबदार राहतील. सरकारनें वहिवाटदार खोत नेमणेचा हक्क आपलेकडे ठेवला असला तथापि सरकारनें या कलमानें वाटेल त्याकडून जमा वसूल करतां येण्यासारखी मोकळीक ठेवली असल्यामुळें वहिवाटदार खोताच्या दुर्वर्तनाचा परिणाम इतर खोत हिस्सेदारांवर होणें शक्य असतें; याकरितां त्यांनीं जपून वागणें केव्हांही इष्ट आहे.

### (३) जुनें कलम आणि १९१३ ची दुरुस्ती—

जुन्या ह्मणजे १९१२ पर्यंतच्या कलमांत वहिवाटदार खोतास लँ. रे. कोड प्रमाणें हक्कवाल्या खातेदारांच्या जमिनी शिवाय करून बाकीच्या जमिनींचा वहिवाटदार खोत हा लँ. रे. कोड कलम ३ पे. क. १६ प्रमाणें " सर्वे खातेदार " समजावा असें होतें. याचा अर्थ असा कीं, वहिवाटदार खोतानें जमा न दिल्यास खोतांच्या खासगी व प्रत्यक्ष कबजांतील खोतनिसबत जमिनी त्याच्याच असें समजून सरकारास जप्त करून विकून रक्कम वसूल करितां येत होती. यामुळेंच पुष्कळवेळां लबाडीनें जमा न देऊन इतर हिस्सेदारांच्या खासगी जमिनी सरकारमार्फत लिलांवास काढून त्या आपण घ्याव्या असें प्रकार चालत. आतां १९१३ च्या दुरुस्तीनें तो भाग काढून टाकल्यामुळें वहिवाटदार खोत हा सर्वे खातेदार समजून सरकारास कांहींएक करितां यावयाचें नाहीं. खोत हिस्सेदारांस सर्वांस जबाबदार धरून सर्वांच्या मालकीची म्हणून जमीन जप्त करून विकावी लागेल. सर्व हिस्सेदारांवर सारखीच जबाबदारी पडेल. विक्री थांबविण्याकरितां कोणासही सरकार देणें देऊन लिलांव थांबवितां येईल. ( लँ. रे. कोड कलम ८० व ८१ ) व बाकीच्या हिस्सेदारांकडून त्यांचे करितां भरलेली रक्कम दावे करून वसूल करून घेतां येईल. **राजा वि. सेत्तुचेलीं २६ मद्रास ६८६.**

### (४) वहिवाटदार खोत होण्याचा प्रत्येक हिस्सेदारास हक्क आहे—

वहिवावाटदार खोत होणें हा खोत हिस्सेदारांस जे हक्क आहेत त्यांपैकीं एक हक्क आहे. व तो हक्क त्यास केव्हांही बजावतां येण्यासारखा आहे. तसा त्याचा हक्क इतर हिस्सेदारांनीं अगर त्यांपैकीं कोणीही चालवूं न दिल्यास त्यास आपणास वहिवाटदार खोत होण्याचा हक्क आहे, असा ठराव करून मागणेकरितां दिवाणी

कोर्टांत दाव आणणेचा हक्क आहे. वहिवाटदार खोताची नेमणूक करण्याचा जरी सरकारनें आपलेकडे अधिकार ठेविला आहे, तरी सरकारला अगर खोतहिस्सेदारांस दुसऱ्या हिस्सेदारांच्या वहिवाटदार खोत होण्याच्या हक्काविरुद्ध जातां येत नाहीं. कृष्णाजी वि. रामचंद्र दु. अ. नं. ४८६ सन १९१४ नि. ता. १३।३।१६ या अप्रसिद्ध परंतु महत्वाच्या ठरावांत. न्या. शहा यांनीं सांगोपांग विचार करून असें ठरविलें आहे कीं "या कलमांवरून असें अनुमान करणें योग्य होईल कीं जो मनुष्य गांवच्या खोतकींत आपला हिस्सा आहे असें शाबीत करितो त्यास खोतकींतील हिशाचा अनुषंगिक हक्क या नात्यानें वहिवाटीचा हक्क प्राप्त होतो."* यावरून वहिवाटदार खोत होणें हा खोतकीच्या हक्कांपैकीं एक हक्क असून तो प्रत्येक हिस्सेदारास हक्कानेंच मिळावयाचा आहे.

## (५) वहिवाटदार खोत होण्याचा हक्क आणि विरुद्ध कबजा—

वहिवाटदार खोत होणें हा एक प्रकारचा हक्क असल्यामुळें तो बजावण्यास अर्थातच मुदतीच्या कायद्याप्रमाणें चाललें पाहिजे; व त्याचप्रमाणें मुदत केव्हां सुरू होते हेंही ठरविलें पाहिजे. एकादा खोतहिस्सेदार वहिवाटदार खोत या नात्यानें वहिवाट करीत राहिला एवढ्यानें त्याचेकडे सतत वहिवाट करण्याचा कायमचा हक्क येतो, असें होणार नाहीं. वहिवाटदार खोत होण्याचा हक्क १२ वर्षांचे आंत बजावला पाहिजे ही गोष्ट खरी; परंतु ज्या दिवशीं कलेक्टर अगर योग्य अधिकारी हिसेदारास हक्क नाहीं असें कळवील, अगर एक हिसेदार दुसऱ्या हिसेदाराचा वहिवाटीचा हक्क उघडपणें नाकबूल करील त्यादिवसापासून मुदत सुरू होते असें समजावयाचें असतें. कृष्णाजी वि. रामचंद्र दु. अ. नं. ४८६ सन १९१४ नि. ता. १३।३।१९१६ या महत्वाचे ठरावांत न्या. शहा यांनीं असें ठरविलें आहे कीं "एका हिस्सेदारानें पुष्कळ वर्षें गांवची वहिवाट केली इतक्यानें वादीच्या वहिवाटीचा हक्क नाकबूल केला असें होत नाहीं. खोती हक्क कबूल असतां उघडपणें तो विशिष्ट हक्क नाकबूल करीपर्यंत वहिवाटदार होण्याचा हक्क कायम राहातो."† यावरून वहिवाट पुष्कळ वर्षें केली नाहीं, एवढ्यावरून

---

* "It seems to me a fair inference from these provisions (Sec 26 to 30) that where a person establishes his right to a share in the khotki of a village, his right to the management followsa s an incident of a share in the khotki."

† "The mere fact that the defendant No. 1 or his predecessor in title has acted as a managing khot for many years prior to the date of the suit is not, in my opinion, sufficient to negative the plaintiff's right to management. It

वहिवाटदार खोत होण्याच्या हक्कास बाध येत नसून तो हक्क ज्या दिवशीं उघडपणें नाकबूल करण्यांत आला तेव्हांपासून बारा वर्षांचे आंत वहिवाट आपलेकडे घेण्याची कायदेशीर तजवीज केली पाहिजे. तसें न होईल तर वहिवाटीचे हक्कास विरुद्ध कबजाचा बाध येईल. विरुद्ध कबजानें दुसऱ्याचा हक्क नष्ट झाला असें ज्याचें ह्मणणें असेल त्याचेवर अशा दाव्यांत पुराव्याचा बोजा असतो. या मुद्याचा विचार वरील ठरावांत झालेला आहे.

कलम २७—सर्वे सेंटलमेंटाचे कागद तयार करतेवेळीं किंवा त्यानतर कोणत्याही वेळीं सहभागिदार पाळीच्या क्रमाविषयीं लेखी कबूल करतील तर, असे कबूल केलेले क्रमाप्रमाणें वहिवाटदार खोताची नेमणूक कलेक्टरानें केली पाहिजे.

वहिवाटदार खोतास कसें नेमावें.

अशी कोणतीही कबुलायत नसेल तेव्हां, किंवा ज्या भागिदाराची नेमला जाण्याची पाळी असेल तो कोणत्याही कारणासाठीं वहिवाटदार खोत ह्मणून काम करण्यास असमर्थ असेल, आणि कलम ३१ अ अन्वयें आपलीं कामें व अधिकार कलेक्टर त्यासंबंधानें मुदत ठरवील तिच्या आंत सोंपवून देण्यास चुकेल तेव्हां सहभागिदारांस, त्यांच्यापैकीं एकास दरवर्षास किंवा प्रसंगाप्रमाणें त्या वर्षाकरितां नेमून देण्याविषयीं सांगितलें पाहिजे, आणि याविषयीं कलेक्टर जी वेळ ठरवील त्या वेळेच्या आंत ते असें करण्यास चुकतील त्या प्रसंगीं, किंवा नेमणुकीविषयीं ते एकमत होत नसतील तर, कलेक्टरानें त्या वर्षाकरितां वहिवाटदार खोत नेमला पाहिजे. अथवा त्यानें सन १८७९ चा मुंबईचा जमीनमहसुलाचा कायदा कलम १४४ यांत ठरविलेल्या रीतीप्रमाणें गांव जप्त करवून आपल्या स्वतःच्या वहिवाटींत घेतला पाहिजे, किंवा या कारणासाठीं तो मुखत्यार नेमील त्या मुखत्याराच्या वहिवाटींत घेवविला पाहिजे.

---

seems to me that the Lower Appellate Court is right in its opinion that "so long as the right in khotship is admitted, the right to management subsists unless that particular right is openly denied."

( ह्या कलमांतील दुसरा प्यारा सन १९०४ चा मुं. आक्ट ३ कलम ५ व ६ वरून दुरुस्त केला आहे. )

जुनें कलम. ( दुसरा प्यारा. )

अशी कोणतीही कबुलायत नसेल तेव्हां, सहभागिदारांस, त्यांच्यापैकीं एकास दर वर्षास, नेमून देण्याविषयीं सांगितलें पाहिजे. आणि याविषयीं कलेक्टर जी वेळ ठरवील त्या वेळेच्या आंत ते असें करण्यास चुकतील त्या प्रसंगीं किंवा नेमणुकीविषयीं ते एकमत होत नसतील तर, कलेक्टरानें त्या वर्षाकरितां वहिवाटदार खोत नेमला पाहिजे. अथवा सन १८७९ चा मुंबईचा जमीनमहसुलाचा कायदा कलम १४४ यांत ठरविलेल्या रीतीप्रमाणें गांव जप्त करवून आपल्या स्वतःच्या वहिवाटींत घेतला पाहिजे किंवा या कारणासाठीं तो मुखत्यार नेमील त्या मुखत्याराच्या वहिवाटींत ठेवविला पाहिजे.

## टिपा.

(१) उद्देश—

सर्व खोतहिस्सेदारांपैकीं जबाबदार असा खोत नेमावा असें कलम* २६ प्रमाणें ठरलें; परंतु ही नेमणूक कशी करावी हें त्यांत सांगितलेलें नाहीं. तें या कलमांत सांगितलें आहे, व त्याचेच बरोबर वहिवाटदार खोत होण्यास कोणीच कबूल न झाल्यास कलेक्टरास आपलेकडे वहिवाट घेण्याचा अधिकार याच कलमानें देण्यांत आला आहे.

(२) पाळीची यादी—

पुष्कळ गांवांतून खोतहिस्सेदारांमध्यें गांवची वहिवाट कोणत्या क्रमानें करावी हें ठरविलेलें असतें; व ह्याबद्दलची खोती सेटलमेंटाचे वेळीं चौकशी होऊन " फ " पत्रक ह्मणून निराळा कागद करण्यांत आला असून त्यावर खोतहिस्सेदारांच्या सह्या घेतलेल्या आहेत ( क. १६ टी. १६ ). तसें सेटलमेंटचे वेळीं ठरलेलें नसून आपसांत मागाहून ठरल्यासही हरकत नाहीं. मात्र असा ठराव लेखी पाहिजे. अशा रीतीनें आपसांत पाळीचा क्रम लेखानें ठरलेला असेल त्यावेळीं कलेक्टरनें ज्याची पाळी असेल त्यासच वहिवाटदार खोत नेमलें पाहिजे. पाळीचा क्रम केवळ तोंडीं ठरलेला असल्यास त्याप्रमाणें नेमणूक करण्यास कलेक्टर जबाबदार नाहीं. पाळीची यादी झाली असल्यास त्याप्रमाणें ठरलेला क्रम रिकार्डिंग कामगारानें कलम

१७ (ब) ३ प्रमाणें नोंदला पाहिजे व त्यांत कांहीं सुधारणा झाल्यास व त्यास सर्व हिस्सेदारांची संमति असल्यास तशी कलम १८-२ प्रमाणें दुरुस्ती केली पाहिजे. दुरुस्ती होईपर्यंत पूर्वीच्या पाळीच्या यादी प्रमाणेंच कलेक्टरास चालावें लागेल. खोत हिस्सेदारांत झालेली पाळीची यादी लेखी असली पाहिजे असें जरी कलमांत सांगितलें आहे, तरी ती रजिस्टर पाहिजे अगर योग्य स्टांपावर पाहिजे असें सांगितलेलें नाहीं. परंतु लेख होतांच त्याप्रमाणें रिकार्डिंग कामगाराकडे नेऊन नोंदून घेणें केव्हांही इष्ट आहे.

## (३) पाळीची यादी नसेल तेव्हां काय करावें—

पाळीची यादी नसेल त्यावेळीं कलेक्टरनें खोतहिस्सेदारांपैकीं एकाची आपण स्वतःच नेमणूक करावी. हे खोतहिस्सेदार ह्मणजे ज्यांची "ब" पत्रकास नांवें दाखल झालेलीं आहेत असे हिस्सेदार होत. कलेक्टरनें स्वतः नेमणूक करण्यापूर्वीं मामलेदार अगर महालकरी यांचे मार्फत कलम ४० रकम फ कानु ५ प्रमाणें सर्व खोतहिस्सेदारांस आपल्याऐवजीं एकाची नेमणूक १ जूनचे आंत करण्याबद्दल नोटीस काढावी व त्याप्रमाणें त्यांनीं ३० जूनचे आंत एका हिस्सेदाराची नेमणूक करून कळविलें पाहिजे. तसें त्यांनीं ३० जूनचे आंत न केल्यास कलेक्टरनें कबूल असेल अशा एका खोतहिस्सेदाराची आपल्या अधिकारांत नेमणूक करावयाची असते. नेमणूक करणें ती सबंध मुलकी सालाकरितांच केली पाहिजे, महिन्या दोन महिन्याकरितां निरनिराळी कारणें योग्य होणार नाहीं. खोतहिस्सेदार अगदीं अल्प हिशाचा मालक असला तथापि हरकत नाहीं. मात्र तीस वर्षांचे मुदतींत केव्हांही कबुलायत दिलेली नाहीं असा असतां नये. तीस वर्षांचे मुदतींत केव्हांही वहिवाट केलेली नसल्यास त्यानें आपला हक्क दिवाणी कोर्टामार्फत शाबीत केला पाहिजे. तोंपर्यंत त्याची नेमणूक करितां येणार नाहीं. (असा १९०९ सालीं रानवली पेटा मंडणगड येथील एका खोतानें अर्ज केला त्या कामीं झालेला सरकारी ठराव आहे. खो. आ. पान १०८). कोणीच खोत हिस्सेदार वहिवाटदार होण्यास तयार नसेल तर लॅं. रे. कोड कलम १४४ प्रमाणें सर्व गांव जप्त करण्याचा कलेक्टरास अधिकार आहे. कलम १४४ मध्यें "धारण केलेली जी जमीन (ती सगळा गांव असेल किंवा गांवाचा हिसा असेल) त्या जमिनीचा जमीनमहसूल जसजसा देणें होत जाईल तसतसा तो हिस्सेदारांमध्यें तंटे असल्यामुळें, किंवा दुसऱ्याकारणामुळें, देण्यांत येणार नाहीं असें समजण्यास कारण आहे असें कलेक्टरास वाटेल तर, तो गांव किंवा गांवचा हिसा जप्त करविण्याचा, आणि आपल्या स्वतःच्या वहिवाटींत घेण्याचा किंवा या कारणासाठीं ज्या कोणाला तो मुखत्यार नेमलि त्या मुखत्याराच्या वहिवाटींत घेवविण्याचा त्यास अधिकार आहे." याप्रमाणें ठराव असून त्याच कलमांत जप्तीचा व वहिवाटीचा खर्च व जमीन महसूल वजा करून जें उत्पन्न राहील तें मिळ-

ण्य.ा ज्यांचा हक्क आहे त्यांस परत करावें असें सांगितलें आहे. अशा तऱ्हेनें कलेक्टरानें खोतकी जप्त केली तथापि खोत हिस्सेदारास लँ. रे. कोड कलम १४५ अन्वयें, कलम १४४ प्रमाणें केलेल्या "तजविजी सोडून देण्याच्या वेळापर्यंत, कलेक्टरानें कायदेशीर रीतीनें कांहीं खर्च केला असल्यास तो खर्च जर देईल आणि या आक्टांत पुढें ठराव केले आहेत त्या ठरावांअन्वयें ज्यावेळीं तो देण्याविषयीं किंवा तो हप्त्यानें द्यावयाचा असल्यास त्या हप्त्यांनीं देण्याविषयीं कलेक्टरांच्या खातरीचें तारण देईल तर" वहिवाट परत घेण्याचा हक्क आहे. तशा तऱ्हेचा अर्ज केव्हांही करून कलेक्टरकडून कलम १४५ प्रमाणें वहिवाट आपल्या ताब्यांत कोणत्याही हिस्सेदारास घेतां येईल. असा अर्ज गांव जप्तींत गेला त्या वर्षाच्या आमष्ट पासून १२ वर्षांचे आंत केला पाहिजे (लँ. रे. को. क. १६२).

**(४) नेमणुकीनंतर अगर पाळीप्रमाणें वहिवाट करतां न आल्यासः—**

ठरलेल्या पाळीप्रमाणें वहिवाटदार खोत व्हावयाचें असतां वहिवाट न केल्यास, सरकारांतून वहिवाटदार म्हणून नेमणूक झाल्यानंतर वहिवाट करतां न आल्यास पुढें काय करावें असा प्रश्न उद्भवतो. परंतु त्याचें उत्तर वर टीप ३ मध्यें सविस्तर लिहिल्याप्रमाणें कलेक्टरनें गांव जप्त करून वहिवाट करावी असेंच आहे. १९०४ च्या पूर्वीचे आक्टांत ही अवस्था लक्षांत आलेली नसावी, व म्हणून नवीन कलमांत जास्त स्पष्ट असा ठराव घालण्यांत आला आहे.

**(५) वहिवाटदार खोताचीं कर्तव्यें व त्याचे अधिकारः—**

पाळीचे यादीप्रमाणें, खोताहिस्सेदारांनीं निवडून दिल्यामुळें अगर सरकारनें नेमल्यानंतर वहिवाटदार खोतानें आपल्या गांवची, हक्कवाले खातेदार, एकसाली कुळें खोताहिस्सेदार वगैरे सर्वांकडून बोडखताचे थलीच्या नोंदीप्रमाणें अगर गांव शिरस्त्याप्रमाणें थल वसूल करावयाची, गांवची पाहणी करून अभावणी, खतावणी वगैरे हिशोबाचे कागद ठेवावयाचे, खोतफायदा वांटावयाचा वगैरे, पुढील कलम ३१ प्रमाणें, सर्व व्यवस्था करून वहिवाट करावयाची असते. या बाबतींत वहिवाटदार खोतानें कलम १५ नीट ध्यानांत ठेवलें पाहिजे. (पान १२१ ते १२७ पाहा.) वहिवाट योग्यप्रकारें करणें याशिवाय कोणतीही गोष्ट इतर हिस्सेदारांचे सल्याशिवाय त्यास करितां येत नाहीं. वर्ग करण्याचे बाबतींत मात्र वहिवाटदार खोतास वहिवाटीचे वालीं कुळास संमति देण्याचा अधिकार असल्याचें अलीकडे इब्राहिम वि. कृष्णाजी २६ मुं. लॉ. रि. ७५४ (१९२४) या ठरावांत ठरविण्यांत आलें आहे. वहिवाट करून वसूल गोळा करण्याचे कामीं मात्र त्यास पूर्ण मुभा असून कुळावर मदतदावे करणें वगैरे गोष्टी करण्याचा त्यास पूर्ण हक्क आहे.

(६) गांवची जप्ती व खोत हिस्सेदारांचे हक्क—

लँ. रे. कोड कलम १४४ प्रमाणें कलेक्टरनें गांव जप्त केल्यानंतर स्वतः ह्मणजे आपल्या हाताखालच्या योग्य अधिकाऱ्यांमार्फत अगर त्यानें नेमिलेल्या कोणत्याही एजंटामार्फत त्यांस गांवची वहिवाट करितां येते. लँ. रे. कोड कलम १६० प्रमाणें अशा जप्तीदाराला वरिष्ठ धारण करणाराचे सर्व हक्क गाजवितां येतात. मात्र खोत हिस्सेदारांच्या इतर हक्कांत कोणत्याही प्रकारें विघाड करितां येत नाहीं. जप्तीदारानें थल, खोतफायदा वगैरे सर्व वसूल करावयाचा असतो. खोतहिस्सेदारांस कोणत्याही प्रकारें वसूल वगैरे करितां येत नाहीं व अशा बाबतींत दिवाणी कोर्टांत कुळांवर उत्पन्नाचे दावे केल्यास अशा फिर्यादी घेण्यास दिवाणी कोर्टास अधिकार नाहीं. तुका वि. पांडुरंग दु. अ. नं. ६२५ सन १९०२ नि. ता. १।६।१९०५. जप्तीदारानें सर्व वसूल केल्यानंतर, जप्तीचा व वहिवाटीचा खर्च, सरकारदस्त, लँ. रे. कोड कलम १११ प्रमाणें मोजणी सुरू केली असल्यास तिचा खर्च वगैरे एकंदर सर्व वजा घालून, जो फायदा उरेल तो, ज्या खोतहिस्सेदारांचा गांव जप्त केला असेल त्यांचेकरितां कलेक्टरचे हुकुमाप्रमाणें ठेव ह्मणून ठेवला जातो, अगर त्यांस आदा केला जातो, (लँ. रे. को. कलम १६२). हा जप्तीनंतर उरणारा खोतफायदा मागण्याचा अधिकार खोती सेटलमेंट आक्ट जेथें लागू आहे तेथें खोत हा वरिष्ठ धारण करणारा असल्यामुळें खोतांस प्राप्त होतो, परंतु ज्या ठिकाणीं खो. से. आक्ट लागू नाहीं तेथें असा अधिकार प्राप्त होत नाहीं, भिकाजी वि. निजाम अल्ली ८ मुं. ५२५ (पान २५ पहा). जप्तीदाराला अगर कलेक्टरला वहिवाट करून वसूल करण्याचा हक्क असला, तथापि कोणत्याहि प्रकारें खोतांचे इतर हक्कांस त्यांस बाध आणतां येत नाहीं; अगर कोणत्याहि प्रकारें खोतांच्या हक्कास बाध येईल असें कृत्य त्यास करितां येत नाहीं. या कायद्यानें खोतास दिलेले सर्व हक्क गांव जप्तींत असला तथापि त्यास बजावतां येतात. अहमंद वि. गणेश २५ मुं. लॉ. रि. ५२१ या कुलाबा जिल्ह्यांतील ठरावांत न्या. कंप यांनीं "हें उघड दिसतें कीं वार्षिक कबुलायत खोतानें न दिल्यास इतकेंच होईल कीं त्याला गांवच्या वहिवाटीचा हक्क मिळणार नाहीं. तथापि वहिवाटीच्या हक्कांशिवाय स्वतंत्र असे जे त्यास दुसरे हक्क आहेत त्यांस बाध येत नाहीं" असें ठरविलें आहे. हेंच तत्व अगदीं अलीकडील पुरुषोत्तम वि. गणपती २८ मुं. लॉ. रि. ७५० या कुलाबा जिल्ह्यांतील ठरावांतही स्पष्टपणें नमूद करण्यांत आलें आहे. न्या. फॉसेट यांनीं वरील ठरावानुसार असें ठरविलें कीं, "तूर्तातूर्त झालेल्या गांवचे जप्तीमुळें वहिवाटीचे हक्काव्यतिरिक्त जे खोतास हक्क आहेत त्यांस बाध येत नाहीं." या ठरावांत मागील सर्व ठरावांचा विचार केलेला असून कलम १६० चाही विचार केलेला आहे. हे ठराव जरी कुलाबा जिल्ह्यापैकीं असले तथापि त्यांचें तत्व रत्नागिरी जिल्ह्यांतील खोती गांवांसही लागू आहेच.

**(७) जप्तींत गांव गेल्यास खोत हिस्सेदारांस एकमेकांविरुद्ध नुकसानी मागतां येत नाहीं—**

खोत हिस्सेदारांच्या कसुरीनें कोणीही वहिवाटदार खोत होण्यास पुढें न आल्यानें गांव जप्तींत गेल्यास इतर हिस्सेदारांस दुसऱ्या हिस्सेदाराविरुद्ध नुकसानीचा दावा आणतां येणार नाहीं. एका सालीं एका हिस्सेदारानें वहिवाट केल्यानंतर दुसऱ्या सालास बाकीच्या हिस्सेदारांपैकीं कोणीतरी कबुलायत द्यावयाची असतां दिली नाहीं, व ह्मणून गांव जप्तींत गेला, एवढ्यावरून त्या हिस्सेदारास दुसऱ्या हिस्सेदारांविरुद्ध नुकसानीचा दावा आणतां येणार नाहीं. याचें कारण अगदीं उघड आहे. कबुलायत देण्याची जबाबदारी सर्वांवर सारखी असल्यानें नुकसानी मागणाऱ्या हिस्सेदाराला कबुलायत देण्यास कांहीं प्रत्यवाय नव्हता. **चिंतो वि. पांडुरंग दु. अ. नं. ४०९ सन १९०९ नि. ता. ५।९।१९११** या ठरावांत परिस्थिति अशी होती कीं, गांवांत खोतांच्या दोन शाखा असून त्यापैकीं प्रत्येकानें एक वर्षाआड कबुलायत द्यावी, असें आपसांत ठरून त्याप्रमाणें ४० वर्षे क्रम चालला होता. त्यास अनुसरून दाव्याचे सालीं प्रतिवादी हिस्सेदारानें कबुलायत द्यावयाची होती. परंतु त्यानें न दिल्यामुळें गांव जप्तींत गेला, व जप्तीचा कांहीं खर्च वादीनें पुढील सालास वहिवाट आपल्याकडे घेतल्यानें त्याजकडून भरून घेतला गेला. त्यामुळें झालेलें नुकसान प्रतिवादीकडून भरून मागणेकरितां त्यानें दावा आणला. त्या दाव्यांत न्या. चंदावरकर व न्या. बॅचेलर यांनीं असें ठरविलें कीं, "आपसांत पाळीची यादी नोंदलेली नसल्यामुळें प्रतिवादीइतकीच, वहिवाट आपलेकडे घेण्याची जबाबदारी, वादीवर होती आणि वादी प्रतिवादी पैकीं कोणीहि वहिवाट न घेतल्यानें जर कलेक्टरला जप्ती करावी लागली तर त्यापासून झालेले नुकसानीस दोघेही सारखेच पात्र आहेत. अशा परिस्थितींत वादी स्वतःच नुकसान होऊं न देण्यास चुकल्यानें त्यास 'मी मिळकत खालसा होण्यापासून वांचविली' असें ह्मणतां येणार नाहीं. कारण त्याला स्वतःला जप्ती पासून व खर्चापासून मिळकतीचा बचाव करितां आला असता."* यावरून पाळीची यादी नोंदलेली नसतां कितीहि वर्षांचा क्रम ठरला तथापि सर्व हिस्सेदारांवर कबुलायत देण्याची सारखीच जबाबदारी असल्यामुळें कोणास कोणाकडूनही नुकसान मागतां येणार नाहीं. पाळीची यादी नोंदलेली असतां नुकसान मागतां येईल किंवा काय या मुद्याचा उलगडा अद्याप झालेला नाहीं.

---

* "If there was no agreement of that character, the responsibility lay upon the plaintiff as much as upon the defendants to undertake the management, and if in consequence of the failure on the part of both the plaintiff and the defendants, the Collector attached the property, the da-

कलेक्टरनें केलेल्या नेमणुकीबद्दल किंवा निवडणुकीबद्दल तक्रार चालणार नाहीं.

कलम २८—कलम २७ अन्वयें कलेक्टरानें करावयाची नेमणूक किंवा निवडणूक लेखी हुकुमानें केली पाहिजे, व त्या हुकुमावर अपील चालणार नाहीं; आणि अशा कोणत्याही नेमणुकीसंबंधानें किंवा निवडणुकीसंबंधानें सरकाराविरुद्ध किंवा कोणत्याही सरकारी अंमलदाराविरुद्ध दावा चालणार नाहीं.

परंतु खोतांमधील वहिवाटीचे हक्कांविषयींच्या फिर्यादींस हरकत होणार नाहीं.

परंतु एकाहून जास्ती सहभागिदारांस वहिवाटीचा हक्क आहे याविषयीं किंवा ज्या क्रमानें त्यांस निरनिराळा वहिवाटीचा हक्क यावा तो क्रम कोणता याविषयीं, ठराव करून घेण्याबद्दल आपसांत हुकुमनामा मिळण्याकरितां कोणत्याहि वेळीं दावा आणण्यास कोणत्याही सहभागिदारास कायदेशीर अधिकार आहे; आणि नेमणूक होण्यासाठीं कलेक्टरास योग्य रीतीनें सदहु हुकूमनाम्याचे दाखले नक्कलेसहित अर्ज केल्यानंतर पुढच्या मुलकी सालाचे आरंभापासून त्यानें सदहु हुकूमनाम्याप्रमाणें वहिवाटदार खोताची नेमणूक करणें ती, त्याप्रमाणें केली पाहिजे.

(ह्या कलमाचा पहिला प्यारा सन १९०४ चा मुं. आक्ट ३ कलम ५ व ६ वरून दुरुस्त केला आहे.)

जुनें कलम ( पहिला प्यारा ).

कलेक्टरानें सदरील शेवटल्या कलमाअन्वयें नेमलेला कोणताही वहिवाटदार खोत यानें ज्या वर्षाकरितां त्याला याप्रमाणें नेमलेला असेल त्या सगळ्या वर्षभर

---

mages which arose from it, fell on the shoulders of both the plaintiff and the defendants equally. Under these circumstances the plaintiff having failed to remedy the wrong, which he says was due to the defendants, is not entitled to say that he has saved the property from forfeiture; He could have saved the property from attachment and expenses, which he had to incur by applying to the Collector and undertaking the management himself.'

त्या न्यायानें चालले पाहिजे, आणि सदरहु नेमणुकीविषयीं कलेक्टराविरुद्ध, किंवा सरकाराविरुद्ध, किंवा कोणत्याही सरकारी अंमलदाराविरुद्ध, दावा चालणार नाहीं.

## टिपा.

(१) उद्देशः—

कलेक्टरानें नेमणूक केल्यानंतर हरएक प्रकारच्या तक्रारी उपस्थित होणें शक्य आहे. व अशा प्रकारें सारख्या तक्रारी येत राहिल्यास कलेक्टरास हें एक मोठें कामच होऊन बसेल. किंवा सरकारानें अमुक एकाला वहिवाटदार खोत नेमण्यांत चूक केली, त्यामुळें नुकसान झालें, वगैरेबद्दल सरकारविरुद्ध दावे होतील, ते थांबविण्याकरितां हें कलम घातलें असून वहिवाटदार खोताच्या नेमणुकी अगर निवडणुकीसंबंधें वाद असेल अगर क्रम ठरवावयाचा असेल, तर दिवाणी कोर्टाकडेच गेलें पाहिजे. दिवाणी कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणें पुढील सालापासून कलेक्टरनें नेमणूक केलीच पाहिजे. त्याविरुद्ध त्यास जातां येणार नाहीं असें या कलमानें स्पष्टपणें ठरविलें आहे.

(२) कलेक्टरानें लेखी हुकुमानें केली पाहिजेः—

जुन्या कलमांत लेखी हुकूम पाहिजे असें स्पष्ट नमूद केलेलें नव्हतें; परंतु आतां लेखी हुकूम दिला पाहिजे असा ठराव करण्यांत आला आहे. लेखी हुकुमाप्रमाणें प्रत्येक वहिवाटदार खोतास नेमणुकीचा एक दाखला मिळत असतो. या दाखल्यांत गांवाचें नांव, वहिवाटदार खोताचें नांव, व ज्या सालाबद्दल नेमणूक केली तें साल इतक्या गोष्टी लिहिलेल्या असतात, कलेक्टरच्या ऐवजीं मामलेदार अगर महालकरी याचे सहीनेंच या नेमणुका होत असतात ( कलम २९ ), परंतु मुख्य अधिकार कलेक्टराचा आहे हें विसरतां कामा नये.

(३) नेमणुकीवर अपील चालणार नाहींः—

या ठिकाणीं इतकें लक्षांत पाहिजे कीं येथें फक्त अपिलाचाच उल्लेख केलेला आहे. इतर " तपासणी अर्ज " वगैरे दुसरे इलाजही चालणार नाहींत असा कांहीं उल्लेख नाहीं. यावरून लँ. रे. कोड कलम २११ प्रमाणें कलेक्टरकडे तपासणी अर्ज करण्यास पूर्ण मोकळीक आहे. अशा अर्जाचा योग्य पुरावा घेऊन निकाल करण्यास कलेक्टर समर्थ आहे. असिस्टंट कलेक्टर, मामलेदार अगर महालकरी यांनीं कलेक्टरनें लँ. रे. कोड कलम १० प्रमाणें दिलेल्या अधिकारांत वहिवाटदार खोताची नेमणूक केली असल्यास त्याचे विरुद्ध कलेक्टरकडे अपील करण्यास मोकळीक आहे,

(४) दिवाणी कोर्टाकडे दावा करण्याची मोकळीक आहेः—

खोत हिसेदारांच्या आपसांतील भांडणामुळें, चढाओढीमुळें अगर अन्य कोणत्याही कारणामुळें आपल्या अधिकारांत कलेक्टरनें वहिवाटदार खोताची नेमणूक केल्यास, ज्यांचें नुकसान झालें असेल, त्यांनीं आपला हक्क ठरवून घेण्याकरितां दिवाणी कोर्टाकडे दावा करून आपला हक्क ठरवून घेतला पाहिजे. दिवाणी कोर्टाचा, अमुक एका खोतहिसेदाराची वहिवाटदार खोत म्हणून नेमणूक करावी, अमुक एका क्रमानें करावी, वगैरे प्रकारें निवाडा मिळाल्यास त्याची सहीसूद नक्कल जोडून कलेक्टरकडे अर्ज करावा, म्हणजे त्याप्रमाणें कलेक्टरला या कलमाच्या दुसऱ्या प्याऱ्याप्रमाणें नेमणूक केलीच पाहिजे. असा दावा केल्यास कलेक्टरचें सर्टिफिकेट वगैरे घेण्याचें कारण नाहीं. या प्रकारचा दावा आणणें तो हक्कस्थापनाचा, ताकीदीचा अगर नुकसानीचा, परिस्थित्यनुरूप करावा.

वहिवाटदार खोताचा दाखला.

**कलम २९—“ कलम २७ अन्वयें नेमिलेल्या किंवा निवडलेल्या ” प्रत्येक वहिवाटदार खोतास दाखल्यांत लिहिलेल्या वर्षाबद्दल दाखला धारण करणारा हा मंजूर केलेला वहिवाटदार खोत आहे अशाविषयीं मामलेदार यानें आपल्या सहीशिक्यानिशीं एक दाखला दिला पाहिजे, आणि अशी सही व शिक्का केलेला दाखला, त्यांत लिहिलेल्या वर्षाबद्दल ज्या गावांसंबंधीं तो असेल त्या गांवचा वहिवाट करण्याविषयीं त्यांत सांगितलेल्या खोताचे हक्काबद्दल निरुत्तर पुरावा होईल.**

(सन १९०४ च्या मुं. आक्ट ३ कलम ७ वरून “ कलम २७ अन्वयें नेमिलेल्या किंवा निवडलेल्या ” हे शब्द जुन्या कलमांतील “ या आक्टांत पुढें ठराव केला आहे तो खेरीज करून ” ह्या शब्दांऐवजीं घालण्यांत आले आहेत.)

टिपा.

(१) उद्देश—

वहिवाटदार खोताचे नेमणुकीचा दाखला कोणीं द्यावा व त्या दाखल्याचा परिणाम काय हें या कलमांत स्पष्टपणें सांगितलें आहे. या कलमाप्रमाणें वहिवाटदार खोताचे नेमणुकीचा दाखला हा निरुत्तर पुरावा आहे असें ठरविण्यांत आलें आहे.

(२) मामलेदारानें दाखला द्यावा—

वहिवाटदार खोत कोण करावयाचा याबद्दलचा निश्चय होऊन कलेक्टर-कडून, अगर लँ० रे० कोड कलम १० प्रमाणें अधिकार दिला असल्यास डि० डे० कलेक्टर कडून प्रकरण तालुक्यास मामलेदाराकडे येतें, व तेथें आल्यानंतर ठराविक नमुन्याप्रमाणें दाखला त्यानें द्यावयाचा असतो. महालाचे बाबतींत हा दाखला महालकरी यांनीं द्यावयाचा असतो. मामलेदारानें दाखला सहीशिक्या-निशीं दिला पाहिजे व त्यांत अधिकृत वहिवाटदार खोताचें नांव व गांव वगैरे लिहिलीं पाहिजेत.

(३) दाखला निरुत्तर पुरावा होय—

निरुत्तर अथवा निर्णायक पुरावा ह्मणजे काय याचा अर्थ मागें (पान १७१) दिलाच आहे. त्याप्रमाणें हा दाखला दिल्यानंतर त्याचे विरुद्ध वहिवाटदार खोताची नेमणूक झालेली नाहीं असा न्यायनिवाडा दिवाणी कोर्टास करितां येणार नाहीं. अगर दाखल्यांतील सालीं अन्य कोणास वहिवाट करण्याचा हक्क होता असेंही ह्मणतां येणार नाहीं. दिवाणी कोर्टास बाकी सर्व बाबतींत ह्मणजे, खोतहिस्सेदारांचे हक्क, वहिवाटीचा क्रम वगैरे बाबतींत विचार करण्याची पूर्ण मुभा आहे. परंतु दाख-ल्याचे सालीं दाखलेवाल्या खोतानेंच वहिवाट केली व त्यासच वहिवाट करण्याचा अधिकार दिलेला होता असें मानलेंच पाहिजे. अशा रितीनें वहिवाटदार खोताचा अधिकार मुलकी सालापुरता असतो. व तोंपर्यंतच दाखल्यांतील सर्व गोष्टी निरुत्तर मानावयाच्या असतात.

जेव्हां सहभागिदार नाहींत तेव्हां वहिवाटदार खोत कोण.

**कलम ३०—जेव्हां खोतानें आपल्या वतःच्या एकट्याच्याच हक्कानें गांव धारण केला असेल तेव्हां, या आक्टाचे सर्व कारणासाठीं तो त्या गांवचा वहिवाटदार खोत आहे असें समजलें पाहिजे, आणि त्यास मागील शेवटल्या कलमांत सांगितल्या-प्रमाणें दाखला देण्याची आवश्यकता नाहीं.**

टिपा.

खोती गांवचा एकच स्वतंत्र असा खोत असतां त्याचेवर सरकारजमा देण्याची सर्व जबाबदारी कलम ४ प्रमाणें आहेच व सरकारासही आपल्या दस्ताची उगवणी कशी होईल याबद्दल भीति बाळगण्याचें कारण नाहीं. खोती गांव याचा

अर्थ क. ३ टी. ४ येथें दिला आहे. त्याप्रमाणें स्वतंत्र धडा खोती गांवच समजून त्याचा खोत स्वतंत्र खोत समजाव्याचा असतो. अशा रीतीनें सबंध गांवचा अगर तुटक धड्याचा स्वतंत्र एकच खोत असल्यास त्यास आपल्या गांवाची वहिवाट करण्याचा हक्क आहे. त्यास दाखला देण्याचें कारण नाहीं. त्यास वहिवाटदार खोताचे सर्व हक्क व अधिकार आपसुखच प्राप्त झालेले असतात.

वहिवाटदार खोताचा अनन्यग्राह्याधिकार

**कलम ३१— जेव्हां एखादा वहिवाटदार खोत मागील ठरावांपैकीं कोणत्याही ठरावाअन्वयें यथायोग्य नेमला असेल तेव्हां, सन १८७९ चा मुंबईचा जमीनमहसुलाचा कायदा कलमें ८६ व ८७ या प्रमाणें हक्कवाले खातेदाराकडून थळ वसूल करण्याविषयीं त्या वहिवाटदार खोतास मात्र मदत मिळण्याचा हक्क आहे.**

## टीका

(१) उद्देश—

वहिवाटदार खोत कसा नेमावा हें मागील कलमांत सांगितलें; परंतु अशा वहिवाटदार खोताचे हक्क काय काय, त्याला विशेष अधिकार काय आहेत वगैरे ठरविणें जरूर असल्यामुळें, या कलमामध्यें गांवचा वसूल करितांना वहिवाटदार खोतास लँ. रे. कोड कलमें ८६।८७ प्रमाणें मदतदावे आणण्याची मुभा असणें आवश्यक असल्यामुळें तो अधिकार या कलमानें दिलेला आहे. या कलमाचा विचार करितांना वहिवाटदार खोताचे निरनिराळ्या हक्कांचा व अधिकारांचा विचार करणें जरूर असल्यामुळें तो खालील टीकेंत केला आहे.

(२) वहिवाटदार खोताचे हक्क व अधिकार—

खोतकी या शब्दांत खोताच्या कोणकोणत्या हक्कसंबंधाचा बोध होतो हें क. ३ टी. ११ (पान ३१) यांत व ठिकठिकाणीं सांगितलें आहे. त्याशिवाय वहिवाटदार खोत या नात्यानें, नेमलेला असो अगर स्वतंत्र असो त्यास खालील गोष्टी करण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे.

(१) ज्या गांवांकरितां अगर तुटक धड्याकरितां नेमणूक झाली असेल त्यांतील खोती खासगी, खोत निसबत, वगैरे खोती जमिनीची थल वसूल करणें; हक्कवाल्या खातेदारांकडून कलम ३३ प्रमाणें येणें असलेला वसूल गोळा करणें.

(२) हक्कवाल्या खातेदारांविरुद्ध वसुलाकरितां मदतदावे करणें.

(३) वसूल पोंचल्याबद्दल कुळाला पावती देणें.

(४) वहिवाटीचे हिशोबाचे योग्य प्रकारें कागद ठेवणें कलम १५.)

(५) सरकारची जमा वारणें ( कलम २६ )

(६) लोकलफंड जमा करणें व वारणें, (कलम ३६).

(७) वर्ग करण्यास संमति देणें, इब्राहीम वि. कृष्णाजी २६ मुं. लॉ. रि. ४२१.

(८) गांवांतील पड जमिनींत कूळ लावून योग्य प्रकारें उत्पन्न येईल अशी तजवीज करणें, अगर खोतीप्रकारास अनुसरून आपलेकडे वहिवाट घेणें, फकी इस्माइल वि. फकी महंमद १२ मुं. ५९५

(९) कलम ३३ कानू २ प्रमाणें कुळाशीं कबुलायत करणें व रिकार्डिंग कामगारापुढें कबुली देणें. (कलम ३३ का. २ खालील टीप पहा.)

**(१) वहिवाटदार खोतानें कोणाकडून वसूल गोळा करावयाचा—**

वहिवाटदाराला या कलमाप्रमाणें सर्व खोती गांवांतील हक्कवाल्या खातेदारां-कडून थल वसूल करण्याचा हक्क आहे, मग ते खातेदार दुसऱ्या खोतहिस्सेदारांस थल देणारे आहेत किंवा काय हें पाहण्याचें कारण नाहीं. खोतहिस्सेदाराला त्याच्या हिशांतील कुळाकडून वहिवाटदारानें उत्पन्न वसूल केलें याकरितां त्याचेविरुद्ध कांहीं करितां यावयाचें नाहीं, अमृता वि. काशिनाथ १८९९ प्रि. ज. ५८. इतकेंच नव्हे तर वहिवाटदार खोतानें आपला वसूल करण्याचा हक्क विकला असल्यास त्या बेचनदारानें वसूल केल्यासही त्यास त्याविरुद्ध कांहीं बोलतां यावयाचें नाहीं. अशा बेचनदाराला थळ वसूल करण्याचा हक्क आहे. वासुदेव वि. धाकू दु. अ. नंबर ८८ सन १९०२ नि. तारीख ११।१२।१९०२. हक्कवाल्या खाते-दाराबरोबरच त्यांचे कबजेगहाणदारही येतात व ह्मणून कबजेगहाणदाराकडूनही थल वसूल करण्याचा वहिवाटदार खोतास हक्क आहे. कृष्णाजी वि. रामचंद्र १ मुं. ७० या ठरावांत "सन १८२७ च्या रेग्युलेशन १७ मधील कलम ५ प्रमाणें सरकारास आणि अर्थात् सरकारचे हक्क धारण करणा-रास ( वहिवाटदार खोतास ), वरिष्ठ धारणकरणारा जमीनमहसूल देण्यास चुकल्यास त्याच्या कनिष्ठ धारणकरणारांकडून वसूल करण्याचा अधिकार आहे. जमीनमहसूल वसूल करण्याबद्दल जे कायदे आहेत त्यामुळें वरिष्ठधारणकरणारा व त्याचा कनिष्ठ-धारणकरणारा यांचेमध्यें एकप्रकारें इस्टेटीसंबंधें खासगीपणा ( privity ) उत्पन्न होतो. त्यामुळें कनिष्ठधारणकरणारा जमिनीचा नफा घेत असल्यामुळें त्यानें उभयपक्षीं झालेल्या करारावाहेर किंबहुना ठरावाच्या अटींविरुद्ध वरिष्ठ धारणकरणारानें द्यावयाचें सरकारदेणें भागविलें पाहिजे. हें देणें देण्याची जबाबदारी जमीनीचा कबजा आणि उपभोग याचेवर अवलंबून असल्यामुळें राजानें अगर त्याच्या प्रतिनिधीनें

माफ केल्याविना टाळतां येणार नाहीं. या न्यायानें विशिष्ट जमिनीचा मुंबई सर्वे आक्टाप्रमाणें ज्याचेकडे कबजा आहे तो जर त्या वरील दस्त देण्यास चुकला तर वहिवाटदार खोताला त्याच्या कबजेगहाणदाराकडून वसूल करण्यास हरकत नाहीं."* या ठरावांत १८२७ च्या रेग्युलेशनचा व १८६५ चा आक्ट १ यांचा जरी विचार केलेला असला तथापि तेंच तत्व लँ. रे. कोड कलम १३६ प्रमाणेंही ग्राह्य आहे. हक्कवाल्या खातेदाराप्रमाणें खोत हिस्सेदारांकडूनही थल वसूल करण्याचा वहिवाटदार खोतास हक्क आहे.

(४) खोती जमिनीचा वसूल करणें—

वहिवाटदार खोत सरकारजमा भरण्यास जबाबदार असल्यामुळें ज्या जमिनीचा सरकारदस्त भरावयाचा असेल त्या जमिनीची थल घेण्याचा वहिवाटदार खोतास अधिकार आहे. कृष्णाजी वि. रामचंद्र १ मुं. ७० या ठरावांत न्या. वेस्ट यांनीं सर्वसाधारण नियम असा घालून दिला आहे कीं, "जमीन महसूल देण्याची जबाबदारी जमिनीचा कबजा ( occupation ) आणि वहिवाट (enjoyment) यांचेवर अवलंबून असते. आणि सरकारानें सोडून दिल्याशिवाय त्या जबाबदारींतून कोणासही सुटतां येत नाहीं." या तत्वानुसार प्रत्येक प्रकारच्या जमिनी वहिवाटदार खोतास थल देण्यास जबाबदार आहेत हें नक्की. बाळकृष्ण वि. विश्वनाथ १९ मुं. ५२९ या ठरावांत, रामचंद्र वि. विसाजी १८८० प्रिं. ज. २९७ या ठरावाचे आधारावर न्या. फुलटन यांनीं असें ठरविलें कीं, "बिनसरकारी

---

* "Reg XVII of 1827 Sec. 5 enables the Government and therefore the holder of the rights of Government, on failure of the superior holder to pay the Land Revenue, to realize it from the inferior holder. The Laws for realizing the land revenue establish a kind of privity of estate which the latter taking profits of the land, must satisfy the obligations of the former to Government, independently of, and even in opposition to any agreement between the two contracting parties. The liability to pay, adheres to the occupation and enjoyment and cannot be got rid of except through its resignation by the Sovereign or the Povereign's representatives. Accordingly when the person who was the occupant of certain land within the meaning of the Bombay Survey Act failed to pay the revenue due thereon, the kabulayatdar khot might recover that amount from that person's mortgagee in possession."

जमीन आहे असें दाखवितां न आल्यास सर्व जमीन सकृद्दर्शनी ( prima facie ) सरकारदस्त देण्यास जबाबदार आहे. आणि खोती खासगी जमीनीबद्दल खोतहिस्सेदार कांहीं देत नव्हता एवढ्यावरून ती त्याचेकडून दुसऱ्याकडे गेल्यानंतर मोफत भोगावयाची असें होत नाहीं." दस्त देण्याला जरी प्रत्येक प्रकारची जमीन व ती जमीन धारणकरणारा इसम जबाबदार आहे तथापि खोतफायदा वसुलीचे कामीं तेंच तत्व लागू करितां येणार नाहीं. खोतफायद्याला खातेदार कूळ वगैरे प्रकारची जी खोतनिसबत जमीन ती जबाबदार असते. खोतफायदा देण्याची जबाबदारी जमिनीवर अवलंबून नसते. आप्पाजी वि. बाळकृष्ण ५ प्रिं. ज. २३८ हा ठराव या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखा आहे. एका खोतहिसेदाराच्या तक्षिमेच्या खरेदीदारानें त्याच तक्षिमेपैकीं त्याच खोतहिस्सेदारानें पूर्वीच एकाला विकलेल्या खोतीखासगी ठिकाणावरील खोतफायदा वसूल करण्याकरितां दावा केला. त्यांत, वादीचें पूर्वीच आपण ठिकाण खरेदी घेतलेलें असून त्यावरील सर्व प्रकारचा हक्कदावासंबंध खरेदी केला असल्यामुळें वादीला खोतफायदा मागण्याचा हक्क नाहीं, अशी प्रतिवादीनें तक्रार केली. तेव्हां अखेर असें ठरलें कीं, प्रतिवादीनें वादीचे पूर्वीच सर्व हक्क विकत घेतला असल्यामुळें मूळ खोतहिस्सेदाराला जर खोतफायदा त्या ठिकाणावर घेण्याचा हक्क असेलच तर तो वादीनें खरेदी घेतला नाहीं. "खोतीपैकीं ठिकाणाचा वहिवाटीचा हक्क विकल्यास त्यांत खोत फायदा भोगण्याचाही हक्क येतो." ("sale of right to cultivate the field of a khoti includes the right to enjoy khotifaida.") असें ठरून खोत फायदा देऊं नये असें ठरलें; परंतु सरकारदस्त मात्र कोणासही माफ नसतो. या एकंदर सर्व ठरावांवरून वहिवाटदार खोतावर ज्या जमिनीबद्दल सरकारजमा देण्याची जबाबदारी आहे, त्या सर्व खोती खासगी, कुळारग, खोत निसबत वगैरे सर्वप्रकारच्या जमिनी दस्त देण्यास पात्र आहेत व त्यांचा वसूल घेण्याचा वहिवाटदार खोतास हक्क आहे. खोतफायदा मात्र तो जेथून घेणें योग्य व कायदेशीर असेल तेथून गांवशिरस्त्याप्रमाणें घेतला पाहिजे.

(५) वहिवाटदार खोतानें वसूल कसा व किती करावा—

वहिवाटदार खोतानें वसूल करावयाचा तो कलम ३३ प्रमाणें हक्कवाल्या खोतेदारांनीं खोतास जें काय द्यावें असें ठरलें असेल त्याप्रमाणेंच केला पाहिजे. या बाबतींत बोटखतास जो शेरा असेल त्याप्रमाणें योग्य प्रकारें कलम ४० खालीं केलेल्या नियमास अनुसरून अभावणी, खतावणी करून त्याप्रमाणें ऐनजिनसी अगर नक्त थल वसून करावयाची असते. निरंतरचे कुळाचे बाबतींत मोबदला–किंमत ( पट ) ठरली असल्यास त्याप्रमाणेंच वसूल केला पाहिजे. खोताच्या खासगी खात्यांतील जमिनींचे बाबतींत, गांवशिरस्त्याप्रमाणें वागावयाचें असतें; कारण कांहीं गांवांत

वहिवाटदार खोतानें हक्कवाल्या खातेदाराकडून वसूल करून दस्त वारावयाचा व खासगी ठिकाणें खोतहिस्सेदारांनीं खोतफायद्याऐवजीं मोफत भोगावयाचीं अशा प्रकारचे ठराव झालेले असतात. ज्यावेळीं असा कांहीं शिरस्ता नसेल त्यावेळीं कलम १७ (ब) १ प्रमाणें जी थल द्यावी असा शेरा असेल त्याप्रमाणें सर्व थल वसूल करण्याचा वहिवाटदार खोतास हक्क आहे.

(६) लँ. रे. कोड कलम ८६ व ८७; मदत दावाः—

लँ. रे. कोड अंमलांत येण्यापूर्वीं मदत दावे करण्याचा अधिकार, सन १८२७ च्या मुं. रेग्यूलेशन १७ भाग ७ प्रमाणें, व १८६५ चा आक्ट १ कलम ४० प्रमाणें, ठरलेला होता. तोच आतां लँ. रे. कोड मध्यें कलमें ८६।८७ प्रमाणें ठरलेला आहे. या कलमांप्रमाणें थल वसूल करण्याचे कामीं रेव्हेन्यु अधिकाऱ्यांची मदत मागण्याचा वहिवाटदार खोतास अधिकार आहे. कलम ८६–"कनिष्ठ धारणकरणारांकडून, किंवा वरिष्ठ धारण करणारांनीं धारण केलेल्या जमिनीच्या सहभागिदारांकडून खंड किंवा जमिनीचा महसूल वरिष्ठ धारणकरणारांस यावयाचा तो वसूल करावयाचा असेल, आणि वरिष्ठ धारणकरणारांनीं कलेक्टरास लेखी अर्जी केली असेल तेव्हां, जमीनमहसूल सरकारानें वसूल करण्यासाठीं या आक्टाच्या अकराव्या बाबींत ज्या कानू (१३७ कलमा खेरीज करून) व जी रीती सांगितली आहे त्या कानूअन्वयें व रीतीअन्वयें पूर्वोपाय, व दुसऱ्या तजविजी योजल्या जाणें आणि तेणेंकरून खंड व जमीनमहसूल वसूल होण्याला मदत मिळणें, याविषयीं हक्क वरिष्ठ धारणकरणारास प्राप्त होईल, मात्र असें ठरविलें आहे कीं, सदर्हु प्रकारची अर्जीकरणें ती ज्या मुलकी सालांत किंवा कूळ वहिवाटीच्या ज्या सालांत सदर्हु खंड किंवा जमीनमहसूल देणें झाला असेल त्या सालांत केली पाहिजे." या कलमाप्रमाणें अर्जी केल्यानंतर कलम ८७ प्रमाणें व्यवस्था करावयाची असते. कलम ८७–(१) ८६ व्या कलमाअन्वयें अर्जी केल्यावर त्यानें त्याबद्दल लेखी नोटीस त्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं दिवस ठरवून कनिष्ठ धारण करणारास अगर सहभागिदारास देवविली पाहिजे. (२) सदर्हुप्रमाणें ठरलेल्या दिवशीं त्यानें संक्षिप्त रीतीनें चौकशी केली पाहिजे आणि त्याच्यापुढें पुरावा असेल त्यावरून खंडाची किंवा जमीनमहसूलाची जी रक्कम कायदेशीर रीतीनें (देणें असल्यास) देणें आहे असें त्यास वाटेल ती वसूल करण्यासाठीं वरिष्ठ धारण करणारास मदत देण्याविषयीं हुकूम केला पाहिजे. (३) परंतु जर कलेक्टरला असें दिसून येईल कीं, पक्षकारांच्या दरम्यान तकरार आहे ती घोंटाळ्याची किंवा कठीण प्रकारची आहे, तर तो त्याच्या नजरेस येईल त्याप्रमाणें मागितलेली मदत देत नाहीं ह्मणणें, अथवा ज्या जमिनीसंबंधीं तकरार असेल तिजवर ८ वे बाबेंतील ठरावां अन्वयें किंवा ११२ वे कलमा अन्वयें बहाल केलेल्या कोणत्याही सर्वे सेटलमेंटाचे वेळीं आकारणी केली असल्यास, सदर्हु जमि-

नीवर सदर्हुप्रमाणें ठरविलेल्या आकारणी पुरती मात्र मदत देणें याविषयीं मुखत्यार आहे. (४) या कलमावरून असें समजूं नये कीं, कोणत्याही पक्षकारास जी रक्कम आपणास आणखी येणें आहे, किंवा देणें होती त्यापेक्षां जी जास्ती रक्कम त्याजवळून घेतली असें (जसें असेल तसें) वाटेल ती रक्कम प्रतिपक्षकाराजवळून वसूल करण्यासाठीं दोहोंपैकीं कोणत्याही पक्षकारास दिवाणी कोर्टांत जाण्याची मनाई आहे. (५) ह्या कलमा अन्वयें केलेल्या कोणत्याही हुकुमांवर फक्त एकच अपील चालेल." या दोन कलमांस अनुसरून मदत मागण्याचा वहिवाटदार खोतास हक्क आहे. इतर खोत हिस्सेदारांपैकीं कोणासही हा अधिकार नाहीं. कलम ३१ प्रमाणें वरिष्ट-धारण करणारास दिलेला हक्क वहिवाटदार खोतापुरताच संकुचित करण्यांत आला आहे.

(७)- मदतीकरितां करावयाचे अर्जाची रीत—

मदत मिळण्याकरितां कलम ८६ प्रमाणें लेखी अर्ज पाहिजे, खालीं प्रतिज्ञा लेख असण्याचें कारण नाहीं. अभावणीप्रमाणें कुळांकडे मागणें केलेलें असल्यास प्रत्येक प्रतिवादीवार तेरीज तयार करून ते बरोबर असल्याबद्दल त्याचेवर सही करून तें सोबत जोडावें लागतें. अन्य तऱ्हेचें नक्त, मोबदला—किंमत, सरकारदस्त यांसारखे ठराविक मागणें असल्यास त्याबद्दलचा स्पष्ट उल्लेख फिर्याद अर्जांत केला पाहिजे. अर्जांत अभावणी शाबीत करणारे अगर मागणें शाबीत करणारे साक्षिदारांची नांवें व इतर पुरावा असेल तो नमूद करून दिला पाहिजे. साक्षिदारांस समन्सें काढणें किंवा नाहीं त्याचाहि स्पष्ट उल्लेख केला पाहिजे. अर्ज समक्ष न देतां पोष्टामार्फत पाठविला तरी चालतो. अर्ज पाठविणें अगर देणें तो कलेक्टर अगर मामलेदार अथवा महालकरी यांचेकडे दिला अगर पाठविला पाहिजे. मदत दावे चालविणेचा अधिकार मामलेदार अगर महालकरी यांचेकडेच सोंपविला असल्यामुळें त्यांचेकडेच अर्ज करणें इष्ट असतें. बरींच कुळें प्रतिवादी असलीं तरी एक अर्ज चालतो. अर्जाला, सर्व मागण्याची एकंदर रक्कम रुपये ५० चे आंत असेल त्यावेळीं, दोन आणे व पन्नासचे वर असेल त्यावेळीं आठ आणे याप्रमाणें कोर्ट फी स्टांप लाविला पाहिजे. मदतीकरितां करावयाचा अर्ज ज्या सालाचें मागणें असेल त्याच मुलकी सालाचे आंत ह्मणजे त्या वर्षाच्या ३१ जुलैचे आंतच केला पाहिजे. मदत मिळणें ती फक्त एकाच सालाची मिळत असते ह्मणून ज्या सालचें त्या सालीं मागणें केलेंच पाहिजे असा नियम आहे. अर्ज केल्याबरोबर प्रतिवादीवर बजावणी करण्याकरितां अर्जाची रक्कम ५० रुपयांचे आंत असल्यास तीन आणे व ५० चे वर असल्यास सहा आणे याप्रमाणें प्रत्येक प्रतिवादीमागें कोर्ट फी स्टॅंप दिला पाहिजे. अर्जांतील साक्षिदारास समन्सें करणें असल्यास त्याचेबद्दलही प्रोसेस व भत्ता भरला पाहिजे. अशा रीतीनें अर्ज आल्यानंतर मामलेदार अगर महालकरी तारीख नेमन

त्या तारखेस हजर होण्याबद्दल प्रतिवादीस नोटीस करतात. त्या तारखेस प्रतिवादींची तक्रार ऐकून, उभय पक्षीं पुरावा घेऊन " संक्षिप्त रीतीनें " चौकशी करून योग्य तें देण्याबद्दल हुकूम करावयाचा असतो. हुकमाप्रमाणें प्रतिवादीनें वादींची फेड न केल्यास सरकारी कामगारांनीं मदत देऊन वसूल करून देण्याची तजवीज करावयाची असते. खोती गांवचे बाबतींत हक्कवाल्या खातेदारांनीं आपलें देणें केव्हां द्यावें याबद्दलच्या तारखा ठरलेल्या आहेत. त्याचे अंत देणें न दिल्यास लँ. रे. कोड कलब १४८ प्रमाणें कुळांकडून दंड देवविणें इष्ट असतें. दंडादाखल मिळणेची रक्कम जास्तींत जास्त सरकारदस्ताच्या एक चतुर्थांश इतकी असते. हा दंड करणें तो ज्यावेळीं मुद्दाम कायद्याविरुद्ध वर्तत झालें असें दिसेल, त्यावेळींच करावयाचा असून दंडाची रक्कम इतर मागण्याबरोबरच वसूल करून द्यावयाची असते. ( जोगळेकर कृत लँ. रे. कोड. पान ४६२ ). मदत दाव्यांत विशेष भानगडीचे प्रश्न आहेत असें दिसल्यास मदत देण्याचें नाकारण्यालाहीं कलेक्टर, ( मामलेदार अगर महालकरी ) यांस अधिकार आहे. त्याचप्रमाणें उभयपक्षकारांस दिवाणीकोर्टाकडे जाण्याचीही पूर्ण मुभा ठेवलेली आहे. मदतीच्या दाव्यामध्यें मामलेदार अगर महालकरी यांस खर्च देवविण्याचाही अधिकार आहे. ( जोगळेकर कृत लँ. रे. कोड पान २६४ ). मदत दावे चालविणारें कोर्ट हें दिवाणी कोर्ट असतें. मदत दाव्याचे काम वकील मार्फत चालविणेस पक्षकारांस पूर्णपणें मुभा आहे. मदत दाव्याचे विरुद्ध फक्त एकदांच अपील करतां येतें.

## (८) मदत कोणाविरुद्ध मागतां येते—

कलम ३१ प्रमाणें अक्षरशः पाहिल्यास वहिवाटदार खोतास फक्त हक्कवाल्या खातेदारांचे विरुद्ध मदत मागण्याचा हक्क आहे. धारेकरी, कच्चाधारेकरी, व निरंतर कुळें यांचे बाबतींत कलम अगदीं स्पष्ट आहे. परंतु खोत हिस्सेदार व साधीं कुळें यांचेविरुद्ध मदत मागतां येईल कीं काय असा प्रश्न आहे. कृष्णाजी वि. रामचंद्र १ मुं. ७० या ठरावांतील तत्वानुसार दस्त देण्याची जबाबदारी जमिनी बरोबर राहात असल्यानें व जमिनी कसणारांशीं सरकारनें नेमिलेल्या वरिष्ठ धारण करणाराचा खासगी संबंध (privity) आपसूकच उत्पन्न होत असल्यामुळें वहिवाटदार खोतास खोवहिस्सेदार अगर साधीं कुळें यांचेविरुद्ध मदत मागण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. कलम ८६ व ८७ यांत असा निर्बंधही कांहीं घातलेला नाहीं, त्यामुळें कलम ३१ प्रमाणें जरी हिस्सेदार व साधीं कुळें यांचे विरुद्ध मदत मागतां येणार नाहीं, तथापि लँ. रे. कोड कलमें ८६ व ८७ व १ मुं. ७० या ठरावाप्रमाणें मदत मागण्यास हरकत दिसत नाहीं. रा. अ. ग. देसाई यांचेंही याचप्रमाणें मत आहे. ( खो. आ. पान ११७ ).

(९) मदत कोणी मागावयाची—

कलम ३१ प्रमाणें वहिवाटदार खोतासच फक्त मदत मागण्याचा हक्क आहे. बाकीच्या हिस्सेदारांस तसा अधिकार नाहीं. कलम ३१ (अ) प्रमाणें वहिवाटदार खोतानें नेमिलेल्या आपल्या मुखत्यारास मात्र मदत दावा करण्याचा हक्क आहे. त्याचप्रमाणें स्वतंत्र गांवचा अगर धड्याचा खोत, ज्यांस कलम ३० प्रमाणें कबुलायत देण्याचें कारण पडत नाहीं, अशा खोतांस मदत मागण्याचा हक्क आहे. गांव इनाम असून त्यांत खोत असल्यास इनामदारास आपल्या जुडी अग्रमांशाबद्दल किंवा खोतांकडील येणें वसूल करण्याबद्दल मदत मागणेची मुभा आहे.

(१०) मदत कोणत्या प्रकारचा वसूल घालण्याबद्दल द्यावयाची—

मदत दाव्यांत अभावणीप्रमाणें येणें असलेल्या ऐनजिनसी थलीचें मागणें करण्याचा वहिवाटदार खोतास हक्क आहे; व त्याप्रमाणें त्यास कुळांकडून ऐनजिन्नस देण्याबद्दल हुकूम केला पाहिजे. सन १९०४ च्या पूर्वी याच आक्टाचें कलम १३ प्रमाणें एनजिनसी थलीबद्दल मदत मागितल्यास त्याबद्दल त्याची किंमत ठरवून पैसे देवविण्याचा हुकूम करण्याचा कलेक्टरला अधिकार दिलेला होता. परंतु आतां तें कलम रद्द केल्यामुळें तो कलेक्टराचा अधिकार काढून घेतला आहे. त्यामुळें आतां ज्याप्रमाणें मागणें असेल त्याप्रमाणें ऐनजिनसी गल्ला अगर नक्त रुपये देवविले पाहिजेत. ज्या ठिकाणीं मोबदला—किंमत ठरलेली आहे त्या ठिकाणीं पटाची रक्कम, धारेकऱ्यांकडून दस्ताची रक्कम व कच्चेधारेकऱ्यांकडून परिशिष्टांत सांगितल्याप्रमाणें रक्कम देवविली पाहिजे.

(११) वहिवाटदार खोतास वर्ग करण्यास संमति देतां येते—

वहिवाटदार खोतास १९२४ साल पर्यंत निरंतरचे कुळास वर्ग करण्यास संमति देण्याचा अधिकार नाहीं असा समज होता; कारण सर्व खोतहिसेदाराविरुद्ध त्याचा परिणाम घडणारा असल्यामुळें वहिवाटदार खोतास एकट्यास तसा अधिकार देणें इष्ट नव्हतें. परंतु इब्राहीम वि. कृष्णाजी २६ मुं. लॉ. रि. ४२१ या ठरावांत सर न्या. मॅक्लिऑड यांनीं वहिवाटदार खोतानें कलम ९ प्रमाणें खातेदार कुळास वर्ग करण्यास संमति दिल्यास ती योग्य आहे असें ठरविलें आहे. न्यायमूर्ति आपले ठरावांत लिहितात कीं "रिस्पॉंडंट तर्फे खोतांची संमति याचा अर्थ सर्व खोतहिसेदारांचा संमति असा आहे, अशी तक्रार करण्यांत आली आहे. परंतु अशा तऱ्हेची तक्रार जर योग्य आहे असें धरलें तर निरंतरचे कुळास खोतहिसेदारांची संमति मिळविणें शक्य नसल्यामुळें वर्ग करणें अगदीं अशक्यच होईल. निरंतरचे कुळास वर्ग करण्यास संमति देणें हें वहिवाटदार खोताच्या सर्वसाधारण कर्तव्यांत

मोडत नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं " * असें ह्मणून, कलम २६ मधील "आणि या आक्टाप्रमाणें.........करावयाची सर्व कामें करण्याकारितां" या खालीं, हा अधिकार येतो असें ठरवून, वहिवाटदार खोतास संमति देण्याचा अधिकार दिला आहे. वहिवाटदार खोतानें संमत्ति देतेवेळीं जो मोबदला घेतला असेल तो त्यानें इतर सर्व खोतहिसेदारांकारितां घेतला असल्यामुळें सर्वांस दिला पाहिजे असेंही सदर टरावांत ठरविलें आहे.† हा टराव गतकालसापेक्ष नाहीं.

## (१२) वहिवाटदार खोतास करण्याचा अधिकार नाहीं अशा गोष्टीः—

वहिवाटदार खोताला कायकाय गोष्टी करतां येतात हें आपण पाहिलें. परंतु त्याचप्रमाणें त्याला कोणकोणते अधिकार नाहींत, हेंही आपण पाहिलें पाहिजे. वहिवाटदार खोताला—

(१) कलम १० प्रमाणें राजिनामा दिलेली, गतकुळी झालेली अगर खालसा केलेली जमीन वहिवाटदार खोतास एकट्यास आपल्या वहिवाटीस घेण्याचा अधिकार नाहीं.

(२) कलम ११ प्रमाणें वरिष्ठ दर्जाचे हक्क देण्याचा एकट्या वहिवाटदार खोतास अधिकार नाहीं, रत्नागिरीचे कलेक्टर वि. व्यंकटराव ८ मुं. हा. रि. १.

(३) वहिवाटदार खोतास एकट्यास कूळ काढून टाकण्याचा अगर खंड-वाढ करण्याचा अधिकार नाहीं. बाबाजी वि. गोपाळ ३ मुं. २३=१८८० प्रि. ज. ६४९.

(४) सर्व वसूल एकट्यानें न घेतां सर्व खोतहिसेदारांस खोतफायदा वांटून दिला पाहिजे.

---

* "It has been urged for the respondent that the consent of the khot meant the consent of the whole body of tht khoti sharers. But the result of such a contention, if upheld would be that the transfer of a permanent tenancy would practically be prohibited as the consent of the whole body of the khoti sharers could not ordinarity be procured. We do not see why it should not be within the ordinary duties of a managing khot to consent to a transfer of a permanent tenancy."

† (हा ठराव आजपर्यंतच्या इतर ठरावांशीं व खोती कायद्याच्या तत्वाशीं विसंगत असून त्याचा पुन्हां विचार होणें इष्ट आहे, असें आमचें मत आहे. कारण ह्या अधिकारानें वहिवाटदार खोतास इतर खोतहिसेदारांच्या मर्जीविरुद्ध अगर नुकसानकारक वर्तन करण्याची एक संधि दिल्यासारखें होण्याचा संभव आहे.)

(१३) खोत फायदा—

खोती गांवांत खोताला दस्ताचे बाहेर बरेंच उत्पन्न मिळतें. गांवचा एकंदर जो वसूल होईल त्यांतून सरकारजमा व गांवचे वहिवाटीचा खर्च वजा करून जो फायदा राहील तो खोतफायदा होय, **गोपाळ वि. त्रिंबक १८९६ प्रिं. ज. ७२८.** हा फायदा सर्व खोत हिस्सेदारांस वहिवाटदार खोतानें सारखा हिशाप्रमाणें वांटून दिला पाहिजे. ज्या खोत हिस्सेदारास त्याच्या हिशाचा फायदा मिळणार नाहीं त्यास वहिवाटदार खोतावर फिर्याद करून आपल्या हिशास बसणारा फायदा वसूल करण्याचा हक्क आहे. इतर हिस्सेदारांस पक्षकार करण्याचें कारण नाहीं, **केसो वि. गणेश १८९१ प्रिं- ज. ३२३.** खोतफायदा दरसाल वांटण्याची खटपट पडूं नये, व बाद होऊं नयेत ह्मणून, पाळीप्रमाणें प्रत्येक हिस्सेदारानें वहिवाट करून सर्व खोत फायदा आपण घ्यावा व इतर सालीं दुसऱ्या हिसेदारास तसा घेऊं द्यावा असा कांहीं गांवांत सर्व खोत हिस्सेदारांत ठराव झालेला असतो, अगर गांव शिरस्ता पडलेला असतो. अशा तऱ्हेची पाळीची यादी कलम १७ प्रमाणें नोंद-लेली असते. कित्येक गांवातून साधारणतः खोत हिस्सेदार आपल्या प्रत्यक्ष वहि-वाटीच्या जमिनीबद्दल कांहीं एक न देतां खोतफायद्याचा हिशोब करितांना जमिनीबद्दल करावयाची पोंच वजा घालतात, **रामचंद्र वि. विसाजी १८८० प्रिं. ज. ८१०.** कित्येक गांवांतून खोत हिस्सेदार आपल्या खासगी जमिनीबद्दल कांहीं एक देत नाहींत. **आत्माराम वि. दत्तात्रय दु. अ. ४९० सन १९०८ नि. ता. १६।९।१९१०** या ठरांवात ही पद्धत योग्य धरली आहे; परंतु त्यांच्याकडे वहिवाटीस आलेल्या कुळारग ठिकाणांचीहि थळ देऊं नये असा ठराव असल्यास तो मात्र असमंजस ( absurd ) अन्याय्य व अयोग्य असा आहे, असें ठरविलें आहे. खातेदार कुळांकडील उत्पन्न वसूल करून सर्व गांवचा खासगी ठिकाणांसुद्धां सरकारदस्त वारावा व राहील तो फायदा वहिवाटदार खोतानें घ्यावा अशीही वहिवाट आहे. एकाद्या खासगी जमिनीबद्दल खोताला खोत-फायदा द्यावयाचा किंवा नाहीं हे त्या गांवच्या वहिवाटीवर अवलंबून राहतें, व वहिवाटदार खोतास अशा खासगी जमिनीबद्दल कांहीं देणें नाहीं असें ज्याचें ह्मणणें असेल त्याचेवर तशा शाबिदीचा बोजा राहतो, **रामचंद्र वि. विसाजी १८८० प्रिं. ज. ८१०.**

कांहीं ठिकाणीं **वांटणी वर्खाची** पद्धत आहे. वांटणीवर्ख ह्मणजे खोत हिस्से-दारांनीं आपसांत खातेदार कुळें वांटून घेणें व त्यांचेकडून वसूल ज्या त्या हिस्से-दारांनीं करणें. ही पद्धत कायदेशीर किंवा बेकायदेशीर, योग्य किंवा अयोग्य, याचा निर्णय अद्याप लागलेला नाहीं. **पर्शराम वि. रघुनाथ दु. अ. नं. ४६३ सन १९२२ नि. ता. २९।६।२३** या ठरावांत अशा तऱ्हेची; वहिवाटदार खोत व

हिस्सेदार यांचे मधील खातेदार कुळें वांटून घेण्याची व्यवस्था, ही योग्य किंवा कसें हा प्रश्न कायद्याचा आहे, असें ठरविलें आहे.* **आत्माराम वि. दत्तात्रय दु. अ. ४९० सन १९०८ नि. ता. १६।९।१९१०** या ठरावांत खोत हिस्सेदारांकडे आलेल्या कुळारग जमिनीबद्दल कांहीं एक देऊ नये अशी व्यवस्था गैर आहे असें म्हटलें आहे; परंतु त्यांत कुळारग खात्याची वांटणी करणें योग्य किं-अयोग्य हें ठरविलेलें नाहीं. **परशराम वि. रघुनाथ** या ठरावांत जो ठराव दिलेला आहे तो अशी व्यवस्था योग्य किंवा अयोग्य याचा निर्णय न करितां "without expressing any opinion as to the validity of the arrangement in question" असा स्पष्ट उल्लेख करून दिलेला आहे. यावरून, वांटणी-वर्खांची पद्धत योग्य किंवा अयोग्य हें अद्याप ठरावयाचें आहे. या बाबतींत रा. अ. ग. देसाई यांचे मत वांटणीवर्खे बेकायदेशीर आहेत असें आहे (**खो. आ. पान ११४**). इतकें खरें कीं खोती से. आक्टानें (कलम ३१) एकट्या वहिवाटदार खोतासच मदत दावे करण्याचा अधिकार दिलेला असल्यामुळें खोत हिस्सेदारास आपल्या वांटणीस आलेल्या कुळांवर मदत दावा आणतां येणार नाहीं.

## (१४) खोत फायद्याचे दावे स्मॉलकॉझ दावे होत—

कुळाकडून अगर खोत हिस्सेदाराकडून ५०० रुपयेपर्यंत वसूल मागण्याचे दावे स्मॉलकॉझ स्वरूपाचे (ज्या कार्टांत दावा असेल त्या जज्जाच्या अधिकारानुरूप) असतात व त्यावर अपील नसतें. त्याचप्रमाणें एका खोतहिस्सेदारानें अन्यायानें घेतलेला दुसऱ्या हिस्सेदाराचा फायदा परत मिळविण्याकरितां केलेला दावाही स्मॉलकॉझ स्वरूपाचा असतो, **वासुदेव वि. दामोदर ६ मुं. लॉ. रि. ३७०.** त्याचप्रमाणें ५०० रुपयांचे आंत उत्पन्न मागण्याचा दावा जरी त्यांत ज्या जमिनीचें उत्पन्न मागावयाचें ती कौली आहे किंवा खोती आहे असा प्रश्न असून त्या प्रश्नावर उत्पन्न देवविणें अवलंबून असलें, तथापि त्या दाव्यांत पैसे देवविण्याचा प्रश्न असल्यामुळें स्मॉलकॉझ स्वरूपाचाच असतो. स्मॉलकॉझच्या दाव्यांत जरी मालकीच्या प्रश्नाचा विचार करावा लागला तरी मुख्य मागणें पैशाचें असलें म्हणजे झालें. इतकें खरें कीं, अशा दाव्यांत मालकीसंबंधानें केलेला ठराव मालकी संबधाचें रेग्युलर दाव्यांत रेसज्युडिकेटा होत नाहीं, **विनायक वि. कृष्णाजी ३ मुं. लॉ. रि. २३९. पुट्टनगौडा वि. निळकंठ १५ मुं. लॉ. रि. ७७३** या ठरावांत तोडलेल्या झाडांच्या किंमतीबद्दल मागणें केलेलें असून तें स्मॉलकॉझ स्वरूपाचें आहे असें ठरवून "स्मॉलकॉझ कोर्टाला, ज्यांत स्थावर मिळकती संबंधीं हक्क ठरविणें हा

---

* "The question of the validity of the arrangement between the subsharers and the managing khot as regards the allotment of the occupancy tenants, is a question of law."

मुख्य हेतु आहे परंतु दाव्याचें स्वरूपांत हें मागणें नसून केवळ पैशाचे मागण्याचें आहे, असा दावा चालविण्याचा अधिकार आहे." असें ठरविलें आहे. खोतफायदा काय असेल याची कल्पना नसतां साधारणपणें अंदाजीं मागणें करून हिशोबाचे कागद आल्यानंतर नक्की हिशोब होईल त्याप्रमाणें रक्कम मिळावी असें जरी मागणें असलें तथापि तो दावा स्मॉलकॉझ स्वरूपाचाच होय. नारायण वि. बालाजी २१ मुं. २४८ या ठरावांत वादीनें कांहीं खोती व कांहीं धारा जमिनीचे उत्पन्नाबद्दल रु. ३३९–१४–२ अगर हिशोबाअंतीं जें देणें योग्य ठरेल तें मागणेकरितां वहिवाटदार खोताविरुद्ध दावा आणला. वहिवाटदार खोतानें कांहीं जमिनीकडे वादीचा मालकी हक्क नाहीं अशी तक्रार केली. मुळच्या कोर्टानें व पहिल्या अपील कोर्टानें फक्त ७२ रु. १४ आ. ११ पै देणें निघतें असें ठरविलें. त्यावरून ना. हायकोर्टानें असें ठरविलें कीं, "हा दावा केवळ स्मॉलकॉझ स्वरूपाचा असून त्याचेवर दुसरें अपील होऊं शकत नाहीं. केवळ मालकीचा प्रश्न उद्भवला एवढ्यावरून दावा स्मॉलकॉझ कोर्टाच्या अधिकारांतील नाहीं असें होत नाहीं. स्मॉलकॉझ कोर्टाच्या अधिकारांतील दावा असतां हिशोबाअंतीं जें देणें निघेल तें द्यावें, असें वैकल्पिक मागणें केलें एवढ्यानेंच त्याचें स्वरूप बदलत नाहीं."* याच ठरावाप्रमाणें केशव वि. बाळकृष्ण सि. अर्ज नं. २२९ सन १८९९ नि. ता. २१–६–१९०० यांतही असाच निकाल केलेला आहे. इतकें खरें कीं, हिशोबाअंतीं स्मॉलकॉझ अधिकारापेक्षां जास्त रक्कम निघाली तर स्मॉलकॉझ स्वरूप नष्ट होऊन दावा रेग्युलर चालेल, गंगाधर वि. विनायक १८९६ प्रिं. ज. ४१७. दावा दाखल करतेवेळीं जो कोर्टाचा न्यायाधीश असेल त्याचे स्मॉलकाझ अधिकारावर दावा स्मॉलकॉझ किंवा रेग्युलर हें अवलंबून राहील. "दावा दाखल केल्यानंतर न्यायाधिशांत फेरबदल होऊन स्मॉलकॉझ अधिकारांत फेरबदल झाल्यानें दाखल केले तारखेस ठरलेलें दाव्याचें स्वरूप बदलत नाहीं," व्यंकटरमण वि. बाबुराव २५ मुं. लॉ. रि. ५१६.

(१५) खोतफायद्याचा दावा आणि मुदतीचा कायदा—

खोतफायदा मागणेचा दावा, मागणें करण्याची वेळ भरल्यापासून तीन वर्षांचे आंत केला पाहिजे, त्याबाहेर मागणें गेल्यास मुदतीच्या कायद्याची त्यास

---

*"The suit was a small cause suit and no second appeal lay. The mere fact of a question of title arising does not prevent a suit being cognizable by a court of small causes. By merely asking in the alternative for an account of the profits a suit cognizable by a Small Cause Court cannot be converted into one of a different nature,"

हरकत येईल. खोतफायदा प्रत्येक वर्षाचे ३१ जुलैचे आंत द्यावयाचा असतो, ह्मणून तेव्हांपासून तीन वर्षांचे आंत मु. का. आर्टिकल ११५ प्रमाणें दावा केलाच पाहिजे. दामोदर वि. सदाशिव दु. अ. ८८१ सन १९०९ नि. ता. १४।१२।१९११ या ठरावांत वादीनें खोतफायद्याचा १९०४।०५ सालाबद्दल जो हिशोब होईल तो मागण्याबद्दल ता. २० जून १९०८ रोजीं दावा केला. विरुद्ध-तक्रार अशी होती कीं, कुळांकडून सर्व येणें १५।१२।१९०४ पासून १।६।१९०५ पर्यंतचें यावयाचें असल्यामुळें वादीचा दावा मुदतीबाहेर आहे. त्या दाव्यांत न्या, बॅचेलर आणि स्कॉट यांनीं असें ठरविलें कीं, " शिरस्त्याप्रमाणें वहिवाटदारानें गोळा केलेल्या रकमा ३१ जुलै १९०५ ला देणें होतात; तेव्हां वादीचें मागणें मु. का. आर्टिकल ११५ प्रमाणें तीन वर्षांचे आंत असल्यानें मुदतींत आहे."*

**(१६) खोत हिस्सेदारांविरुद्ध वहिवाटदाराचा विरुद्ध कबजा—**

वहिवाटदार खोत असतां कांहीं जमिनी आपल्या मालकीच्या धारा जमिनी आहेत असें ह्मणून उघडपणें त्यांचें उत्पन्न वगैरे वसूल करूं लागल्यास व अशा रीतीनें बारा वर्षे गेल्यास इतर खोत हिस्सेदारांचे विरुद्ध त्याचा विरुद्ध कबजा होतो, व अशा जमिनींचा कबजा अगर उत्पन्न इतर हिस्सेदारांस मागतां येत नाहीं. **धोंडो वि. वासुदेव १ मुं. लॉ. रि. ४६६** या ठरावांत हें तत्व कायम करण्यांत आलें आहे. परिस्थिति अशी होती कीं, एक खोती गांव धोंडो आणि परशुराम यांचे मालकीचा असून त्यांत त्यांचा निम्मे निम हिस्सा होता, व एक साल आड करून कबुलायत देण्याचा क्रम चालू होता. १८६२।६३ सालापासून परशुराम ह्मातारा झाल्यामुळें त्यानें धोंडो यास कबुलायत देऊं दिली. १८६७ सालीं धोंडोनें कबुलायत न दिल्यामुळें गांव सरकारनें जप्त केला. पुढें १८७८ सालीं धोंडोनें पुन्हां कबुलायत दिल्यामुळें सरकारनें गांव व नफा त्याचे स्वाधीन केला. नंतर १८८१ मध्यें परशुरामानें आपला निम्मा हक्क सखाराम यास विकला; तेव्हां सखारामानें लगेच निम्मा खोतफायदा मागणेकरितां दावा केला, परंतु तो कांहीं कायद्याचे मुद्यावर रद्द झाला. १८८१ ते १८८४ चे दरम्यान धोंडोनें कांहीं कुळांवर त्यांचेपाशीं असलेली जमीन आपली धारा आहे असें विधान करून दावे केले व धारा जमीन आहे असें ठरवून निवाडेही मिळविले. १८८१ मध्यें सखा-रामानें वहिवाटदार ह्मणून कबुलायत देऊन खोतफायदा भोगला होता. ३१।८। १८९५ रोजीं सखारामाच्या मुलानें, धोंडोनें लबाडीनें धारा ह्मणून लाविलेलीं

---

* " And according to the custom the amounts received by the manager would be payable on 31st July 1905. 1st July was within three years and according to the provisions of Art. 115 of the Limitation Act the suit was within time."

ठिकाणें धारा नसून खोती आहेत असा ठराव होण्याकरितां व १८९२।९३ व १८९४।९५ चे खोतफायद्याबद्दल रु० ७० मागणेंकरितां हा दावा आणला. ना. हायकोर्टानें असा ठराव दिला कीं मुदत १२ वर्षांची आहे असें धरलें तरी दावा मुदती बाहेर आहे. कारण खरेदीदाराचा दाव्यांतील जमिनीबद्दल खोती फायदा घेण्याचे हक्कास त्यानें १८८१ मध्यें खरेदी घेतल्यापासून सुरवात झाली आणि या दाव्यांतील परिस्थितींत मु. आ. कलम १८ लागू पडत नाहीं. सर न्या. जेंकिन्स आणि क्यांडी यांनीं आपले ठरावांत असें ह्मटलें आहे कीं, "कांहीं कारण असलें तथापि तो ( खरेदीदार ) आणि त्याचे मुलगे यांस दाव्यांतील जमिनीबद्दल ( धोंडोनें धारा ह्मटलेल्या जमिनीबद्दल ) खोती फायदा भोगलेला नाहीं, इतकेंच नव्हे तर वडील मुलानें कबुलायत देऊन गांवची वहिवाट केली, त्या सालींही ( १८८१ ) भोगलेला नाहीं आणि अशा तऱ्हेनें त्या जमिनीवरील हक्क धोंडोनें सारखा नाकारला आहे. तेव्हां सकृद्दर्शनीं ( prima facie ) मागणें मुदतीबाहेर आहे. ......... धोंडोचे कित्येक दुष्ट हेतू असले तथापि १८८१ आणि १८८४ या सालीं धोंडोनें उघडपणें कुळांच्या विरुद्ध या आपल्या धारा जमिनी आहेत असें ह्मणून दावे केले. असें असतां खरेदीदाराला पक्षकार केलें नाहीं, एवढ्यानें खरेदीदाराचा १८८१ मध्यें दावा करण्याचा उत्पन्न झालेला हक्क, लबाडीमुळें अगर ठकबाजीमुळें मागें राहातो असें मानितां येत नाहीं." या ठरावावरून असें स्पष्ट होत आहे कीं एका खोत हिस्सेदारानें आपल्याकडे वहिवाट असतां कांहीं जमिनी आपल्या धारा ह्मणून वापरण्यास सुरवात केली व १२ वर्षें उघडपणें आपलेकडे कबजा ठेविला तर तो दुसऱ्या खोत हिस्सेदारांचे विरुद्ध विरुद्धकबज्यानें मालक होतो.

याच बाबतींत अलीकडचा एक अप्रसिद्ध ठराव त्रिंबक वि. कृष्णाजी दु. अ. २२३ सन १९२० नि. ता. २५।२।१९२१ हा होय. या दाव्यांत रामजी ह्मणून ५ आणे ४ पै तक्षिमेचा मालक होता. त्याला चार मुलगे असून त्या चौघांच्या कुटुंबांमध्यें १८७० सालीं पाळीचा क्रम ठरला. त्यासालीं चौघांपैकीं यज्ञेश्वर यानें कबुलायत दिली व पुढेंही पाळीचे क्रमाविरुद्ध आपणच कबुलायत देऊन वहिवाट करून उत्पन्न घेतलें. पुढें, बरेच वर्षांनंतर इतर हिस्सेदारांपैकीं एकानें २ आणे ८ पै तक्षिमेचा आपण मालक असल्याबद्दल ठराव व्हावा ह्मणून दावा आणला. विरुद्ध तक्रार, अशी कीं, वादीचें मागणें मुदती बाहेर आहे. १९१२।१३ सालीं प्रतिवादींच्या मुखत्याराकडून वादीला तक्षिमेचा खंड पोंचला होता, ही गोष्ट सर्वांस मान्य ( admittedly ) आहे. तेव्हां प्रश्न असा कीं वादीचा प्रतिवादींशीं समाइकांत वहिवाट करण्याचा हक्क नष्ट झाला आहे कीं काय? न्या. मॅक्लिऑड आणि शहा यांनीं आपले ठरावांत असें ह्मटलें

आहे कीं, "१८७० पासून १९१२ पर्यंत वादींनीं वहिवाट करण्याकरितां कबुलायत देण्याची तसदी घेतली नसली तथापि प्रतिवादींकडून वादीचा कबुलायत देण्याचा हक्क नाकबूल केला असें वादीस दर्शविण्यासारखें उघडपणें कोणतेंही कृत्य घडलेलें नाहीं. या कुटांतील हिस्सेदार हे भागिदार ( tenants-in-common ) असोत वा नसोत; परंतु प्रतिवादीकडून १८७० च्या ठरावाप्रमाणें आपण यापुढें वागण्यास तयार नाहीं असें वादीस दाखविण्यासारखें एखादें कृत्य उघडरीतीनें वादीविरुद्ध घडणें जरूर होतें. दुसऱ्या कुटाच्या इसमांनीं आपल्या पाळीच्या वर्षीं जर वहिवाट मागितली असती तर यज्ञेश्वराच्या कुटानें ती नाकारली असती असें दाखविण्यास कांहीं पुरावा नाहीं. आणि यज्ञेश्वराचे कुटाकडून जोंपर्यंत असें कांहीं घडलें नाहीं तोंपर्यंत त्याच्या तर्फे व इतर कुटाविरुद्ध मुदत सुरू होत नाहीं."* या ठरावावरून पाळीचा क्रम ठरला असला तथापि उघडपणें पाळी करण्याच्या हक्काविरुद्ध कृत्य घडल्याशिवाय नुसती दुसऱ्याची पाळी असतांना आपणच वहिवाट केली इतक्यानेंच विरुद्ध कबजा सुरु होत नाहीं. त्याप्रमाणेंच जमिनींच्या बाबतींतही उघडरीतीनें आपली मालकी दाखविणारी व दुसऱ्याचा हक्क नाहीं ह्मणणारीं अशीं कृत्यें झालीं तर तेव्हांपासून विरुद्ध कबजा घडतो. नाहीं तर तो कबजा दुसऱ्या हिस्सेदारांकरितांच आहे असें ह्मणणें भाग आहे. कांहीं झालें तरी वहिवाटदार खोत वहिवाट करीत असतां त्याच्या हालचाली काय चालल्या आहेत याचेकडे इतर हिस्सेदारांनीं नीट लक्ष पुरविलें पाहिजे; नाहींतर मुदतीचे कायद्यानें त्यांस कांहीं तरी खोट लागण्यासारखें कृत्य करून ठेवलें जाण्याचा बराच संभव आहे.

---

* "Nothing has happend between 1870 & 1912 to put the plaintiffs on notice that their right was denied by the defendants beyond this fact that they did not take the trouble when their year came round to sign the kabulayat to manage the taxim. Whether you consider the members of his family as tenants-in-common or not, there should have been some direct action on the part of the defendants to put the plaintiffs on notice that they were no longer willing to act up to the agreement of 1870. That appears to be the simple answer to the argument of the appellants. There was nothing to show that Yadnyeshwar's branch all these years, if the other branches had chosen to ask for their year of management, would have refused it, and unless there was some action of that kind on the part of Yadnyeshwar's branch, there was nothing which would make time begin to run in his favour against the other branches."

(१७) खोत हिसेदारांस धारा जमिनी वेगवेगळ्या धारण करण्यास हरकत नाहीं—

" खोती गांव समाईक असतां त्यांत असलेल्या खोतांच्या धारा जमिनी निरनिराळ्या धारण करण्यास खोत हिस्सेदारांस प्रत्यवाय नाहीं."* असें शेख महंमद वि. शेख इब्राहिम-दु. अ. नं. ५८५-सन १९११ नि. ता. १९।१२।१९१२ या ठरावांत न्या. मॅक्लिऑड आणि क्रंप यांनीं ठरविलें आहे.

(१८) स्वामित्व चिठी आणि वहिवाटदार खोतः—

वहिवाटदार खोत आणि हिस्सेदार या दोन अवस्था अगदीं भिन्न आहेत. हिस्सेदार या नात्यानें आपसांत अगर तिसऱ्याशीं उत्पन्न झालेले संबंध वहिवाटदार खोत या अवस्थेचा फायदा घेऊन नष्ट करितां येत नाहींत. बालाजी वि. रामचंद्र ४ मुं. लॉ. रि. १७२-या ठरावांत एका हिस्सेदाराचा हिस्सा पांच वर्षांकरितां एकानें स्वामित्वानें घेतला. त्यांत स्वामित्व चिठीची मुदत भरली तथापिही कबजा त्याचेकडेच राहिला. तेव्हां ३।४ वर्षांनीं मालकानें दावा करून स्वामित्वाची रकम वसूल केली. तरीसुद्धां कबजा तसाच त्याचेकडे चालू राहिला. पुढें स्वामित्वानें घेणारा इसम स्वतः वहिवाटदार खोत झाला. मूळ मालकानें पुन्हां स्वामित्वाची रकम मागण्याचा दावा केला, तेव्हां 'स्वामित्वपत्राची मुदत संपून गेली असल्यानें त्या आधारें आपलेकडे कबजा चालत नाहीं, वहिवाटदार खोत म्हणून कबजा चालतो, खोतफायदा देण्यासच मी जबाबदार आहें.' अशी त्यानें तक्रार केली. त्यावर ना. हायकोर्टानें असें ठरविलें कीं स्वामित्व चिठीची मुदत संपल्यानंतर स्वामित्व प्रतिवादीकडून वसूल करून घेतलें असल्यानें प्रतिवादीकडे जो कबजा राहिला तो स्वामित्वचिठीच्या आधारेंच असून त्या दाव्यानंतर स्वामित्वचिठी नष्ट करण्यासारखें कांहीं कृत्य केलें असें प्रतिवादी न दाखवील तर त्यास स्वामित्वाची रकम द्यावी लागेल. न्या. चंदावरकर यांनीं आपले ठरावांत असें म्हटलें आहे कीं, " प्रतिवादीतर्फे तक्रार अशी कीं, वास्तविक स्वामित्वचिठीप्रमाणें कबजा आपलेकडे ठेवण्याबद्दल आपण संमति दिलेली नसून आपणांकडे वहिवाटदार या नात्यानेंच कबजा चालत आहे, व त्यामुळें वादीच्या हिशाचा प्रतिवादींचा कूळहक्क वहिवाटदार खोत या नात्याच्या कबजांत मिसळून (merged) गेला, अगर नष्ट (extinguished) झाला. परंतु कबूल असलेल्या कित्येक गोष्टींवरून असें अनुमान काढितां येत नाहीं. दरम्यानच्या खंडाच्या दाव्यानें प्रतिवादी सालोसालचें कूळ आहे असें ठरलें असून त्याप्रमाणें स्वामित्व देण्याची जबाबदारी, कूळहक्क नष्ट करण्याकरितां नोटीस दिली असें प्रतिवादीस दाखवितां न येईल तर, त्याचेवर आहे."

* "There is nothing illegal in the sharers in khoti village agreeing to hold certain Dhara lands in severalty."

या ठरावावरून पूर्वी अस्तित्वांत असलेले हक्कसंबंध केवळ वहिवाटदार खोत झाल्यानें त्यांत मिसळून ( merge ) जात नाहींत अगर नष्ट (extinguished) होत नाहींत.

वहिबाटदार खोतानें कामें व अधिकार सोंपवून देणें.

**कलम ३१ अ.–कलम १५ यांत अगर कलम ३१ यांत वहिवाटदार खोताकडे सोंपविलेलीं सर्व कामें व त्यास दिलेले सर्व अधिकार करण्याचा व चालविण्याचा अखत्यार त्यानें कलेक्टराच्या पसंतीस पात्र राहून, या बाबतींत त्यानें योग्य रीतीनें लेखी अधिकार दिलेल्या कोणत्याही मनुष्याकडे सोंपवून देणें कायदेशीर होईल, आणि याप्रमाणें नेमिलेला मनुष्य १५ व्या कलमांत सांगितलेलीं कामें करण्याच्या संबधानें, सदहु कलमाअन्वयें ज्या जबाबदाऱ्यांस सदहु खोत पात्र असेल, त्या सर्व जबाबदाऱ्यांस पात्र राहील.**

( हें कलम सन १९०४ चा मुं. आक्ट ३ कलम ८ वरून नवीन दाखल केलें आहे. )

टिपा.

(१) उद्देश—

हें कलम १९०४ च्या आक्टानें नवीन दाखल करण्यांत आलें आहे. एकाद्या वहिवाटदार खोतास स्वतःला वहिवाट करणें अशक्य असेल तर ती पूर्वीच्या कायद्याप्रमाणें दुसऱ्या कोणाकडेही सोंपवितां येत नव्हती. परंतु ती अडचण या नवीन कलमानें काढून टाकिली असून कायदेशीर लेखी मुखत्यारपत्रानें वहिवाट करण्याचा अधिकार दुसऱ्यास देतां येतो. नुसतें मुखत्यारपत्र देऊन चालणार नाहीं. असा मुखत्यार कलेक्टराच्या पसंतीस पात्र असला पाहिजे.

(२) कायदेशीर मुखत्यारपत्र कसें करावें—

स्टांप आक्ट, सन १८९९ चा हिं. आक्ट २, आर्टिकल ४८ (ड) प्रमाणें मुखत्यारास वसूल गोळा करणें, कुळावर दावे करावे लागल्यास करणें, मूळ मालकाविरुद्ध कोणीं कांहीं केल्यास त्यास तोंड देणें, जमा बारणें, वगैरे पुष्कळ प्रकारचीं कामें करण्याचा हक्क देणें असल्यास १० रुपयांच्या जनरल स्टांपावर योग्य प्रकारें

मुखत्यारास दिलेल्या सर्व अधिकारांची नोंद करून लेख तयार करून, नंतर तो माजिस्ट्रेटासमोर पुरा करावा लागतो. पुरा करणें ह्मणजे एक रुपयाचा कोर्ट फी स्टांप लावून मुखत्यार नेमल्याचें कबूल करून माजिस्ट्रेटासमोर सही करावी लागते. त्यानंतर त्या माजिस्ट्रेटचा आपल्या समोर मुखत्यारपत्र पुरें केल्याबद्दल शेरा व शिक्का होतो.

(३) कलेक्टराच्या पसंतीस पात्र राहून—

मुखत्यार नेमल्यानंतर कलेक्टराला कळवून त्याची आगाऊ परवानगी घेतली पाहिजे असें नाहीं. मात्र मुखत्यार पसंत न झाल्यास त्याला वहिवाट करूं न देण्याची सत्ता कलेक्टरकडे ठेवण्यांत आली आहे. याबद्दल कौन्सिलमध्यें ठराव आला त्यावेळीं चर्चा झाली असून, ठराव मांडणारे ना. सर जेम्स मॉंटिथ यांनीं "कलेक्टरच्या पसंतीस पात्र राहून" ( Subject to the approval of the collector ) याचा अर्थ आणि "कलेक्टर विरुद्ध हुकूम करीपर्यंत" ( unless the collector orders otherwise ) याचा अर्थ एकच आहे असें ह्मटलें आहे. (सन १९०३ चे बिल नं. ६ वेळीं झालेलें भाषण).

(४) मुखत्याराची जबाबदारी—

वहिवाटदार खोताच्या सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या कायदेशीर नेमिलेल्या मुखत्यारावर पडतात. वसूल गोळा करणें, जमा वारणें, हिशोबाचे कागदपत्र ठेवणें, १५ कलमाप्रमाणें सर्व जबाबदाऱ्या पार पाडणें, या सर्व गोष्टी त्यासच कराव्या लागतात. हिस्सेदार वहिवाटदार खोत जितका स्वतः दंडास पात्र होईल तितकाच मुखत्यारही कागद नीट न ठेवल्यास, वेळीं हजर न केल्यास पावत्या वगैरे न दिल्यास, दंडास पात्र होईल. वहिवाटदार खोतानें मुखत्यार नेमिल्यानंतर दंड वगैरेस तोच पात्र आहे. वहिवाटार खोतास जबाबदार धरतां येणार नाहीं. सर्वांशीं मुखत्यारच जबाबदार आहे.

## विभक्त झालेले भागिदार.

**कलम ३२—खोतांनीं आपल्या खोतकीचे विभाग केले असतील किंवा त्याचे विभाग दिवाणी कोर्टाकडून किंवा दुसऱ्या रीतीनें झाले असतील, आणि सहभागिदारांनीं आपआपले निरनिराळे हिसे निरनिराळे धारण केले असतील तर, प्रत्येक निरनिराळ्या हिशाबद्दल यावयाची जमेची रक्कम कलेक्टरानें ठरविली पाहिजे, आणि सदर्हू हिस्से धारण करणारे, त्यांचे निरनिराळ्या हिशावर सदर्हू प्रमाणें बसविलेल्या जमेच्या भागांबद्दल, पृथक पृथक पात्र आहेत**

विभक्त झालेले भागिदार हे आपल्या निरनिराळ्या विभागाबद्दल निरनिराळे जबाबदार आहेत.

असें मानलें पाहिजे, आणि या आक्टाचे सर्व ठराव ते सगळे खोत-कीचे स्वतंत्र धारण करणारे असते तर जसे लागू होते त्याप्रमाणें त्यांस प्रत्येकीं लागू होतील.

## टिपा.

(१) उद्देश—

या कलमानें खोती गांवाचें वांटप झाल्यानंतर मग प्रत्येक तुटक धड्याच्या मालकावर त्याचे धड्याचे ज़मेची जबाबदारी पडते. इतर स्वतंत्र धडेवाले खोतां-वरील जर्थी मर्थी असणारी जबाबदारी नष्ट होते, असें कायद्यानें ठरविण्याकरितां हें कलम घातलें आहे. कलम ३ मध्यें गांवाची व्याख्या करितांनाही या कलमाकडे लक्ष देऊन गांवाचा भाग अगर हिस्सा असें स्पष्ट ह्मटलें आहे, व त्या खालीं योग्यतो विचार आह्मीं केलाच आहे. (क. ३ टी. ४ पाहा)

(२) खोतकीचें वांटप करण्याची रीत—

खोती गांवचे वांटप या कलमांत सांगितल्याप्रमाणें तीन प्रकारानें करतां येतें—

(१) खोतांनीं आपसांत समजुतीनें वांटप करावें.

(२) लँ. रे. कोड कलम ११४ प्रमाणें सर्वे मोजणी झालेल्या खोती गांवां-तील हिस्सेदारांत हिशाचा वाद नसेल व अशा हिस्सेदारांचे हिस्से निम्या सरकार दस्ताहून जास्त सरकार दस्त देणारे असतील तर कलेक्टर मार्फत अगर त्यानें नेमिलेल्या योग्य अधिकाऱ्यामार्फत वांटप करावें.

(३) कोर्टात वांटपाचा दावा घालून हिस्से व हक्काच्या बाबी ठरवून घेऊन त्याप्रमाणें कलेक्टर मार्फत वांटप करून घ्यावें.

वरील तीनहीप्रकारें वांटप होतांना गांवचे वांटप तक्ते कलेक्टर मार्फतच तयार व्हावे लागतात, कारण तुटक धडे पडणें व ते मंजुर करणें ही कलेक्टरच्या अधिकारांतील गोष्ट आहे. आपसांत समजुतीनें वांटप झालें तथापि तुटक धडे कलेक्टर मार्फतच पाडून घेतले पाहिजेत. नाहीं तर या कलमाप्रमाणें जमा देण्याची जबाबदारी पृथक् होणार नाहीं. कोर्ट मार्फत वांटपाचा दावा चालून झाला तथापि कोर्टाला प्रत्यक्ष वांटप करण्याचा मुळींच अधिकार नाहीं. दि. का. कलम ५४ प्रमाणें सर्वेदस्त देणाऱ्या गांवचे वांटप कलेक्टर कडूनच झालें पाहिजे असा नियम असल्यामुळें वांटपाचे निवाड्यानें कोणाचा किती हिस्सा हें नक्की ठरवितां येईल; परंतु प्रत्यक्ष वांटणी करून, वांटप तक्ते तयार करून तुटक धडे पाडणें,

प्रत्येक धक्याचा वेगळा सरकारदस्त करणें, वगैरे सर्व कामें कलेक्टरनेंच केलीं पाहिजेत. त्यांत हात घालणें त्याचे वरिष्ठांशिवाय इतरांस शक्य नाहीं. वांटप केल्या-नंतर ताबा देण्याचाही अधिकार कलेक्टरासच आहे. भीमनगौडा वि. हणमंत ४२ मुं. ६८९ या ठरावांत न्या. बॉमन यांनीं वांटपाचे कामांत कलेक्टर वरिष्ठ अधिकारी व दिवाणी कोर्टें कनिष्ठ अधिकारी असें स्पष्ट ठरविलें आहे. कलेक्टरनें वांटप करणें तें मात्र निवाड्याप्रमाणेंच केलें पाहिजे. निवाड्याचे विरुद्ध कलेक्टर गेल्यास, त्यास केलेलें वांटप सुधारण्यास सांगण्याचा दिवाणी कोर्टास अधिकार आहे, पुरुषोत्तम वि. बाळकृष्ण २८ मुं. २३८=५ मुं. लॉ. रि. ९५०; गणोजी वि. धोंडू १४ मुं. ४५०.

## (३) वांटपाचे दाव्यांत पुराव्याचा बोजा —

खोती गांवांत नेहमीं जरी गांव समाईक असला तरी खासगी जमिनीचा निर-निराळा भोगवटा असतो. इतकेंच नव्हे, तर खोती फायदा सुद्धां वांटून घेण्यांत येत असतो. वांटपाचा दावा आणतांना गांव समाईक म्हणूनच दावा आणला जातो. अशा वेळीं गांव समाईक अगर विभक्त हें दाखविण्याची जबाबदारी कोणावर, असा नेहमीं प्रश्न असतो. याचें समर्पक उत्तर खोती गांवांतील परिस्थितीचा विचार करू-नच बाबाशेट वि. जिरशेट ५ मुं. हा. रि. ७१ या ठरावांत देण्यांत आलें आहे. या ठरावांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, "वांटप झालें आहे असें शाबीत करण्या-चा पुराव्याचा बोजा प्रतिवादीवर असून खोती एकच कुटुंबाची समाईक असून जमीन आणि कुळें वांटलेलीं आहेत. एवढ्यावरून, दक्षिण कोकणांत ही नेहमींचीच पद्धत असल्यामुळें रीतसर वांटप झालें आहे असें होत नाहीं." हा ठराव अद्यापपर्यंत योग्य असा गणला गेला असल्यामुळें त्यांत नमूद केल्याप्रमाणेंच वांटपाचे दाव्यांत पूर्वीं वांटप झालें होतें हें शाबीद करण्याची जबाबदारी प्रतिवादीवर आहे.

## (४) खोती गांवांतील दाव्यांतील कोर्ट फी करितां मुकदम्याची आकारणी—

एक्सपार्टी विठ्ठल वि. गोपाळ गणेश बिवलकर ४ मुं. हा. को. रि. १४८ या ठरावांत, खोती इस्टेटीच्या मुकदम्यांस कोर्ट फीकरितां कशी आकारणी करावी हें सांगितलें असून खोती इस्टेट सरकारदस्त देणारी असल्यामुळें त्या संबंधा-च्या दाव्यास सरकारदस्ताच्या कोर्ट फी आक्टानें ठरलेल्या पटीवर कोर्टफी दिली पाहिजे असें ठरलें आहे. चालू परिस्थितींत दस्ताची साडेसातपट करून जी रक्कम होईल त्यावर १०० रुपयांपर्यंत दर पांच रुपयांस सहा आणे व १०० रुपयांचे वर दर १० रुपयांस १२ आणेप्रमाणें कोर्टफी स्टांप लावावा लागतो.

हक्कवाल्या खातेदारांचीं थळें.

हक्कवाले खातेदारांनीं द्यावयाचे थळाचा प्रकार आणि रक्कम.

कलम ३३–हक्कवाल्या खातेदारांनीं खोतास द्यावयाचें थळ खालीं लिहिल्याप्रमाणें आहे (ह्मणजे):–

(अ) धारेकऱ्यानें: आपले जमिनीचा सर्वेचा आकार;

(ब) कच्च्या धारेकऱ्यानें: आपले जमिनीचा सर्वेचा आकार आणि त्याशिवाय आणखी या आक्टास जोडलेल्या परिशिष्टांत धान्याचें किंवा पैशाचें मान लिहिलें आहे तितकें धान्य किंवा पैसा, जसें असेल तसें;

(क) कोणत्याही " निरंतरचे कुळानें " प्रत्येक बाबतींत, सर्वेच्या कागदपत्रांत त्या बाबतसंबंधानें केलेल्या नोंदीच्या, व त्या त्या कामीं त्या बाबतीस लागू असलेल्या, शर्तीस अनुसरून, खालील कानू प्रमाणें:–

( " क " ही रक्कम सन १९०४ चा मुं. आक्ट ३ कलम ९ वरून नवीन दाखल केली आहे. कानुवार टीपा पुढें दिल्या आहेत )

जुनें कलम ( क रक्कम )

(क) खातेदार कुळानें:–जी ठरलेली रक्कम द्यावयाची कबूल केली असेल ती नक्त असो किंवा ऐनजिनसी असो, अथवा सर्वेचे कागदपत्र तयार करतेवेळीं, किंवा त्यापुढें कोणत्याही वेळीं खोत आणि सदहू कूळ यांच्या दरम्यान कबुलायत झाली असेल ती रकम;

अथवा ज्या मुदतीचा सदहू प्रकारचा करार केला असेल, किंवा करण्यांत येईल, ती मुदत संपल्यानंतर, अथवा सदहु प्रकारचा करार केला नसेल, किंवा करण्यांत येईल तर, सदहू कुळाच्या जमिनीचे वार्षिक कच्चे उत्पन्नाचा जो ठरलेला हिसा, ह्मणजे भाताचे जमिनीबद्दल अर्ध्यापेक्षां जास्त नाहीं, किंवा वर्कस जमिनीबद्दल एक तृतीयांशापेक्षां जास्त नाहीं, आणि सदहु कुळाच्या

जमिनींत फळझाडें असल्यास त्याचे उत्पन्नाचा जो हिस्सा, ज्या गांवांत ती जमीन असेल त्या गावांत खातेदार कुळांनी आजपर्यंत देण्याची चाल आहे असें सर्वेचे कागदपत्र तयार करणारा सर्वेचा अंमलदार ठरवील तो ठरविलेला हिस्सा.

## टिपा.

(१) उद्देश—

कलम ३३, खोत आणि हक्कवाले खातेदार यांचे दरम्यान जो नेहमींचा वादाचा थलीचा प्रश्न त्याचें निराकरण करणारा असल्यामुळें फारच महत्वाचा आहे. खोती से. आक्ट अंमलांत येण्या पूर्वींपासून खोत व कुळें यांचे संबंध कायमचे ठरवावे, असे अधिकाऱ्यांचे प्रयत्न चालूच होते. त्यास अनुसरून १८६५ चा मुं. आक्ट १ कलम ३८ प्रमाणें कुळानें खोतास काय द्यावें याबद्दल ठराव करण्याचा अधिकार सर्वे कामगारास देण्यांत आला. परंतु त्याविरुद्ध पुष्कळ ओरड झाली व त्यामुळें खोती सेटलमेंट आक्ट निराळा करण्यांत आला, आणि त्यांत खोत आणि कुळें यांचे मधील थलींच्या संबंधाचा या कलमानें ठराव करण्यांत आला. १८६५ चे आक्टाचें धोरण १८८० च्या आक्टांत कमी कडक करण्यांत आलें व तेंच अद्याप चालू आहे.

(२) या कलमाबाबत जुन्या कायद्याचें निरीक्षण—

कलम ३३ मध्यें ज्या गोष्टी सांगितल्या आहेत व ज्यांस आज कायद्याचें स्वरूप आणलेलें आहे त्या गोष्टींत कसकशा सुधारणा होत गेल्या आहेत हें कळणें जरूर आहे. ह्मणजे कुळांच्या हिताच्या दृष्टीनें खोतांचे थल घेण्याचे हक्कास कसकसा आळा घालण्यांत आला आहे हें उघड होईल. सन १८२७ मध्यें प्रथम सरकारानें मुं. रेग्यूलेशन १७ पास करून जमिनीचा सारा वसूल करण्यास सुरवात केली. त्यावेळीं एकंदर गांवची जमा काय एवढेंच ठरविलें जात असे, व त्यामुळें गांवच्या वरिष्ठ धारण करणाऱ्या खोतांशींच मुख्यतः सरकारचा संबंध येत असे. खोत आणि कुळें यांचे संबंध पूर्वापारच्या रीतीस अनुसरूनच होते. ही परिस्थिति सन १८६५ चा मुं. आक्ट १ अमलांत येईपर्यंत चालू राहिली. त्या मधल्या काळांत मोजणी, सर्वे, करण्यासंबंधें निरनिराळ्या चळवळी झाल्या. त्यावेळीं खोत आणि कुळें यांचेमधील हें भांडणाचें बीज उघडकीस आलें; व १८६५ च्या सर्वे सेटलमेंट आक्ट १ मधील कलम ३८ मध्यें सर्वे आफिसरास कुळांनीं खोतास काय द्यावें हें कायम करण्याबद्दल पूर्ण मुभा देण्यांत आली, व त्याचे ठरावाप्रमाणेंच कुळांनीं खोतास द्यावें असा निर्बंध घालण्यांत आला. इतकेंच नव्हे तर कुळाच्या कायदेशीर हक्काचा

विचार न करितांही त्यांस त्यांच्या त्यावेळीं वहिवाटीस असलेल्या सर्व जमिनीबद्दल सर्वेनंबरवार नोंद करून कागदही देण्यांत आले. या कागदांचा आपली वहिवाट शाबीत करण्याकडे पुष्कळ दुरुपयोग करण्यांत येऊं लागला, व खोतांचें नुकसान होऊं लागलें. त्यामुळें खोतांनीं पुष्कळ ओरड केली. सरकाराविरुद्ध व कुळांविरुद्ध शेंकडों दावे झाले. अशी पुष्कळ धडपड केली तेव्हां, सन १८८० चा आक्ट १ खोती से. आक्ट, पास करण्यांत आला व त्यांत थलीचें प्रमाण ठरविण्याकरितां कलम ३३ घालण्यांत आलें. कलम ३३ यांत धारेकरी, कच्चेधारेकरी यांनीं काय द्यावें तें नक्की ठरविण्यांत येऊन खातेदार कुळानें कबुलायतानें ठरलेला खंड, किंवा भात व वर्कस जमिनीचे पिकाचा हिसा—अनुक्रमें अर्धेलपेक्षां जास्त नाहीं असा, गांवांतील चालीस अनुसरून रास्त असेल तो, देण्याबद्दल बोटखतास नोंद करावी असें ठरलें. या कलमासंबंधें लिहितांना, **हरी वि. बाळाजी दु. अ. नंबर १८१ सन १८९४ नि. ता. १८।११।१८९५** या टरावांत न्या. फॅरन आणि पार्सन्स यानीं असें म्हटलें आहे कीं " १८८० च्या आक्ट १ मध्यें कलम ३३ मधील अटी अगदीं परिपूर्ण आहेत. "* या कलम ३३ प्रमाणें खोत व कुळें यांचेमधील संबंध कोणा-सही फार जाचक नाहींत अशा तऱ्हेचे होते. १८८० च्या ३३ कलमांत " मोबदला —किंमत " ठरवून देण्याची मुभा नव्हती. परंतु कलम १३ प्रमाणें मदत दाव्याचे वेळीं कलेक्टरास थलीची किंमत ठरवून ती घेण्याबद्दल खोतास हुकूम करण्याची मोकळीक होती. १८८० च्या कलम ३३ प्रमाणें बोटखताचे शेऱ्याबाहेर खोत व कुळें यांस आपसांत करार करून थल ठरवितां येत असे व ते करार योग्य म्हणून गणले जात असत. इतकेंच नव्हे तर करार असतां नोंद अगदीं निरुपयोगी होत असे, **वामन वि. रामचंद्र दु. अ. नं. ५५७ सन १९०१ नि. ता. १६।६।१९०२; पर्शराम वि. गणेश दु. अ. २६ सन १९०२ नि. ता. २०।८।१९०२;** व कुळांना कराराप्रमाणें थळं द्यावी लागे. १९०४ च्या दुरुस्तीनें कलम ३३ मध्यें फार सुधारणा करण्यांत येऊन खोत आणि खातेदार अगर निरंतरचीं कुळें यांचे मधील संबंधाची अगदीं छाननी करून थल कायम कशी करावी हें ठरविण्यांत आलें, व १८६५ च्या आक्टाचें तत्व पुन्हां अंमलांत आणण्यांत आलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. नुसती अर्धेल, तिर्धेल ठरविली तरी अभावणी करण्यानें कुळांचें नुकसान करण्यांत येतें असें मानून त्यासही आळा घालण्याकरितां या कलमांतील कानु ५ प्रमाणें उपाययोजना करण्यांत आली आहे. कुळांचा अर्ज आल्यास सरकार दस्तांचे पटांत थलीची "मोबदला—किंमत" कायमची ठरवून द्यावी असाही आतां निर्बंध घालण्यांत आला आहे. इतकेंच नव्हे तर अशाप्रकारें केलेल्या थलीचे नोंदीविरुद्ध आपसांत करार करण्यासंबंधें कानु २ मध्यें विशेष निर्बंध घालण्यांत आला

* "The provisions of Sec. 33 Bombay Act I of 1880 are evidently exhaustive."

व योग्यरीतीनें कानु २ प्रमाणें करार नोंदलेले नसल्यास ते अग्राह्य असें ठरविण्यांत आलें. चाळशेट वि. हरी २७ मुं. लॉ. रि. १४८७ या ठरावांत १९०४ च्या आक्टांतील कलम ३३ च्या योजनबद्दल सर न्या. मॅक्लिऑड यांनीं असें ह्मटलें आहे कीं "खोती सेटलमेंट आक्ट कलम ३३ ची सर्व योजना, खोत आणि कुळें यांचे दरम्यान बोटखताच्या शर्तीविरुद्ध अनधिकृत करार होऊं देऊं नयेत अशाकरितां आहे"† यावरून सध्यांचें कलम ३३ चा विनियोग कसा आहे हें उघड होईलच. चालू कलम ३३ चा हेतू होतां होइल तों अभावणीची पद्धत काढून टाकून खोत आणि कुळें यांचा थलीच बाबतींतील संबंध पैशाचे रूपानें कायम करणें असा आहे आपरांतील करारांनीं या गोष्टीस बाध येऊं नये, याकरितां नक्त थलीबद्दलच करार पाहिजे व उभयतांच्या कबुलीनें रेकार्डिंग आफिसरापुढें नोंदला पाहिजे, वगैरे निर्बंध घालण्यांत आले आहेत.

### (३) धारेकऱ्यांनीं सरकार दस्त देणें व खोती खटपटी वेतन—

या आक्टाचा भाग ३ यामध्यें सांगितल्याप्रमाणें धारा ह्मणून जी जमीन ठरली असेल तिचेबद्दल धारेकऱ्यानें फक्त सरकारदस्त लोकलफंड द्यावा असें या कलमांत पोटभाग "अ" यांत सांगितलें आहे. या कलमांत जरी लोकलफंड द्यावा असें स्पष्ट सांगितलेलें नसलें तथापि कलम ३६ प्रमाणें धारेकरी आणि कच्चे धारेकरी यांनीं लोकलफंड दिलाच पाहिजे असा ठराव आहे. सध्यां धारेकरी गांवांपैकीं बरेचसे गांव खालसा झालेले असून सरकारी अधिकाऱ्यांमार्फत—तलाठी नेमून, वसूल करण्यांत येत असतो. अशा गांवांस खो. से. आक्ट लागूहि नाहीं. परंतु ज्या ठिकाणीं खोती अस्तित्वांत आहे अशा गांवांचे बाबतींतच या कलमाप्रमाणें खोताकडे वसूल दिला पाहिजे. रिव्हिजन सेटलमेंटप्रमाणें दस्त वाढ झाल्यास त्याप्रमाणें वाढलेला दस्त देणें भाग आहे.

धारेकऱ्यांकडून बसूल करण्याकरितां खोतांना जी खटपट पडते त्याचेबद्दल त्यांना एक खोती खटपटी वेतन पूर्वीं मिळत असे. हें वेतन इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतरहि बरींच वर्षें चालू होतें. सन १८७२ च्या सुमारास क० फ्रान्सिसनें धान्याची जी एकंदर जमा होईल त्यामानानें हें वेतन द्यावें असें ठरविलें होतें; परंतु १८८० चा आक्ट १ अंमलांत आल्यानंतर पुन्हां पूर्वींप्रमाणेंच वेतन देण्यास सुरुवात झाली. अशा तऱ्हेचीं वेतनें सरकारला देण्याचें यापुढें कारण नाहीं असें

† "It seems to me that the whole scheme of the Khoti Settlement Act is to prevent arrangements being made in an unauthorised way by the khots with the tenants contrary to the terms of the Bhotkhat."

बाद्ध लागल्यामुळें सरकारनें दसपट वेतन घेऊन हा हक्क तरी सोडावा, नाहींतर केवळ जिवंत असेपर्यंत हें वेतन मिळेल असें १९०६ चे सुमारें जाहीर केलें. त्याप्रमाणें पुष्कळ खोतांनीं दसपट रकमा घेऊन आपला धारेकऱ्यांवरील हक्क सोडून दिला. असे गांव सरकारनें खालसा करून स्वतःचे अधिकाऱ्यांमार्फत लँ. रे. कोड प्रमाणें वसूल गोळा करण्यास सुरवात केली. धारेकऱ्यांकडील सरकारदस्त लोकलफंडाची रक्कम बसूल करण्याकरितां मदतदावे करण्याचा खोतास अधिकार आहे.

(४) कच्चे धारेकऱ्यांनीं काय द्यावें—

कलम ३३ (ब) प्रमाणें कच्चे धारेकऱ्यांनीं सरकारदस्त लोकलफंड व आणखी तो ज्या प्रकारचा कच्चा धारेकरी असले त्याप्रमाणें परिशिष्टांत सांगितल्याप्रमाणें मानानें त्यास जास्त रक्कम अगर थल द्यावी लागते. कच्चे धारेकरी चारप्रकारचें असतात, दसपटकरी, दुप्पटकरी, दीडपटकरी, पावणेदुप्पटकरी. ( यांनीं काय द्यावें याबद्दल परिशिष्ट पहा.) परिशिष्टांत सांगितल्याप्रमाणें कच्च्या धारेकऱ्यांनीं थल देऊन शिवाय लोकलफंड कलम ३६ प्रमाणें दिला पाहिजे. थल वेळीं न दिल्यास मदत दावा करण्याचीहि खोतास पूर्ण मुभा आहे.

(५) खातेदार अगर "निरंतरचीं कुळें" व या कलमांतील सुधारणा—

कलम ३३ मध्यें महत्वाची सुधारणा १९०४ च्या कलमाप्रमाणें झालेली आहे. ती सुधारणा काय हें पक्कें ध्यानांत येणें जरूर आहे. (१) पहिला महत्वाचा फरक ह्मणजे १९०४ च्या पूर्वींच्या कायद्यानें खोत आणि कुळें यांचे दरम्यान झालेल्या अगर होणाऱ्या करारांच्या आधारें खातेदारांकडून खंड घ्यावयाचा असे, व अशा करारांपुढें नोंदीचें कांहीं महत्व नसे. परंतु १९०४ च्या कलमानें या नोंदी महत्वाच्या केल्या असून खातेदारांनीं खंड देणें तो नोंदी प्रमाणें दिला पाहिजे. करार झाले असल्यास त्यास त्याप्रमाणें रिकार्डिंग कामगारापुढें याच कलमांत कानु २ ब प्रमाणें उभयपक्षीं हजर होऊन संमति दिली पाहिजे, व रिकार्डिंग कामगारानें त्याप्रमाणें नोंद बदलली पाहिजे. अशी नोंद बदलली गेली तरच त्याप्रमाणें दिवाणी कोर्टानें चालावयाचें नाहींतर खोटखताला जी नोंद आहे त्याप्रमाणेंच चाललें पाहिजे, बाळशेट वि. हरी २७ मुं. लॉ. रि. १४८७.

(२) दुसरी महत्वाची सुधारणा ह्मणजे जुन्या कलमाच्या ऐवजीं पांच कानु घातले असून कुळांचें खोताला देणें नक्की करण्याकडे विशेष लक्ष दिलेलें आहे. पूर्वींच्या कायद्यानें खोतीची जुनी चाल, गांवशिरस्ता, आपसांतील करार व आपसांत ठरलेले नक्त खंड यांसच कायद्याचें स्वरूप देऊन चालू ठेविलें होतें, परंतु १९०४ च्या दुरुस्तीनें कुळानें खोतांचें देणें काय तें कायम करण्याकडे, खोताचे अभावणीनें कुळांस त्रास पोंचूं नये अशी व्यवस्था व्हावी या दृष्टीनें, सर्व कानुंची

रचना केली आहे. पहिल्या कानूंत " विवाक्षित ऐवजाच्या रूपानें " व पिकाच्या हिशाचे रूपानें थळ काय द्यावी तें ठरवावयाचें आहे. दुसऱ्या कानूंत आपसांतील सर्वे लागू केल्यानंतरच्या अगर पूर्वीच्या कबुलायती उभय पक्षकारांच्या कबुलीनें नोंदावयाच्या परंतु "ठरलेले ऐवजच" फक्त नोंदावयाचे, "पिकाचा हिस्सा" नोंदावयाचा नाहीं असें ठरविलें असून, पक्षकार यांत वहिवाटदार खोत येतो असें ठरविलें आहे. तिसऱ्यां कानूंत करार, कबुलायती वगैरे कांहीं नसून गांव शिरस्त्याप्रमाणें उत्पन्न घेण्याची चाल असतां काय करावें हें नक्की करण्याचा रीत सांगितली आहे. ज्यां ठिकाणीं पिकाचा ठराविक हिस्सा घेण्याची पद्धत आहे तेथें अधिक अगर तिथेंल यापेक्षां जास्त नाहीं असा हिस्सा नोंदला पाहिजे. नाहींतर बारा वर्षे कुळानें जें कांहीं दिलें असेल त्यांची सरासरी काढून त्या सरासरीची नोंद अगर त्याची किंमत नोंदली पाहिजे. कानु चार प्रमाणें सर्वेचें वेळीं नोंद झालेली नसल्यास अगरे अन्य कारणानें झालेली नोंद सुधारणें भाग झाल्यास, ती नोंद सुधारण्याबद्दल सांगितलें आहे. कानु ५ प्रमाणें कुळाला " मोबदला-किंमत " ह्मणजे सरकारदस्ताचे पटींत थळ ठरवून केव्हां व कशी द्यावी याचा खुलासा केलेला आहे.

अशा रीतीनें १८८० च्या आक्टांत १८६५ च्या आक्टांतील धोरण नव्हतें तें पुन्हां १९०४ च्या दुरुस्तीनें अंमलांत आणण्याचा प्रयत्न सविस्तर कानू घालून करण्यांत आला आहे.

### (६) थळीची नोंद निरुत्तर असून त्याप्रमाणेंच थळ दिली पाहिजे—

या मुद्याचा उहापोह कलम १७ मध्यें केलाच आहे. त्यांत कलम ३३ यांतील कानूंस अनुसरून नोंदीमध्यें फेरबदल होईपर्यंत ती नोंद धरूनच कोर्टानें त्याप्रमाणें उत्पन्न देवविलें पाहिजे. बापुजीराव वि. गानु २ मुं. लॉ. रि. ३७६ या ठरावांत न्या. पार्सन्स यांनीं असें ठरविलें कीं, " कलम ३३ खालीं सर्वे कामगार नवीन ठराव करीपर्यंत दिवाणी कोर्टानें कायदेशीर रीतीनें ठरलेल्या जुन्या दराप्रमाणेंच थळ देवविली पाहिजे.*" यावरून व कलम १७ खालीं विवेचन केल्याप्रमाणें थळीची नोंद निरुत्तर असल्यामुळें नोंद असेल त्याप्रमाणेंच थळ देवविली पाहिजे. या ठिकाणीं नोंद व निकाल या मधील फरक नीट ध्यानांत टेवावा. (कलम १७ टी. ८)

### (७) कलम ३३ गतकालसापेक्ष नाहीं—

कलम ३३ हें इतर कलम ९।१० वगैरेप्रमाणें गतकालसापेक्ष (retrospective)

---

* " Untill a new determination has been made by the Survey Officer under the Sec. 33 of the rent payable to the khot, a civil court must award rent at the old rates legally fixed."

नाहीं. १९०४ च्या पूर्वी खोत आणि कुळें यांच्या दरम्यान झालेल्या कबुलायती नोंदाव्या लागत नसल्यानें त्यास १९०४ च्या कायद्यानें कोणत्याही प्रकारें बाध येणें शक्य नाहीं. त्या योग्य असें समजून त्या कराराप्रमाणेंच चाललें पाहिजे. कोणताही कायदा गतकालसापेक्ष केव्हां होतो हें विषयप्रवेश टी. ४ (पान ४) येथें पहा.

## (८) रिकार्डिंग कामगाराचा ठराव व अपील.—

कलम ३३ खालीं ठरविलेल्या थलीचे अगर मोबदला किंमतीचे ठरावाविरुद्ध कलम २० (२) मध्यें सांगितल्याप्रमाणें गव्हर्नर-इन्-कौन्सिल शिवाय रिकार्डिंग कामगाराचा ठराव फिरविण्याचा अगर अपील घेण्याचा कोणासही अधिकार नाहीं. रिकार्डिंग कामगार कोणास म्हणावें हें कलम ३ (११) मध्यें सांगितलें असून लँ. रे. कोड कलम १०८ किंवा या आक्टाचा तिसरा भाग याप्रमाणें नोंदी करण्याचा ज्याला योग्य रीतीनें अधिकार दिलेला आहे असा अधिकारी पाहिजे. तसा नसून कलेक्टरच्या हाताखालील अधिकाऱ्यांस कलम १० प्रमाणें केवळ अधिकार दिलेला असेल तर असा अधिकारी—असिस्टंट कलेक्टर अगर डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर, यांचे निकालाविरुद्ध, त्यांस योग्य अधिकार दिलेला नसल्यानें कलेक्टरकडे अपील करण्यास हरकत नाहीं. ( या बाबतींत चिपळूण तालुक्यांतील कोळकवाडीच्या लोकांनीं १९०९ मध्यें सरकारकडे असिस्टंट कलेक्टरच्या निकालाविरुद्ध कलेक्टरला अपील घेण्याचा अधिकार नाहीं अशाबद्दल अर्ज केला होता. त्या कामीं अखेर असिस्टंट कलेक्टर रिकार्डिंग कामगार नसल्यामुळें कलेक्टरला अपील घेण्याचा अधिकार आहे असा सरकारी ठराव झाला.)

## (९) कलम ३३, कलम ४० अ ८, व कोर्टाचा अधिकार—

खंड देवविण्याचे बाबतींत पुष्कळ वेळां कोर्टासमोर प्रश्न येतो व कुळाकडून काय खंड देववावा याचा विचार पडतो. कलम ३३ (क) प्रमाणें खातेदार कुळानें नक्त खंड द्यावा असा ठराव असेल त्यावेळीं हरकत नाहीं. परंतु उत्पन्नाचा ठराविक हिस्सा द्यावा असा ठराव असतां खोतानें योग्यप्रकारें अभावणी न केल्यास मग कोणत्या प्रकारें उत्पन्न द्यावें ! कोर्टाला योग्य वाटेल तें देववावें अगर कलम ४० अ ८ प्रमाणें कूळ कबूल करील तेवढेंच उत्पन्न देववावें ? त्याचप्रमाणें कलम ४० अ ८ हा कानू कायद्याचे क्षेत्राबाहेरील आहे किंवा काय ? असे प्रश्न असून त्याचे समर्पक उत्तर विनायक वि. सिताराम १४ मुं. लॉ. रि. ११७३ या ठरावांत दिलेलें आहे. त्यांत कलम ४० अ खालील कानूनें कोर्टाचा योग्य थल काय आहे हें ठरविणेचा अधिकार काढून घेतला आहे, असें ठरविलें आहे. सर न्या. स्कॉट यांनीं आपलें ठरावांत " खातेदार कुळानें जी काय थल द्यावयाची ती कलम ३३ (क) नें ठरविलेली रक्कम होय. कलम ४० प्रमाणें वार्षिक उत्पन्न काय,

हें ठरवावयाचें आहे. कलम ४० चा कानु. ८ नें उत्पन्नाची अभावणी दोन प्रकारानें करतां येते. एक कानूंत सांगितल्याप्रमाणें अभावणी करावी, अगर त्याप्रमाणें अभावणी न केल्यास खोतास ऐन उत्पन्न काय द्यावें हें ठरविण्याचा दुसरा एक मार्ग आहे. तो ह्मणजे कुळानें स्वतः ठरविलेले उत्पन्न होय. या दृष्टीनें आह्मांस असें दिसतें कीं हा कानू कायद्याचे क्षेत्रांतील ( intra vires ) आहे." या ठरावावरून कोर्टानें अभावणी शाबीत झाल्यास अभावणीप्रमाणें तरी, नाहीं तर क. ४० अ ८ प्रमाणें कूळ कबूल करील तितकीच थल देवविली पाहिजे. स्वतःच्या न्याय विचारानें सुद्धां त्यास थल देववितां येणार नाहीं.

(१०) थलीचें मागणें आणि रेस्ज्युडिकेटा—

खातेदार कुळांविरुद्ध पुष्कळवेळां थलीचे मागणें करण्याकरितां दावे करावे लागतात व एका दाव्यांत जो निकाल झाला तो पुढील दाव्यांत रेस्ज्युकेटा होतो कीं काय असा प्रश्न उपस्थित होतो. थलीचे मागण्यांत नेहमीं झाडांचे थलीचा, अभावणी किती झाली, वगैरे पुष्कळ प्रश्न उपस्थित होतात. अशावेळीं थलीबद्दलचा एकदां झालेला ठराव रेस्ज्युडिकेटा होत नाहीं असा ठराव **विष्णु वि. रामलिंग ३ मुं. लॉ. रि.** ४५०=२४ मुं. २५ या ठरावांत करण्यांत आला आहे. या ठरावांत वोटखताला पोफळीबद्दल काय द्यावें याबद्दल निराळा शेरा नव्हता. असें असतां गांव शिरस्त्याप्रमाणें अभावणी करून खोतानें कुळाविरुद्ध पोफळीबद्दल १८९७।९८ सालाबद्दल थल मागितली. प्रतिवादी कूळ, बजावणी होऊनही, हजर झाला नाहीं. ह्मणून कोर्टानें वादीस पोफळीची थल, अभावणी शाबीद मानून, वसूल करण्याबद्दल एकतर्फी निवाडा दिला. नंतर पुन्हां १८९८।९९ सालाबद्दल वादीनेंच दावा आणला. त्यांत वादीतर्फेची मुख्य तक्रार अशी कीं, प्रतिवादी विरुद्ध गेले सालचा निवाडा असल्यामुळें प्रतिवादीस आतां कांहींएक तक्रार उपस्थित करितां येणार नाहीं; रेस्ज्युडिकेटाचे तत्वाचा बाध आहे. तो वाद ना. हायकोर्टपर्यंत जाऊन न्या. फुलटण यांनीं असा ठराव दिला कीं, " त्या दाव्यांतील निकालानें खो. से. आक्ट कलम ३३ प्रमाणें विरुद्ध तक्रार करण्यास हरकत येत नाहीं. पूर्वीच्या दाव्यांत पोफळीबद्दल थल अगर उत्पन्न गैरशिस्त देवविलें यावरून कायद्याचे ठरावास बाध येऊं शकत नाहीं आणि ह्मणून या परिस्थितींत रेस्ज्युडिकेटाचा प्रश्न उद्भवत नाहीं. करारावर मागणें अवलंबून आहे असें ह्मणणें नसून मागणें वहिवाटीवर अवलंबून आहे. अशा ठिकाणीं रिकार्डींग कामगार फळझाडांबद्दल उत्पन्नाचा अमुक एक अंश देणें आहे असा जो ठराव करील त्याप्रमाणेंच खंड घेणें भाग आहे." न्या. चंदावरकर यांनींही याप्रमाणेंच आपलें मत दिलें आहे. केवळ एका विशिष्ट गोष्टीबद्दल थलीचें मागणें करून निवाडा मिळविला एवढ्यानें तो पुढील दाव्यांत रेस्ज्युडिकेटा न होतां कलम ३३ प्रमाणें कायदेशीर तक्रार करण्यास कुळास पूर्ण मुभा आहे,

कलम ३३ कानु १.— अशा प्रत्येक नोंदींत, कोणतेंही थळ द्यावयाचें आहे किंवा कसें, व तें द्यावयाचें असल्यास, तें,

देण्याचा प्रकार नोंदींत लिहिणें

(अ) ठरींव ऐवजाच्या रूपानें : म्हणजे पिका-विचार न करितां नक्त किंवा ऐन जिनसी किंवा या दोन्ही प्रकारांनीं द्यावयाच्या विवक्षित ऐवजाच्या रूपानें द्यावयाचें, किंवा

(ब) पिकाच्या हिश्याचे रूपानें: म्हणजे, जमिनीच्या कच्च्या वार्षिक उत्पन्नाच्या व फळझाडें (असल्यास) त्यांच्या उत्पन्नाच्या ठरींव हिश्याच्या रूपानें द्यावयाचें तें लिहिलें पाहिजे.

## टीपा.

(१) उद्देश—

हा कानु सर्वसाधारण लागू असा आहे. कलम ३३ खालीं करावयाची नोंद कोणत्या स्वरूपाची असावी, त्यांत मुख्यत्वें करून कोणत्या गोष्टींचा उल्लेख केला पाहिजे, हें या कानूंत सांगितलें आहे. प्रत्येक वेळीं ज्या जमिनीबद्दल ठराव करावयाचा असेल त्या जमिनीबद्दल थल द्यावयाची आहे, अगर थल द्यावयाची नाहीं, याबद्दल निर्णय करून थल द्यावयाची असल्यास खालील गोष्टींपैकीं कोणत्या प्रकारानें थल द्यावयाची ह्या बद्दलचा ठराव करून लिहिलें पाहिजे.

(१) थल द्यावयाची आहे किंवा नाहीं.

(२) नक्त — ठराविक रुपये.

(३) ऐनजिन्नस — नक्की अमुक एक धान्य द्यावें असा ठराव.

(४) नक्त अमुक व ऐनजिन्नस अमुक असा जोड ठराव.

(५) पिकाचा ठराविक हिस्सा — भातशेतीबद्दल अर्धेलपेक्षां जास्त नाहीं व वर्कस शेतीबद्दल तिर्धेलपेक्षां जास्त नाहीं असा हिस्सा.

(६) फळझाडें, फणस, आंबे असल्यास त्याचे उत्पन्नाचा नक्की हिस्सा.

याप्रमाणें परिस्थितीच्या मानानें कोणती तरी नोंद केलीच पाहिजे. कांहीं तरी मोघम ठराव केल्यास तो बेकायदेशीर, अव्यवहार्य असाच गणला पाहिजे.

(२) "थळ द्यावयाचे आहे किंवा कसें"—

हा शब्दप्रयोग १९०४ च्या पूर्वीचे कलमांत नव्हता व त्यामुळें थळ देणें नाहीं असा ठराव करण्याचा रिकार्डिंग कामगाराला अधिकारच नव्हता. याप्रमाणें

१९०४ च्या पूर्वीच्या हायकोर्टाच्या ठरावांचेंही धोरण आहे. विठ्ठल वि. येसा २२ मुं. ९५ (१८९६) या ठरावांत न्या. पार्सन्स यांनीं असें ह्मटलें आहे कीं;— "यावरून खातेदार कुळानें ठराविक खंड अगर ठराविक हिसा यापैकीं कोण त्याना कोणत्यातरी प्रकारें थल दिलींच पाहिजे. हें अगर तें कांहींच देऊं नये असा ठराव सर्व अधिकाऱ्याच्या क्षेत्राबाहेरील आहे." त्याच ठरावांत न्या. क्यांडी यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "कलम ३३ अन्वयें खातेदार कुळानें आपल्या जमिनीबद्दल कांहीं तरी दिलेंच पाहिजे असे शब्द आहेत. ह्या शब्दांचा जर कांहीं अर्थ असेल तर तो, खातेदार कुळानें आपल्या जमिनीबद्दल कांहींतरी दिलेंच पाहिजे, असा असला पाहिजे." या ठरावाप्रमाणें खातेदार कुळानें कांहीं देऊं नये असा ठराव करण्याचा सर्व कामगारास अधिकारच नव्हता.

तथापि १९०४ च्या दुरुस्तीनें या कानूंत "थळ द्यावयाचें आहे किंवा कसें" याचा निर्णय करण्याची मुभा दिलेली असल्यामुळें खातेदार कुळानें थळ देऊं नये असें दिसल्यास तशी नोंद करण्याची मुभा ठेविलेली आहे. हेंच धोरण याच कलमांतील कानु ४ पो. २ व कलम १७ (अ) यांतील "कांहीं थळ द्याव-याचें असल्यास" या शब्दांवरूनही उघड होत आहे. ही १९०४ ची दुरुस्ती गतकालसापेक्ष नाहीं.

### (३) थलीबद्दल पुराव्याचा बोजा, व कायद्याचें अनुमान—

थल देण्यास आपण पात्र नाहीं असें ज्याचें ह्मणणें असेल त्यानेंच आपलें ह्मणणें शाबीद केलें पाहिजे. महंमद वि. महंमद ९ मुं. हा. रि. २७८ या ठरावांत या बाबतींत पुराव्याचा बोजा कोणावर पडतो याचा निर्णय केलेला असून, जमीन मोफत भोगावयाची आहे असें ज्याचें ह्मणणें असेल त्याचेवर पुराव्याचा बोजा पडतो, असें स्पष्ट नमूद केलें आहे. या ठरावामध्यें स्पे. अ. नंबर ४८५ सन १८६८ या ठरावानुसार असें ह्मटलें आहे कीं "खोती गांवांतील जमीन धारण करणाराविरुद्ध थलीकरितां ज्यावेळीं कबुलायतदार खोत फिर्याद करितो त्यावेळीं वादीवर ही जमीन खोती आहे असें शाबीद करण्याचा पुराव्याचा बोजा नसून खोती इस्टेटींतील जमीन धारण करणारांनीं आपणास खंड देणेचा नाहीं, असें शाबीद केलें पाहिजे." या ठरावावरून खोती जमीन थल देण्यास पात्र आहे असें अनुमान असून त्याचे विरुद्ध ज्याचें ह्मणणें असेल त्यानें तें शाबीद केलें पाहिजे. असें कुळानें शाबीद केल्यास १९०४ च्या दुरुस्तीप्रमाणें नोंद करण्यास हरकत नाहीं असें दिसतें.

### (४) थलीची नोंद ठरीव ऐवजाच्या अगर हिशाचे रूपानें असावी—

पूर्वीं ह्मणजे १८८० चा आक्ट अंमलांत येण्यापूर्वीं खोत व कुळें यांचे मधील थलीचे संबंधाचें नियंत्रण १८६५ चा आक्ट १ कलम ३८ प्रमाणें सर्व

ऑफिसर ठराव करतील त्याप्रमाणें करण्यांत येत असे; परंतु त्याबद्दल पुष्कळ ओरड झाल्यामुळें १८८० च्या आक्टांत हें कलम घालण्यांत आलें. १८६५ चे आक्टानें स्पेशल मक्ते, नक्तखंड, वगैरे थलीचे ठराव करून त्याप्रमाणें कुळांस पट्टी देण्यांत आले होते, परंतु हा आक्ट पास झाल्यानंतर ते रद्द पाडण्यांत आले. पूर्वीपासून कांहीं जमिनीबद्दल ठराविक मक्ता घालण्यांत येत असे व कांहीं जमिनीबद्दल अर्धेल, तिर्धेल अशा प्रकारें देण्याबद्दल गांवशिरस्ते असत. कांहीं जमिनी अगर कुळें यांच्याबद्दल ठराव नव्हता व खोतानें काय घ्यावें याची इयत्ता ठरलेली नव्हती. या कानूनें थलीची इयत्ता ठरवून टाकिली आहे. खोत आणि कूळ यांचे दरम्यान नक्त थल ठरली असल्यास हा "ठरीव ऐवज" नोंदलाच पाहिजे. पण तसा ठराव नसेल तर मात्र भात जमिनीचे बाबतींत अर्धेलपेक्षां जास्त नाहीं व वर्कस जमिनीचे बाबतींत तिर्धेलपेक्षां जास्त नाहीं अशा-रीतीनें पिकाचा कांहींतरी हिस्सा कायम केलाच पाहिजे अगदींच सर्व खोताच्या मर्जीवर सोंपविणें उपयोगी नाहीं, कारण **अंताजी वि. अंताजी २१ मुं. ४८०** यांत ह्मटल्याप्रमाणें हें एक भांडणाचें कारण होतें. १८९८ सालीं या आक्टांत दुरुस्ती करण्याकरितां एक बिल आणलें गेलें होतें. त्यांत पिकाचा हिस्सासुद्धां न ठर-वितां ठरीव नक्त ऐनजिन्नस अगर रुपये कुळानें खोतास द्यावे असा कायदा कर-ण्याबद्दल सूचना करण्यांत आली होती. परंतु त्यास जोराचा विरोध झाल्यामुळें तें बिल पास झालें नाहीं. त्यांतील थल कायम करण्याचे तत्व मात्र कायम ठेवण्यांत येऊन तें १९०४ च्या दुरुस्तीनें अंमलांत आणतां येईल अशी तजवीज कानू ५ घालून करण्यांत आली आहे, व त्याप्रमाणें रिकार्डिंग कामगारास "मोबदला–किंमत" ठरविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. कांहीं झालें तरी, ठरीव ऐवज, ठरीव हिस्सा अगर ठरीव मोबदला–किंमत, याप्रमाणें खोत आणि कुळें यांमधील थलीचे बाबतींतील संबंध ठरीव करण्यांत आला आहे.

**(५) फळझाडें व त्यांचेबद्दलची थळ—**

खातेदार कुळाचे जमिनींत आंबा, फणस, नारळ, पोफळी, कलमें वगैरे पुष्कळ प्रकारचीं उत्पन्न देणारीं फळझाडें असतात व त्या झाडांस खोती जमिनी-च्याच उपयोग होत असल्यामुळें त्याबद्दल खोतास थल मिळणें रास्त आहे. तथापि याबद्दलचाहि बोटखतास शेरा पाहिजे, मग तो नक्त थल अगर ठरीव हिस्सा असा असला तरी चालेल. अशा ठरावांत कोणकोणत्या प्रकारच्या झाडांबद्दल थल द्याव-याची त्याबद्दलचाही स्पष्ट उल्लेख केलेला पाहिजे. ज्या प्रकारच्या झाडांबद्दल उल्लेख नसेल त्याबद्दल कांहीं देऊं नये असें यावरून अगदीं स्पष्ट आहे. **हरि वि. बाळाजी** दु. अ. नं. १८१ सन १८९४ नि. ता. १८।११।१८९५ या ठरावांत सर न्या. फॅरन आणि पार्सन्स यांनीं असें ह्मटलें आहे कीं "कुळानें फळझाडांचे पिकाबद्दल

काय हिस्सा द्यावा हें ठरविणेचें काम सर्वे कामगाराचें आहे. खोताची मागणी सर्व प्रकारच्या फळझाडांबद्दल हिस्सा मिळावा अशी असलीच पाहिजे. फणस झाडांबद्दल पिकाचा हिस्सा मिळावा असाच फक्त ठराव आहे. ह्याचा परिणाम दुसऱ्या कोणत्याही प्रकारचे फळझाडांचे उत्पन्नांतील हिस्सा देवविला नाहीं असा होतो. कारण, नाहींतर तसा उल्लेख केलेला असता " * यावरून ज्या झाडांबद्दल उत्पन्नाचा हिस्सा द्यावा असा ठराव असेल त्या पुरताच थल मागणेचा खोतास हक्क आहे. जास्त हक्क नाहीं. वरील ठरावांत अशीही तक्रार होती कीं ठराव झाल्या नंतर कुळानें झाडें लाविल्यास कोर्टानें उत्पन्न देवविलें पाहिजे. परंतु त्या बाबतीं तही असा निकाल दिला कीं " आम्हांला कायद्यांत काय कमीपणा (defect) आहे तें बघण्याचें कारण नाहीं व दिवाणी कोर्टाला सेटलमेंट अधिकाऱ्याचे ठरावाबाहेर कांहीं देवविता येणेंही शक्य नाहीं. खोत आणि कुळें यांचे मधील ठराव खोत आणि सरकार अथवा सरकार आणि सर्वे खातेदार यांचे मधील संबंधाप्रमाणें कायम (enduring) कां राहूं नयेत याचें कारण आह्मांला कांहींच दिसत नाहीं." § हा ठराव असला तथापि नवीन फळ झाडांबद्दल थल ठरवून मिळावा ह्मणून रिकार्डिंग कामगाराकडे अर्ज करून त्याबद्दल थल ठरवून त्याप्रमाणें बोटखतांतील शेऱ्यांत कलम ३३ कानु ४ प्रमाणें दुरुस्ती करून घेण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

---

* "The provisions of Sec. 33 of Bombay Act I of 1880 are evideutly exhaustive. The khot can recover no more rent than that therein mentioned. By the Section the duty is devolved on that officer of determining what share, if any, of the produce of fruit trees shall be paid by the tenant. The claim of the khot would be for a share of the produce of all fruit trees. The determination is that he is to get a share of the produce of jack trees. This is in effect a determination that he is not to get a share of the produce of any other fruit trees, otherwise those trees would have been mentioned."

§ "As to the second part we think it clear that the Civil Court can only award what the Settlement Officer has determined to be payable. We may add that, as at present advised, we see no reason why a settlement between a khot and his occupaney tenant should not be as enduring as one between a khot and Government or Government and its occupancy tenant."

इतकें खरें की सेटलमेंट ऑफिसराचे ठरावानंतर जर खोत आणि कुळें दरम्यान कबुलायत झाली असेल, व ती १९०४ च्या दुरुस्ती नंतरची असेल व ती रेकार्डिंग ऑफिसरासमोर नोंदली गेली असेल तर त्याप्रमाणें उत्पन्न घेतां येईल. १९०४ पूर्वीचे करार नोंदण्याचें कांहीं कारण नाहीं. मात्र पुष्कळ वर्षे सतत उत्पन्न मिळालें असें दाखवितां आलें एवढ्यावरून तितकेंच देण्याचा करार होता, असें मानतां येणार नाहीं. विशिष्ट सालाबद्दल करार झाला होता असें दाखवितां आलें पाहिजे, वामन वि. रामचंद्र दु. अ. ५५७ सन १९०१ नि. ता. १६।६।१९०२.

**कलम ३३ कानू २—**

कबुलायतीनें निश्चित केलेल्या म्हणून कोणत्या नोंदी कशा नोंदाव्या

**(१) ठरलेले ऐवज, पक्षकारांनीं केलेल्या कबुलायतींत ठरले म्हणून खालीं लिहिलेल्या वेळीं नोंदले पाहिजेत, म्हणजे—**

**(अ) असे ऐवज, सर्वे लागू केल्या नंतर पुढें कोणत्याही मुदतींत, थळादाखल दिले पाहिजेत अशी कबुलायत पक्षकारांनीं, सर्वेचे कागदपत्र तयार करण्याचे वेळीं किंवा त्यापूर्वीं कोणत्याहि वेळीं केली आहे असी रिकार्डिंग कामगाराची खात्री होईल तर, सर्वेचे कागदपत्र करण्याच्या वेळीं; किंवा**

**(ब) पक्षकार, जातीनें, किंवा योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या मुखत्यारामार्फत, रिकार्डिंग कामगारापुढें हजर होऊन अशा नोंदीस संमती देतील, तर, इतर कोणत्याही वेळीं;**

पिकाचा हिस्सा कबुलायतीनें निश्चित केलेला म्हणून नोंदावयाचा नाहीं.

**(२) पिकाचा हिस्सा कबुलायतीवरून निश्चित केलेला म्हणून कोणत्याही वेळीं नोंदतां कामा नये.**

"पक्षकार" या शब्दाचा अर्थ.

**(३) या कानूंत "पक्षकार" या शब्दाचा अर्थ, कबुलायतीच्या संबंधानें, कूळ व त्या कबुलायतीचे वेळीं जो कोणी वहिवाटदार खोत असेल तो इसम असा आहे.**

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, जर, खोतकींतील ज्या कोणत्याहि भागिदाराचा हितसंबंध, किंवा अशा ज्या कोणत्याहि अनेक भागिदारांचा एकंदर हितसंबंध एकंदर खोतकीच्या तीन अष्टमांशाहून जास्त असेल तो किंवा ते भागिदार, वहिवाटदार खोत नेमून देण्याच्या किंवा त्याच्या नेमणुकीच्या वेळीं किंवा असा वहिवाटदार खोत आपल्या हुद्यावर असतांना कोणत्याही वेळीं, रिकार्डिंग कामगारापाशीं असा लेखी इकरार करून देतील कीं, अशा लेखांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि कुळाबरोबर केलेल्या कबुलायतीनें अशा भागिदारास किंवा भागिदारांस बांधण्याचा अधिकार त्या वहिवाटदार खोतास नसावा, तर, असा इकरार करून दिल्यानंतर असा वहिवाटदार खोत व असें कूळ यांच्या दरम्यान झालेली कोणतीहि कबुलायत अशा भागिदारास किंवा भागिदारांस,

कुळाबरोबर केलेल्या कबुलायतींत वहिवाटदार खोत खोतकींतील भागिदारास अगर भागिदारांस कोठवर बांधू शकतो.

(अ) अशा भागिदारानें किंवा भागीदारांनीं रिकार्डिंग कामगारापुढें हजर होऊन त्या कबुलायतीस संमति न दिली तर, किंवा

(ब) अशी कबुलायत करण्याचा इरादा असल्याची लेखी नोटीस अशा वहिवाटदार खोताच्या किंवा कुळाच्या खर्चानें, रिकार्डिंग कामगारामार्फत, अशा भागिदाराच्या किंवा भागिदारांच्या नांवावर पोष्टानें रजिस्टर केलेल्या लखोट्यांत घालून पाठविली असून, अशी नोटीस सदरहुप्रमाणें पाठविल्यानंतर तीन महिन्याहून कमी नाहीं अशा मुदतीपर्यंत अशा भागिदारानें किंवा भागिदारांनीं रिकार्डिंग कामगारापुढें हजर होऊन अशा कबुलायतीस हरकत घेतली तर,

बद्धक होणार नाहीं.

## टीपा.

(१) उद्देश—

कानू १ मध्यें थलीची नोंद कशी असावी याबद्दल सर्वसाधारण ठराव दिला असून, कानू २ मध्यें खोत आणि कुळें यांचे दरम्यान कबुलायत होऊन त्यांनीं

थलीबद्दल करार केल्य व ती नोंद कशी करावी हें सांगितलें आहे. मुख्य गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत त्या—

(१) कबुलायती आधारें पिकाचा हिस्सा केव्हांही नोंदावयाचा नाहीं.

(२) उभय पक्षकारांनीं अगर त्यांचे योग्य अधिकार दिलेल्या मुखत्यारांनीं रिकार्डिंग कामगारासमोर समक्ष येऊन अशी कबुलायत कबूल असल्याबद्दल संमत्ती दिली पाहिजे. पक्षकार ह्मणजे कूळ व वहिवाटदार खोत.

(३) अशी कबुलायत करणाऱ्या वहिवाटदार खोतास अशी कबुलायत करण्यांत तीनअष्टमांश हिस्शापेक्षां जास्त हिसा आहे अशा इसमांनीं लेखी नाकबुली दर्शविली नसली पाहिजे. नाकबुली दर्शविली अशा स्थितींत, (१) विरुद्ध असलेल्या हिस्सेदारांनीं रिकार्डिंग कामगारापुढें संमत्ती दिल्यास, अगर (२) कबुलायत करण्याचा इरादा असल्याबद्दल लेखी रजिस्टर नोटिशीनें रिकार्डिंग कामगारामार्फत विरुद्ध हिस्सेदारांस कळवून त्यांनीं तीन महिन्यांचे आंत रिकार्डिंग कामगारापुढें हरकत न घेतल्यास, नोंदण्यास हरकत नाहीं.

(४) रिकार्डिंग कामगाराची कबुलायत झाल्याची खात्री होईल तर.

इतक्या गोष्टी असल्यास करारप्रमाणें ठरींव थल देण्याबद्दल केव्हांही नोंद करण्याचा रिकार्डिंग कामगारास पूर्ण अधिकार आहे.

## (२) कबुलायतीप्रमाणें ठरींव थल नोंदतां येतें—

कबुलायत ह्मणजे जमीन वहिवाटीसंबंधें मालक व कूळ यांमध्यें ठरलेले कराररमदार होत. खोत आणि कुळें यांचे दरम्यान होणाऱ्या कबुलायतींत निरनिराळ्या प्रकारें अटि ठरवितां येणें सारख्या असून त्यांचे जोरावर या आक्टाचा उद्देशही रद्द पाडला जाऊं नये याकरितां ज्यांत ठरींव थल असेल अशाच कबुलायतीप्रमाणें नोंद करावी असें या कानूंत स्पष्ट ठरविण्यांत आलें आहे. ठरीव ऐवज या शब्दानें नक्त ऐनजिन्नस अगर नक्त रुपये असा अर्थ होतो. पिकाचा हिस्सा कबुलायतीनें ठरवितां येणार नाहीं व ठरविल्यास तो नोंदणेंही शक्य नाहीं. १९०४ चे पूर्वीचे कलमांतही याचप्रमाणें "ठरविलेली रक्कम—नक्त किंवा ऐनजिनसी" कबुलायतीप्रमाणें द्यावी असाच ठराव होता. १८६५ चे आक्टापासून खोत आणि कुळें यांचेमधील थलीचे देण्याचा संबंध ठरींव असावा असा जो सरकारनें निर्बंध घातला, तोच या कलमांत आजपर्यंत चालू ठेविला आहे. अशी कबुलायत नोंदण्याचा अधिकार कानू १ प्रमाणें रिकार्डिंग कामगाराला देण्यांत आला आहे. अशा कबुलायती लेखी पाहिजेत किंवा कसें असा प्रश्न आहे. याबद्दल कानूमध्यें कांहीं उल्लेख नसल्यामुळें खोत आणि कुळें यांचे मधील कबुलायत लेखीच पाहिजे अगर कायद्याचा शिष्टाचार केलेलीच पाहिजे असें नाहीं. मात्र अशी कबुलायत झाल्याबद्दल रिकार्डिंग कामगाराची खात्री झाली पाहिजे, ही अटही

१९०४ चे पूर्वी नव्हती त्यामुळें कबुलायत झाली असेल त्याप्रमाणें नोंद करणें भाग होतें. १९०४ नंतर अशी कबुलायत खोत आणि कुळें यांचे दरम्यान झाल्यास उभयपक्षकारांनीं रिकार्डिंग कामगारापुढें येऊन कबुली दिली पाहिजे, तरच त्याप्रमाणें अंमल होईल, नाहींपेक्षां बोटखताची नोंद कायम धरली जाईल, बाळशेट वि. हरी २७ मुं. लॉ. रि. १४८७. १९०४ चे पूर्वी बोटखतास नोंद असो वा नसो झालेल्या कबुलायतीप्रमाणें ठरीव थल देवविणें कोर्टास अगर मुलकी कामगारास भाग होतें, वामन वि. रामचंद्र द्. अ. नं. ५५७ सन १९०१ नि. ता. १६।६।१९०२; व परशराम वि. गणेश द्. अ. नं. २६ सन १९०२ नि. ता. २०।८।१९०२. कांहीं असलें तरी कबुलायतींत "ठरीव थल" देण्याबद्दल करार असेल तरच तिचा अंमल होईल नाहींपेक्षां ती या कानूप्रमाणें गैर कायदा समजली जाईल.

**(३) "पक्षकार" या शब्दाचा अर्थ व वहिवाटदार खोताचा अधिकार—**

"पक्षकार" या शब्दाचा अर्थ याच कानूंत ज्या सालीं कबुलायत होईल त्या सालचा वहिवाटदार खोत असा दिलेला आहे. वहिवाटदाराला हा अधिकार देण्याचा उद्देश असा दिसतो कीं, कुळाला सर्व खोत हिस्सेदारांशीं कोणतीही कबुलायत करणें बहुतेक अशक्य असल्यामुळें एकट्या खोताशीं ठरविणें सोपें जावें व रिकार्डिंग कामगारापुढें कबुली देण्यास सर्व खोतहिस्सेदार जमविणेंपेक्षां एकटा वहिवाटदार खोत येणें जास्त सोईचें व्हावें. वहिवाटदार खोतास या कानूनें दिलेल्या या अधिकाराविरुद्ध इतर तीनअष्टमांशपेक्षां जास्त हिस्सा असणाऱ्या खोतहिस्सेदारांनीं वहिवाटदाराची नेमणूक होते वेळेपासून अशी कबुलायत करण्याचा अधिकार नाहीं असें लेखी कळविल्यास वहिवाटदार खोतास कबुलायती करण्याचा हक्क नाहीं. वहिवाटदार खोत जर स्वतःच पांचअष्टमांश हिशाचा मालक असेल तर इतर हिस्सेदारांस कांहीं करतां येणार नाहीं, व त्याचेपाशीं झालेली कुळाची कबुलायत सर्वांस मान्य करावी लागेल. वहिवाटदार खोताचा हिस्सा पांचअष्टमांशपेक्षां कमी असल्यास व तीनअष्टमांशपेक्षां जास्त हिसेदारांनीं रिकार्डिंग कामगारास आपली नाकबुली लेखी कळविल्यास वहिवाटदार खोतास कबुलायत अगर करार कांहींएक करितां यावयाचें नाहीं. ही हरकत केव्हांही घ्यावी परंतु वहिवाटदार खोत कुळाशीं कबुलायत करण्यापूर्वी पाहिजे. कबुलायत झाल्यानंतर इकरार करणें निरुपयोगी होईल. वहिवाटदारखोतानें इतर हिस्सेदारांस फसवून कबुलायत करण्याचा प्रयत्न केल्यास इतर हिस्सेदारांनीं काय करावें हें या कानूंत सांगितलेलें नाहीं. परंतु अशावेळीं रिकार्डिंग कामगारापुढें तीन अष्टमांशपेक्षां जास्त खोतहिस्सेदारांनीं हरकत घेतल्यास त्यानें योग्य कबुली नाहीं असें समजून कबुलायत न नोंदणें बरें. खोतहिस्सेदारांनीं कोणत्याही वहिवाटदाराची नेमणूक होतांच त्यानें कबुलायती करूं

नयेत अशी इच्छा असल्यास लेखी नाकबुली कळवून ठेवावी, हें बरें. लेखी इकरार केलेला असतां कबुलायत झाल्यास ती कोणत्या परिस्थितींत नोंदावी हें याच कानूंत सांगितलें असून खोतहिस्सेदारांनीं स्वतः कबुली दिल्यास, अगर कुळानें लेखी नोटीस रजिस्टर पोष्टानें, रिकार्डिंग कामगारामार्फत पाठवून ती पोंचल्यापासून ३ महिन्यांचे आंत विरुद्ध खोतहिस्सेदारांनीं आपली हरकत न कळविल्यास, नोंदण्यास हरकत नाहीं, असें स्पष्टपणें ठरविलें आहे.

वहिवाटदार खोत फारच लहान हिशाचा मालक असून बाकी पाच अष्टमांश हिशाचे मालक खोतांनीं कुळांबरोबर कबुलायत केल्यास ती नोंदावी किंवा नाहीं याचा खुलासा कानूंत केलेला नाहीं. परंतु या कानूंतील तत्व ध्यानांत आणिल्यास उभय पक्षकारांच्या कबुलीनें रिकार्डिंग कामगारानें अशी कबुलायत नोंदण्यास हरकत नाहीं, असें वाटतें. १९०४ चे पूर्वींचे ३३ वे कलमांत कबुलायत करणारा वहिवाटदार खोतच पाहिजे वगैरे अटी नव्हत्या. पूर्वींच्या कलमांत "खोत आणि सदर्हु कूळ यांचे दरम्यान कबुलायत झाली असेल ती" असें शब्द होते व त्यामुळें कोणत्याहि खोताला इतर खोत हिस्सेदारांच्या हक्काला बाध न येईल अशा रीतीनें कुळाशीं कबुलायत करण्याचा हक्क होता. पूर्वींच्या कलमाप्रमाणें एखाद्या खातानें इतर खोतांची कबुली नसतां कबुलायत केल्यास वांटपाचे वेळीं असें कूळ त्याच्या हिशांत पुरविण्यांत येत असे. तो अधिकार या कानूनें काढुन घेण्यांत आला असून वहिवाटदार खोतास देण्यांत आला आहे. हा कानू कलम ११ शीं विसंगत आहे असें वाटतें.

## (५) "रिकार्डिंग कामगाराची खात्री होईल तर"—

ज्यावेळीं कबुलायत सर्वेचे कागद तयार करण्याचे पूर्वींची असेल त्यावेळीं तशी कबुलायत झाली अशाबद्दल रिकार्डिंग कामगाराची खात्री झाली असली पाहिजे. रिकार्डिंग कामगाराची "खात्री होणें" याचा अर्थ "कायदेशीर, न्याय्य व योग्य प्रकाराची खात्री होणें" असा आहे, केवळ कामगाराच्या मर्जीची गोष्ट नव्हे. खोत व कुळें, उभयतां योग्यप्रकारें, पुरे समजुतीनें संमत्ती देतील तरीही खात्री झाली नाहीं असें ह्मणण्याचा रिकार्डिंग कामगाराला अधिकार नाहीं. येथें मुलकी अधिकाऱ्यांसही दिवाणी कोर्टाचें तत्व लागू आहे. रिकार्डिंग कामगाराची खात्री अथवा समाधान (satisfaction) ही न्याय्य (judicial) पाहिजे. **न्याय्य विचार (judicial discretion)** याचा अर्थ ना. हायकोर्टानें हिराबाई वि. धनजीबाई २ मुं. लॉ. रि. ८४५ या ठरावांत "न्यायाच्या कोर्टाचे दृष्टीनें न्याय्य विचार याचा अर्थ कायद्याच्या तत्वानें निदर्शित योग्य विचार असा आहे. तो नियमानेंच बनलेला पाहिजे, लहरीचा उपयोगी नाहीं. तो यथेच्छ, अनिश्चित आणि

काल्पनिक असा नसून कायदेशीर व योग्य असला पाहिजे."* याच ठरावाप्रमाणें खिमचंद वि. सोभागचंद २५ मुं. लॉ. रि. २४५ या ठरावांत सर न्या. मॅक्लिऑड यांनीं "ज्याठिकाणीं जरूर त्या सर्व परिस्थितीचा विचार केलेला नाहीं, तो विचार योग्य प्रकारें केलेला आहे असें केव्हांही मानणें शक्य नाहीं," असें ह्मटलें आहे. या ठरावांवरून खात्री होणें ही गोष्ट रिकार्डिंग कामगाराच्या मर्जीची नसून ज्या ठिकाणीं कायद्याप्रमाणें सर्व अटी पुऱ्या झालेल्या असतील त्या ठिकाणीं त्यानें खात्री झाली असेंच समजलें पाहिजे.

कबुलायतीनें ठरविलेल्या ऐवजांच्या नोंदीशिवायकरून इतर नोंदी कशा निश्चित कराव्या.

**कलम ३३ कानू ३**—पक्षकारांच्या कबुलायतीनें कोणताही ऐवज ठरलेला नाहीं असें सर्वेचे कागदपत्र तयार करतेवेळीं दिसून येईल तर, रिकार्डिंग कामगारानें खालीं लिहिल्याप्रमाणें केलें पाहिजे, ह्मणजे

(अ) जर त्यास असें आढळून येईल कीं, तशा प्रकारच्या जमिनींच्या संबंधानें गांवच्या साधारण चालीप्रमाणें पिकाचा हिस्सा त्या वेळपर्यंत देण्यांत येत आहे, तर त्यानें असा पिकाचा हिस्सा नोंदला पाहिजे; किंवा,

(ब) जर त्यास कोणत्याही बाबतींत असें आढळून येईल कीं, त्यावेळपर्यंत देण्यांत येत असलेल्या थळाचा प्रकार किंवा ऐवज, त्या गांवांतील तशा प्रकारच्या जमिनींच्या संबंधानें त्या गांवच्या साधारण चालीप्रमाणें द्यावयाच्या थळाच्या प्रकाराहून किंवा ऐवजाहून भिन्न आहे, किंवा तशी कोणतीहि साधारण चाल निश्चित करण्याजोगी नाहीं.

तर त्यानें, त्या बाबतींत त्या वेळपर्यंत देण्यांत येत असलेलें थळ नोंदलें पाहिजे, किंवा असें थळ एकाच मानानें घेतलेलें नसल्यास, त्यानें चालविलेल्या चौकशी पूर्वील लगत बारा वर्षांमध्यें त्या जमिनीबद्दल देण्यांत आलेल्या किंवा देणें झालेल्या थळाची सरासरी काढून ती नोंदली पाहिजे; किंवा,

---

* "Discretion when applied to a court of law means sound discretion guided by law. It must be governed by rule, not by humour; it must not be arbitrary, vague and fanciful but legal and regular."

**(क) जर त्यास असें आढळून येईल कीं, कानू ५, पोट कानू (१) अन्वयें पिकाच्या हिशाचा मोबदला–किंमत देणें झालेली आहे, तर त्यानें त्याच कानूच्या (३) ऱ्या पोटकानू अन्वयें द्यावयाची मोबदला–किंमत नोंदली पाहिजे.**

**मात्र असें ठरविणेंत येत आहे कीं, पिकाचा हिस्सा नोंदणें तो, कोणत्याहि प्रसंगीं, भातशेतीच्या जमिनीच्या बाबतींत एक द्वितियांशाहून व वर्कस जमिनीचे बाबतींत एक तृतियांशाहून जास्त नोंदतां कामा नये.**

## टिपा.

(१) उद्देश—

कानू २ मध्यें सांगितल्याप्रमाणें जर खोत आणि कुळें यांचे दरम्यान कांहीं कबुलायत अगर करार नसेल तर थलीची नोंद कोणत्या प्रकारें करावयाची तें या कानूंत सांगितलें आहे.

**(२) गांवच्या साधारण चालीप्रमाणें त्या वेळपर्यंत देण्यांत येणारा पिकाचा हिसा—**

पूर्वापार चालत आलेल्या अर्धेल तिर्धेल देण्याचे वहिवाटीस या कानूनें कायद्याचें स्वरूप दिलेलें आहे. पिकाचा हिस्सा देणेंबद्दल ठराव करतांना तीन गोष्टी रिकार्डिंग कामगारानें पाहावयाच्या असतात—

(१) गांवची साधारण चाल.

(२) त्याच प्रकारच्या जमिनीबद्दल सर्व साधारण काय देण्यांत येतें.

(३) त्या वेळेपर्यंत चाली प्रमाणें थल सारखी देण्यांत आली आहे किंवा नाहीं, असल्यास किती.

या तीन गोष्टींपैकीं गांवची साधारण चाल याचा आजुबाजुच्या गांवांची चाल असा अर्थ नसून (१) ज्या गांवांतील थल ठरवावयाची असेल त्याच गांवांतील चाल काय हें पहावयाचें आहे. ( सरकारी ठराव आहे. ) (२) त्याच प्रकारच्या जमिनीबद्दलची चाल काय आहे तें पाहिलें पाहिजे. जमिनीचा मगदूर–पाटस्थळ, खडकाळ, बाऊळ वगैरे अशा प्रकारें निरनिराळा जमिनीचा प्रकार पाहून त्याप्रमाणें तसल्या प्रकारच्या जमिनीबद्दल काय देण्यांत येतें तें पाहिलें पाहिजे. व (३) नंतर अखंड त्याच चालीप्रमाणें थल देणें चालू आहे किंवा नाहीं हें नक्की ठरविलें पाहिजे. हें ठरवितांना खोत कुळांचा तोंडी पुरावा, अभावण्या,

खतावण्या, कुळाच्या पावतीचोपड्या वगैरे पुराव्यावरूनच खात्री करून घ्यावयाची आहे. पुराव्याअंतीं पिकाचा हिस्सा देण्याची चाल आहे, असें आढळल्यास तो पिकाचा हिसा नोंदावयाचा. मात्र असा हिसा नोंदणें तो भात जमिनीचे बाबतींत अर्धेलपेक्षां जास्त असूं नये व वर्कस जमिनीचे बाबतींत तिर्धेलपेक्षां जास्त असूं नये. जमिनीचा प्रकार ह्मणजे केवळ सर्वे मोजणीकरितां सरकारनें ठरविलेला प्रकार असा अर्थ नसून प्रत्यक्ष ज्या प्रकारची लागवड असेल तो प्रकार धरावयाचा आहे. खोताला जें उत्पन्न भोगावयाचें तें नेहमीं प्रत्यक्ष पीक असेल अगर होणारें असेल त्या मानानें भोगावयाचें असतें. त्याचा संबंध सरकारदस्ताशीं नाहीं. (कलम १४ व त्या खालील टीपा पहा.) भात व वर्कस जमिनीबद्दल स्पष्ट उल्लेख केलेला आहे. परंतु बागायत व रब्बी जमिनीबद्दल कांहीं स्पष्ट ठराव नाहीं. त्याचप्रमाणें फळझाडांबद्दल कानू १ मध्यें ठराव करण्याबद्दल सांगितलें आहे, परंतु आकारणी कशी करावी हें सांगितलेलें नाहीं. यामुळें गांवची चाल व पुरावा पाहून जो योग्य हिसा अगर ऐवज दिसेल तोच नोंदला पाहिजे. अर्धेल, तिर्धेलची मर्यादा येथें लागू नाहीं.

### (३) त्यावेळेपर्यंत देण्यांत येत असलेलें थळ नोंदलें पाहिजे.—

वर टीप २ येथें सांगितल्याप्रमाणें जमिनीच्या मगदुराप्रमाणें अगर ठरीव पिकाच्या हिशाप्रमाणें, या पैकीं कोणत्याही रीतीनें थल न घेतां, कांहीं ठराविक थल सारखी घेण्यांत येते असें आढळल्यास अशी देण्यांत आलेली थल नोंदली पाहिजे. कारण अशावेळीं जरी सरासरी काढावयाची ह्मटली तरी तिच निघणार. यांत फेरबदल करण्याचा रिकार्डिंग कामगारास अधिकार नाहीं.

### (४) देण्यांत आलेल्या किंवा देणें झालेल्या थळाची सरासरी काढून ती नोंदली पाहिजे—

वरील टीप २।३ यांतील प्रकाराप्रमाणें थलीची नोंद करितां न आल्यास मागील बारा वर्षांत प्रत्यक्ष थल दरसाल किती दिली अगर कलम १४ प्रमाणें देणें रास्त होतें, तें पाहून त्याची सरासरी काढली पाहिजे. "देण्यांत आलेल्या" हे शब्द मुद्दाम घालण्यांत आले असून त्याचा अर्थ खोताला कुळानें प्रत्यक्ष काय दिलें हें मांडून दिलेल्या पावतीचोपड्यांवरून त्याचप्रमाणें अभावण्या, खतावण्यांवरून, वगैरे पुराव्यावरून खोतास मागील १२ सालांत प्रत्यक्ष काय मिळालें हें पाहून त्यावरून सरासरी काढली पाहिजे. अंदाजानें कांहीं तरी करून चालावयाचें नाहीं. पुरावा असेल तो पाहून पुराव्यावरून देण्यांत आलेल्या थलीची सरासरी काढली पाहिजे. पुरावा मिळणें ज्यावेळीं अगदीं अशक्य असेल त्यावेळीं "देणें झालेल्या" थलीची बारा वर्षांची सरासरी पहावयाची आहे. अशावेळीं त्याच गांवांतील त्याच मगदुराच्या जमीनीची काय थल देण्याची चाल आहे तें पाहून त्याप्रमाणें थल देवविली पाहिजे.

कांहीं सालास " देण्यांत आलेल्या " थलीचा आकार मिळाला व कांहीं सालास न मिळाला तर, ज्या सालाबद्दल प्रत्यक्ष पुरावा मिळाला नसेल त्या सालाबद्दल अप्रत्यक्ष पुरावा म्हणजे गांवांतील चालीप्रमाणें काय द्यावयाचें याबद्दल घेतला पाहिजे. कोणत्याही परिस्थितींत रिकार्डिंग कामगारानें न्याय्य विचाराचा (Judicial discretion) उपयोग केला पाहिजे. रिकार्डिंग कामगारानें आपली जबाबदारी व आपल्या कृत्यास कायद्यानें दिलेली बळकटी यांचा विचार करून योग्य नियमांस अनुसरून नोंद केली पाहिजे. पुराव्याअंती, पुरावा प्रत्यक्ष असो वा अप्रत्यक्ष असो, जी सरासरी निघेल तीच देवविली पाहिजे. थल जास्त वाटतें कि कमी वाटतें हें पाहून रिकार्डिंग आफिसरास स्वतःचे मर्जीचा अंमल करण्याचा अधिकार दिलेला नाहीं. थलीची नोंद बाटखतास झाल्यानंतर ती कायम होते व ती फिरविण्याचा दिवाणी कोर्टासही अधिकार नाहीं, हरी वि. बाळाजी १८९५ प्रिं. ज. ५१९ (कलम १७ टी. ६)

**कलम ३३ कानू ४–जर कोणत्याही बाबतींत—**

(अ) सर्वे सेटलमेंट लागू करतेवेळीं कोणतीही नोंद केली नसेल, किंवा

सेटलमेंटच्या वेळीं नोंद करण्याची राहिल्यास किंवा नोंद लागू होण्याची बंद झाल्यास नोंदी करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार.

(ब) केलेली नोंद, अधिकार असणाऱ्या कोर्टाच्या हुकुमनाम्यामुळें किंवा कुळानें लागवडीची पद्धत बदलल्यामुळें किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें, ती ज्या जमिनीसंबंधानें केली होती त्या जमिनीस सर्वांशीं किंवा अंशतः लागू होण्याची बंद झाली असेल,

आणि कबुलायतीनें ठरविलेला कोणताही ऐवज मागाहून नोंदण्यांत आलेला नसेल,

तर, रिकार्डिंग कामगारास तो २ ऱ्या कानूअन्वयें काम चालवीत असल्याप्रमाणें, द्यावयाचें थळ निश्चित करून तें नोंदण्याचा किंवा त्याबद्दलची पूर्वी केलेली नोंद बदलण्याचा अधिकार आहे.

किंवा नोकरीच्या विशेष शर्तींवर धारण करणाऱ्या कुळानें अशी नोकरी करण्याचें बंद केल्यास नोंदी करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार.

(२) जर कोणतीही जमीन, कुळानें खोताची किंवा गांवच्या लोकांची किंवा त्यांतल्या कोणत्याही वर्गाच्या फायद्याकरितां जी नोकरी करावयाची तिच्या मोबदला सर्वांशीं किंवा अंशतः धारण केलेली असेल, तर रिकार्डिंग कामगारानें, अशी नोकरी करण्याचें बंद झाल्याबद्दलचा पुरावा करण्यांत आला असतां, अशी सर्वांशीं किंवा अंशतः माफी नसती तर जें थळ घेतां आलें असतें तें निश्चित करून नोंदलें पाहिजे.

किंवा ठरलेला ऐवज, सर्वेचा आकार व लोकलफंड सेस व त्यावरील शेकडावळ यांच्या रकमेइतका नसल्यास नोंदी करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार;

(३) जर बिनथळी धारण केलेली ह्मणून नोंदलेल्या जमिनीशिवाय इतर कोणत्याहि जमिनीच्या संबंधानें, ठरलेला ऐवज किंवा पिकाच्या हिशाच्या बाबतींत जी मोबदला-किंमत द्यावयाची ह्मणून कानू ५ अन्वयें नोंदलेली असेल किंवा नोंदण्यांत येईल, ती मोबदला-किंमत, त्या जमिनीबद्दल खोताकडून वसूल करावयाचा सर्वेचा आकार व लोकलफंड सेस व अशा आकारावर व लोकलफंड सेसवर पंचवीस टक्के शेकडावळ (हीस यांत पुढें "सदई शेकडावळ" ह्मटलें आहे) यांच्या एकंदर रकमेहून कमी असेल तर रिकार्डिंग कामगारानें पक्षकारांपैकीं कोणत्याही एका पक्षकाराची अर्जी आली असतां तो ठरलेला ऐवज किंवा ती मोबदला-किंमत त्या रकमेपर्यंत किंवा तिच्या ऐनजिनसी ऐवजापर्यंत वाढविली पाहिजे आणि मग त्यानें त्याप्रमाणें ती नोंद बदलली पाहिजे.

मात्र सरकारानें जर सदई शेकडावळीची सर्व रकम किंवा तिचा अंश भरला, तर त्या मानानें ऐवज कमी करण्याचा अखत्यार आहे.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, गव्हर्नर-इन्-कौन्सिल ह्यांस खोती सेटलमेंट आक्ट सुधारण्याबाबद सन १९०४ चा आक्ट ह्याच्या सुरवातीच्या वेळीं अंमलांत

असलेल्या सर्व सेटलमेंटच्या मुदतींत, ह्यासंबंधानें सामान्य किंवा विशेष हुकूम करून त्यांच्या द्वारें असं फर्माविण्याचा अधिकार आहे कीं, मद शेकडावळीची सर्व रकम किंवा तिचा कांहीं भाग अशा मुदतीच्या बाकी राहिलेल्या अवधींत सरकारनें आदा करावा; आणि जोंपर्यंत याप्रमाणें आदा करण्याचें चालू राहील तोंपर्यंत, ह्या पोटकानूच्या ठरावांअन्वयें कुळानें खोतास द्यावयाच्या थळांत, याप्रमाणें आदा करण्यांत आलेली रकम कमी करण्यांत आली पाहिजे; आणि त्याचप्रमाणें रिकार्डिंग कामगारानें सदर्हु बदललेल्या नोंदींत एक टीप दाखल केली पाहिजे.

किंवा जमिनीस नुकसान झाल्यामुळें आकाराची सूट दिली असल्यास अगर आकार कमी केला असल्यास नोंदी करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार

(४) जर कोणत्याही सर्वे नंबरावर बसविलेला सर्वेचा आकार तो नंबर जलमय झाल्यामुळें, अगर त्याची पुरानें, किंवा "ईश्वरचे कुआ-च्या" शक्तीबाहेरील इतर कोणत्याही कारणानें खराबी झाल्यामुळें, कमी केला असेल अथवा कादून टाकलेला असले तर रिकार्डिंग कामगारानें, त्या नंबरचा जो भाग अशा कुळच्या "भोगवट्यां-तील" असेल त्या भागाबद्दल द्यावयाचा ह्मणून जो ठरलेला एकंदर ऐवज, किंवा पिकाच्या हिशांच्या प्रसंगीं जी एकंदर मोबदला-किंमत (कांहीं असल्यास) नोंदलेली असेल, त्यांत, त्याच्या "भोगवट्यां-तील असलेल्या सर्व क्षेत्रावरील एकंदर आकाराशीं सूट दिलेल्या अथवा कादून टाकलेल्या आकाराचें जें प्रमाण असेल त्या प्रमाणानें ऐवज कमी केला पाहिजे आणि त्यानें कागदपत्रांत एक नोंद करून तींत

(अ) कमी केलेला ऐवज, व

(क) तो, पुढें आणखी नोंद न होतां, ज्या मुदतीपर्यंत अमलांत रहावयाचा त्या मुदतीची इयत्ता,

हीं निर्दिष्ट केलीं पाहिजेत.

( ह्या कानूंतील रकम ४ सन १९१३ चा मुंबई आक्ट ४ कलम १० वरून दुरुस्त केली आहे. )

टिपा.

१ उद्देश—

या कानूमध्यें, नोंद करणेचें राहिलें असल्यास, ती नोंद कालानुरोधानें अयोग्य झाल्यास, अगर प्रमाणाचे बाहेर कमी झाल्यास, ती सुधारण्याचा अधिकार रिकार्डिंग कामगारास दिलेला आहे. त्याचप्रमाणें नोंद करतेवेळीं झालेल्या चुका अगर अन्याय दूर करण्याचा, त्याचप्रमाणें निसर्गाच्या योगामुळें ठरलेली थल कमीजास्त करण्याचा, अधिकार रिकार्डिंग कामगारास या कानूनें दिला आहे. कलम १८ प्रमाणें सर्वेच्या कागदांत सुधारणा करण्याचा अधिकार दिलेला असून, कानू ४ प्रमाणें थलीचे ठरावांतच फक्त फेरफार करावयाचा आहे. या कानूप्रमाणें खालील परिस्थितींत थलीचे नोंदींत सुधारणा करावयाच्या असतात.

(१) नोंद अजिबात केलेली नसेल तेव्हां,

(२) कोर्टाचे हुकुमामुळें नोंद बदलणें भाग झाल्यास,

(३) कुळानें लागवडीची पद्धत बदलल्यास,

(४) अन्य कारणानें नोंद गैरलागू झाल्यास,

(५) नोकरी करण्याचें बंद झाल्याबद्दल पुरावा करण्यांत आल्यास,

(६) ठरविलेली थल सरकारदस्त लोकलफंड व अधिक शेकडा पंचवीस टक्के फायदा, इतक्यापेक्षां कमी आकारली गेली असल्यास,

(७) जमीन शक्तीबाहेरच्या कोणत्याही कारणानें खराब झाल्यास—उ• जलमय झाल्यामुळें, पुरामुळें वगैरे.

इत्यादि गोष्टींचे बाबतींत केव्हांही सुधारणा करण्याचा रिकार्डिंग कामगारास पूर्ण अखत्यार आहे. या कानूमध्यें सांगितल्याप्रमाणें फेरफार करितांना रिकार्डिंग कामगारानें कानु ३ मध्यें सांगितल्याप्रमाणें वागलें पाहिजे व त्यांत सांगितल्या रीतीप्रमाणेंच चौकशी केली पाहिजे. कानू ४ हें बाकी कानूंप्रमाणें केल्या जाणाऱ्या प्रत्येक नोंदीचे बाबतींत लागू आहे.

(२) कोणतीही नोंद केली नसेल तर—

खातेदार कुळाचे बाबतींत थलीची नोंद झालेली नसणें ही गोष्ट फारशी शक्य नाहीं, परंतु चुकीनें, गैरसमजानें, लबाडीनें अगर मुद्दाम, अशी नोंद करण्याचें राहून जाणें शक्य आहे. किंवा नोंद काय करावी या संबंधाचा परस्पर विरोधी पुरावा आल्यामुळें अगर योग्य पुरावा अपरिहार्य कारणानें पुढें न आल्यामुळें नोंद करणेची राहून गेल्यास, अशी नोंद कानू ३ चे रीतीप्रमाणें करण्याची मुभा देण्यांत आलेली आहे. अशा वेळीं रिकार्डिंग कामगारास सर्वे सेटलमेंटची मुदत संपेपर्यंत थांबण्याचेंही कारण नाहीं. नोंद करण्याचे पूर्वी जर कूळ आणि खोत यांचा आपसांत ठराव झाला असेल तर मात्र त्याप्रमाणें उभय पक्षकारांचे कबुलीनें नोंद करावी; नाहींतर कानू ३ स अनुसरून नोंद केली पाहिजे.

(३) कोर्टाचे हुकुमामुळें बदलणें भाग झाल्यास—

रिकार्डिंग कामगारानें केलेली थलीची नोंद निरुत्तर असते याबद्दलचा ऊहापोह मागें आलाच आहे. एकदां बोटखतास झालेले थलीचे नोंदीविरुद्ध जाण्याचा दिवाणी कोर्टास अधिकार ठेविलेला नाहीं. परंतु सत्ताप्रकारची नोंद निरुत्तर नसल्यामुळें ती बदलली गेल्यास थलीची नोंदही बदलणें भाग आहे. अंताजी वि. अंताजी २१ मुं. ४८० या ठरावांत हीच गोष्ट स्पष्टपणें नमूद केलेली आहे. उदाहरणार्थ धारेकरी अशी झालेली नोंद दिवाणी कोर्टानें बदलून खातेदार कूळ असें ठरविल्यास थलीची नोंद बदलीच पाहिजे; त्याचप्रमाणें याचे उलट परिस्थितींत. कलम ११ प्रमाणें खोतानें उच्च सत्ताप्रकार बहाल केल्यास नोंद फिरविणें भाग होईल. अशा प्रकारच्या परिस्थितींत नोंद सुधारण्याचा अधिकार या कानूनें दिला आहे.

(४) कुळानें लागवडीची पद्धत बदलल्यास—

कुळाकडून खोतास मिळणारी थल प्रत्यक्ष पिकावर अवलंबून असते. त्यामुळें जमिनीच्या पिकामध्यें फरक झाल्यास त्याप्रमाणें नोंदींतही फरक पडतो. पुष्कळ वेळां कुळें जमिनांचा मगदूर वाढवितात; वर्कस जमिनींत बांधबंदस्ती करून भात जमीन–कुर्याट-तयार करितात. त्याचप्रमाणें पाण्याची सोय असल्यास बागायत तयार करतात. वर्कस जमिनींत कलमांची लागवड करितात, अशा रीतीनें जमिनीचे लागवडींत फेरफार होतात व त्यामुळें जमिनीच्या उत्पन्नांतही फरक पडतो. याचा फायदा ज्याप्रमाणें कुळास मिळतो त्याचप्रमाणें खोतासही मिळाला पाहिजे. परंतु नोंद बदलली न गेल्यास कायदेशीर रीतीनें खोतास कुळाकडून मागणें करितां यणार नाहीं. याकरितां अशा वेळीं नोंदींत फेरबदल करितां यावा याकरितां तसा अधिकार या कानूनें रिकार्डिंग कामगारास दिला आहे. खोतानें लागवडीची पद्धत बदलतांच नोंद बदलून घेण्याची खटपट केली पाहिजे. कारण नोंद न बदलल्यास नोंदीबाहेर त्यास कुळाकडून वसूल करितां यावयाचा नाहीं.

(५) अन्य कारणानें नोंद गैरलागू झाल्यास—

हा शब्दप्रयोग सर्वसाधारण कल्पना न होण्यासारख्या परिस्थितीच्या वेळीं नोंद फिरवितां यावी या हेतूनें केलेला आहे. आपसांतील करारांची मुदत संपल्यास, करार अयोग्य, लबाडीचा, फसवून घेतलेला आहे अगर बेकायदेशीर आहे असें कोर्टमार्फत ठरल्यास, खोतानेंच खातेदार कुळाचा हक्क खरेदी घेतल्यास वगैरे हरएक, ज्यामुळें नोंद गैरलागू होईल, अशा बाबींचा यांत समावेश होतो.

(६) नोकरी करण्याचें बंद झाल्याबद्दल पुरावा करण्यांत आल्यास—

ब्रिटिश अंमलापूर्वी गांवची व्यवस्था सुव्यवस्थित चालावी याकरितां निरनि-

राळे समाजोपयोगी लोक गांवांत असून त्या प्रत्येकास वेतन असे. अशा इसमांस बलुतेदार असें म्हणत. ते पाटील, कुळकर्णी, जोशी, गुरव अथवा घाडी, सुतार, सोनार, लोहार, कुम्भार, न्हावी, परीट, चांभार आणि महार असे १२ बलुतेदार असत, व त्यांस गांवांतून त्यांचे चाकरीबद्दल वसुलाचे बाबतींत सवलती अगर हक्क असत. **हेरीडिटरी ऑफिसेस आक्ट, सन १८७४ चा मुं. आक्ट ३ यानें** यापैकीं महार वगैरे कांहींचे अधिकार कायम राखिले आहेत. या बलुतेदारांस पूर्वी त्यांच्या नोकरीबद्दल कांहीं जमिनी मोफत अगर विशेष सवलतीनें दिलेल्या असत, व त्याच आधारें पुढें नोंदीही झाल्या आहेत. पूर्वीच्या ग्रामसंस्था मोडल्यामुळें पुष्कळसे बलुतेदार आतां मागीलप्रमाणें नोकरी करीनातसे झाले आहेत. नोकरी ऐवजीं दिलेल्या सवलती आतां चालू ठेवणेंही योग्य नाहीं. याकरितां नोंदीमध्येंही फेरफार होणें क्रमप्राप्तच आहे. मात्र या कारणाकरितां नोंद फिरविते वेळीं खोतानें नोकरी करणें बंद झाल्याबद्दलचा योग्य पुरावा केला पाहिजे. योग्य व समाधानकारक पुराव्याअंतीं शाबीद झाल्यास नोंद बदलणें भाग आहे. आपण होऊन असें अनुमान काढण्याचा रिकार्डिंग कामगारास अधिकार नाहीं. इतकेंच नव्हे तर अशा नोकरीची आवश्यकता नाहीं असें दाखवूनही नोंद बदलण्याचा त्यास अधिकार नाहीं. झालेली नोंद नोकरीचा मोबदला असल्याबद्दल दाखवून, तशी नोकरी करीत नाहीं असें पुराव्यानें शाबीद केल्यास नोंद बदलतां येईल. या ठिकाणीं केवळ बलुतेदारांच्याच नोकरीचा प्रश्न नसून "नोकरी" हा शब्द सर्वसाधारण वापरला असल्यामुळें यांत इतर नोकरीचाही समावेश होऊं शकेल. खोतानें खासगी नोकरीकरितां कुळास सवलत दिल्यामुळें नोंद झाली असल्यास, अशी नोंदही नोकरी करण्याचें बंद झाल्यास बदलतां येईल.

**(७) थळ सरकारदस्त लोकलफंड व त्यावर पंचवीस टके शेंकडावळ यापेक्षां कमी असतां नये—**

कुळाला ठरवून दिलेल्या थळीची किमान मर्यादा याच कानूंतील पोट कानु ४ प्रमाणें ठरलेली आहे. खोताला सरकारदस्त व लोकलफंड द्यावा लागतो त्याचेवर आणखीं शेंकडा पंचवीस टके तरी निदान खोतास खोत फायदा मिळाला पाहिजे. तेव्हां केव्हांही खातेदार कुळाची थळ, मोबदला–किंमत अगर पिकाचा हिस्सा ठरवितांना, अगर नक्त ठरवितांना, मात्र कुळास मोफत भोगावयांची नसेल त्यावेळीं, सरकारदस्त, लोकलफंड अधिक त्यांच्या योगानें होणाऱ्या रकमेचा चौथा भाग, यांपेक्षां कमी होतां कामां नये. ह्मणजे सरकारदस्त लोकलफंड मिळून एक रुपया झाल्यास थळीचा ठराव सवा रुपयापेक्षां केव्हांही कमी असतां कामा नये. कमी नोंद झाली असल्यास ती बदलली पाहिजे. कानु ३ पो. का. (क) (शेवटचा प्यारा) व कानु ४ पो. का. ३ या दोहोंचा अर्थ केल्यास, अर्धेळ तिर्धेळपेक्षां

जास्त नाहीं व सरकारदस्त लोकलफंडाच्या सवापटीपेक्षां कमी नाहीं अशा रीतीनें थलीचा आकार असला पाहिजे. ह्या कमाल व किमान मर्यादा ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. हा नियम केवळ खातेदार कुळानांच लागू आहे. किमान मर्यादेपेक्षां थलीची नोंद कमी प्रमाणाची झाली असल्यास ती बदलण्याचा रिकार्डिंग कामगारास अधिकार दिलेला आहे. अशावेळीं सुधारणा करणें झाल्यास ती रिकार्डिंग कामगारास आपण होऊन करितां येत नाहीं. पक्षकारांपैकीं कोणाचा तरी अर्ज आला पाहिजे.

या बाबतींत कुळांच्या थलीच्या वाजवीपेक्षां कमी नोंदीमुळें जें खोताचें नुकसान होईल तें सेटलमेंट नवीन होईपर्यंत स्वतः आपण सोसण्याची मुभा सरकारनें आपणाकडे ठेविली आहे. मात्र गव्हर्नर–इन्–कौन्सिलचा सामान्य अगर वट हुकूम निघाला पाहिजे. देवगडच्या खोतांच्या बाबतींत सरकारनें केलेल्या स्पेशल टरावाची माहिती **रा. अ. ग. देसाई** यानीं दिली आहे. (**खो. आ.** पान १४०।१४१ पाहा.)

**(८) शक्तीबाहेरील कारणामुळें खराबी झाल्यास थल कमी करणें—**

पोटकानु ४ नें कुळाच्या शक्तीबाहेरील, दैवी क्रोधानें त्यास भोगाव्या लागणाऱ्या, आपत्तीच्या प्रसंगीं त्यास सूट देण्याची मुभा ठेविलेली आहे. कायद्याचें नेहमींचें तत्व असें आहे कीं, शक्तीबाहेरील, ईश्वरीकोपानें ज्या आपत्ती येतात त्याचा परिणाम कोणासही भोगावा लागूं नये. यासच इंग्रजींत "Vis Major" असें म्हणतात. या कानूप्रमाणें लँ. रे. कलम ४७ मध्यें व कलम २१४ नियम ७२ मध्यें जमीन वाहून गेल्यास, अर्ध्या एकरपेक्षां ती जास्त असेल तर, सरकारदस्त कमी करण्याची मोकळीक ठेवलेली आहे. अशा तऱ्हेचीं दैवी कारणें कोणतीं याचें दिग्दर्शन या कानूमध्यें, जलमय होणें, पुरानें वाहून जाणें, धरणीकंप होणें, अशा रीतीनें केलें असून कुळाच्या शक्तीबाहेरील सर्व गोष्टींचा त्यांत समावेश होतो. अशा दैवी क्रोधामुळें कुळाचें नुकसान झाल्यास त्याप्रमाणें थल कमी होणें आवश्यक आहे. तशी सूट देऊन थलीची नोंद सुधारण्याचा या कानूनें रिकार्डिंग कामगारास अधिकार दिलेला आहे दैवी क्रोधाचें तत्व लावतांना, **विठ्ठलदास वि. मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर ४ मुं. लॉ. रि. ९१४** या ठरावांतील तत्व ध्यानांत ठेविलें पाहिजे. "दैवी करणी असें कायद्यानें मानावयास ती गोष्ट अगदीं अशक्य (overwhelming), केवळ कल्पना न झालेली, इतकेंच नव्हे तर अगम्य, व अनिवार्य अशी पाहिजे.*" त्याचप्रमाणें **मुंबई कार्पोरेशन वि. वासुदेव ६ मुं.**

---

* "To be regarded, in law, as an act of God, the occurrance must be overwhelming and not only unforeseen but incapable of being foreseen and absolutely incapable of being prevented or guarded against."

लॉ. रि. ८९९ या ठरावांतही या तत्वाचा पूर्ण विचार करून असें ठरविलें आहे कीं " दैवी करणी ही सबब माह्य मानण्यापूर्वीं प्रतिवादीनें त्यास करणें शक्य असलेल्या सर्व गोष्टी केल्या असल्या पाहिजेत.‡" हरी वि. गणेश दु. अ. नं. ६१ सन १९०८ नि. ता. २०।७।१९०८ या ठरावांत हेंच तत्व न्या. ब्याचेलर आणि चौबळ यांनीं गृहीत मानून "नुसत्या पुरामुळें जमीन वाहून जाणें हें खोताच्या थलीविरुद्ध दाखविण्यास योग्य कारण नव्हे असें मानलें आहे."§ या तत्वांचा " शक्ती बाहेरील" या शब्दांचा अर्थ करतांना उपयोग केला पाहिजे. नदी कांठची जमीन वाहून जाणें शक्य आहे असें माहीत असतां बांध घालणें वगैरे आवश्यक गोष्टी केल्या नाहींत तर कुळाला सवलत मिळणें शक्य नाहीं. दैवी करणी, अशक्य, अगम्य, अ र्थ अशी पाहिजे. असें असतांच नोंद फिरविणें इष्ट होईल.

(९) थल माफ जमिनी—सरकारदस्त माफी—

ज्या जमिनींबद्दल धार्मिक गोष्टीमुळें अगर नोकरी वतनामुळें खोतास कांहींच थल मिळत नाहीं अशा रत्नागिरी जिल्ह्यांतील जमिनींचा सरकारदस्त सरकारनें माफ केला आहे. अशा तऱ्हेचा १९०४ चे सुमारें एक सरकारी ठराव झालेला आहे. (खो. आ. पान १४२)

(१०) या कानूचा फायदा इनाम खोती गांवासही मिळण्याचा हक्क आहे—

कांहीं खोती गांव सर्व इनाम असून त्यांतील खोतांचा संबंध इनामदारांशीं येत असतो. अशा ठिकाणीं सरकारचा संबंध येत नसल्यामुळें खो. से. आक्टाचे चवथे भागाचा तेथें अंमल नाहीं असें मानलें जाण्याचा संभव आहे. परंतु ज्या ठिकाणीं अशा इनाम खोती गांवांतून सर्वे सेटलमेंट लागू करण्यांत आलें असेल तेथें खोती आक्टाचे चवथे भागाचा अंमल व्हावयाचा असतो. कारण या आक्टाचे सुरवातीसच रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व खोती गांवास हा आक्ट लागू आहे असें ठरविण्यांत आलें आहे. अशा रीतीनें चवथा भाग लागू असल्यामुळें सर्व सेटलमेंट लागू होण्यापूर्वीं खोत आणि कुळें यांचे दरम्यान जे ठराव असतील ते या कानू: प्रमाणें सेटलमेंट लागू झाल्यानंतर बदलणें केव्हांही इष्ट आहे. इतकेंच नव्हे तर रिकार्डिंग कामगारास, अशा रीतीनें बदलण्याबद्दल उभयपक्षीं अर्ज आल्यास पूर्वीचे

---

‡ "Before the act of God may be admitted as an excuse the defendant must himself have done all that he was bound to do."

§ "It is said that the land has deteriorated in value owing to floods, but that circumstance, if true, is no answer to the khot's demand for rent."

ठराव बदलून मोबदला-किंमत अगर पूर्वीचा नक्त ठराव, सर्व दस्तात्रे मानानें व शेकडा २५ टक्के फायदा याप्रमाणें वाढ केलीच पाहिजे. याबद्दलचा वाद देवगड तालुक्यांत कासार्डे या इनाम खोती गांवांसंबंधें उपस्थित झाला असतां १९०९ सालीं सरकारनें अशा प्रकारचा ठरावही केलेला आहे.

**कलम ३३ कानू ५—**

पिकाच्या हिशाची मोबदला-किंमत केव्हां नोंदतां येईल, आणि अशा नोंदीचा परिणाम

**(१) ज्या कुळानें थळ सर्वांशीं अगर अंशतः पिकाच्या हिशाचे रूपानें द्यावयाचें असेल त्यानें कोणत्याही वर्षी मे महिन्याच्या पहिल्या तारखेस किंवा त्या तारखेच्या आधीं अर्जी केली असतां, किंवा सेटलमेंट कामगारानें अशा सगळ्या पिकाच्या हिश्शाची मोबदला-किंमत ठरवून ती नोंदली पाहिजे; आणि तदनंतर ती मोबदला किंमत पोट-कानू (२) ह्याच्या ठरावांस पात्र राहून लगत पुढें येणाऱ्या मुलकी सालाच्या सुरवातीपासून, त्या कुळानें, त्यावेळापर्यंत जो पिकाचा हिस्सा त्याला द्यावा लागत होता त्या सगळ्या हिशाच्या बदला दिली पाहिजे.**

'मोबदला-किंमत' ह्या संज्ञेचा अर्थ, आणि ती कशी ठरवावी.

**(२) ह्या कानूंत 'मोबदला-किंमत' ह्या संज्ञेचा अर्थ द्यावयाच्या उत्पन्नाची पैशाचे रूपानें सरासरी किंमत असा आहे, आणि सेटलमेंट कामगारानें उलट प्रकारचा कोणताही समाधानकारक पुरावा नसल्यास, अशी पैशाच्या रूपानें किंमत आकारण्याकरितां, पिकाच्या अर्ध्या हिशाची किंमत त्या जमिनीवर बसविलेल्या सर्व आकाराच्या तिपटी इतकी, पिकाच्या तिसऱ्या हिशाची किंमत अशा आकाराच्या दुपटी इतकी व पिकाच्या इतर कोणत्याही हिशाची किंमत त्या आकाराच्या प्रमाणानें निघेल तितके पट धरून चाललें पाहिजे.**

माञ असें ठरविणेंत येत आहे कीं, ही कानू अंमलांत येण्याच्या दिवशीं विद्यमान असलेल्या कागदपत्रांमध्यें जा कोणतीही वर्कस जमीन, भातशेतीच्या संबंधानें राब तयार करण्याकरितां खरोखर वापरण्यांत येत असलेली जमीन ह्मणून नोंदलेली असेल त्या वर्कस जमिनीबद्दल द्यावयाच्या उत्पन्नाची मोबदला किंमत त्या जमिनीवरील सर्व आकारापेक्षां जास्त असतां कामा नये.

राबाच्या कारणासाठीं उपयोग केलेल्या वर्कस जमिनीसंबंधानें विशेष ठराव.

(३) जेव्हां पोट-कानू (१) अन्वयें मोबदला किंमत देणें झालेली असेल, तेव्हां रिकार्डिंग कामगारानें, तपासलेल्या सर्व सेटलमेंटच्या वेळीं, ती मोबदला-किंमत, त्या जमिनीवर बसविलेल्या सर्व आकाराच्या संबंधानें पोट कानू (१) याच्या ठरावांस अनुसरून तपासली पाहिजे, परंतु त्यानें ह्याप्रमाणें द्यावयाच्या थळाचा प्रकार बदलतां कामा नये.

मोबदला-किंमत तपासलेल्या सर्व सेटलमेंटच्या वेळीं तपासली जाण्यास पात्र आहे.

## टिपा

(१) उद्देश—

या कानूमध्यें मोबदला–किंमत कशी व किती ठरवावी हें सांगितलें आहे. सरकारचें १८६५ पासूनचें धोरण नेहमीं असें आहे कीं, खोत आणि कुळें यांचे दरम्यान थलीबद्दल कोणत्याही प्रकारची भानगड न उरतां कुळानें खोतास पैशाचे रूपानें काय द्यावें हें कायमचें ठरवून टाकावें. १८९८ मध्यें असा कायदा करण्याचेंही घाटत होतें. त्या हेतुप्रमाणें अभावणीची जेथें जेथें पद्धत आहे तेथें थलीचे किंमतींत रूपांतर करून त्याचें सरकार दस्ताशीं काय प्रमाण असतें तें पाहून त्याप्रमाणें सरकारदस्ताचे पटीचे रूपानें मोबदला–किंमत ठरवून द्यावी असें ठरविलें आहे. या कानूप्रमाणें मोबदला–किंमत ठरविण्यास खालील गोष्टींची आवश्यकता आहे.—

(१) खातेदार कुळानें अर्ज केला पाहिजे.

(२) अर्ज कोणत्याही वर्षी १ मे अगर त्याचे आंत केला पाहिजे.

(३) खातेदारास सर्वांशीं अगर अंशतः पिकाचा हिस्सा द्यावा लागत असला पाहिजे.

(४) ज्या पिकाचा हिस्सा द्यावा लागतो अशा सर्व पिकांबद्दल ठराव करून मागितला पाहिजे.

या चार अटींस अनुसरून अर्ज आल्यानंतर मोबदला–किंमत, कानु २ प्रमाणें, ठरविली पाहिजे. एकदां मोबदला–किमत ठरल्यानंतर ती रीत केव्हांही बदलतां येत नाहीं. फक्त सरकारदस्ताची तपासणी झाल्यास त्यामुळें पटीच्या मानानें होणारा फेरबदल करावयाचा असतो.

## (२) कुळानें अर्जी केली असतां—

कुळानें अर्ज केल्याशिवाय रिकार्डिंग कामगारास पट ठरविण्याचा या कानूनें अधिकार दिलेला नाहीं. आपण होऊन पूर्वीची नोंद मोबदला–किमतींत कामगारास बदलतां येणार नाहीं. अर्ज आलाच पाहिजे असा निर्बंध घालण्याचा हेतू असा दिसतो कीं कूळ आणि खोत यांच्यामध्यें योग्य रीतीनें सलोख्यानें चाललें असतां कोणासही त्यांत हात घालतां येऊं नये. कूळ आणि खोत यांत तक्रार उत्पन्न झाल्यास मात्र खातेदार कुळास अर्ज करण्याचा अधिकार दिलेला आहे. अर्ज आल्यानंतर रिकार्डिंग कामगारानें योग्य चौकशी वगैरे करून मोबदला–किंमत ठरवून द्यावयाची आहे. कांहीं ठराविक रीत नसून गांवाचें नांव, असल्यास धडा नंबर खातें नंबर, खोतांची नांवें व जमिनी यांचा स्पष्ट उल्लेख करून थळीचे देण्याचा शिरस्ता काय आहे तें, वगैरे माहिती नमूद करून सही करून अर्ज केला म्हणजे झालें.

## (३) अर्ज मे महिन्याचे पहिल्या तारखेस किंवा त्या तारखेचे आधीं केला पाहिजे—

अर्ज करणें तो १ मेचे आंतच केला पाहिजे. याचें कारण इतकेंच कीं रिकार्डिंग कामगारास चौकशी करण्यास योग्य कालावधि मिळून मुलकी सालाचे सुरवातीपासून म्हणजे १ ऑगस्टपासून मोबदला–किंमत देणें अंमलांत यावें. १ मेचे आंत याचा अर्थ १ मेपासून ३० एप्रिलपर्यंत १२ महिन्यांचे कालावधींत आलेले अर्ज होय. या गणनेप्रमाणें होणाऱ्या सालांत केव्हांही आलेल्या अर्जाचा निकाल १ ऑगष्टचे पूर्वी केला गेल्यास मोबदला–किंमत देणें होईल. १ ऑगष्ट नंतर निकाल झाल्यास त्याचा परिणाम पुढील सालच्या १ ऑगष्टपासून होतो.

## (४) लगत पुढें येणाऱ्या मुलकी सालाच्या सुरवातीपासून—

"लगत पुढें येणाऱ्या" याचा अर्थ अर्जाच्या तारखेनंतर येणाऱ्या मुलकी सालापासून असा करावयाचा नसून रिकार्डिंग कामगारानें अर्जाबद्दल ज्या दिवशीं निकाल दिला त्यानंतर येणाऱ्या मुलकी सालाचे सुरवातीपासून म्हणजे १ ऑगष्ट

पासून असा करावयाचा आहे. कुळानें १ मेचे आंत अर्ज द्यावा असा जो निर्बंध घालण्यांत आला आहे त्याचा हेतूच असा कीं रिकॉर्डिंग कामगारास १ ऑगष्टचे आंत निकाल देण्यास पुरेशी सवड मिळावी. परंतु कानूंमध्यें ज्या सालीं अर्ज आला त्याचे लगत पुढें येणारे सालाचे आंत निकाल दिलाच पाहिजे असा निर्बंध घातलेला नाहीं. त्यामुळें " लगत पुढें येणाऱ्या " याचा अर्थ निकालानंतर लगेच येणाऱ्या १ ऑगष्टपासून असा अर्थ करणें इष्ट आहे. अशा अर्थाचा सरकारी ठराव सन १९०८ चे सुमारें झालेला आहे. ( खो. आ. पा. १४३ पहा ).

(५) खातेदार कुळास पिकाचा हिस्सा द्यावा लागत असला पाहिजे—

ही अट फार महत्वाची आहे. कुळास पिकाचा हिस्सा द्यावा लागत नसून नक्त खंड अगर नक्त रुपये ठरलेले असतां, मग तो कितीही असो, पिकाची मोबदला किंमत ठरवून मागणेंचा त्यास हक्क नाहीं, कारण ठराविक थल करणेचा कायद्याचा हेतु पूर्वी सफल झालेलाच असतो. कुळास मोबदला–किंमत ठरल्यानें आपला फायदा होईल असें वाटल्यासही त्यास अर्ज करितां येणार नाहीं. त्याचप्रमाणें खोत आणि कुळें यांचे दरम्यान कबुलायती झाल्या असल्यास त्याचे कराराविरुद्धही कानु २ मधील अटीप्रमाणें करार असतां मोबदला–किंमत ठरवितां येणार नाहीं. फक्त ज्या ठिकाणीं पिकाचा हिस्सा द्यावा असा बोटखतास शेरा असेल त्या ठिकाणींच अर्ज आल्यास या कानूनें खातेदार कुळास मोबदला–किंमत ठरवून द्यावयाची आहे.

(६) सगळ्या पिकाच्या हिशाची मोबदला– किंमत पाहिजे—

ही अट मुद्दाम घातली असून खातेदार कुळानें आपल्या सबंध खात्यांतील ज्या जमिनींबद्दल पिकाचा हिस्सा द्यावा लागत असेल त्या सर्व जमिनींबद्दल मोबदला किंमत ठरवून मागितली पाहिजे. एका अगर कांहीं विवक्षित ठिकाणांबद्दल त्यास मोबदला–किंमत ठरवून मागतां यावयाची नाहीं. एका ठिकाणाबद्दल मोबदला–किंमत ठरविणेंविषयीं केलेला अर्ज बेकायदेशीर ह्मणून नामंजूर केला पाहिजे. मोबदला–किंमत सर्व खात्यांतील ज्या जमिनींबद्दल अर्धेल, तिर्धेल अशा तऱ्हेचा उत्पन्नाचे हिशाचा शेरा असेल अशांबद्दलच नेहमीं ठरवावयाची असते.

(७) " मोबदला–किंमत, " व ती कशी ठरवावी—

" मोबदला–किंमत " याचा अर्थ " द्यावयाचे उत्पन्नाची पैशाचे रूपानें सरासरी किंमत, " असा केला आहे. मोबदला–किंमत सरकारदस्ताचे पटींत ठरवावयाची असल्यामुळें " पट " असें लौकिक नांव पडलें असून तोच शब्द सर्वांच्या विशेष परिचयाचा आहे. सरासरी उत्पन्न ठरविण्याकरितां खोत आणि कुळें यांचा पुरावा पाहावयाचा असतो. अभावण्या, खतावण्या, कुळांनीं थल घातल्यावेळीं

मांडून दिलेल्या पावतीचोपड्या हा योग्य पुरावा असेंच मानलें पाहिजे. अभावणीप्रमाणें थल दिल्यानंतर कुळाचे चोपडीवर थल पोंचल्याबद्दल मांडून द्याव-याची असते व त्याप्रमाणें मांडून दिलेली असल्यास ती थल कायम धरलीच पाहिजे. खोतांच्या अभावण्या रद्द मानल्या एवढ्यावरूनच योग्य पुरावा नाहीं असें अनुमान न करितां कुळांनीं पोंच काय केली, याबद्दलचे खोताचे हिशोबाचे कागद, कुळांच्या पावतीचोपड्या वगैरे अवश्य पाहिले पाहिजेत व त्या मानानें येणारी पट ठरविली पाहिजे, (खो. आ. पान १४४). रिकार्डिंग कामगारानें कोणताही समाधानकारक पुरावा (any satisfactory evidence) असतां त्यावरूनच मोबदला–किंमत ठरविली पाहिजे. सरकारदस्त कमी आहे किंवा जास्त आहे हें पाहावयाचें नसतें. खोताला पैशाचे रूपानें थलीबद्दल सरासरी मिळावी याकरितां, थलीची जी सरासरीची किंमत होईल त्याचें सरकारदस्ताशीं काय प्रमाण पडतें तें पाहून तितकी पट मोबदला-किंमत ठरविली पाहिजे. पट नेमून देणें ही रिकार्डिंग कामगाराच्या मर्जीवर अवलंबून असलेली गोष्ट नाहीं. या बाबतींत महत्वाचे सरकारी ठराव पुष्कळ आहेत. व त्या मध्यें रिकार्डिंग कामगारानें सर्व तऱ्हेचा पुरावाच पाहिला पाहिजे असें ठरविलें आहे. सरासरी काढणें ती बहूतकरून कानू ३ प्रमाणें १२ वर्षांची थल किती खोतास मिळाली हें पाहून काढावयाची असते. बारा वर्षांचीच सरासरी पाहिली पाहिजे असा निर्बंध नसून १० वर्षें, अगर त्याहूनही कमी वर्षांची, सरासरी पाहिली असतां चालेल. बारा वर्षांबद्दलच पुरावा पाहिजे असें नसून कांहीं कमी वर्षांचा असला तरी चालेल, या अर्थाचा सरकारी ठराव १९०७ सालीं झालेला आहे, (खो. आ. पा. १४४). सरासरी काढितांना पिकाची किंमत ठरविली पाहिजे. ती किंमत त्या वेळच्या बाजारभावानें ठरविली पाहिजे. मोरभट वि. गंगाधर ८ मुं. २३४ या ठरावांत न्या. वेस्ट आणि न्या. नानाभाई यांनीं असें ह्मटलें आहे कीं "पैशानें किंमत याचा अर्थ बाजार भावानें किंमत असा असून, केवळ काल्पनिक लिलांवाचा ह्मणून ठरलेला दर नव्हे." यावरून सरासरी काढतांना मागील सालचे उत्पन्नाची त्या त्या सालचे प्रत्यक्ष बाजार भावानें किंमत काढून त्याचें सरकार दस्ताशीं प्रमाण काय बसतें कोणत्या पटींत बसतें हें ठरवावयाचें आहे. ही येणारी पट मोबदला–किंमत होय. बाजारभावानें किंमत ठरवावयाची; परंतु बाजारभाव सर्व वर्षभर सारखा राहात नाहीं, कमी जास्त होत असतो. तेव्हां एका वर्षातील बाजार भावाची सरासरी काढावयाची किंवा कसें असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. या बाबतींत चिपळूण तालुक्यांतील कालसूर गांवच्या खोतांनीं सरकारकडे अपील १९०८ सालीं केलें त्या कामीं सरकारी ठरावानें असें ठरलें आहे कीं बाजार भाव पाहाणें तो ज्यावेळीं थल घ्यावयाची त्यावेळीं जो बाजारभाव असेल त्या मानानेंच आकारणी करून बाजारभाव काढला पाहिजे. यावरून मोबदला–किंमत ठरवितानां जमिनीची थल ज्यावेळीं द्यावी असें ठरलेलं आहे त्यावेळीं किंमत काय हें पाहिलें पाहिजे, थल

केव्हां द्यावयाची तें कलम ४० रकम फ (६) यांत ठरलेलें आहे. अभावण्या, खता-बण्या व पावर्तीचोपड्या पुढें न आल्यास अगर बेकायदेशीर अर्थात् अग्राह्य ठरल्यास इतर पुरावा घेण्यासही प्रत्यवाय नाहीं. कूळ आपण किती पीक घातल्याचें कबूल करितो तें, मदत दावे झाले असल्यास त्यांतील ठराव, दिवाणी कोर्टामार्फत झालेले थलीबद्दलचे निवाडे, गांव जप्तीत असतां जप्तीदारानें पिकाचा अंदाज केला असेल तो, दिवाणी दाव्यांत पिकाचें मान ठरलें असल्यास तें, कुळाच्या जबान्या वगैरे हरएक प्रकारचा अन्य पुरावा असूं शकतो. असा असल्यास तो घेऊन त्यावरून मोबदला–किंमत काढली पाहिजे.

अशा रीतीनें कोणत्याही प्रकारें समाधानकारक पुरावा पुढें न आल्यास मोबदला किंमत कशी ठरवावी हें याच कानूंत सांगितलें असून पिकाची अर्धेल असा शेरा असतां दस्ताची तिप्पट, व तिर्धेल असतां दस्ताची दुप्पट ही मोबदला–किंमत ठरवावी असें सांगितलें आहे. १८९८ सालीं खोती आक्टाचे दुरुस्तीकरितां बिल (४) आलें त्यावेळीं सिलेक्ट कमेटीनें देशस्थितीबद्दलची माहिती गोळा करून असें ठरविलें होतें कीं, "प्रत्येक शेताच्या उत्पन्नाची किंमत पडणावळाचा विचार करून सरासरीनें त्या शेतावरील दस्ताच्या सहापटी इतकी असते किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे उत्पन्नाचा सहावा हिस्सा सर्व दरत असतो. * यावरूनच तिर्धेल म्हणजे सहापटीचा तृतीयांश व अर्धेल म्हणजे सहापटीचा द्वितीयांश असें प्रमाण ठरविलें आहे, व त्याप्रमाणें मोबदला–किंमत ठरवावयाची आहे.

(८) कवळाच्या जमिनीबद्दल केवळ सरकारदस्तच मोबदला-किंमत ठरवायाची–

वर्कस शेतीबद्दल तिर्धेलपेक्षां केव्हांही जास्त पिकाचा हिस्सा नसतोच, त्या मानानें वर लिहिल्याप्रमाणें सरकार दस्ताची दुप्पट मोबदला किंमत बसते. परंतु ज्या वर्कस जमिनीचा उपयोग केवळ शेतीच्या कवळ गवत वगैरे राबाकरितां होतो अशी खरोखर नोंद असेल अशा जमिनीबद्दल मोबदला–किंमत सरकारदस्ताइतकीच ठरवावयाची आहे. या बाबतींत एक अट फार महत्वाची आहे ती अशी कीं दुरुस्तीचे वेळीं, म्हणजे २१ जून १९०४ या दिवशीं, राबाची जमीन म्हणून नोंद असली पाहिजे. अशी नोंद असेल तरच सरकारदस्ताइतकी मोबदला–किंमत ठरवावयाची आहे. कुळानें लागवडीची पद्धत बदलल्यास कानु ४ प्रमाणें मोबदला किंमत दुरुस्त करून घेण्याचा अधिकार आहेच.

---

* "Statistics show that on the average, and making due allowance for fallows, the value of the crop of a field is equivalent to six times the assessment on that field, or in other words the assessment represents as a rule a sixth part of the produce."

(९) सर्वेदस्त वाढल्यास मोबदला किंमत वाढविली पाहिजे—

दर तीस वर्षांनीं सरकारदस्ताची तपासणी लँ. रे कोडप्रमाणें होत असते. अशी तपासणी झाल्यास पूर्वी पोटकानूप्रमाणें जी पट्ट ठरली असेल व त्या अटीप्रमाणें जी मोबदला किंमत ठरली असेल त्याचें प्रमाण योग्य राहणार नाहीं या करितां मोबदला-किंमतींतही फेरफार होणें इष्ट आहे. परंतु सरकारदस्ताशीं जें एकदां प्रमाण ठरलें तें कायमच राहाणार.

(१०) मोबदला-किमतीचा लोकलफंडाशीं संबंध नाहीं—

कानु ५ प्रमाणें जी मोबदला-किंमत ठरवावयाची तिचा संबंध सर्वे दस्ताशीं असतो. लोकलफंडाशीं तिचा कांहीं संबंध नाहीं. त्यामुळें लोकलफंडाच्या पटीवर मोबदला-किंमत केव्हांही आकारावयाची नसते. कलम ३६ पहा.

**कलम ३४—हक्कवाल्या खातेदारांनीं जीं थळें द्यावयाचीं ती गव्हर्नर-इन-कौन्सिल हे याबद्दल ज्या तारखांस, ज्या हप्त्यांनीं आणि या आक्टांतील ठरावांस विरुद्ध नाहीं अशा ज्या कानूंस अनुसरून द्यावी असें वेळोवेळीं ठरवितील त्या तारखांस, त्या हप्त्यांनीं आणि त्या कानूंस अनुसरून देणें होतील.**

हक्कवाले खातेदारांचीं थळें कशीं आणि केव्हां द्यावी.

## टीपा

(१) उद्देश

या कलमानें खोतास कुळांनीं द्यावयाच्या थळीं केव्हां द्याव्या हें ठरविण्याचा अधिकार गव्हर्नर-इन्-कौन्सिल यांस दिलेला आहे. गव्हर्नर-इन्-कौन्सिल याचा अर्थ ना. गव्हर्नर व त्यांचे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद, अशांचें कार्यकारी-मंडळ ( Executive Council ) हें होय. एकट्या गव्हर्नरास अगर कौन्सिलच्या सभासदास हा अधिकार दिलेला नाहीं. गव्हर्नर-इन्-कौन्सिलनें ज्या तारखा ठरवावयाच्या त्या या आक्टांतील ठरावांशीं विरोधी असतां कामा नयेत. आक्टाशीं विरोध आल्यास आक्टाप्रमाणें चालतां यावें याकरितां अशी स्पष्ट भाषा वापरली आहे या कलमांत ज्या नियमांचा उल्लेख केला आहे ते कलम ४० खालीं केलेले नियम होत.

(२) त्या कानूस अनुसरून—

कलम ४० प्रमाणें गव्हर्नर-इन्-कौन्सिल यांस निरनिराळ्या बाबतींत कानू करण्याचा अधिकार दिला असून त्याप्रमाणें कानू करण्यांत आले आहेत. त्यांतील

फ रकमेतील नियम ६ प्रमाणें तारखा व हप्ते ठरविले आहेत. या हप्त्याप्रमाणें दाव्याचें कारण ह्मणलें जात असल्यामुळें त्या महत्वाच्या आहेत. याबद्दल विशेष खुलासा कलम ७ टीप ४ पान ७० येथें केला आहे तो पहावा. थल देण्याची जागा कोणती असावी, याबद्दल खुलासा कलम ४० रकम ई नियम ६ शेवटच्या प्यारा येथें केला असून वहिवाटदारास अशी जागा कायम करण्याचा अधिकार दिलेला आहे.

## बाबी वगैरे विषयीं.

**कलम ३५—**

सर्व बाबी, वगैरे काढून टाकणें.

**कोणत्याही खोताला फसकी, वेठ, नांगरवेठ, वरताळा, किंवा दुसरी कोणतीही बाब, पट्टी, किंवा कोणत्याही प्रकारचा किंवा नांवाचा कर किंवा नोकरी कीं जी, या आक्टांतील ठरावाप्रमाणें कायदेशीर रीतीनें वसूल करावयाच्या थलाहून व्यतिरिक्त असतील, तीं हक्कवाल्या खातेदाराकडून घेणें कायदेशीर होणार नाहीं.**

### टिपा

**(१) उद्देश—**

खोत आणि कुळें यांचे संबंध एकाकाळीं फारच सलगीचे होते व एकमेक एकमेकांकरितां वाटेल ती झीज सोसण्यास तयार असत. अशावेळी कामकाजासंबंधें, मानपानासंबंधें वगैरे निरनिराळे रिवाज पडले व तेच पुढें कायम होत जाऊन अखेर त्यांची हक्क ह्मणून बजावणी होऊं लागली. सलगीनें एकमेकांत चाललेले व्यवहार कुळांस अखेर त्रासदायक व जुलमी वाटूं लागले अशा तऱ्हेचे गैर व अर्वाचीन संस्कृतीविरुद्ध असलेले कर व इतर बाबी बेकायदेशीर ठरवाव्या याकरितां हें कलम मुद्दाम घालण्यांत आलें आहे. या कलमानें कलम ३३ यांत जी थल कायदेशीर ठरली असेल त्या बाहेर कुळांकडून कर, व फसकी, वेठ वगैरे बाबी वसूल करणें बेकायदेशीर ठरविलें आहे.

**(२) बेकायदेशीर पट्ट्या, कर व मजुरी—**

कांहीं वर्षांपूर्वी कुळांकडून घेण्यांत येत असलेल्या पट्ट्यांचा विचार केला असतां, खोत कुळांकडून तो जें काय करील, भाजीपाला, घरदार, लग्नकार्य, मोल मजुरी इ. प्रत्येकावर कर घेत असत. पूर्वीच्या पट्ट्यापैकीं कांहीं मुख्य मुख्य येथें देणें इष्ट आहे. कासोई—खोताच्या घर शाकारणीकरितां गवत, टहाळ वगैरे प्रत्येक कुळांकडून ठरलेल्या वरंडी वगैरे; पेंढी—भाताचे पेंढ्या पैकीं कांहीं पेंढा; फसकी—दरमण धान्याला एक ओंजळभर धान्य; फडफर्मास—फळ झाडें, भाजीपाला वगैरे

लाविल्यास त्याचे उत्पन्नापैकीं भाग; फणसपोळी—कुळानें फणसाची अगर आंब्याची साटें घातल्यास त्यांतून कांहीं खोतास द्यावीं लागत; आंबसल पट्टी—तयार केलेल्या आंबसुलापैकीं; लग्नपट्टी—लग्न केल्याबद्दल खोतास शेलापागोटें व कांहीं रोख पैसे; ग्रामखर्च पट्टी—गांवसूली व इतर खातास कराव्या लागणाऱ्या गांवातील उठाठेवी-करितां कुळांकडून घेण्यांत येणारा खर्च; या शिवाय पोतदार पट्टी, दांडहांडी, हक्कदार पट्टी, नक्त पटी, गल्ले पट्टी, पंचोत्रा, खरेदीपट्टी—कोणताही जिन्नस खरेदी दिल्यास त्यावरील, घरपट्टी वगैरे प्रत्येक गोष्टीवर किंबहुना नवीन मूल झाल्यास त्याबद्दलहि झोईपट्टी घेण्यांत येई. ठराविक अर्धेल तिर्धेल प्रमाणें मक्ता घेण्यांत येऊन शिवाय दर मणास पांवली अगर दोन पावलीं या प्रमाणें वरताळा घेण्यांत येत असे -हा वरताळा घेण्याची अद्यापहि रीत चालू आहे.

याप्रमाणें उत्पन्नाच्या व खर्चाच्या प्रत्येक बाबींवर पट्या असून शिवाय कुळाच्या आंगमेहनतीवरही कर होता. कुळाकडून फुकट मजुरी घेण्याचा प्रघात होता व अजुनही बरेच गावांत राजरोसपणें चालू आहे. यास वेठ असें ह्मणतात. वेठ याचा अर्थ कुळानें हंगामीं खोताकडे वर्षांतून ठराविक दिवस फुकट काम करणें, असा आहे. खोतास वेठीची पैरी लागेल तेव्हां बोलावण्याचा अधिकार असे. पैऱ्यास खोतानीं फक्त एक वेळ जेवण द्यावयाचें असे. याच प्रमाणें कुळाजवळ असलेल्या नांगरावरही कर होता त्यास नांगरवेठ ह्मणतात. कुळानें आपला नांगर घेऊन वर्षांतून कांहीं ठराविक दिवस खोताची जमीन फुकट नांगरून द्यावयाची असे नांगरकी करणें ती कुळानें आपल्या सवडीप्रमाणें न करितां खोताच्या मर्जीप्रमाणें खोत बोलावील त्यावेळीं करावयाची असे. अशा प्रकारचे मोलमजुरीवरही कर असत.

अशाप्रकारे घेतल्या जाणाऱ्या, वर नमूद केलेल्या अगर न केलेल्या सर्व पट्या व कर व मजुरी बेकायदेशीर ठरविण्यांत आल्या आहेत. या कलमामध्यें अशा बेकायदेशीर गोष्टी करणारास जरी शासन काय तें सांगितलें नसलें तरी इंडियन पीनल कोड प्रमाणें त्या गोष्टी दंडास व शिक्षेस पात्र आहेत. उ. बळजबरीनें मजुरी घेणें हा इं. पी. कोड कलम ३७४ प्रमाणें गुन्हा आहे.

**(३) कुलाबा जिल्हांतील खोती गांवांतही या बाबी व कर बेकायदेशीर होत—**

खोती से० आक्ट लागू नाहीं अशा खोती गांवीं सुद्धां अशा तऱ्हेची वेठ-बगार घेणें, पट्या व कर वसूल करणें या गोष्टी बेकायदेशीर आहेत. या बाबतींत सरकारनें सन १८३९ चा मुं. आक्ट २० व १८४४ चा मुं. आक्ट १९ हे महत्वाचे आक्ट पास केले असून त्यावरून कलम ३५ प्रमाणें प्रत्येक बाबी बेकाय-देशीर ठरविल्या आहेत. हे आक्ट अद्याप योग्य असल्याचें, कल्याणरायाजी वि. माक्यूझिल कंपनी १४ मुं. १२६ व नसरवानजी वि. डेप्यूटी कमिशनर २ मुं. हा. रि. ८० यांत ठरलें आहे.

कलम ३६—सन १८६९ चा मुंबईचा लोकल फंड आक्ट, कलम ६, या प्रमाणें सरकार वेळोवेळीं जो दर ठरवितील त्या दरानें लोकलफंड सेस, खोताचे जमेचे प्रत्येक रुपयावर त्याच्याकडून सरकारास वसूल करितां येईल.

*लोकलफंड सेसाविषयी खोताची पात्रता.*

सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा, कलमें ८६ व ८७ याप्रमाणें धारेकरी व कच्चे धारेकरी यांजकडून त्यांचे प्रत्येकाच्या "धारण केलेल्या" जमिनींचे सर्वे आकाराच्या प्रत्येक रुपयावर सदहु बाब सदई दरानें वसूल करण्याविषयीं खोतास मदत मिळण्याचा हक्क आहे.

*धारेकरी व कच्चे धारेकरी कितपत सेस देण्यास पात्र आहेत.*

कोणी जमिनीचे कनिष्ठ धारण करणारे लोकलफंड सेस देण्यास पात्र नाहींत. याविरुद्ध सन १८६९ चा मुंबईचा लोकलफंड आक्ट कलम ८ यांत कोणताही ठराव असला तरी चिंता नाहीं.

*दुसरे कनिष्ठ धारणकरणारे बाब देण्यास पात्र नाहींत.*

(हें कलम सन १९१३ चा मुं. आक्ट ४ कलम ९१ वरून दुरुस्त केलें असून त्याप्रमाणें दुसऱ्या प्याऱ्यांत 'खात्यांच्या' या शब्दाऐवजीं "धारण केलेल्या" हे शब्द घालण्यांत आले आहेत.)

## टिपा

(१) उद्देश—

सन १८६९ चा मुं. आक्ट ३ लोकलफंड आक्ट कलम ६ प्रमाणें खोताचे जमेवर एक रुपयास एक आणा याप्रमाणें लोकलफंड घ्यावयाचा असून तो देण्यास लॅं. रे. कोड कलम १३६ प्रमाणें खोत मुख्यतः जबाबदार आहे. खोत जरी मुख्यतः जबाबदार असला तथापि त्यास धारेकरी व कच्चा धारेकरी यांकडून लोकलफंड सेस या कलमाप्रमाणें वसूल करितां येतो. तसा त्यांनीं न दिल्यास तो वसूल करण्याकरितां मदतदावा करण्याची मुभा या कलमानें दिलेली आहे. खातेदार कुळें अगर साधीं कुळें यांचेकडून लोकलफंड सेस खोतास

वसूल करितां येत नाहीं, मात्र खातेदाराची थल आकारितांना स्वोतास किमानपक्ष सरकारदस्त लोकलफंड व त्यावर शेकडा २५ टक्के फायदा याप्रमाणें आकारून मिळावयाचें असें कलम ३३ कानु ४ पो. का. ३ प्रमाणें ठरविलें असल्यामुळें थलीचे रकमेंत लोकलफंडाची रक्कम येते असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

(२) लोकलफंडाची रक्कम कशावर आकारावयाची—

लोकलफंडाची आकारणी कशी करावी हें लोकलफंड आक्ट कलम ७ यांत सांगितलें असून, गांवचा सरकारदस्त ज. लँ. रे. कोडाप्रमाणें ठरलेला असेल तर घर्षाला द्याव्या लागणाऱ्या दस्तावर लोकलफंडाची आकारणी करावी. १८६३ चा आक्ट १ व ७ याप्रमाणें सेटलमेंट झालें असल्यास सेटलमेंटकरितां जो दस्त ठरविला त्यावर आकारावी, व ज्यावेळीं या दोहोंपैकीं कोणत्याही प्रकारें दस्त ठरलेला नसेल, त्यावेळीं कलेक्टरकडे नोंद असलेल्या जुन्या कमाल दरावर, अगर नोंद नसेल तेव्हां कलेक्टर व जमिनदार यांचे मतानें ठरेल तो लोकलफंड सेस घ्यावा असें ठरलें आहे. कलम ८ प्रमाणें हा सेस जमीन महसुलाप्रमाणेंच वसूल करण्यांत यावा असें ठरविलें आहे; दस्त ठराविक नसेल तेव्हां धारेकरी अगर कच्चा धारेकरी यांजकडून जमिनीचे मानानें जें दस्ताचें प्रमाण असेल त्या मानानेंच लोकलफंड घेतला पाहिजे, सुलैम न. वि. येसू १८७४ प्रि. ज. २९. खातेदारकुळें, साधीं एकसाली कुळें यांवर कोणत्याही प्रकारें जबाबदारी नाहीं. त्यांनीं आपली थल दिली ह्मणजे झालें.

(३) मदतदावे—

या संबंधाची संपूर्ण माहिती कलम ३१ खालीं दिली आहे, (पान २२०।२२१ पाहा). लोकलफंडाचे बाबतींत धारेकरी व कच्चे धारेकरी यांचे विरुद्धच फक्त मदत मिळूं शकेल. खातेदार कुळांविरुद्ध मदत मिळणार नाहीं.

# भाग ५

## किरकोळ

कलम ३७—ज्या गांवास हा आक्ट लागू हे तो त्या गांवची जमीन महसुलाचीं हेल्लींचीं सर्व सेटलमेंटें गव्हर्नर-इन्-कौन्सिल यांच्या हुकूमावरून केलेलीं व बहाल व मंजुर केलेलीं आहेत तीं, कायदे शीर रीतीनें केलेलीं आहेत असें समजलें पाहिजे आणि पुढें दुसरे रीतीचा ठराव केलेला आहे तो खेरीजकरून, हा आक्ट ठरला नसता तर त्याला जो कायदा लागू झाला असता त्या कायद्याचे सर्व ठरावांस अनुसरून ज्या निरनिराळे मुदतीचें अभय दिलें असेल त्या निरनिराळे मुदतीपर्यंत तीं अंमलांत राहतील, आणि या आक्टांतील कोणतीही एखादी गोष्ट मदहू कोणत्याही ठरावांविरुद्ध असेल, तर ती मदहू सेटलमेंटांस लागू होत नाहीं असें समजावें.

हल्लींची सर्व सेटलमेंटें बहाल केलीं.

टीपा

**(१) उद्देश—**

खोती हे आक्ट गतकालसापेक्ष नाहीं ही गोष्ट निश्चित आहे. कोणताही कायदा गतकालसापेक्ष होण्यास तसा कायद्यांत स्पष्ट उल्लेख लागतो. याकरितां जुन्या सर्व सेटलमेंटाचे बाबतींत तीं योग्य ठरविण्याकरितां या कलमाची योजना केलेली आहे. या कलमानें जुनीं खोती सेटलमेंट आक्टाच्या पूर्वीचीं जीं सेटलमेंटें गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेलीं मंजूर केलेलीं आणि कायम केलेलीं असतील तीं सर्व योग्य असें ठरविलें आहे.

**(२) अभय दिलेल्या मुदतीपर्यंत सेटलमेंट कायम राहील—**

सरकारनें कोणतेंही सेटलमेंट लागू केलें असतां त्यांत कांहीं वर्षें हें सेटलमेंट सर्वतोपरी कायम राहील असें अभय दिलेलें असतें. १८६५ च्या आक्ट १ मध्यें त्या आक्टाप्रमाणें अमलांत आलेलीं सेटलमेंटें २७ ते ३० वर्षें अवधीपुरतीं अभय दिलेलीं असत. या सरकारचे वचनास बाध येऊं नये या करितां हें कलम घातलेलें आहे.

अभय ज्या वेळीं दिलें त्यावेळीं जें सेटलमेंट झालें तेंच त्या मुदतीपर्यंत कायम राहाणें इष्ट असल्यामुळें खोती से. आक्टांत जर कांहीं विरोधी भाग असेल तर तो अभयाचे मुदतीपर्यंत गैर लागू समजावा, असें स्पष्ट ठरविलें आहे. खोती से. आक्ट लागू असलेल्या सर्व भागांत मागील अभयाची मुदत संपून गेली असल्यामुळें या कलमाचा अंमल फक्त त्या सेटलमेंटच्या कायदांचा विचार कर्तव्य असेल त्या वेळींच व्हावयाचा आहे.

हल्लींच्या सेटलमेंटाचे बदला नवीं सेटलमेंट कारितां येतील.

**कलम ३८—सदहु कोणत्याही अभयाची मुदत संपल्यावर किंवा गव्हर्नर इन् कौन्सिल यांस वाटेल कीं सदहु अभय ज्यांस लागू आहे असे जमीन धारण करणारे असतील त्यांतून अर्धेअधिक अशी इच्छा करितात कीं, सदहु मुदत (ती मुदत गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं ठरवावी) संपण्याचे पूर्वी कोणत्याही वेळीं ज्या गांवांमध्यें सदहु अभय अमलांत होतें त्या गांवांत नवें सर्वे सेटलमेंट चालू करावें, तर नवें सेटलमेंट चालू करावें, आणि या आक्टाचे ठराव त्यापुढें सदहु सेटलमेंटास लागू होतील, दुसरे कोणत्याही कायद्यांत याविरुद्ध कांहीं असलें तरी चिंता नाहीं.**

## टिपा.

(१) उद्देश—

या कलमाचा संबंध कलम ३७ मधील "पुढें दुसरे रीतीचा ठराव केलेला आहे तो खेरीज करून" याकडे असून, अर्धा अधिक जमीन धारण करणारांनीं जुनें सेटलमेंट बंद करून नवें चालू करावें अशी इच्छा प्रदर्शित केल्यास अभय मोडून नवीन सेटलमेंट चालू करण्याची या कलमानें गव्हर्नर इन् कौन्सिल यांस सवड दिली आहे. नवीन सेटलमेंट अमलांत आणतांना लॅं. रे. कोडप्रमाणें नोटिसा काढणें वगैरे सर्व गोष्टी केल्याच पाहिजेत, एरवीं त्यांस कायद्याचें स्वरूप यावयाचें नाहीं.

सन १८७९ चा मुं. जमीन महसुलाचा कायदा खोती गांवांस कितपत लागु पडणार नाहीं.

**कलम ३९—ज्या गांवास हा आक्ट लागू होतो त्या गांवास सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा, कलमें १८, ७२, ७३, ७४, कलम १०४ चा दुसरा पारिग्राफ, कलमें ११२, ११७ अ,**

११७ ब, कलम १५० याची रकम ( ब ) किंवा कलम १५३, यांतील कोणताही मजकूर लागू होतो असें समजूं नये.

सदर्हु कायद्यांतील ठराव सदर्हु प्रकारच्या कोणत्याही गांवास लागू करण्यांत येतील त्या ठरावांत खालीं लिहिल्याप्रमाणें फेरफार आहेत असें समजलें पाहिजे, ( म्हणजे ):—

(अ) ( १९१३ चा मुं. आक्ट ४ नें रद्द केलें )

(ब) सदर्हु कायद्याचीं क. ११८, ११९ आणि १२३ यांत 'पाटील' "आणि गांवचे दुसरे अंमलदार" हे शब्द आणि "गांवचे अंमलदार व नोकर" हे शब्द जेथें असतील, तेथें तेथें त्या शब्दांचे बदला "खोत" हा शब्द लिहिला आहे याप्रमाणें तीं कलमें वाचावीं व त्याप्रमाणें त्यांचा अर्थ समजावा.

(क) खोत, कलम १३६ याच्या कारणासाठीं त्यांच्या गांवाच्या जमेबद्दल सरकारास प्रथम जबाबदार मनुष्य आहे असें समजलें पाहिजे.

(ड) कलम १५० रकम (फ) यांतील दुमाला हा शब्द गाळला आहे असें समजलें पाहिजे, आणि

(इ) सदर्हु प्रकारचा गांव हा आक्ट अंमलांत येण्याच्या तारखेस जप्तींत असेल तर, तो गांव परत मिळण्यासाठीं कलम १६२ या अन्वयें अर्ज्या सदर्हु तारखेनंतरच्या ऑगस्ट महिन्याचे पहिले तारखेपासून १२ वर्षांच्या आंत करण्याचा अधिकार आहे.

(या कलमाचा पहिला प्यारा सन १९१३ चा मुं. आक्ट ४ वरून नवीन दाखल केला असून अ रकम रद्द करण्यांत आली आहे.)

— जुनें कलम —

पहिला प्यारा— ज्या गांवास हा आक्ट लागू होतो त्या गांवास सन १८७९ चा, मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा, कलमें ६७, ७२, ७३,

७४, ९९ रकम (ब), १०४ चा भाग २ ए, ११२, १५० रकम (ब) व १५३ यांतील कोणतीही गोष्ट लागू होते असें समजूं नये.

(अ) रकम— जेव्हां कलम १०३ याप्रमाणें सदहु कोणत्याही गांवांत सर्वे सेटल्मेंट चालू करावयाचें असेल तेव्हां, प्रत्येक सर्वे नंबरावर बसविलेला आकार जाहीर रीतीनें सांगावयाचा त्या ऐवजीं प्रत्येक खातेदारानें द्यावयाचें थळ आणि खोतानें द्यावयाच्या जमेचा आकार हें सांगावें.

## टिपा.

(१) उद्देश—

ह्या कलमानें खो. से. आक्ट आणि लँ. रे. कोड यांचा जेथें जेथें परस्पर विरोध येण्याचा अगर द्विरुक्ति होण्याचा संभव आहे तेथें तेथें कोणता भाग रद्द समजावयाचा व कोणता भाग कितपत लागू आहे असें समजावयाचें हें या कलमांत सांगितलें आहे. जमीन महसुलाचे बाबतींत लँ. रे. कोड फार महत्वाचें असल्यामुळें त्यांतील कलमें पुष्कळ अंशीं खोती गांवांसही लागू आहेत, परंतु विरोधी संबंध जेथें येतो तेथें कोणता कायदा मुख्यत्वें लागू करावयाचा असा प्रश्न पडूं नये याकरितां हें कलम स्पष्टपणा आणण्याकरितां घातलेलें आहे. या कलमांत नमूद केलेलीं लँ. रे. कोडाचीं कलमें काय आहेत, त्याचा परिणाम काय, विरोधी संबंध कसा वगैरे सविस्तर टिपा दिल्या आहेत; पूर्वींही वेळोवेळीं या कलमांचा ठिकठिकाणीं विचार आलाच आहे.

(२) लँ. रे. कोड कलम ६८ व खो. से. आक्ट क. ४—

लँ. रे. कोड कलम ६८ मध्यें खातेदाराकडे जमिनी कोणत्या अटींवर चालू राहातात हें सांगितलें असून "त्या जमिनीबद्दल जमीन महसुलाच्या ज्या रकमा देणें असतील त्या रकमा तो देत राहील तर, आणि त्याच्या सत्ताप्रकारास इतर कोणत्याही शर्ती किंवा अटी कायदेशीर रीतीनें जोडलेल्या असतील त्या पुऱ्या करीत राहील तर" चालू राहातील, ही मुख्य अट नमूद केली आहे. सरकारदस्त देण्यावर सत्ताप्रकार धारण करणाराकडे जमिनी चालू राहाणें अगर न राहाणें हें अवलंबून असतें. त्याचप्रमाणें इतर कांहीं कायद्यानें पडणाऱ्या जबाबदाऱ्या जमीन धारण करणारांवर ठेविलेल्या आहेत. खोती आक्टाचे बाबतींत सरकारदस्ताची व इतर कायदेशीर गोष्टींची जबाबदारी कोणावर अवलंबून आहे हें खो. से. आक्ट कलम ४ यांत व कलम ७।८ यांत सांगितलें आहे, व सर्व जबाबदारी वरिष्ठ धारणकरणारे खोत यांचेवर टाकिलेली आहे. धारेकरी, कचे धारेकरी व खातेदारकुळें यांचेवर

खोतास थल देण्याची जबाबदारी आहे, परंतु जमा वारण्याची सर्व जबाबदारी खोताखरच आहे. रयतवारी गांवांत सर्व खातेदारावर (Occupant) कलम ६८ प्रमाणें येणारी जबाबदारी वरिष्ठ धारण करणारा या नात्यानें कलम ४ अन्वयें खोतावर येते. खालसा धारेकरी गांवांत व कुलाबा जिल्ह्यांत कलम ६८ हेंच लागू धरावयाचें आहे. ( मागें पानें ४७।४८ पाहा )

(३) लँ. रे. कोड क. ७२ व खो. से. आक्ट कलम १०—

लँ. रे. कोड कलम ७२ मध्यें हिंदू, मुसलमान अगर बुद्ध धर्माचा खातेदार " मृत्युपत्र केल्यावांचून अगर मशहूर वारसांवांचून मरण पावेल तर " त्यानें धारण केलेली जमीन कलेक्टरानें विकावी असें ठरविलें आहे. परंतु हें कलम खोती आक्टाचे कलम १० शीं विरोधी आहे, हें कलम १० वाचलें असतां ध्यानांत येण्यासारखें आहे. कलम १० प्रमाणें गतकुळी जमीन खोताकडे खोतनिसबत जमीन म्हणून यावयाची असते. (पान १०३ पाहा.) अशा विरोधी स्थितींत कलम १० चें प्राधान्य आहे ही गोष्ट कलम ७२ लागू नाहीं असें ठरविल्यानें सिद्ध आहे.

(४) लँ. रे. कोड कलम ७३ खो. से. आक्ट कलम ९—

लँ. रे. कोड कलम ७३ मध्यें खातेदारानें धारण केलेली जमीन (occupancy) ही " वारसांकडे चालण्याजोगी व दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगी मालमिळकत " आहे असें सांगितलें आहे. या कलमाचा कलम ९ शीं थोडा विरोधी संबंध आहे. कलम ९ मध्यें सर्व धारण केलेल्या जमिनी वारशानें चालणाऱ्या आहेत असें ठरविलें आहे; परंतु वर्ग करण्याचे बाबतींत खातेदार कुळांचे हक्क नियमित केलेले आहेत. खोत, धारेकरी यांस वर्ग करण्याचा पूर्ण अधिकार आहे. खातेदार अथवा निरंतरचे कुळाचे बाबतींत मात्र हा हक्क नियमित केला असून, कलम ९ मध्यें दिलेल्या अटी असतील तरच फक्त त्यांस वर्ग करण्याचा अधिकार आहे. कलम ७३ व कलम ९ यांचा विरोध खातेदार कुळांचे बाबतींतच फक्त आहे, बाकी विरोध नाहीं.

(५) लँ. रे. कोड कलम ७४ व कलम १०—

लँ. रे. कोड कलम ७४ मध्यें खातेदारानें " जमिनीचा राजिनामा देणें तो कोणत्याही मनुष्यासाठीं कायदेशीर रीतीनें असलेल्या कोणत्याही हक्कांस, सत्ताप्रकारांस, बोजांस किंवा न्याय्यहक्कांस पात्र राहून कोणत्याही सालाचे मार्चच्या ३१ वे तारखेपूर्वी " मामलेदार अगर महालकरी यांस लेखी नोटीसीनें कळवून दिला पाहिजे, असें ठरविलें आहे. लँ. रे. कोड कलम ७४ प्रमाणें राजिनामा दिल्यास सर्व हक्क बोजे कायम राहतात. खो. से. आक्ट कलम १० मध्यें राजिनाम्याचे बाबतींत स्पष्ट ठराव केला असून कलम ७४ प्रमाणें खातेदारकुळानें राजिनामा दिलेल्या

जमिनीवर कोणाचाही कसलाही हक्कसंबंध शिल्लक राहूं शकत नाहीं, व राजिनामा दिलेली जमीन खोताची होते असा ठराव केला आहे. (पान १७६ पाहा) कलमें ७४ मधील तत्वांचा समावेश खोती से. आक्टाचे कलम १० मध्यें खोती आक्टाचे तत्वानुरूप केलेला आहे, करितां कलम ७४ गैर लागू आहे असें ठरविलें आहे.

## (६) लँ. रे. कोड कलम १०४ ग्या. २ व कलम १०—

लँ. रे. कोड कलम १०४ ग्या. २ यामध्यें सर्वे सेटलमेंटची तपासणी होऊन दस्त वाढला असतां खोतदार "सदर्हु प्रकारच्या नवीन बसविलेल्या जास्ती दराने नाराजी होईल तर", त्या जमिनीचा दस्त वाढला असेल त्या सर्वे नंबरचा अगर त्यांतील पोटनंबरचा कलम ७४ प्रमाणें राजिनामा देण्याची त्यास म.कळीक ठेविलेली आहे. परंतु खो. से. आक्टाचे कलम १० मध्यें राजिनाम्याविषयीं सविस्तर ठराव केला असल्यामुळें हा भाग खोती से. आक्ट लागू असलेल्या खोती गांवास गैर लागू समजावयाचा आहे.

## (७) लँ. रे. कोड कलम ११२ व कलम ३७—

कलम ११२ मध्यें "गव्हर्नर–इन्–कौन्सिल यांच्या हुकमावरून केलेलीं व महाल केलेलीं, मंजुर केलेलीं जमीनमहसुलाचीं सर्वे सेटलमेंटें जीं हल्लीं चालू असतील तीं अमलांत राहातील व अंमलांत आहेत" असें ठरविलें आहे. त्याच कलमाप्रमाणें खोती गांवाचे बाबतींत खो. से. आक्ट कलम ३७ नें गव्हर्नर–इन्–कौन्सिलनें मान्य केलेलीं सेटलमेंटें योग्य आहेत असा ठराव केला असल्यामुळें कलमें ११२ व कलम ३७ हीं अगदीं एकाच स्वरूपाचीं आहेत, करितां कलम ११२ खोती गांवास लागू नाहीं असें ठरविलें आहे.

## (८) कलम ११७ अ व कलम १८—

लँ. रे. कोड कलम ११७ अ हें १९१३ सालीं लँ. रे. कोडांत नवीन घालण्यांत आलें असून, त्यांत "जमिनींत हक्क प्राप्त झाले असल्यामुळें किंवा कोणत्याही इतर कारणांसाठीं सर्वे नंबरचे जितके जरूर असतील तितके पोटविभाग वेळोवेळीं आणि कोणत्याही वेळीं करण्याचा अधिकार" कलेक्टरास आहे व हें कृत्य गव्हर्नर इन्-कौन्सिलनें केलेल्या कानूंअन्वयें केलें पाहिजे, असें ठरविलें आहे. खो. से. आक्ट लागू असलेल्या गांवांचे बाबतींत सेटलमेंट कसें करावें, त्यामध्यें एकदां झालेल्या नोंदी केव्हां बदलाव्या वगैरे सर्व गोष्टी कलम १८ मध्यें ठरविलेल्या

टीप—१९०४ च्या खो. से. आक्टाच्या या कलमांत कलमें ९९ ब, १९० व ११० यांचा उलेख केलेला होता परंतु तीं कलमें लँ. रे. कोडांतून १९१३

आहेत. सर्वे नंबरच्या बाबतीत दुरुस्ती केव्हां करावी हें कलम १८ मध्यें सविस्तर सांगितलें असल्यामुळें कलम ११७ (अ) चा अंमल करणें केव्हांही इष्ट नाहीं. खोती से. आक्टाशीं विरोध येण्याचा संभव असल्यामुळें कलम ११७ (अ) गैर लागू ठरविलें आहे.

(९) लँ. रे. कोड कलम ११७ ब व कलम १०—

"लँ. रे. कोड कलम ७४ प्रमाणें सर्वे नंबर पैकीं एकाद्या पोटविभागाचाच जर खातेदारानें राजिनामा दिला अगर दस्त न दिल्यामुळें सरकारजमा झाला तर, तो तुकडी त्याच सर्वे नंबरपैकीं इतर तुकडेवाल्यांस देऊं केला पाहिजे" वगैरे कलम ११७ (ब) यांत सांगितलें आहे. प्रथम खो. से. आक्टाप्रमाणें असे तुकडे पाडतां यावयाचे नाहींत आणि पाडले तरी कलम १० च्या ठरावांअन्वयें त्याचेकडे कलेक्टरचा कांहीं हक्क संबंध पोंचत नाहीं, ह्मणून या कलमाचा खो. से. आक्टाचे दृष्टीनें कांहीं उपयोग नाहीं.

(१०) लँ. रे. कोड कलम १५० ब व १५३ आणि कलम १०—

लँ. रे. कोड कलम १५० (ब) यामध्यें "ज्या खात्याबद्दल किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीबद्दल बाकी येणें असेल तें खातें, किंवा धारण केलेली जमीन कलम १५३ याअन्वयें सरकार दाखल करावी," असें सांगितलें असून, कलम १५३ मध्यें अशीं खातीं किंवा बिनसरकारी जमिनी सरकारदस्त न दिल्यामुळें सरकाराकडे खालसा झाल्या असें पुकारण्याचा व कलम ५६।५७ प्रमाणें विकण्याचा कलेक्टरला अधिकार दिलेला आहे. खोती गांवांत खातेदारांच्या जमिनीकडे कलेक्टरला कलम १० प्रमाणें हक्क ठेविलेला नसल्यामुळें, खातें खालसा करणें, वगैरे गोष्टींकडे कलेक्टरचा कांहीं संबंध येतच नाहीं. शिवाय खोतांच्या बाबतींत खो. से. भाग ४ प्रमाणें सर्व व्यवस्था झाल्यानंतर, सरकारदस्ताची बाकी खोताकडे थकण्याचा प्रसंगच येत नाहीं व आला तरीही लँ. रे. कोड कलम १५० (ब) व १५३ यांचा अंमल करावयाचा नसतो, कारण (ड) रकमेंत खोती गांवास "दुमाला" शब्द लागू नाहीं असें ठरविलें आहे.

(११) जुनें पोट कलम अ—

लँ. रे. कोड कलम १०३ मध्यें "कलम १०० व १०१ यांअन्वयें कोणत्याही जमिनीवर ठरविलेला आकार कलम १०२ अन्वयें बसविण्याची मंजुरी मिळाली असेल व तिजबद्दल गव्हर्नर-इन्-कौन्सिल यांनीं या बाबतींत दिलेल्या कानूस अनुसरून नोटीस देण्यांत आली असेल तेव्हां ज्या जमिनींचा सारा मंजुर झाला असेल त्या जमिनींच्यासंबंधें सेटलमेंट चालू करण्यांत आलें असें समजलें

पाहिजे" असें ठरविलें आहे. हा लँ. रे. कोडाचा भाग खोती गांवांसही लागू आहेच; कारण नवीन सर्वे वगैरे करणें झाल्यास ती किंवा सरकारदस्त ठरविणें, कायम करणें वगैरे सर्व कामें लँ. रे. कोडाप्रमाणें चालावयाचीं असतात. (अ) रकमेंत प्रत्येक हक्कवाल्या खातेदारानें द्यावयाचें थल व खोतानें द्यावयाच्या जमेचा आकार सांगावे असें होतें. परंतु कलम ३३ मध्यें हक्कवाल्या खातेदारांनीं थळ काय द्यावी हें ठरविण्याविषयीं भरपूर कायदा असून, कलम २४ मध्यें खोतानें सबंध गांवची जमा काय द्यावी हें ठरवावें असेंहि ठरविलेलें आहे, तेव्हां (अ) रकमेनें केवळ या दोन कलमांचीं द्विरुक्ति होत असल्यामुळें, ती १९१३ च्या दुरुस्तीमध्यें गाळलेली आहे.

(१२) कलमें ११८ व ११९; हद्दींचा प्रश्न—

सर्वे सेटलमेंट लागू झाल्यानंतर प्रत्येक सर्वे नंबरच्या, त्याचप्रमाणें गांवच्या हद्दी कायम करण्यांत येतात. परंतु पुष्कळ वेळां या हद्दीसंबंधें वाद उपस्थित होतो. गांवच्या हद्दीसंबंधें वाद उपस्थित झाल्यास तो वाद कसा मिटवावा याबद्दलचा ठराव लँ. रे. कोड कलम ११८ मध्यें केला असून, सर्वे नंबरच्या हद्दींचा वाद उपस्थित झाल्यास तो कसा सोडवावा हें कलम ११९ मध्यें सांगितलें आहे. गांवच्या हद्दी मधील वाद तोडण्यासंबंधें कलम ११८ मध्यें दोन्ही गांवचे खोत "त्यांच्या गांवांची परस्पर सामायिक हद्द अमुक एका रेषेनें आहे असें स्वसंतोषानें कबूल करतील तेव्हां हद्द ठरविणाऱ्या अंमलदारानें सदर्हु पक्षकाराजवळून त्याप्रमाणें कबुलायत लिहून घ्यावी व मग कबूल केलेल्या रीतीप्रमाणें हद्द ठरवावी," आणि याप्रमाणें कोणत्याही गांवची हद्द ठरली म्हणजे ती अखेरची ठरली असें समजावें. मात्र कबुलायत कपटाची, धमकीची अगर कायद्याविरुद्ध इलाज करून मिळविलेली नसावी. समेट न झाल्यास नकाशा काढून, तकरारींची चौकशी करून "खटल्यांचा निवाडा करावा" इ. सांगितलें आहे. खोत हा शब्द दोन्ही कलमांचे भाषेत गोंवावयाचा असल्यामुळें दोन्ही कलमें खोती गांवांस पूर्णपणें लागू आहेत.

दोन गांवचे हद्दीचे प्रश्नाप्रमाणेंच दोन शेतांतील अगर सर्व्हे नंबरांतील हद्दींचा वाद उपस्थित झाला असतां कलम ११९ मध्यें सांगितल्याप्रमाणें कलेक्टरनें जुनें कागद पाहून अगर कागद योग्य नसतील तर अन्य पुराव्यानें ठरवावयाची असते. या बाबतींत कलेक्टरचा अधिकार पूर्ण आहे. कलम १२० मध्यें, असे हद्दीचे वाद उपस्थित झाल्यास ते तोडण्याकरितां उभय पक्षकारांनीं तीन पंच निवडून त्यांचेकडे न्याय सोंपवावा व त्यानें न्याय दिल्यानंतर तो सुपरिंटेंडेंट ऑफ सर्व्हे या दर्जाच्या अधिकाऱ्यानें कायम केला तर तोही ग्राह्य असें ठरविलें आहे. कलम १२१ मध्यें अशा रीतीनें हद्द कायम केल्यानंतर ती दोन सर्वे नंबरांतील कायमची हद्द असून त्या हद्दीप्रमाणेंच दोन्ही सर्वे नंबरवाल्यांची मालकी होय, असें ठरविलें आहे. व कलेक्टरला कायम केलेल्या हद्दींचें आक्रमण करून कबजा करणाऱ्या मालकास

संक्षिप्त चौकशी करून काढून लावण्याचीही मुभा ठेविलेली आहे. हद्दी संबंधाचे पुष्कळ प्रश्न नेहमीं कोर्टासमोर येत असल्यामुळें या बाबतींतील लँ. रे. कोडांतील कायद्याचें मुद्दाम थोडक्यांत निरीक्षण केलें आहे. अशा हद्दीचे बाबतींत कलेक्टरचा अधिकार पूर्ण असल्यानें त्यांत दिवाणी कोर्टाश कितपत हात घालतां येतो असा प्रश्न उद्भवतो. या बाबतींत कॉवसजी वि. होर्मसजी ६ मुं. लॉ. रि. ७८२ या ठरावांत असें ठरविलें आहे कीं, "कपट किंवा घोंटाळा यासारख्या कांहीं तरी पक्षकारांच्या कृत्यामुळें न्याय (equity) करणें आवश्यक झालें असल्याशिवाय कोर्टाला कायदेशीर इस्टेटींच्या हद्दी ठरविण्याचा अधिकार नाहीं."* अलीकडील ठरावांचें धोरण या व यासारख्या इतर ठरावांपेक्षां थोडें निराळें असून कलेक्टरनें हद्द कायम केली तथापि मालकीवर त्याचा परिणाम होत नाहीं असें ठरविण्यांत आलें आहे. भागा वि. दोराबजी २२ मुं. लॉ. रि. ११११ या ठरावांत "कलेक्टरनें लँ. रे. कोड कलम १२१ प्रमाणें हद्द ठरविल्यास त्यानें दोन सर्वे नंबरांतील हद्दीची रेशा कायम केली आणि दोन्हीं सर्वे नंबराच्या मालकास कलेक्टरनें ठरविलेल्या हद्दीप्रमाणें मालकीचा हक आहे (entitled to property) यापेक्षां कांहीं एक जास्त सिद्ध होत नाहीं. कलेक्टरच्या ठरावानें एका पक्षकारास शेजारच्या सर्व्हे नंबरांतील कांहीं भागाचा आपण विरुद्ध कबजानें मालक झालों असें ह्मणून दावा आणण्यास कांहींच हरकत नाहीं" असें ठरविलें आहे. ह्याच ठरावानुसार गणेश वि. रामचंद्र २३ मुं. लॉ. रि. ११०९ या ठरावांतही हद्द ठरविण्याचे अधिकाऱ्याचे अधिकार कोठपर्यंत आहेत हें निश्चित केलें आहे. यांबच्या हद्दीच्या बाबतींतही कृष्णाजी वि. निळो १८९४ प्रिं. ज. ८२ या ठरावांत सर्व्हे कामगारांनीं केलेल्या ठरावाविरुद्ध दिवाणी कोर्टांत दावा करण्याची पूर्ण मुभा आहे असें ठरविलें आहे. या ठरावाप्रमाणेंच नरसंगजी वि. बाई आचरट २६ मुं. लॉ. रि. १२६४ (१९२४) यांत ॲ. सर न्या. शहा यांनीं असें ठरविलें आहे कीं "दोन गांवांतील हद्दीचा वाद नसतां सर्व्हे कामगारानें कांहीं जमिनीच्या मालकीबद्दल केलेल्या ठरावाविरुद्ध पुनः विचार व्हावा ह्मणून कोर्टांत दावा आणण्यास लँ. रे. कोड कलम १२१ चा कांहीं बाध येत नाहीं." याच बाबतींतील अत्यंत महत्वाचा अगदीं अलीकडचा ठराव कन्हैलाल वि. इस्माइलभाई २८ मुं. लॉ. रि. १४९८ (१९२६) हा होय. ह्यांतील वाद ठाणें जिल्ह्यांतील खोती गांवासंबंधेंच होता. या ठरावांत सर न्या. मॅक्लिऑड यांनीं आजपर्यंत झालेल्या सर्व ठरावांचा सांगोपांग विचार करून असें ठरविलें आहे कीं, "दिवाणी कोर्टास रेव्हेन्यू कामगारांनीं दावा दाखल केल्यानंतर

* "The court has no power to fix the boundaries of legal estates, unless some equity is supe induced by the act of the parties, as some particular circumstance of fraud or confusion, when one has ploughed too near or the like."

केलेले हद्दीचे ठरावाविरुद्ध हद्द ठरविण्याबद्दलचा दावा चालविण्याचा अधिकार आहे " सर न्या. मॅक्लिऑड यांनीं ठराव लिहितांना फार मार्मिक भाषा वापरली असून ते ह्मणतात कीं (पान १५००) "हद्द ह्याचा अर्थ फक्त नकाशावरील रेघ अगर शेतांत अगर कुंपणाबरोबर काढिलेली रेघ असा नाहीं. वादग्रस्त प्रश्नाचे वेळीं कांहीं जमीन अच्या मालकीची अगर बच्या मालकीची असा प्रश्न असतो."* पान १५०२ वर "लँ. रे. कोडांतील निर्णायक (determinative) ह्या शब्दास जर विस्तृत अर्थ दिला तर कलेक्टरचा ठराव सर्व गोष्टींत निर्णायक मानला पाहिजे, व जमीन अच्या मालकीची आहे आणि असें असतांही ब हा त्याचा विरुद्ध कबजानें मालक आहे असें मानणें भाग येईल. लोक जमिनींचे मालक कसे होतात? ते दानानें (grant), वारसानें अगर विरुद्ध–कबजानें मालक होऊं शकतात. ह्मणून एका विशिष्ट वादांत कांहीं विशिष्ट जमिनी अच्या मालकीच्या अगर बच्या मालकीच्या हें ठरवावयाचें असतें व हें ठरविण्यास ह्या सर्व गोष्टी ध्यानांत घ्याव्या लागतात. मालक कोण होता, असा नसून, मालक कोण आहे असा मुद्दा असतो." याच ठरावांत न्या. मडगांवकर यांचाही ठराव फार महत्वाचा आहे. ते लिहितात. (पान १५०६) "खातेदारास कदाचित् सरकारवर एखाद्या सर्वे नंबरच्या हद्दी चुकीच्या असून त्याचा विस्तार कमी आहे असा ठराव करून घेण्याकरितां सरकारविरुद्ध दावा करतां येणार नाहीं. या दृष्टीनें कलेक्टरच्या हद्दी निर्णायक होतील. परंतु एकादा सर्वे नंबर अगर त्याचा भाग अमुक एका व्यक्तीच्या मालकीचा आहे, अगर दुसऱ्याचा आहे ह्या प्रश्नाचे बाबतींत तो तसा निर्णायक होईल किंवा नाहीं. याचेबद्दल मला शंका आहे "§ या एकंदर ठरावांवरून हद्दीचे प्रश्नाचे बाबतींत हात घालण्याचा दिवाणी कोर्टास पूर्ण अधिकार आहे, व तसा दावा चालवून, कलेक्टरनें हद्दीचा ठराव केला असला तथापि, आपले निरनिराळे हक्क शाबीत करण्यास कोणासही प्रत्यवाय नाहीं.

---

* "A boundary does not merely mean a line on the map or through a field or along the fence. In a disputed case it involves the question whether certain lands belong to A or belong to B."

§ "An occupancy tenant could not perhaps sue Government in the Civil Court for a declaration that the Survey boundaries of a certain number were wrong and the area was actually less In this sense Collector's boundaries may be determinative. But I doubt if they are so on the question whether a certain Survey number, or part of one, belongs to one individual or another."

**(१३) लँ. रे. कोड कलम १२३ व हद्दीचे दगड—**

लँ. रे. कोड कलम १२३ मध्यें हद्दींच्या खुणा यथास्थित जागच्या जागीं राखण्याची जबाबदारी जमिनदारावर आहे असा ठराव केलेला आहे. कलम ३९ मध्यें, त्या कलमांत जी दुरुस्ती करावी ह्मणून सुचविलें आहे. त्या अन्वयें ही जबाबदारी खोती गांवांत खोतांवर टाकण्यांत आली आहे. यास अनुसरून खोती गांवांतील सर्व नंबरांच्या हद्दीच्या खाणाखुणा जशाच्या तशा राखणें, त्यांच्या दुरुस्तीस लागणारा खर्च देणें व त्याच्यामध्यें फेरबद्दल कोणी न करील अशा तऱ्हेची खबरदारी घेणें वगैरे लँ. रे. कोड कलम १२३ प्रमाणें सर्व गोष्टी करण्याची जबाबदारी खोतांवर आहे. खातेदार कुळें, धारेकरी अगर कच्चे धारेकरी यांचेवर ही जबाबदारी नाहीं.

**(१४) लँ. रे. कोड कलम १३६ व कलम ४—**

लँ रे. कोड कलम १३६ मध्यें सरकारदस्त देण्याची जबाबदारी मुख्यतः कोणावर हें सांगितलें असून त्या कलमापासूनचे पुढचे भागांत, ह्मणजे बाब ११ यांत, जमा वेळीं न दिल्यास काय काय गोष्टी कलेक्टरनें कराव्या हें सांगितलें आहे. कलम ३९ (क) नें जमेची सर्व जबाबदारी प्रथम खोतांवर टाकली आहे. या बाबतींत याच आक्टाचे कलम ४ स्पष्ट असून त्यांत खोत जमा वेळचे वेळीं देईल तोंपर्यंत त्यांचेकडे गांव चालेल असें स्पष्ट सांगितलें आहे. या बाबतींत सर्व खुलासा कलम ४ खालीं केला आहे ( पान २७।४८ ).

**(१५) लँ. रे. कोड कलम १५० रकम फ यांतील दुमाला शब्द गाळावा—**

कलम १५० (फ) मध्यें बिनसरकारी गांवची जमा न दिल्यास तो गांव अगर गांवाचा भाग कलमें १५९ ते १६३ प्रमाणें जप्त करून वसूल करावा असें सांगितलें आहे. या कलमांतील " दुमाला " ( alienated ) हा शब्द गाळला आहे कारण खोती गांवाची जमा थकल्यास ती वसूल करण्याकरितां जरी गांव जप्त करणें वगैरे गोष्टी करावयाच्या असल्या तरी खोती गांव हे दुमाला आहेत, असें गणलें जाऊं नये याकरितां ही रकम मुद्दाम घालण्यांत आलेली आहे.

**(१६) खोती गांवची जप्ती व लँ. रे. कोड कलमें १४४ व १५९—**

खोती गांवचे बाबतींत जप्तीचा प्रश्न हरहमेश येत असल्यामुळें त्या मुद्याचा सांगोपांग विचार करणें प्राप्त आहे. खोती गांव वास्तविक कलम २७ प्रमाणें वहिवाटदार खोत नेमला न गेल्यास लँ. रे. कोड कलम १४४ प्रमाणें जप्तींत जातो. स्वतंत्र खोत असून त्यानें वेळीं सरकारजमा न दिल्यास त्याचा गांव अगर तुटक धडा लँ. रे. कोड कलम १५९ प्रमाणें जप्तींत जातो. कलम १४४ प्रमाणें

झालेली जप्ती आणि कलम १५९ प्रमाणें झालेली जप्ती यांत महद्‍न्तर आहे, व तें नीट लक्षांत घेणें अत्यंत जरूर आहे. लॅ. रे. कोड कलम १४४ प्रमाणें कलेक्टरला ज्यावेळीं हिस्सेदारांमधील भांडणामुळें अगर अन्य कारणानें गांवाची अगर गांवांतील धड्याची जमा वेळीं दिली जाणार नाहीं असें वाटेल, त्यावेळीं तो गांव अगर धडा जप्त करून त्याची व्यवस्था स्वतः अगर एजंट मार्फत करावी असा अधिकार दिलेला आहे. या कलमाप्रमाणें जप्ती झाल्यानंतर गांवची व्यवस्था कलम १६० प्रमाणें करून जें उत्पन्न होईल त्यांतून सरकारदस्त व जप्तीचा खर्च हीं वजा करून जो फायदा उरेल तो खोत अगर खोत हिस्सेदार यांस देण्याकरितां शिल्लक ठेवावयाचा अगर कलेक्टरच्या हुकुमाप्रमाणें ज्याच्या त्याच्या हिशाप्रमाणें ज्याला त्याला आदा करावयाचा असतो. कलम १५९ प्रमाणें, ज्या गांवचा अगर गांवांतील हिशाचा सरकारदस्त येणें झाला असेल आणि अन्य मार्गानें ( जंगम माल जप्त करून वगैरे ) वसूल करणें योग्य नाहीं असें कलेक्टरास वाटेल त्यावेळीं कमिशनरच्या आगाहू परवानगीनें गांव अगर गांवाचा हिसा जप्त करून त्याची वहिवाट स्वतः अगर त्यानें नेमिलेल्या एजंट मार्फत करावी असा कलेक्टरास अधिकार दिलला आहे.

या दोन्ही कलमांकडे तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यास महत्वाचे फरक असे आहेत—

(१) कलम १४४ प्रमाणें सरकारदस्त देणें होण्याचे कारण नाहीं. कलम १५९ प्रमाणें सरकारदस्त देणें झाला पाहिजे.

(२) कलम १४४ प्रमाणें जप्ती करावयाची ती सरकारदस्त वेळीं दिला जाणार नाहीं असें होऊं नये ह्मणून केलेला पूर्वोपाय (precautionary measure) असून, कलम १५९ प्रमाणें आगाहू देणें झालेल्या सरकार दस्ताची रकम वसूल करण्यास अन्य मार्ग नाहीं असें वाटल्यानें जप्ती करावयाची असते.

(३) कलम १४४ प्रमाणें कलेक्टरला जप्ती स्वतःच्या अधिकारांत करितां येते; कलम १५९ प्रमाणें जप्ती करण्यास कमिशनरची आगाहू परवानगी घ्यावी लागते.

(४) कलम १४४ प्रमाणें जप्ती झाली असतां सरकारदस्त व जप्तीचा खर्च हीं वजा जातां जो फायदा राहील तो खोतहिस्सेदारांस मिळतो; कलम १५९ प्रमाणें तो सरकारचे स्वाधीन होतो.

(५) कलम १४४ प्रमाणें जप्त झालेला गांव कितीही वर्षे जप्तीत असला तथापि खोतांचे हक्कास बाध येत नाहीं. परंतु कलम १५९ प्रमाणें गांवची जप्ती उठविण्याकरितां १२ वर्षांचे आंत अर्ज न केल्यास गांव कलम १६३ प्रमाणें सरकार जमा होऊन रयतवारी गांव बनतो.

(६) कलम १४४ प्रमाणें कितीही वर्षे गांव जप्तींत राहिला तरी जो नफा

दरवर्षी जमत जाईल तो हिस्सेदारांत मिळत जाईल, भिकाजी वि. अलीखान १८८५ प्रि. ज. १५५. परंतु कलम १५९ प्रमाणें गांव जप्त झाल्यानंतर ज्या सालीं १२ वर्षांचे आंत जप्ती दूर होण्याचा अर्ज येईल, त्या सालापुरताच जो फायदा उरेल तो मालकास मिळेल व बाकीच्या सर्व वर्षांचा फायदा सरकार जमा होईल.

अशा रीतीनें गांवाची जप्ती होणें यांतील फरक आहे. सरकारदस्त वाढ झाल्यामुळें खोतास दस्त देणें अशक्य झालें. व त्यामुळें गांव जप्त झाले पुढें ही वाढ गैर वाटून कमी करण्यांत आली. तेव्हां खोतांनी वाढीची रक्कम जप्तीचे खर्चाकडे धरून जप्ती उठवावी असें मागणें केलें असतां सरकारनें वाढ मूळपासूनची माफ करून जप्तीचे खर्चांत मंजुरी घालून जप्ती दूर केली. ही गोष्ट देवगड तालुक्याचे बाबतींत १९०४ साली व राजापूर व संगमेश्वर तालुक्याचे बाबतींत १९११ साली सरकारी ठराव होऊन घडलेली आहे.

(१७) गांव जप्तीचा अखेर परिणाम—

वर लिहिल्याप्रमाणें दोन प्रकारें खोती गांवची जप्ती होणें शक्य असतें. कलम ३९ च्या पहिल्या प्याऱ्यांत ठरविल्याप्रमाणें लँ. रे. कोड कलमें १५० (अ) व १५३ हीं खो. से. आक्ट लागू असलेल्या गांवांस लागू नसल्यामुळें गांवांतील खातीं अगर जमिनी खालसा करण्याचा सरकारास अधिकार नाहीं; परंतु कलम १६३ प्रमाणें खोती तक्षीम खालसा करण्यास मात्र कांहीं हरकत नाहीं. खोती खालसा झाल्यास खोतीगांव धारेकरी गांव असें समजुन त्याप्रमाणें त्याची व्यवस्था होते. जमिनीची खातीं ज्याचीं त्याजकडे रयतवारी गांवाप्रमाणें चालतात, व सर्व खातेदार ह्मणून लँ. रे. कोडप्रमाणें सर्व व्यवस्था होते. त्यांस फक्त सरकारदस्त लोकलफंड द्यावा लागतो. खोत, धारेकरी, कचा धारेकरी, आणि वर्ग करण्यास अधिकार असलेलीं खातेदार कुळें, यांस सर्वसाधारण सर्वे–खातेदार, व वर्ग करण्यास पात्रता नाहीं अशा कुळांस नियमित ( restricted ) सर्वे–खातेदार ह्मणून दाखल करण्यांत येतात. (अशा अर्थाचे १९०५ व १९०६ सालीं सरकारी ठराव झालेले आहेत..खो. आ. पान १५५ ). कलम १४४ प्रमाणें जप्ती झाल्यास खोती कधींही खालसा व्हावयाची नसून कलेक्टर वहिवाट करीपर्यंत ती त्यांचेकडे चालावयाची असते. त्यामुळें खोतांचे आवांतर हक्कांस कांहीं बाध येत नाहीं, पुरुषोत्तम वि. गणपती २८ मुं. लॉ. री. ७५०. जप्ती योग्य कारणांकरितांच केलेली असली पाहिजे. अयोग्य, बेकायदेशीर गोष्टींकरितां जर खोती जप्त केली तर खोतास दरम्यानचे उत्पन्न इतकेंच नव्हे तर नुकसानही मागणेंचा हक्क आहे असें गणपती वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २६ मुं. लॉ. रि. ७५४ या ठरावांत ठरलें आहे. ( जास्त माहिती पान २१० वर पहा.)

**(१८) गांव जप्तीत असतां सरकार खोतांचा ट्रस्टी नाहीं–मुदतीचा कायदा—**

खोतीगांव सरकारनें जप्त केल्यानंतर खोत आणि सरकार यांचेमधील संबंध ट्रस्टी या नात्याचा आहे किंवा काय असा प्रश्न आहे. ट्रस्टी असें नातें असल्यास तो मु. का. कलम १० या अन्वयें ट्रस्टीविरुद्ध दावा करण्यास केव्हांही मुदत आड येऊं शकत नाहीं. परंतु खोत आणि सरकार यांचे मधील संबंध ट्रस्टी असा नसून मु. का. कलम १० चे क्षेत्रांत येत नाहीं असे ना. हायकोर्टानें ठरविलें आहे. **भिकाजी वि. निजामअली ८ मुं. ५२५** या ठरावांत न्या. वर्डवुड यांनीं, "सरकार हें गांवच्या खोतांचा ट्रस्टी आहे असें ह्मणणें शक्य नाहीं."* असें ह्मटलें आहे. यापेक्षां विशेष महत्वाचा व ज्यांत याच प्रश्नाचा शेवटचा निकाल लागलेला आहे असा **सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. सखाराम १ मुं. लॉ. रि. ४७२** हा ठराव होय. खोतीगांव ५० वर्षेपर्यंत जप्तींत होता व त्यानंतर आपले कबजांत मिळावा अशाबद्दल खोतानें दावा आणला. ५० वर्षांच्या मुदतीचा, मु. का. कलम १० यांत सांगितल्याप्रमाणें सरकार ट्रस्टी असल्यामुळें बाध येऊं शकत नाहीं अशी तक्रार होती. परंतु सर न्या. जेन्किन्स व क्यांडी यांनीं असें ठरविलें कीं मुं. का. कलम १० या दाव्यास लागू नाहीं, कारण सरकारकडे विशिष्ट गोष्टीकरितां विश्वासानें ट्रस्टी ह्मणून इष्टेट आली असें दाखविणेस कांहीं आधार नाहीं."§ यावरून जप्त झालेला गांव अगर हिसा १२ वर्षांचे आंत अर्ज करून सोडविला पाहिजे. सरकार आणि खोत यांचा ट्रस्टी असा संबंध नसल्यानें मु. का. क. १० चा फायदा मिळणें शक्य नाहीं.

**(१९) गांव जप्तींत असतां खोतहिस्सेदारांच्या खासगी जमीनी खोतफायदा देण्यास पात्र आहेत—**

पुष्कळ खोती गांवांतून खोतहिस्सेदारांनीं खासगी ठिकाणाबद्दल वहिवाटदारखोतास कांहीं देऊं नये असें ठरलेलें असतें (पान २२५ पाहा). परंतु खोती जप्तींत गेल्यानंतर हे आपसांतील करार अगर वहिवाटी बाजूस राहून सर्व जमिनी खोत फायदा देण्यास सारख्या पात्र असतात. **रामचंद्र वि. रत्नागिरीचे कलेक्टर ७ मुं. हा. रि. ४१** या ठरावांत, "गांव सरकार जप्तींत असतां खोताकडून त्याच्या खासगी वहिवाटीस असलेल्या सर्व जमिनी खोत फायदा देण्यास पात्र आहेत" असें ठरविण्यांत आलें आहे.

---

* The Government could not be said to have been trustee for the khot of the village."

§ "Sec. 10 of the Limitation Act 1877, has no application to the cace, as there was no foundation for the inference that the property became vested in the Government in trust for any specific purpose."

**(२०) खोत हा सरकारी कामगार नसून, खोत फायदा त्याचा पगार नव्हे—**

खोत हा दि. का. कलम २६६ (१८८२) प्रमाणें सरकारी कामगार नसून त्यास मिळणारा खोत फायदा हा त्याचा पगार नव्हे असें रावजी वि. सयाजीराव १८८९ प्रि. ज. ९१ या ठरावांत ठरविण्यांत आलें असून, १९०८ च्या दि. का. मैं. कलम ६० प्रमाणेंहि तो सरकारी कामगार होऊं शकत नाहीं.

**(२१) जप्तीचा खर्च—**

खोतीगांव सरकारनें जप्त केल्यानंतर गांवची वहिवाट तलाठी अगर दुसरे सरकारी अधिकारी यांचे मार्फत होते, त्यामुळें सरकारला स्वतंत्र खर्च येतो. तो सर्व खर्च, लँ. रे. कोड कलम १६२ च्या शेवटच्या प्यान्यांत सांगितल्याप्रमाणें, गांवच्या एकंदर जमेंतून भरून घ्यावयाचा असतो. खर्च वजा करून जी शिल्लक राहील त्यांतून मग सरकारचा जमेचा भरणा करून घ्यावयाचा व नंतर जी बाकी राहील ती खोत फायदा समजावयाची असते. खर्च प्रथम वजा करून जी शिल्लक राहील ती जमा वारण्यास पुरेशी नसल्यास, जी बाकी राहील ती पुढील सालीं येणें असलेली बाकी असें समजून वसूल करावयाची असते. खोती खिचडी गांवांत मात्र धारा जमिनीबद्दल सरकारनें धाराजमिनीचें खोती जमिनीशीं जें प्रमाण असेल तितक्या प्रमाणांत खर्च आकारावयाचा असतो. ज्यावेळीं सरकारी खात्याच्या चुकीमुळें गांव जप्तींत जातो त्यावेळीं खोतांकडून खर्च वसूल करावयाचा नसतो. (जप्तीच्यावेळीं ठेवावयाच्या हिशोबाचे कागदांची माहिती पान १२६ वर पाहा.)

**कलम ४०—गव्हर्नर इन् कौन्सिल यांस मुंबईच्या सरकारी ग्याझेटांत जाहिरात देऊन खालीं लिहिलेल्या गोष्टीबाबद, या आक्टाचे ठरावांशीं विरुद्ध न होतां अशा कानू वेळोवेळीं करण्याचा, व वेळोवेळीं त्या बदलण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार आहे:—**

गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं कानू करणें

**(अ) जेव्हां खोतास द्यावयाचें थळ हक्कवाल्या खातेदाराचे जमिनीचे उत्पन्नाचा भाग असेल तेव्हां पिकाची पहाणी आणि अभावणी करण्याबद्दल;**

**(ब) कोणती जमीन धान्याची जमीन आहे हें ठरविण्याबद्दल;**

**(क) जेव्हां हक्कवाल्या खातेदाराचे वर्कस जमिनीच्या सीमा अगदीं बरोबर ठरवितां येत नसतील तेव्हां, गांवचे सगळे वर्कस जमिनीचा जो भाग लावून देणें बरोबर आणि**

बाजवी असेल तसा भाग अथवा कोणत्याही जमिनीबाबद जे हक्क किंवा अधिकार लावून देणें, बरोबर आणि बाजवी असेल तसे हक्क किंवा अधिकार, अथवा सगळी जी वर्कस जमीन तिचा जो कोणताही भाग व अशा दुसऱ्या कोणत्याही जमिनीबाबद जे हक्क किंवा अधिकार हे दोन्ही लावून देणें बरोबर आणि वाजवी असेल तसा भाग व तसे हक्क किंवा अधिकार प्रत्येक हक्कवाले खातेदारास लावून देण्याबद्दल;

(ड) ज्या गांवास हा आक्ट लागू होतो त्या गांवांस सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा, कलम २१४ प्रमाणें केलेली कोणतीही कानु, किंवा हुकूम, (असल्यास), कितपत लागू होईल तें ठरविण्याबद्दल;

(ई) या आक्टांत स्पष्ट रीतीनें ठरविलेल्या नाहींत अशा गोष्टींविषयीं या आक्टाचे हेतु सिद्धीस नेण्याबद्दल,

(फ) हा आक्ट अमलांत आणण्याच्या संबंधाचे कामांतील सर्व मनुष्यांनीं वहिवाट कशी करावी त्याबद्दल साधारण रीत्या.

टीप.

(१) उद्देश—

या आक्टानें ठोकळ मानानें कायद्याचे ठराव केलेले आहेत, परंतु सेटेलमेंट करण्याच्या, अभावणी करण्याच्या वगैरे हरएक बाबतींत पुष्कळ लहानसहान गोष्टी ठरवावयाच्या असतात व त्यांस कायद्याचे कलमवारात आणण्याचें कारणही नसतें. अशा लहानसहान, रीतीच्या, चौकशीच्या, पहाणीच्या, वगैरे गोष्टींत कानु करण्याचा अधिकार गव्हर्नर–इन–कौन्सिल यांस दिलेला आहे. असे कानु करतांना कायद्यांतील ठरावांशीं विरोध येतां कामा नये. विरोध आल्यास मुख्य कायद्याच्या तत्वाप्रमाणेंच चाललें पाहिजे. या कलमाखालीं केलेले कानू पुढें परिशिष्टांत दिले आहेत तें पहावे.

कलम ४१—आणि ज्यापेक्षां खोतांनीं धारण केलेल्या गांवांत जंगलांच्या विस्ताराची वृद्धी लोकांच्या सामान्य हितासाठीं सरकारास करितां यावीं हें आवश्यक आहे त्यापेक्षां, या कलमावरून असें ठरविलें आहे कीं,

लागवड न केलेल्या जमिनींत राखलेलें जंगल करण्याचा सरकारास अधिकार आहे.

ज्या कोणत्याही गांवास हा आक्ट लागू आहे, किंवा यापुढें लागू करण्यांत येईल, तशा गांवांतील लागवड न केलेल्या जमिनींत सन १८७८ चा हिंदुस्थानचा जंगलाचा आक्ट ह्याच्या दुसऱ्या ठरविलेल्या रीतीनें राखलेलें जंगल कोणत्याही वेळीं करण्याचा अधिकार सरकारास आहे. परंतु कोणत्याहि कायदेशीर अधिकाऱ्यानें दिलेल्या कोणत्याहि सनदेवरून किंवा देणगीच्या दुसऱ्या पत्रांवरून कोणतेंही हक्क प्राप्त झाले असतील ते या कलमांतील कोणत्याहि ठरावावरून कमी होतात असें समजूं नये.

व्याख्याः—या कलमाच्या कारणांसाठीं "लागवड न केलेली जमीन" ह्मणजे जी जमीन १ जून १८७९ च्या पूर्वी, किंवा असें राखलेलें जंगल करण्याविषयीं हुकूम केला असेल त्या हुकुमाच्या तारखेपूर्वी सतत २० वर्षें नांगरली नसेल ती.

( हें कलम सन १९०४ चा मुं. आक्ट ३ कलम ११ वरून दुरुस्त केलें आहे, व " सन १८७८ चा हिंदुस्थानचा जंगलाचा आक्ट ह्याच्या दुसऱ्या ठरविलेल्या रीतीनें " हे शब्द नवीन घालण्यांत आले आहेत. )

## टिपा.

(१) उद्देश—

कोकणांतील बराचसा भाग अगदीं डोंगराळ असून नापिक, ओसाड, पड असा आहे. अशा भागांत जंगली झाडांशिवाय फारसें कांहीं होण्यासारखें नाहीं व झालें तरी किफायतशीर वहिवाट कधींही होणें शक्य नाहीं. १०।१५ वर्षें जमिनी पड टाकून वर उगवणारें रान तोडून एखादे सालीं पीक येतें. परंतु अशा रीतीनें महाप्रयास करून अखेरीस फायदा न होतां आपलाच तोटा होतो, याची कल्पना खोत व कुळें यांस होत नाहीं. ज्या जागेवर १० वर्षांनें १ मण धान्य पिकूं शकेल त्याच जागीं जर १० इमारती, साग, शिसवा अशा सारखीं झाडें तयार केलीं तर त्याचे आपणास १०।१५ वर्षांनीं ५० रुपये येतील, याची त्यांस कल्पना नसते व शिवाय अशा रानें तोडण्यानें सार्वजनिक नुकसान होत असतें तें निराळेंच. पाऊस पडतांच उजाड केलेल्या डोंगरावरची माती वाहून येऊन त्यामुळें पूर्वीच्या मोठमोठ्या खाड्यांची पात्रें होरत चाललीं आहेत, शिवाय डोंगर पायथ्याच्या जमि-

नीस झाडी असतांना वाहून येणारा पानांचा गाळ उत्तम खत होऊन भात व वर्कस पीक उत्तमप्रकारें येत होतें तेंही आतां नाहींसें झालें आहे. डोंगरावरची माती हळूहळू धुपून जाऊन डोंगर शेतीसही निरुपयोगी होत चालले आहेत. अशा रीतीनें पड जमिनीची अनास्था अदूरदर्शी लोकांनीं करूं नये याकरितां अरण्यें राखून ठेवण्याचा व त्याची फॉरेस्ट आक्टाप्रमाणें सर्व व्यवस्था करणेचा अधिकार खोती गांवांचे बाबतींत सरकारनें या कलमानें आपले हातीं ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. या कलमानें १८७९ च्या १ जून पूर्वी ज्या जमिनी २० वर्षेपर्यंत पड होत्या त्यांचेवर व त्यापुढें अरण्य राखण्यापूर्वीच्या २० वर्षांत लागवडीस न आणलेल्या जमिनींवर अरण्य राखण्याचा अधिकार सरकारनें आपलेकडे ठेविला आहे. या कलमाच्या सुरवातीचे, "खोतांनीं धारण केलेल्या गांवांत जंगलांच्या विस्ताराची वृद्धी लोकांच्या सामान्य हितासाठीं सरकारास करितां यावी हें आवश्यक आहे" हे शब्द फार महत्वाचे असून या कलमानें सरकारला दिलेला अधिकार लोकांच्या हितासाठीं आहे ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. या अधिकाराचा उपयोग सरकारनें व लोकांनीं आपले फायद्याकरितां करावा हें उचित आहे.

## (२). हें कलम व फॉरेस्ट आक्ट—

फॉ. आ. १८७८ चा हिं. आक्ट ७ सर्वत्र लागू करण्याचा सरकारास केव्हांही अधिकार आहे. असें असतां हें कलम खोती आक्टांत घालण्याची आवश्यकता काय? हा एक महत्वाचा प्रश्न असून त्या बाबतींत १८७९ सालीं कायदा पास होतेवेळीं ने. ना. गव्हर्नर यांनीं आपले भाषणांत असें म्हटलें आहे कीं "नवीन फॉरेस्ट आक्टाप्रमाणें सरकारकडे अरण्यांवरचा हक्क येत असल्यामुळें या कलमाचें विशेष महत्व आहे असें मला वाटत नाहीं. हें कलम इं. फॉरेस्ट आक्टाला धरून असून तें या आक्टांत असणेंही तितकेंच चांगलें आहे. तें अगदीं निरपवाद आहे. जरी हें कलम येथें घातलें नाहीं तरी सरकार फॉ० आ० खालीं अरण्य राखील, खोत आपले कल्पित ( supposed ) हक्क बचावण्याकरितां दावे आणतील, कलेक्टर विरुद्ध तक्रार करतील, आणि आजपर्यंतच्या झालेल्या निकालांप्रमाणेंच निकाल होतील. सरकारचा वकील मागील ठरावांकडे तावडतोब बोट दाखवील." या भाषणाचा रोख प्रत्येकास कळेलच, कीं या कलमाचा अर्थ व उपयोग फा० आ० प्रमाणें व तितकाच करावयाचा आहे, मात्र याच कलमाच्या शेवटच्या भागाप्रमाणें सनदांवरून अगर दुसऱ्या कागदपत्रांवरून प्राप्त झालेल्या कोणत्याही हक्कांस बाध येऊं शकत नाहीं. त्या व्यतिरिक्त सर्व हक्क फॉ. आ. च्या तत्वांप्रमाणेंच, खोती गांवांत या कलमाप्रमाणें राखावयाचे अरण्याचे बाबतींत चालावयाचे आहेत व त्याचाच स्पष्ट खुलासा व्हावा या करितां १९०४ च्या दुरुस्तीमध्यें "१८७८ च्या फॉरेस्ट आक्टाच्या दुसऱ्या भागांत सांगितलेल्या रीतीनें" असे शब्द घालण्यांत आले आहेत.

(३) खोतांचे मालकीहक्क व फॉ० आ० भाग २—

फॉ. आ. कलम ३ मध्यें अरण्यें राखण्याचा अधिकार सरकारास केव्हां प्राप्त होतो हें सांगितलें आहे. त्या कलमाप्रमाणेंच "रान जमिनी व ओसाड जमिनी, ज्या सरकारच्या मालकीच्या आहेत, अथवा ज्यांवर सरकारचा मालकीहक्क आहे, अथवा जेथें अरण्याचे सर्व अगर थोड्या उत्पन्नावर सरकारची मालकी आहे, त्याठिकाणीं स्थानिक सरकारला वेळोवेळीं राखीव अरण्य पुढील ठरावांस अनुसरून करितां येईल."* या कलमावरून राखीव अरण्य करण्यास त्या जमिनींशीं सरकारचा मालकीचा संबंध पाहिजे. जेथें खोतांचा मालकी हक्क, सनदेवरून अगर अन्य पुराव्यावरून शाबीत होईल तेथें सरकारास राखीव अरण्य करितां येणार नाहीं. अगर सरकारनें केल्यास दिवाणी कोर्टात सरकारचें कृत्य योग्य ह्मणून टिकावयाचें नाहीं. राखीव अरण्य करते वेळीं फॉ. आ. कलम ४ प्रमाणें सरकारी गॅझेटांत कोणत्या जमिनीवर राखीव अरण्य करावयाचें, त्याचा विस्तार काय, हें जाहीर करून फॉरेस्ट सेटलमेंट आफिसर नेमून, त्या जमिनीवरील हक्कांची चौकशी करून, कोणाचा मालकीहक्क आहे किंवा काय वगैरे ठरवून, निरनिराळे गूरचरीव पाणी पुरवठा अशा सारखे कांहीं हक्क असल्यास त्यांचाहि विचार करून, वाद आपसांत मोबदला ठरवून तोडावयाचे अगर लँड ॲक्विझीशन आक्टाखालीं जमिनी घ्यावयाच्या, वगैरे प्रोसीजर करावयाचें असतें. मालकीहक्क ठरविणें केवळ सरकारच्या हातांतीलच गोष्ट आहे असें नसून बलवंत वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट ७ मुं. लॉ. रि. ४९६ या ठरावांत ठरविल्याप्रमाणें, "इं. फॉ. आ. कलम ३ प्रमाणें त्यांत दिलेला अधिकार स्थानिक सरकारच्या मतावर अगर निकालावर अवलंबून नसून वस्तुस्थितीवर अवलंबून आहे. जर कलम ३ मधील अट त्या जमिनीच्या बाबतींत खरोखरच पुरी होत असेल तर सरकारला आपला अधिकार चालवितां येईल नाहींतर येणार नाहीं. त्याची कसोटी ( test ) स्थानिक सरकारास काय दिसतें ही नसून खरी वस्तुस्थिती काय आहे ही होय. आणि ज्या अर्थी हें कलम वस्तुस्थिती ठरविण्याचा स्थानिक सरकारला अधिकार देत नाहीं त्या अर्थी कायद्याचे व वस्तुस्थितीचे बाबतींत शेवटचा निकाल देण्याचा ज्यांस अधिकार आहे अशा दिवाणी कोर्टानेंच, कायद्यानेंच स्पष्टपणें तसा अधिकार मुद्दाम काढून घेतला नसेल तर, ह्या मुद्याचा निकाल करावयाचा आहे." हा ठराव फारच महत्वाचा असून

---

* Sec. 3– "the Local Government may from time to time constitute any forest-land or waste-land, which is the property of Government, or over which Government has proprietary rights, or to the whole or any part of the forest produce of which Government is entitled, a reserved forest in the manner here in after provided."

त्यांत राखलेलें अरण्य ज्या जमिनीवर करावयाचें ती रान जमीन अगर ओसाड जमीन आहे किंवा नाहीं, तिचेवर सरकारचा हक्क आहे किंवा नाहीं वगैरे गोष्टी ठरविण्याचा दिवाणी कोर्टास अधिकार आहे, असें ठरविलें आहे. या ठरावावरून या कलमांत जरी फॉ. आ. भाग २ प्रमाणें व्यवस्था करावी असें ह्मटलें आहे तथापि खोतांचे व सरकारचे हक्क काय आहेत, जमीन लागवड न केलेली आहे किंवा नाहीं. वगैरे सर्व गोष्टी ठरविण्याचा दिवाणी कोर्टास अधिकार दिलेला आहे. तेव्हां या कलमाप्रमाणें सरकारनें अरण्य राखिल्यास आपले हक्कांस बाध येईल असें मानण्याचें खोतांस, धारेकऱ्यांस अगर कोणासही कारण नाहीं. या कलमानें अरण्य राखण्याचा अधिकार फक्त लागवड न केलेल्या जमिनीचे बाबतींत दिलेला असून अरण्य राखल्यानंतर करावयाच्या कामाबद्दल खोतास कलम ४२ प्रमाणें एकतृतियांश फायदा मिळावयाचा आहे.

**(४) "लोकांच्या सामान्य हितासाठीं" याचा अर्थ व तें साधण्याचे मार्ग–**

या कलमाच्या सुरवातीसच हें कलम खोती आक्टांत, खोती प्रकाराशीं कांहीं एक संबंध नसतां घालण्याचा हेतू काय तो दर्शविलेला आहे. जंगलाच्या विस्ताराची वृद्धी लोकांच्या सामान्य हितासाठीं सरकारास करितां यावी हा या कलमाचा मुख्य उद्देश आहे. सरकारास फॉ. आ. कलम ३५ प्रमाणें कोणतेंहि रान अगर ओसाड जमिनीचे बाबतींत (१) शेती करितां रान तोडण्याची, (२) गुरेंचरविण्याची (३) वनस्पतीची वाढ नाहींशी करण्याकरितां जाळण्याची अगर साफसफाई (Clear) करण्याची, मनाई करण्याचा अगर नियमन करण्याचा अधिकार दिलेला असून असे करण्याचे इष्ट हेतु कोणते हेंही सांगितलें आहे. ते पांच आहेत– (१) वादळ, वारे, मोठमोठे दगड धडपडत येणें, डोंगर घसरणें, पूर येणें, यांपासून संरक्षण करणेंकरितां; (२) डोंगरावर व खोऱ्यांतून माती शिल्लक राहावी, कडे कोसळूं नयेत, नवीन ओढे, प्रवाह वगैरे सुरू होऊं नयेत, डोंगर धुपून जाऊं नयेत, व जमिनीवर दगड रेती वगैरे जमूं नये, याकरितां; (३) नद्या, तळीं, व झरे यांमधील पाणिपुरवठा कायम राहावा ह्मणून; (४) रस्ते, पूल, रेल्वे अगर अन्य मार्ग यांचें संरक्षण व्हावें ह्मणून; (५) सार्वजनिक शरीर स्वास्थ्याकरितां; याप्रमाणें हेतु दिले आहेत. फॉ. आ. क. ३५ प्रमाणें अंमल करण्यास अशी जमीन सरकारचे मालकीचीच पाहिजे असें नाहीं. वरील तीन कारणांनीं वरील हितें साधत नाहींत, असें दिसल्यास रान अगर ओसाड जमिनीस बंदी करण्याचा हक्क सरकारास आहे. मात्र अशी बंदीं करण्यापूर्वीं योग्य नोटीस मालकास दिली पाहिजे. स्वतः खोतासही अशा रीतीनें आपली मालकी कायम ठेऊन अरण्य राखणें शक्य आहे. फॉ. आ. कलम ३८ या बाबतींत स्पष्ट असून त्या कलमाप्रमाणें "जमिनदारास अगर दोनपेक्षां जास्त जमीनदार असल्यास त्यापैकीं निदान दोनतृतियांश हिशाचे

मालकांनीं कलेक्टरकडे अगर डेप्युटी कमिशनरकडे अरण्य तयार करणेंकरितां अगर जपणेंकरितां (conservation) अर्ज करून (१) आपसांत करार ठरेल त्या अटींप्रमाणें राखीव अगर संरक्षित ह्मणून अरण्य फॉरेस्ट कामगारानें राखणेंची अगर संरक्षण करणेची व्यवस्था करावी; अगर (२) फॉरेस्ट आक्टाची कांहीं अगर सर्व कलमें लागू करावीं; असा अर्ज करावा; ह्मणजे कोणत्याही प्रकारचा अर्ज असल्यास स्थानिक ग्याझेटांत प्रसिद्ध करून परिस्थित्यनुरूप अर्जदारांच्या मर्जीप्रमाणें कलमें लागू करावीं " असेंही ठरविलें आहे. वरील कायद्याच्या नीरीक्षणावरून या कायद्याचा मुख्य हेतु सरकार अगर खोत या उभयतांचे मनांत आल्यास कोणाच्याही कायदेशीर हक्कांस बाध न येतां करितां येणें शक्य आहे.

## (५) "लागवड न केलेली जमीन"—

या कलमांत लागवड न केलेली जमीन हे शब्द वापरले असून त्यांची व्याख्याही दिलेली आहे. त्याप्रमाणें लागवड न केलेली जमीन यांचा अर्थ १ जून १८७९ या तारखेपूर्वीं २० वर्षें ज्या जमिनींची मशागत केलेली नाहीं अशी जमीन अथवा ज्या तारखेस अरण्य राखणेबद्दल हुकूम होईल त्या तारखेचे पूर्वीं २० वर्षें ज्या जमिनीची मशागत केलेली नाहीं अशी जमीन होय. ह्मणजे सतत २० वर्षें पड राहिलेली जमीन होय. जमीन पड राहिल्यानें मालकी सरकारकडे गेली असा केव्हांही अर्थ होऊं शकत नाहीं. खोती गांवांतील सर्व पड जमिनीवर ती वहिवाटीस आणण्याचा खोताचा हक्क आहे, **सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. वासुदेव ९ मुं. लॉ. रि. ७१९.** लँ. रे. कोड कलम ३७ प्रमाणें पड, ओसाड जमिनींवर पूर्वीच असलेले खोतांचे हक्क नष्ट होत नाहींत. हा पड व ओसाड जमिनीवरील खोतांचा हक्क नष्ट करणें सरकारास केव्हांही शक्य नाहीं. त्याचप्रमाणें सनद वगैरे कागदपत्रांवरून जे हक्क प्राप्त झाले असतील तेही या कलमाप्रमाणें अस्तित्वांत राहावयाचे आहेत.

## (६) फॉरेस्ट आक्ट व लँड ॲक्वीझीशन या आक्टांअन्वयें चौकशी—

लागवड न केलेल्या जमिनीवरील खोतांचे हक्काची चौकशी करण्याचा अधिकार फॉ. आ. कलम ४ प्रमाणें फॉरेस्ट सेटलमेंट कामगार यास दिलेला आहे. त्यानें योग्य चौकशी न केल्यास दिवाणी कोर्टाकडे जाण्यासही हरकत नाहीं, **बलवंत वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट ७ मुं. लॉ. रि. ४९७.** फॉ. आ. कलम ४ प्रमाणें चौकशीअंतीं हक्क शाबीत झाल्यास फॉ. आ. कलम १० प्रमाणें पुढील व्यवस्था करावयाची असते. **लँड ॲक्विझीशन** आक्टाखालींही सरकारास जमिनी आपल्या ताब्यांत घेतां येतात व त्यावेळींही चौकशी करावयाची असते. फॉ. आ. खालीं करावयाची चौकशी व लँड ॲ. आक्ट खालीं करावयाची चौकशी यांत फरक आहे तो:—

(१) लँ. ॲ. आक्टाप्रमाणें जमीनदाराची मालकी अगर हक्क ग्रहित मानून

चालावयाचें असतें, तर फॉ० आ० खालीं जमीनदारानें आपला हक्कसंबंध शाबीत करावयाचा असतो.

(२) लँ. अॅ. आक्ट खालीं जमीन घेणें झाल्यास मोबदला द्यावा लागतो. फॉ. आ. खालीं अरण्य राखल्यास खोतास खो. से. आक्ट कलम ४२ प्रमाणें एक-तृतीयांश फायदा मिळावयाचा असतो.

(३) लँ. अॅ. आक्टाखालीं स्थानिक सरकारास लोकहिताकरितां जमीन पाहिजे असें वाटल्यास जमीन घेण्याचा हक्क आहे. फॉ. आ. खालीं तसा हक्क नाहीं.

(४) लँ. आ. आक्टाखालीं वाटेल त्या प्रतीची जमीन असली तरी हरकत नाहीं. फॉ. आ. खालीं ओसाड अगर रानजमीनच पाहिजे.

(५) फॉ. ऑ. प्रमाणें पड अगर रान जमिनीवर सरकारचा हक्क पाहिजे. लँ. अॅ. आक्टप्रमाणें हक्क असण्याचें कारण नाहीं.

**(७) सनद अगर दुसऱ्या देणगीच्या कागदपत्रांवरून प्राप्त झालेल्या हक्कांस बाध येत नाहीं.**

या कलमाच्या पहिल्या प्याऱ्याचे शेवटीं कायदेशीर अधिकाऱ्यानें दिलेल्या सनदांवरून अगर देणगीच्या दुसऱ्या कागदपत्रांवरून प्राप्त झालेल्या हक्कांस बाध येत नाहीं असें ठरविलें आहे. सनदा व देणगीचे कागद यांवरून जर मालकी हक्क शाबीत होत असेल तर खोतास त्या जमिनीबद्दल योग्य मोबदला पोंचलाच पाहिजे. नुसता वतनदार खोत एवढ्यानेंच अशा रीतीची मालकी आहे असें होत नाहीं. सनदेंत अगर देणगीच्या कागदपत्रांत तसा स्पष्ट उल्लेख असावा लागतो. **रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी १२ मुं. ५३४** या ठरावांत सनदांचा अर्थ नेहमीं सरकारला फायदेशीर होईल तितका करावा असें सांगितलें असून सनदेमध्यें " जल तरु तृण काष्ठ पाषाण निधि निक्षेप " अशासारखा स्पष्ट उल्लेख मालकी दाखविण्यास पाहिजे असें **सर न्या. सार्जंट** यांनीं म्हटलें आहे. याचप्रकारें **कान्झरव्हेटर ऑफ फॉरेस्ट वि. नागरदास १८७५ प्रिं० ज. ३२५, इन रि. अंताजी १८ मुं. ६७०** या ठरवांतही ठरलें आहे. ज्यावेळीं फक्त गांव इनाम दिलेला असतो व इतर कस काही विशेष उल्लेख नसतो त्यावेळीं मालकी हक्क नसून त्यास फक्त गांवचा वसूल घेण्याचा हक्क असतो, **कॉन्सरव्हेटर ऑफ फॉरेस्ट वि. नागरदास १८७५ प्रिं. ज. ३२५.** जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण निधिनिक्षेप अशासारख्या शब्दांनीं मालकीचा उल्लेख केला नसल्यास केवळ वसुलाचा हक्क आहे असें अनुमानावें, **रतनजी वि. ठाण्याचे कलेक्टर ११ मू. इं. अ. २९५, वामन वि. ठाण्याचे कलेक्टर ६ मुं. हा. रि. १९१; बलवंत वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट ७ मुं. लॉ. रि. ४९७.** परंतु जेथें तसा स्पष्ट शब्दांनीं उल्लेख केला असेल तेथें जरी इतर हक्कदारांचे हक्कास बाध येणार नाहीं, वगैरे उल्लेख असला तरी मालकी सरकारकडे येऊं शकत नाहीं, **रावजी वि.**

दादाजी १ मुं. ५२३, सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. हैबतराव ६ मुं. लॉ. रि. ४३ वरील ठरावांस अनुसरून सनदांचा अर्थ करून जर मालकी शाबात होत असेल तर तिला बाध आणावयाचा नाहीं असें ठरलें आहे.

ह्या सनदा अगर कागदपत्र कोणत्या तरी कायदेशीर अधिकाऱ्यानें दिलेल्या पाहिजेत. कायदेशीर अधिकारी याचा अर्थ केवळ इंग्रज सरकारचे अधिकारी असा नसून, पूर्वगामी जे राजे–विजापुरकर, मराठे, पेशवे वगैरे ते, व त्यांचे हाताखालील अधिकारी, असा अर्थ आहे. सरकारनें योग्य मानिलेल्या सनदा अशाच अधिकाऱ्यांनीं अगर राजांनीं दिलेल्या आहेत. कांहींतरी सनदेसारख्या भाषेंत लिहिलेला कागद उपयोगी नाहीं. इंग्रज सरकारनें कौल वगैरे दिलेले आहेत, त्यांचाही या कागदपत्रांत समावेश होतो.

(८) झाडांच्या बाबतींत मालकी कोणाची ? कायद्याचें अनुमान –

जमिनीच्या मालकीबरोबर जमिनीशीं संबंध असलेल्या सर्व गोष्टींची मालकी जमिनीच्या मालकाकडे जाते, हें कायद्याचें तत्व आहे. "जमिनीच्या मालकी बरोबर जमिनीशीं निगडित झालेल्या सर्व गोष्टी येतात" ( Quicquid Plantatur solo, solo cedit = whatever is fixed to the soil goes with the soil ) अशी कायद्याची एक जुनी म्हण आहे. परंतु ह्या तत्वाचा दोन संबंधांचे दृष्टीनें विचार केला पाहिजे. एक सरकार व जमीनदार, व दुसरा जमीनदार व कुळें वगैरे इतर. सरकार व जमीनदार यांचे बाबतींत सरकारनें लँ. रे. कोड कलम ४० व ४१ याप्रमाणें झाडांवरति मालकी कोणाची हें ठरविलें आहे. त्यांत ग्रथित केलेल्या तत्वाप्रमाणें सर्व जमीन सरकारचे मालकीची असून ती खातेदाराकडे वहिवाटीस दिलेली असून त्यावरील झाडें सरकारला राखून ठेवणेचा हक आहे. अशा प्रकारें कलम ४० प्रमाणें झाडें राखून ठेविलेलीं नसतील तर त्यांवरील सर्व हक जमीन धारण करणारास सरकारनें सोडून दिलेला आहे. मात्र सन १८६५ चा आक्ट १ पास होण्यापूर्वीं जेथें सर्वे सेटलमेंट लागू झालेले असेल तेथें साग शिसवा, व चंदन या झाडांवर सरकारनें आपली मालकी राखून ठेविलेली होती व ती तशीच पुढें समजावयाची आहे. बिनसरकारी गांवांत सरकार व जमीन धारण करणारे इनामदार वगैरे यांची झाडावरची मालकी वर लिहिल्याप्रमाणें सनदेच्या अगर देणगीच्या भाषेवर अवलंबून असते. सरकारचा अशा रीतीनें जरी झाडांवर हक ठेविलेला आहे, तरी व्यक्तिशः अगर निरनिराळ्या व्यक्तींचे एकत्रित जे मालकी हक असतील त्यांस बाध येत नाहीं. जमीन धारण करणारे व इतर, यांचे बाबतींत मात्र वर नमूद केलेल्या कायद्याच्या म्हणीप्रमाणेंच जमिनीचा मालक तोच झाडांचा मालक हें तत्व लागू आहे. नेहमीं अशा तऱ्हेनें दोघांमध्यें वाद उपस्थित झाल्यास जो जमिनीचा मालक असेल त्याचें तें झाड असें कायद्याचें

अनुमान असून ज्याचें त्याचेविरुद्ध ह्मणणें असेल, तें त्यानें योग्यरीतीनें शाबीत केलें पाहिजे, नूरबिबी वि. मगनलाल १६ मुं. ५४७. तसें योग्य प्रकारें शाबीत न केल्यास जमिनीच्या मालकाकडेच झाडांची मालकी जाते.

(९) डनलॉपचा जाहिरनामा व खोतांचा झाडांवरील हक्क—

वर सांगितल्याप्रमाणें सरकारकडे जमिनीची मालकी असून झाडांची मालकी आपल्याकडे राखून ठेवण्याचा अगर सोडण्याचाही सरकारास हक्क आहे. त्याप्रमाणें रत्नागिरी जिल्ह्याचे बाबतींत सन १८२३।२४ सालीं दक्षिण कोंकणचे कलेक्टर मि. जे. ए. डन्लॉप यांनीं त्यांचेच नांवें प्रसिद्ध असलेला जाहीरनामा काढून असें जाहीर केलें कीं, साग, शिसवा अगर दुसरी इमारती झाडें ज्या कोणाची असतील अगर जे यापुढें वाढवितील त्यांची मालकी त्यांचेकडे राहील, व त्यांस त्या झाडांची वाटेल त्याप्रमाणें व्यवस्था करणेचीही मुभा राहील. सरकारचा त्याकडे आपला हक्क सांगणेचा इरादा नाहीं. डनलॉपचा जाहिरनामा १ मार्च १८२४ रोजीं प्रसिद्ध झाला. तो येणेंप्रमाणें:—"सर्व लोकांच्या माहितीकरितां असें जाहीर करण्यांत येत आहे कीं, पूर्वींचें सरकार, कोणत्याही इसमाचे मालकीचीं या जिल्ह्यांतील जमिनीवर वाढणारीं साग, शिसवा व इतर इमारती लाकडाचीं झाडें घेत असे, त्यामुळें लोक (तसलीं झाडें) वाढविण्याचा त्रास घेत नसत. सरकारला यापुढें साग, शिसवा वगैरे इतर इमारती झाडें लोकांनीं वाढविल्यास त्यांचें कल्याण होईल असें वाटल्यावरून असें जाहीर करण्यांत येत आहे कीं, मालवण व सुवर्णदुर्ग या तालुक्यांतील राखलेल्या अरण्याशिवाय करून ज्यांचे जाग्यावर सागवान वगैरे झाडें असतील, त्यांवर सरकारचा इरादा नाहीं. ज्यांचीं झाडें असतील तीं व पुढें करतील तीं त्यानें आपले खुशीस येईल तशी वहिवाटावीं, सरकारांतून अडथळा जरा कांहीं होणार नाहीं*." हा जाहिरनामा फार महत्वाचा असून कंपनी सरकारनें

---

* *Dunlops proclamation*—

"Whereas the Government has observed that the former Government used to take Teak, Blackwood, and other good timber grown on the lands situate in the aforesaid zilla belonging to any person whatever, the people did not take the trouble of raising (such timber trees); and (whereas the Government) thinks that it would be to the advantage of all if from this day forth, teak, blackwood and any other kind of good timber (trees) were raised in the country, it is proclaimed to all people that the Government has no intention (eye) towards the trees that may be growing on the lands of any person whatever situate beyond the fron-

या जिल्ह्यांतील ( म्हणजे १८२३।२४ वेळच्या जिल्ह्यांतील ) सर्व झाडांवरील हक्क संबंध सोडला आहे. यानंतर १८५१ सालीं हा जाहिरनामा रद्द करण्याच्या दृष्टीनें पुन्हां जाहिरनामा काढण्यांत येऊन त्यांत, डनलॉपचा जाहिरनामा कांहीं अटींनीं झाडांवरील सरकारचा मालकी हक्क देणारा होता, तो चालू राहिल्यास साग शिसवा वगैरे झाडांचा नायनाट होण्याचा संभव आहे वगैरे नमूद करून "ने. ना. गव्हर्नर-इन-कौन्सिल असें पुकारतात कीं १८२३ चा जाहिरनामा मागें घेण्यांत येत असून सरकार जंगलाचे बाबतींत जे १८२३ चे पूर्वीचे हक्क होते ते सर्व आपणाकडे घेत आहे. याच वेळीं, कांहीं थोड्या इसमांनीं, १८२३ च्या सढळ सवलतीचा फायदा घेऊन आपल्या जमिनींत वाढणाऱ्या साग आणि शिसवा यांचेकडे काळजी पुरविली आहे त्यांना येत्या १ जून पासून सहा महिन्यांचे आंत कलेक्टर आणि कॉन्झरव्हेटर ऑफ फॉरेस्ट यांचें, १८२३ पासून आपण आपल्या जमिनींतील झाडांची काळजी घेऊन वाढविली आहेत असें सप्रमाण समाधान करतील तर, सरकार त्यांस आजचा व पुढील पूर्ण फायदा, ते सध्यां वाढत असलेल्या झाडांची काळजी घेतील, या अटीवर देण्यास तयार आहेत. इ. "† याप्रमाणें जाहिरनामा काढून डनलॉपचा जाहिरनामा कायमचा आहे, तो

---

tiers ( limits ) of the Jungles preserved by the Government ............that those who may own and may grow here-after (such trees) may ( i. e. have the liberty to ) deal with them in any manner they like; and that no obstruction whatever will be made by the Government ( to their so doing.)"—Dated 1st March 1824.

† *Proclamation of 1851*—

(1) Be it known that in 1823 (Sic.) Mr. Dunlop, then Collector of the Southern Konkan, put forth a proclamation wherein he conditionally made over, on behalf of Government the royalty rights heretofore exercised in regard to teak and sissu trees growing in certain places.

(2) The object of the said proclamation, as stated in the first paragraph thereof, was the extension of the growth of useful timber.

(3) As, however, from past experience it is clear that the continuance of the permission to cut teak and sissu trees on such terms throughout the collectorate will speedily lead to the complete annihilation of such useful timber.

(4) The Right Honourable the Governor in Council is pleased to declare that the proclamation of 1823 is rescinded, and that the Government resumes, in regard to forest,

मागें घेतां यावयाचे नाहीं असें ठरलें आहे. सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. नारायण ९ मुं. लॉ. रि.१९ या ठरावांत न्या. पार्सन्स यांनीं असें म्हटलें आहे कीं, "हा जाहिरनामा केवळ त्या वेळच्या सरकारनें दिलेलें वचन नसून सागवानी झाडें, तीं ज्यांचे जमिनींत वाढत असतील अगर यानंतर वाढतील त्यांस प्रत्यक्ष देणगी अगर बक्षिस दिलेलीं होतीं." हा ठराव अत्यंत महत्वाचा असून त्यांत कलेक्टर ऑफ रत्नागिरी वि. व्यंकटराव ८ मुं. हा. रि. १, इन् री. अंताजी १८ मुं. ६७७ या ठरावांस अनुसरून, कलेक्टर ऑफ रत्नागिरी वि. रघुनाथ १८७५ प्रि. ज. ३२४, नागरदास वि. कॉन्झरव्हेटर ४ मुं. २६४ व रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी १२ मुं. ५४१ या ठरावांशीं भेद दाखवून वर नमूद केलेल्या दोन्हीं जाहिरनाम्यांचा व त्या वेळच्या सरकारी पत्रकांचा विचार करून डनलॉपचा जाहिरनामा सरकारला रद्द करितां येत नाहीं असें कायमचें ठरविलें आहे. कुलाबा जिल्ह्याचे बाबतींतही खोती गांवांस जमिनीवरील हक्क शाबीत झाल्यास डनलॉपचा जाहिरनामा लागू होण्यास हरकत नाहीं असें सदाशिव वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २० मुं. लॉ. रि. १४१ या ठरावांत ठरविलें आहे.

**(१०) डनलॉपचे जाहिरनाम्यावरून हक्क कोणास प्राप्त होतो—**

डनलॉपचे जाहिरनाम्यांत हक्क अमुक प्रकारचेच पाहिजेत वगैरे कांहीं उल्लेख

---

all the seigniorial rights which it possessed previous to 1823.

(5) At the same time, as it is understood that a few persons, taking advantage of the liberal offer made by Government in 1823, did attend to the teak and sissu timber growing in their own grounds (Jagih), Government is prepared to grant full benefit, present and prospective, to such persons, provided they establish to the satisfaction of the Collector and Conservator of Forests, within six months from 1st June next, that the wood in their lands has been attended to and nurtured since 1823, such benefit to be contingent on their continuing their care to the trees now in course of growth.

(6) The forest preserves in the Taluka of Suwarnadurg and in the Subha of Malwan to remain, as at present, exclusively Government preserves, subject to such future orders as Government may see fit to issue in regard to them."

‡ "Proclamation was not a mere promise that the Government then made, but an actual grant or gift of the teak trees to the persons on whose lands they were then actually growing or might thereafter grow."

नाहीं. "ज्याचे जागेवर सागवान वगैरे झाडें असतील त्यांवर सरकारचा इरादा नाहीं" अशी भाषा वापरलेली आहे. परंतु हायकोर्टच्या ठरावांप्रमाणें हळूहळू डन्लॉपचे जाहिरनाम्याचा, जमिनीची मालकी ज्यांस शाबीत करितां येते अशांसच फक्त फायदा मिळेल असें ठरलें आहे. कॉन्झरव्हेटर ऑफ फॉरेस्ट वि. नागरदास १८७५ प्रि. ज. ३२५ यांत " डनलॉपच्या जाहिरनाम्यावरून, गांवांतील जमिनीचा मालकीहक्क आहे असें शाबीत केल्याशिवाय नुसते खोत ह्मणून इमारती लाकडें तोडणेचा हक्क पोंचत नाहीं." याप्रमाणें ठरविलें व तोच ठराव प्रिव्ही कौन्सिलपर्यंत जाऊन ४ मुं. २६४ येथें कायम करण्यांत आला आहे. न्या. मेलविल यांनीं रत्नागिरीचे कलेक्टर वि. रघुनाथ १८७५ प्रि. ज. ३२४ या ठरावांत मालकीहक्क असेल तर डन्लॉपचे जाहिरनाम्याचा फायदा घेतां येईल असें ठरविलें. रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी १२ मुं. ५३४ या ठरावांतही सर न्या. सार्जंट यांनीं मालकीहक्क शाबीत झाल्याशिवाय डन्लॉपचे जाहिरनाम्याचा फायदा घेतां येणार नाहीं असें ठरविलें. त्याचप्रमाणें पुढें वर नमूद केल्याप्रमाणें सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. नारायण १ मुं. लॉ. रि. १९ व सदाशिव वि. सेक्रेटरी ऑफ स्टेट २० मुं. लॉ. रि. १४१ या ठरावांतही गृहीत मानण्यांत आलें आहे.

(११) जंगल अगर ओसाड जमिनीवरील झाडें; कवळ घेण्याचा हक्क—

रत्नागिरीचे कलेक्टर वि. रघुनाथ १८७५ प्रिं. ज. ३२४ या ठरावांत, जमिनीवर मालकी असल्याशिवाय खोतांचा जंगल अगर ओसाड जमिनीवरील झाडांवर हक्क पोंचत नाहीं, असें ठरविण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें रत्नागिरीचे कलेक्टर वि. अंताजी १२ मुं, ५३४ या ठरावांतहि जंगल अगर ओसाड जमिनीवरील झाडें तोडण्याचा, केवळ खोत म्हणून अगर डन्लॉपच्या जाहिरनाम्यावरून हक्क पोंचत नाहीं. पण त्या ठरावांत असेंही ठरविण्यांत आलें आहे कीं " सरकारनें जंगलाचें उत्पन्न राखलें आहे असा पुरावा नसेल तर जमिनीचे मशागतीकरितां अगर जमेकरितां वादीस कवळ तोडण्याचा हक्क आहे."*

---

* "In the absence of evidence to show that the right to jnugle produce was intended to be reserved to Government the plaintiff was entitled to cut down brushwood whether as a source of revenue or for the purposes of bringing the land into cultivation."

टीपः— कुलाबा आणि ठाणा जिल्ह्याचे बाबतींत लँ. रे. कोड कलम ६० प्रमाणें सरकारी रिकामी जागा वापरण्याकरितां देतांना झाडांचा टाहाळ वगैरे तोडण्याचे बाबतींत अटी काय असाव्या हें मु. स. ग्या. भाग १ पान ३८५ तारीख ४।१।१९०९ चे ग्याझिटांत प्रसिद्ध केलें आहे तेथें पाहावें.

(१२) खोती खासगी जमिनीवरील झाडांवर खोतांची पूर्ण मालकी आहे—

ओसाड जमिनींचे बाबतींत जरी खोतांची झाडांवरील मालकी जमिनींचे मालकीवर अवलंबून असली तथापि खोती खासगी ठिकाणांचे बाबतींत ही गोष्ट अगदीं निराळी आहे. रत्नागिरीचे कलेक्टर वि. व्यंकटराव ८ मुं. हा. रि. १ या ठरावांत, खोती खासगी जमिनीवरील झाडांवर खोतांची मालकी आहे, असें प्रथम मानण्यांत आलें. इन् री. अंताजी १८ मुं. ५७० या ठरावांत न्या. फुल्टन आणि न्या. तेलंग यांनीं डनलॉपचे जाहिरनाम्याचा वगैरे सर्व विचार करून वरील ठरावाचे जोरावर असें मानलें कीं "खोतांच्या प्रत्यक्ष कबजांत असलेल्या खासगी जमिनी डनलॉपचे जाहिरनाम्याचे क्षेत्रांत येत असून त्यानें वतनदार खोतांच्या खासगी जमिनींतील साग वगैरे झाडांचा हक्क देणगी ह्मणून दिलेला आहे. जरी खोती खासगी जमिनींचा खोत हा मालक नसला तरी तो त्यामधील हितसंबंध धारण करणारा खचित आहे. आणि तो हितसंबंध १८२३ मध्यें त्यापुढें वाढणाऱ्या झाडांचे बाबतींत हक्क देऊन वाढविलेला असल्यामुळें, अशा झाडावरील हक्क नंतर काढून घेऊन कमी करितां येणार नाहीं.*" याप्रमाणें ठरवून अंताजी यांजवर फॉ. आ. कलम ७५ पो. क. (क) खालीं केलेली दोन झाडें तोडल्याबद्दलची शिक्षा रद्द करण्यांत आली. यानंतर सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. नारायण १ मुं. लॉ. रि. १९ या ठरावांत वर नमुद केलेल्या १८ मुं. ५७० च्या ठरावाचे जोरावर न्या. पार्सन्स यांनीं तर असें ठरविलें आहे कीं "खासगी जमिनीचे बाबतींत त्या शब्दावरूनच त्याची (खोताची) मालकी सिद्ध होते."‡ त्याचप्रमाणें न्या. रानडे यांनींही ठरविलें आहे. हेंच तत्व अगदीं अलीकडे सुद्धां गृहीत मानलें असून अहंमद वि. गणेश २५ मुं. लॉ. रि. ५२१ या ठरावांत कुलाबा जिल्ह्यांतील खोतांचे बाबतींत खोती खासगी व खोत निसबत या जमिनीवरील झाडांचे, डनलॉपचे जाहिरनाम्यावरून खोत मालक आहेत असें न्या. क्रंप आणि सर न्या. मॅक्लिऑड यानीं ठरविलें आहे.

---

* "Khasgi land of which khot was actually in possession was clearly within Dunlop's Proclamation, and it granted the right to teak and other trees in khasgi lands held by watandar khots............Even though the khot may not be the proprietor of the soil in khoti khasgi lands, he is certainly the holder of an interest in it and that interest having in 1823 been increased by the concession of all trees which he might grow there-after, could not subsequently be reduced by the withdrawal of the right to such trees."

‡ "In the case of khasgi lands, however, proprietory title is proved by the very term itself."

(१३) बिन् सरकारी गांवांस डनलॉपचा जाहिरनामा लागू नाहीं—

डन्लॉपचा जाहिरनामा फक्त सरकारी गांवांसच लागू आहे. खोती गांव सरकारीच असून दुमाला नव्हत असें कलम ३९ प्रमाणेंच ठरलें असल्यामुळें डनलॉपचा जाहिरनामा त्यास लागू आहे. बिनसरकारी ह्मणजे इनाम वगैरे गांवास तो लागू नसून त्यामुळें इनामदारांस अगर इतरांस जाहिरनाम्याचा फायदा घेतां येत नाहीं. इनामदारांची झाडावर मालकी आहे किंवा नाहीं हा प्रश्न जमिनीवर त्याची मालकी आहे किंवा नाहीं याचेवर अवलंबून राहतो. जर इनामदार फक्त दस्ताचाच इनामदार असेल तर त्यास झाडांवर हक्क प्राप्त व्हावयाचा नाहीं. त्याच्या सनदेवरून जर तो मालक असेल तर त्याची झाडांवर मालकी राहते. अशा स्थितींत खोतास फक्त कवळ वगैरे शेतीला उपयोगी असें झाडांचें उत्पन्न घेणेचा अधिकार आहे. गजानन वि. निळो ६ मुं. लॉ. रि. ८६४ या ठरावांत न्या. चंदावरकर यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "असिस्टंट जज्याचे मत डन्लॉपच्या १८२४ च्या जाहिरनाम्याप्रमाणें वहिवाटीच्या जमिनींतील झाडांवर खातदाराची मालकी आहे. परंतु त्या जाहिरनाम्याचा फक्त सरकारी गांवासच उपयोग आहे. त्या तारखेपूर्वीं जे गांव सरकारनें बिनसरकारी ह्मणून इनामदारांस दिले त्यांस तो लागू नाहीं."* या ठरावाप्रमाणें इनाम गांवांतील खोतांस आपणास डन्लॉपच्या जाहिरनाम्याप्रमाणें झाडांवर मालकी पोंचते असें ह्मणतां येत नाहीं.

(१४) धारा जमिनीस डनलॉपचा जाहिरनामा लागू आहे—

डनलॉपचा जाहिरनामा धारेकरी हे या जिल्ह्यांतील जमिनींचे मालक असल्यामुळें त्यास लागू असून धारा जमिनीवरील झाडांचे धारेकरी पूर्ण मालक आहेत. मात्र खेळता धारेकरी यांस कलम ४० [ई] ५ प्रमाणें झाडें तोडण्याचा हक्क नाहीं.

(१५) इमारती झाडें—

या कलमांत इमारती झाडें असा उल्लेख पुष्कळ वेळां आलेला आहे. कोकणांतील झाडांपैकीं ज्या झाडांच्या लाकडांचा इमारतीला उपयोग होण्यासारखा आहे अशीं सर्व झाडें होत. कोणतेंही झाड इमारती उपयोगी आहे किंवा नाहीं हें ठरविणें प्रत्येक देशाच्या पद्धतीवर अवलंबून असतें. या तत्वास अनुसरून कृष्णराव

* "In the opinion of the Assistant Judge, under the Dunlops' Proclamation of 1824 the trees etc. belonged to the occupants of cultivated lands. But that Proclamation could only affect villages which belonged to Government. It could not apply to villages which had been alienated by Government in favour of the Inamdars before its date."

वि. बाबाजी १ मुं. लॉ. रि. ४८९, या ठरावांत "आंब्याचें झाड जरी फळझाड म्हणून असलें तरी या बाजूच्या (रत्नागिरी) च्या प्रदेशांत त्याचें लांकूड इमारतीकरितां म्हणून गणलें पाहिजे." नारळी, पोफळी, कलमें, वगैरे केवळ फळांच्या उपयोगी झाडें यांस इमारती झाडें असें म्हणतां येणार नाहीं.

**(१६) खातेदार कुळास आपल्या जमिनीवर आपण लाविलेलीं झाडें तोडण्याचा हक्क आहे—**

खोती गांवांत खातेदार कुळें आहेत त्यांस आपल्या खात्यांतील जमिनीवरील झाडें तोडण्याचा हक्क आहे किंवा नाहीं असा एक प्रश्न आहे. ट्रा. ऑफ. प्रा० आक्टाचें कलम १०८ (ह) प्रमाणें कबुलायतदार कुळास आपण स्वत: त्या ठिकाणीं तयार केलेल्या निरनिराळ्या गोष्टी काढून नेण्याचा हक्क आहे. या कलमास अनुसरून सिताबाई वि. संभू सोनु ३८ मुं. ७१६=१६ मुं. लॉ. रि. ५९५ या ठरावांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, "ज्या कुळाच्या कुळपणाची सुरवात पुरातनपणामुळें केव्हां झाली हें समजण्यास मार्ग नाहीं, आणि ज्यानें आपल्या जमिनींत झाडें लाविलीं आहेत, अशा कायम कुळास तीं तोडण्याचा व वापरण्याचा हक्क आहे." या ठरावाप्रमाणें लँ. रे. कोड कलम ८३ प्रमाणें जीं कायम कुळें होतात त्यांस झाडें तोडण्याचा हक्क प्राप्त होतो. ह्याच ठरावानुसार १९१९ सालीं काजी अहंमद वि. काजी गफूर दु. अ. नं. १४१ सन १९१८ नि. ता. ९।९।१९१९ या दाव्यांत खोतानें कुळावर कबजा काढणेंकरितां व तोडलेल्या झाडांची किंमत मागणेंकरितां दावा केला. पहिल्या अपील कोर्टानें असें ठरविलें कीं प्रतिवादी एकसालीं कूळ असो अगर खातेदार कूळ असो त्यास झाडें तोडण्याचा हक्क नाहीं. त्यावर ना० हायकोर्टकडे अपील झालें तेव्हां न्या. मॅक्लिऑड आणि हीटन यांनीं असें ठरविलें कीं "कूळपणा कोणत्या प्रकारचा आहे हें ठरविलें नसतां झाडें तोडण्याच्या प्रश्नाचा निकाल देणेंं आमच्या मतें कारण नव्हतें. कारण खातेदार कुळाला झाडें तोडण्याचा हक्क नाहीं, असें आम्हांस मुळींच उघड होत नाहीं. सिताबाई वि. संभूसोनु ३८ मुं. ७१६ या ठरावांत पुरातनपणामुळें ज्याचा कूळपणा केव्हां सुरू झाला हें कळणें शक्य नाहीं व ज्यानें आपले जमिनीवर झाडें लावलीं आहेत अशा कायम कुळास झाडें तोडण्याचा व वापरण्याचा हक्क आहे, असें ठरलें आहेच. ह्या ठिकाणीं कुळानें झाडें लावलीं किंवा नाहीं हें कळण्यासही मार्ग नाहीं."* अशा रीतीचा ठराव देऊन

---

* "We do not think that the question of cutting down the trees ought to have been decided when the question what is the nature of the tenancy, was left undecided. For it is not clear to us at all that an occupancy tenant is not

खालील कोर्टाचा हुकूम रद्द करून दावाही रद्द केला. या ठरावाचे धोरणावरून खोती गांवांतील खातेदार अथवा निरंतरचे कुळांस आपण लाविलेलीं झाडें तोडण्याचा अगर वापरण्याचा पूर्ण हक्क आहे, हें उघड होणार आहे.

**(१७) खातेदार कुळास झाड वर्ग करण्याचा अधिकार नाहीं—**

कलम ९ प्रमाणें खातेदार कुळास आपली जमीन वर्ग करण्याचा अधिकार नाहीं, त्याचप्रमाणें कोणताही हक्कसंबंध (any interest therein) वर्ग करण्याचा हक्क नाहीं. उभें झाड हें स्थावर मिळकत असून एक प्रकारचा जमिनीवरील हक्क आहे. तेव्हां अशा वेळीं कुळास आपल्या जमिनीचा वर्ग खोताचे संमती वांचून करितां येणार नाहीं. या बाबतींत मुंबई हायकोर्टाचा स्पष्ट ठराव नाहीं. परंतु अलहाबाद हायकोर्टाचे मात्र अशा बाबतींत स्पष्ट ठराव आहेत. इमदाद वि. भगीरथ १० अ० १५९ या ठरावांत "खातेदारकुळाच्या जमिनींतील झाडांचा, तीं त्यानें लाविलेलीं असोत वा नसोत, त्यांचा खात्याशीं संबंध असल्यामुळें तीं, जमिनीप्रमाणेंच वर्ग करण्याचा कुळास हक्क नाहीं"* असें ठरलें आहे. कौसल्या वि. गुलाब कुवर २१ अ० २९७ या ठरावांत "कुळानें धारण केलेल्या जमिनीवर वाढणाऱ्या झाडांची मालकी सर्वसाधारण कायद्याप्रमाणें जमीनदाराकडे येते, आणि कुळास विशेष शिरस्ता नसतां अशीं झाडें तोडण्याचा व विकण्याचा अधिकार नाहीं, असा शिरस्ता शाबीद करण्याची जबाबदारी कुळावर आहे"† असें ठरविलें आहे. हे ठराव अलहाबाद हायकोर्टाचे असून त्यामध्यें खोतीपद्धतीचा विचार झालेला नाहीं. मुंबई हायकोर्टाचा या बाबतींत स्पष्ट ठराव नाहीं. ही गोष्ट ध्यानांत ठेऊन, टीप १६ मधील मुंबई हायकोर्टाचे ठरावांतील धोरणानें ह्या ठरावांचा उपयोग केला पाहिजे.

---

entitled to cut down trees In Sitabai V. Sambhusonu 38 Bom. 716, it was decided that a permanent tenant, the origin of whose tenancy is lost in antiquity and who has planted trees upon the land demised, has a right to cut them down and to use them. We do not know, in this case whether the defendants have planted trees etc".

* "The trees upon an occupancy holding, whether planted by the tenant himself or not, belong and attach to such holding and like it are not susceptible of transfer by the tenant."

† "The property in trees growing on a tenant's holding is by General law vested in the Zamindar and a tenant is not entitled in the absence of special custom, burden of proving which is on him, to cut down and sell such trees".

**(१८) आपल्या जमिनीवर येणाऱ्या दुसऱ्याचे झाडाचा भाग तोडण्याचा हक्क आहे—**

एका जमीनदाराच्या झाडांच्या फांद्या, पाळें वगैरे शेजारच्या जमिनीवर जातात व त्यामुळें दुसऱ्या जमीनदाराचें नुकसान होतें. अशा वेळीं आपल्या जमिनीवर येणारा दुसऱ्याचे जमिनीचा भाग तोडून टाकण्याचा, अगर शेजारचे जमीनदारावर झाडें तोडून मिळणेकरितां, व ताकीद व नुकसानीकरितां दावा करणेचा हक्क आहे. कितीही वर्षें झाडांच्या फांद्या दुसऱ्याचे जमिनींत गेल्या असल्या तरी त्या तोडणेचा अगर तोडून घेणेकरितां दावा करणेचा हक्क आहे. त्यांत इझमेंटचा अगर मुदतीचा प्रश्न येत नाहीं, हरी वि. शंकर १९ मुं. ४२०; लक्ष्मी नारायण वि. तारा ३१ क० ९४४; विष्णु वि. वासुदेव २० मुं. लॉ. रि. ८२६. दोन जमिनदारांच्या हद्दीवरील झाडांचे बाबतींत मात्र जरा भेद आहे. सोमेश्वर वि. चुनीलाल २२ मुं. लॉ. रि. ७९० या ठरावांत वरील ठरावांशीं विरोध न करितां असें ठरविण्यांत आलें आहे कीं "पुष्कळ वर्षेपर्यंत अंशतः आपल्या व अंशतः शेजारच्या जमिनीवर वाढणाऱ्या झाडांच्या फांद्या अगर मुळें तोडण्याचा शेजारच्या मालकास हक्क नाहीं"

**(१९) मुदतीचा कायदा आर्टिकल १४४—**

आंब्याचें झाड धरून, इमारती झाडें हीं स्थावर मिळकतींत मोडतात हें वर सांगितलेंच आहे. स्थावर मिळकत असल्यामुळें झाडांचे बाबतींतही कबजाचा दावा १२ वर्षांचे आंत केला पाहिजे, नाहीं तर विरुद्ध कबजा होईल. एका जमीनदारानें आपल्या जमिनींतील आंब्याच्या झाडांचा कबजा मिळणेकरितां दावा केला. त्या झाडांचा कबजा प्रतिवादींकडे १२ वर्षांहून जास्त वर्षें होता. तेव्हां असें ठरविण्यांत आलें कीं, या ठिकाणीं झाड स्थावर मिळकत असल्यामुळें मु. का. आर्टिकल १४४ प्रमाणें विरुद्ध कबजा होतो, बापु वि. धोंडी १६ मुं. ३५३. त्याचप्रमाणें सखाराम वि. विश्राम १९ मुं. २०७ हा ठराव पहा. या ठरावांप्रमाणें झाडांचे कबजाचा दावा १२ वर्षांचे आंत केला पाहिजे.

सदरील शेवटच्या कलमाअन्वयें केलेलें जें राखीव जंगल त्यास सन १८७८ चा हिंदुस्थानचा जंगलाचा आ ट यांतील ट ाव लागू होतील.

**कलम ४२—सदरील शेवटच्या कलमाअन्वयें केलेलें जें राखीव जंगल त्या प्रत्येक राखलेल्या जंगलास सन १८७८ चा हिंदुस्थानचा जंगलाचा आक्ट यांतील, आणि जंगलासंबंधीं ज्यावेळीं जो दुसरा कोणताही कायदा अंमलांत असेल त्यांतील ठराव लागू होतील, मात्र असें ठरविलें आहे कीं—**

(१) सदर्हु प्रकारच्या जंगलासंबंधीं जी चाकरी करण्याचें सरकार वेळोवेळीं फर्मावील ती चाकरी यथायोग्य करावी या शर्तीनें, खोतास वहिवाट करण्याचा खर्च बाद करून सरकारास त्या जंगलापासून मिळालेल्या निव्वळ नफ्याचा एकतृतीयांश भाग मिळाला पाहिजे असा हक्क आहे.

(२) सरकारनें सदर्हुप्रमाणें फर्माविलेली चाकरी खोताकडून यथायोग्य बजावण्यांत न येईल तुम्हां, सन १८७८ चा हिंदुस्थानचा जंगलाचा आक्ट, कलम ८०, यांतील ठराव लागू होतील.

## टिपा.

(१) उद्देश—

कलम ४१ मध्यें राखीव जंगल कसें व कोणत्या परिस्थितींत करावें हें सांगितलें. त्याप्रमाणें अरण्य राखल्यानंतर त्याची व्यवस्था कशी करावी हें ठरविण्याकरितां हें कलम घालून फॉ. आ. प्रमाणें सर्व व्यवस्था करावी असें ठरविलें आहे, व त्यामध्यें खोतांना काय हक्क द्यावा हेंही ठरविलें आहे. अरण्य राखणें, आंतील लांकूड, कवळ, गवत वगैरे यांची व्यवस्था करणें, गुन्हे कोणते वगैरे वगैरे सर्व गोष्टी फॉ. आ. प्रमाणें चालावयाच्या असतात. मात्र अरण्याची व्यवस्था ठेवण्याचें काम खोतांस सांगावयाचें असतें.

(२) खोतानें करावयाची चाकरी व मोबदला—

खोती गांवांतील पड जमिनींत अरण्य राखल्यानंतर त्याची व्यवस्था, करण्याचें काम खोताकडेच दिलें पाहिजे. खोत स्वतः असमर्थ अगर अज्ञान असल्यास त्याचे मुखत्यार अगर पालनकरणारा यांचेकडून व्यवस्था करवावी. व्यवस्था उर्फ चाकरी कशी करावी त्याबद्दल सरकारनें वेळोवेळीं फर्माविलें पाहिजे व त्याप्रमाणें खोतानें जंगल राखणें वगैरे सर्व कामें काळजीपूर्वक केलीं पाहिजेत. या सर्व व्यवस्थेबद्दल त्यास सरकारला जंगल राखण्याचा खर्च वजा जाऊन जो फायदा राहील त्यापैकीं एक तृतीयांश भाग मिळावयाचा असतो. खोत हिस्सेदार असतां जंगलाची व्यवस्था अर्थातच सर्वांकरितां वहिवाटदार खोतानें करून सरकारकडून त्यानेंच फायदा वसूल करावयाचा आहे. वहिवाटदार खोतास मिळावयाचा फायदा सर्व खोत हिस्सेदारांकरितां असल्यामुळें सर्व हिस्सेदारांस खोत फायद्याप्रमाणें वांटून दिला पाहिजे. (या माहितीबद्दलचे सरकारी ठराव खो. आ. प. न १७३ वर पाहा.)

(३) फॉ. आ. कलम ८० व खोत—

फा. आक्ट कलम ८० मध्यें एकाद्या इसमास जंगलासंबंधीं काम करण्याचा मोबदला ह्मणून जंगलाचे उत्पन्नापैकीं कांहीं भाग देण्यांत येत असेल आणि अशी चाकरी करण्यांत येत नाहीं असें स्थानिक सरकारास खातरी होण्यासारखें शाबीत होईल तर असा हिस्सा जप्त होईल. मात्र अशी शाबिदी सरकारनें नेमिलेल्या योग्य अंमलदारापुढें झाली पाहिजे. खोतानें आपली कामगिरी योग्य रीतीनें न बजावल्यास त्यास मिळणारा एक तृतीयांश फायदा मिळण्याचें बंद करितां येईल. मात्र कामगिरी होत नाहीं वगैरे गोष्टी योग्यप्रकारें, खातरीपूर्वक शाबीत झाल्या पाहिजेत.

# परिशिष्ट.

(कलम ३ रकम ७, आणि कलम ३३ पहा.)

| कच्चे धारेकऱ्यांचे | खालीं लिहिलेल्या जमिनींवरील जो सर्वेचा आकार त्याच्या प्रत्येक रुपयास द्यावयाच्या किंवा रुपयाच्या प्रत्येक अंशाबद्दल हिस्सेरसीनें द्यावयाच्या थळाची जास्त रकम. | | |
|---|---|---|---|
| | भाताच्या जमिनी. | वरकस जमिनी | बागायत किंवा रब्बी जमिनी. |
| दसपटकरी ... | २ आणे | २ आणे | २ आणे. |
| दुप्पटकरी ... | ½ मण भात | सव्वा पांच पायल्या धान्य (निमे नाचणी, निमे वरी) | ८ आणे. |
| दीडपटकरी किंवा दिढीवाळा. | ३ पायल्या भात | २ पायल्या धान्य (निम्मे नाचणी व निम्मे वरी) | ३ आणे. |
| पावणेदुप्पटकरी | ६ पायल्या भात | ४ पायल्या धान्य (निम्मे नाचणी, निम्मे वरी) | ६ आणे. |

खरें भाषांतर

मुक्काम जंजिरे मुंबई
तारीख ५ मे १८८०.

सही— सी. जी. डब्ल्यू मॅक्फर्सन
„ एस. पी. पंडित
(सरकारचे ओरिएण्टल ट्रान्सलेटर)

आक्ट पुरा.

# खोती से० आक्ट कलम ४० खालीं केलेले सरकारी कानू*.

( हे कानू मुं. स. ग्याझेट भाग १ पान २६२ सन १८८२ येथें प्रथम प्रसिद्ध झाले. त्यांत मुं. स. ग्याझेट भाग १ पृ. ८०८ सन १८८६ व इतर सरकारी ठरावांनीं दुरुस्ती केली )

## कलम ४०, रकम अ.

### पिकपहाणीबद्दल कानू

(१) ज्या वेळीं कुळाचे जमिनींवरील पिकाचा हिस्सा थळ म्हणून खोतास देणें असतो त्या वेळीं तो ऐवज प्रत्येक शेताच्या संभवनीय पिकाच्या अंदाजानें खोतानें काय घ्यावा हें ठरविलें पाहिजे. असा अंदाज खोतानें, शेत कापण्यास तयार होण्यापूर्वी योग्य ( reasonable ) वेळीं कुळासमक्ष अथवा त्यानें लेखानें नेमून दिलेल्या कुटुंबांतील इसमासमक्ष अथवा त्याचे कायदेशीर मुखत्यारा ( agent ) समक्ष, आणि ज्यांपैकीं एकाला लिहितां वाचतां येतें अशा दोन संभावित पंचांसमक्ष केला पाहिजे. कुळाची दुसऱ्या प्रकारची इच्छा नसेल तर मात्र खोतानें खालीं दिलेल्या तारखांस अगर त्यापूर्वीं पहाणी व अभावणी केली पाहिजे—

| | |
|---|---|
| हळवा नाचणा— | १० सप्टेंबर अथवा त्यापूर्वीं |
| इतर हळवीं पिकें— | १ आक्टोबर ,, ,, |
| महान पिकें—हरीक, कुळीथ उडीद, ताग आणि तूर }— | १५ नवंबर ,, ,, |
| टाकला— | ३१ डिसेंबर ,, ,, |
| इतर महान पिकें— | १ नवंबर ,, ,, |
| रब्बी, (उ. हरबरा वगैरे)— | १ मार्च ,, ,, |
| उन्हाळीं पिकें, (उ. पावटा वगैरे)— | २० मार्च ,, ,, |
| उष्ण हवेंतील पिकें, वांयगणें भात, गिमवस नाचणी, फणस इ. } | २० मे ,, ,, |

बागायत पिकासंबंधें मात्र मामलेदार अगर महालकरी यांनीं या कानूंचे अर्थाप्रमाणें योग्य वेळ कोणती तें ठरविलें पाहिजे.

---

* या कानूंचें सरकारी भाषांतर नसल्यामुळें आम्हींच भाषांतर केलें आहे. हें अगदीं अक्षरशः नसून शक्य तितक्या सोप्या भाषेंत मुळास न सोडतां केलेलें आहे. शंका आल्यास मूळ इंग्रजी पाहाणें बरें.

(२) खोतानें पहाणी व अभावणी करण्याच्या ज्या तारखा ठरविल्या असतील त्या, सर्व आणि प्रत्येक कुळास लेखी नोटिसीनें निदान सात दिवस पूर्वी जाहीर केल्या पाहिजेत. ह्या तारखा देवळावर नोटिसा लावून, ढोल वाजवून अगर अन्य रीतीनें समजावण्याबद्दल कलेक्टरनें पोलीसपाटलास ताकीद (direct) केली पाहिजे; आणि जर कोणत्याही पुरेशा (sufficient) कारणाकरितां (पीक तयार झालें नाहीं, इ.) अशा नेमिलेल्या तारखे रोजीं पहाणी अथवा अभावणी केली नाहीं तर, कुळाची कबुली नसेल तर, अशीच दुसरी नोटीस गांवांत जाहीर केल्याशिवाय पहाणी अगर अभावणी खोतानें करितां नये. दुसऱ्या नोटिशीनें जाहीर केलेली तारीख मागील नियमांत सांगितलेल्या मर्यादेंत असली पाहिजे.*

(३) जर वर नमूद केल्याप्रमाणें पहाणी, अभावणीच्या तारखा नेमूनही कूळ, त्यानें लेखानें नेमिलेला त्याचे कुटुंबांतील इसम, अगर त्याचा कायदेशीर मुखत्यार, नेमिलेल्या तारखेस आपल्या शेतांत हजर नसेल, तरीही खोतानें पहाणी व अभावणी केली पाहिजे व अशा कुळास २४ तासाचें आंत, पुढील नियमांत सांगितलेल्या अभावणी पत्रकांत त्याच्या शेताबद्दल केलेल्या नोंदीचा उतारा पाठवून लेखी कळविलें पाहिजे.

(४) "या नियमास जोडलेल्या परिशिष्टांतील नमुना १ अ."‡ याप्रमाणें अभावणी पत्रक या नांवची वही खोतानें ठेविली पाहिजे. त्यांत प्रत्येक पहाणी अभावणीचे वेळीं, अशा पहाणी अभावणीचा तपशील जागचे जागीं (on the spot) भरला अगर भरविला पाहिजे. या वहींतील प्रत्येक नोंदीवर, ती ज्या दिवशीं केली ती तारीख असून, अभावणी पहाणी करणाऱ्या खोताची, दोन्ही साक्षिदारांच्या, आणि जर कूळ, लेखानें नेमून दिलेला त्याचे कुटुंबांतील इसम अगर कायदेशीर मुखत्यार हजर असेल आणि नोंद बरोबर असल्याचें कबूल करील तर कुळाची, कुटुंबांतील इसमाची अगर मुखत्याराची, अशा सह्या झाल्या पाहिजेत. मात्र सदोदित अशा कुळास इसमास अथवा मुखत्यारास निशाणी न लावतां आपलें नांव लिहितां येत असलें पाहिजे.

(५) जर कूळ, त्यानें लेखानें नेमिलेला कुटुंबांतील इसम अथवा त्याचा कायदेशीर रीतीनें नेमिलेला मुखत्यार, हजर असेल तर खोतास त्यास अभावणी-पत्रकांत केलेल्या नोंदीचा उतारा सहीनिशीं तेथल्या तेथें (Then and there) देणें भाग (shall be bound) आहे. जर कूळ नोंद बरोबर असल्याचें कबूल

* नियम १ मधील तारखांचे नंतर योग्य कारण पडल्यास काय करावें, याचा उलगडा नाहीं. पिक उभें असतां पहाणी, अभावणी करण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

‡ ही दुरुस्ती मु. स. ग्या. भाग १ ता. ३१।७।१९१३ रोजीं प्रसिद्ध झालेली असून येथें पूर्वी "वेळोवेळीं कलेक्टर ठरवील त्याप्रमाणें" असे शब्द होते.

करील आणि जर त्यानें आपली पावतीचोपडी आणली असेल तर त्यावर नांवेच्या बाजूस नोंदी उतरल्या पाहिजेत. इतर सर्व वेळीं उतारा वेगळ्या कागदावर असला पाहिजे.

(६) वरील ठरावांस अनुसरून केलेली आणि कुळानें, त्यानें लेखानें नेमिलेल्या कुटुंबांतील इसमानें, अथवा कायदेशीर रीतीनें नेमिलेल्या मुखत्यारानें, सही केलेली अभावणी पत्रकांतील नोंद आंत नमूद केलेल्या प्रत्येक गोष्टीसंबंधें निर्णायक पुरावा ( Conclusive evidence ) होईल व अभावणी अखेरची ( final ) मानली जाईल. आणि कूळ, त्यानें लेखानें नेमिलेला कुटुंबांतील इसम अथवा कायदेशीर रीतीनें नेमिलेला मुखत्यार, हजर नसतां, आणि नियम ३ च्या शेवटच्या भागाप्रमाणें अभावणीबद्दल कुळास कळविलेलें असतां, पुढील नियमांत सांगितल्याप्रमाणें विरुद्ध शाबीत होईपर्यंत अशा रीतीनें केलेली नोंद बरोबर आहे असें गृहीत ( presumed ) मानलें जाईल.

(७) अभावणी पत्रकावर ज्यानें सही केलेली नाहीं अथवा ज्यानें नुसती निशाणी केली आहे अशा कुळानें असमाधानकारक ( dissatisfied with ) अभावणी असेल तर, ज्यांत त्याचा गांव असेल अशा तालुक्याच्या मामलेदाराकडे अथवा महालाच्या महालकऱ्याकडे खोतानें अभावणी केल्यापासून सहा दिवसांचे आंत अर्ज करावा, नंतर त्या अधिकाऱ्यानें लगेच (forthwith) त्या गांवचे अथवा शेजारचे तीन सभ्य रहिवाशी, सात दिवसांचे आंत पहाणी व अभावणी करण्याकरितां, नेमले पाहिजेत. अशां इसमांनीं अथवा त्यांचे बहुमतानें केलेली अभावणी अखेरची (final) होईल, आणि खोतानें अभावणी पत्रकांत ती केल्यावेळींच नोंदली पाहिजे व त्या नोंदीवर त्या तीन इसमांनीं अगर बहुमतवाल्यांनीं सह्या केल्या पाहिजेत.

(८) जर खोत, अभावणी पत्रक ठेवण्यास, नियम १ यांत सांगितल्या रीतीनें आणि वेळीं पिकाची अभावणी करण्यास, नमूद केलेल्या ठरावांस अनुसरून नोंद करण्यास अथवा करविण्यास, अथवा नियम ३ यांत सांगितल्याप्रमाणें कुळास समज देण्यास, चुकेल तर खोतास, कुळास जें पिकाचें उत्पन्न झाल्याचें कबूल असेल त्या मानानें खंड घेण्याचा हक्क आहे. ( हा नियम कायद्याचें क्षेत्रांतील आहे, पान २४२ वरील टीप ९ पाहा ).

(९) पिकाची पहाणी व अभावणी होण्यापूर्वीं, अथवा ज्यापूर्वीं खोतानें पहाणी व अभावणी केली पाहिजे अशा, नियम १ यांत दिलेल्या, तारखांपूर्वीं, कुळानें पीक कापणें कायदेशीर होणार नाहीं. या नियमाविरुद्ध जर कूळ पीक कापील तर प्रत्येक संशयित मुद्यावर खोताचे तर्फें अनुमान काढलें जाईल, ( presumption shall be made).

(१०) खोतानें, कुळासमक्ष, त्यानें लेखानें नेमिलेल्या कुटुंबांतील इसमासमक्ष, अथवा कुळानें कायदेशीर रीत्या नेमिलेल्या मुखत्यारासमक्ष पिकाची पहाणी अभावणी केल्यानंतर अथवा ( or ) खोतानें नियम ३ यांत ठरविल्याप्रमाणें अशा कुळास समज दिल्यानंतर, जर नियम ७ खालीं अर्ज केल्याशिवाय कूळ पीक कापील तर, त्यास खोतानें केलेला अंदाज ( estimate ) कबूल ( admitted ) आहे असें मानलें जाईल. ( shall be deemed )

---

टीपः– वरील नियमांप्रमाणें पहाणी अभावणी करून, अभावणी पत्रकांतील नोंदी केल्या नतर अभावणीचे विरुद्ध कुळास अगर अधिकाऱ्यांस कांहीं तक्रार करितां येणार नाहीं. अधिकाऱ्यांची दृष्टी खोतानें काय केलें पाहिजे याचेकडे असते. कुळावर नियम ७ प्रमाणें घातलेल्या जबाबदारीकडे व नियम ९ व १० यांतील अनुमानाकडे त्यांचेकडून दुर्लक्ष केलें जातें हें योग्य नव्हे. अभावणीची पद्धत नाहींशी करण्याच्या दृष्टीनें कायद्याची रचना असून शिवाय अधिकाऱ्यांची करडी नजर असते या करितां खोतांनीं नियमांकडे दुर्लक्ष करून आपलें आपण नुकसान करून घेणें बरें नव्हे. प्रत्येक नोंदीवर पंचांच्या सह्या घेणें, सही करणारे कूळ असल्यास त्याची सही घेणें वगैरे गोष्टी केल्या पाहिजेत. सात दिवस पूर्वी कुळांस लेखी नोटिसा देणेची तजवीज करावी शिवाय पोलीसपाटलाच्या मार्फतही नियम २ मध्यें सांगितल्याप्रमाणें तारखा योग्य रीतीनें जाहीर करवाव्या. लेखी नोटिसा काढूनही त्या पोंचल्या किंवा नाहीं हें समजण्यास काय करावें याबद्दल नियमांत उल्लेख नाहीं परंतु लेखी नोटिसीची स्थलप्रत ठेऊन त्यावर पोलीसपाटलाच्या व मिळाल्यास कुळांच्या व आणखी अभावणीस येणाऱ्या पंचांच्या अगर इतर सभ्य इसमांच्या सह्या घेऊन ठेवाव्या. दंवडी वगैरे पिटविण्याची जबाबदारी पोलीस पाटलावर आहे. अभावणी करण्यास जाण्यापूर्वी द्यावयाची लेखी नोटीस पुढील नमुन्याची असावी असें आम्हीं सुचवितों.

नोटीस खालीं नमूद केलेलीं कुळें अगर कूळ यांस ..................
खोत वहिवाटदार यांचेकडून कळविण्यांत येतें कीं आपल्या खात्यांतील ( घडा तुटक असल्यास नंबर द्यावा ) ......................ठिकाणांतील हळव्या पिकाची पहाणी अभावणी ...................... तारीख रोजीं, महान पिकाची तारीख .................. रोजीं ( ज्याप्रमाणें पीक असेल त्याप्रमाणें लिहिणें ) आपले शेतांत येऊन पंचांसमक्ष करण्यांत येणार आहे. तरी आपण स्वतः अगर लेखांत नेमलेला कुटुंबांतील इसम अगर कायदेशीर मुखत्यार या मार्फत शेतांत हजर असावें, व पहाणी करीत येऊं तेव्हां हजर असण्याची खबरदारी ठेवावी. तसें आपणाकडून न होईल तर नियम ३ प्रमाणें आपले पश्चात् अभावणी केली जाईल व नंतर आपली तक्रार चालणार नाहीं. ह्या नोटीसीची नक्कल पोलीसपाटलापाशीं नि० २ प्रमाणें जाहीर करण्याकरितां दिली असून आपणांस कळविण्याकरितां

# कलम ४० रकम ब अन्वयें केलेले नियम.

## धान्याची जमीन ठरविण्याबाबद.

(१) धान्याची पहाणखर्ड्यांतील नोंद तिचेविरुद्ध पुरावा न आल्यास, धान्याचा निर्णायक पुरावा होईल. जर पहाणखर्ड्यांत फक्त धारा ह्मणून धारण केलेलें विशिष्ट (certain) क्षेत्र दाखविलें असेल, परंतु ठिकाणें दिलीं नसतील, तर रयतेच्या कबजांतील सर्व नंबरावरून धारा ह्मणून दाखल करावयाची जमीन सेटलमेंट कामगारानें आपल्या विचारानुरूप (discretion) निवड केली पाहिजे; मात्र केव्हांही (always) पहाणखर्ड्यांत दिलेलें, बर्कस जमिनीचें भात जमिनीशीं असलेलें, प्रमाण व क्षेत्र, हें उल्लंघितां कामा नये आणि जर अशा प्रमाणाबद्दल कांहीं माहिती उपलब्ध नसेल तर एक एकर भातजमिनीला चार एकर बर्कस जमीन असें प्रमाण गृहीत मानलें पाहिजे (shall be assumed.).

(२) ज्या ठिकाणीं पहाणखर्डा नसून फक्त गोषवाऱ्यांतील नोंद असेल तेथें ही नोंद, विरुद्ध पुरावा येई तोंपर्यंत, खातेदार कांहीं धारा जमीन धारण करितो अशाबद्दलचा निर्णायक पुरावा होईल. त्याच्या धान्याचें क्षेत्र नक्की करण्यास त्या गांवचा जमीनमहसूल कोणत्या दरानें ठरविलेला होता याचा शोध लावणें जरूर होईल. याबद्दलचा पुरावा आजूबाजूच्या गांवचे पहाणखर्ड्यावरून अथवा अन्य तऱ्हेनें otherwise) मिळवावा. सेटलमेंट कामगारानें नंतर वरील नियम १ यांत सांगितल्याप्रमाणें पुढील काम केलें पाहिजे (shall proceed). जर सेटलमेंट कामगाराचे समाधान होईल अशा रीतीनें जमिनमहसुलाचे दर ठरवितां येत नसतील तर गोषवाऱ्याचे तारखेचे दिवशीं जास्तींत जास्त दर असल्याची माहिती लागेल तो दर आधार धरून, वरीलप्रमाणें काम केलें पाहिजे.

(३) पहाणखर्डा अथवा गोषवारा यांतील नोंदीचे पुराव्याचें, सर्वे लागू करण्याच्या लगत पूर्वीच्या बारा वर्षांत सतत तीन वर्षे आपणास थल अगर मक्ता

---

(गांवचा महार)························याचेपाशीं दिली आहे. तरी पोंचल्याबद्दल आपल्या नांवासमोर आपली सही अगर निशाणी करावी. तारीख···············

नकल घेतली. ता.··········· सही खोताची···················

सही पो. पा.

कुळांचीं नांवें. समज घेतली तारीख

कुळांच्या सह्या अगर निशाण्या.

पोंचला अशाबद्दलचा लेखी पुरावा पुढें केल्यास, खोतास खंडन करितां येईल. आपणास वर्कस जमिनीबद्दल लागोपाठ (successive) त्याच जमिनीबद्दल नाचणी, वरी आणि हरीक या पिकांबद्दल अनुक्रमें देणें थलींत देण्यांत आलें असें त्यानें दाखविलें पाहिजे.

(४) जर पेहाणखर्डी अगर गोषवारा नसेल, तर सेटलमेंट कामगाराचें समाधान करण्याइतक्या पुरेशा वर्षांकरितां धान्याचें देणें दिलें असें दाखविणाऱ्या पावतीचोपड्या दाखवून धान्याचा कबजा शाबीत करावा. जर पावतीचोपड्यांत ठिकाणें नमूद केलेलीं नसलीं तर पहिल्या नियमाच्या शेवटच्या भागांत सांगितल्या रीतीनें त्यानें चालावें.

(५) जर कांहीं धारा रयतेनें धारण केला आहे असें शाबीत असेल, आणि जर त्याच्या कबजांतील कोणत्याही (any) जमिनीबद्दल थल दिली असें शाबीत होणार नाहीं तर सर्व जमीन त्याची धारा म्हणून नोंदली जाईल.

(पेहाणखर्डी व गोषवारा याबद्दलची माहिती प्रस्तावनेंत दिली आहे व नमुने पुढें दिले आहेत ते पहावे.)

---

# कलम ४० रकम ई खालील कानू

## सर्वसाधारण

(१) जेव्हां एकादा खोतहिस्सेदार आपली खोती खासगी जमीन विकतो तेव्हां त्याचा खरेदीदार त्या जमिनीचा, चालीप्रमाणें थल देणारा व वर्ग करण्याचा अधिकार असलेला, खातेदार कूळ म्हणून (निरंतरचें कूळ म्हणून) सर्व कागदीं नोंदला जाईल.

(२) खेळत्या धारेकऱ्यास, प्रत्येक वर्षी ३० एप्रिल रोजीं अगर त्या पूर्वी, येत्या वर्षाकरितां खोत निसबत जमिनीपैकीं कोणत्या शेतांत धान्याचे दरानें आपला वहिवाट करण्याचा हेतू आहे हें खोताला नोटिसीनें कळविणें भाग आहे. जर तो असें करण्यास चुकेल तर त्यानें आपला त्या मोसमेचा (Season) हक्क गमावला (waived) असें गृहीत मानलें जाईल व तो ज्या खोती जमिनींची वहिवाट करील त्याबद्दल त्यास थल द्यावी लागेल.

(३) १८६५ चे पूर्वी खोतहिस्सेदार मक्ता किंवा थलीपेक्षां कांहीं कमी दर देत होते असें शाबीत झाल्यास जुन्या चालीप्रमाणें, नाहींतर खोतहिस्सेदारांनी

त्यांच्या खासगी जमिनीबद्दल त्या गांवांतील खातेदार कुळांचे बाबतींत जो शिरस्त्याचा दर असेल त्या दराप्रमाणें, वहिवाटदार खोतास थल दिली पाहिजे.

(४) ज्या जमिनीबद्दल दोन गांवांतील हद्दीचा वाद होता अगर आहे अशी जमीन खातेदाराचे नांवें खालीलप्रमाणें नोंदण्यांत येईल:—

(अ) जर दोन्ही गांव निव्वळ धारा असतील तर धारा ह्मणून,

(ब) दोन्ही गांव खोती असतील तर अर्धेल तिर्धेल देणारे खातेदार कूळ ह्मणून.

(क) इतर कोणत्याही परिस्थितींत, फक्त सर्व दस्त लोकलफंड देणारे खातेदार कुळाची जमीन ह्मणून.

(५) खेळता घरेकरी यास झाडें तोडण्याचा हक्क नाहीं.*

(६) खोतानें कलम १५ प्रमाणें ठेवावयाचे हिशोबाचे कागद या नियमांस जोडलेल्या परिशिष्ट १ मधील १ अ, २, आणि ३, या नमुन्यांप्रमाणें आणि खालीं दिलेल्या रीतीनें ठेविले पाहिजेत.†

खतावणी ठेवणें ती नेहमींच्या जमा व नांवें या पद्धतीप्रमाणें प्रत्येक बोटखतांतील खात्याला एक निराळें खातें याप्रमाणें घालून त्यांत प्रत्येक रयतेकडून येणें असलेली व दिलेली रक्कम दाखवावी. रयतेच्या खात्यांत नांवेकडील ऐनजिनसी येण्याचा तपशील, ज्या तारखांचे आंत अभावणीच्या नियमांप्रमाणें तपशिलाच्या प्रत्येक बाबी संबंधें पिकाची अभावणी करणें भाग आहे, त्या तारखांपासून १५ दिवसांच आंत लिहावयाचा आहे.

रयतांच्या पावतीचोपड्यांतील नांवेकडील ऐनजिनसी येण्याचा तपशील, ज्या तारखेपूर्वीं निरनिराळ्या पिकाची अभावणी करणें भाग आहे त्या तारखांपासून एक महिन्याचे आंत, लिहावयाचा आहे; धारा व कच्चा भाग येण्याचा तपशील १ सप्टेंबरचे पूर्वीं लिहावयाचा आहे.

जेव्हां जेव्हां रयत देणें देईल, तेव्हां तेथल्या तेथें (then and there) खोतानें रयतेच्या पावतीचोपडींत जमेच्या बाजूला तें मांडून मालकाला चोपडी परत करावयाची आहे.

जर योग्य वेळीं नांवेकडील तपशील लिहिण्याकरितां रयत आपल्या चोपड्या आणणार नाहींत, तर खोतानें मुदत संपतांच ताबडतोब मामलेदार अगर महालकरी

---

* मुं. स. ग्या. भाग, पान ८५३ सन १८८७ पहा.

† मु. स. ग्या. भाग १ ता. ३१।७।१९१३ प्रमाणें हा नियम दुरुस्त केला असून पहिल्या दोन प्यार्‍यां ऐवजीं हा प्यारा नवीन दाखल करण्यांत आला आहे.

यांचेकडे तसा रिपार्ट केला पाहिजे. नंतर तो (मामलेदार अगर महालकरी) जरूर ते हुकूम ( instruction ) रयतेला करील.

पावतीचोपड्या बरोबर न आणतां जरी आपल्या महसुलाचें देणें देण्याकरितां रयतानें गल्ला अथवा रोख रक्कम आणिली तरी खोतानें देणे घेतलें पाहिजे; परंतु रयतेच्या खात्यांत भरपाईबद्दल केलेल्या नोंदींत ही हयगय (omission) नमूद करून तारीख घालून निराळी पावती दिली पाहिजे.

सर्व हिशोबाच्या वह्या ज्या वर्षाकरितां वापरावयाच्या असतील त्याच्या पूर्वीच्या १ जुलैचे रोजीं अगर आंत खोतानें मामलेदार अगर महालकरी याचे कचेरींत शिक्का करण्याकरितां आणल्या अगर पाठविल्या पाहिजेत. ह्यामध्यें रयतेच्या नवीन पावतीचोपड्यांचा समावेश होत असून, त्या याकरितां रयतेनें ज्या वर्षी त्या प्रथम वापरावयाच्या असतील त्या पूर्वीच्या १ जून रोजीं अगर अगोदर खोताकडे आणून दिल्या पाहिजेत.

प्रत्येक हिशोबाच्या वहीचे प्रत्येक पानावर शिक्का केला पाहिजे. पहिल्या दोन हिशोबाच्या वह्या खोतानें पुरविल्या पाहिजेत. प्रत्येक रयतेनें आपली पावतीचोपडी आपण पुरविली पाहिजे, वर नमूद केलेल्या हिशोबाचे कागदांव्यतिरिक्त खोतानें बोटखताची नक्कल स्वखर्चानें घेतली पाहिजे व मामलेदार अगर महालकरी जाहीर करील त्याप्रमाणें ती योग्यप्रकारें वेळोवेळीं सुधारली पाहिजे.

अशा रीतीनें केलेली बोटखताची नक्कल गांव जप्त झाल्यास जप्तीदाराचे उपयोगाकरितां मामलेदाराचे ताब्यांत दिली ( delivered up ) पाहिजे; जप्ती दूर झाल्यानंतर ती त्याची त्याला परत मिळेल. खोतानें आणखीं सुडाची व फाळणीबुकाची नक्कल घेतली पाहिजे. जर तो असें करणार नाहीं तर तीं बुकें न वापरल्यानें ज्या चुका घडतील त्यांजबद्दल तो जबाबदार होईल. परंतु दुसरे कोणतेही शिक्षेस (penalty) तो पात्र होणार नाहीं.

वहिवाटदार खोतानें, गांवच्या चतुःसीमेंत कोठेंतरी रयतेनें ऐनजिनसी अगर रोखीचे देणें आणून देण्याकरितां एक सोईवार जागा नेमली पाहिजे. त्यास कोणत्याही सबबीवर (pretence) कुळाला आपली थल, ज्या गांवांत सर्व कागदीं त्याचें नांव असेल त्या गांवाव्यतिरिक्त अन्य जागीं, देणें भाग पाडण्याचा हक्क नाहीं.

(७) बोटखत सोबत जोडलेल्या (परिशिष्ट १ नमुना १) नमुन्याप्रमाणें असेल. बोटखताचे शेवटीं गांवचे चालीप्रमाणें दर (customary rates) सविस्तर नमूद केले पाहिजेत.

बोटखतांतील हुकुमानें करावयाच्या कोणतेही दुरुस्तीवर मामलेदार अगर महालकरी यांची सही पाहिजे.

जर योग्य प्रकारें वांटप अथवा विभागणी (livi-i n)झाली असेल, तर प्रत्येक खोतहिस्सेदारास धडा नंबर दिला पाहिजे (shall be denoted). आणि प्रत्येक रयतेचे खात्यांत असलेली खोती जमीन ज्या तुटक खोत हिस्सेदाराकडे गेली असेल त्याचा धडा नंबर प्रत्येक सर्वेनंबरापुढें (affix d दिला पाहिजे, आणि एका विशिष्ट खोतहिस्सेदाराच्या हिश्शांत असलेले सर्वेनंबर क्रमवार नोंदले पाहिजेत.

सर्व बाबतींत ज्या ठिकाणीं सेटलमेंट कामगारानें कुळास खोती जमीन वर्ग करण्याचा अधिकार आहे असें ठरविलें असेल त्या ठिकाणीं ती खोटखताच्या पांचव्या रकान्यांत मामलेदार अथवा महालकरी यांनीं नोंदली पाहिजे.

---

# कलम ४० रकम फ अन्वयें केलेले कानू.

## वहिवाट कशी करावी त्याबद्दल साधारणरीत्या.

(१) कलम १० प्रमाणें खालसा झाल्याबद्दल द्यावयाचा दाखला, खातेदार कुळाचे बाबतींत तो क्रमानें ( consecutive ) दोन वर्षे थल देण्यास चुकला नसेल तर, व कूळ अज्ञान असून सज्ञान झाल्यापासून दोन वर्षे होऊन जाईपर्यंत तो थळ देण्यास चुकला नसेल तर, द्यावयाचा नाहीं.

(२) अज्ञान सज्ञान होते वेळीं जर खोताकडे प्रत्यक्ष कबजा असेल आणि तो सोडण्याचें नाकबूल करील, तर अज्ञानाचा अर्ज आल्यावर कलेक्टरनें कबजा त्याचे हवालीं केला पाहिजे.

(३) पड टाकण्याचे जरुरीशिवाय अन्य कोणत्याहि कारणानें जर खातेदार कूळ आपली जमीन वहिवाटणार नाहीं तर त्या हंगामाकरितां खोतानें जणूं काय आपलीच खोतनिसबत जमीन ह्मणून तिची वहिवाट करावी, परंतु अशी जर तो वहिवाट करील तर त्यास कलम १४ प्रमाणें मदत मिळणार नाहीं.

(४) कलम १२ खालीं करावयाचा लेखी अर्ज खालीलप्रमाणें असला पाहिजे.

मी/आह्मी खालीं सही करणार गांव ..................... चे खोत/खोत हिसेदार असा दाखला देतों कीं मी/आह्मीं खालील रकान्यांत नमूद केलेल्या सर्वेनंबर, पोट अथवा फाळणी नंबर या बाबद अ. ब. कुळास धारेकऱ्याचे ( अथवा कच्चे धारेकऱ्याचे इत्यादि असेल त्याप्रमाणें ) हक्क व अधिकार दिले आहेत:—

| सर्वे नंबर. | पोट अगर फाळणी नंबर. | क्षेत्र. | आकार. |
|---|---|---|---|
| | | | |

आणि $\frac{\text{मी}}{\text{आम्हीं}}$ अशी विनंति करितों कीं अशा प्रकारची दुरुस्ती गांवच्या बोटखतांत करण्यांत यावी.

तारीख............ सही...............

सर्व खोतहिस्सेदार अगर त्यांचे कायदेशीर मुखत्यार यांनीं सह्या केल्या पाहिजेत. तसें नसेल तर अर्ज रद्द करण्यांत येईल.

(५) कलम २७ प्रमाणें जर पाळीची यादी नसेल तर मामलेदार अगर महालकरी यांनीं प्रत्येक वर्षाच्या १ जून रोजीं अगर त्यापूर्वीं, पुढील मुलकी साला-करितां वहिवाटदार खाताचे नांव ३० जूनचे पूर्वीं सुचविणेविषयीं खोतहिस्सेदारांस नोटिस काढली पाहिजे.

(६) खोतांच्या जमेचा भरणा करणेच्या हप्त्याच्या तारखा ५ फेब्रुवारी आणि ५ एप्रिल अशा असतील. धारेकरी आणि कचेधारेकरी यांनीं थल द्यावयाच्या तारखा १५ डिसेंबर, १ फेब्रुवारी, १५ मार्च, आणि १ मे अशा असतील, मात्र दुप्पटकरी यानें आपली ऐनजिनसी थल खातेदार कुळांच्या तारखांप्रमाणेंच दिली पाहिजे.*

खातेदारानें आपली ऐनजिनसी थल खालीलप्रमाणें दिली पाहिजे:—

१५ डिसेंबर रोजीं—हळव्या किंवा लवकर तयार होणारे आणि महान अथवा उशिरां होणारे भाताबद्दल द्यावयाचे थलांपैकीं निम्मी थल आणि हळव्या वर्कस पिकाबद्दल सर्व थल.

---

टीप— * ही दुरुस्ती मुं. स. ग्या. भाग १ पान ११३२ तारीख १८।५। १९२२ रोजीं प्रसिद्ध करण्यांत आली. त्यापूर्वीं खोत व धारेकरी व कच्चा धारेकरी यांच्या तारखा १५ डिसेंबर, १ फेब्रुवारी, १५ मार्च व १ मे अशा होत्या.

१ फेब्रुवारी रोजीं—हळव्या व महान भाताबद्दल बाकी निम्मे थल आणि महान वर्कस पिकाच्या सर्व थलीपैकीं निम्मे थल.

१५ मार्च रोजीं—महान वर्कस थलीचा बाकी निम्मे भाग.

१ जून रोजीं—बागायतशिवाय इतर सर्व पिकाबद्दल देणें असलेली सर्व थल. बागायताबद्दल प्रत्येक तक्रारीचे बाबतींत मामलेदार अगर महालकरी जो योग्य वेळ ठरवील त्याचे आंत दिली पाहिजे.

खातेदार कूळ जर मक्ता देत असेल तर त्यानें तीन सारख्या हप्त्यांनीं १५ डिसेंबर १ फेब्रुवारी आणि १५ मार्च रोजीं दिला पाहिजे.

(७) वहिवाटदार खोतास कलम २९ प्रमाणें द्यावयाचा दाखला जोडलेले नमुन्याप्रमाणें ( प. १ न. ४ ) असावा.

---

# कलम ४० रकम ड खालीं केलेले कानू.

## लँ. रे. कोड कलम २१४ खालील नियम कोणते लागू याबाबद.

(ही सर्व रकम मुं. स. ग्या . भाग १ पान ६८८ येथें तारीख ६ एप्रिल १९२२ रोजीं प्रसिद्ध झालेल्या नं. २१८० फ या सरकारी ठरावाप्रमाणें नवीन दाखल करण्यांत आली आहे.)

(१) १८७९ च्या लँ. रे. कोड कलम २१४ खालीं यापुढें करण्यांत येणारा कोणताही नियम अथवा हुकूम, ज्या गांवास १८८० चा खोती सेटलमेंट आक्ट लागू आहे अशा गांवास तसा नियमांत अगर हुकूमांत अगर पुढें होणाऱ्या नियमांत अगर हुकमांत स्पष्ट उल्लेख नसेल तर, लागू होणार नाहीं.

(२) लँ. रे. कोड खालीं केलेले नं. १५,१६, २० ते २३; ३० ते ३८, ४१ ते ५३; ७३,७४,८४; ९२ ते ९८; १०३ ते ११७; ११९ ते १२७ आणि १३४ ते १४५ हे नियम अशा गांवास लागू असणार नाहींत.

(३) नियम ८० ते ८३, ८५ ते ९१ आणि ९९ ते १०२ धारा आणि कच्चा धारा जमिनीसच फक्त लागू आहेत. बाकीचे सर्व नियम अशा गांवांस खालीं दर्शविलेले फेरफार करून लागू आहेत. फेरफार येणें प्रमाणें:—

| नियमाचा नंबर | | सुचविलेले फेरफार. |
|---|---|---|
| २४ | | दुसरें वाक्य गाळावें. |
| ७२ ब | (१) | "गांव कामगार" या शब्दां ऐवजीं "गांवचा कुळकर्णी अथवा जमीदार," आणि तसा कुळकर्णी अथवा जमीदार नसेल त्यावेळीं "सर्कल इन्स्पेक्टर" असें समजावें. |
| | (२) | शेवटीं असलेल्या "कलमें ४६, ४७ आणि ६४" या ऐवजीं "कलम ६४" असें वाचावें. |
| १३३ | (१) | तिसऱ्या रकमेंत "गांव कामगार" याचे एवजीं "रेव्हेन्यु" पाटील, कुळकर्णी अथवा जमीदार" असे समजावें. |
| | (२) | आंकडे ११९ (अ), (ब), १३४ अथवा १३५ हे गाळावे. |
| | (३) | पोट रकमा अ, क आणि ड गाळाव्या. |
| | (४) | पोट रकम (ब) या ऐवजीं "अशा नियमानें देणेचा अधिकार दिला आहे अशी कोणतीही परवानगी देण्याकरितां कांहीं ही फी आकारून" हे शब्द घालावे. |

# नमुना नंबर १.

## सेटलमेंट पत्रक.

### व पत्रक.

तेरीज परिशिष्ट व खोतांची नावें व हिशाचे तपशिलाबद्दल गांव ……तालुके……

| खोताचा अनुक्रम, नंबर | कोर्टाकडून आलेल्या धडे वाटपाचा विभाग आणे, पै सुद्धां. | वकलाप्रमाणें भाग असले तर किती ते आणे, पै, सुद्धां. | कोष्टक २।३ याशिवाय सर्व प्रकारचे हिसेदार किंवा कोष्टक २।३ याचे पोट हिसेदार आ. पै. सु. | नांवें, ३।४ वारी लेल्या लोकांचीं. | कोष्टक २। यांत आणे- दाखल के- | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | ६ |
| | | | | | | |

# नमुना नंबर ४.

## वहिवाटदार खोताचा दाखला.

नंबर……

शिक्का.

……………………………

यांची सन १८८० चा आक्ट १ कलम २९ प्रमाणें मे० कलेक्टरसाहेब जिल्हा रत्नागिरी यांनीं मौजे …………… तालुके …………यांची साल ………… करितां वहिवाटदार खोत ह्मणून नेमणुक केली आहे.

(सही)
मामलेदार.

तारीख…………

नंबर……

शिक्का.

……………………………

यांची सन १८८० चा आक्ट १ कलम २९ प्रमाणें मे० कलेक्टरसाहेब जिल्हा रत्नागिरी यांनीं मौजे …………… तालुके …………यांची साल ………… करितां वहिवाटदार खोत ह्मणून नेमणुक केली आहे.

(सही)
मामलेदार.

तारीख…………

# नमुना नंबर १ (चालू).

## बोटखत.

जंगलखर्डा / बोटखत मौजे , तर्फ , तालुका , जिल्हा येथील सन १९

| नंबर. | | | शेताचें नांव. | प्रकार ह्मणजे इनाम किंवा खालसा, धारा किंवा खोती. | खाते नंबर. | हिस्सा समाईक पैकीं. | सर्व्हेप्रमाणें आकार घ्यावयाचा. | | | | | | | | एकूण आकार रुपये. | कुळाचें नांव. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | खरीप. | | रबी. | | बागाईत. | | वरकस. | | | | |
| सर्व्हे नंबर. | पोट नंबर. | वर्कस फाळणी नंबर. | | | | | एकर गुंठे. | आकार रुपये. | एकर गुंठे. | आकार रुपये. | एकर गुंठे. | आकार रुपये. | एकर गुंठे. | आकार रुपये. | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

टीपः—यांत गांवांतील जमिनींची खात्याप्रमाणें फोड करून प्रत्येक खात्यांत कोणकोणत्या जमिनी येतात हें खातेवार लिहिलेलें असतें. शेवटीं थलीचा शिरस्ता, वर्ग करण्याची पात्रापात्रता यांबद्दल शेरा दिलेला असतो. मागें पान १४५ व १४९ पहा.

जुन्या बोटखतांत शेवटचे दोन (१७,१८) हे रकाने नव्हते. कमजास्ती पत्रकही, याच नमुन्यांत भरतात.

# नमुना नंबर १ (अ)

## आभावणी पत्रक.

| १ | २ | ३ | | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | | | ९ | | | १० | ११ | १२ | १३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुक्रम नंबर | सर्वे नंबर | पोट नंबर | फाळणी नंबर | ठिकाणाचें नांव | लावणी केलेली जमीन | | लावणी करणाराचें नांव आणि नेमलेली तारीख | उत्पन्नाचा प्रकार | आभावणी प्रमाणें पिकाचें उत्पन्न (१६ पायल्यांचा मण) | | | चालीप्रमाणें देण्याचें थळ | | | आभावणीची तारीख | आभावणी करणारे लोकांची अगर इतर आभावणी करणाराची सह्या. | दोन साक्षीदाराच्या सह्या. | लावणी करणारे कुळाची सही. |
| | | | | | एकर | गुंठे | | | खंडी | मण | पायली | खंडी | मण | पायली | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |

टीपः—कुळाची सही घेतांना लेखी नोंद दिली ती पोंचली असें लिहून खालीं सही घ्यावी. कूळ हजर नसल्यास तसें लिहून ज्या इसमाबरोबर नोंद पाठविली त्याची सही घेऊन ठेवावी. साक्षीदारांच्या सह्या रोजचेरोज घ्यांव्या व आपणहि कराव्या. मागें पान १२४ व सरकारी कानू क. ४० अ पहा.

# नमुना नंबर १ (चालू).

## बोटखत.

जंगलखर्डा / बोटखत मौजे , तर्फ , तालुका , जिल्हा येथील सन १९

| नंबर. | | | शेताचें नांव. | प्रकार ह्मणजे इनाम किंवा खालसा, धारा किंवा खोती. | खाते नंबर. | हिस्सा समाईक पैकी. | सर्व्हेप्रमाणें आकार ध्यावयाचा. | | | | | | | | एकूण आकार रुपये. | कुळाचें नांव. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | खरीप. | | रबी. | | बागाईत. | | वरकस. | | | | |
| सर्व्हे नंबर. | पोट नंबर. | वर्कस फाळणी नंबर. | | | | | एकर गुंठे. | आकार रुपये. | एकर गुंठे. | आकार रुपये. | एकर गुंठे. | आकार रुपये. | एकर गुंठे. | आकार रुपये. | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

टीपः—यांत गांवांतील जमिनींची खात्याप्रमाणें फोड करून प्रत्येक खात्यांत कोणकोणत्या जमिनी येतात हें खातेवार लिहिलेलें असतें. शेवटीं थलीचा शिरस्ता, वर्ग करण्याची पात्रापात्रता यांबद्दल शेरा दिलेला असतो. मागें पान १४५ व १४९ पहा.

जुन्या बोटखतांत शेवटचे दोन (१७,१८) हे रकाने नव्हते. कमजास्ती पत्रकही याच नमुन्यांत भरतात.

# नमुना नंबर १ (अ)

## आभावणी पत्रक.

| १ | २ | ३ | | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | | | ९ | | | १० | ११ | १२ | १३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुक्रम नंबर | सर्वे नंबर | पोट नंबर | फाळणी नंबर | ठिकाणाचें नांव | लावणी केलेली जमीन | | लावणी करणाराचें नांव आणि नेमलेली तारीख | उत्पन्नाचा प्रकार | आभावणी प्रमाणें पिकाचें उत्पन्न (१६ पायल्यांचा मण) | | | चालीप्रमाणें देण्याचें थळ | | | आभावणीची तारीख | आभावणी करणारे खोतांची अगर इतर आभावणी करणाराची सह्या. | दोन साक्षीदारांच्या सह्या. | लावणी करणारे कुळाची सही. |
| | | | | | एकर | गुंठे | | | खंडी | मण | पायली | खंडी | मण | पायली | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |

टीपः—कुळाची सही घेतांना लेखी नोंद दिली ती पोंचली असें लिहून खालीं सही घ्यावी. कूळ हजर नसल्यास तसें लिहून ज्या इसमाबरोबर नोंद पाठविली त्याची सही घेऊन ठेवावी. साक्षीदारांच्या सह्या रोजचेरोज घ्यांव्या व आपणहि कराव्या. मागें पान १२४ च सरकारी कानू क. ४० अ पहा.

# नमुना नंबर २.

खतावणी मौजे............ तर्फ...... ता ............ खोती जमिनीबाबत सन......... शके.

खातेदाराचें नांव व खातें नंबर.

| भात | नाचणी | वरी |
|---|---|---|
| खं.म.पा. | खं.म.पा. | खं.म.पा. |
| ... ठिकाणाचें नांव, सर्वेनंबर, पोटनंबर, किती जमिनींत पीक आहे तें, एकंदर पीक व अभावणी किती झाली तें, अभावणीचा अनुक्रम नंबर.... | ... ठिकाणाचें नांव, सर्वे नंबर, फा. नंबर, जमीन, एकंदर पीक अभावणी प्रमाणें येणें व अभावणीचा अ. नंबर ...... | ... ठिकाणाचें नांव, सर्वे नंबर, फा. नंबर, जमीन, एकंदर पीक, अभवणी प्रमाणें येणें व अभावणीचा अ. नंबर... |
| ........ ,, ...... | ...... ,, ...... | ...... ,, ...... |
| ........ ,, ...... | ...... ,, ...... | ...... ,, ...... |
| —— एकूण. | —— एकूण | ...... एकूण |
| पोंच | पोंच | पोंच |
| . स्वतः आणून घातलें अगर ...... हस्तें घातलें तारीख ... भाताची किंमत दर खंडीस ... प्रमाणें रु. ...... | ... स्वतः आणून घातलें अगर हस्तें ...... तारीख .... याची किंमत दर खंडीस ........ प्रमाणें रु. ...... | ... स्वतः आणून घातलें अगर हस्तें ...... ता. ... याची किंमत दर खंडीस ........ प्रमाणें रु. ...... |
| —— बाकी येणें. | —— बाकी. | —— बाकी. |

टीप:— अशा रीतीनें पीकवार तपशील लिहून त्याचेंच खालीं पोंच लिहिण्याबद्दल सरकारी नमुना आहे. नेहमीची ही पद्धत नसून देशी जमाखर्चाचे पद्धतीप्रमाणें खर्चाचे बाजूस खातेदाराकडील भाताचें वगैरे सर्व येणें सर्वेनंबर पोटनंबरवार अभावणीचा अनुक्रम नंबर देऊन नमूद करावें व कुळाकडून येईल तसतसें जमेच्या बाजूला हस्तें व तारीख वगैरे तपशीलासह लिहावें. खतावणीचा खातेनंबर, खातेदाराचें नाव व चोपडखतांतील खातें नंबर याप्रमाणें प्रत्येक खात्याचा मथळा लिहावा व अखेर बाकी काढावी. नांवेंची बाजू अभावणी पासून १५ दिवसांत भरावयाची असल्यानें प्रत्येक खात्याचा तपशील केव्हां भरला त्याची तारीख लिहावी.

(मागें पान १२५ पहा)

# नमुना नंबर ३

## रयतेच्या पावतीचोपडीचा नमुना

खातें पान ······ खातें नंबर ······

खातेदाराचें नांव ········· राहणार मौजे ······ तर्फ ······ ता. ······

| | |
|---|---|
| रु. आ. पै | रु. आ. पै |
| · · · रोख दिले हस्तें ············ | · · · चालू सालकरितां येणें ठरलें |
| तारीख ········· | धारा जमिनीबाबद |
| ······सरकारदस्त | सरकारदस्त ( ठिकाणचा स. नं |
| ······लोकलफंड | वगैरे तपशील ) |
| —— एकूण ( अक्षरी ) | लोकलफंड |
| सही खोताची ······ | —— एकूण |
| खं. म. पा. | खं. म. पा. |
| · · · गल्ला पोंचला हस्तें ···ता.··· | · · · थल येणें त्याचा तपशील |
| ······भात | भात स. नं. पीक पैकीं खोताचें |
| ······प्रतवार तपशील देणें | ········ येणें. |
| —— एकूण ( अक्षरीं ) | —— |
| सही खोताची ········ | खं. म. पा. |
| | · · · नाचणी स. नं. फा. नं. पीक खोताचें येणें |
| | ( असें प्रत्येक पिकाचें तपशीलवार येणें लिहिणें. ) |

टीपः—(१) जर गल्ल्याऐवजीं पैसा दिला असेल तर गल्ला जमा करून तपशिलांत आलेल्या पैशाचा उल्लेख करावा. (२) वर्षाचे अखेरीस येणें राहील तें तपशीलवार लिहावें. (३) दर पांच वर्षांनीं एकदां सर्व नंबर, पोट, फाळणी नंबर वार तपशील द्यावा, बाकी वर्षीं जो फरक झाला असेल तेव्हढाच नमूद करावा. (४) निव्वळ खोती गांवांत अगर एक सालीं कुळासंबंधें धान्याचा वगैरे तपशील लिहिण्याचें कारण नाहीं. (५) या नमुन्याप्रमाणें पावती मोडून द्यावी.

# नमुना नं. ५*

## पेशवे पहाणीचे कागद.

हिशब जमाबंदी आकार पाहाणी मौजे............प्रां..........मामले .........सुरू सब सबैन मया अलफ मा। भिकाजी रघुनाथ व धोंडो नारायण कारकून.

गल्ला कैली खंडी. वजन कच्चे

१०।·।।।≈ भात (सवा दहा खंडी पाऊण मण दोन पायली) ० ०

·।४।।१।। वरकस सुमारी सुमार

१०।।।·।।·।। ( number )

१ फणस बारदार

४ रायमाड

ता।

ऐन जमीन बिघे ·।४।।।२।।।. वजा खराबा भात जमीन बिघे

८।।।२।।। किर्दसार

८४८३।।। मध्यम कांर्दसार

८५।। माळजमीन कनिष्ठ

८।।।१।। खाजणी दर्यागर्क

८११।२।।।.

बाकी लागवड जमीन ८२३।।. एकूण

दर बिघा ·।३।।।. (पावणे नऊ मण) प्रमाणें भात कैली खंडी १०।·।।।२

वरकस नजर अंदाज

·।३।।१ नागली

८१ वरी

८८।।· उडीद

·।४।।१।।.

सुमारी ५ सुमार

---

* टीपः–पुढील नमुने सरकारी कानु बरोबर दिलेले नसून आम्हीं विशेष माहितीकरितां दिले आहेत. नमुने ५ ते ११ हे पेशवे पहाणीचे वेळचे असून त्यांचे उतारे पुणें दप्तरांत मिळूं शकतात.

# नमुना नंबर ६.

श्री.

पाहाणी खर्डा जिरायत मौजे.........प्रांत.........मामले.........

मु॥ सवासबैन मया व अलफ मा॥ धोंडो............ कारकून

### भात जमीन बिघे.

शेत खैरे बु॥ बरहुकूम गुदस्त जमिन स॥ ॥।१।

हल्ली शेती सालमजकूर शेती काना म्हार

लागवड

लांबी रुंदी

॥· ४ ३ (लांबी रुंदीच्या काठ्यांचे

॥· ५ १ आकडे आहेत.)

.................

.................

.................

खराब

।· २ २

।· २ २

।· ५ १

॥।·

तेरीज जमिन बिघे ॥।१॥। पै॥ वजा किर्दसार जमिन ॥। बाकी लागवड जमीन ॥।१ एकूण दर बिघा ·।२ ·।३॥।· प्रमाणें

शेतखरी बु॥ गु॥ जमिन ॥।४।· हल्ली शेती रामजी नांखती

लागवड

.................

.................

.................

खराब

.................

.................

.................

गुदस्ताचा सुड पाहातां कमी आले सबब सन आर्बा खमसैनां लागवड खराबा मिळोन बिघे ४।३॥।. खाली वरकस केली माळ जमीन खराब कमी आहे १।·॥·

................. ( याप्रमाणें शेतवार .................

................. तपशील आहे. ) .................

पहाणी खर्डा जिरायत मौजे.........मामले.........बंद १ ते ७.

# नमुना नंबर ७

श्री.

.... पहाणी खर्डा नजर माजणा मौजे ......... प्रगणे हवेली मामले तळें सुरूसबासबैन मया व अलफ बरकस ......

| रामजी पवर | | | धर्माजी खाडा | |
|---|---|---|---|---|
| नागली | वरी | | नागली | वरी |
| ८८१ | ८८१ | | ८८॥ | ८॥' |
| ८॥' | | | ८०॥ | |
| ८॥१ | | | ८८। | |
| ८॥२ | | | ८१८१ | |
| | | | ८१॥१ | |

...............( निरनिराळा कुळवार तपशील )............

| | ऐनगल्ला | नागली | वरी | उडीद |
|---|---|---|---|---|
| रामजी पवार | ८॥२ | ८॥१ | ८१ | ० |
| रामजी नाखती | ८१८२ | ८॥।.॥ | ८।१॥ | ० |
| ... | ... | ... | ... | ... |
| खुद्द खोत | ८८२ | ८८१॥ | ... | ८८॥ |
| ... | ... | ... | ... | ... |
| | ।४॥१॥ | ।३॥१ | ८८। | ८८॥ |

पाहाणी खर्डा बरकस जनर माजणा बंद १।२ मौजे..................

# नमुना नंबर १३

क्षेत्र बुक

तारीख माहे सन १९ कबजेदाराचें नांवः—

| सर्वे नंबर | ऐन एकर | वजा खराब | बाकी एकर | आकार |
|---|---|---|---|---|

नकाशा

स्केलावर

# नमुना नंबर ८.

श्री.

बोटखत भातशेत कुळारग मौजे.........प्रो.........
मामले.....................सुमा सबासबैन मया वं अलफ
रघुनाथ बहिरव खोत

| | — ऐनजमीन | वजाखरावा | बाकीजमीन | एकूणभात |
|---|---|---|---|---|
| शेतखेरेखुर्द | ८॥३॥। | | ८॥३॥। | ।१८॥ |
| शेतनांबरे | ८२८४ | ८८२ | ८२८२ | ॥३।१॥ |
| शेतपिपळे | ८१॥।२॥। | ८८३। | ८१॥४॥ | ॥।॥ |
| .....................(शेतांचीं नांवें आहेत) | | | | |
| ..................... | | | | |
| | ८१८॥॥ | ८२८१ | ८१६।४॥ | ७८४।१ |

काळनाक चांगनाक

(टिकाणें वगैरे)...............

खा जमीन चिघे

| सालीना | | मोघम | |
|---|---|---|---|
| ८॥। | चिचबंदर | ८।३। | शेत ह्मातार वाचूळें पैकीं |
| ८१।२॥ | शेत अड्ढचा पायथा | ० | शेत कुडेट पैकीं |
| ८१।१॥। | शेत तेटवे | ८॥।३॥। | कामथ पैकीं |
| ८१८१॥। | शेत तेटवे रुपे खुर्द | — | |
| .................... | | ८१ | |
| ८६॥।४॥ | | | |

८८।१॥

तेरीज भात शेत

| | ऐनजि० | वजाखरावा | बाकी | भात |
|---|---|---|---|---|
| रघुनाथ बहिरव खोत | ८१८॥॥ | ८२८१ | ८१६।४॥ | ७८४।१ |
| बाळनाक | ८१॥४॥ | ८८२॥। | ८०॥१॥। | ॥३॥।२॥ |
| पिरनाक | ८१॥१॥। | ८।१॥ | ८१।। | ॥१८॥। |
| धर्माजी खाडे | ८२॥२॥। | ८८४। | ८२।३। | १८१८१॥ |
| कालनाक | ८२८२ | ८।१॥। | ८१॥।। | ।॥।२। |
| | ८२६॥१। | ८३८१। | ८२३॥ | १०।॥।२ |

बोटखत भातशेत कुळरग मौजे ज़ानवली नं.१

# नमुना नंबर ९

तेरीज शेतगणा पाहाणी जिराइत मौजे······मामले······सुमासबासबैन मया व अलफ

| | जमीन साल गु॥आर्वाखसैन | पाहाणी साल-मजकुर | वजाखराबा | कांर्दसाल | मध्यम | मालजमीन कनीष्ट | खाजण दर्यागर्क | बाकी लागवड | एकूण आकार दर बिघा भात '।३॥।' |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शेत खरे बु. | ६॥।१।' | ६॥।१॥।' | ६६॥।' | ६६॥। | . | . | . | ६॥।१ | '।= |
| शेत खरे खुर्द | ६॥४।' | ६॥३॥।' | . | . | . | . | . | ६॥३॥।' | '।१६॥' |
| शेत जावळ | ६२६२॥।' | ६२६४ | ६६२ | . | . | ६६२ | . | ६२६२ | '॥।३६१॥।' |
| ······················ सर्व शेतें वगैरे वर्णन वरीलप्रमाणें दिलें आहे.···················· | | | | | | | | | |
| | | '।४॥।२॥।' | ६११।२॥।' | ६॥।२॥।. | ६४६३॥' | ६५॥' | ६॥।१॥।. | ६२३॥. | १०।.॥।२ |

# नमुना नंबर १०

तेरीज वरकस नजर मांजना मौजे············मामले···········सुमासबैन मया व अलफ

जमा सालमजकूर

| | ऐनगल्ला कैली | नागली | वरी | तीळ | हरीक | उडीद |
|---|---|---|---|---|---|---|
| चांनोजी खुडा | ६१।१॥ | ६॥।' | ६॥' | ० | ६६१॥ | ॥ |
| येसजी तोबटे | '।६१॥ | ६२॥ | ६१. | ० | ६१॥ | ६६१॥. |
| कासजी सदोडा | ६।' | ० | ० | ० | ६।. | ० |
| ( कुळांचीं नांवें दिलेलीं असून पुढें येणेंगल्ला दिलेला आहे.) | | | | | | |
| | २।-।' | १६१ | '॥३॥। | ६१२॥ | '।४॥।१॥ | ६६२ |

# नमुना नंबर ११

श्री.

सूड कमजाजती मौजे······प्रा॥ ······मामले······सुमा आर्बा समानीन मिया व अलफ.

बरहुकूम गुदस्तसाल समसमानीन.

| | ऐनगल्ला | भात कैली खंडी | वरकस कैली खंडी |
|---|---|---|---|
| ऐनदस्त | २५८३।२।॰ | २१॥२॥।२।॰ | ३॥॰॥ |
| चढचौ॥ | ४८१ | ३॥३॥। | ॰।२॥ |
| | २९८४॥२।॰ | २५।१॥२। | ३॥।३ |
| चढसाल मजकूर | ॰।॰ | ॰।॰ | • |
| जासती मौजे चांडोरे त॥ गोवले पैकीं सजणाजी चालका याचा धारा बेदाज आला तो जमा. | ११३८॥ | ॥।॰॥।१॥ | ॰॥२८२ |
| | ३०॥।२॥२॥। | २६।२॥॰।॥ | ४॥८२ |

यांस पाहाणी सालमजकूर

१६॥।८॥१। भात कैली

३॥१॥।१ वरकस

२०।४।२।

कमी सरासरी पहाणीमुळें गल्ला कैली खंडी

१०।३।॰॥

तपशील.

हजर कुळांपैकीं.

१८२।२।

(कुळांचीं नांवें व प्रत्येकास किती कमी तें.)

गयाळ कुळांपैकीं.

(कुळवार तपशील)

...........................

...........................

जास्ती पाहाणीमुळें कुळारगवर कीर्द भात गल्ला कैली.

८।.।. सदाशिव दामोदर

वगैरे कुळावर

# नमुना नंबर १२

## टिपण बुक

जि हा—　　　मोजणीची तारीख　माहे　　　सन १९
तालुका—
मौजे—
मालकाचें—

मोजणीबरोबर इसम—
सर्वे नंबर

ऐन एकर　　　वजा खराबा　　　बाकी एकर　　　आकार

नकाशा

# नमुना नंबर १४

## वसलेवार.( हा नमुना क्षेत्रबुकाबरोबर नेहमीं असतो. )

| वसल्याचा नंबर | वसल्याचा प्रकार | लांबी | | रुंदी | | गुणाकार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शंकूपर्यंत | एकंदर. | एकंदर. | निम्मे | गुंठे | आणे | प्रती आणे |
| | | | | | | | | |

# नमुना नंबर २१

## हक्काचें पत्रक (गा. न. नं, ६)

| नोंदीचा अनुक्रम नंबर. | हक्काचा प्रकार. | फरफार झालेले सर्वे नंबर आणि पोटहिस्से. | तपासणा अंमलदाराची सही किंवा दोरा. |
|---|---|---|---|
| | | | |

# नमुना नंबर १५

## प्रतीबुक

पान तारीख माहे सन १९२ इसवी रोजीं प्रतीबरोबर खातेदार लोक व गांवचे कामदार लोक हजर होते ते खालीं लिहिल्याप्रमाणें:—

.................... .................. ....................

रेव्हिन्यु सर्वे नंबर सदरहू नंबरचें:—

| माजी नंबर. | डागाचें नांव. | सरकारी किंवा इनामी. | कब्जेदाराचें नांव. | जमिनीचा प्रकार | पेन प्रकार गुंठे. | खराब प्रकार गुंठे. | बाकी प्रकार गुंठे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जिराईत. | | | |
| | | | | तरी. | | | |
| | | | | बागाईत. | | | |
| | | | | एकूण. | | | |

या नंबरची प्रत खालीं लिहिल्याप्रमाणें जमीन.

लागण. पड.

दिशा. प्रत. हिसे. आणे.

कलम:—

१. नंबर गांवापासून मैल मजेरपासून मैल
२. या नंबरांत खत घालण्याची वहिवाट
३. गुरांस पाणी प्यावयाचें तें
४. मोजणी व मोजणी बुकांतील क्षेत्र व लिहिण्याचा मजकूर:—

५. नकाशाबरोबर.
६. या नंबरांस खराब.
७. बांध व दगड मोजणी बुकाप्रमाणें व कायद्याप्रमाणें बरोबर.

(सही) क्लासर.

तरी प्रकरणीं मजकूर.

१. तरी जमिनींत पाणी सरवे नंबर चें.
२ तरी जमिनींत ऊंस लावण्याची वहिवाट दुफसल करण्याची वहिवाट.

# नमुना नंबर १६

बागायत तक्ता

मौजे  तालुका  जिल्हा  येथील

| विहीर कोणते रेव्हेन्यु सर्व्हे नंबरांत आहे व तो नंबर सरकारी किंवा इनामी. | विहिरीचे शेजवार याद्विरून पाण्याचे मगदुराचा नंबर. | विहीर कोणी व कधीं खणली व वहिवाट कोणाकडे आहे. | विहिरीचे घारोळ किती मोटेचे, कसे बांधले आहेत अगर रहाट आहे, विहीर कशी बांधली आहे. | विहिरीची खोली: कण्यापासून पाण्यापावेतों (यार्ड) | विहिरीची खोली: पाण्याची खोली (यार्ड) | विहिरीची खोली: पाण्याचे ठिकाणीं विहिरीचा गर्भ (यार्ड) | मोट शेवटीं कधीं धरली होती | किती मोठा धरण्याची वहिवाट आहे. | उन्हाळ्यांत दर रविवारीं सरासरी कितीतास मोट धरतात | पाणी गोड अगर खारें व पाझर कसे आहेत. | कोणते रेव्हेन्यु सर्व्हे नंबरांतील: सर्व्हे नंबर व तो सरकारी अगर इनामी | कोणते रेव्हेन्यु सर्व्हे नंबरांतील: खराब वजा जातां बाकी कीर्दसार एकर गुंठे, पैकीं सरासरी बागाइत होत आहेत तें एकर गुंठे. | कोणते रेव्हेन्यु सर्व्हे नंबरांतील: पाणी घेण्याचा हक्क अथवा पाण्याची वहिवाट कोणाकडे आहे किंवा नाहीं. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | | | | | | | |

# नमुना नंबर १६ ( पुढें चालू )

## बागायत तक्ता ( पुढें चालू ).

विहिरीचे मोटस्थळ व पाटस्थळ बागाईताचे मजकुरा प्रकरणीं. सन १९   इसवी.

<table>
<tr><th colspan="10">जमीन भिजते व बागाईत पिकें, वगैरे.</th><th colspan="4">सुपरिं० साहेबांचा ठराव</th><th rowspan="3">तलावाहून किंवा ओढ्याचे धरणाहून पाटानें पाणी येत असल्यास बागाईताबद्दल पुरी समजूत होण्याकरितां कांहीं अधिक मजकूर लिहिणें जरूर दिसल्यास तें थोडक्यांत लिहावें.</th></tr>
<tr><th rowspan="2">बागाईत जमीन फरपाळीने होत आहे किंवा नाहीं.</th><th colspan="5">बागाईत जमिनींत साल मजकुरीं पिकें आहेत त्याचा तपशील.</th><th colspan="2">पाट असल्यास त्या प्रकरणीं</th><th rowspan="2">जमिनीचे भाग आणे.</th><th rowspan="2">बागाईत जमिनीचे पोटक्लास.</th><th rowspan="2">बागाईत जमिनीत फळझाडें आहेत की व त्यांची संख्या.</th><th rowspan="2">सर्वे नंबर</th><th rowspan="2">बागाईत एकर गुंठे.</th><th rowspan="2">दर</th></tr>
<tr><th>एकर गुंठे</th><th>पिकाचा आकार</th><th>नारळी व सुपारीचे झाडांची संख्या<br>भारदार</th><th>उमेदवार</th><th>रोपे</th><th>किती जमीन पाटाचे पाण्यानें भिजते ते, एकर गुंठे.</th><th>पाण्याचे भाग क्लास</th></tr>
<tr><td>१५</td><td>१६</td><td>१७</td><td>१८</td><td>१९</td><td>२०</td><td>२१</td><td>२२</td><td>२३</td><td>२४</td><td>२५</td><td>२६</td><td>२७</td><td>२८</td><td>२९ (आकार.)</td><td>३०</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

## नमुना नंबर १७

कच्चा सूड.

| नंबर | | | शेताचें नांव | प्रकार | क्षेत्रफळ | | | भाग आणे | सांगसन दर खरीप रबी बागाईत | | आकार रुपये | | जुडीबद्दल यावयाचें तें | इनाम आकार जुडी वजा जातां | नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वे नंबर | पोट नंबर | फाळणी नंबर | | | ऐन एकर गुंठे | पैकीं वजा खराबा एकर गुंठे | बाकी एकर गुंठे | | दर | कायम दर | दराप्रमाणें आकार रुपये | कायम आकार रुपये | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | | | | | | | | | |

## नमुना नंबर १८

पक्का सूड.

| सर्वे नंबर. | शेताचें नांव. | तपशील. | | | | | | | | | | कसणाराचें नांव. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इनामी किंवा खालसा. | जमिनीचा प्रकार. | पोट नंबर. | फाळणी नंबर. | ऐन एकर गुंठे. | पैकीं वजा खराबा एकर गुंठे. | बाकी एकर गुंठे. | कायम आकार रुपये. | जुडीबद्दल यावयाचें तें. | इनामआकार जुडी वजा जातां. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |

# नमुना नंबर १९

## धारेपत्रक

तक्ता मौजे······तर्फ······तालुके······जिल्हा रत्नागिरी येथील धारेकरी लोक यांचे रुजवातीबद्दल सन १८६४ इसवी

| शेताचा नंबर | पाहाणी खर्ड्या प्रमाणें. | | | वारसदाराचें नांव व हल्लीं वहिवाटदाराचें नांव. | खरीप | | | | | | वरकस | | | | | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | हल्लीं वहिवाटदार यांजकडे कसे वहिवाटीस आले | | हल्लीं मोजणी प्रमाणें. | | | | | | हल्लीं वहिवाटदार यांजकडे कसे वहिवाटीस आले. | | | |
| | शेताचें नांव | पहाण खर्ड्या प्रमाणें नांव. | बिघे | | वडिलापासून | खरेदी किंवा गहाण संबंधानें | नंबर | पोटनंबर | एकर गुंठे | शेरा | पाहाणी खर्ड्याप्रमाणें बिघे | दस्त | वडिलापासून | खरेदी संबंधानें | वरकस कोणते नंबरांत सामील जाले ते नंबर. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | | | | | | | | | | |

टीप—हा कागद फार जुना १८६४।६५ चे सुमारचा आहे.

# नमुना नंबर २०.

## फाळणी बुक.

तारीख १३।४।१८८१ रोज

माहितगार

१ मोरो आबाजी कोरेकर

२ बाबाजी महादेव कोरेकर

चालता नंबर ६ — नकाशा — सर्वे नंबर ४४

| ठिकाणाचें नांव | फाळणी नंबर | प्रकार | ऐन एकर | खराबा | बाकी एकर | खोत नंबर | खाते नंबर | हिस्सा | रयताचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| भटीण देवीचा खळगा | १ | खोता | ३१८ | ६१० | २६१८ | २ | १ | | मो० आ० कोरेकर. |

# नमुना नंबर २२.

## गांवचा नमुना नंबर ७—जमिनीची अनुक्रमणिका.

| सर्वे नंबर, इनामाचा प्रकार, जमिनींचें स्थानिक नांव (असेल तर) | पोट हिस्सा नंबर. | क्षेत्र | आकार | जुडी अगर विशेष अगर बिनशेतकी आकार. | सरकारी जमिनींचा कबजेदार व इनाम जमिनीचा धारण करणारा. | हक्क नोंदणी पत्रकांतील नंबर. | इतर हक्क अथवा बोजा आणि हक्क धारण करणाराचें व बोजा अस-णाराचें नांव. | हक्क नोंदणी पत्रकां-तील नंबर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | एकर | रु. आ. पै. | रु. आ. पै. | | | | |

# नमुना नंबर २३

## फेरफाराचें रजिस्टर.

| फेरफाराचा अनुक्रम नंबर | फेरफाराची नोंद केल्याची तारीख. | मागिल नंबराचा दाखला. | पुढील नंबराचा दाखला. | सर्वे नंबर व नंबराचा पोट-विभाव. | क्षेत्र. | आकार. | जुडी अगर विशेष अगर बिनशेतीचा आकार | खालसा जमिनीचा कबजेदार अगर इनाम जमिनीचा धारण करणार. | हक्काचा प्रकार व हक्क कसा प्राप्त जाहला तें, व तो प्राप्त झाल्याची मिळाल्यास तारीख | इतर हक्क व बोजे, व हक्कदाराचें अगर बोजेदाराचें नांव. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गांवचा न. नं. ६ चीं जुळतीं कोष्टकें. | | | २ अगर ५. | ३ किंवा ६. | ४ किंवा ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |



# नमुना नंबर २९

## वारस तपास.

जमा मौजे······तर्फ······तालुके······जिल्हा रत्नागिरी येथील मयतखातेदारांचे वारसांचीं नावें दाखल करणेंचा—

| अनुक्रम नंबर. | बोट-खतांतील नंबर | मयत खातेदाराचें नांव. | वारसाचें नांव. | दुरुस्ती करणेंविषयीं झालेला हुकूम. | हुकुमाची तारीख. | दुरुस्ती केल्याची तारीख व अंमलदाराची सही. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

# नमुना नंबर २४.

हिस्साफार्म नंबर ४, कोंकण.

आकारफोड पत्रक, मौजे , तालुका , जिल्हा

| पोट व फाळणी नंबर. | | | | | | | नवीन हिस्सा | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुक्रम नंबर. | सर्वे नंबर. | पोट व फाळणी नंबर. | ऐन एकर. | पोट खराब. | बाकी एकर. | आकार. | हिस्सा नंबर. | ज्या पोट व फाळणी नं. | बरमिळून हिस्सा झाला ते पोट फाळणी नंबर. | ऐन एकर. | पोट खराब. | बाकी एकर. | कच्चा आकार. | हिश्शाचा एकंदर आकार. | कबजेदाराचें नांव. | शेरा. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | | | | | | | | | | |

# नमुना नंबर २५

हिस्साफार्म नंबर ३ टिपणबुक. पान

गांवाचें नांव

तालुका सर्व्हे नंबर. ऐन एकर. खराब. बाकी एकर

जिल्हा हिस्साफार्म नंबर ४, पान पट्टा.

नकाशा

| हिस्सा नंबर. | कबजेदाराचें नांव. | हजर किंवा गैरहजर. | हिस्सा नंबर. | कबजेदाराचें नांव. | हजर किंवा गैरहजर. | हिस्सा नंबर. | कबजेदाराचें नांव. | हजर किंवा गैरहजर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

# नमुना नंबर २६

## ड पत्रक

परिशिष्ट ड. सन १८६५ चा आक्ट १ कलम २७ व सरकारचा ठराव नंबर २४७४ तारीख २४ एप्रिल सन १८७६ वरून केलले कुळाचे हकीकतीबद्दलचें रजिष्टर मौजे—

| खोटखतांतील खात्याचा नं. | रयतेचें नांव. | तो आपला हक्क कोणत्या प्रकारचा आहे ह्मणतो | खोताची कांहीं हरकत आहे कीं काय | जर कांहीं हरकत असेल तर ती कोणती. | तपास क.रून आह्मीं ट.राव करतं. ते. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

# नमुना नं. २७

'ग' पत्रक तेरीज मक्त्याबद्दल मौजे            तालुके            जिल्हा

| खोटखतांतील खात्याचा नंबर. | खोटखतांतील खातेदाराचें नांव व ठिकाणें. | सर्वे नंबर | पोट नंबर | मक्ता. | | | | | सद्या | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नक्त | ऐन जिन्नस गल्ला | | | | | |
| | | | | | भात | नागली | वरी | इतर | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

# नमुना नंबर २८

परिशिष्ट क येणेंप्रमाणें—उतारा खोत व कुळें त्यांचे हक्काचे तेरजांतील मौजे— तालुका            याजबद्दल—

| खोटखतांतील खात्याचा नंबर | रयतेचें नांव | रयतेचा हक्क उर्फ स्थिती | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

# परिशिष्ट २

## हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें वारसांचा क्रम.

( मुंबई इलाक्यांतील मिताक्षराप्रमाणें ).

पत्नी दुहितरश्चैव पितरौ भ्रातरस्तथा ।
तत्सुता गोत्रजा बन्धु शिष्यसब्रह्मचारिण: ॥ १ ॥
एषांमभावे पूर्वस्य धनभागुत्तरोत्तरः ।
स्वर्यातस्य ह्यपुत्रस्य सर्ववर्णेष्वयंविधिः ॥ २ ॥
आत्मपितृष्वसुःपुत्राः आत्ममातृष्वसुः सुताः ।
आत्ममातुलपुत्राश्च विज्ञेया आत्मबांधवाः ॥ ३ ॥
पितुः पितृष्वसुः पुत्राः पितृमातृश्वसुः सुताः ।
पितुर्मातुलपुत्राश्च विज्ञेयाः पितृबांधवाः ॥ ४ ॥
मातुः पितृसुष्वः पुत्रा मातुर्मातृष्वसुः सुताः ।
मातुर्मातुलपुत्राश्च विज्ञेया मातृबांधवाः ॥ ५ ॥
क्लीबोऽथ पतितस्तज्जः पङ्गुरुन्मत्तको जडः ।
अन्धोऽचिकित्स्यरोगाद्याः भर्तव्याः स्युर्निरंशकाः ॥ ६ ॥

मर्द इसमाचे मरणानंतर त्याचा वारसा खालीलक्रमानें जातो. वडिलोपार्जित मिळकतीवर जन्माबरोबरच वारसाचा हक्क उत्पन्न होतो.

१ पुत्र
२ नातू ( बाप मयत असल्यास )
३ पणतू ( बाप आणि आजा मयत असल्यास )
४ विधवा; ५ कन्या; ६ कन्यापुत्र
७ आई; ८ बाप;
९ भाऊ(सख्खे भाऊ प्रथम व नंतर सावत्र )
१० भावाचा मुलगा; ११ बापाची आई
१२ सख्खी बहीण; १३ सावत्र बहीण;
१४ नातवाचे मुलाचा मुलगा
१५ नातवाचे मु० मु० मुलगा
१६ नातवाचे मु० मु० मु० मुलगा
१७ विधवा सून; १८ विधवा नातसून;
१९ नातवाचे मुलाची विधवा
२० ते २२, वरील वारस नंबर १४ ते १६ यांच्या विधवा क्रमवार
२३ भावाचे मुलाचा मुलगा
२४ भावाचे मु० मु० मुलगा
२५ भावाचे मु० मु० मु० मुलगा
२६ भावाचे मु० मु० मु० मु० मुलगा
२७ सावत्र आई; २८ भावजय.
२९ ते ३३, वरील वारस नंबर १० व २३ ते २६ च्या विधवा क्रमवार
३४ आजा; ३५ चुलता;
३६ चुलत भाऊ
३७ चुलत भावाचा मुलगा
३८ चुलत भा० मु० मुलगा
३९ चुलत भा० मु० मु० मुलगा
४० चुलत भा० मु० मु० मु० मुलगा
४१ बापाची सावत्र आई
४२ ते ४७, वरील वारस नंबर ३५ ते ४० च्या विधवा क्रमावर

४८ पणजी;
४९ पणजा;
५० बापाचा चुलता
५१ बापाचे चुलत्याचा मुलगा
५२ बापाचे चु० मुलाचा मुलगा
५३ बापाचे चु० मु० मु० मुलगा
५४ बापाचे चु० मु० मु० मु० मुलगा
५५ बापाचे चु० मु० मु० मु० मु० मुलगा
५६ सावत्र पणजी
५७ ते ६२, वरील वारस नंबर ५० ते ५५ यांच्या विधवा क्रमवार
६३ ते ७०, चवथ्या पिढीची आई व चवथ्या पिढीचा बाप व त्याचे ६ मर्द वंशज एका मागून एक
७१ ते ७७, वरील ६४ ते ७० च्या वारसांच्या विधवा एकामागून एक
७८ ते ८५, पांचव्या पिढीची आई व पांचव्या पिढीचा बाप व त्याचे ६ मर्द वंशज एकामागून एक
८६ ते ९२ वरील ७९ ते ८५ च्या विधवा एका मागून एक
९३ ते १०० सहाव्या पिढीची आई व बाप व त्याचे ६ मर्द वंशज एकामागून एक
१०१ ते १०७, वरील ९४ ते १०० च्या विधवा

(याप्रमाणें अनुक्रमानें सगोत्र सपिंडामध्यें वारसा जातो. एकाच क्रमांकाचे बरेच वारस असतां मिळकत त्या सर्वांस सारख्या प्रमाणानें विभागून मिळते).

हे सगोत्र वारस संपून कोणीहां न सांपडल्यास मग भिन्न गोत्र सपिंडाकडे ह्मणजे बंधूकडे वारसा जातो. बंधू सवर्ण, मृतापासून पांचव्या पिढीपर्यंतचाच असावा लागतो. बंधू तीन प्रकारचे असतात. आत्मबंधु, पितृबंधु व नंतर मातृबंधु व ते क्रमानें एक प्रकारचे नसतां दुसऱ्या प्रकारचे याप्रमाणें वारस होतात. हे बंधु कोण हें वरील संस्कृत श्लोक ३ ते ५ यावरून कल्पना येईलच. सहाव्या श्लोकांत सांगितलेल्या लोकांमध्यें असलेलें व्यंग उपजतेंच असेल तर त्याचेकडे वारसा जात नाहीं. ते फक्त अन्नवस्त्राचे मालक असतात. अशा इसमाच्या संततीकडे वारसा त्याचे हिशाप्रमाणें जातो. त्यांस बापाचे व्यंगाचा बाध येत नाहीं. सगोत्र सपिंडाच्या विधवा मरेपर्यंतच्या संकोचित हक्कदार असतात व त्यांचे मरणानंतर त्यांचे नवऱ्याचे वारसांकडे इस्टेट जाते.

मुली, बहिणी वगैरे भिन्न गोत्री स्त्रिया पूर्ण मालक असतात. त्यांस या वारसानें प्राप्त झालेली इस्टेट त्यांचें स्त्रीधन असून, स्त्रीधन वारस निराळे आहेत.

---

## परिशिष्ट ३.

## मुसलमान धर्मशास्त्राप्रमाणें वारसानुक्रम.

मुसलमान धर्मशास्त्राप्रमाणें जो तो आपल्या इस्टेटीचा स्वतंत्र मालक असतो. मुसलमानी शास्त्राप्रमाणें कोणतीही इस्टेट वडिलोपार्जित नसते. मयत झाल्याशिवाय त्याचे इस्टेटीकडे कोणाचाही वारसा पोंचत नाहीं. वारस तीन प्रकारचे असतात. (१) ठराविक हिस्सेदार, (२) शेषाधिकारी, (३) दूरचे नातेवाईक.

इसम मयत होतांच प्रथम ठराविक हिस्सेदारांचा हिस्सा बाजूला काढून नंतर अवशेष राहील तो शेषाधिकाऱ्यांकडे जातो. शेषाधिकारी नसल्यास नंतर दूरचे नातेवाईक वारस होतात.

**ठराविक हिस्सेदार–**

(१) मूल अगर मुलाची मर्द संतती कितीहि पिढ्यांनीं खालीं असेल तेव्हां– बाप = एक षष्ठांश; बाप नसतांना, आजा = एक षष्ठांश; नवरा = एक चतुर्थांश; बायको = एक अष्टमांश.

(२) मूल अगर मुलाची मर्द संतती कि० पि० नसेल तेव्हां–नवरा=एक द्वितियांश; बायको = एक चतुर्थांश.

(३) पुत्र असेल तेव्हां – मुलगी = एकद्वितियांश; मुली = दोन तृतियांश.

(४) पुत्र, मुली, अगर समान पिढीचे मुलाचे मुलगे नसतील तर–मुलाची मुलगी = एक द्वितियांश, मुली = दोन तृतियांश.

(५) मूल नाहीं, पुत्राची संतती नाहीं, बाप नाहीं व आजा नाहीं तेव्हां—
सहोदर ( uterine ) भाऊ अथवा बहीण = एक षष्ठांश; जास्त असतील तर = एक तृतियांश
सख्खा भाऊ नसेल तर सख्खी बहिण = एक षष्ठांश; बहिणी = एक तृतियांश.
सख्खा भाऊ अगर बहीण नसेल तर समानपितृक (consanguine, बहीण = एक द्वितियांश; बहिणी = दोन तृतियांश

**शेषाधिकारी–**

(१) वंशज–मुलगे व मुली ( मुलीला नेहमीं मुलाचे हिशाचा निमे भाग मिळतो ); नातू व नाती इ० क्रमानें

(२) बाप, आजा इ० क्रमानें.

(३) बापाचे वंशज–सख्खे भाऊ व बहीण ( बहिणीला भावाच्या निमे हिस्सा ); सख्खी बहीण; सावत्र भाऊ व बहीण; सावत्र बहीण; सख्या भावाचा मुलगा; सावत्र भावाचा मुलगा; सख्या भावाचे मुलाचा मुलगा, सावत्र भावाचे मुलाचा मुलगा ( यानंतर याप्रमाणें क्रमानें )

(४) आजाचे ( कितीही पिढ्याचा ) वंशज–सख्खा चुलता; सावत्र चुलता, सख्खा चुलत भाऊ, सावत्र चुलत भाऊ, याप्रमाणें पिढीनुसार.

**दूरचे नातेवाईक—**

(१) मयताचे वंशज:– मुलीचीं मुलें; मुलाचे मुलीचीं मुलें इ० क्रमानें.

(२) मयताचे पूर्वज:– आईचा बाप; आईची आई इ० क्रमानें.

(३) पूर्वजांचे वंशज:–सख्या भावाच्या मुली व त्यांचे वंशज; सावत्र भावाच्या मुली व त्यांचे वंशज; इ० क्रमानें.

# विषयसूचि.


| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| अखेरचा पुरावा (निर्णायकत्व)... | १७१ |
| अण्णाजी दत्तो ... | ... प्र.१ |
| अधिकारातिक्रम ... | ... १८० |
| " अ " पत्रक ... | ... १४४ |
| अपील— | |
| कलेक्टरकडे ... | ... २६९ |
| थळीचे नोंदीवर... | ... १५४ |
| मदत दाव्यावर... | ... २३२ |
| रि.का. निकालाविरुद्ध. | १७५,२४२ |
| वर्गपात्रता नोंदीवर | १७५,१७१ |
| वहिवाटदार नेमणूकीवर ... | २१३ |
| अभय–सेटलमेंटबाबद | ... २७५ |
| अभय मोडणें ... | ... २७६ |
| अभावणी ... | ... १२४ |
| तारखा...१०९; नमुना... | ३२३ |
| नियम ... | ३०९ ते ३१२ |
| अंमलबजावणी— | |
| खोती से.आ.ची व दुरुस्त्यांची | ...७ |
| अहमदनगरचें राज्य ... | प्र.२ |
| अयोग्यता ... | ... १८६ |
| अर्ज हक्कदानाबद्दल | ... ३१७ |
| अर्ध मांडणी ... | ... ४२ |
| अर्धेली कुळें ... | प्र.८,५४ |
| असमर्थता ... | ... १८६ |
| असिस्टंट कलेक्टर | ... २४२ |
| अज्ञान खातेदार ... | १०३,३१७ |
| आकार फोडपत्रक | ... १४३ |
| „ नमुना | ... ३४० |
| आक्ट २० मुं. सन १८३९ ... | २७२ |
| आक्ट ११ सन १८४२ ... | प्र.१४ |
| आक्ट १९ मुं. सन १८४४ ... | २७२ |
| आक्ट २ व ३ सन १८६३ ... | २७४ |
| आक्ट १, मुं. १८६५. | २,५५,२३७ |
| अंमलाची सुरुवात ... | २ |
| कलम २५...१३; क. २७... | १३१ |
| कलम २८...२०; क.३७ प्र.१७,१० | |
| कलम ३८ ... | प्र.१८,१०,२३७ |
| काय काय गोष्टी केल्या ... | १० |
| कोठें लागू...८; निकाल... | १८७ |
| आक्ट ३ मुं. सन १८६९ ... | २७२ |
| आक्ट २३ सन १८७१ (पेन्शन) | ५१ |
| आक्ट १ सन १८७२ (पुरावा)... | ९४ |
| आक्ट ९ सन १८७२ हिं. कॉन्ट्रक्ट | १६२ |
| आक्ट ३ मुं. सन १८७४... | ४९,२६१ |
| आक्ट ७ हिं. सन १८७८ (फॉरेस्ट) | २९२ |
| आक्ट मुंबईचा १८७९ चा ५. | ७ |
| आक्ट १ मुं. सन १८८० | प्र.२३,२३८ |
| कसा पास झाला ... | ३ |
| नामाभिदान ... ... | ६ |
| आक्ट १ हिं. सन १८९४ (लँ.अँ) | ५९५ |
| आक्ट १० हिं. १८९७ (ज.क्लॉ.) | ४।६ |
| आक्ट २ हिं. सन १८९९ (स्टांप) | २३२ |
| आक्ट १ मुं. १९०४ (ज. क्लॉ.) | ४,६ |
| आक्ट ३ सन १९०४. प्र.२३,७,२३८ | |
| आक्ट ५ सन १९०८ (दि.का.पद्दा.) | |
| आक्ट ९ सन १९०८ (मु.आ.पद्दा) | |
| आक्ट ८ सन १९१२ ... | प्र २४,७ |
| आक्ट ४ सन १९१३ ... | प्र.२४,७ |
| आंबे ... ... | प्र.२,३ |
| आदिलशाही महसूल पद्धति... | प्र.२ |

आंध्रभृत्य ... ... प्र.१
आंब्याचें झाड ... ... ३०४
"आय्" पत्रक ... ... १४५
इंग्रजी अंमल ... ... प्र.७
इजाफती खोती ... ... ४०
इंडियन पिनल कोड. १६३,२७२
इतिहास—
कबुलायतींचा ... १९७
कोंकणचा...प्र.१; साष्टीचा...प्र.३०
इनाम गांव व थलीचा ठराव .. २६३
इनाम गांव व झाडांची मालकी. ३०३
इनामदार—
थल...७१; मदत दावा...२२३
व खोत ... ५०,१९५
व डनलॉपचा जाहिरनामा... ३०३
इमारती झाडें ...२९८,३०३
इमारती झाडें स्थावर मिळकत. ३०६
इलिस रिपोर्ट ... ...प्र.११
"ई" पत्रक ... ... १४४
ईश्वरी कोप ... ... २६२
उद्देश—
क.२...९;क. ३...१७; क. ४...४५; क.५...५३; क. ... ६३ क. ७... ६७; क. ८...७५; क. ९...८४; क. १०...१००;क, ११...१०५; क. १२...११८; क. १३...११९ क. १४...१२०; क. १५...१२३; क. १६...१२९; क. १७...१४८; क. १८...१६१; क. १९...१६७; क. २०...१७०; क. २१...१७५; क. २२...१८९; क. २३...१९२; क. २४...१९४; क. २५...१९६ क. २६...२०३; क. २७...२०७ क. २८...२१३; क. २९...२१४ क. ३१...२१६; क. ३१ अ.. २३२; क. ३२...२३४; क. ३३...२३७; क. ३३ का. १...२४४; क. ३३ का. २...२४९; क. ३३ का. ३ ...२५४; क. ३३ क. ४ ...२५९; क. ३३ का. ५ ... २६५; क. ३४...२७०; क. ३५...२७१; क. ३६...२७३; क. ३७...२७५; क. ३८...२७६; क. ३९...२७८; क. ४०...२९०; क. ४१...२९१; क. ४२...३०७.
उपभोग सततचा ... ५८
उपरी कुळें (एकसाली कूळ पहा) ५४
व खातेदार तुलना ... ६८
जुनी माहिती ... ... ७६
एकसाली कूळ ... ...४३,५४
अप्रत्यक्ष परवानगीचें ... ७९
अशीं कुळें कोणतीं ... ७७
काढणें ... ८१,२२४
कायद्याचें अनुमान ... ७७
खंड...७९; बाधेकरी... ५४
मदत दावा ... २२२
व लोकल फंड... ... १७४
वर्ग करण्याचा अधिकार ... ७८
विरुद्ध कबजा ...८२; समती. ८९
"एन्" पत्रक ... ... १४५
"एम्" पत्रक ... ... १४५
"एल्" पत्रक ... ... १४५
एस्टॉपेल ... ९२,९७
ऐनजिनसी देणें व मदत दावा २२३
औतबंदी ... ... प्र.३
"क" पत्रक ... ... १४४
कचाधारेकरी—
अर्थ ... ११,२६

थळ ... २४७,३०८
कथा सूत्र ... १४३
कंटूर नकाशा ... १४१
कनिष्ठ धारणकरणार ... ६२
कपटाची नोंद ... १६१
कबजा—
कायदेशीर ... ९९
महसुलाची जबाबदारी ... २१८
सततचा ... ९८
कबुलायत (कुळाची) ... २५०
१९०४ ची दुरुस्ती ... २५२
ठरीव थल ... २५०
व वहिवाटदार खोत ... २५१
कबुलायत (खोताची)—
इतिहास ... प्र.१६,१९७
उद्देश ...१२; नमुना ... १९८
व खोताची मालकी, प्र.१६,१९९
साष्टी खोत व... ...प्र.३२
कबुलायतींतील शर्ती ... २१०
कबुलायतीचा लेख... ... १४१
कबुलीचें उत्पन्न ... ... २४२
कमाल थल ... ... २६२
कमाविशी तक्शीम ... ... ४२
कमजास्ती पत्रक ... ... १४५
करार—
थलीबद्दल...७३; ठरीव थल २५०
कुद्र ... ... प्र.१०
कलम २८ (१८६५ चा.१) ... १०
कलम ३७(१८६५ चा आक्ट१)—
कलम ...१०; दोष...प्र.१७
परिणाम...११;१३; वैगुण्यें....१४
कलम ३८ (१८६५ चा आक्ट १)—
कलम...११; दोष...प्र.१८
परिणाम ... ११,१२,१३
वैगुण्यें ... ... १४
कलम ४० अ. ८ ... २४२
कलम ४० फ. ६ ... २७१
कलेक्टरचा कागदांवर ताबा... १६१
कलेक्टरची पसंती—मुखत्यार... २३३
कवळाच्या जमिनी ... २६९
कवळ घेण्याचा हक्क ... ३०१
कसबा ... ... १७
कायद्याचा अंमल करण्याची रीत. ५
कायद्याचें अनुमान —
एकसाली कूळ... ... ७७
झाडांची मालकी ... २९७
थलीबद्दल ... ... २४५
कायद्याचा अर्थ करण्याची रीत... ३
कायदेशीर अधिकारी व सनदा... २९७
कायम कूळ ... ...३७,५६
वर्गाधिकार ... ... ९५
सतत वहिवाट... ... ७८
झाडांवरील हक्क ... ३०४
कार्साई ... ... २७१
किमान थल ... ... २६२
कुलाबा खोती ... ... प्र.२५
खोती से. आक्ट तुलना ... प्र.२५
गांवची जप्ती ... ... प्र.२६
चालू कायदा ... ... ८
बेकायदेशीर पट्या बाबी वगैरे २७२
महत्वाचे फरक ... प्र.२६
वर्ग व संमती ... ... ९३
वर्गाचा परिणाम ... ११३
कुलाबा खोतांचे प्रयत्न ... प्र.२८
कुलाबा जिल्हा कसा बनला ... प्र.६
कुलाबा जि० से० सनवारी ... १४६
कूळ—
अप्रत्यक्ष परवानगीचे ... ७१

अर्धेली, उपरी, तिर्धेली, बाधेकरी ५४
लँ. रे. कोडप्रमाणें ... ३३
व्याख्या (१८६५ चा आ. १) १३१
कुळ हक्क ... ... ७६
कुठारगी गांव ... ... १८
"खो" पत्रक ... १४५,३३६
नमुना ... ... ३३६
कोंकण—व्युत्पत्ती ... ... प्र.१
प्रांत विभाग ... ... प्र.५
कोर्ट फी—
खोती गांवांतील दावा ... २३५
मदत दावा ... ... २२१
कोर्टाचा हुकूम व थल नोंद ... २६०
कोल्स यांचा रिपोर्ट ... प्र.११
कौल ... ... ४१
क्यांडी इ. टी ... ...२२।२३
खंड (थल पहा) ... ७९
खंड चिठी ... ... ७४
खंड वाढ ... ... ..७४,८०
नोटीस... ... ... ८०
बहिवाटदाराचा अधिकार... २२४
खतावणी ... १२५,३१५
नमुना ... ... ३२४
खरे, दाजी आबाजी ... प्र.२३
खरेदी खत ... ... ८६
खरेदी आणि राजिनामा ... १०८
खातेदार—
खंडचिठ्ठी ... ... ७४
जमीन...५९; झाडांचा वर्ग... ३०५
झाडांवरील हक्क ३०४; थल... ६९
नोंद ... ६१,१३२
मोबदल्याची किंमत, अर्ज... २६५
लोकलफंड ... ... २७४
व कलम ३३ च्या दुरुस्त्या... २४०
वर्गाधिकार ... ...५५,२७९
विरुद्ध कबजा... ...६१,७२
विशिष्ट हक्क ... ... ५६
सर्व खातेदार, तुलना ... ६०
सार्धी कुळें, तुलना ... ६८
हक्क देणें, खोतानें ... ११५
हिस्सेदारांतील आपसांतील वर्ग ११३
खात्री ... ... २५२
खालसा गांव ... ... १८
खालसा झाल्याचा दाखला १०४,३१७
खालसा होणें, परिणाम १०३,२८७
खासगी जमीन ... १८,३९,४०,२७
खोत फायदा ... ... २८८
खोताची मालकी ... १०२
वर्ग केल्यास ... ४३,३१४
खासगीपणा इस्टेटीचा ...२१७,२२२
खेळता धारेकरी ... ३०३,३१४,३१५
खोत—
अर्थ, सनदांवरून ... २०
आणि इनामदार ...५०,१९५
कोषार्थ ... ...प्र.१,१९
जबाबदाऱ्या ..३२,४५,१२५,२०२
जमा देणें...४७; थल व... ७०
धारण करणें ... ... ९
रेग्यु. १८०८ मधील ... २०
व निरंतरचें कुळ, संबंध ... ३७
व प्राप्त झालेला हक्क ... २९६
व जंगलाची चाकरी १०७,३०८
व सरकारी अधिकारी ...२०,२१
व्याख्या...९,१५; व्यक्ती... २९
व्युत्पत्ती...प्र.१; शेतकरी... ३०
सरकार, व ... ... २००
सरकारी कामगार नव्हे ... २८९
सेमती ... ८८; स्वतंत्र ... ३१५

हायकोर्ट ठरावाप्रमाणें ... २१
ात फायदा ... ... २१९,२२५
खासगी जमिन, जप्ती ... २८८
निरनिराळ्या पद्धती ... २२५
पगार नव्हे ... २८९
वांटणी वर्ख ... २२५
मॉलाकॉम दावा ... २२६
खोत हिसेदार—
अविभक्त अगरा विभक्त ... १५६
गांवची जप्ती व हक्क ... २१०
जमाव...४८,२०३; थल...७०
थलीची नोंद...१५७; नोंद... १३४
व धारा जमिनी ... २३१
वहिवाटदाराचा विरुद्ध कबजा—२२८
विभक्त ... २३३
'खोत हिसेदार खातदार कूळ' ६०,१६५
खोत निसबत ...प्र.२७,३८,४०
खोतकी—
बांटप...२३४; व्याख्या...१५
हक्कांचा समुच्चय ... ३१
खोताचे हक्क—
कबुलायतींतील शर्ती ... २००
कबळ घेण्याचा ... ३०१
खातेदारांचे हक्क घेणें ... ११६
खातेदारांस उच्च हक्क देणें... ११६
खासगी जमिनी ... ३०२
गतकुळी जमिनी ... १०५
जमिनी परत येणें ... १२
जगल व ...२९३; मालकी...२२,३९
व कबुलायत ... १९७
सनदा व ... २९६
सेटलमेंट पुर्वीची स्थिती... प्र.६,२९
खोतांचे प्रकार—
अधिकरी, वतनदार, सरकारी... २२
खोती कमिशन ... ... प्र.२२
खोती—खटपटी—वेतन ... २३९
खोती गांव ... ... १८
किती आहेत ... ... ८
खिचडी ... ... १८
खोताचे हक्कापुरता ... १९
निव्वळ...१८; प्रकार... १८
साष्टी ... ... प्र.३१
खोती जमीन—
थल, कायद्याचें अनुमान ... २४५
वसूल ... ... २१८
व्याख्या ... ... १६,३८
खोती तक्षिम ... ... ४२
खालसा होण्याचा परिणाम... २८७
खोती सत्ताप्रकार—...
कसा अस्तित्वांत आला ... प्र.६
केव्हां अस्तित्वांत आला ...प्र.१,प्र.६
लागू कायदे ... ... ८
वतन आक्ट—संबंध ४९,१२५
विस्तार ... ... ८
खोती सेटल्मेंट आक्ट (१८८० चा १)
उद्देश ... ... ... ... २,१५
पूर्वीची परिस्थिती २,५४,प्र.२३
बिलें ... ... प्र.२३
व कबुलायत ... ... २०१
विस्तार ... ... ७,८
खोती सेटलमेंटचे कागद ... १४४
खोतीची मूळपीठिका ... प्र.६
गटबूक ... ... १४३
गतकालसापेक्षता ... ... ४,५
क. ९...८७; क. १० १०२
क. ३३ ... ... २४१
कायदे व दुरुस्त्या ... ४
वर्ग पात्रतेची नोंद ... १३६

गतकुळ ... १७३,२७९
"ग" पत्रक ... १४४ ३४१
गव्हर्नर–इन्–कौन्सिल ... २७०
ग्लास रिपोर्ट ... ... प्र.११
गहाणखत ..... ८६,८७१४०
गहाणदार ... ... २९
गांव—
अर्थ...१७, कुळारगी... १८
खालसा...१८, खोती खिचडी १८
दुमाला गांव ... ... ३०३
निव्वळ खोती... ... १८
व्याप्ति ... ...१५,१७
गांवची साधारण चाल ... २५४
गांव नमुना नंबर ७ ... ३३८
गुन्हायुक्त नोंद ... ... १६३
गैर अंमल ... ... १६३
गैर लागू नोंद ... ... २६०
गोषवारा पत्रक ... ... ३१३
चॅपलीन रिपोर्ट ... ... प्र.९
चाकरी जंगलाची ... ३०७
चालू दिवाणीकामांचा बचाव ... १७३
चक ... ... ... १६३
चौकशी—
खोती कमिशनची ... २२
नोंद दुरुस्तीची ... १६७
मॉटफर्ड ... ... प्र.२४
लॅं.ॲ. आक्ट व फॉ.आक्ट ... २९५
हॅव्हलॉक ... ... २०
जप्ती... ... ४७,२८५
कुलाबा खोती... ... प्र.२८
खर्च ... १२६,२८९
खासगी जमिनी ... २८८
गांवची ...२१०,२८५,२९६
परिणाम...२८७; फरक... २८६
व मुदत ... ... २८८
हिशोब ... ... १२६
जमा—
इनामदाराची ... ५०,१९५
कुलाबा खोतानीं द्यावयाची ... १९५
केव्हां द्यावी ... ४९,१९५,३१८
ठरविणेंची रीत... ३२,४६,१९४
देण्याची जबाबदारी. ४८,२०३,७८
पहिला बोजा ... ... ३३,४७
मुदत .. ... ... ५०
व्याख्या ... ....१५,४६
वाद केव्हां करावी ... ५१
सरकारचा अधिकार ... ३३
जमीन—
कौली ...४१; खोती.. १६
खोती खासगी... प्र.२७,३८
खोती निसबत... प्र.२७,३८
गतकुळी ... १०३,१०५
गांवीक...प्र.१०; धारा... १६
प्रतबंदा बदलत नाहीं .. ५२
जमिनी काढणें—
शक्याशक्य परिस्थिती ... ८१
जमीन महसूल पद्धती
आदिलशाही...प्र.२; आंग्रे.. प्र.३
पेशवे...प्र.४; ब्राह्मणी राज्य.. प्र.२
राजाराम. प्र.३; शिवाजीचेवेळीं प्र.३
संभाजीचेवेळीं प्र.३; सिद्दी... प्र.३
जंगल खर्डी ... ... १४३
जंगल राखणें ... २९२,२९३
जपणें...२९४; मोबदला... ३०७
लोकहित ... ... २९४
जाहिरनामा—
१८०१ चा ... ... प्र.११
१८५१ चा ... ... २९९

डनलॉपचा ... ... २९८
डाणी सरकारचा ... प्र.१४
जुनें कलम व नव्यांशीं तुलना—
क. ५ ...५४; क. ९...८३,८५
क. १० ...१००,१०१,१११
क.१६..१२९;क. १७..१४८,१४९
क. १८...१६०,क.१९... १६७
क. २०...१७०, क.२१... १७४
क. २२ .... १८९,१९०
क. २६ ... २०२,२०४
क. २७...२०७, क.२८... २१२
क. ३३ ...२३६,२३७,२४०
क. ३९ ... २७७,२८०
जुलमी कर ... २७१,प्र.३,प्र.४
झाडें दुसऱ्याचे जमिनीवर जाणारीं. ३०६
झाडांचा वर्ग ... ... ३०५
झाडांचा विरुद्ध–कबजा ... ३०६
झाडांची मालकी ... ... २९७
झाडें, ओसाड जमिनी वरील ... ३०१
झाडें, खाजगी जमिनींतील ... ३०२
झाडें, राखींव ... ... २९७
झाडें व कायमकूळ ... ३०४
झाडें व खातेदार ... ३०४
टरकांड ... प्र.१३,२३
ट्रस्टी नाहीं–सरकार ... २८८
ट्रान्स्फर ऑफ प्रापर्टी आक्ट ... २९
क. ५१ ... ... १०८
ट्रान्स्फर पत्रक ... ... १४१
ट्रिपण बुक ... ... १४१
नमुना ... ३३२,३४०
पोट हिस्सा मोजणीचें ... १४६
ठकबाजी .... .... १६३
ठरांव—
भलीचा .... .... ७३
रिकार्डिंग कामगारांचा .... २४२
हद्दींचा .... .... १३७
ठरींव ऐवज .... .... २४५
डनलॉपचा जाहीरनामा ... २९८
दुमाला गांव व ... ३०३
देणगी किंवा बक्षिस ... ३००
मालकी ... ... ३०१
व हक्क ... ... ३००
डनलॉप रिपोर्ट ... ... प्र.९
"ड" पत्रक ... १४४,३४१
डॉवेल ... ... ५५
डॉवेलचा रिपोर्ट ... ... प्र.११
डिस्ट्रीक्ट डेप्युटी कलेक्टर ... २४२
डुवल पहाणी ... प्र.१०,५५,१४६
तक्रारी रजिस्टर... ... १४३
तपासणी अर्ज ... ... १७५
वहिवाटदार खोत नेमणूक.... २१३
तपासणी सेटलमेंट... ५१,१८७,२८०
तावा–सेटलमेंटचें कागद .... १६१
तारखा–थल देण्याच्या ७०,३१८
तारणहक्क (लिअन) .... ११५
तिर्थेलि .... ... ५४
तुलना—
क. ४ व लॅ. रे. क. ६८.... २७०
क.४व लॅ. रे.क. १६८.... २८५
क. ५ व क. ६ .... ६३
क. ५ व लँ. रे. को. क. ८३ ५६
क. ६ व क. ९ .... ६६
क. ९ व लँ. रे. को. क. ७३. २७९
क. १० व लँ.रे. १०२,२७९,२८०
क. १६ व लँ. रे. १०८.... १३०
क.१८व लँ.रे. ११७ अ. २८०
क. ३३ नवें व जुनें .... २३७
खातेदार व साधीं कुळें .... ६८

खातेदार व सर्व खातेदार .... ६०
खालसा क. १० व लँ. रे. १५३;१०४
खोत व पाटील.... २९
खो. से. आक्ट व कुलाबा खोती.प्र.२५
चौकशी लँ. अ. आक्ट व फॉ. आ. २९५
नोंद व निकाल .... १७८
राजिनामा आणि खरेदी .... १०८
लँ. रे. क. १४४ व क. १५९, २८५
तेरीज वरकस नजर माजना ... ३३०,४
तेरीज शेतगणा .... ३३७,प्र.४
थल—
अर्थ....६९; एकसाली कुळ.... ७९
क. ४० फ. ६ .... २७१
कच्चे धारेकरी .... २४०
करार. .... ७३,२५०
कोणास द्यावी .... ७०
कोर्टाचा अधिकार.... २४३,२४७
ठरविणें .... २४४
देण्यांत आलेली. .... २५५
देण्याची जागा. .... २३५
देण्याची जबाबदारी .... ७२
देण्याच्या तारखा.. ७०,२७०,३१८
धारेकऱ्यांची .... २३९
निर्णायक नोंद.... ६९,७३,२४१
पिकाचा हिस्सा.... २५४
फळ झाडें .... २४६
व क. ४० अ. ८.... २४२
व रेसज्युडीकेटा .... ७३
व शेंकडावळ .... २६१
थलीचा ठराव—
इनाम गांव .... २६३
कसा करावा .... २४५
ठरींव ऐवज .... २४६
ठरींव हिस्सा .... २४६
पुरावा. .... २५४
मोबदला—किंमत .... २६५,२६६
व कबुलायतींतलि करार.... २५०
सरासरी .... २५५
थलीबद्दल नोंद नसेलतर .... २५९
थलीची नोंद .... १५,१५२
व अपील.... १५४
थलीची नोंद व १९०४ दुरुस्ती .... १५२
थलीचे नोंदींत फेरफार करणें.... १६५
कोर्टाचा हुकूम.... २६०
नोंदच नाहीं .... २५९
परिस्थिती .... २५९
लागवडीचे पद्धतांत फेरबदल. .... २६०
थलीची मर्यादा .... २६२
थलीची माफी .... २६३
थिओडोलाईट फील्ड बुक .... ३४१
दंड....१२६,२७२; दरबारी.... १४३
दसपटकरी .... ३२८
दस्तवाद व राजिनामा .... २८०
दादोजी कोंडदेव .... प्र.३
दावा—
खोत फायद्याचा .... २२६
चालू असतां कायदा पास झाल्यास .... ५
निकाला विरुद्ध.... १७६
नुकसानीचा .... ३५१
वहिवाटदार नेमणुकीकरितां.... ३५४
वांटपाचा .... २३५
सरकार विरुद्ध .... १९३
हक्क स्थापनचा. .... १३४,१७६
दाव्याची आकारणी .... २२५
दाव्यास कारण—
खोत फायद्याचे .... २२७
जमा बाकी....५१, थल.... ७१
निकालाविरुद्ध .... १८२

दिवाणी कायदा—
क. ११...७३,९५; क.५४ २३४
क. ३९ ते ८२ ... १९१
क. २६६ व क. ६० जुनें... २८९
ऑ. २७ ... ... १९१
दिवाणी कोर्ट व मदत दावा ... २२५
दिवाणीकोर्टाचा अधिकार व थल. २४३
व फळ झाडांची थल ... २४७
दीडपटकरी ... ... ३०८
दुप्पटकरी ... ... ३०८
दुमाला प्र.३२,२८१,२८५,३०३
दुरुस्त्या ('जुनें कलम' पहा.)
दुसरे कागदपत्र ... १३३,१४९
देणगीचे कागदपत्र ... २९६
देण्यांत आलेली थल ... २५५
१३६,२२२,२२६
देहझाडा ... ... प्र.५
दैवी करणी ... ... २८२
धारा—
अर्थ ....३५, जमीन.... १६
व खोतहिस्सेदार... ... २३१
धारा जमीन ठरविण्याचे नियम. ३१३
धारेकरी—
अर्थ ...१६, खोत आणि... ३५
डनलापचा जाहिरनामा .... ३०३
मालक आहे ... .... ३५
लोकल फंड देणें .... २३९
सरकार दस्त देणें .... २३९
धारेपत्रक .... १४३,३३७
नकला मिळणें .... १४३,१४५
नमुने ... .... ३२१ ते ३४१
नाना फडणीस .... .... प्र.४
निकाल .... .... १७६
अधिकारावाहेरील .... १८०
बेकायदेशीर .... .... १८५
१८६५ चा आक्ट १ खालील. १८७
निकाल व नोंद .... १५५,१७८
निकाल व हुकूम. .. .... १७९
निकाल व हुकूमनामा .... १८८
'निरंतरचें कूळ' (खातेदार पहा)
अर्थ .... ... १६,३६
खातेदार व कायम कूळ भेद. ३७
व खोत संबंध .... ३७
निरंतरची कूळ वहिवाट(खातेदार पहा)५२
आवश्यक गोष्टी .... ५३
पूर्वेतिहास .... ५५
सततची वहिवाट .... ५८
निरुत्तरपणा अथवा निर्णायकत्व—
खोतहिस्सेदारांनीं द्यावयाची थल १५७
थलीचीनोंद,१५१,१५२,१७१,२४१
थलीची नोंद नाहीं अशा गोष्टी १७१
देणगीचे नोंदीचा ... ११८
नोंद वि. निकाल१५५; नोंदी १३५
"ब" पत्रकांतील नोंद ... १५६
मोटखतांतील नोंदी ... १५०
वर्गाचे बाबतींतील नोंद. १३५,१७२
वहिवाटदार नेमणुकीचा दाखला २१५
निर्णायक ठराव–हद्दीचा ... १३७
निर्णायक पुरावा ... ... १७१
नुकसानी- खोतस्सेदारांची ... २११
नेमणुकीचा दाखला २१३,२१५
नोकरी व थल नोंद ... २६०
नोटीस—
कूळ काढणेंची ८१; खंड वाट.. ८०
नोंद दुरुस्तीची... ... १६८
सेटलमेंटची ... .. २७६
नोंदी—
अयोग्य नोंदी १६२; क.१६ प्रो १३०

क. १७ प्रमाणें १४८; खातेदार १३२
हक दिल्याची ११८; गुन्हायुक्त १६३
निरुत्तर नोंदी ... ... १३५
परिस्थित्यंतर व... ... १६४
हद्दीचे वादाचे वेळीं ... ३१५
१८६५ चा आ. १ खालील १३२
नोंद व मालकी ... ... १३८
न्याय्यविचार ( Judicial discretion )... २५२,३५६
पक्का नकाशा ... ... १४२
पट (मोबदला-किंमत पहा) ... २६६
पड जमिनी ... ... २७
मुद्दाम टाकलेली १२१; व जंगल २९५
शेती व्यतिरिक्त उपयोग ... २०१
पडण ... ... ... १२२
परशुरामपंतांची पहाणी ... प्र.४
परिणाम—
कलम ३७ व ३८ चा ...११,१२
खोती खालसा होणेंचा ... २८७
लँ. रे. क. १४४ व १५९... २८७
१८६५ चे सेटलमेंटचा ... प्र.१९
१९०४ चे दुरुस्तीचा ... १५२
पहाणी—मुद्दाम पड टाकलेली जमीन १२१
पहाणी सूड ... ... १४२
पहाणखर्डा प्र.४,३१३,३२७,३२८
पक्षकार ... २४८,२५१
पावती चोपड्या ...१२५,३१५,३२५
पाळीची यादी ('फ' पत्रक) १४४,२०७
पाळीची यादी व नुकसानी ... २११
पाळीची यादी नसेल तेव्हां ... २०८
पीक पहाणी ... ... ३०९
पिकाचा हिस्सा ... ... २५४
पुराव्याचा आक्ट—
क. ३५ ... १३९,१५०
क. १०२,१०३,१०४ ... ९४
क. ११५ ... ... ९७
व सेटलमेंटचे कागद ... १३८
पुराव्याची जबाबदारी—
थल... ... ७१,२७५
निकालाविरुद्ध ... १८१,१८३
वर्ग करण्याची पात्रता ... ९४
वांटपाचे दाव्यांत ... २३५
पुराव्यांतील ग्राह्याग्राह्यता—
बोटखत ... ... १५०
सेटलमेंटचे कागद ... १३९
१८६५ च्या नोंदी ... १३२
पुराव्याचे दृष्टीनें महत्व—
क. १७ खालील नोंदा ... १५८
निकालांतील गोष्टी ... १८०
पेली यांचा रिपोर्ट ... प्र.८
पेशवे पहाणीचे कागद प्र.४,३२६
पोटविभाग, सर्वे नंबराचे ... २८०
पोटहिस्सा मोजणीचें टिपणबुक १४३
पोष्टाचा दोरा ... ... ८१
प्रतबुक ... १४२,३३३
फड ... ... प्र.५,३१६
"फ" पत्रक ... १४४,२०७
फणकी ... ... २७१
फळझाडें व थल... ... २४६
फॉरेस्ट आक्ट ... ... २९२
क.३४...२९३; क.३५।३८...२९४
क. ८० ... ... ३०८
फाळणी बुक ... १४३,३३८
फेरफाराचें रजिस्टर.. १४३,३३९
फ्रान्सिस ..... २३,प्र.१४
फ्यूडल पद्धति ... ... २८
"ब" पत्रक ... ३०,१४४,१८८,२०८, ३२१

बलात्काराची नोंद ... १६२
बलुतेदार .... .... २६१
बागायत तक्ता ....१४२,३३४,३३५
बाजारभाव .... .... २६८
बांधकरी (एकसालो कुळ पहा.) ५४
बिघा ... ... ... प्र.३
बेकायदा बर्गी .... .... ८६
कुळाच्यांतील, ११३; परिणाम, ११४
बेकायदेशीर निकाल .... १८५
बेकायदेशीर दस्त, कर, व मजुरी.. २७१, २७२
बेडन पॉवेल .... ... १७,४०
बोजा, सरकारचा ... ... ३१४
बोटखत ...१४५, ४१,३२२
करार आपसांतील व ... ७३
खोतानें बाळगणें ... ३१६
पुराव्यांतील ग्राह्यत्व ... १५०
पेशव्याचे वेळचे, नमुने प्र.४,३२९
महत्व १३३; वर्गाचा शेरा ६७,९५
भाषण, गव्हर्नर साहेबांचें, जंगल २९२
भाषा, कलमाची ... ... ३
मक्त्याबद्दल तेरीज ... १४४
मजुरी, बेकायदेशीर ... २७१
मंडलिक वि. ना ... प्र.८,प्र.१७
मदत दावा ... २२०
अर्जाची रीत ... २२१
इनाम गावांत ... २२३
काय देववावें ... २२३
कोणाविरुद्ध ... २२२
कोणी करावा २२३; खातेदार २२१
थल २२३; लोकलफंड ... २७४
मसुदा, खोती आकडाचा प्र.१२,प्र.२०
माफी ईस्तावा ... ४२
मालकी हक्क (खोतांचा हक्क पहा) ८४
व कबुलायत ... १९९
व डनलॉपचा जाहीरनामा ... ३०१
व नोंद ... ... १३८
व सेटलमेंटचे कागद ... १४०
मॉटफर्ड रिपोर्ट ... प्र.२४
मुखत्यार व कलेक्टरची पसंती २३३
मुखत्याराची जबाबदारी ... २३३
मुदत—
अभ्याची ... ... २७५
खोत फायद्याचा दावा, जप्ती २२८
तपासणी सेटलमेन्ट व ... १८७
निकालाविरुद्ध दावा ... १८१
नोंदींतील फेरबदल व ... १८६
बेकायदेशीर निकाल ... १८५
वर्गाधिकार नोंद व . ... १७३
मुदतीचा कायदा —
क. ९...१८६; क.१०... २८८
क. १८...२२९; क. १९.... १४०
आ. १४.१८२; आ. ११०.५१,७०
आ. १२० ... ...५२,१८२
आ. १४२ व १४४. ६१,९६,३०६
मुलकी साल ... ... ५८
मुलकीसाल व मोबदल्याची किं० २६६
मुसलमान वारसानुक्रम .... ३४३
मोबदला—किंमत—
कबळाच्या जमिनी .... २६९
कशी ठरवावी... २६५,२६७,२६८
कुळाचा अर्ज ... .. २६६
ठरविण्याची परिस्थिति ... २६७
लोकलफंड ... ... २७०
सरकारदस्त वाढ ... २७०
मोबदला, जंगल राखण्याबद्दल... ३०७
रत्नागिरी जिल्हा कसा बनला... प्र.६
राखीव झाडें ... ... २९७

राजिनामा—
आवश्यक गोष्टी १०६; खरेदी व १०८
ट्रा. प्रा. आक्ट क. ५३... १०८
परिणाम ११०; व दस्तवाढ.. २८०
व लँ. रे. को. २७९; व्याख्या. १०६
रिकार्डिंग कामगार—
अधिकार व कर्तव्यें ... १६७
कोणाला ह्मणावें ... ४३
खात्री...२५२; ठराव ...७३,२४२
व्याख्या ... ...१६,१६१
सुधारणा करणेंचा अधिकार.. १६२
रीड यांचा रिपोर्ट ... प्र.१०
रीव्हस् रिपोर्ट ... ... प्र.१४
रेकार्ड ऑफ राईट ... ... १४३
कुलाबा जिल्ह्यांतील ... प्र.२७
सरकारी सूचना ... प्र.२८
रेग्यु. १८०८चा १, प्र.७,प्र.३१,८,२०
रेग्युलेशन १८२७ चा १७ ...प्र.१०, २,१३,१९३,२१७
रेस्ज्युडिकेटा ... ... ७३
थलीचें मागणें ७३,२४३; वर्ग ९५
लँ. रे. कोड ... .. ४४
क. ३(१४) .... ... ३३
क. ३(१६) .... ... ३३
क. ३(२२) ... ... ५८
क. १० ... २१३,२१५
क. १८ ... ... ४३
क. १९ .... ... १६९
क. ४० .. ११७,२९७
क. ४१ ... ... २९७
क. ४५ ..... ... ४६
क. ४८ ... ... ४६
क. ५२ ... ... ३३
क. ५६ ... ३३,४७,११७
क. ६८ ... ... २७८
क. ६९ ... ... ११७
क. ७२ ... १०२,२७९
क. ७३ ६०,८४,१०२,२७९
क. ७४ ... ११०,२७९
क. ८० ... ... ४८
क. ८३ ... ३७,५६,७७
क. ८४ ... .... ८१
क. ८६ ... ४८,२२०,२२२
क. ८७ ... २२०,२२२:
क. १०० ... ... ४६
क. १०२ ... ४६,१९३
क. १०३ ... ... २८१
क. १०४ ... ... २८०
क. १०६ .... .... ५१
क. १०८ .... ४३,१३०,१४९;
क. ११२ ... ... २८०
क. ११४ .... ... २३४
क. ११७ (अ) (ब) .... २८०,२८१
क. ११८...२८२; क. ११९...२८२
क. १२१..१३७; क. १२३...२८५
क. १३५ (ब) ... .... १४३
क. १३६ .... ४८,२८५
क. १४४ ... २०८,२१०,२८५
क. १४५ .... .... २०९
क. १५० (ब) (फ) २८१,२८५
क. १५३ ... १०४,२८१
क. १५९ ... ... २८५
क. १६२. २९,४७,२१०,२८९
क. २०३ ... ... १५५
४५ क. २११... १५४,२१३
लँ. रे. क. २१४ खालील नियम कोणते लागू ... ... ३१९
लँड ॲक्वीझीशन आक्ट ... २९५

लागवड न केलेली जमीन ... २९५
लागवडींत फेरबदल, परिणाम... २६०
लियन ... ... ११४
लेख–कबुलीचा ... ... १४१
  खातेदारांस हक्क दिल्याचा... ११७
  संमतीचा ... ... ८८
लेणीं... ... ... प्र.१
लोकलफंड आकारणी ... २७४
लोकलफंड व मोबदला किंमत.. २७०
लोकहित व जंगल .... २९२,२९४
वकील देणें ... ... १६९
वतन आक्ट ... ४९,२६१
वर्तोळा ... ... २७२
वरिष्ठ धारण करणारा ११,२१७;
वर्ग—
  आपसांतील वर्ग... ... ११३
  एकसाली कूळ व ७८; एस्टॉपेल.९७
  कबजे गहाणखत ... ८६
  कुलाबा जिल्ह्यांतील ... १०३
  कोर्टमार्फत विक्री ...८७,९०
  खरेदीखत ८६; खातेदार कूळ व ८५
  झाडें व ३०५; तारण गहाणखत ८७
  परिणाम...६६; बेकायदा....८६,९२
  बोटखतांतील शेरा ... ६६
  राजिनामा ... ८७,१०९
  रेसजुडिकेटा ... ... ९५
  लँ. रे. कोड कलम ७३ व ... २७९
  विरुद्ध कबजा... ...६१,९६
वर्गाधिकाराबाबद नोंद ... १७२
वसलेवार अगर गुणाकार बुक... ...
  १४२,३३२
वहिवाटदार खोत-—
  अधिकार नाहीं अशा गोष्टी... २२४
  कर्तव्यें ... ... २०९
  कुळांची कबुलायत ... २५१
  खोती जमीन ... ... ११८
  जमेची जबाबदारी ... ... ४८
  थल ... ७०; नेमणुक २०७,२०८
  नेमणुकीचा दाखला... २१३,२१५,
  ३२१
  मदतदावा ... ... २२०
  व मुखत्यार ... ... २३३
  व विरुद्ध–कबजा ... २०५
  व स्वामित्व चिठी ... २३१
  वर्गास संमत्ती ... ९०,२२३
  वसुल करणें ... २१७,२१९
  वहिवाट करितां न आल्यास.. २०९
  स्वतंत्र खोत ... ... २१६
  हक्क व अधिकार... २०९,२१६
  होण्याचा हक्क ... ... २०४
वहिवाटीशिवाय राहिलेली जमीन ३१७
वांटणीवर्ख ... ... २२५
वांटप खोतकीचें–रीत ... २३४
वांटपाचा दावा ... ... २३५
वाडलाचा हक्क ... ... ८५
वारसानुक्रम ... ३४२,३४३
वारस तपास ... १४५,३३९
विक्री कोर्टमार्फत ...८७,९०
विगेट, ... २२,३५,प्र.१२
विपर्यास ... ... १५३
विरुद्ध-कबजा ... ....६१,९६
  एकसाली कूळ... ... ८२
  खातेदार कुळाचा ....६१,६२
  व झाडें ३०६; पाळीची यादी २२९
  वर्ग ९६; व हद्दीचा वाद... २८४
  वहिवाटदारीचा हक्क ... २०५
विस्तार खोती से. आक्टाचा... ७,८
वेठ ... ... ... २७२

व्यवहार—
१८६५ पूर्वीचे ... ६४
१८८० चे पूर्वीचे ... ९१
१९१२ च्या पूर्वीचे ... ९२
१९१२ नंतर ... ९३
शक्तीबाहेरील कारणें ... २६२
शहर... ... ... १७
शिरस्ता – व वर्गाधिकार ... ८८
शिवाजी ... ...प्र.२,३
शेतकरी, खोत ... ... ३०
शेंकडावळ ... ... २६१
सत्ताप्रकार नोंद ... ... १५३
सनदा... ... प्र.६,२९७
सनदा व मालकीहक्क ... २९६
सनवारी ... ... १४६
संमत्ती ... ८८,८९,९०,९१
सरनामा ... ... ६
सरकार ट्रस्टी नाहीं ... २८८
सरकारदस्त माफी ... २६३
सरकारदस्त व मोबदल्याची किं० २७०
सरकारसारा–सरकारचा अधिकार १३
सरकारविरुद्ध दावा. १९०,१९१
सरकारचा हक्क ... १३,११७,२००
सरकारी कामगार, खोत नव्हे ... २८९
सर्टिफिकेट–पेन्शन आक्ट ... ५१
सर्वे खातेदार ... ...५४,६०
सर्वेनंबर व खोती सेटलमेंट ... २८०
सर्वे रेकार्ड ... ... १४३
सर्वे सत्ताप्रकार ... ... ४२
सरासरी व थलीचा ठराव ... २५५
सरासरी व मोबदला-किंमत ... २६८
साधीं कुळें (एकसालीं कुळें पहा).
सामासिक टीप—उपयोग ... ३
साष्टी खोती ... प्र.३१,प्र.३२
साष्टीचा इतिहास ... प्र.३३
साष्टी–उत्पत्ती ... ... प्र.२९
सीमा (हद्द पहा.) ...१३७,२८५
सुधारणा व थलीची नोंद ... २५९
सड–कच्चा, पक्का व पहाणी १४२,१४३ ३३६
सूड कमीजास्ती (पेशवे पहाणी) ३३१
सूतिदार व त्याचे हक्क...प्र.३२,प्र.३३
सेटलमेंट— ... ... १९३
अभय मुदत ... ... २७६
मुदत ठरविणें व मंजुरी देणें ... १३,१४,१९३
१८६५ चा आ. १ प्रमाणें... १९३
सेटलमेंटचे कागद ... १४१
ग्राह्याग्राह्यता ... ... १३८
तावा ... ... १६१
सेटलमेंट पत्रक ..४३,१३०
सोडपत्र ... ... १०७
स्टांप आक्ट–आ. ४८ (ड.)... २३२
स्थावर मिळकत व झाडें ... ३०६
स्मॉलकॉझ दावा ... २२६
स्पेशलचे कागद ... १४४
स्वामित्व चिठी व वहिवाटदार.. २३१
हक्क—
खोतानें दिल्याचा दाखला... ३१७
खोतानें देणें ... ११५
प्राप्त झालेले ... ५
वहिवाटदारानें देणें ... २२४
हक्क नोंदणी पत्रक १४३,३३२
हक्कवाला खातेदार १५,३३,३४
हक्क स्थापनाचा दावा १३४,१७६
हद्द ... ... ... २८४
हद्दीचा वाद—
खातेदार नोंद ... ३१५

गांवच्या ... ... २८२
सर्वे नंबरच्या ... १३७,२८२
हद्दीचे दगड ... ... २८५
"ह" पत्रक ... ... १४४
हयगय ... ... १२१
हस्तदोष ... ... १६२
ह्यले यांचा रिपोर्ट ... ... प्र.८
हॅव्हलॉक चौकशी व रिपोर्ट ... प्र.२०
हिंदी बुंदी ... ... ४२
हिंदू वारसानुक्रम.... ... ३४२
हिशेबाचे जमाबंदी पहाणीचा नमुना... ३२६
हिशोबाचे कागद ... ... १२३
तपासण्याचा अधिकार ... १२६
हुकूम ... ... १७९
हुकूमनामा व निकाल ... १८८
क्षेत्रबुक ... १४२,३२८
नमुना ... ... ३२८


संपूर्ण.

व्यवहार—
१८६५ पूर्वीचे ... ६४
१८८० चे पूर्वीचे ... ९१
१९१२ च्या पूर्वीचे ... ९२
१९१२ नंतर ... ९३
शक्तीबाहेरील कारणें ... २६२
शहर... ... ... १७
शिरस्ता – व वर्गाधिकार ... ८८
शिवाजी ... ...प्र.२,३
शेतकरी, खोत ... ... ३०
शेंकडावळ ... ... २६१
सत्ताप्रकार नोंद ... ... १५३
सनदा... ... प्र.६,२९७
सनदा व मालकीहक्क ... २९६
सनवारी ... ... १४६
संमत्ती ... ८८,८९,९०,९१
सरनामा ... ... ६
सरकार ट्रस्टी नाहीं ... २८८
सरकारदस्त माफी ... २६३
सरकारदस्त व मोबदल्याची किं० २७०
सरकारसारा–सरकारचा अधिकार १३
सरकारविरुद्ध दावा. १९०,१९१
सरकारचा हक्क ... १३,११७,२००
सरकारी कामगार, खोत नव्हे ... २८९
सर्टिफिकेट–पेन्शन आक्ट ... ५१
सर्वे खातेदार ... ....५४,६०
सर्वेनंबर व खोती सेटलमेंट ... २८०
सर्वे रेकार्ड ... ... १४३
सर्वे सत्ताप्रकार ... ... ४२
सरासरी व थलीचा ठराव ... २५५
सरासरी व मोबदला-किंमत ... २६८
साधीं कुळें (एकसालीं कुळें पहा).
सामासिक टीप—उपयोग ... ३
साष्टी खेती ... प्र.३१,प्र.३२
साष्टीचा इतिहास ... प्र.३३
साष्टी–उत्पत्ती ... ... प्र.२९
सीमा (हद्द पहा.) ...१३७,२८५
सुधारणा व थलीची नोंद ... २५९
सड–कच्चा, पक्का व पहाणी १४२,१४३
३३६
सूड कमीजास्ती (पेशवे पहाणी) ३३१
सूतिदार व त्याचे हक्क...प्र.३२,प्र.३३
सेटलमेंट— ... ... १९३
अभय मुदत ... ... २७६
मुदत ठरविणें व मंजुरी देणें ...
१३,१४,१९३
१८६५ चा आ. १ प्रमाणें... १९३
सेटलमेंटचे कागद ... १४१
ग्राह्याग्राह्यता ... ... १३८
तावा ... ... १६१
सेटलमेंट पत्रक ..४३,१३०
सोडपत्र ... ... १०७
स्टांप आक्ट–आ. ४८ (ड.)... २३२
स्थावर मिळकत व झाडें ... ३०६
स्मॉलकॉझ दावा ... २२६
स्पेशलचे कागद ... १४४
स्वामित्व चिठी व वहिवाटदार.. २३१
हक्क—
खोतानें दिल्याचा दाखला... ३१७
खोतानें देणें ... ११५
प्राप्त झालेले ... ५
वहिवाटदारानें देणें ... २२४
हक्क नोंदणी पत्रक १४३,३३२
हक्काला खातेदार १५,३३,३४
हक्क स्थापनाचा दावा १३४,१७६
हद्द ... ... ... २८४
हद्दीचा वाद—
खातेदार नोंद ... ३१५

| | | | |
|---|---|---|---|
| गांवच्या ... | ... २८२ | हिंदू वारसानुक्रम.... | ... ३४२ |
| सर्वे नंबरच्या ... | १३७,२८२ | हिशेबाचे जमाबंदी पहाणीचा नमुना... | ३२६ |
| हद्दीचे दगड ... | ... २८५ | हिशोबाचे कागद ... | ... १२३ |
| "ह" पत्रक ... | ... १४४ | तपासण्याचा अधिकार | ... १२६ |
| हयगय ... | ... १२१ | हुकूम ... | ... १७९ |
| हस्तदोष ... | ... १६२ | हुकूमनामा व निकाल | ... १८८ |
| ह्यूले यांचा रिपोर्ट... | ... प्र.८ | क्षेत्रबुक ... | १४२,३२८ |
| हॅव्हलॉक चौकशी व रिपोर्ट | ... प्र.२० | नमुना ... | ... ३२८ |
| हिंदी बुंदी ... | ... ४२ | | |


---

संपूर्ण.

